महाराष्ट्र-साहित्य-परिषद्-इतिहास

वृत्तविभाग व साधनविभाग

सन १९८३
म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. नं. ३२२

महाराष्ट्र-साहित्य-परिषद् १९०६–१९४२ अखेर

आणि

महाराष्ट्र-साहित्य-संमेलनें १८७८–१९४१ अखेर

संपूर्ण व साधार इतिहास

लेखक : दत्तो वामन पोतदार


REFBK-0006414


प्रकाशक : महाराष्ट्र-साहित्य-परिषद्


—:o:—

इ. स. १९४३] किंमत तीन रुपये [शके १८६५

सन १९८३







आर्यसंस्कृति मुद्रणालय, चिमणबाग, टिळक रस्ता, पुणें, येथे लक्ष्मण नारायण चापेकर
यांनी छापिलें व पुणें येथे महाराष्ट्र-साहित्य-परिषदेच्या कार्यालयांत परिषदेकरिता
वामन मल्हार जोशी यांनी प्रसिद्ध केलें.

महाराष्ट्र-साहित्य-परिषद्-इतिहास

अनुक्रमणिका

प्रकाशकाचे प्रास्ताविक चार शब्द— अध्यक्ष म. सा. परिषद् पृ. १–२

भूमिका— संपादक पृ. ३ ते ८

अनुक्रमणिका पृ. १ ते ४

वृत्तविभाग पृष्ठें १–३७

प्रकरण पहिलें—
परिषदेचीं पहिलीं सहा वर्षें (१९०६–१९१२) पृ.१–२

प्रकरण दुसरें—
घटना झाली पण संघटना ? पृ.२–४

प्रकरण तिसरें—
वास्तुलाभ आणि कायापालट पृ.४–८

प्रकरण चौथें—
म. सा. परिषदेचें ग्रंथोत्तेजन आणि प्रकाशन पृ.८–११

प्रकरण पांचवें—
महाराष्ट्र साहित्य परिषद् आणि महाराष्ट्र साहित्य संमेलनें पृ.११–२२

प्रकरण सहावें—
कार्यकर्त्यांच्या सेवेचा परामर्श पृ.२२–

प्रकरण सातवें—
महाराष्ट्र साहित्य परिषदेचा व्याप आणि आकांक्षा पृ. –३३

प्रकरण आठवें—
समारोप पृ.३४–३७

साधनविभाग पृष्ठें १–१२८

(१) परिशिष्ट १ लें— १– २
१८७८ तील ग्रंथकारांचें पहिलें संमेलन, नोटिस– पृ. १
फाटककृत रानडेचरित्रांतील उतारा– पृ. १–२
[संदर्भ, परिशिष्ट १७]

(२) परिशिष्ट २ रें— २–११
१८८५ तील ग्रंथकारांचें दुसरें संमेलन— विनंतिपत्र (केसरी) पृ. २
—मराठी ग्रंथकार मंडळींची सभा पृ. ३–७
प्रोसीडिंग ग्रंथकारांची सभा पृ.७–९
— साभार निवेदन (संपादकीय) पृ.१०
पत्रकर्त्यांच्या स्फुट सूचना— केसरी– २६ मे १८८५ पृ. ११
[संदर्भ, परिशिष्ट १७]

(३) परिशिष्ट ३ रें— ११–१२
१९०५ मधील ग्रंथकारांचें तिसरें संमेलन– केसरी अंक, २३ मे १९०५ पृ. ११–१२
[संदर्भ, परि. १० वें व १६ वें].

(४) परिशिष्ट ४ थें— १२-१७
— मराठी ग्रंथकारांचें चौथें संमेलन
केसरी अंक २९ मे १९०६ इ.
पृ. १२-१७
[संदर्भ, परिशिष्ट ११]
(५) परिशिष्ट ५ वें— १८-१९
—मराठी ग्रंथकारांचें पांचवें संमेलन
केसरी अं.२१ माहे मे सन १९०७ इ.
पृ. १८-१९
(६) परिशिष्ट ६ वें— १९-२९
— मराठी ग्रंथकारांचें सहावें संमेलन
(केसरी- चिटणीस, म. सा. परिषद् यांचें विनंतिपत्र) मराठी लेखकांचें संमेलन
पृ. १९-२०
— (वरील संमेलनाचा वृत्तान्त)—
मराठी ग्रंथकारांचें चौथें संमेलन
केसरी अंक ता. २ माहे जून सन १९०८ इ.
पृ. २१-२९
(७) परिशिष्ट ७ वें— २९-३४
महाराष्ट्र साहित्य-संमेलनें १९०९ ते १९४० विहंगमावलोकन (संपादक)
पृ. २९-३४
(८) परिशिष्ट ८ वें— तक्ता.
महाराष्ट्र-साहित्य-संमेलनें— अधिवेशनांची शकावली (तक्ता) -संपादकीय-
परिशिष्ट ८ वें पुरवणी—
पुरवणी (मागील बाजू)
[संदर्भ, परि. ३,१०,१६,१७]
(९) परिशिष्ट ९ वें— ३४-७९
महाराष्ट्र-साहित्य-संमेलनांतील वर्गीकृत ठराव क्र. १-२८९ अखेर
खुलासा पृ. क्र. ७७-७९
[संदर्भ, परि. १८ व २४]
(१०) परिशिष्ट १० वें— ७९-८१
१९०५ मधील सातारा येथील संमेलन
[संदर्भ, परिशिष्ट ३,१६]
(११) परिशिष्ट ११ वें— ८१-८३
(केसरी, ता.१० जुलै सन १९०६)
महाराष्ट्र साहित्य परिषद् (विनंतिपत्र)
[संदर्भ, परिशिष्ट ४]
(१२) परिशिष्ट १२ वें— ८३-८५
संमेलन-नामकरण आणि वर्षगणन
[संदर्भ, परिशिष्ट १७]
(१३) परिशिष्ट १३ वें— ८५-८७
परिषदेचें निधिपत्र (ट्रस्ट डीड)
(१४) परिशिष्ट १४ वें— ८८-९१
परिषदेच्या इमारत जामेचा भाडेपट्टा
(१५) परिशिष्ट १५ वें— ९२
महाराष्ट्र साहित्य परिषद्
इ. स. १९४०-४१
शाखासभा- संलग्न संस्था
(१६) परिशिष्ट १६ वें— ९३-९४
पुनः सातारा संमेलन
[संदर्भ, परि. ३ व १०]
(१७) परिशिष्ट १७ वें ९४-९६
मराठी ग्रंथोत्तेजक मंडळी आणि महाराष्ट्र साहित्य संमेलनें
[संदर्भ, परि. १, २, ८ व १२]
(१८) परिशिष्ट १८ वें— ९६-१०९
वर्गीकृत ठराव (२९०-३५५)
[संदर्भ, परिशिष्ट ९ व २४]
(१९) परिशिष्ट १९ वें— १०९-११२
म. सा. परिषदेचे पदाधिकारी
(२०) परिशिष्ट २० वें— ११३-११५
म. सा. परिषद्- सभासद
(सालवार गटवार कोष्टक)
(२१) परिशिष्ट २१ वें— ११६
महाराष्ट्र साहित्य परिषद् शकावलि
(२२) परिशिष्ट २२ वें— ११७-१२०
विविध समित्या
(२३) परिशिष्ट २३ वें— १२१-१२५
महाराष्ट्र साहित्य परिषद्-
आर्थिक परिस्थिति
(२४) परिशिष्ट २४ वें— १२५-१२६

वर्गीकृत ठराव (३५६-३६१) [संदर्भ, परिशिष्ट ९ व १८]
(२५) परिशिष्ट २५ वें— १२६-१२७
माधवराव पटवर्धन स्मारक समिति
(२६) परिशिष्ट २६ वें— १२८
संदर्भ–साहित्य

परिशिष्ट ९।१८ व २४ मधील वर्गीकृत संमेलन–ठरावांचे विषयविभाग

[ ] या कंसांतील आंकडा हा त्या समोरील विषयविभागाच्या खुणेचा आंकडा समजावा.

[१] महाराष्ट्र-साहित्य-परिषद्
परि. ९, ठराव क्रमांक १ ते २४
पृ.३४–३८
ठ. क्र. २६९-२७३ पृ.७५
परि. १८ ठ. क्र. २९०-२९३
पृ. ९६-९७
परि. २४ ठ. क्र. ३५६ पृ.१२५

[२] महाराष्ट्र विद्यापीठ
परि. ९ ठराव क्र. २५–३५
पृ. ३८-४०
परि. १८ ठ. क्र. २९४-२९७
पृ. ९७-९८

[३] डाकेबाबत सवलती, सक्कारी इ.
परि. ९ ठराव क्र. ३६–४१
पृ. ४०–४१

[४] नभोवाणी व चित्रपट
परि. ९ ठराव क्र. ४२–४५
पृ. ४१–४२
परि. १८ ठ. क्र. २९८-३०१
पृ. ९८-९९

[५] लिपि (मोडी नागरी) आणि व्याकरण व शुद्धलेखन
परि. ९ ठराव क्र. ४६ ते ७५
पृ. क्र. ४२ ते ४६
ठ. क्र. २७४
पृ. ७५
परि. १८ ठ. क्र. ३०२-३०६
पृ. ९९-१००

[६] शिक्षण–अभ्यासक्रम–बोधभाषा-विषयक
परि. ९ ठराव क्र. ७६ ते ११७
पृ. क्र. ४६ ते ५२
ठ. क्र. २७५–२७७
पृ. ७५–७६
परि. १८ ठ. क्र. ३०७-३१३
पृ. १००
परि. २४ ठ. क्र. ३५७ पृ.१२५

[७] परिभाषा व कोश
परि.९ ठराव क्र.११८ ते १२३
पृ. क्र. ५२
परि. १८ ठ. क्र. ३१४-३१७
पृ. १०१

[८] आक्षिप्त वाङ्मय व अन्याय-निर्बंधनिवारण
परि. ९ ठराव क्र. १२४–१५५
पृ. क्र. ५२–५८
ठ. क्र. २७८–२७९
पृ. ७६
परि. १८ ठ. क्र. ३१८-३२६
पृ. १०१-१०२
परि. २४ ठ. क्र. ३५८ पृ.१२५

[९] अश्लील–निषेध
परि. ९ ठराव क्र. १५६–१५९
पृ. क्र. ५८
परि. १८ ठ. क्र.३२७ पृ.१०३

[१०] मराठी भाषा–विद्योत्तेजन
परि. ९ ठराव क्र. १६०–१८०
पृ. क्र. ५९–६२
परि. १८ ठ. क्र. ३२८–३३१
पृ. १०३
परि. १४ ठ. क्र. ३५९ पृ.१२६

[११] दुर्मिळ-ग्रंथ-पुनर्मुद्रण
परि. ९ ठराव क्र. १८१-१८३
पृ. ६२

[१२] भाषांतर
परि. ९ ठराव क्र. १८४-१८८
पृ. क्र. ६२-६३

[१३] बाल-वाङ्मय
परि. ९ ठराव क्र. १८९-१९३
पृ. क्र. ६३
परि. १८ ठ.क्र. ३३२ पृ.१०४

[१४] परीक्षण-समालोचन
परि. ९ ठराव क्र. १९४-१९७
पृ. क्र. ६३-६४
परि. १८ ठ. क्र. ३३३-३३४
पृ. १०४

[१५] वाङ्मयिक आकांक्षा
परि. ९ ठराव क्र. १९८-२०४
पृ. क्र. ६४-६५
ठ. क्र. २८०-२८४
पृ. ७६-७७
परि. १८ ठ. क्र. ३३५-३३८
पृ. १०४-१०५

[१६] ग्रंथालय-वाचनालयें
परि. ९ ठराव क्र. २०५-२१५
पृ. क्र. ६५-६६
परि. १८ ठ.क्र. ३३९ पृ.१०५

[१७] भाषावार विभागणी आणि शिरगणती
परि. ९ ठराव क्र. २१६-२२३
पृ. क्र. ६६-६८
परि. १८ ठ. क्र. ३४०-३४२
पृ. १०५-१०६

[१८] महाराष्ट्र शारदामंडळ आणि भारतीय साहित्यपरिषद्
परि. ९ ठराव क्र. २२४-२२७
पृ. क्र. ६८-६९
ठ. क्र. २८५
पृ. ७७
परि. १८ ठ.क्र. ३४३ पृ.१०६

[१९] विविध
परि. ९ ठराव क्र. २२८-२४४
पृ. क्र. ६९-७१
ठ. क्र. २८६-२८७
पृ. ७७
परि. १८ ठ. क्र. ३४४-३५१
पृ. १०६-१०८
परि. २४ ठ. क्र. ३६० पृ. १२६

[२०] गौरव-बहुमान
परि. ९ ठराव क्र. २४५-२४७
पृ. क्र. ७१-७२
परि. १८ ठ.क्र. ३५२ पृ.१०८

[२१] प्रार्थना-आभार-अभिनंदन-संतोष
परि. ९ ठराव क्र. २४८-२५६
पृ. क्र. ७२-७४
ठ. क्र. २८८-२८९
पृ. ७७
परि. २४ ठ. क्र. ३६१ पृ.१२६

[२२] संमेलन-निमंत्रण
परि. ९ ठराव क्र. २६६-२६८
पृ. क्र. ७४-७५
परि. १८ ठ. क्र. ३५३-३५५
पृ. १०८-१०९

साधनविभाग— परिशिष्टें १-२६ (पृष्ठें १-१२८)

*परिषद् विषयक परिशिष्टें :— परिशिष्टें १३।१४।१५।१९।२०।२१।२२।२३। २५ व २६**.

†संमेलन विषयक परिशिष्टें :— परिशिष्टें १ ते १२ आणि १६।१७।१८ व २४ व २६**.

*पृष्ठें एकूण २४. †पृष्ठें एकूण १०२. **उभयविध एकूण पृष्ठें २.



श्रीमंत महाराज सवाअी तुकोजीराव होळकर, इंदूर

यांनी

दिलेल्या **दहा हजार** रुपयांच्या देणगीमुळे म. सा. परिषदेला
आपला स्थिरनिधि स्थापन करतां आला.



श्रीमंत मेजर राजे सर मालोजीराव नाईक निंबाळकर, राजा ऑफ् फलटण,

यांनी

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या 'माधवराव पटवर्धन साहित्य मंदिरा'च्या
कार्यासाठी अेकूण साडेतीन हजार रुपयांची देणगी
अुदारपणें दिली आहे.

प्रकाशकाचे प्रास्ताविक चार शब्द

महाराष्ट्र-साहित्य-परिषदेपुढे व महाराष्ट्र-साहित्य-संमेलनापुढे विचाराकरिता जे प्रश्न येत होते आणि येतात त्यांपैकी कांहींना अितिहास असतो. शिवाय खुद्द परिषद् व संमेलन यांचेच संबंध काय आहेत किंवा असावेत याविषयीच चर्चा सुरू झाल्यास या प्रश्नालाहि अितिहास आहे हें ध्यानांत येत असे. या अितिहासांतील घटनांची चांगली माहिती असली तर चर्चा सरळ आणि सुफलदायी होण्याचा संभव अधिक, अशा प्रकारच्या कल्पना पुष्कळ वर्षांपासून साहित्यिकांच्या मनांत वावरत होत्या. या कल्पनांना चालना १९३४ सालीं बडोदें येथील संमेलनाने अेक ठराव पास करून दिली. या ठरावांतील शब्दांत संमेलनाच्या अितिहासाविषयी विशेष औत्सुक्य दिसत असलें तरी संमेलन व परिषद् या दोहींचा अितिहास विवक्षित असावा, कारण या दोहींचा संबंध तसाच निकट आणि जिव्हाळ्याचा आहे.

महाराष्ट्र-साहित्य-परिषदेने असा अितिहास लिहवून घेण्याचें ठरवून तें काम प्रो. दत्तोपंत पोतदार यांचेकडे सोपविलें. प्रो. पोतदार यांना स्वतःचीं, अितिहास-संशोधक-मंडळाचीं व अितर संस्थांचीं कामें अनेक असलीं तरी त्यांतल्या त्यांत वेळ काढून त्यांनी हें काम दीड वर्षापूर्वी बव्हंशी पुरें केलें, तथापि अनेक कारणांमुळे पुस्तक प्रकाशित होण्यास कालावधि लागला. त्यांतल्यात्यांत समाधानाची गोष्ट अशी की पुष्कळ कालावधीने का होईना, हें पुस्तक-प्रकरण हातावेगळें करण्याचें भाग्य आज मला लाभत आहे.

या पुस्तकांत प्रो. पोतदार यांनी जी माहिती दिली आहे ती त्यांनी मोठ्या साक्षेपाने आणि परिश्रमाने मिळविलेली आहे. आधाराशिवाय कांही लिहिणार नाही (**"नामूलं लिख्यते किंचित्"**) असा मल्लिनाथाप्रमाणे त्यांचा बाणा आहे. मतें मांडतांनादेखील त्यांनी शक्य तेवढा समतोलपणा आणि निःपक्षपातीपणा दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. माहिती मिळविण्याचें सर्व श्रेय प्रो. पोतदारांकडे आहे आणि मतांची सगळी जबाबदारी त्यांच्याकडेच आहे. परिषदेच्या कार्यकारी मंडळाकरिता मी हें पुस्तक प्रकाशित करीत असल्यामुळे मला अेक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. आणि ती ही की या पुस्तकांतील यच्चयावत् सर्व माहिती अगदी निर्चूक आहे, त्यांत यत्किंचित् क्षुणीव नाही किंवा चूक नाही, असा आग्रह मी किंवा कार्यकारी मंडळांतील कोणीहि सभासद धरूं शकत नाही. फार काय, खुद्द प्रो. पोतदारांना कांही ठिकाणीं माहिती जितकी पुरेपूर पाहिजे होती तेवढी त्यांना मिळालेली नाही व मिळत नाही म्हणून हळहळ वाटत आहे. तसेंच, दिलेल्या माहितींत अेखाददेखील लहानशी चूक होणें-असणें शक्य कोटींतलेंच नाही असें ते देखील म्हणणार नाहीत. पहिलें संमेलन कोणतें समजावें या संबंधाने त्यांनी जी हकिकत दिली आहे ती वाचून थोडाबहुत मौजेचा वाद अुत्पन्न होण्यासारखा आहे तसा अितर बाबतीतहि असूं शकेल (परि. १७). दिलेल्या माहितीपेक्षा प्रदर्शित केलेलीं मतें हीं वादाला कारणीभूत होण्याचा अधिक संभव असतो. कोणाच्या स्तुतिपर अुल्लेखांत अेखादा शब्द जरा कमी पडला किंवा अधिकच पडला; कोणावर न्यायनिष्ठुर टीका केली आहे तींत हा शब्द नसता तर बरें झालें असतें किंवा तो शब्द असता तर तें अधिक यथार्थ झालें असतें; येथे अतिशयोक्ति झाली आहे, तेथे अल्पोक्ति दिसते; अशा प्रकारची टीका– सदबुद्धीनेच केलेली टीका– कोणत्याहि ग्रंथावर होअूं शकते. प्रो. पोतदारांच्या या पुस्तकावरहि अशी टीका झाल्यास कार्यकारी मंडळाला किंवा मला फारसें आश्चर्य वाटणार नाही, कारण आम्हांला ठाअूक आहे की प्रो. पोतदारांनी काय किंवा दुसऱ्या कोणत्याहि अितिहासकारांनी काय, तटस्थ आणि निःपक्षपाती

राहण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी अेखाददुसऱ्या स्थळीं, अबुद्धिपुरःसर का होईना, न्याय-दोष अुत्पन्न होण्याचा संभव मनुष्यत्वांतच आहे, त्याला कोण काय करणार ?

मीं जर हा परिषद्-संमेलन-अितिहास लिहिला असता तर ज्या मंडळींबरोबर मी अलिकडे पुष्कळ वर्षें कार्याध्यक्ष म्हणून काम कलें आहे त्यांचा अुल्लेख अधिक विस्ताराने करण्याचा मला मोह झाला असता यांत शंकाच नाही. नानासाहेब चापेकर यांनी कार्याध्यक्ष व संपादक म्हणून जी अमोलिक कामगिरी केली ती माझ्या प्रत्यक्ष पाहण्यांतली असल्यामुळे तिचा मी साहजिकपणेंच अधिक विस्ताराने आणि आपुलकीने उल्लेख केला असता. रावसाहेब र. लु. जोशी यांच्यासारख्या खिश्चन मनुष्याने केवळ मराठी भाषेच्या अभिमानाने परिषदेकरिता आपुलकीने अितके परिश्रम घेतले त्यांचा माझ्या मनावर परिणाम झाल्याशिवाय कसा राहील ? तसेंच रा. विठ्ठलराव घाटे यांनी माधवराव पटवर्धन-साहित्य-मन्दिर अुभें करण्याच्या कामीं मित्रप्रेम व मातृप्रेम जें दाखविलें त्याचें कौतुक करावेंसें मला वाटलें असतें तर त्यांत अस्वाभाविक असें काय झालें असतें ? प्रिन्सिपल धनंजयराव गाडगीळ यांची पोक्त सल्लामसलत कार्यकारी समितीच्या बैठकींत अत्यंत अुपयोगी होत असे त्याचा कृतज्ञतापूर्वक गौरवयुक्त अुल्लेख केल्याशिवाय मला राहवलेंच नसतें. वैयक्तिक दृष्टि सोडून कार्याधिकारी या नात्याने पुस्तकाकडे पाहूं लागलों म्हणजे क्षणभर येअून जाणाऱ्या या विचारांअेवजी मनाचें धोरण निश्चित असें ठरतें की पुस्तकांतील मतें पोतदारांचीं, त्या मतांची सगळी जबाबदारी त्यांची, मग त्यांत मीं कशाला ढवळाढवळ करावी ? त्यांनी त्यांत कमीजास्त काय करावयास हवें होतें तें जग ठरवीलच; मी किंवा कार्यकारी मंडळाने यांत पडण्याचें कारण नाही.

प्रो. पोतदारांना धन्यवाद देण्याचें काम मात्र जगावर सोंपवितां येत नाही. तें कार्याधिकारी या नात्यानें मी करीत असतां मला मोठा आनंद होत आहे; अितका की या आनंदाच्या भरांत अेक दोन पॅरॅग्रॅफ त्यांच्या स्तुतिपर आता लिहून काढावेत असा मोह मला पडूं पाहत आहे. पण पोतदार आता असल्या स्तुतिपर अुल्लेखांच्या जरूरीच्या पलीकडे गेलेले आहेत. परिषद्-संमेलन-अितिहासाची सामग्री मिळवितांना व जुळवितांना, या अितिहासांतील घटनांचे कार्यकारणात्मक संबंध, साखळ्या व घड्या मनांत बसवितांना, अितिहासाची व प्रकरणांची रूपरेखा आंखतांना, या व्यासंगी अितिहासप्रेमी साहित्यभक्ताच्या अंतरात्म्याला जो सात्त्विक आनंद झाला असेल आणि याच्यांतच त्यांना जी मूक धन्यता वाटली असेल त्या धन्यतेच्या पुढे लोकांनी दिलेल्या शब्दात्मक धन्यवादाची किंमत त्याला काय ?

आर्यसंस्कृति मुद्रणालयाचे मालक रा. चापेकर यांचे आभार मानतांना माझ्यापुढे अेक मौजेचा प्रश्न अुत्पन्न झाला आहे. या पुस्तकाचीं बरींचशीं पानें कंपोज होअून दीडदोन वर्षें छापल्याशिवाय राहिलीं होतीं. अितका टाअीप अितके दिवस गुंतवून ठेवण्यास लावून त्यांच्या सहनशीलतेचा जणूं कांही अंतच पाहणारे जे आम्ही त्यांची तर धन्यच आहे, पण असल्या परिस्थितींतहि सहनशीलतेचा अंत दिसूं न देणारे जे चापेकर त्यांचीहि आमच्यापेक्षा धन्यच म्हटली पाहिजे ! हेच माझे 'धन्य'वाद ! असो. आपुलकीशिवाय असल्या मौजेच्या सत्त्वपरीक्षा होअूं शकत नाहीत आणि चालूं शकत नाहीत. ही आपुलकी अुभयपक्षी अखंड राहो अेवढीच अिच्छा.

पुणें ४,
ता. ३०।५।४३.

वा. म. जोशी
अध्यक्ष, म. सा. परिषद्.



भूमिका

म. सा. परिषदेच्या कार्याध्यक्षपदाची धुरा कांही अंशी आमच्या आग्रहावरून रावसा. ना. गो. चापेकर यांनी अ. स. १९२७ त पत्करली आणि मध्यें बंद पडलेलें परिषदेचें "मुखपत्र" म्हणजे 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' पुनरपि चालू करण्याचा जेव्हा त्यांनी निश्चय केला तेव्हा पहिल्याच अंकांत परिषदेचा मागील सर्व अतिहास लिहून देण्याचा तगादा त्यांनी आम्हांला केला. आम्हांला त्या विषयाचा अगोदरच थोडासा नाद होता; जात्याच आमचा संग्रही स्वभाव असल्यामुळे आम्हांला हें काम कांही अंशाने तरी पार पाडण्यास तो सहाय होईल असें मनांतून वाटतहि होतें. तथापि रावब. पाध्ये, प्रि. ज. र. घारपुरे, प्रो. पां. वा. काणे, सरवटे, बंदे इ.– परिषदेशीं बऱ्याच पूर्वकाळापासून संबद्ध असलेली अनुभवी व वृद्ध मंडळी किंवा आमचे मित्र प्रो. न. र. फाटक यांच्यासारखे तरुण परंतु चिकित्सक साहित्यगार आमच्यापेक्षाहि हें काम अधिक चांगलें करतील हें आम्ही जाणून होतों. तथापि रा. चापेकर यांस आपण ओढून आणून त्यांचे शिरीं भार दिला तेव्हा होईल तें साहाय्य त्यांस करणें आम्हांस प्राप्तच होतें!

असेच दिवसांमागे दिवस आणि वर्षांमागे वर्षें गेलीं! परिषदेच्या नव्या मांडणीला जुना अतिहास वारंवार लागूं लागला. जिज्ञासू पृच्छकांची संख्या प्रत्यही वाढूं लागली. आणि अखेर बडोदें संमेलनांत साहित्यसंमेलनांचा अेकत्र आणि सुसंगत अतिहास परिषदेने लिहून घेऊन प्रसिद्ध करावा अशा अर्थाचा ठरावहि सन १९३४ त मंजूर झाला (वर्गीकृत ठराव क्रमांक २३९) आणि म. सा. परिषदेच्या कार्यकारी मंडळाने आमची योजना त्या कामावर केली.

त्याप्रमाणे कामगिरीला हात घातला. १९०६।७।८ चीं पुण्यांतील संमेलनें विद्यार्थी म्हणून आम्हीं औत्सुक्यतेने आणि लक्ष्यपूर्वक पाहिलेलीं होतीं आणि अ. स. १९१५ पासून तों आजतागायत संमेलनाची आमची अेकहि वारी चुकलेली नाही! संमेलनाच्या संबंधानें पाहतां अ. स. १९०९ पासूनच्या प्रत्येक संमेलनाचे स्वतंत्र अहवाल पुस्तकरूपाने उपलब्ध आहेत. त्यांचा संग्रह आम्हीं बऱ्याच खटपटीने स्वतः केलेला आहे! १९०९ सालच्या बडोदें संमेलनाची हकीकत हाच संमेलनाचा पहिला छापील ग्रंथरूप वृत्तान्त. यापूर्वी जीं संमेलनें भरलीं त्यांचे अहवाल त्या त्या वेळीं वृत्तपत्रांतून आले तेवढेच. त्या म्हणजे १९०५ ते ८ या सालांतील संमेलनाचे अहवाल स्वतंत्र पुस्तकरूपाने कधी प्रसिद्ध करण्यांत आले नव्हते.

१९०५ मधील संमेलनाच्याहि पूर्वी महर्षि न्या.मू. रानडे यांच्या प्रेरणेने दोन– आतां तीन समजलीं पाहिजेत– संमेलनें भरल्याचें आम्हांला अवगत झालें होतें. परंतु या संमेलनांची हकीकत कशी व कोठे पाहावयास मिळणार ही चिंता होती. त्या वेळचीं वृत्तपत्रें कोठे मिळणार! त्या वेळचीं माणसें तरी कोठे भेटणार! यासाठी जुन्या वृद्ध साहीतगारांच्या गांठी-भेटी घ्यावयास पाहिजेत, पेंडसे, रानडे, करंदीकर, खापर्डे यांच्यासारख्यांच्या रोजनिशा तपासावयास मिळाल्या तर प्रयत्न केला पाहिजे, सरकारी दप्तरांतहि डोकावलें पाहिजे, तत्कालीन साक्षेपी मंडळींचे पत्रव्यवहार मिळविण्याची खटपट केली पाहिजे, बाअी, पुणें, मुंबअी, ठाणें वगैरे स्थळीं तसेंच दूरवरच्या मराठी संस्थानांतूनहि जुने ग्रंथसंग्रह धांडोळले पाहिजेत, आणि तत्कालीन मासिकें, वृत्तपत्रें, पत्रकें अित्यादि मिळाल्यास शोध केला पाहिजे. तसेंच या इतिहास-ग्रंथांत जुन्या जुन्या मंडळींचीं चित्रें द्यावयास मिळालीं तर तो प्रयत्न केला पाहिजे. यासाठी पत्रव्यवहार व प्रवासहि

राहण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी अखादद्सऱ्या स्थळीं, अबुद्धिपुरःसर का होईना, न्याय-दोष उत्पन्न होण्याचा संभव मनुष्यत्वांतच आहे, त्याला कोण काय करणार ?

मी जर हा परिषद्-संमेलन-अितिहास लिहिला असता तर ज्या मंडळींबरोबर मी अलिकडे पुष्कळ वर्षें कार्याध्यक्ष म्हणून काम कलें आहे त्यांचा अुल्लेख अधिक विस्ताराने करण्याचा मला मोह झाला असता यांत शंकाच नाही. नानासाहेब चापेकर यांनी कार्याध्यक्ष व संपादक म्हणून जी अमोलिक कामगिरी केली ती माझ्या प्रत्यक्ष पाहण्यांतली असल्यामुळे तिचा मी साहजिकपणेंच अधिक विस्ताराने आणि आपुलकीने उल्लेख केला असता. रावसाहेब र. लु. जोशी यांच्यासारख्या खिश्चन मनुष्याने केवळ मराठी भाषेच्या अभिमानाने परिषदेकरिता आपुलकीने अितके परिश्रम घेतले त्यांचा माझ्या मनावर परिणाम झाल्याशिवाय कसा राहील ? तसेंच रा. विठ्ठलराव घाटे यांनी माधवराव पटवर्धन-साहित्य-मन्दिर अुभें करण्याच्या कामीं मित्रप्रेम व भाषाप्रेम जें दाखविलें त्याचें कौतुक करावेंसें मला वाटलें असतें तर त्यांत अस्वाभाविक असें काय झालें असतें ? प्रिन्सिपल धनंजयराव गाडगीळ यांची पोक्त सल्लामसलत कार्यकारी समितीच्या बैठकींत अत्यंत अुपयोगी होत असे त्याचा कृतज्ञतापूर्वक गौरवयुक्त अुल्लेख केल्याशिवाय मला राहवलेंच नसतें. वैयक्तिक दृष्टि सोडून कार्याधिकारी या नात्याने पुस्तकाकडे पाहूं लागलों म्हणजे क्षणभर येअून जाणाऱ्या या विचारांअैवजी मनाचें धोरण निश्चित असें ठरतें की पुस्तकांतील मतें पोतदारांचीं, त्या मतांची सगळी जबाबदारी त्यांची, मग त्यांत मी कशाला ढवळाढवळ करावी ? त्यांनी त्यांत कमीजास्त काय करावयास हवें होतें तें जग ठरवीलच; मी किंवा कार्यकारी मंडळाने यांत पडण्याचें कारण नाही.

प्रो. पोतदारांना धन्यवाद देण्याचें काम मात्र जगावर सोंपवितां येत नाही. तें कार्याधिकारी या नात्यानें मी करीत असतां मला मोठा आनंद होत आहे; अितका की या आनंदाच्या भरांत अेक दोन पॅरॅग्रॅफ त्यांच्या स्तुतिपर आता लिहून काढावेत असा मोह मला पडूं पाहत आहे. पण पोतदार आता असल्या स्तुतिपर अुल्लेखांच्या जरूरीच्या पलीकडे गेलेले आहेत. परिषद्-संमेलन-अितिहासाची सामग्री मिळवितांना व जुळवितांना, या अितिहासांतील घटनांचे कार्यकारणात्मक संबंध, साखळया व घड्या मनांत बसवितांना, अितिहासाची व प्रकरणांची रूपरेखा आंखतांना, या व्यासंगी अितिहासप्रेमी साहित्यभक्ताच्या अंतरात्म्याला जो सात्त्विक आनंद झाला असेल आणि याच्यांतच त्यांना जी मूक धन्यता वाटली असेल त्या धन्यतेच्या पुढे लोकांनी दिलेल्या शब्दात्मक धन्यवादाची किंमत त्याला काय ?

आर्यसंस्कृति मुद्रणालयाचे मालक रा. चापेकर यांचे आभार मानतांना माझ्यापुढे अेक मौजेचा प्रश्न अुत्पन्न झाला आहे. या पुस्तकाचीं बरींचशीं पानें कंपोज होअून दीडदोन वर्षें छापल्याशिवाय राहिलीं होतीं. अितका टाअीप अितके दिवस गुंतवून ठेवण्यास लावून त्यांच्या सहनशीलतेचा जणूं कांही अंतच पाहणारे जे आम्ही त्यांची तर धन्यच आहे, पण असल्या परिस्थितींतहि सहनशीलतेचा अंत दिसूं न देणारे जे चापेकर त्यांचीहि आमच्यापेक्षा धन्यच म्हटली पाहिजे ! हेच माझे 'धन्य'वाद ! असो. आपुलकीशिवाय असल्या मौजेच्या सत्त्वपरीक्षा होअूं शकत नाहीत आणि चालूं शकत नाहीत. ही आपुलकी अुभयपक्षीं अखंड राहो अेवढीच अिच्छा.

पुणें ४.
ता. ३०।५।४३.

वा. म. जोशी
अध्यक्ष, म. सा. परिषद्.



भूमिका

म. सा. परिषदेच्या कार्याध्यक्षपदाची धुरा कांही अंशी आमच्या आग्रहावरून रावसा. ना. गो. चापेकर यांनी अि. स. १९२७ त पत्करली आणि मध्यें बंद पडलेलें परिषदेचें "मुखपत्र" म्हणजे 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' पुनरपि चालू करण्याचा जेव्हा त्यांनी निश्चय केला तेव्हा पहिल्याच अंकांत परिषदेचा मागील सर्व अितिहास लिहून देण्याचा तगादा त्यांनी आम्हांला केला. आम्हांला त्या विषयाचा अगोदरच थोडासा नाद होता; जात्याच आमचा संग्रही स्वभाव असल्यामुळे आम्हांला हें काम कांही अंशाने तरी पार पाडण्यास तो सहाय होअील असें मनांतून वाटतहि होतें. तथापि रावब. पाध्ये, प्रि. ज. र. घारपुरे, प्रो. पां. वा. काणे, सरवटे, बंदे इ.– परिषदेशीं बऱ्याच पूर्वकाळापासून संबद्ध असलेली अनुभवी व वृद्ध मंडळी किंवा आमचे मित्र प्रो. न. र. फाटक यांच्यासारखे तरुण परंतु चिकित्सक साहित्यगार आमच्यापेक्षाहि हें काम अधिक चांगलें करतील हें आम्ही जाणून होतों. तथापि रा. चापेकर यांस आपण ओढून आणून त्यांचे शिरीं भार दिला तेव्हा होअील तें साहाय्य त्यांस करणें आम्हांस प्राप्तच होतें !

असेच दिवसांमागे दिवस आणि वर्षांमागे वर्षें गेलीं ! परिषदेच्या नव्या मांडणीला जुना अितिहास वारंवार लागूं लागला. जिज्ञासू पृच्छकांची संख्या प्रत्येही वाढूं लागली. आणि अखेर बडोदें संमेलनांत साहित्यसंमेलनांचा अेकत्र आणि सुसंगत अितिहास परिषदेने लिहून घेऊन प्रसिद्ध करावा अशा अर्थाचा ठरावहि सन १९३४ त मंजूर झाला (वर्गीकृत ठराव क्रमांक २३९) आणि म. सा. परिषदेच्या कार्यकारी मंडळाने आमची योजना त्या कामावर केली.

त्याप्रमाणे कामगिरीला हात घातला. १९०६।७।८ चीं पुण्यांतील संमेलनें विद्यार्थी म्हणून आम्हीं अुत्सुकतेने आणि लक्ष्यपूर्वक पाहिलेलीं होतीं आणि अि. स. १९१५ पासून तों आजतागायत संमेलनाची आमची अेकहि वारी चुकलेली नाही ! संमेलनाच्या संबंधानें पाहतां अि. स. १९०९ पासूनच्या प्रत्येक संमेलनाचे स्वतंत्र अहवाल पुस्तकरूपाने अुपलब्ध आहेत. त्यांचा संग्रह आम्हीं बऱ्याच खटपटीने स्वतः केलेला आहे ! १९०९ सालच्या बडोदें संमेलनाची हकीकत हाच संमेलनाचा पहिला छापील ग्रंथरूप वृत्तान्त. यापूर्वी जीं संमेलनें भरलीं त्यांचे अहवाल त्या त्या वेळीं वृत्तपत्रांतून आले तेवढेच. त्या म्हणजे १९०५ ते ८ या सालांतील संमेलनाचे अहवाल स्वतंत्र पुस्तकरूपाने कधी प्रसिद्ध करण्यांत आले नव्हते.

१९०५ मधील संमेलनाच्याहि पूर्वी महर्षि न्या.मू. रानडे यांच्या प्रेरणेने दोन– आतां तीन समजलीं पाहिजेत– संमेलनें भरल्याचें आम्हांला अवगत झालें होतें. परंतु या संमेलनांची हकीकत कशी व कोठे पाहावयास मिळणार ही चिंता होती. त्या वेळचीं वृत्तपत्रें कोठे मिळणार ! त्या वेळचीं माणसें तरी कोठे भेटणार ! यासाठी जुन्या वृद्ध माहीतगारांच्या गांठी-भेटी घ्यावयास पाहिजेत, पेंडसे, रानडे, करंदीकर, खापर्डे यांच्यासारख्यांच्या रोजनिशा तपासावयास मिळाल्या तर प्रयत्न केला पाहिजे, सरकारी दप्तरांतहि डोकावलें पाहिजे, तत्कालीन साक्षेपी मंडळीचे पत्रव्यवहार मिळविण्याची खटपट केली पाहिजे, बाअी, पुणें, सुबअी, ठाणें वगैरे स्थळीं तसेंच दूरवरच्या मराठी संस्थानांतूनहि जुने ग्रंथसंग्रह धांडोळले पाहिजेत, आणि तत्कालीन मासिकें, वृत्तपत्रें, पत्रकें अित्यादि मिळाल्यास शोध केला पाहिजे. तसेंच या इतिहास-ग्रंथांत जुन्या जुन्या मंडळींचीं चित्रें द्यावयास मिळालीं तर तो प्रयत्न केला पाहिजे. यासाठी पत्रव्यवहार व प्रवासहि

पुष्कळ केला पाहिजे. असा दीर्घ प्रयत्न करावा तेव्हा विश्वसनीय व सर्वांगीण इतिहास सिद्ध होण्याचा संभव होता. म. सा. परिषदेने या ग्रंथासाठी मंजूर केलेल्या २०० रुपयांत हें कसें आटपणार ! ग्रंथ हप्त्याहप्त्याने म. सा. पत्रिकेंत छापावा असा एक विचार त्या वेळचा होता. एखादा माणूसहि अुतारे वगैरेसाठी मदतीस घेणें अवश्य होतें. आमचें म्हणणें आम्हीं परिषदेच्या चालकांना कळविलें. चित्रांचा विचार मागाहून करावा, दूरवरचा प्रवास आणि वर लिहिलेल्या पद्धतीने करावयाच्या दीर्घ प्रयत्नांसाठी खर्चाची मंजुरी देणें परिषदेच्या आवाक्याबाहेरचें होतें. संमेलनें ठराव करितात परंतु अंमलबजावणीसाठी लागणाऱ्या द्रव्याची भरपूर तरतूद त्यांजकडून होण्याची बहुशः वानवा असते ! तेव्हा जुळेल तेवढीच खटपट करावी असें ठरवून अेकें पत्रक प्रसिद्ध केलें. खाजगी पत्रेंहि लिहिलीं. फळ अेवढेंच निष्पन्न झालें की कांही फोटो हातीं आले. कै. माधवराव पटवर्धन यांनी पुणें संमेलनाच्या वेळचा अेक दुर्मिळ फोटो पाठविला. हा व आणखी त्याच्या जोडीचा दुसरा असे दोन फोटो पूर्वी 'ज्ञानप्रकाशां'त प्रसिद्ध झाले असून दुसऱ्याची छापील प्रत आमच्या संग्रहीं अद्यापिहि आहे.

दुसरा प्रश्न समोर असा अुभा राहिला की, संमेलनांचा अितिहास समजण्यास कांही साधनें तरी आहेत पण संमेलनें भरविण्याची खटपट आणि जबाबदारी होती म. सा. परिषदेच्या अंगावर ! आणि तिच्याविषयींचें सविस्तर व सुसंगत वृत्त कधीच कोठे छापलेलें अथवा लिहिलेलेंहि नव्हतें. संमेलनें कांही आपोआप थोडींच भरतात ! कोणी तरी चार अुत्साही व कळकळीचीं खटपटी माणसें आधी अेकत्र जुळतात, अेकत्र मनसुबा करतात तेव्हा पुढील सोहोळा अुभा राहतो. पडद्यामागे हीं डोकींच असतात ! १८७८ ते ८५ या सालांत रानडे हे या सर्व खटपटीच्या मुळाशीं होते. वा. वा. ठाकूर यांना कै. गोपाळ मोरेश्वर साठे यांनी दोन पत्रें दाखविलीं; "मराठी साहित्य परिषदेच्या अुपक्रमाची कल्पना या पत्रांत आहे" असें रा. ठाकूर लिहितात (पहा वि. ज्ञा. विस्तार सन १९१३ पृ. ४९). म्हणजे साहित्य परिषदेच्या कल्पनेचें मूळहि रानड्यांना जाअून भिडलें. ज्या मंडळींनी १९०५ सालापासून अुचल करून साहित्यसंमेलनें अुभीं केलीं तीच मंडळी साहित्य-परिषद् नांव धारण करून पुढे आली. पण जर या मंडळींना बाहेरच्या मंडळींचीं मतें काबीज करण्याचें कौशल्य प्रगट करतां आलें नसतें तर ही परिषद् तेथेच गाभाटली असती ! याप्रमाणे परिषद् आणि संमेलन अन्योन्याश्रयी आहेत. या प्रकरणीं रा. ब. महाजनींचे पुढील अुद्गार निःसंशय मननीय वाटतील. अकोला संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदावरून ते म्हणाले :— "कारखान्याची चालकशक्ति वाफेच्या यंत्रांत असते, तशी साहित्य-संमेलनाची चालकशक्ति साहित्य-परिषदेंत असते. वाफेचें यंत्र जसें साफसूफ करून अगदी दुरुस्त ठेवावें लागतें, त्यांत पाहिजे तितकी वाफ अुत्पन्न करण्याकरिता कोळसा व पाणी यांचा विपुल पुरवठा करावा लागतो तसाच साहित्य-परिषद् हेंहि यंत्र दुरुस्त, काम देणारें ठेवण्याकरिता त्यास द्रव्याचा विपुल नाही तरी पुरेसा पुरवठा करावा लागतो. या सत्याकडे सूचना करणाऱ्यांनी तसेंच सामान्य वाचकांनी, आतापर्यंत द्यावें तितकें लक्ष्य दिलें नाही अशी शंका येते." (अकोला रिपोर्ट पृ. ९,९२). अशा साहित्य-परिषदेचा अितिहास जर परिषदेने नाही करावयाचा तर कोणीं ! आणि साहित्य-संमेलनाला वगळून परिषदेचा यथार्थ अितिहास कसा लिहितां येणार ! अेकाच प्रेरणेचीं हीं जुळीं फळें आहेत. संमेलनें आणि परिषद् यांत अेकप्रकारचा अंगागिभाव आहे. परिषदेवर संमेलनें भरविण्याची जबाबदारी नियमानेच टाकलेली आहे. पहिलीं पहिलीं सर्वच व पुढीलहि

१ म. सा. पत्रिका, वर्ष ८।३ तळ पृ. ६६७, शके १८५७.

कांही संमेलनें स्वतः परिषदेनेच भरविलीं आहेत आणि त्यांचे अहवालहि परिषेदनेच छापले आहेत. तेव्हा संमेलनांचा अितिहास न दिला तर परिषदेचा अितिहास पूर्ण होणेंच शक्य नाही. तात्पर्य, परिषदेच्या कार्यांत नियमतः संमेलनांचा अंतर्भाव होतो. अुलटपक्षीं संमेलनाच्या कार्यांत परिषदेचा अंतर्भाव होतोच असें नाही. असा विचार करून यद्यपि बडोदें ठरावांत परिषदेचा अुल्लेख नाही तरी परिषदेचा अितिहास हें व्यापक नांव देअून संमेलनांचा अंतर्भाव त्यांतच करावा असें धोरण आम्हीं निश्चित केलें व तसें प्रसिद्धहि केलें. बडोदें ठराव करणारांचीहि मनीषा आम्हीं समजावून घेतली होती. आम्हीं केवळ शब्दांकडे पाहिलें नाही, भलत्याच द्वैत कल्पनेला वश झालों नाहीं आणि योग्य तोच मार्ग अवलंबिला. अुगाच कोणी नसती शंका घेतांत म्हणून आमची ही भूमिका येथे विशद केली आहे.

आता परिषदेचा इतिहास लिहावयाचा तर त्याला मुख्य आधार परिषदेच्या दप्तराचा. परंतु परिषद् अशी दुर्दैवी की, तिचें जुनें दप्तरच उपलब्ध नाही ! आम्ही १९२२ सालापासून परिषदेच्या कारभाराशीं निगडित आहों, कार्यकारी सभांचें वृत्तान्तपुस्तक आम्हीं पाहिलेलें आहे. परंतु १९२७ ते १९३२ च्या धामधुमींत परिषदेचें दप्तरच नष्ट झालें ! कांही बाळबीने खाल्ल्याचें ऐकलें आणि कांही गहाळ झालें, पत्ता नाही ! मोठाच पेंच पडला; आणि त्यामुळे तर मिळेल ती सामग्री मिळवून परिषदेचा अितिहास सजविण्याची आवश्यकता आमच्या मनास अधिकच तीव्र भासूं लागली !

आमच्या संग्रहीं विविधज्ञानविस्तार आणि महाराष्ट्रसाहित्यपत्रिका यांचे जुने अंक होते, 'केसरी'चीं बांधीव पुस्तकें होतीं, संमेलनांचे सर्व वृत्तान्त होते आणि अितरहि सामग्री होती तिच्या बळावरच काम आरंभिलें. आमच्या दैववशात् आमचे मित्र रा. शरचंद्रपंत रानडे यांचेपाशीं १८८५ च्या सालच्या संमेलनांचे हकीकतीचे कागद मिळाले. कारण, शरचंद्रपंतांचे वडील 'ज्ञानचक्षु'कर्ते वामनराव हे १८८५ च्या संमेलनाचे अेक चिटणीस होते. हा मोठाच अलभ्य लाभ झाला. या संमेलनास हजर असलेल्यांपैकी रा. थत्ते आणि सीतारामपंत गुर्जर दोघेहि नुकतेच कालवश झाले. या उभयतांस आम्ही भेटलों, हा अहवाल दाखविला व आठवणी विचारल्या. परंतु ८० च्या पलीकडे वयोमान गेलेल्या या वृद्धांकडून आनंद आणि आशीर्वाद यांच्या अभिव्यक्तीखेरीज कांही प्राप्ति झाली नाही. १९०५ च्या संमेलनाबाबतचीं टिपणेंहि आम्हांस बॅ. विठ्ठलराव करंदीकर व दत्तोपंत परांजपे यांनी आपापल्या वडिलांच्या रोजनिशींवरून पुरविलीं.

येणेंप्रमाणे, १८७८ ते १९०८ पर्यंतच्या संमेलनांचे ग्रंथरूपाने अविद्यमान असलेले अहवाल ग्रंथबद्ध करणें अवश्य वाटल्यावरून 'केसरी'वरून ते उतरून घेऊन या ग्रंथाच्या साधनविभागांत जोडून दिले. साधनविभाग आणि वृत्तविभाग असे दोन भाग आमच्या या ग्रंथाचे आम्हीं प्रथमपासूनच मनांत कल्पिले होते. धोरण असें ठेवलें की या अितिहासांत शक्य तेवढी साधार आणि सप्रमाण माहिती द्यावी, होतां होअील तों मूळ आधारच पुढे ठेवावे, 'नामूलं लिख्यते किंचित्' पंथास अनुसरावें आणि बनेल तोंवर कोणावरहि निराधार टीका करूं नये अथवा मतप्रतिपादनाच्या भरीस फारसें पडूं नये. आमचा ग्रंथ संमेलनपरिषदप्रेमी प्रत्येक व्यक्तीस संदर्भग्रंथ म्हणून उपयोगी व्हावा अशी आम्हीं कोशीस केली आहे. तथापि ग्रंथाचा थोडा विस्तार करण्याची सूचना झाल्यावरून ह्या पूर्वीच्या धोरणालाच चिकटून राहतां आलें नाही. इतिहासकाराला अभिप्रायाच्या कठोर कर्तव्यांतून सुटतांच येत नाही. आणि 'कार्यकर्त्यांच्या सेवेचा परामर्श' घेण्याचें ठराविल्यावर या कर्तव्यालाहि सादर व्हावें

लागलें. त्यांतलें सूक्तासूक्त आणि युक्तायुक्त पाहणें आता इतरांचें काम आहे.

केवळ वस्तुस्थिति सांगावी आणि ती सांगतांना आपले आधार जागजागीं नमूद करावे हें आमचें मूळचें धोरण मात्र आम्हीं त्यांतल्या त्यांत कसोशीने राखण्याचा प्रयत्न केला आहे. आधार घेतांना कोणा एका बाजूस कलून तदनुकूल आधार तेवढे ग्राह्य करावे आणि प्रतिकूल ते जाणूनबुजून डोळ्यांआड करावे असा पक्षपात आम्हीं होऊं दिला नाही. अर्थात् जी सामग्री आमचे हाताशीं होती तेवढ्यावरच आम्हांस काम भागवून घ्यावें लागलें आहे. यद्यपि आम्हांला विश्वास वाटतो की आम्हीं यथार्थ तेंच लिहिलें आहे तरी सप्रमाणरीत्या कोणी यांतील अधिकउणें दाखवून देअील तर तसा शोध आम्ही आनंदाने स्वीकारूं.

या ग्रंथाच्या साधन विभागांत तसें म्हटलें तर सुमारें १२५ पानांपैकी १०० पानें अथवा चारपंचमांशावर मजकुर म. सा. संमेलनांबद्दलच आहे. अर्थात् संमेलनांचा इतिहास अपेक्षिणाऱ्यांचें भरपूर समाधान या ग्रंथाने होण्यास कसलीहि हरकत पडूं नये.

ग्रंथाचा विस्तार याहूनहि वाढविणें शक्य असलें तरी अवश्य व इष्ट तेवढी सर्व माहिती येथे संकलित केलेली आहे. संमेलन आणि परिषद् यांची सेवा ज्यांनी वेळोवेळीं केली त्या सेवकांच्या सेवेचा नामनिर्देशपूर्वक परामर्श घेणारें एखादें प्रकरण अशा ग्रंथांत घालणें अवश्य होतें असें आम्हांसहि वाटत होतें. तथापि तसें करावयाचें तर, यथार्थ माहितीच्या अभावाची अडचण घटकाभर बाजुस ठेवली तरीहि, वैयक्तिक चर्चा पुष्कळच करावी लागली असती. परंतु तसें प्रकरण घालणें पुढे अवश्य ठरविल्यावरून तेंहि यथामति लिहून समाविष्ट केलें आहे. तसेंच गुजराती, हिंदी, बंगाली, तेलगु, तामील आणि उर्दू वगैरे हिंदुस्तानी देशी भाषांतील आणि पाश्चिमात्य देशांतील साहित्यपरिषदा किंवा तत्सम संस्था आणि आमच्या महाराष्ट्रांतील आमच्या साहित्यपरिषदा आणि संमेलनें यांच्या कार्याचें तौलनिक पर्यालोचन करणारें एखादें उद्बोधक प्रकरणहि जोडतां आलें असतें तर आम्हांस आनंद वाटला असता. परंतु एक तर या विषयाला लागणारें साहित्य अद्यापिहि आमच्या परिषदेने संग्रहित केलें नाही किंवा अन्यत्र येथे कोठे संग्रहित असलेलें आम्हांला आढळलें नाही हें एक आणि जसजसा आमच्याकडून या ग्रंथाच्या कामीं कालातिक्षेप होऊं लागला तसतसें पूर्वीची २०० रु.ची मंजुरी चालती करून मागण्यास आम्हांसच परम संकोच व लज्जाहि वाटूं लागली म्हणून हा उद्बोधक भाग घालण्याचा विचार तसाच सोडून द्यावा लागला.

इ. स. १९३४।३५ मध्यें आम्ही कामास लागलों आणि १९३७ मध्यें २०।२५ पानें छापून घेण्यापर्यंत मजल गांठली. इकडे बाहेर परिषद्-संमेलन-वादाचा डोंब उसळला होता. मनें कचरत होतें. त्यांत स्वतःच्या चैगट स्वभावाची भर पडली. आणि काम जें तेव्हापासून रेंगाळलें तें दुसरी मंडळी तर काय पण आम्ही स्वतःच कधी कधी निराश होऊं लागलों. कामास प्रारंभ करावा आणि मध्येंच मदतीकरिता अडावें असेंहि झालें. अखेर १९४० सालच्या संमेलनाचे प्रसंगीं आम्हीं बरीच मजल गांठली. आमच्याकडूनच काम पुरें करून घेण्याचा म. सा. परिषदेच्या मंडळीचा निश्चय मात्र खंबीर दिसून आला आणि दयालुत्व तर भरपूर अनुभवावयास मिळालें. रत्नागिरीस आणखी १५० रु.ची मंजुरी आपण होऊन सभासदांनी आम्हांस मंजूर केली. पुढे दुसऱ्या कांही किरकोळ अडचणी आल्या नसत्या तर १९४० तच हा ग्रंथ प्रसिद्ध झाला असता परंतु या अडचणी दूर होण्यास दिनांबधि लागला. तदुत्तर सोलापूर साहित्यसंमेलनाच्या शुभप्रसंगीं हा ग्रंथ हातानिराळा करून मोकळे व्हावें एवढी तयारी केली आणि ग्रंथाचे नमुन्याच्या कच्च्या पण बांधीव प्रति योजलेल्या

प्रकाशनसमारंभासाठी सिद्ध ठेवल्या ! पण 'दैवमन्यद्विचिंतयेत्' हा अनुभव आला. पुनः काळ लोटला, कटकटहि पडली आणि आता १९४३ च्या वसंतांत ही अखेरी साधण्याचें समाधान लाभत आहे !

या ग्रंथांत जशी जुन्या विस्मृत संमेलनांची माहिती अथवा माहितीचीं साधनें दिलीं आहेत तशी आजवरच्या संमेलनीय ठरावांची अेक वर्गीकृत यादी दिली आहे. तीमुळे या ग्रंथाचा उपयोग आणि महत्त्व फार वाढलें आहे असें आम्ही निश्चयपूर्वक म्हणतों. हें वर्गीकरण आणि ही यादी यांनी आम्हांस फार नडविलें. पूर्वी अेकदा १९३२।३३ मध्यें अशी यादी आमच्या साहाय्याने पत्रिकेंत प्रसिद्ध झाली होती. ती त्या काळापुरती तरी पूर्ण असेल असें आम्ही समजत होतों. फक्त तेथे झालेलें वर्गीकरण आम्हांस सदोष वाटत होतें म्हणून नवें वर्गीकरण करावयाचें व पुढील ठराव त्यांत घालण्याचेंच काम शिल्लक राहिलें असा आमचा समज झाला. परंतु पुढे अेकेक्षर मंजूर ठरावांची मोजणी करून आंकडेमेळ घालूं लागलों तों कांही अपूर्णता व कांही प्रमाद नजरेस येऊं लागले तेव्हा सर्व मेळ बिनचूक जमविणें बरेंच कष्टाचें गेलें. अेकट्याने हें करावयाचें तर बरेंच जिगजिगीचें काम होतें परंतु तें आता आम्हीं पुरें केलें आहे याचें आम्हांस मनापासून समाधान वाटतें. ठराव-वर्गीकरणाच्या पुरवणी यादींत अेक सुधारणा आम्हीं केली आहे. त्या त्या संमेलनांतील ठरावांचा जो अनुक्रमांक मूळ संमेलन अहवालांतून नमूद आहे तो आम्हीं तेथे दाखल केला आहे. त्याने संदर्भ पाहणें सुलभ होअील. मागील २६८ ठरावांवरहि हे क्रमांक घालून घेतले पाहिजेत. या पुढील संमेलनांतील ठराव जोडण्यासाठी या ग्रंथाच्या बिनबांधीव प्रती राखून ठेवाव्या आणि नवीं नवीं परिशिष्टें जोडीत जावें. तसेंच नानासाहित्यांचे जे मुद्रित अहवाल आहेत तेहि साक्षेपी वाचकांनी जोडून या ग्रंथांतच साधनविभागांत बांधवून घेतले म्हणजे संदर्भाचें कार्य अडणार नाही.

संमेलन आणि परिषद् यांच्या शकावली आम्हीं या ग्रंथांत मुद्दाम तयार करून घातल्या आहेत. त्या सर्वांनिच अत्यंत अुपयुक्त वाटतील अशी आमची खात्री आहे.

नामकरण आणि वर्षगणन या परिशिष्टांत आम्हीं ज्या अराजकाचा अुल्लेख केला आहे तिकडे सर्वांचे लक्ष्य जाईल आणि त्यावर अवश्य ती सर्वमान्य अुपाययोजना ताबडतोबीनें होईल अशी आम्हांस अुमेद आहे.

मूळ ग्रंथ लहानसा आणि साधन-विभाग त्याहून कितीतरी मोठा असा आम्हीं अवलंबिलेला प्रकार पुष्कळांस अरोचक होईल हें आम्ही जाणून आहों. परंतु आम्हीं बुद्ध्याच या विभागणीचा अवलंब केला आहे. या ग्रंथास एरवी यावें तें प्रामाण्य मिळवून देणें कठिण होतें. आता ज्याला त्याला परिषदेचा आणि संमेलनाचा इतिहास स्वतःपुरता स्वतः देखील निशंकपणें रचून घेतां येईल. साधनें पाहूनच विधानें करावीं ही संवयच हितकारी असते. परिषद् संमेलनांसंबंधी आज पंचवीस तीस वर्षांचा आमचा अनुभव असा आहे की सत्य पारखून घेण्याची प्रवृत्ति फार कमी आणि त्यामुळे व्यर्थ तर्ककुतर्क करण्याकडे आणि श्रवणसुलभतेला वश होण्याकडे कल फार. या प्रवृत्तीला आळा घालणें हें प्रत्येक सत्यशोधक इतिहासकाराचें पवित्र कर्तव्य आहे हें लक्ष्यांत घेणारास साधनविभागाचें महत्त्व आपोआप ध्यानांत येईल.

या ग्रंथांतहि आम्हीं जेथे आमचें मत दाखल केलें असेल तेथे तें पारखून घेण्याची विनंती करतों. आमचें मत हें सत्यावर आधारलेलें असलें तरी तें कांही सत्य नव्हे. मत तें मत आणि सत्य तें सत्य हा विवेक कधीच सुटतां कामा नये. आमचें मत आमचें मत म्हणून

अनुसरणाऱ्यापेक्षा आमचें मत सत्य म्हणून अनुसरणाराच आम्हांस प्रिय आहे. इतकें लिहिल्यावर हें निराळें लिहिण्याची गरज नाही की ज्या महाराष्ट्र साहित्य परिषदेने आमची योजना या कार्यावर केली तिजवर आमच्या मतांची यत्किंचितहि जबाबदारी पडते असे कधीच कोणीं समजूं नये. आमच्या मताला जबाबदार एकटे आम्ही; म. सा. परिषदेला त्याचा कसलाहि संपर्क नाही.

शेवटीं म. सा. परिषदेला येथे एक सूचना करणें अवश्य वाटतें. हा ग्रंथ पुढीलांस कांही अंशीं तरी मार्गदर्शक होईल; परंतु भावी इतिहासकाराचे श्रम आणि प्रमाद चुकवावयाचे असतील तर एव्हापासूनच सावध व्हावें. संमेलन-परिषदांचे अहवाल आणि तत्संबंधी वर्तमानपत्रांत आलेला मजकूर, चर्चा, वाद इत्यादींचीं कात्रणें यांचा काळजीपूर्वक स्वतंत्र संग्रह करून ठेवावा. तें एक खातेंच ठेवावें. अहमदनगर साहित्यसंमेलनाच्या चालकांना संमेलनसंबंधी कात्रणें नगर अहवालास जोडण्याची सूचना आम्हीं केली होती. परंतु अद्यापि त्याची उपयुक्तता मनांत भरत नसावी. म. सा. परिषदेच्या संग्रहीं म. सा. पत्रिकेच्या पहिल्या १३ वर्षांचीं पुस्तकें कोठे आहेत ? अजून तीं मिळूं तरी शकतील. जों जों दिवसगत लागेल तों तों असा संग्रह करणें दुष्कर होऊन बसेल. साहित्यसंमेलनें ज्या जागीं भरतात त्या जागीं त्यांचीं दप्तरें राहण्यापेक्षा– आणि सर्व ठिकाणीं तीं जपून ठेवण्यांत येत असतीलच अशी खात्री नाही– या संमेलनांचें सर्व कार्य संपल्यावर हीं सर्व दप्तरें म. सा. परिषदेला सुपूर्त करण्याची आणि परिषदेने त्यांचें संरक्षण करण्याची तजवीज अवश्यमेव झाली पाहिजे. या सूचनेची उपेक्षा होऊं नये एवढी आमची काकुळतीची प्रार्थना आहे.

परिषदेने पांच सात वर्षें कळ काढली, आमच्यासाठी दूषणें सोसलीं, ताटकळत राहून वाट पाहिली– या सौहार्दाचें आनृण्य कसें जोडावें !

आमची भूमिका आम्हीं येथवर विशद केली आहे. ग्रंथ पुरा झाला, शिरींचा भार उतरला. याने किंचित् हलकें वाटतें. आता सुज्ञ वाचकांच्या हातीं ग्रंथ निरवून द्यावा आणि त्यांना विनवावें की केली सेवा ती प्रांजलबुद्धीने अंगचोरपणा किंवा पक्षपात न ठेवतां केली आहे. पारखून घेणारे तुम्ही धनी समर्थ आहांत.

वैशाख व. १२, १८६५ }
पुणें. }

दत्तो वामन पोतदार



श्रीमंत राजे भवानराव बाळासाहेब पंतप्रतिनिधि, औंध

यांनी

महाराष्ट्र साहित्य परिषदेस आपली पुणें गोटांतील जागा
केवळ प्रतिवार्षिक १५ रु. आकार घेऊन दिली.
याच जागेवर परिषदेचें मंदिर आणि
'माधवराव पटवर्धन साहित्य मंदिर'
हीं बांधण्यांत आलीं आहेत.

श्री. संपादक 'महा-राष्ट्र', पुणें, यांच्या कृपेने]



श्रीमंत बाबासाहेब घोरपडे, अधिपति, संस्थान इचलकरंजी

म. सा. परिषदेचे एक प्रमुख साहाय्यक, यांनी रुपये दोन हजारांचे रोखे परिषदेच्या नांवाने करून दिले आहेत.

श्रीमंत सरकार इचलकरंजी यांच्या कृपेने]



महाराष्ट्र-साहित्य-परिषद्-इतिहास

वृत्तविभाग

प्रकरण पहिलें

परिषदेचीं पहिलीं सहा वर्षें (१९०६ ते १९१२)

महाराष्ट्र-साहित्य परिषद् या संस्थेचा जन्म निश्चितपणें कोणत्या दिवशीं झाला याविषयी थोडेसें संशोधनच करावें लागेल अशी वस्तुस्थिति आहे. एवढें मात्र निश्चित म्हणतां येतें की या परिषदेची स्थापना इ. स. १९०६ सालीं पुण्यास झाली (पहा, साधनविभाग परिशिष्ट ११वें) आणि त्या वेळीं तिच्या पटावर ६० सभासद होते. या वर्षी या संस्थेचे तीन चिटणीसहि नेमण्यांत आले[1]. पुढील वर्षी (१९०७ सालीं) परिषदेच्या कामगिरीचा अहवालहि संमेलनास सादर झाला. पुढे १९०८ सालच्या संमेलनाचें निमंत्रणपत्रक साहित्य-परिषदेच्या त्रिवर्ग चिटणिसांनी प्रसिद्ध केलें. त्यांतच "साहित्य-परिषदेच्या रचनेच्या नियमांचे मसुद्याची चर्चा करण्यांत येईल व साहित्य परिषदेस कार्यक्षम करण्याचे उपाय कायम करण्यांत येतील" असें जाहीर केलें आणि त्याप्रमाणे या विषयाची चर्चाहि पुणें संमेलनांत १९०८ मध्यें झाली[2]. या वर्षी "परिषदेचे सभासद ७० होते ते आता ९० झाले आहेत" असें सांगण्यांत आलें[3]. लागोपाठ तीन वर्षें पुण्यास जमल्यावर आमच्या मराठी लेखकांचा भाग्योदय होण्याचा सुयोग येऊन मंडळी कै. श्री. सयाजीरावमहाराज गायकवाड यांच्या आश्रयाने बडोद्यास जमली. या बडोदें संमेलनांत साहित्यपरिषदेच्या नियमांचा मसुदा पुढे मांडण्यांत आला आणि तो तपासण्यासाठी समिति नेमण्यांत आली (पहा, वर्गीकृत ठराव क्र. १, साधन विभाग पृ.३४). या ठरावाची सूचना करितांना परिषदेचे एक चिटणीस श्री. खाडिलकर म्हणाले– "महाराष्ट्र-साहित्य-परिषदेला ३।४ वर्षें झालीं. पण तिला व्यवस्थित स्वरूप नाही, कार्यक्रम नाही, नियम नाहीत असा तिच्यावर आरोप आहे. हे दोष पुष्कळ अंशीं खरे आहेत हें मी कबूल करितों.... यंदा साहित्यपरिषद् नियमबद्ध होईल. बंगालच्या साहित्यपरिषदेच्या नियमांच्या आधारें नवीन नियम रा. वासुदेवराव आपटे यांनी तयार केले आहेत ते तपासण्याकरिता कमिटी नेमावयाची आहे" (बडोदें संमेलन १९०९, संपूर्ण हकीकत पृ. ५९). या संमेलनाचे वेळीं "परिषदेचे सभासद गेल्या वर्षी ९० होते, यंदा ९५ झाले आहेत" असें रा. वासुदेवराव आपटे यांनी सांगितलें (बडोदें–सं. हकीकत पृ.२३). बडोदें संमेलनांत नेमलेल्या कमिटीने आपले नियम तयार केले आणि तो मसुदा बडोदेंसंमेलनाच्या हकीकतीच्या अखेरीस जोडलेला आढळतो. पुढे १९१२ सालीं अकोल्याच्या संमेलनाच्या बैठकींत वरील बडोदा मसुदा कांही फेरफार करून मांडण्यांत आला आणि तो संमेलनाने मंजूर केला. परिषदेच्या घटनेचा हा मसुदा

---

१ पहा– साधन-विभाग, पृ. १६।१७ हे त्रिवर्ग चिटणीस म्हणजे कै. विनायक लक्ष्मण भावे (ठाणें), श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर आणि कै. श्री. वासुदेव गोविंद आपटे हे होत.

२ पहा, साधन विभाग पृ. २० व २३.

३ साधन-विभाग पृ. ३३, हा ७० चा आंकडा १९०७ चा असावा.

अकोला रिपोर्टास जोडण्यांत आलेला आहे. या मसुद्याप्रमाणे ७५ जण परिषदेचे सभासद झाले. आणि कार्यकारी मंडळीचीं नांवेंहि मंजूर झालीं (अकोला रिपोर्ट पृ. ३६). येणेंप्रमाणे १९०६ सालीं जन्मास आलेल्या परिषदेला १९१२ मध्यें नियमबद्ध व घटनामंडित करण्यांत आलें ! ६० (१९०६); ७० (१९०७); ९० (१९०८); ९५ (१९०९) व ७५ (१९१२) याप्रमाणे सभासदांची संख्या परिषदेस वेळोवेळीं लाभली. परिषदेची ही घटना 'वंगीय साहित्य परिषदे'च्या घटनेच्या नियमांस धरून तयार करावयाची होती. कै. महामहोपाध्याय हरप्रसादशास्त्री, कै. दिवाण रमेशचंद्र दत्त प्रभृति वंगीय साहित्य परिषदेच्या प्रख्यात सभासदांचा निकट संबंध बडोद्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या घटनाकर्त्यांशीं आला होता. ते दिवसच बंगाल आणि महाराष्ट्र यांच्या दृढ सहकार्याचे होते आणि व्यापक राष्ट्रीय ऐक्याची भावना भरतखंडभर वेगाने प्रसृत होत होती ! कै. वासुदेवराव आपटे हे बंगाली भाषा जाणणारे आणि कलकत्ता विद्यापीठाचे स्नातक असलेले गृहस्थ महाराष्ट्र साहित्य परिषदेचे एक प्रमुख चिटणीस होते; त्यामुळेंहि या वंग-महाराष्ट्रसंबंधाचे दुवे जोडण्यास सहजच घरचेंच साहाय्य मिळालें असलें पाहिजे.

प्रकरण दुसरें

घटना झाली पण संघटना ?

अकोल्याच्या घटनेप्रमाणे म. सा. परिषदेची कचेरी मुंबईस आली, आणि ती तेथें सुमारें १९३२ अखेरपावेतों राहिली ! मुंबापुरींतील या बीस वर्षांत परिषदेचा संसार कसा काय रंगला तें मननपूर्वक पाहण्यासारखें आहे. इ.स.१९०९ सालीं एकवार असें वाटण्याजोगी परिस्थिति उत्पन्न झाली होती की परिषदेचें दुःखदैन्य लवकरच विलयाला जाऊन आपली वडील बहीण जी वंगीय साहित्य परिषद् तिच्याप्रमाणेच वैभवाचा, किंबहुना कांकणभर वरचढच, संसार हिचाहि थाटेल ! पण बडोद्याच्या तीन वाऱ्या करूनहि हें वैभव तिला अद्याप लाधलें नाही ! १९१२ सालचा जन्मगुणच विपरीत म्हटला पाहिजे ! असो. या बीस वर्षांचेहि दोन भाग केले पाहिजेत. पहिला १९१२ ते १९२७ आणि दुसरा १९२८ ते १९३२ अखेरचा. पैकी पहिल्या भागांत चार महाराष्ट्र साहित्य संमेलनें भरलीं. यांतलीं दोन (१९१५ आणि १९२६) खुद्द परिषदेने भरविलीं आणि दोन (१९१७ व १९२१) इंदूर आणि बडोदें येथील आमच्या उत्साही महाराष्ट्रीय बांधवांनी तेथील आमच्या महाराष्ट्रीय राजांच्या कृपाछत्राखाली भरविलीं !

१९१२ ते २६ या चौदा वर्षांच्या कारकीर्दीत म. सा. परिषदेकडून पुढे दिलेलीं चारपांच विधायक कार्येंच तेवढीं घडून आलीं. पहिलें, महाराष्ट्र साहित्य पत्रिका या नांवाची एक छोटिशी १२ ते १६ पानांची पत्रिका, आणि तीहि बरींच वर्षें मुंबईच्या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ अशा 'विविधज्ञानविस्तार' मासिकाला जोडून चालकांनी चालविली; दुसरें, इंदूर संमेलनाच्या प्रसंगाने इंदूरचे उदार आणि दानशूर श्रीमंत महाराज सर सवाई तुकोजीराव होळकर यांच्याकडून रुपये दहा हजारांची देणगी मिळाली तिचा स्थिरनिधि बनविला; तिसरें, एक प्रकाशननिधि आणि एक हरिभाऊ आपटे स्मारकनिधि यांची अर्धवट जोड करून घेतली; चौथें, 'बालशुश्रूषा' वगैरे तीन चार ग्रंथ लिहवून घेऊन त्यांतले एकदोन छोटेसे होते ते प्रसिद्ध केले; आणि पांचवें कार्य म्हटलें

म्हणजे संलग्न संस्थांसाठी व शाखासंस्थांसाठी पोटनियम तयार केले. पोटनियम केले परंतु "शाखासभा किंवा संलग्नसंस्था स्थापण्यासंबंधी खटपट करण्याचा 'श्रीगं' काढणेंहि शक्य झालें नाही !" (म. सा. परिषद् १९२१-१९२५ अखेरचा अहवाल परिशिष्ट अ, पृ. ९– म. सा. प. ची हकीकत, स्थापनेपासून अखेर.) मोडी लिपीबाबत सरकाराकडे परिषदेने याच काळांत कांही अयशस्वी खटपट केली. (म. सा. पत्रिका, जुनी १९१३, पृ. ४१-४५.) याहून सांगण्यासारखें अधिक कार्य कांही नाही. भांडणतंटे मात्र झाले त्यांचा उल्लेख अन्यत्र केला आहे.

बरें, सभासद किती मिळवितां आले म्हणाल तर १९२० अखेर १२ तहाहयात आणि १०० साधारण सभासद एवढेच ! १९०८–९ मध्येंच ८०।९० सभासद होते; ती संख्या पुढील आठ वर्षांत ११२ पर्यंत गेली !

या परिस्थितीचें समालोचन करतांना परिषदेचे अभिमानी P यांनी लोकांची अनास्था हें अशा दुरवस्थेचें कारण म्हणून दर्शविलें आहे (म. सा. पत्रिका, जुनी–'विस्तार' विभागी- वर्ष ९, अंक ३ सप्टेंबर १९२१ पृ. १३९). या देशांतील आस्था-अनास्था कशी आहे ती सर्वश्रुत आहे. तीहून कांही विशेष विपरीत अनुभव म. सा. परिषदेच्या चालकांच्या वांट्याला यावयाचें सबळ कारण कांही दिसत नाही. १९०४।५ सालापासून राष्ट्रांत नवयुगाचा उदय झपाट्याने होऊं लागल्याचीं स्पष्ट चिन्हें दृग्गोचर होऊं लागलीं होतीं. देशी भाषेविषयीचें प्रेम, अभिमान आणि आस्था प्रत्यही बळावत होतीं. अनेक पक्षोपपक्ष देशांत नांदत असतांहि "**मराठी भाषा बोलणाऱ्या सर्व लोकांचें ऐक्य**" साधण्याच्या (पृ. ५२९ वि. ज्ञा. विस्तार, १९१२) उच्च व सर्वमान्य हेतूसाठी अवतरलेल्या महाराष्ट्र–साहित्य–परिषदेच्या मात्र दुर्दशा वांट्यास यावी याचा दोष कांही अंशीं तरी परिस्थितीपेक्षा परिषदेच्या तत्कालीन कांही कार्यकर्त्यांच्या दुबळेपणाला किंवा अदूरदृष्टीला किंवा हट्टालाच कोणीहि निःपक्षपाती इतिहासकार दिल्याशिवाय राहणार नाही. बडोद्याच्या विद्याभिलाषी श्री. सयाजीरावांचा वरदहस्त परिषदेस कां लाभला नाही हें मोठें गूढ वाटतें ! कोल्हापुरास १९३२ सालीं तर त्यांस संमेलनाचें अध्यक्षपदहि अर्पण करण्यांत आलें होतें. त्यांच्या आकांक्षा व योजना मोठ्या होत्या. पण कोठे तरी कांही तरी बिघडलें असलें पाहिजे हेंच खरें. मोठे राजेरजवाडे राहूं द्या, केवळ मुंबई-सारख्या राजधानीच्या श्रीमंत शहरांत, पांच सात लक्ष महाराष्ट्रीयांच्या आगरांत, म. सा. परिषदेला १०० च्या वर सभासद दहावीस वर्षांत लाभूं नयेत या घटनेचा दोष परिषदेच्या तत्कालीन चालकांवर न टाकतां केवळ जनतेच्या उदासीनपणावर आणि अनास्थेवर कोणता न्यायी मनुष्य टाकील ? याच काळांत कोण कोण मंडळी परिषदेपासून दूर गेली आणि इतरांनी साहित्यविषयक मोठमोठे उद्योग कसे यशस्वी केले याचा जरी नुसता वर वर विचार केला तरीहि आमचे म्हणण्यास कोणाचाहि दुजोराच पडेल!! हें लिहितांना आम्हांस कांही सुख होतें असें थोडकेंच आहे ? आम्ही दुःखित होऊन केवळ कटुकर्तव्य करीत आहोंत इतकेंच ! प्रो. रानडे यांनी एकट्यानें कोशाचें प्रचंड कार्य सिद्धीस नेलें तें याच अनास्थेच्या काळांत ना ? आणि बळवंतराव दामोळकरांची सुंदर ग्रंथमाला ? डे. व्ह. ट्रा. सोसायटी-संबंधांत कांही पुनर्योजना घडवून आणण्याचा जो विचार १९०६ त चिटणिसांनी प्रकट केला. (पहा, परिशिष्ट ११ वें) तो सिद्धीस नेण्याचा कोणता नेटाचा प्रयत्न परिषदेच्या त्या वेळच्या चालकांनी केला ? सरकार आणि मुंबई विद्यापीठ यांचे दरबारींहि म. सा. परिषदेची प्रतिष्ठा रतिमात्र तरी वाढविण्याचे काय उपाय योजिले ? एवढे राजेरजवाडे आणि कै. सर भालचंद्रां-

सारखी वजनदार मंडळी यांचें साहाय्य लाभलें असतां हेहि यत्न होऊं नव्हते काय ! मग घोडें कोठें अडलें ? परिषदेचे तत्कालीन सूत्रचालक यांसच या अपयशाचे वांटेकरी समजण्याशिवाय गत्यंतर नाही. एवंच, परिषदेस १९१२ सालीं घटना लाभली परंतु पुढील चौदा पंधरा वर्षांत टिकाऊ आणि वर्धमान संघटनेचा मात्र लाभ झाला नाही !

प्रकरण तिसरें

वास्तुलाभ आणि कायापालट

इ. स. १९२६ सालीं म. सा. परिषदेनेच म. सा. संमेलनाची बैठक कशीबशी उरकून घेतली. ही बैठक १९२१ च्या बडोदें संमेलनानंतर पांच वर्षांनी भरली. १९२१ मध्यें बडोद्यास परिषदेच्या कारभाराबद्दल अत्यंत तीव्र असंतोष सर्वांनी प्रकट केला. त्याचे पडसाद त्या संमेलनाच्या अहवालांत स्पष्टपणें उठलेले आहेत. या असंतोषांतूनच पुण्यास 'शारदोपासक संमेलना'चा जन्म (१९२५) झाला. मग कोठे जागें होऊन परिषदेच्या चालकांनी नाशिकच्या 'हंसराज प्रागजी ठाकरसी कॉलेज'लाच परिषदेची संलग्न संस्था बनवून संमेलन नाशिकास भरविण्याची बातमी जाहीर केली. (म. सा. प. अहवाल १९२१-१९२५, पृ. २.) परंतु तो बनाव बनून आला नाही. अखेर परिषदेच्या चालकांनी मुंबईसच संमेलनाची बैठक बोलावली आणि पडतें घेऊन असंतोषाचा कांही अंशीं उपशम केला. मुंबईच्या बैठकींतच आम्हीं पुण्यातर्फे पुढलें आमंत्रण दिलें !

आमंत्रण देतांना पोटांत हा एक हेतु होता की परिषदेचा थारेपालट घडवून आणल्यास तिचा कायापालटहि होईल ! संमेलन पुण्यास सहज आणतां आलें पण परिषदेला मुंबईच्या जंजिरेकोटांतून बाहेर काढणें महाकर्म कठिण होतें ! पण एकदा निकराचा प्रयत्न करून पाहावा असा विचार केला. मुंबईस परिषदेच्या सभेंत मात्र अनुभव फारच निराळा आला. बहुसंख्य मुंबईकर सभासद थारेपालटाने गुण पडत असेल तर परिषदेच्या थारेपालटास अनुकूल होतीलसें दिसलें. या सभेंत १९२७ सालीं कार्याध्यक्षाची नवी निवडणूक करण्याचा प्रश्न निघाला. आम्हीं रावसा. ना. गो. चापेकर यांस ही जबाबदारी पत्करण्यास आग्रह केला, आणि तो त्यांनी व परिषदेने मान्य केला.

रावसा. चापेकर यांस आमचें मनोगत ठाऊक होतें. ते एकदम कामास लागले. परिषदेचे एक जुने चिटणीस रा. न. र. फाटक यांचेवर कार्याध्यक्षांची भिस्त होती. रा. चापेकरांनी परिषद् मुंबईसच ठेवून तिच्यांत नवा जीव उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला. रा. चापेकर यांची भिस्त मुख्यतः बौद्धिक कार्यावर होती. म्हणून त्यांनी १९२५ सालीं बंद पडलेल्या म. सा. पत्रिकेचा प्रथम पुनरुद्धार करण्याचें ठरविलें, आणि पत्रिका स्वतंत्र आणि भरदार स्वरूपांत प्रकाशित (नवी पत्रिका, प्रथमांक आषाढ शु. ११।१८५०, २८ जून १९२८) होऊं लागली.

कचेरीची दुर्दशा सुधारण्याची दुसरी जबाबदारी नव्या चालकमंडळावर होती. पगारी माणसांचीहि योजना करण्यांत आली. १९२६ च्या संमेलनाचे आगेमागे परिषदेच्या दप्तराची दुर्दशा फारच उडाली होती ! त्यामुळे नव्या चालकांची अत्यंत कुचंबणा झाली. म. सा. पत्रिकेच्या

अंकाच्या मलपृष्ठावर सर्व कचे जमाखर्च चापेकर यापुढे वेळोवेळीं प्रसिद्ध करूं लागले. परिषदे-सारख्या संस्थेस आणि मुंबईसारख्या शहरांत प्रतिष्ठेने नांदावयाचें तर स्वतःच्या मालकीची नसली तरी एखादी अशी जागा कचेरीसाठी असावयास पाहिजे होती की जींत परिषदेला कायमचें नांदतां येईल. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या कष्टाळू चालकांनी आपल्या संस्थेला स्वतंत्र मंदिराची जोड करून दिली होती. परिषदेचा एक हेतु– ग्रंथसंग्रहाचा– ग्रंथसंग्रहालयाने पूर्ण केला होता. तेव्हा या दोन संस्थांचें गोत्र जुळण्यास कांही प्रत्यवाय असण्याचें कारण नव्हतें. शिवाय म.ग्रं.सं.स परिषदेकडून भाड्याचे रूपाने मदतच झाली असती. त्या वेळीं मुंबईच्या 'वाङ्मय-सेवामंडळ' या संस्थेस परिषदेकडून रोकड मदत मिळत असे. 'वाङ्मयसेवामंडळा'साठी व्याख्यानें वगैरे म.ग्रं.सं. च्याच जागेंत होत असत. तेव्हा म. ग्रं. सं. च्याच जागेंत परिषद् जाईल तर उभयपक्षीं तें सोईस्कर होईल असें वाटून आम्हीं तशी सूचना केली. त्याप्रमाणे व्यवस्था होऊन दरसाल रु. १०० भाड्याचा करार होऊन परिषदेची कचेरी म.ग्रं.संग्रहालयाच्या वास्तूंत नेण्यांत आली. यामुळे परिषदेस किंचित् स्वास्थ्य लाभलें हें जरी खरें तथापि तिची आर्थिक स्थिति आणि कचेरीची व हिशेबी कामाची व्यवस्था कांही विशेषशी सुधारली नाही. दरम्यान परिषदेच्या घटनेंत कांही बदल करण्यांत आले. विशेषतः ट्रस्टी अथवा विश्वस्तप्रकरणीं नवे एक दोन महत्त्वाचे नियम मंजूर झाले. (घटना– द. गो. काळे, चिटणीस प्रकाशित १९२८.)

याखेरीज आणखी अेक महत्त्वाचें व आवश्यक कार्य या वेळीं अुरकलें. तें म्हणजे **परिषद् १८६० च्या २१ व्या कायद्याप्रमाणे सरकारांत नोंदली गेली.** या नोंदणीचा दाखला क्र. ४१९ चा ता. १७ आगस्ट १९२७ चा आहे. सर्व सार्वजनिक संस्थांस आवश्यक व हितकारक असणारा हा संस्कार म. सा. परिषदेस गेल्या पंधरा वर्षांत कां करण्यांत आला नव्हता कळत नाही. परिषदेच्या कार्याचें १९२५ अखेरचें (सांप्रत दुर्मिळ झालेलें) जें मुद्रित विवरण आमचे संग्रहीं आहे त्यांत १९१७–१८ सालाच्या जमाखर्चांत पृ. १३ वर "परिषद् रजिस्टर करण्यासाठी फी" म्हणून रु. ५० व अर्ज लिहिणावळ रु. ४–८–० खर्ची पडलेले आहेत. यावरून परिषद् दुबार नोंदली गेली कीं काय याचा उलगडा करून घेतला पाहिजे. सांप्रतचा अुपलब्ध दाखला काय आहे तो वर दिलाच आहे.

कै. भिडे यांजकडून परिषदेने लिहवून घेतलेला 'मराठी भाषेचा व वाङ्मयाचा इतिहास' म. सा. पत्रिकेंतून छापण्यास प्रारंभ झाला व युक्त क्रमाने हातीं असलेला भाग पुरा झाला. रा. भिडे हे विद्वान् आणि व्यासंगी होते. यामुळे या ग्रंथास, तो नवीन शोधांमुळे मागासला तरी, निःसंशय कांही महत्त्व सदाच राहील.

१९१२-२६ या खंडापेक्षा परिषदेच्या कारभारांत आता कांहीसा नवा जोम आलेला दिसला तरी एकदा गेलेली विरी पुनः निर्माण करणें शतपट कठिण पडतें. मुंबअींत राहून झाली यापेक्षा अधिक सुधारणा करणें जे होते त्या चालकांना तरी शक्य असल्याचें दिसेना. वास्तविक चमत्कार वाटतो याचा. अेवढें धनाढ्य शहर, अेवढी लक्षावधि महाराष्ट्रीयांची संख्या हातीं असतां महाराष्ट्र-भाषेचा झेंडा मुंबापुरींत तेजस्वीपणें कां फडकत ठेवतां येवूं नये ? आजच्या मुंबअींत मराठी साहित्याचा जोर कसा वाढत आहे ! झालें याहूनहि अधिक त्या वेळींहि घडवून आणतां आलें नसतें काय ? पण त्याला निराळ्या वृत्तीचे चालक व निराळ्या वृत्तीचे प्रयत्न पाहिजे होते. अितर शेकडोंगे कार्यें मुंबअींत वाढीस लागत असतां महाराष्ट्राची मध्यवर्ती साहित्य-परिषद् मात्र विपन्नावस्थेतच खितपत पडावी याचा विषाद वाटल्याखेरीज राहत नाही.

अखेरीस हैदराबाद-संमेलनाचे वेळीं भरलेल्या परिषदेच्या साधारण सभेंत या विषयास

एकदाचें तोंड फुटलें आणि "कचेरी पुण्यास नेण्यांत यावी" असा ठराव तेथे झाला (७।८।९ मे १९३१. म. सा. पत्रिका वर्ष ४ थें, अंक १।२, पृ.१२१). त्याप्रमाणे अंमल होणार तों वरील हैदराबाद सभेच्या वेळेपासून "या सभेची सूचना सर्व सभासदांस मिळाली नाही" असा सभेंत घेण्यांत आलेला आक्षेप पुनः डोकें वर काढूं लागला. १९३२ चें सर्व वर्ष या वादांत गेलें. हैदराबाद सभेच्या आक्षेपकांनी व त्यांच्या सहानुभविक परिषत्सभासदांनी २३ जणांच्या सह्यानिशीं परिषदेच्या विशेष सभेची मागणी केली. त्या बाबतहि कांही घोटाळे निघाले. ता. २० मार्च १९३२ रोजीं वरील तेवीस सहीकरांनी स्वतःच सभा भरविली आणि पाठोपाठ ता. २७ मार्च १९३२ रोजीं म. सा. प. अधिकाऱ्यांनी दुसरी सभा भरविली. सभा पुण्यास कीं मुंबईस भरविणें योग्य हा एक नवाच वादाचा मुद्दा होता. मुंबईस सभा घेण्यास आमची कायदेशीर हरकत आम्हीं कळविली होती; कारण आम्ही हैदराबाद सभेचा ठराव कायदेशीर मानीत होतों. वर्तमानपत्रांतून खळबळ उडाली (ज्ञानप्रकाश, ता.२०।३।३२). शेवटीं २७ मार्च १९३२ च्या मुंबईच्या साधारण सभेंत उभयपक्षांच्या तडजोडीने एक समिति नेमण्यांत येऊन त्या समितीकडे सर्वच मानगडी चौकशीसाठी व शिफारसीसाठी सोपविण्यांत आल्या (म. सा. पत्रिका वर्ष ५, अंक १, पृ.९८।९९). खरोखर ज्यांनी समंजसपणें तडजोडीचा हा मार्ग काढला, पडतें–मिळतें घेतलें, आणि एतदर्थ त्या वेळीं आणि मागाहून जे श्रमले, त्या सर्वांस धन्यवाद दिल्यावांचून राहवत नाही. याच तडजोडसमितीस पुनर्घटनासमिति असें नांव प्राप्त झालें. या समितीच्या अनेक सभा पुण्यास भरल्या, आणि कसून चौकशी केल्यानंतर या समितीने आपला अहवाल व माहिती आणि शिफारशी परिषदेस सादर केल्या. हा समग्र अहवाल म्हणजे परिषदेच्या झालेल्या दुर्दशेचें प्रदर्शनच आहे ! म. सा. पत्रिका वर्ष ५, अंक २।३ यांत हा २४ पानी अहवाल स्वतंत्रच छापला आहे. तो अवश्य पाहावा. होतां होतां या सर्व शिफारशी वगैरेंचा विचार कोल्हापूर संमेलनप्रसंगींच्या परिषदेच्या साधारण सभेमध्यें होऊन अनेक ठराव येऊन अनेक बाबी निकालांत निघाल्या आणि **परिषदेची कचेरी पुण्यास कायम झाली.** पुनर्घटनासमितीचें काम व सभा याहि पुण्यासच महाराष्ट्र शब्दकोश मंडळाच्या जागेंत जमखिंडीकर वाड्यांत झाल्या आणि परिषदेची कचेरीहि प्रत्यक्ष पुण्यास आल्यासारखीच होती. तथापि १९३२ अखेर करवीरास त्याला पक्केपणा आला. पुनः १९३५-३६ त नवें वादळ निघून या प्रश्नाची तड जळगांव येथे संमेलन-सामयिक परिषत्सभेंत मोठ्या हिरिरीने लावण्यांत आली. तेव्हापासून गेलीं कित्येक वर्षें बाहेरून तरी शांतता दिसून येत आहे.

पण यद्यपि पुनः वादळें उठलीं तरी परिषदेची मुख्य कचेरी कांही पुण्याहून हालूं शकणार नाही असा निराळाच बनाव मध्यंतरीं बनून आला. परिषदेचे कार्याध्यक्ष आणि औंध संस्थानांतील सर न्यायाधीश रावब. ना. गो. चापेकर यांच्या परिश्रमाने म. सा. परिषदेस पुण्यास पंतांच्या गोटांतील टिळक रस्त्यावरील एक लहानशी पण नाक्याची बखळ जागा नाममात्र भाड्याने मिळाली. भाडेपट्टा ९९९ वर्षांचा झाला ! (साधन विभाग परि. १४) येणेंप्रमाणे **म. सा. परिषदेस पुण्यांत महनीय वास्तुलाभ झाला.** म.सा. परिषदेच्या संसारांत असा सोन्याचा दिवस उगवला आणि तिचा कायापालट स्पष्ट प्रतीत होऊं लागला. ही गोष्ट इ. स. १९३५ सालीं घडली. सालिना केवळ रु. १५ भाडें घेण्याचें ठरवून श्रीमंत राजे बाळासाहेब पंडित पंतप्रतिनिधि आऊंधकर यांनी म. सा. परिषदेला आणि अखिल महाराष्ट्राला उपकृत केलें. या प्राप्त झालेल्या ऐतिहासिक वास्तूवर परिषदेसाठी स्वतंत्र मंदिर बांधण्याची खटपटहि त्या वेळच्या कार्यकारी मंडळाने चालविली होती. नागपूरसंमेलना(१९३३)मध्यें भर संमेलनाच्या बैठकींत

साहाय्यार्थ याचना करून आंकडेहि घेण्यांत आले होते. सुमारें तीनचार हजारांचा अंकित निधिहि जमविण्यांत आला. त्या प्रकरणीं अनेक वाद व शंका-कुशंकां पुढे निघाल्या. त्या सर्वांचें गोड पर्यवसानें होऊन शेवटीं म. सा. परिषदेचे अनेक वर्षें कार्याध्यक्ष असलेले तिचे एक प्रारंभापासूनचे विश्वस्त मुंबईचे रावब. दा.ग.पाध्ये यांच्या हस्तें परिषदेच्या नव्या जागेंत परिषदेच्या संकल्पित **साहित्यमंदिराचा कोनशिलासमारंभ** (ट्रस्टीप्रकाशित ट्रस्टफंडपत्रक १९३५ आणि म. सा. पत्रिका वर्ष ८।३, तळ पृ. ६८७ ते ६८९ आणि तेंळ पृ. ६९५ ते ७१४) शके १८५७ च्या दिवाळी पाडव्याचे मुमुहूर्तावर (कार्तिक शुद्ध १, ता.२८-१०-१९३५) मोठ्या थाटाने साजरा करण्यांत आला.

या प्रसंगीं 'खरे पुणेकर' रावब. पाध्ये म्हणाले :— "या कोनशिलासमारंभाने परिषदेची कचेरी पुणें शहरीं आता दृढतम रीतीने स्थापिली गेली. परिषदेची स्थापना होऊन तिची कचेरी, तिचें माहेरघर, मुंबअीस नक्की झालें होतें. ती प्रथम कै. रा. सा. मोरमकर (परिषदेचे अेक भूतपूर्ण चिटणीस) यांचे घरीं व नंतर माझे स्वतःचे घरीं वाढली खेळली व तरुणपणाच्या स्थितीला आली. कांही वर्षें तिची वाढ अवरुद्ध होण्यासारखे बनाव घडून आले तरीहि ती पुण्यास न्यावी या सूचनेला मी सहजच प्रतिकूल होतों हें मला कबूल केलें पाहिजे. पण पुण्यास येऊन श्री. नानासाहेब चापेकर, प्रो. वाडेकर यांचा उत्साह व उद्योग पाहून माझें मत बदललें. तेव्हा बरें आहे हें स्थळ, घ्यावी येथे कन्या उजवून, असें चिंतून 'अर्थो हि कन्या परकीय एव' यांतील तत्त्वाला अनुसरून परिषद् पुण्यास कायम करण्याच्या योजनेस मीं आपली संमति दिली." (म. सा. पत्रिका वर्ष ८।३ तळ पृ. ७११).

कन्या आणि त्यांतून पाळलेली. तिला वेळेवर उजवूनच टाकावयास पाहिजे होती. अतिवात्सल्यामुळे ती कायमची खुजी किंवा कुवारी राहते कीं काय ही भीति वाटत होती. पण पुण्याचा थारेपालट या कन्यकेला चांगला मानवला आणि ती एखाद्या मूळच्या उफाड्याच्या मुलीप्रमाणे भराभर वाढणार अशी स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं होतीं. भूमिपूजन झालें, कोनशिलासमारंभहि झाला आणि अेकदोन वर्षांतच संकल्पित साहित्यमंदिराचा अेक विभाग (कचेरीविभाग) बांधूनहि सिद्ध झाला. या मंदिर-विभागाचें उद्घाटन अिचलकरंजीचे सुविद्य अधिपति **श्रीमंत बाबासाहेब घोरपडे** यांच्या हस्तें ता. ७ फेब्रुवारी १९३७ रोजीं झालें ! पुण्यांत आल्यापासून चार वर्षांतच हें अपूर्व स्थित्यंतर घडून आलें ! (म. सा. पत्रिका, वर्ष १०।१ पृ.१८ ते २५).

थोरपालटाबरोबरच पोटांतहि कांही औषधियोजना चालू होती. परिषदेच्या दप्तराची दुर्दशा मोडल्याशिवाय कायमची सुधारणा होणें शक्य नव्हतें. या कामीं परिषदेचे उत्साही चिटणीस यांचें, विशेषतः प्रो. दे. द. वाडेकर यांचें, परिषदेस विशेष साहाय्य झालें.

वास्तुलाभ झाला, दफ्तरी दुर्दशा संपली आणि परिषद् स्वतःच्या सत्तेच्या मंदिरांत नांदूं लागली. परिषदेचा कायापालटच झाला. चालकांचा हुरूपहि वाढत चालला. महाराष्ट्राचे 'कादंबरी'काराग्रणी कै. हरिभाऊ आपटे यांच्या स्मारकाची एक योजना आंखून एक अल्पसा निधिहि परिषदेने एकेकाळीं जमविला होता. पण शेवटीं हा निधि परिषदेच्या गंगाजळींतच समाविष्ट करावा लागला. तथापि हरिभाऊंच्या पुण्याईने पुनः उचल खाल्ली आणि त्यांच्या धर्मपत्नी श्री. रमाबाईसाहेब आपटे यांच्या १००० रुपयांच्या उदार देणगीमुळे **'हरि नारायण आपटे ग्रंथालय'** या नांवाच्या स्मारक ग्रंथालयाची जोड परिषदेस लाभली. (म. सा. पत्रिका, नवी, वर्ष १०।२, १९३७, पृ. ३४.)

इ. स. १९३९ त महाराष्ट्राचे लोकप्रिय पंडितकवि आणि परिषदेचे निस्सीम अभिमानी डॉक्टर माधवराव पटवर्धन (माधव ज्यूलियन्) यांस अैन तारुण्यांत मृत्यूने गांठलें ! सर्व महाराष्ट्र त्यांचेसाठी हळहळला ! त्यांच्या मित्रमंडळींनी **'माधवराव पटवर्धन स्मारक-समिति'** स्थापन केली. समितीने स्मारकाची अनेकांगी योजना आंखली आणि कर्तव्यबुद्धीने आणि माधवरावांवरील अलोट प्रेमामुळे द्रव्यनिधि गोळा करण्याचें कार्य झपाट्याने चालविलें. समितीने जमविलेल्या निधींतून बरीच मोठी रक्कम महाराष्ट्र साहित्य परिषदेकडे दिली आणि समितीने घातलेल्या अटींचा स्वीकार करून महाराष्ट्र साहित्य परिषदेने समितीच्या संमतीने **'माधवराव पटवर्धन साहित्य मंदिर'** नांवाचें सुंदर भवन उभारलें. या भवनाचा उद्घाटनसमारंभ श्रीमंत राजे मालोजीराव नाईक निंबाळकर, संस्थान फलटण, या थोर आणि प्राचीन परंपरेच्या विद्याप्रगतिप्रिय भूपतींच्या हस्तें मोठ्या थाटाने साजरा करण्यांत आला. (म. सा. पत्रिका, नवी अंक ६५ पृ.९८, वर्ष १६।१.) या मंदिरांत एक संदर्भग्रंथालय स्थापण्यांत यावयाचें आहे आणि चालकांची आकांक्षा अशी आहे की अनेक साहित्यभक्तांनी या पंडित कवीच्या स्मारक साहित्य मंदिरांत बसून आपला व्यासंग चालवावा आणि या व्यासंगाचीं सतेज, मधुर आणि प्रभावी फळें जनतेस चाखण्यास मिळावीं. हें नवें मंदिरहि परिषदेच्या वाढत्या पसाऱ्यास आताच अपुरें पडतें; तेव्हा लवकरच नव्या नव्या स्मारकमंदिरांची जोड परिषदेस लाभावी आणि कालेंकरून महाराष्ट्र साहित्य परिषदेचीं साहित्यभवनेंहि इतकीं विशाल व कीर्तिवान् व्हावीं की कलकत्त्याच्या वंगीय साहित्य परिषदेचें जोड भवन अथवा प्रयाग येथील हिंदी साहित्य संमेलनाचें भव्य भवन पाहून आलेल्यांसहि आमच्या म. सा. परिषदेचीं भवनें पाहिल्याशिवाय समाधान वाटूं नये.

प्रकरण चौथें

म. सा. परिषदेचें ग्रंथोत्तेजन आणि प्रकाशन

म. सा. परिषदेने प्रसिद्ध केलेला पहिला ग्रंथ म्हणजे कै. पुरातत्त्वभूषण विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनी संपादिलेला **'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १ ला'** हा होय. हा ऐतिहासिक पत्रांचा खंड आहे. त्या वेळच्या संमेलनांतून या ऐतिहासिक संशोधनावर फारच भर देण्यांत येत असे. या खंडांत शके १६८३ ते १७३९ या कालखंडांतील ६६५ पत्रांक समाविष्ट झालेले आहेत. परिषदेचें हें पहिलें प्रकाशन (इ. स. १९०९) एवढेंच काय तें तिचें नांव पुष्कळ वर्षें पुढेहि राखील ! परिषदेच्या खातीं जमा करून घेतलेलें दुसरें प्रकाशनहि संशोधनसाहित्यापैकीच आहे. जुन्या कागदपत्रांप्रमाणेच जुन्या कवींच्या साहित्य-संशोधनावर परिषद-संमेलनांतून त्या वेळीं फार भर होता. एकंदर हें प्राचीन मराठी काव्यसाहित्य असेल तरी किती हें स्वतः अजमावून पाहावें व लोकांस दाखवावें म्हणून म. सा. परिषदेचे एक चिटणीस आणि 'महाराष्ट्रकवि' मासिकाचे संपादक कै. विनायक लक्ष्मण भावे यांनी तयार केलेली एक काव्यसूचि परिषदेने १९०८ त प्रसिद्ध केली. याच वेळीं परिषदेने पारिभाषिक

कोशाचें काम हातीं घेऊन कांही भाग पुरा केला होता. कित्येक शास्त्रांच्या परिभाषा जुन्या म. सा. पत्रिकेंतून प्रसिद्धहि केल्या होत्या; परंतु स्वतंत्ररूपाने तो कोश कांही प्रसिद्ध झाला नाही.

अकोल्यास परिषद् घटित झाल्यानंतर बक्षिसें जाहीर करून कांही विषयांवर ग्रंथ मागविण्यांत आले. या ग्रंथांपैकी डॉ. रामचंद्र वामन खेर यांनी लिहिलेला बालशुश्रूषा हा ग्रंथ पसंत होऊन त्यासाठी लेखकास रु. १०० बक्षिस दिलें (इ. स. १९१९). पुढे (१९२१) हा ग्रंथ छापून परिषदेच्या सभासदांस वांटण्यांत आला. बालशुश्रूषा हें परिषदेचें तिसरें प्रकाशन होय. याशिवाय आणखी तीन ग्रंथ तयार करविण्यासाठी परिषदेने[1] (१९१८ ते १९९०) विद्वान् लेखकांची योजना केली होती. (१) ब्रिटिश अमदानींतील हिंदुस्थान देशाच्या राज्यघटनेचा इतिहास– प्रो. हणमंत बाळाजी भिडे, एम्.ए., एल्एल् बी.; (२) व्यापार व उद्योगधंदे व त्यांची अर्थशास्त्रीय साधनें– श्री. माधव दामोदर आळतेकर, एम्.ए., आणि (३) मराठी भाषेचा आणि वाङ्मयाचा इतिहास (प्रथम श्री. चिं. वि. वैद्य, मग श्री. शि. ए. भारदे आणि नंतर)–श्री. बाळकृष्ण अनंत भिडे, बी. ए., याप्रमाणे तीन विषय आणि तीन लेखक यांची योजना परिषदेने केली.[2] या ग्रंथांसाठी परिषदेने पुरस्कारहि चांगला पोटभर देऊं केला होता. कंजूषपणा दाखविला नाही ! प्रो. भिडे आणि प्रो. आळतेकर यांनी आपापले ग्रंथ लिहून हस्तलिखितें परिषदेकडे दिलीं आणि त्यांस प्रत्येकीं रु. ४०० परिषदेकडून पुरस्कारार्थ आदाहि झाले. 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' या ग्रंथासाठी प्रथम रु ३०० चा पुरस्कार ठरविला होता तो कमीच होता. तो पुढे वाढवून रु.५०० केला आणि शिवाय संदर्भग्रंथादिकांसाठी आणखी रु. ३०० रु. मंजूर केले. अखेर रा. बाळकृष्णपंत भिडे यांनी 'मानभावअखेर'चा इतिहासाचा एक भाग पुरा करून दिला (१९२४) आणि त्यासाठी ½ पुरस्कार त्यांस देण्यांत आला. १९२९ त रा. भिडे वारले. नंतर पुढे हा ग्रंथ म. सा. पत्रिकेंतून क्रमशः प्रसिद्ध करण्यांत आला. रा. भिडे यांचा मराठी भाषेचा व वाङ्मयाचा इतिहास (महानुभावअखेर) हें परिषदेचें चौथें प्रकाशन होय.

एवढींच चार स्वतंत्र प्रकाशनें म. सा. परिषदेने केलीं. रा. ब. पाध्ये यांनी लिहिलेलें 'टिळक-चरित्र'हि म.सा.प.च्या सभासदांस वांटण्यांत आलें होतें. (१९२१; वि.वि.वर्ष९।२.)

वरील नैमित्तिक प्रकाशनांखेरीज परिषदेचें नित्याचें एक प्रकाशन आहे. तें म्हटलें म्हणजे महाराष्ट्र साहित्य पत्रिका हें होय. परिषदेचें 'मुखपत्र' म्हणून ही पत्रिका १९१३ मध्ये मुंबईच्या 'विविधज्ञानविस्तार' मासिकाला जोडून निघूं लागली. प्रथम ती मासिक पत्रिकाच काढण्यांचें ठरलें (कार्यकारी सभा– ठराव– म. सा. प. ता. ९ मार्च १९१३ म. सा. पत्रिका प्रास्ताविक अंक पृ. ७). "सदर्हू पत्रिकेंत साहित्य परिषदेचीं संमेलनें, सभा वगैरेबद्दल माहिती... परीक्षण लेख... वळण लावणारे लेख... प्रसंगीं पारितोषिक देऊन घालण्यांत यावे" असें ठरलें होतें. १९१४।१५ या प्रथमच्या दोन वर्षी पत्रिका मासिक म्हणून चालली आणि पुढे १९१६ सालापासून ती त्रैमासिक करण्यांत आली; आणि १९२५ च्या मे मध्ये नव्या वर्षाचा पहिला अंक काढून बंद केली ! या नव्या वर्षाच्या अंकावर वर्ष १३ अंक १ असें छापलें आहे. परंतु मागील हिशेबाने पाहतां १३ वें वर्ष येत नाही ! येथेहि संशोधनाची पाळी इतिहासकारावर यावी ना ! त्यांतहि अडचणींत भर अशी की म.सा.पत्रिकेच्या त्या वेळच्या अंकांवर आंतील भागास शक–सन–महिना कधीच दिलेला आढळत

१ म. सा. पत्रिका- (जुनी) वर्ष १ (१९१३; वि. विस्तार पु. ४४ अंक १२) अंक १ पृ. ९.

२ वि. विस्तार, जून १९२१, पृ. ८०.

नाही !! जरी पत्रिका १९१३ त निघाली तरी प्रथम १९१४ पासूनच तिचें पहिलें वर्ष धरलें गेलें. या क्रमाप्रमाणे १९२५ ला बारावें वर्ष पडतें, तेरावें नाही ! मागे शोध करतां गफलत कोठे झाली तें मग अमगलें ! १९१८ च्या १ ल्या अंकावर "वर्ष ५- अंक १" पडल्यावर १९१८ च्याच पुढील म्हणजे दुसऱ्या अंकावर "वर्ष ६ अंक २" म्हणून छापलें आहे. या अंकांत कै. रावब. महाजनी— म. सा. परिषदेच्या चालकांना गुरुस्थानीं असणारे सत्त्वशील विद्वान्— यांनी म. सा. पत्रिकेच्या कामगिरीचा आढावा घेतला आहे. त्यांत १९१३ चे पहिले पांच अंक हे त्यांनी पहिल्या वर्षाचे गणले आहेत. तेव्हा चालकांनी पूर्वी छापलेली वर्षगणना टाकून देऊन १९१३ चें पहिलें वर्ष पूर्वी खालें होतें तें पुनरपि जमा करून घेतलें असावें असें दिसतें. असो. तर येणेंप्रमाणे १९१३ ते १९२५ पावेतो 'विविधज्ञानविस्तारा'च्या सहवासाने चालून म. सा. पत्रिका कांही काळ अंतर्धान पावली ती पुनः शके १८५० च्या चैत्रीपाडव्याच्या मुमुहूर्तावर (२२ मार्च १९२८) १३।१०।२७ च्या कार्यकारी मंडळाच्या ठरावाने स्वतंत्र आणि ठसठशीत स्वरूपांत अवतीर्ण झाली !! 'विस्तारा' च्या जोडीने निघालेला म. सा. पत्रिकेचा १३ व्या वर्षीचा पहिला अंक तिच्या विस्तार-सहप्रवासांतील शेवटचाच टप्पा ठरला ! हा अंक निघून पत्रिका बंद पडण्यापूर्वी थोडेच दिवस म.सा. परिषदेच्या कार्यकारी मंडळाने पत्रिका त्रैमासिक स्वरूपाने रा. रा. म. रा. बोडस यांच्या सामान्य संपादकत्वाखाली निघावी असा ठराव केला होता (पाहा, मलपृष्ठ वि. ज्ञा. विस्तार, मे १९२५).

१९१३ ते १९२१ या वर्षांतील म. सा. पत्रिकेच्या कार्याचें **त्रिवार समालोचन** करण्यांत आलेलें आढळतें. पहिले सतरा अंक झाल्यावर एकदा आणि पुनः पंचवार्षिक अशीं दोन समालोचनें रसिकवर्य रावब. महाजनी यांनी केलेलीं आहेत. पत्रिकेंतील प्रथमांकांत तिचे उद्देश व स्वरूपकथन त्यांनीच केलेलें होतें. तेव्हा फल काय पदरीं पडलें तें त्यांनीच सांगण्यांत औचित्य होतें यांत शंका नाही. पहिल्या समालोचनांत रावब. पत्रिकेच्या 'चाकरी'विषयी प्रांजलपणें लिहितात—"मनाप्रमाणे झाली नाही, करितां आली नाही—हें खरें खरें सांगून मोकळें व्हावें हें बरें ! आता वाचक संपादकास म्हणतील— "कामांत चुकूर, मागतो मुशारा, लाज फजितखोरा, कांही नाही !" मान खाली घालून निमूटपणें ऐकून घेण्याची पाळी आली खरी ! पण ! पण !—घवी पाठीवर मारतो, पोटावर मारीत नाही. पण येथे तर अक्षयी एकादशी व त्यांत महाशिवरात्र पाहुणी येऊन [हा उल्लेख परिषदेची शिल्लक बाँबे बँकिंगचे दिवाळें निघून बुडाली त्यास अनुलक्षून आहे.—संपादक] होतें नव्हतें तें घेऊन गेली ! दिवस कंठावे तरी कसे ! !" किती कारुण्य आणि आणि निष्कपट प्रांजलपणा भरला आहे या शब्दांत ! रावब.चें दुसरें पंचवार्षिक समालोचन पत्रिका वर्ष ५ अंक १ (नोव्हेंबर १९१८) यांत आलें आहे. तेंहि मार्मिक व वाचनीय उतरलें आहे. नवे पांच सहा लेखक पुढे आल्याबद्दल समाधान व्यक्त करून रावब. अखेर समेवर येऊन विचारतात—"मराठी वाङ्मयाला सर्वस्वीं वाहून घेतलेले भक्त इतर संस्थांत थोडे फार आढळतात तसे साहित्यपरिषदेंत कां आढळूं नयेत ?"

१९१८ पासूनच्या पुढील चार वर्षांतील लेखांचें समालोचन म. सा. पत्रिका वर्ष ९ अंक ४ मध्यें आलें आहे. त्यांत एकूण स्थूल मानाने या खंडांत १०३ लेख पत्रिकेंत आले त्यांतील १६ परीक्षणाचे वगळल्यास इतर ८७ लेख साहित्यविषयक असल्याचें समालोचनकार सांगतात.

थोडक्यांत इतकें म्हणावयास चिंता नाही की पत्रिकेचें स्वरूप या वेळीं चिमुकलेंसें असलें तरी तिची सेवा भारदस्त व ग्राह्य अशीच झाल्याचा अभिप्राय द्यावा लागेल. येथे पत्रिकेचा पूर्वावतार संपला !

वर सांगितल्याप्रमाणे पत्रिकेचा पुनरुद्धार इ. स. १९२८ मध्यें झाला आणि तेव्हापासून आजतागायत ती अखंडपणें साहित्याची सेवा करीत आहे. आज तिला १४ वें वर्ष चालू आहे.

या नवावतारकालांतहि पत्रिकेवर हल्ले झाले, टीका झाल्या, काढावी–बंद करावी–मासिक करावी–त्रैमासिक ठेवावी इत्यादि कडाक्याचे वाद व चर्चा झाली तथापि 'पत्रिका' धीमेपणाने आपलें कार्य करीत आहे; आणि मतभेद व रुचिभेद बाजूस ठेवल्यास आक्षेपकांसुद्धा सर्वजण तिच्या भारदस्त आणि प्रौढ वाङ्मयसेवेबद्दल एकमताने ग्वाही देतील. आक्षेपकांना तरी काय पाहिजे ! आहे यापेक्षाहि सर्वमान्यता व सर्वाळ्यता तिला लाभावी हेंच ना ! कांही काळ संपादकीय टिळा आमच्याहि मस्तकीं लागला असल्याने आणि गेलीं १०।१५ वर्षें अद्यापि इतकी विस्मृतिपथांत गेलीं नसल्याने, तसेंच अवकाशाभावास्तव याविषयी येथे अधिक विवेचन न करणेंच उचित ठरेल ! शिवाय प्रस्तुत ग्रंथांत विवेचनापेक्षा माहिती पुरविण्याचेंच आपलें उद्दिश्य आहे.

प्रकरण पांचवें

महाराष्ट्र-साहित्य-परिषद् आणि महाराष्ट्र-साहित्य-संमेलनें

प्रस्तुत विषय सांगोपांग लिहावयाचा म्हटला तर या ग्रंथाअेवढा मोठा निराळा ग्रंथच लिहावा लागेल. प्रस्तुत आम्हांस घातलेली स्थलमर्यादा आणि आम्हीं स्वतः ठरविलेलें धोरण यांचा विचार करतां सविस्तर आणि सांगोपांग माहिती देणें व त्यांतून अुपस्थित होणाऱ्या अनेक मुद्यांची विस्तृत चर्चा करणें येथे आम्हांस शक्य नाही म्हणून आम्हीं हा विषय महत्त्वाचे मुद्दे न सोडतां संक्षेपानेच मांडण्याचें योजिलें आहे.

१८७८–८५ तील संमेलनांची प्रेरणा न्या. मू. रानडे यांचीच होती. परंतु ते त्यांचे यत्न विशेषसे फलद्रूप झाले नाहीत. (साधनविभाग परिशिष्टें १।२।१७ पहा.) साहित्य परिषदेसारखी अेखादी संस्था स्थापावी असा त्यांचाहि मनोदय होता असें साठे यांस त्यांनी लिहिलेल्या आणि रा. ठाकूर यांनी पाहिलेल्या रानडे यांच्या पत्रांवरून दिसतें. (वि. ज्ञानविस्तार पुस्तक ४४, अंक २, पृ. ४९; इ. स. १९१३.)

पुढे १९०५–०६ सालीं कांही मंडळींच्या मनाने अुचल केली आणि सातारा पुण्याचीं पहिलीं पहिलीं संमेलनें भरलीं. ही 'कांही मंडळी'च 'साहित्य परिषद्' नांव घेअून काम करण्यास पुढे आली होती. संमेलनांची आवश्यकता सर्वांच्या अनुभवास आल्यानंतर या स्वयंभु साहित्य परिषदेला नियमबद्ध रूप देण्याचा विचार झाला. वंगीय साहित्य परिषद् १८९२ पासूनच काम करीत होती तेंच अुदाहरण डोळ्यांपुढे ठेवून बडोद्यांतील १९०९ च्या संमेलनांत महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नियमांचा मसुदा सादर करण्यांत आला आणि तो तपासून कायम करण्यासाठी समिति नेमण्यांत आली. या समितीने १९१२ सालच्या अकोल्याच्या संमेलनांत बडोदा मसुदा दुरुस्त करून मांडला व तो संमेलनाने मंजूर केला. हा अकोला मसुदा हाच म. सा. परिषदेच्या घटनेचा पहिला प्रमाण मसुदा होय (१९१२). तदनंतर

त्यांत वेळोवेळीं बदल होत गेले. आज आम्हांस म. सा. परिषदेच्या वेळोवेळीं अंमलांत असलेल्या ज्या घटनांचीं मुद्रितें उपलब्ध झालीं आहेत तीं अशीं—

(१) १९१२— अकोला-घटना (संमेलनाच्या अहवालांत)
(२) १९१५— मुंबई संमेलन १९१५ च्या सं. अहवालाच्या अखेरीस दिलेली.
(३) १९२२— (१२ मार्च १९२२ रोजीं संमत झालेली)— स्वतंत्र.
(४) १९२७— (२९ एप्रिल १९२७ ,, ,, ,,)— ,,
(५) १९२८— (५ मार्च १९२८ ,, ,, ,,)— ,,
(६) १९३३— (२८ डिसेंबर १९३२ ,, ,, ,,)— ,,
(७) १९३४— (२४ डिसेंबर १९३३ ,, ,, ,,)— ,,
(८) १९३७— (९ जानेवारी १९३६ ,, ,, ,,)— ,,
व
(९) १९३९— (७ एप्रिल १९३९ ,, ,, ,,)— ,,

याशिवाय १९१७-१८ म्हणजे इंदूर संमेलन १९१७ चे वेळीं 'नियमांची उजळणी' झाली ती घटना (म. सा. पत्रिका जुनी, वर्ष ९, अंक ३, पृ. १४० पहा.)

प्रतिवर्षी संमेलन भरविण्याचें काम या सर्व घटनांत म. सा. परिषदेवर सोपविलेलें आहे, आणि यांतच पुढे झालेल्या संमेलन आणि परिषद् वादाचें बीज आहे. वर्षानुवर्ष चालत आलेल्या या वादांत पुढील मुद्देच महत्त्वाचे आहेत :—

(१) घटनेंत संमेलनाची सत्ता परिषदेवर किती आणि कशी आहे ?
उलटपक्षीं परिषदेची सत्ता संमेलनांवर किती आणि कोणत्या प्रकारची आहे ?
(२) संमेलनाची घटना करण्या-ठरविण्याचा अधिकार कोणाचा ?
तसेंच परिषदेची घटना करण्या-ठरविण्याचा अधिकार घटनेप्रमाणे कोणाचा ?
(३) संमेलनांचे ठराव अंमलांत आणण्याची जबाबदारी परिषदेवर आहे काय ?
असल्यास किती व कशा प्रकारची ?
नसल्यास संमेलनाचे ठराव अंमलांत आणणें घटनेप्रमाणे कोणाचें काम आहे ?

वरील मुद्यांचा विचार करतांना हें ध्यानांत ठेवलें पाहिजे की 'काय आहे !' आणि 'काय असावें !' हे दोन अगदी निराळे प्रश्न आहेत. आधी काय आहे हें पाहावें लागतें, आणि मग काय असावें असें वाटत असेल त्याप्रमाणे 'काय आहे' तें बदलून घ्यावें लागतें. असो. वर दिलेल्या मुद्यांसंबंधांत वरील सर्व घटना अभ्यासून झालेले आमचे निर्णय पुढे दिल्याप्रमाणे आहेत :—

मुद्दा १ ला— घटनेप्रमाणे संमेलनाची परिषदेवरील सत्ता संमेलन ठरावांची अंमलबजावणी अपेक्षिण्यापर्यंतच मर्यादित आहे. उलटपक्षीं संमेलनाला शिस्त लावण्यासाठी नियम करण्याची सत्ता घटनेप्रमाणे परिषदेकडे आलेली आहे.

मुद्दा २ रा— संमेलनाची संपूर्ण घटनाच नाही. जेवढी आहे तेवढी परिषदेनेच तयार करून संमेलनास लागू केली आहे.

उलटपक्षीं घटनेप्रमाणे परिषदेची घटना ठरविण्याचा अधिकार सर्वस्वीं परिषदेचाच आहे. [अकोला, घटना नियम १७ पहावा.]

मुद्दा ३ रा— होय. संमेलन ठरावांची अंमलबजावणी करण्याचें काम परिषदेकडे आहे. परंतु त्याला कांही मर्यादा आहेत.

आमचे निर्णय नमूद केल्यावर आता या निर्णयांची स्पष्टता करूं.

१९१२ त म. सा. परिषदेची घटना पक्की झाल्यावर सर्वांची अपेक्षा साहजिकच अशी होती की आता संमेलनें नियमाने प्रतिवर्षी भरूं लागतील आणि सारीं कार्यें अुत्तम रीतीने होअूं लागतील. पण याच्या अगदी अुलट परिणाम घडून आला ! संमेलनेंच भरेनात ! अशा विपरीत पर्यवसानाचें अुदाहरण अुभ्या भरतखंडांत त्या वेळीं दुसरें क्वचित्च घडलें असेल. १९०५ ते १९०९ पर्यंत प्रतिवर्षी भरत आलेलीं संमेलनें १९१२ नंतर एकाएकीं बंद पडावीं हा काय चमत्कार म्हणावा ! कोणास कांही कळेना. लोकांत विषादाची छाया पसरूं लागली. अशीं तीन वर्षें लोटलीं. मग १९१५ त संमेलनाचें अधिवेशन मुंबईस भरविण्यांत आलें. लोकांचा उत्साह चांगला दिसून आला. पण पुनः संमेलनें अदृश्य झालीं. अखेर इ. स. १९१७ त संमेलनाची बैठक इंदुरांत थाटाने भरली. तेथे मराठी शब्दकोशाची कच्ची योजना आंखण्यांत आली. अशा प्रकारचीं मोठीं कार्यें व्हावीं म्हणून तर म. सा. परिषद् स्थापन झाली. तिचें दैन्य हरण व्हावें म्हणून श्रीमंत महाराज तुकोजीराव यांनी दहा हजार रुपयांची देणगी दिली. श्रीमंत महाराजांच्या मनांत त्या वेळीं क्वचित्च आलें असेल की या देणगीचें रूपांतर स्थिर निधींत होईल. परिषदेने मोठमोठीं कार्यें हातीं घेअून चालविण्याची धमक दाखविली असती तर अशा देणग्या सतत येत राहिल्या असत्या. परंतु द्रव्यदृष्ट्याहि प्रगतीचा मार्ग चालता होण्याऐवजी या देणगीनंतर अवरुद्धच झाला ! घटना केली नि संमेलनें थांबलीं; देणगी मिळाली नि द्रव्यार्जन तेथेच थबकलें !! थबकण्याचा, स्थिरावण्याचा अेखादा रोगच परिषदेच्या प्रकृतींत त्या वेळीं शिरला असावा अशी दृढ खात्री झाली. अिंदुरास श्रीमंत महाराजांनी तर देणगी दिली परंतु 'नशियां'तील बैठकींत सामान्य लोकांनीहि ग्रंथप्रकाशननिधीसाठी आश्वासनें दिलीं. या गरीब लेखकाने सालिना अेक रुपया तहाहयात देण्याचें कबूल केलें. पण या देणग्यांची वसुलीच परिषदेकडून व्हावी तशी झाली नाही. आम्हीं आमचें भिकारसें अुदाहरण वर अेवढ्याचसाठी दिलें की कोणीं कांहीहि म्हटलें तरी आम्हीं स्वतःच्या साक्षीनेच ही परिस्थिति सांगूं शकत असल्याने निःशंकपणें लिहीत आहों. इ. स. १९२० अखेरचा म्हणून जो अहवाल म. सा. प.ने प्रसिद्ध केला आहे त्यांत पृ. १० वर लोकांसच उलट दोषी ठरविण्याचा जो प्रयत्न केला आहे तो सार्वजनिक कार्याच्या सामान्य अनुभवांस विरुद्ध असल्याने ग्राह्य होण्यासारखा नाही. परिषदेच्या तत्कालीन चालकांना लोकांचीं मनें आपल्याकडे ओढून यांचा विश्वास संपादन करतां आला नाही हेंच अपयशाचें खरें इंगित होय.

मध्येंच हें विषयांतर केलें असें वाटेल. परंतु तसें नाही. लोकांचीं मनें परिषदेविषयी विटत कशीं गेलीं असलीं पाहिजेत तें लक्ष्यांत यावें म्हणूनच या कांही बाबींचा निर्देश आम्हीं केला आहे.

असो. अिंदुरासहि परिषदेच्या सभेंत कै. प्रो. ग. स. भाटे व कै. म. रा. बोडस-प्रभृति मंडळींनी कांही बाद केला. परंतु ती कुरबूर प्रतिनिधींच्या कानांपर्यंत गेली नाही. यापुढे तरी संमेलनें प्रतिवर्षी भरत राहतील म्हणून लोकांना आशा वाटूं लागली. परिषदेची द्रव्यचिंताहि हरण झाली तरी पण तिला जडलेला वंशपणाचा रोग तिला चालूंच देअीना ! परिषद् 'म्हैसमंगळु' बनली !! पुनः चार वर्षें लोटलीं आणि १९२१ साल अुजाडलें. मग बडोद्याच्या आमच्या अुत्साही मित्रांनी कंबरा बांधल्या. तेथे 'सहविचारिणी सभा' नांवाची सभा १८९० पासूनच स्थापन झालेली होती. परिषदेपेक्षा ती वयाने बरीच वडील होती. त्या सभेच्या चालकांनी ठरविलें की, संमेलनाचा गाडा चिखलांत रुतला आहे तो बाहेर काढावा !

त्यांनी म. सा. परिषदेकडे लिहिलें. परिषदेने घटना व नियम यांचे आधारें जें उत्तर लिहिलें त्याने संमेलनपरिषद्‌वादाला प्रारंभ झाला. स्वतः कांही न करितां दुसऱ्यांची अडवणूक करण्यास मात्र परिषद् नियमांचे आधारें पुढे येत आहे असा ग्रह बळावूं लागला. परिषदेचे नियम गैर नव्हते; परंतु वर्षानुवर्ष स्वस्थ राहून परिषदेने आपल्यावरील विश्वास पार घालवून टाकला होता! त्यामुळे परिषदेचें हितकर दिसणारें नियमनहि पत्करावयास सहविचारिणी सभा राजी होईना! संमेलन भरविणार सहविचारिणी आणि अध्यक्षपदाची देऊन ठेवलेली सुपारी पुढे करणार परिषद्. श्रीमंत बाबासाहेब अिचलकरंजीकर यांस या समेलनाचें अध्यक्षपद द्यावें असा परिषदेच्या चालकांचा हेतु– नव्हे आग्रह– होता. श्री. बाबासाहेब यांनी म. सा. परिषदेच्या पुणें येथील मंदिरोद्‌घाटनप्रसंगीं केलेल्या भाषणांत जो अुल्लेख केला आहे तो याबद्दलचाच. बडोदेकरांस श्री. न. चिं. केळकरांस अध्यक्षपद द्यावयाची अिच्छा होती. परिषद् ही कोण सासूबाअी, नुसती घरीं बसून हुकूम करूं पाहणार असे वाद वाढून वातावरण गरम होत चाललें. कशाला पाहिजे परिषद्! आपण स्वतंत्रच संमेलन भरवूं असा आग्रह दुसऱ्या बाजूस वाढत चालला. बडोदेकरांनी श्रीमंत महाराज सयाजीरावांच्या परवानगीने संमेलनाच्या तारखा जाहीर केल्याच होत्या. परिषदेचें नियंत्रण झुगारलें जाणार असा रंग दिसूं लागला. संमेलनाचे दिवस अगदी नजीक आले तोंच परिषदेच्या अधिकाऱ्यांनी जाहीर केलें की हें संमेलन नियमाप्रमाणे भरलेलें नाही. म. सा. परिषदेच्या सभासदांनी वाटल्यास वैयक्तिकदृष्ट्या त्यांत भाग घ्यावा! झालें. ३।११।२१ च्या या पत्राने आग अधिकच भडकली. (म. सा. प. जुनी, वर्ष ९, अंक ३, पृ, १४०-१४१.) श्री. संपतराव गायकवाड, श्री. न. चिं. केळकर, रावब. शारंगपाणी वगैरे मोठमोठी मंडळी मध्यें पडली आणि संमेलनाच्या बैठकीच्या पूर्वी कांही दिवस समेट झाल्याचें सर्वत्र जाहीर झालें!!

संमेलनाचें काम अुत्साहाने पार पडलें. पण वादाची खरी मेख होती निराळीच. येथे परिषद् आणि संमेलन यांच्या संबंधी परिषद्‌घटनेंत त्या वेळीं जे नियम होते त्यांचा संबंध येतो म्हणून जरा तिकडे वळतों.

अकोला-घटनेंतील नियम १३ व १४ येणेंप्रमाणे आहेत:—

(१३) परिषदेमार्फत साहित्यसंमेलन होतां होअील तों दरवर्षी भरविलें जावें. असें संमेलन भरविण्याचें काम ज्या ठिकाणीं संमेलन भरेल तेथील 'स्वागतमंडळी'च्या साह्याने **चिटणिसांनी करावें.** (जाड ठसा आमचा)

(१४) अशा संमेलनाच्या वेळीं परिषदेची वार्षिक बैठक व्हावी व तींत वार्षिक अहवाल व हिशेबतपासनिसाने तपासलेला जमाखर्चाचा तक्ता सादर करण्यांत यावा.

नियम १३ प्रमाणे संमेलनें भरविण्याची जबाबदारी परिषदेच्या चिटणीसांवर टाकलेली होती; आणि नियम १४ प्रमाणे परिषदेची वार्षिक बैठक (त्यांत नियम १६ प्रमाणे कार्यकारी मंडळाची नेमणूक व्हावयाची असे) संमेलन भरेल तेथे भरवावी लागत होती.

संमेलनप्रसंगाने परिषदेच्या बाहेरगांवच्या अनेक सभासदांस अनायासें परिषदेच्या सभेस हजर राहण्यास मिळण्याची सोय व्हावी असा या नियमाचा हेतु होता. १९१७ नंतर परिषदेच्या वार्षिक सभा मुंबअीस भरल्या असतील त्यांला बाहेरून पदरखर्चाने किती सभासद हजर राहूं शकले असतील! अेकाददुसराच! पण बडोदें संमेलन कायदेशीर ठरल्याने तेथे परिषदेची वार्षिक बैठक, कार्यकारी मंडळाची निवडणूक वगैरे सर्व करणें क्रमप्राप्त होतें.

आता वादाची आंतील बाजू ध्यानांत आली असेल. परिषदेने जर प्रतिवर्षी संमेलन भरवून वरील १३।१४ नियमांप्रमाणे कारभार केला असता तर लोकांमध्यें गैरसमज व वाद वाढले नसते. परंतु उलट जेव्हां संमेलन भरविण्यास दुसरे पुढे होऊं लागले तर नियमांचे पाशाने त्यांचे हातपाय बांधण्याविषयी मात्र परिषद् जागरूक दिसूं लागली तेव्हा याचा परिणाम लोकमत परिषदेविरुद्ध कलुषित होण्यांत झाला यांत लोकांचा दोष काय ? पुनः लिहितों की परिषदेचे नियम तत्त्वदृष्ट्या योग्य होते आणि परिषदेने आपलें कर्तव्य योग्य रीतीने पार पाडलें असतें तर लोकांनी ते निमूटपणें पाळले असते ! परंतु येथे परिषद् घसरली आणि आता ती पूर्वीची गेलेली अब्रू आणि पत परत मिळविण्यास किती कष्ट पडत आहेत ! ! लोकमतावर परिषदेच्या विरोधाचा इतका वाईट पगडा बसला की अद्यापि जुन्या स्मृति नष्ट झाल्याचें दिसत नाही ! !

बडोद्याच्या संमेलनास परिषदेची परवानगी आयत्या वेळीं मिळाली. परंतु परिषदेच्या वार्षिक बैठकीची व्यवस्था नियम १४ प्रमाणे झाली नाही. खरें पाहतां समेट झाल्यानंतर योग्य मुदतीची आगाऊ सूचना देऊन अशी सभा भरविण्यास अवसरच नव्हता; पण लोकमत इतकें बिथरलें की, लोकांनी बडोद्यास **परिषदेविरुद्ध अखेर बंडच उभारलें ! !** थोर मोठे सर्व बडोदेकर या वेळीं आम्हा बंडखोरांच्या बाजूला होते ! परिषदेची वार्षिक सभा येथेच झाली पाहिजे, नव्या मंडळीस सभासद करून घेतलें पाहिजे, असा सर्वांचा आग्रह होता. परिषदेचे चिटणीस रावसाहेब मोरमकर हाडाचे गरीब होते. त्यांचे करवीं आम्हीं मंडळींनी सभेची सूचना तर काढविली. परिषदेचे एक उपाध्यक्ष– १९१७ च्या इंदूर संमेलनाचे प्राण डॉ. तांबे– यांना आम्हीं बंडखोरांनी आपल्या बाजूस वळविलें आणि २७।२८ नोव्हेंबर १९२१ रोजीं इंदुमती-महालांत परिषदेच्या वार्षिक सभेच्या बैठकी डॉ. तांबे यांच्या अध्यक्षतेखाली भरल्या. नवे सभासद मंजूर झाले. नव्या निवडणुकी झाल्या. मुंबईहून आलेल्या मंडळींत आजचे भाई डांगे हे तरुण मंडळीचे प्रमुख होते. परिषदेचीं खरीं सूत्रें रावब. पाध्ये यांच्या हातांत होतीं. ही सभा कायदेशीर नाही, या सभेने निवडलेलें कार्यकारी मंडळ आपणांस कबूल करतां येणार नाही इत्यादि हरकती रावब. पाध्ये यांनी पुढे मांडल्या आणि श्री. संपतराव गायकवाड व रावब. शारंगपाणी वगैरेंनी भीड घातली तरी आपलें म्हणणें सोडलें नाही. रावब. पाध्ये यांच्या हरकती रास्त होत्या आणि ट्रस्टी म्हणून जी जबाबदारी त्यांजवर होती त्याप्रमाणे आम्हा बंडखोरांचें म्हणणें तेथल्या तेथे मान्य करण्याचा आमचा हट्ट त्यांना कायदेशीरपणें पुरवितां आला नसताहि. परंतु कार्याध्यक्ष वा कार्योपाध्यक्ष रावब. पाध्ये यांच्याविषयी तीच दृष्टि स्वीकारणें शक्य नव्हतें. शेवटीं, परिषदेच्या चालकांनी परिषदेची रीतसर सभा मुंबईस भरवावी आणि तेथे बडोद्याच्या बंडखोर सभेंत पास झालेलें सर्व काम **जसेंच्या तसें** मंजूर करून घेण्याचें आश्वासन पाध्ये यांनी द्यावें असा जोराचा आग्रह मंडळींनी धरला. आपण लवकर सभा भरवूं, तेथे बंडखोर सभेचें काम मांडूं, परंतु तें सर्वच्या सर्व जसेंच्या तसें मंजूर करून घेण्याची हमी आपण देऊं शकत नाहीं तथापि शक्य तितका त्यांतील भाग मंजूर करून घेण्याची खटपट आपण करूं असें त्यांनी मान्य केलें. या वेळीं रावब. पाध्ये यांनी लोकांच्या रोषाला भीक न घालतां, कायदेशीर जबाबदारीच्या दृष्टीने आग्रह धरण्यांत जें धैर्य दाखविलें त्याबद्दल त्यांची तारीफच केली पाहिजे. धैर्य दिसून आलें पण लोकप्रेम रसातळाला जाण्याची पाळी आली याची वाट काय ?

पुढे परिषदेची सर्वसाधारण सभा १२ मार्च १९२२ रोजीं मुंबई मराठी ग्रंथसंग्रहा-

लयांत रा. पाध्ये यांच्या अध्यक्षतेखालीच भरली. त्यांत बडोदा संमेलनांतील काम फक्त विचारांत घेऊन नव्या निवडणुकी केल्या. त्यांत डांगे वगैरे कित्येकांचीं नांवें गाळून बडोद्याचें बाकीचें बहुतेक काम मंजूर झालें. नवे ९६ सभासद १९ फेब्रुआरी १९२२ च्या कार्यकारी मंडळाने मंजूर केले. बडोद्याच्या गरम वातावरणांत ट्रस्टींचे हिशोब कोठे आहेत अशी विचारणा जोराने सर्वजण करीत होते. या सर्वांस उत्तर म्हणून 'महाराष्ट्र साहित्य परिषदेची हकीकत— स्थापनेपासून सन १९२० अखेर' या नांवाचें पत्रक परिषदेने प्रसिद्ध केलें. या पत्रकांत सालो-सालचे हिशेबहि जोडले आहेत ! परिषदेचा प्रसिद्ध असा हा एवढाच अहवाल १९१२ नंतर सभासदांस मिळाला !! किती केलें तरी कांचेचें भांडें, एकदा फुटलें तें परत सांधून येणें कठीण हेंच खेर !

अितकें सगळें झालें परंतु १९२१ नंतर संमेलनांना पुनः टाळेंच लागलें, तें पांच वर्षांनंतर १९२६ सालीं उघडलें !! लोकांनी तरी काय करावें ! त्यांनी संशय घेतले तर त्यांचा काय दोष ! १९२६ सालीं पाध्ये यांनी 'झालें गेलें सर्व विसरून जावें' म्हणून सर्वांची मनधरणी केली आणि पुनः मंडळी शान्त झाली.

१९२७ ला बैठक आम्हीं पुण्यास बोलाविली आणि तेव्हापासून आजतागायत **संमेलनें प्रतिवर्षी नियमाने भरत आहेत.**

किती सुधारणा केली तरी मागील परिणाम थोडेच लवकर बुजण्यासारखे होते ! संमेलनानेच परिषदेस जन्म दिला; परिषद् ही संमेलनाची कार्यकारिणी सभा आहे, नसेल तर केली पाहिजे, या मुद्यांचे रोखाने वेळोवेळींच्या संमेलनांतून आणि संमेलनाच्या वेळच्या वर्तमानपत्रांतून सतत वादप्रतिवाद चालत आले आहेत.

हैदराबाद संमेलनाचे वेळची परिषदेची सभा, तिचा कायदेशीरपणा, मुंबईच्या तेवीस सहीकरांची सभामागणी आणि सभा, परिषदेच्या कचेरीचें स्थलांतर, २७ मार्च १९३२ ची मुंबईची परि. साधारण सभा, त्यांतून जन्मास आलेली पुनर्घटनासमिति आणि अखेर कोल्हापूर संमेलनाचे परिषद्सभेंत झालेला या वादाचा शेवट यांचा अुल्लेख अन्यत्र प्रसंगाप्रसंगाने आलाच आहे. कचेरी पुण्यास आली परंतु परिषदेला संमेलनाची कार्यकारिणी करण्याचा झगडा चालूच राहिला. येथे विचाराच्या सोअीसाठी पुनः वेळोवेळच्या घटनेंतील कांही नियम उतरून देतों.

१९२२ च्या पूर्वीच्या उपलब्ध मुद्रित घटनापत्रकांत संमेलन-ठरावांच्या अंमलबजावणी बाबत कांही नियम असलेला दिसत नाही. मात्र परिषद् प्रथमपासूनच हें अंमलबजावणीचें काम यथाशक्ति करीत आलेली आहे हें स्पष्ट आहे.

(१) १९२२ च्या मुद्रित घटनाप्रतींत १९ वा नियम असा आहेः—

"परिषदेच्या वार्षिक सभेंत व संमेलनांत होणारें काम या परिषदेच्या अुद्देशांस व नियमांस अनुसरून चालेल व तेथे मंजूर झालेल्या ठरावाप्रमाणे कार्य करणें तें परिषदेची कार्यकारी सभा व ठिकठिकाणच्या शाखासभा करतील."

पुढे १९२७ मध्यें ही घटना बदलली. तींतील २३ वा नियम असा आहेः—

"संमेलनांतील मंजूर झालेले ठराव कार्यकारी मंडळाने परिषदेपुढे विचारार्थ ठेवावे" हें कार्यकारी मंडळ परिषदेचें कार्यकारी मंडळ होय आणि परिषदेपुढे म्हणजे परिषदेच्या साधारण सभेपुढे असा अर्थ आहे.

पुनर्घटना समितीच्या शिफारसीनंतर जी नवीन घटना झाली तींत 'नियामक मंडळ'

नवीन निर्माण करण्यांत आलें. शिवाय 'कार्यकारी' मंडळ होतेंच. १९३३ च्या या नवीन घटनेंतील (३१ वा) नियम येणेंप्रमाणे आहे :—

"संमेलनांत मंजूर झालेले सर्व ठराव कार्यकारी मंडळाने 'नियामक मंडळापुढे' विचारार्थ ठेवावे" म्हणजे आता ठरावांच्या विचारांचें काम परिषदेच्या साधारण सभेकडे न राहतां नवीन योजलेल्या नियामक मंडळाकडे आलें. तरीहि 'विचारार्थ' या शब्दाने पळवाट राहते, परिषद् मोकळी राहते, ती पूर्णतया संमेलनाची खरीखुरी कार्यकारिणी होत नाही ही रुखरूख ज्यांस होती त्यांची दौड चालूच होती.

१९३२ नंतरच्या वादाचा मुख्य रोख वरील मुद्यावर होता. संमेलन स्वतंत्र आहे इत्यादि मुद्यांचें प्रतिपादन करून हैदराबाद संमेलनाचे अध्यक्ष डॉ. केतकर यांनी म. सा. परिषदेवर फिर्याद देखील दाखल केली होती ! कोल्हापूर संमेलनाचे अध्यक्ष श्रीमंत सयाजीराव महाराज यांस त्यांनी नोटिसहि दिली होती. परंतु केतकरांना हवा तसा पाठिंबा कोणीं दिला नाही आणि केतकरांच्या खिलाडू वृत्तीमुळे हें प्रकरण विकोपास गेलें नाही. पण वाद कांही मिटला नाही.

परिषद् ही १८६० च्या २१ व्या कायद्याप्रमाणे रजिस्टर झालेली संस्था होती. ती कायदेशीर रीत्या परिषदेच्या सभासदांसच फक्त जबाबदार होती. संमेलनाचे बहुसंख्य प्रतिनिधि परिषदेच्या बाहेरचेच असतात. तेव्हा अशा बाहेरच्या मंडळींनी मंजूर केलेल्या ठरावासंबंधांत परिषद् कशी पूर्णतया कार्यकारिणी होणार ? हे बाहेरचे ठराव नियामक मंडळाने 'दत्तक' करून घेतल्यावर मग ते परिषदेचेच समजून परिषदेच्या कार्यकारिणी सभेने त्यांचा अंमल करावा एवढेंच परिषदेस शक्य होतें व न्यायाचेंहि तेवढेंच तिच्याकडून अपेक्षिणें योग्य होतें. बिनसभासदांचे ठराव वर्गणी भरून सभासद झालेल्यांनी अंमलांत आणावे असें म्हणणें कोणत्या युक्तीस धरून होतें तें आमच्या तरी बुद्धीस उमजत नाही. कायदा आणि घटना हीं घटकाभर बाजूस ठेविलीं तर लोकांची अडचण ध्यानांत घेण्यास सोपें जाईल. संमेलनांना सोहोळ्याचें स्वरूप आहे. परिषदेपेक्षा संमेलनांचाच गाजावाजा वर्तमानपत्रें करतात. शेकडों लोक संमेलनांत हजर राहतात. मातृभाषेविषयी प्रेम उत्पन्न करणें, साहित्यिकांचा आणि जनतेचा संबंध जोडणें, साहित्यिकांच्या परस्पर भेटीगांठी होणें आणि अनेक साहित्यिक प्रश्नांबाबत चर्चा करणें व लोकमत तयार करणें आणि त्यास इष्ट तें वळण देणें हीं व असलीं कार्यें संमेलनांनीच केलेलीं आहेत. अशा संमेलनांस पदरमोड करून हजर राहावें, तेथे ठराव पास करावे पण त्यांची अंमलबजावणी मात्र मनाजोगती होऊं नये, याचा लोकांस विषाद वाटणें साहजिकच होतें. परिषदेकडेच संमेलनें भरविण्याचा अधिकार आहे; संमेलनाध्यक्षाची निवडहि परिषदेच्या संमतीशिवाय होऊं शकत नाही; परिषदच आजवर या नाही तरी त्या प्रकाराने जर संमेलनाची कार्यकारिणी म्हणून वावरत आलेली आहे तर परिषदेनेच संपूर्णतया संमेलनांची कार्यकारिणी कां होऊं नये ? या युक्तिवादाचा रोख कांही अयोग्य म्हणतां येत नाही. ठरावांची जर अंमलबजावणी नियमाने करवून घेण्याचा आणि जाब विचारण्याचा अधिकार संमेलनांस नसेल तर संमेलनें तरी भरवावीं कां आणि तेथे भाराभर ठराव तरी पसार करावे कां ! हजारों रुपयांचा व्यर्थ चुराडा कां करावा ! या परिस्थितीवर दोन प्रकारांनी तोड निघण्यासारखी होती. एक म्हणजे संमेलनाने परिषदेपासून पूर्णपणें स्वतंत्र व्हावें, आपली घटना बनवावी, आपली कार्यकारिणी नेमावी आणि आपला कार्यभाग उरकून घ्यावा; किंवा दुसरी म्हणजे परिषदेला पूर्णतया आपल्या कार्यकारिणीचें स्वरूप द्यावें.

पहिला पर्याय अवलंबावयाचा म्हटलें तर आज पंचवीस तीस वर्षें चालत आलेली परंपरा मोडावी लागणार आणि शिवाय परिषद् आणि संमेलन अशा दोन स्वतंत्र संस्था नांदूं लागणार. जेथे अेकीचाहि संसार घडपणें चालविण्यास आपण समर्थ झाल्याचें दिसून येत नाही तेथे दोन निराळ्या स्वतंत्र संस्था चालविण्याचा मार्ग कांही मोठासा शहाणपणाचा ठरणार नाही. महाराष्ट्र साहित्याच्या अनेकविध प्रश्नांसंबंधाने अधिकाराने बोलणारी आणि काम करणारी एकच संस्था असल्यास त्याचा अधिक सुपरिणाम होअील हें अुघड आहे. द्वैताने शक्ति क्षीण होते. आणि आपली शक्ति दुप्पट किंवा चौपट कशी होअील हीच काळजी नित्य वाहिली पाहिजे. असा विचार केला म्हणजे संमेलनांनी स्वतंत्र घटना करून नांदण्याचा पक्ष स्वीकारण्यास मन सहसा अनुकूल होत नाही. राहतां राहिला दुसरा पर्याय. अिंदुरास १९३५ त संमेलनाची घटना करावी म्हणून ठराव झाला (वर्गीकृत ठराव क्र. २१) परंतु त्यांत महाराष्ट्र साहित्य परिषद् संमेलनांची कार्यकारी संस्था राहावी हें मूलभूत तत्त्व ठेवलें होतें.

सांप्रतची प्रगति त्याच घोरणाने घडून आलेली आहे. ती कशी तें जरा वेळाने पाहूं. परंतु या दिशेने जावयाचें तर शेवटीं या निर्णयाला पोंचावेंच लागतें की परिषद् आणि संमेलन हीं नांवें दोन राहिलीं तरी ज्या ठरावांची अंमलबजावणी परिषदेकडून व्हावयाची ते ठराव परिषदेचे सभासद नसणाऱ्यांनी मंजूर केलेले असतां कामा नयेत. यांतून अर्थ अेवढाच निघतो की असले ठराव पसंत करणारे संमेलन सभासद परिषदेचेहि सभासद असले पाहिजेत आणि या कामापुरतें संमेलन म्हणजे परिषदेची अेक साधारण सभा म्हणूनच तिचें काम चालविलें पाहिजे.

तेव्हा आता वरील प्रकरणीं वेळोवेळची वस्तुस्थिति कसकशी आढळून येते तें पाहूं.

१९१२ सालच्या घटनेंतील १२।१३।१६ अित्यादि नियम पाहतां परिषद् आणि संमेलन यांच्या बैठकी संमेलनाच्या जागीं पण निरनिराळ्या भरावयाच्या अशी मांडणी दिसते. ही घटना बरीच मोघम आहे. संमेलनाची व्यवस्था या घटनेंत परिषदेच्या चिटणिसांवर सोपविलेली आहे. संमेलनाचे सभासद कोणीं व्हावें याविषयी कांही निर्बंध तींत आढळत नाहीत. येथे पुनः थोडे नियमांकडे वळूं.

१९२२ च्या घटनेंतील २३ वा नियम असा आहे :– "महाराष्ट्रसाहित्यपरिषदेचे व शाखासभासदांचे सभासद व परिषदेने केलेल्या पोटनियमान्वयें कार्यकारी सभेने नोंदलेल्या इतर संस्थांच्या सभांचे सभासद [संस्थांच्या सभांचे म्हणजे काय? सं.] यांनाच *फक्त संमेलनांत किंवा अधिवेशनांत प्रतिनिधि म्हणून येतां येईल. इतर लोक प्रेक्षक किंवा निमंत्रित पाहुणे म्हणून येऊं शकतील. पण त्यांस मत देण्याचा अधिकार नाही." १९२१ च्या बडोदें संमेलनाच्या वेळीं वाद माजण्याला असलाच नियमहि कारण झाला. एक तर असला नियम आपणांस पूर्वी कळविला नव्हता अशीहि तक्रार बडोदेकरांनी केलेली आढळते (दहावें मराठी साहित्य संमेलन, अहवाल, प्रस्तावना पृ.१७ आणि म. सा. पत्रिका, जुनी वर्ष ९, अंक ४, पृ. १७४-७५.) हे शाखासभा वगैरे विषयीचे नियम इंदूर संमेलनाचे वेळीं झालेल्या नियमांच्या 'उजळणी'-नंतर तयार झाले होते आणि याच ७।८।९।१०।११ क्रमांकांच्या नियमांवरून हा सारा वाद माजला होता. सहविचारिणी सभा जुनी, वडील. ती परिषदेची शाखा होण्यासच तयार नव्हती. पण शेवटीं तडजोड झाली तेव्हा संमेलनापुरती ती शाखा-सभा झाली. पुढे १९२७ च्या घटनेंत वरील नियमांतील *फक्त या शब्दाच्या पूर्वी पुढील शब्द जोडण्यांत आले– "आणि संमेलनाचें स्वागतमंडळ ठरतील त्या अटींवर प्रतिनिधि होणाऱ्यांसच". या-

प्रमाणे नियम थोडा शाब्दिक फरक (१९३४ घटना, नियम ४५) सोडला तर १९३४ पावेतो कायम राहिला. नागपूर संमेलनांत विषयसमितींत हा प्रश्न पुनः पुढे आला आणि कडाक्याचा वाद होऊन एक ठराव करण्यांत आला (वर्गीकृत ठराव क्र. १५). या ठरावांत नवीन व्यवहार्य योजना आंखून परिषद्-संमेलनविषयक एक नवीन घटना तयार करावी व ती संमेलनापुढे मंजुरीसाठी मांडावी असें ठरलें. अर्थात् 'मंजुरी'चें कलम परिषदेच्या स्वयं-प्रभुत्वाला विरोधी असल्याने परिषदेच्या बऱ्याच चालकांना मान्य नव्हतें. म्हणूनच या ठरावांतील 'भाव' पाहून त्यास मान्यता दर्शवावी असा इषारा आम्हीं या प्रसंगीं दिला होता (१८ वें म. सा. सं. अहवाल पृ.८). हा ठराव 'प्रचंड बहुमताने' मंजूर झाला. या ठरावाचा विचार करून परिषदेने एक **परिषद्-संमेलन-समिति** नेमली. या समिती-च्या शिफारशी (म. सा. पत्रिका वर्ष ७, अंक ३, पृ.३६२-३६६) प्रसिद्ध झाल्या आहेत. या समितीने घटनेंत असा बदल सुचविला की, जेणेंकरून परिषद् संमेलन-ठरावांची शक्यतो अंमलबजावणी करण्यास बांधली जाईल. वरील परिषद् संमेलन समितीने सुचविलेली योजना दिसण्यांत थोडीशी गुंतागुंतीची असली तरी परिषद्-संमेलन-संबंध निश्चित करण्याचा जो दृष्टिकोन आणि जी दिशा या समितीने पुढे मांडली तोच दृष्टिकोन आणि तीच दिशा स्वीकारण्यांत आली तरच या जुनाट आणि शक्तिपात करणाऱ्या वादाचें उच्चाटन होईल असा आमचा दृढ अभिप्राय आहे. वरील समितीच्या योजनेचें विवरण आम्हीं बडोदें संमेलनांत १९३४ सालीं केलें आणि यद्यपि वर्तमानपत्रांतून आणि प्रत्यक्ष बडोदें संमेलन १९३४ च्या इतिवृत्तांत (म. सा. सं. १९ वें, पृ. २३ संमेलनवृत्त) आमचे विवरणाला वश होऊन ही नवीन 'घटना संमेलनाने मान्य केली' असें म्हटलें तरी ती आम्हीं संमेलनास केवळ सादर केली हेंच सत्य आहे. मंजुरी-साठी मांडली नाही. यावरूनच इंदूर संमेलनांत, अध्यक्षीय भाषण संपतें न संपतें तोंच, एक विलक्षण खळबळ उडविणारी घटना घडून आली. नवे नियम प्रथमच इंदूर संमेलनप्रसंगीं अंमलांत यावयाचे होते. या नियमांप्रमाणे संमेलनाच्या विषयसमितीची घटना विशेष प्रकारें मर्यादित केली होती. एकंदर पूर्वापार इतिहास समजावून न घेतां किंवा त्याबाबत विकृत समजूत झाल्यामुळे किंवा इतर कारणांमुळे आपल्या प्रतिनिधित्वाचे हक्कावर घाला आला असें समजून एकाएकीं असंतोष माजण्याची भीति वाटल्यावरून इंदूर स्वागतमंडळाने आम्ही 'नियमाप्रमाणे चालण्यास सिद्ध नाही' असें कळविलें. एकदम विद्युत्पात व्हावा तसें हें झालें. जिकडे तिकडे मंडळी गडबडून गेली. 'आम्हीं नियम मान्य केले ते अशा समजुती-वर की हे नियम बडोदा संमेलनाने मंजूर केले आहेत; पण जर हे नियम नुसते सादर केले होते, संमेलनाने मंजूर केले नव्हते, तर आम्ही त्यास अनुसरण्यास कबूल नाहीं' असें इंदूरकरांचें म्हणणें पडलें ! विलक्षण परिस्थिति उद्भवली आणि अखेर इंदूर संमेलनापुरते हे नियम स्थगित करण्यांत आले. पण एवढ्यावरच धुसपूस थांबली नाही. संमेलनाने एका **नवीन घटनासमितीची** (वर्गीकृत ठराव क्र. २१) स्थापना केली म्हणजे परिषदेची **परिषद्संमेलनसमिति** आणि इंदूर संमेलनाने नेमलेली **संमेलनघटनासमिति** अशा दोन (परिशिष्ट २२ पाहा.) समित्या कायम झाल्या. दोन्ही समितींवर आमचें नांव होतें आणि दोन्हीकडे आम्हीं काम केलें. दोन्ही समित्यांनी आपापलीं कामें अत्यंत तत्परतेने आणि हिरिरीने केलीं. हें द्वैत टळेल तर पाहावें म्हणून बरेच यत्न झाले आणि शेवटीं मुंबईस रा. दाजीसाहेब तुळजापुरकर यांच्या बद्रिका-श्रमांत उभय समितींच्या स्वतंत्र आणि संयुक्त सभा होऊन कांही निर्णय ठरले आणि त्यांस

अनुसरून (वर्गीकृत ठराव २२ पाहा.) जी घटना झाली तीच सांप्रत अंमलांत आहे. या मुद्याकडे पुनः वळण्यापूर्वी आणखी एक दोन वादाच्या बाबींचा थोडक्यांत परामर्श घेऊं.

परिषदेच्या घटनेंतील आणखी अेका योजनेवर पूर्वी अत्यंत तीव्र आघात केले जात असत. ही योजना अि.स. १९२२ च्या घटनेंतील २१ व्या नियमांत समाविष्ट आहे. परंतु तिचा जन्म १९१७ च्या अिंदूरसंमेलनानंतर झाला असावा असे दिसतें (१९२१ चें बडोदें संमेलन अहवाल, प्रास्ताविक पृ. १७ पाहा), हा नियम असाः—

"२१. संमेलनाचे वेळीं दिलेल्या देणग्या, पारितोषकें व नजराणे आणि संमेलनाचा सर्व खर्च भागून बाकी अुरल्यास त्याची **चौथाअी** परिषदेच्या निधींत जमा होअील व त्याचा घटनेच्या ९ व्या कलमाप्रमाणे किंवा कार्यकारी सभा ठरवील त्याप्रमाणे विनियोग होअील." १९२७ व १९२८ च्या घटनापत्रकांत हा नियम अस्तित्वांत असलेला दिसतो. पण १९३३ पासून पुढील घटनापत्रकांत तो आढळत नाही. अितकेंच नव्हे तर १९३७च्या घटनापत्रकांतील ६३ वा नियम पाहिला म्हणजे मजल कशी अुलटली याची स्पष्ट कल्पना येअील. हा ६३ वा नियम येणेंप्रमाणेः—

"६३. संमेलनाच्या खर्चासाठी संमेलन भरविणाऱ्या संस्थेस जरूर पडल्यास परिषदेने शंभर रुपयेपर्यंत मदत करावी." आणि हाच नियम आजमितीस(१९४३)हि कायम आहे.

मूळ 'चौथाअी'चा नियम करणारांचा हेतु परिषदेचा द्रव्यकोष पुष्ट करण्याचा होता. ज्या मोठ्या आकांक्षा आणि जे व्यापक हेतु परिषदेने आपल्यासमोर, निदानपक्षीं कागदावर तरी, मांडून ठेवले होते आणि ज्यासाठी संमेलनांचे खटाटोप करण्याचें अंगीकारलें होतें त्या मूळ मुद्याकडे लक्ष्य दिलें तर चौथाअीसारखी परिषदेच्या पोषणाची कांही व्यवस्था अवश्यमेव व्हावयास पाहिजे होती. म्हणजे तत्त्वतः पाहतां असा नियम अयुक्त ठरवितां येणार नाही. तथापि परिषदेचे १९१२ पासून २७ पावेतोचे चालक ज्या धोरणाने वागत होते त्याचें पर्यवसान लोकप्रीति गमावण्यांतच झालें आणि त्यामुळे 'चौथाअीवाले' अशी त्यांची हेटाळणी होऊं लागली! चौथाअीच्या धोरणास अनुसरून परिषदेस काय फलप्राप्ति झाली याची कल्पना परिशिष्ट ८ मध्ये दिलेल्या आंकडेवार माहितीवरून होअूं शकेल. येथे दोनच वेचक अुदाहरणें देतों म्हणजे या प्रकरणींचें वर्म स्वच्छ-ध्यानांत येअील. अि.स.१९१२ सालीं अकोला संमेलनाचें सूप वाजल्यानंतर अकोला संमेलन स्वागत मंडळाची जी सभा आक्टोबर १९१२ त भरली तींत अखेर शिलकेचा विनियोग "**वऱ्हाड (प्रांतिक) साहित्य-परिषदेकडे**" करण्याचा अधिकार रावब. महाजनी यांस देण्यांत आला (म. सा. पत्रिका जुनी वर्ष १, अंक १ पृ.९). खरोखरच अशी प्रांतिक साहित्य-परिषद् होअून ती जर वाढीस लागली असती तर किती अुत्तम गोष्ट झाली असती! शिलकांचा विनियोग करतांना प्रांतिक संघटनेवर मुख्य दृष्टि दिली जाणें सहज होतें. १९१२ नंतर सुमारें तीस वर्षांनी १९४१ त सोलापुरीं भरलेल्या संमेलनाच्या शिलकेचा विनियोग "सोलापूर साहित्यनिधि ट्रस्ट" निर्माण करण्याकडे करण्यांत आला! (पाहा सोलापूर अहवाल पृ.३१-३२). आणखी अुदाहरणें हवीं असतील तर हीं दोन देअूं. अि.स. १९३३ च्या नागपूर संमेलन शिलकींतून दोन हजार रुपये 'अंकित' करून देण्यांत आले (नागपूर संमेलन अहवाल पृ.२६) आणि बडोदें संमेलना(१९३४)च्या शिलकेंतून १६०८/१० रुपये "सहविचारिणी सभेस अिमारतफंडाकरिता सुपूर्त केलें" (बडोदा अहवाल, अखेरचें पान, हिशेब व पृ.२५ संमेलनवृत्त).

याप्रमाणे प्रांतिक कार्योकडे कल झुकता राहिला तथापि म. सा. परिषदेला अल्पस्वल्प 'नजराणा' बहुतेक सर्व स्वागत मंडळांकडून मिळत राहिला. संमेलन ठरावांची अंमलबजावणी वास्तविक फार कसोशीने व्हावयास पाहिजे. प्रथमपासून हें कार्य परिषदेकडेच आलेलें आहे आणि तें वाजवीच आहे. पण परिषदेच्या या अंमलबजावणीवर रुष्ट झालेल्यांनी ग्वालेरीस (१९२८) संमेलनाचें स्वतंत्र अंमलबजावणीमंडळ नेमिलें (ग्वालेर; वर्गीकृत ठराव ३५६) परंतु ज्या आशेने आणि आवेशाने अंमलबजावणीमंडळ नेमिलें ती आशा आणि तो आवेश सफल करण्यासारखें कांहीहि काम या मंडळाकडून निष्पन्न झालें नाही. सर्व 'ऑफस्' झालें ! पुढे हैदराबाद संमेलनाचे अध्यक्ष डॉ. केतकर यांच्या अध्यक्षतेखाली परिषदेशीं सहकार करून व जरूर तर स्वतंत्रपणें संमेलनठरावांची अंमलबजावणी करण्यासाठी समिति नेमण्याचा प्रयोग झाला (वर्गीकृत ठराव क्र.११). या समितीची तर सभाच भरली नाही ! डॉ. केतकर यांनी कांही पत्रकें मात्र प्रसिद्ध केलीं आणि अखेर कोल्हापूर संमेलनांत दप्तर म. सा. परिषदेच्या हवालीं करावें असें ठरलें (वर्गीकृत ठराव क्र.१२). या प्रकरणीं निरनिराळ्या संमेलनांतून मंजूर झालेले पुढील ठराव पाहणें अुपयुक्त होअील. वर्गीकृत ठराव क्र.६।१०।११।१२।१५।२१।२२। २६९, २८६, २९१ आणि ३५६. अलीकडे परिषदेकडून संमेलनठरावांच्या अंमलबजावणीची खटपट होते आणि ही खटपट अहवालरूपाने संमेलनास नियमेंकरून सादर केली जाते. आज केली जाते यापेक्षाहि चिकाटीने, तडफेने आणि सातत्याच्या नेटाने अंमलबजावणी करणें अिष्ट आणि आवश्यकहि आहे असें आम्हांस वाटतें. नगरसंमेलना(१९३९)च्या अध्यक्षांनी ठरावअंमलबजावणी प्रकरणीं आपला अहवाल प्रसिद्ध करून (अग्रणी ता. २९ अेप्रिल १९४०) तो रत्नागिरी संमेलनास सादरहि केला. या अहवालांत अंमलबजावणीनिधीची कल्पना व अितर अनेक सूचना ग्रथित झालेल्या आढळतात. या प्रकरणीं अनुभवी मंडळीकडून आणखीहि सूचना व योजना येअूं शकतील. परिषदेकडून अंमलबजावणीप्रकरणीं तत्परतेने कार्य होअूं लागलें आहे. माणूसबळ व द्रव्यबळ वाढण्यावर अधिक नेटाची खटपट अवलंबून आहे. या प्रश्नाचा बारकाअीने खल करून आजवरच्या अनुभवाचे आधारें कांही अधिक कार्यक्षम योजना केली पाहिजे असें आम्हांस वाटतें. पुढेमागे असें कांही तरी करावें लागेलच.

परिषदेला अधिक प्रातिनिधिक स्वरूप प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने सभासदांचे प्रादेशिक गट पाडून गटवार प्रतिनिधींनी ग्रथित असें नियामक मंडळ निर्माण करण्याची योजना इ. स. १९३३ सालीं झाली. अद्यापि सर्व कार्यभार कार्यकारी मंडळावरच पडतो. नियामक मंडळाचें अभिप्रेत कार्य जसें व्हावें तसें होत नाहीं असें आम्हांस वाटतें. पण तोहि विषय येथे अधिक चर्चिणें योग्य होणार नाही.

गेल्या (१९४२) नाशिक संमेलनांत प्रचलित संमेलनें चालू ठेवूनहि आणखी विशिष्ट संमेलनें भरविण्याचा जो ठराव (वर्गीकृत क्र. २९६) मान्य झाला आहे त्याचाहि येथे उल्लेख केला पाहिजे. या ठरावाचा रोख मार्मिकांच्या ध्यानांत आल्याशिवाय राहणार नाही.

एकंदरीत संमेलन व परिषद् यांच्या परस्पर संबंधांत काय काय घटना घडल्या आणि काय हर्षामर्ष, वादविवाद, सुधारणा, वगैरे झाल्या यांची आवश्यक कल्पना येथवर केलेल्या विवेचनावरून येईलच. आता सांप्रत जी घटना अंमलांत आहे तिकडे पाहूं. ही घटना मोठ्या खडाजंगी वादाच्या समुद्रमंथनांतून कशी जन्मास आली तें मागे उल्लेखिलेंच आहे. या घटनेचा 'सरनामा' महत्त्वाचा आहे आणि तो लक्ष्यांत घेऊनच पुढील पाऊल टाकावें लागेल. सरनाम्यांतील शब्द असे आहेत :—

"महाराष्ट्र साहित्य संमेलन व महाराष्ट्र साहित्य परिषद् या दोन संस्था एकत्र बनतील अशा धोरणाने परिषदेचा विकास व्हावा आणि महाराष्ट्रांतील सर्व साहित्यिक परिषदेचे सभासद होऊन संमेलन ही परिषदेची वार्षिक साधारण सभा व्हावी हें या घटनेचें अंतिम साध्य आहे. त्यासाठी निरनिराळ्या प्रादेशिक विभागांतील परिषदेच्या सभासदांची संख्या पुरेशी झाल्यावर, किंवा एकंदर सभासदांची संख्या निदान एक हजार झाल्यावर, हें साध्य सिद्ध होईल अशी सुधारणा या घटनेंत करण्यांत येईल."

सरनाम्यांतील धोरणास अनुसरून परिषदेचे सभासद वाढविण्याचे प्रयत्न चालकांकडून अत्यंत परिश्रमपूर्वक करण्यांत आले आहेत. १९४२ जुलै अखेर म. सा. परिषदेच्या पटावर ८५९ सभासद होते. गळती-भरतीचा वेग पाहून स्थिर सभासदसंख्येचा आंकडा कदाचित् याहून कमीच धरावा लागेल. एक हजारापर्यंत पोचण्याच्या दृष्टीने पुष्कळच मजल परिषदेने गाठली असें यावरून म्हणण्यास प्रत्यवाय नाही. प्रादेशिक विभागांतील सभासदसंख्येची वांटणी कशी आहे तें गटवारीचे जे आंकडे परिशिष्टांत (क्र. २० वें) दिले आहेत त्यावरून समजून येईल.

येणेंप्रमाणे परिस्थिति आहे. मराठी साहित्याचे संवर्धांत प्रगतीचा जो इष्ट बिंदु आपणांस गांठावयाचा आहे त्या दृष्टीने आपलें बळ आपणांस अद्यापीहि पुष्कळ पटीने वाढविलें पाहिजे. म. सा. परिषद् ही अखिल महाराष्ट्रीयांनी शिरोधार्य मानलेली एकमेव प्रधान साहित्यसंस्था म्हणून सर्वमान्य व्हावी आणि या सर्वमान्य संस्थेच्याच छत्राखाली सर्व महाराष्ट्राच्या साहित्यकारणाच्या हालचाली एकसूत्रतेने घडून याव्या. हें घडेल तेव्हाच कृतार्थतेचें श्रेय आपल्या पदरीं पडेल !*

प्रकरण साहावें

कार्यकर्त्यांच्या सेवेचा परामर्श

कोणतींहि मोठालीं कार्यें अथवा संस्था नांवारूपाला येतात त्याला अनेकांची सेवा, सल्ला, सदिच्छा आणि सहानुभूति हीं कारण होत असतात. अर्थात् अशा कार्यांचें आणि संस्थांचें यश वास्तविक पाहतां एक प्रकारें सामुदायिकच असतें. असें असलें तरी हेंहि तितकेंच खरें की कित्येक निवडक व्यक्ति अशा दाखवितां येतात की त्यांच्या सेवेचा सनामक विशिष्ट निर्देश केला असतां सामुदायिक यशाला कमीपणा न येतां एका रीतीचा उठावच मिळतो.

म. सा. संमेलनें आजवर ठिकठिकाणीं भरलीं त्या पायीं तर अक्षरशः शेकडो मंडळींचें साहाय्य

---

* **'विहगमावलोकन'** साधन विभाग, परिशिष्ट ७ वें, हें प्रकरण संमेलनांचें स्थूल वर्णन करणारें प्रकरणच आहे; आणि तें वृत्तविभागांतच शोभण्यासारखें आहे. तरी जिज्ञासू वाचकांनी तें संमेलन-परिषद् प्रकरणांचा विचार करतांना वाचणें लाभदायक होईल.

वर्गीकृत ठराव [१९०९ ते १९४२ अखेर संमेलनांतून झालेल्या ३६१ ठरावांचें वर्गीकरण केलेले ठराव परिशिष्ट ९ पुरवणी व खुलासा यांसह आणि परिशिष्ट १८ वें व २४ वें] आणि इतर संमेलन-विषयक परिशिष्टेंहि जरूरीप्रमाणे पाहावीं.

झालेलें आहे; आणि ह्या संमेलनांचे जे वृत्तान्त प्रसिद्ध झाले आहेत त्यांत त्या त्या मंडळीच्या विशिष्ट सेवेचा निर्देशहि नामोल्लेखपूर्वक आलेला आहे. कोणाच्या नुसत्या नांवाने किंवा उपस्थितीमुळे कार्यास वजनदारी प्राप्त होते तर कोणाकडून द्रव्याची मदत मिळून कार्यें सुकर होतात. दुसऱ्या कोणाचें बौद्धिक साहाय्य उपयोगी पडतें तर तिसरे कोणी अंगमेहेनतीनेच कार्याला सफलता मिळवून देतात. असे यशाचे वांटेकरी अनेकानेक मिळाले म्हणूनच महाराष्ट्र साहित्यसंमेलनें यशस्वी झालीं आणि आजची लोकमान्यता व लोकप्रियता त्यांस लाभली. या सर्व विद्यमान व गत साहाय्यकांचें ऋण या लहानशा ग्रंथांत पुनश्च नामनिर्देशपूर्वक गाण्यास अवकाश नाही म्हणून समष्टिरूपानेच त्यांस धन्यवाद देणें प्राप्त आहे.

म. सा. परिषदेची स्थिति मात्र थोडी निराळी आहे. फिरत्या वार्षिक संमेलनांप्रमाणे तिचें स्वरूप अ-घटित नाही. घटनाबद्धतेमुळे म.सा.परिषद् आपणांस अधिक साकारतेने पाहतां येते. म्हणून समष्टिरूपाने जसा तिच्या सेवकांचा परामर्श घेतां येईल तसाच व्यष्टिरूपानेहि तो घेणें कांहीसें शक्य व सुकर आहे. अनेकांच्या सदिच्छादिकांचा लाभ संमेलनांप्रमाणे म. सा. परिषदेसहि घडलेला आहे. परंतु तिचें सदस्यत्व स्वीकारून आणि नंतर तिचे पदाधिकारी बनून आपलीं नांवें परिषदेशीं वर्षानुवर्ष ज्यांनी संलग्न करून ठेविलीं आहेत आणि विविध रीतीने परिषदेला नांवारूपाला आणण्यास्तव जे झटले आहेत त्यांचा आणि त्यांच्या सेवेचा सनाम निर्देश यथामति या ग्रंथांत करणें हें या इतिहासास पूर्णता आणण्यास अवश्य आहे यांत शंका नाही. हें काम नाजूक निःसंशय आहे; आणि इतिहासकाराची जबाबदारी वाढविणारेंहि आहे. तें योग्य रीतीने पार पाडलें तर ठीक; नाहीपेक्षा तें न केलें तरीहि चालेल असा पक्ष मनांत धरून माझील प्रकरणांतून प्रायशः तेंच धोरण अवलंबिलें आहे. म. सा. परिषदेच्या पदाधिकाऱ्यांची वर्षानुक्रमानें आणि पदाधिकारानुसाराने एक सूचिहि तयार करून साधनविभागांत परिशिष्ट १९ मध्यें दिली आहे. तींत परिषदेच्या कार्याशीं संबद्ध होऊन राहिलेल्या बहुतेक सर्व ज्ञात व्यक्तींचा नामोचार तरी झालेला आहे. तथापि केवळ अशा सूचीवरच न भागवितां विशिष्ट सेवकांच्या कामगिरीचें थोडक्यांत पर्यालोचन करणारें स्वतंत्र परामर्श प्रकरण लिहावें हेंच उचित असा परिषदेच्या कार्यकारी मंडळाचा आग्रह पडल्यावरून थोडें भीतभीतच कां होईना हें प्रकरण लिहिण्याचें धाडस केलें आहे. इतिहासकाराची पवित्र भूमिका स्मरून प्रयत्न तर केला आहे तथापि यांत ज्या उणीवा आढळतील त्याकडे सदय दृष्टीने पाहावें अशी आगाऊच वाचकांची विनवणी करून ठेवतों. विशेषतः इतिहासकारास जशी भरपूर कच्ची सामग्री लागत असते तिचा अभाव या प्रकरणीं कसा नडला असेल तिकडे दुर्लक्ष्य होऊं नये एवढी सावधानता सर्वांनी ठेवावी.

न्या. रानडे आणि लोकहितवादी यांची पिढी टाकून आपण एकदम अर्वाचीन युगाकडेच वळूं. या युगांत परिषदेच्या सेवकांपैकी पहिलें नांव जर कोणाचें घ्यावयाचें असेल तर तें कै.गु. वासुदेवरावजी आपटे यांचेंच होय. विशेषतः त्यांचेच निरलस प्रयत्न परिषदेच्या बाळपणीं (१९०६ ते १२) तिच्या पोषणास उपयोगी पडले. मराठी ग्रंथकारांस संमेलनरूपाने एकत्र आणून परिषदरूपाने त्यांना संघटित करण्याची प्राथमिक कामगिरी वासुदेवरावजींनीच मुख्यत्वें केली.

वि. विस्ताराचे सुयशस्वी संपादक म्हणून पंचवीस वर्षें ज्यांनी विस्ताराची सेवा मनोभावें केली ते कै. रावसा. रामभाऊ मोरमकर हे १९१२ सालीं म. सा. परिषदेचे चिटणीस झाले ते १९२३ त त्यांच्या अंतकालपावेतो त्या पदावर अधिष्ठित होते. रावसा. मोरमकर

स्वभावाने प्रेमळ, लोकसंग्रही व मार्मिक असून विस्ताराप्रमाणेच परिषदेच्या पत्रिकेसाठीहि त्यांनी पुष्कळ झीज सोसली होती. तथापि परिषदेचें पाअूल कांही त्यांच्या हातून विशेष पुढे पडलें नाही. "त्यांच्या चिटणीशी अंमलांत म. सा. परिषदेने विशेष वाहवा करण्याजोगीं कार्यें सिद्धीस नेलेलीं नाहीत हें खरें" अशी प्रांजलपणाची पण वस्तुस्थितिनिदर्शक कबुली विस्ताराच्या नव्या संपादकांनीहि (वि. विस्तार वर्ष ५४।११; नोव्हेंबर १९२३ पृ.४७६) दिलेली लक्ष्यांत घेण्यासारखी आहे. "पण त्याचा दोष म. सा. परिषदेची अंतर्गत माहिती असणारे केव्हाहि रावसाहेबांना देणार नाहीत" असा जो निर्वाळा त्यांनी तेथेच दिला आहे तोहि आमच्या समजुतीप्रमाणे व माहितीप्रमाणे सत्य आहे. कै वासुदेवराव आपटे हे अगदी आंतले माहितगार ना? त्यांनी स्पष्टच लिहिलें आहे–"म. सा. परिषदेच्या संबंधांत कित्येक टीकाकारांचा त्यांच्यावर (म्ह. मोरमकरांवर सं.) निष्कारण रोष झालेला दिसत आहे. वस्तुतः त्यांचा टीकाविषयक गोष्टीशीं फारसा संबंध नसून **परिषदेचे खरे सूत्रधार निराळेच होते हें पुष्कळांस ठाअूक आहे** (जाड ठसा आमचा; विस्तार वर्ष ५४।११, पृ.४८८).

ह्या प्रकरणीं प्रत्यक्ष पाध्ये– दुर्दैवाने नुकतेच कैलासवासी झालेले– ह्यांचाच पुढील अभिप्राय पाहिल्यास संशयास मुळींच वाट राहणार नाही:—

"ह्या संमेलनांना अेकरूपता व सर्व वर्षभर कार्य करण्याची योग्यता येण्यासाठी १५ वर्षांमागे अकोल्यास महाराष्ट्र साहित्य परिषद् ही मध्यवर्ति व कायमची अशी संस्था स्थापण्यांत आली. स्थापणारांना त्या वेळीं मोठी हौस व तीहूनहि अधिक अुमेद होती. परिषद् स्थापन झाल्यापासून गेल्या वर्षापर्यंत माझा तिच्याशीं अत्यंत निकट संबंध होता. अशा संस्थांना पैशाची वाण बहुदा कर्तृत्वाचे आड येते. पण प्रकृत साहित्य परिषदेला सुदैवाने कायमचा फंडहि वार्षिक रु. ५००।६०० अुत्पन्न देणारा मिळालेला आहे. पण तिचेकडून दरवर्षी संमेलन भरविणेही होअूं शकलें नाही.... नांव घेण्यासारखें कांही विशेष कार्यही घडून आलेलें नाहीं. आजपर्यंत ह्या अखिल महाराष्ट्रीय संस्थेचे मार्फत आपल्या मातृभाषेच्या प्रगतीचें पाअूल जोराने पुढे टाकविण्याचें काम अद्यापि तरी झालें नाहीं. मला वाटतें, या कार्यविषयक अक्षमतेचें कारण संस्थेचा अवाढव्यपणा होय. पाया विस्तृत पण त्यामुळेच शिखरांची अुंची कमी झाली. संस्थेचे चालक चार दिशांस फांकलेले, त्यामुळे सहकारित्व नाहीं, चिकाटीही नाही व कोणचेंही काम जोरानें व अेकाच दिशेनें वाहणाऱ्या प्रवाहाचे वेगानें होत नाहीं. अनास्थेचीं आणि मंदगतीचीं हीं कारणें..." —रावब. दा. ग. पाध्ये, अध्यक्ष– नगर नासिक वाङ्मयोपासक संमेलन– भाषण. (२३ सप्टेंबर १९२८)

मागील पिढींतील ज्या वडील मंडळींचें मार्गदर्शकत्व या आपटे मोरमकर प्रभृतीस लाभलें त्यांत विष्णुशास्त्री चिपळोणकरांचें सतीर्थ्य, अकोल्याचे कै.रावब. अण्णासाहेब महाजनी यांचें नांव सर्वप्रमुख गणण्यास चिंता नाही. अण्णासाहेबांना गुरुस्थानीं कल्पून ही मंडळी परिषदेचा कारभार चालवीत असत. इ. स. १९१२ पासून अण्णासाहेबांचे आप्त रावब. दामोदर गणेश पाध्ये यांनी अण्णासाहेबांचा भार बराच हलका केला. तेव्हापासून सतत तीस वर्षे पाध्ये यांचा व परिषदेच्या निकट संबंध टिकून राहिला. कार्योपाध्यक्ष, कार्याध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विश्वस्त अशा जबाबदारीच्या पदांवर त्यांनी कामें केलीं. पाध्ये यांच्या कारकीर्दीत परिषदेचें पाऊल जोराने पडण्याऐवजीं कांहीसें आंतच आलें असा खेदकारक अभिप्राय येथे नमूद करणें आम्ही आपलें कर्तव्य समजतों. जनतेशीं समरस होण्याचें कौशल्य पाध्ये यांचे ठायीं दिसून आलें नाही. त्यामुळे त्यांचेवर खरे व खोटे असे दोन्ही प्रकारचे आक्षेप आले. पाध्ये यांनी चिकाटी सोडली

नाही; त्यांच्या जपणुकीच्या धोरणाला कांही प्रकरणीं तरी जाचणुकीचें स्वरूप आलें आणि परिषदेचा संकोच होऊन तिने बाळसें टाकल्यासारखें केलें. इ. स. १९२७ पासून ही स्थिति पालटूं लागली आणि पाध्ये यांचाहि संशय बहुशीं लयाला गेला. मुंबईचे महाराष्ट्रीय पुढारी कै. सर मालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांचा पाठिंबा पाध्ये यांस लाभला होता. पाध्ये आणि भाटवडेकर यांच्यासारख्या कार्यकर्त्यांची जोडी परिषदेला लाभूनहि तिची अपेक्षित भरभराट झाली नाही हें तिचें दुर्दैवच म्हटलें पाहिजे. परिषदेचा जन्म आणि राजकीय पक्षभेदांचा जन्म समकालीन झाला. राजकीय पक्षभेदाची धग परिषदेला लागूं न देतां तिची वाढ अबाधित करण्याची धमक व पुण्याई त्या काळीं कोणांत दिसून आली नाही. अशा स्थितींत परिषद् बचावली हेंच तिचें भाग्य म्हटलें पाहिजे. पण या धगीने ती जी एकदा आहाळली ती अद्यापि कांही पूर्णपणें निवळल्याचीं चिन्हें दिसत नाहीत. आता पुनः युगांतर होत आहे आणि त्यांत परिषदेस नवजीवन देण्याचें कार्य आपणांस करावयाचें आहे. येथेच आपल्या सर्वांच्या कर्मकौशल्याची परीक्षा आहे.

पाध्यांच्या मागाहून रा. ना. गो. चापेकर हे परिषदेचे कार्याध्यक्ष निवडून आले. तटणीस, न. र. फाटक, माधवराव आळतेकर, सुंदरराव वैद्य, कै. भास्करराव पंडित, प्रि. ज. र. घारपुरे, प्रो. पां. वा. काणे प्रभृति अनेक कर्तृत्ववान् मंडळींचें साहाय्य उपलब्ध असतां जें यश पाध्ये यांस मिळवितां आलें नाही तें श्री. चापेकर यांचे कारकीर्दीत परिषदेस लाभलें. वास्तविक पाध्ये कांही कमी कर्तृत्ववान् होते असें नाही परंतु चापेकर यांना जसा कार्यकर्त्यांचा मेळावा लगामीं लावतां आला तसें पाध्यांना करतां आलें नाही. चापेकर यांनी श्री. कृ. पां. कुळकर्णी, चिं. ग. कर्वे, ग. गं. जांभेकर, दे. द. वाडेकर, रा. दा. देसाई प्रभृति कळकळीच्या मंडळींना वाव देऊन त्यांचेकडून पुष्कळच काम उठवून दाखविलें. स्वतः चापेकर यांनी म. सा. पत्रिकेला नवें व भरदार स्वरूप देऊन स्वतंत्र केली. त्यांनी जातीने परिषदेसाठी कष्टहि सोसले. चापेकरांच्यावरहि आक्षेप आले नाहीत असें नाही परंतु काम करून दाखविण्याचा संकल्प त्यांनी सिद्धीस नेला. परिषदेला स्वतःची वास्तु मुख्यतः त्यांच्याच परिश्रमाने प्राप्त झाली. म. सा. परिषदेला शोभेल आणि तिची विद्वन्मंडळांत मान्यता वाढवील असें साहित्यिक कार्यहि त्यांनी धडाडीने अंगीकारलें. त्यामुळे लिपी, व्याकरण वगैरे विषयांसंबंधीचीं कामें रंगारूपाला आलीं. रा. य. रा. व शं. रा. दाते, गो. कृ. मोडक, गो. पां. पावशे, पितापुत्र बनहट्टी, रा. दा. देसाई, चिं. ग. कर्वे, कृ. पां. कुळकर्णी प्रभृति उत्साही विद्वानांच्या परिश्रमांचा लाभ परिषदेच्या पदरीं पडला. कचेरीचीं कामेंहि सुधारूं लागलीं. रा. कृ. पां. कुळकर्णी आणि रा. चिं. ग. कर्वे यांनी निरलसपणें परिषदेची सेवा केली. पुढे प्रो. दे. द. वाडेकर यांजकडे चिटणीशी आल्यावर खऱ्या 'कारकुनी' बाण्याने त्यांनी मोठ्या हिरिरीने दप्तराची मांडणी केली. त्यामुळे निदान तेव्हापासूनचें दप्तर तरी चांगलें व्यवस्थित झालें. परिषदेचें पूर्वीचें दप्तरच दुर्दैवाने नष्ट झालें. पण म्हणून दप्तरच नव्हतें किंवा होतें तें सारेंच अव्यवस्थित होतें असें मात्र म्हणतां यावयाचें नाही. पाध्ये यांनी ट्रस्ट प्रकरणींचें दप्तर चोखपणाने सांभाळलें हें विसरून चालणार नाही. आपटे, मोरमकर, पाध्ये, फाटक, तटणीस, रायकर वगैरे मंडळी परिषदेकरिता अंग झिजवित होती त्या वेळीं दप्तराची दुरवस्था असेल असें नव्हे; जी काय दुरवस्था झाली ती विशेषतः १९२२ नंतर होऊं लागली असा आमचा तर्क आहे. जर परिषदेचें कार्य सतत व जोमाने चालू राहिलें असतें तर दप्तराची ही दुरवस्था होण्याचा संभव स्वभावतः कमीच झाला असता. कसेंहि असो, आज परिषदेचें जुनें दप्तर उपलब्ध नाही याचा

खेद या इतिहासकारास जेवढा होत आहे तेवढाच तो पाध्येप्रभृति जुन्या कार्यकर्त्यांसहि झाला किंवा होत असला पाहिजे यांत शंका नाही. असो.

चापेकरांच्या पंचवार्षिक कारकीर्दीत 'म. सा. पत्रिका' स्वतंत्र झाली; तिचें रूप अधिक पुष्ट झालें; परिषदेला वास्तुलाभ झाला; दप्तराची व्यवस्था लागली; आणि लिपीव्याकरणादि जटिल प्रश्नांच्या सोडवणुकेचा कसून प्रयत्न झाला. पांचसात वर्षांत झालेली ही प्रगति, मागचें प्रगतिमान लक्ष्यांत घेतलें तर, किंचितशी आश्चर्यावहच गणावी लागेल.

म. सा. परिषदेचें एक उपांग म्हटलें म्हणजे तिची **पत्रिका** हें होय. 'वि. लि. विस्तारा' ला जोडून निघणारी छोटी 'पत्रिका' तिच्या चालकांनाच मोठी अभिमानार्ह वाटत नसावी असें म्हणतां येतें. पुढे चापेकरांनी तिला नवें व स्वतंत्र भरदार रूप दिलें. भाषिक आणि समाजशास्त्रीय संशोधनपर आणि संशोधनप्रवृत्तिपोषक लिखाण हा 'पत्रिके'चा विशेष चापेकरांनी कल्पून तिची वाढ केली. यांत एक प्रकारचा एकांगीपणा येणें साहजिक होतें, पण हा प्रयत्न नवीन दिशेचा आणि प्रगतिपर होता. मराठींत सर्व विद्या अवतराव्या व वाढीस लागाव्या हा सिद्धान्त चापेकरांना ग्राह्य असल्यामुळे त्यांनी एका उपेक्षित अंगाचा परिपोष पत्रिकेच्या द्वारानें करण्याचा उपक्रम केला. चापेकरांच्या मागून रा. पोतदार यांच्याकडे संपादनसूत्रें आलीं. या दीर्घसूत्री गृहस्थाच्या कारकीर्दीत 'पत्रिका' निघते कीं नाही याचाच मागमूस लागणें कठीण झालें. 'पत्रिके'ला एका प्रकारचें 'गॅझेट' बनवावें ही त्यांची योजना अद्यापिहि अमूर्तच राहिली असली तरी असे 'गॅझेट' प्रसिद्ध झालें पाहिजे हें निर्विवाद आहे आणि 'मराठी' सरकार जोपर्यंत देशांत स्थापन होणार नाही तोपर्यंत हा भार परिषदेच्या डोक्यावरच लटकत राहणार हेंहि उघड आहे. पोतदारांच्या मागून कै. माधवराव पटवर्धन आणि रा. मो. ज्ञा. शहाणे हे संपादक झाले. परंतु या उक्षयतांच्या कारकीर्दीत प्रसिद्धीचा नियमितपणा बराच राखतां आला तरी 'पत्रिके'च्या कीर्तीचा पारा कांही विशेष वर चढला नाही. येथे हें लक्षांत ठेवलें पाहिजे की 'पत्रिके'च्या प्रकाशनासाठी सुमारें ६००।७०० रुपये या वेळीं व्यय होत असे आणि तेवढ्यांत 'पत्रिके'चें स्वरूप आकर्षक आणि सर्वांगपरिपोषक करणें शक्यच नव्हतें. या कामीं निदान रु. २००० पावेतो व्यय करणें प्राप्त होतें. 'पत्रिके'चे यानंतरचे संपादक श्री. के. नारायण काळे हे होत. यांनी 'पत्रिके'ला आकर्षक करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आणि परिषदेनेहि उदारपणें 'पत्रिके'प्रीत्यर्थ व्ययाचें मान दोन हजारांच्या घरांत नेलें. हें व्ययमान 'पत्रिके'च्या वार्षिक उत्पन्नाच्या साधारणपणें निम्याजवळ पोचलें आहे. आणि तरीहि लेखकांस मेहनताना किंवा संपादकास स्वतंत्र कारकुनी साहाय्य वगैरेंची सोय अद्यापिहि केलेली नाही. इतकेंच काय, परिषदेचें 'ग्रंथालय' असून नसल्यासारखेंच आजमितीस आहे. 'पत्रिके'च्या धोरणाचा प्रश्न वारंवार विचारासाठी पुढे येतो; आणि तसा तो आलाहि पाहिजे. तें पुढे कांहीहि होवो आजवर 'पत्रिके'च्या द्वारें झालेलें कार्य स्पृहणीय असेंच गणावें लागेल आणि तिच्या वेळोवेळींच्या संपादकांस व लेखकांस धन्यवादच द्यावे लागतील यांत किमपिहि संदेह नाही. 'पत्रिके'च्या संपादकाचे जागी काळे यांच्यानंतर नुकतीच प्रो. रा. श्री. जोग यांची योजना झाली आहे.

सार्वजनिक संस्थांत, निदान आमच्या इकडे तरी, कामाची मुख्य मदार संस्थेच्या चिटणिसांवरच बरीचशी असते. अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजिनदारादिकांचीं कामें आपापल्या पदांच्या कक्षेपुरतीच मर्यादित असतात. परंतु सर्व शेष कार्याचा भार चिटणिसांवरच ठेवावा लागतो. एकापेक्षा अधिक चिटणिस असले आणि कामांची वांटणी पद्धतशीर करून एका

विचाराने आणि धोरणानें कामाचा उरक होत राहिला तर संस्थेची जोराने प्रगति होते. तसें न झाल्यास व्यर्थ घोटाळे उद्भवतात आणि प्रसंगी कामाची नासाडी होते आणि संस्थेचा गाडा रुतून बसतो किंवा वेळीं मोडूनहि पडतो.

म. सा. परिषदेचा इतिहास पाहिला तर वरील गोष्टींचा अनुभव तेथेहि आलेला दिसतो. प्रारंभींच्या काळीं खरें काम पाहणारे चिटणीस आमच्या माहितीप्रमाणे कै. वासुदेवरावजी आपटे हेच होते. त्यांचा जोडीदार चिटणीसांवर विशेष कांही भार नव्हता. वासुदेवरावजी हौशी आणि कामसू होते. पण त्यांचें आजारपण त्यांच्या आड आल्याशिवाय राहिलें नाही. शिवाय नेट धरून तड लावण्याची तडफ आणि ताकदहि त्यांचे ठिकाणीं अनुभवास आली नाही. मात्र जातीने ते मेहनती आणि शिवाय ग्रंथकार आणि लेखक यामुळे त्यांच्या कारकीर्दीचा पूर्वार्ध मोठ्या उत्साहाने पार पडला. उत्तरार्धांत पाध्ये हेच खरे सूत्रधार बनले आणि पाध्ये चिवट असल्यामुळे आपटे, मोरमकर किंवा इतर कोणी यांचें त्यांनी कांही चालूं दिलें नाही.

पाध्ये यांनी कार्याध्यक्षपणाची धुरा सोडलीहि आणि त्यांस सोडावी लागलीहि. त्यांचे मागून चापेकर आले. चापेकरांचे कारकीर्दीत पुष्कळ चिटणीस झाले. त्यांत प्रथम प्रो. न. र. फाटक यांचा निर्देश केला पाहिजे. मोरमकर सुमारें १०।११ वर्षें, वासुदेवराव आपटे ९।१० वर्षें आणि फाटक ८ वर्षें चिटणीशीवर होते. तिघांत फाटक अधिक कणखर आणि आत्मविश्वासी होते. स्मरणशक्ति आणि निरीक्षणशक्ति यांची देणगी फाटक यांस उत्तमांतली प्राप्त झालेली आहे आणि आपल्या परिश्रमाने आणि बहुविध व्यासंगाने त्यांनी स्वतःस एक स्वतंत्र स्थानच मिळविलेलें आहे! त्यांच्या चिटणीशी कालांतील अनेक मानगडी आणि मौजा आजहि ते धडाधड सांगूं शकतील. पण त्यांच्या गुणांचा उपयोग परिषदेस व्हावा तसा झाला नाही; आणि परिषदेचा कुजलेला डाव वेळींच सुधारण्याचा 'क्षणखर' प्रयत्न त्यांच्या हातून घडला नाही. पाध्ये यांशीं त्यांनी शक्यतोंवर इमान राखिलें आणि अखेर पाध्ये यांचेपेक्षा परिषद् मोठी हें लक्षांत घेऊन त्यांनी २७ मार्च १९३२ च्या वादळी सभेंत समन्वय घडून आणण्यास साहाय्य केलें. पुढे चापेकरांच्या अमदानींतहि फाटक कांही दिवस चिटणीस होते. नंतर कांही दिवस रा. केशवराव ओगले यांनी हें काम केलें. या उभयतां चिटणिसांचे आमारहि परिषदेच्या साधारण सभेने हैदराबादेस मानले परंतु कोल्हापुरास हवाच जरा फिरली! त्याला कारणेंहि तशींच घडलीं होतीं पण पुढे पुनः सर्व सौरस्य झालें.

चिटणिशी कारभार खरा जोमाने सुरू झाला तो रा. कृ. पां. कुळकर्णी यांच्या कारकीर्दीतच! कुळकर्णी यांना रा. चिं. ग. कर्वे यांची अभेदभावाची मदत एव्हापासूनच होती. या उभयतांनी कार्याध्यक्ष चापेकर यांच्या नेतृत्वाखाली उदंड कष्ट केले आणि परिषदेचें गाडें मार्गावर आणण्यास ही जोडी पुष्कळच झटली. रा. य. रा. दाते परिषदेचे एक भूतपूर्व चिटणीस, यांचें मुख्य काम विविधसमित्यांवरच झालें असलें तरी यांनी 'पुनर्घटना समिती'च्या कामीं अत्यंत परिश्रम केले यांत संदेह नाही. प्रो. वाडेकर यांच्या चिटणिशी दुसरी कामगिरीचा उल्लेख पूर्वी केलेलाच आहे. रा. राजारामपंत देसाई यांनीहि विविध समित्यांवर कामें करीत असतां, विशेषतः नागपूर संमेलनप्रसंगी वगैरे परिषदेचे चिटणीस म्हणून पुष्कळ श्रम घेतले. म. सा. परिषदेचे चिटणीस असे श्रमूं लागले आणि त्यांच्या श्रमाला यशहि येऊं लागलें.

चापेकरांच्या मागाहून कार्याध्यक्षपदावर प्रो. वामनराव जोशी यांची निवड झाली. सर्वांना सांभाळून घेऊन आणि उत्साही कार्यकर्त्यांचा वेळीं अतिरेकहि सोसून वामनरावांनी

---

१ रा. ना. गो. चापेकर–निरोप– म. सा. पत्रिका, वर्ष १० वें अंक १ पृ. ४१.

कार्याचा गाडा पुढे रेटण्यास होईल तें साहाय्य न कंटाळता केलें ! बामनरावांसारखा सर्व साहित्यिकांना सारखाच प्रिय व आदरणीय वाटणारा शांतिमूर्ति कार्याध्यक्ष परिषदेस लाभल्यामुळे रावसा. र. लु. जोश्यांसारख्यांच्या उत्साहास अधिकच भरती आली हें कांही निराळें सांगावयास नको.

खजिनदाराचें पद सांभाळणारे प्रि. ध. रा. गाडगीळ यांस केवळ परिषदेचा द्रव्यकोश सांभाळणारे खजिनदार समजणें चूक होईल. ते एकप्रकारें परिषदेचा हृदयकोश सांभाळणारे कोषाध्यक्ष म्हणूनच वर्णिले जातील अशी त्यांची वास्तविक कामगिरी झालेली आहे. विलायतेंतून पदवी मिळवून आलेला हा अर्थशास्त्रविशारद पंडित 'मराठी' साहित्याच्या अभिवृद्धीसाठी एवढा तळमळतांना पाहून सर्वच मराठी मंडळींना एक विशेष कौतुक वाटत असलें तर त्यांत नवल नाही.

कार्यकारी मंडळांतील वेळोवेळींच्या अनेक सभासदांनी परिषदेस आपापल्यापरी पुष्कळ साहाय्य केलेलें आहे. रा. जांभेकर किंवा रा. काकासाहेब लिमये यांची कामगिरी या प्रकरणीं विशेष उल्लेखनीय वाटते. या लेखकानेहि यथामति असे प्रयत्न केल्याचा दाखला परिषदेच्या दप्तरीं सांपडेल. मागील एका चिटणिसांनी तर या लेखकाच्या नांवची स्वतंत्र बारनिशी (फाईल) च ठेविली होती ! असें कागदी काम त्याच्या नांवावर पुष्कळच जमा आहे. पण कागदी इमारत ती कागदी इमारत. ती 'साहित्य मंदिरा'ची उणीव कशी भरून काढील ?

परिषदेचें काम अुठवणारी मंडळी म्हटली म्हणजे तिची कार्यकारी मंडळी हीच होय. कार्यकारी मंडळाच्यावर नियामक मंडळ आहे हें खरें परंतु खरें नियामक कार्य त्याचेकडून घडून होण्याजोगा सुटसुटीतपणाची घडण त्याची नाही. नियामक मंडळाचेच घटक असलेले अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांचा अधिकार इतर घटकांहून अर्थात् वरिष्ठ आहे. नियामक मंडळ नव्हतें त्या काळींहि अध्यक्ष व अुपाध्यक्ष होतेच. पैकी अुपाध्यक्ष मंडळी अध्यक्षांच्या अनुपस्थितींतच अधिकारतः काम करूं शकतात. म्हणजे त्यांच्या जागा मानाच्या असल्या तरी शोभेच्याच खऱ्या. बडोद्याच्या संमेलनप्रसंगीं (१९२१) कै. डॉ. तांबे यांना काय कामगिरी करावी लागली हें मागील एका प्रकरणांत दिलेंच आहे. अध्यक्ष आणि त्यांचे प्रतिनिधिभूत अुपाध्यक्ष हीं मोठ्या मानाचीं पदें समजलीं जातात आणि म. सा. परिषदेसारख्या संस्थांची मान्यता मोजतांना या सर्वोच्च पदाधिष्ठित पदांवरील व्यक्तीची मान्यता लक्षांत घेतली जाते. आजवर मोठमोठ्या मंडळींनीहि पदें भूषविलीं आहेत आणि त्यामुळे परिषदेच्या प्रतिष्ठेंत आणि लौकिकांत थोडीफार भरच पडली आहे.

परिषदेचे पहिले अध्यक्ष कै. रावबहादूर महाजनी होते. महाजनींचा सल्ला नेहमी पोक्त, समतोल आणि प्रांजलपणाचा असे. परिषदेच्या कार्यकक्षेविषयी त्यांची दृष्टि विशाल होती आणि तिच्या शक्तीची अभिवृद्धि करतांना जी दूरदृष्टि ठेवणें अवश्य होतें त्याचीहि योग्य कल्पना त्यांस होती. वयोवृद्ध महाजनींनी जरी याप्रमाणे योग्य मार्गदर्शन केलें आणि स्वतःहि परिषदेसाठी कष्ट सोसले तथापि त्या वेळच्या कार्यकर्त्यांनी त्यांचा हितकर अुपदेश फलद्रूप होअील असें कांही कर्तृत्व करून दाखविलें नाही.

महाजनी १९२३ त वारले आणि त्यांची जागा, बहुशः थोड्याच दिवसांनी, इंदूरचे श्रीमंत माधवरावसाहेब किबे यांनी घेतली. किबेसाहेब जवळ जवळ अेक तपपर्यंत म. सा. परिषदेचे अध्यक्ष राहिले. ते दूरस्थ असतांहि परिषदेच्या साधारण सभांस आणि संमेलनाच्या बैठकींस ते आस्थापूर्वक येत आणि मतभेद विकोपास जाअूं नयेत म्हणून प्रयत्न करीत.

१९१७ तील इंदूर संमेलनाच्या महद्यशाचे तेहि अेक प्रमुख वांटेकरी आहेत ! त्यांच्या लौकिकाचा परिषदेला झाला त्याहूनहि मोठा लाभ झाला नाही किंवा करून घेतां आला नाही याचें दुःख वाटतें.

किबे यांच्या मागून सुप्रसिद्ध साहित्यधुरीण श्री. तात्यासाहेब केळकर हें पांचसहा वर्षें म. सा. परिषदेचे अध्यक्ष निवडून आले ! हीं वर्षें परिषदेस मोठ्या भरभराटीचीं गेलीं आणि परिषदेच्या स्थापनेपासून तिच्याशीं संबद्ध असलेल्या केळकरांसारख्या लोकाग्रणींस संतोषदायक झालीं. तात्यासाहेबांची साहित्यिक मंडळांतील लोकप्रियता, त्यांची निरलसता आणि विद्वत्ता आणि कार्योपयोगी स्वभाव यांच्या योगें परिषदेच्या कार्यकर्त्यांस त्यांचा केवढा आधार वाटत असेल याची सहज कल्पना होईल. त्यांच्या नुसत्या नांवावरहि ही कार्यकर्ती मंडळी अनेक उपक्रम हातीं घेऊन तडीस नेण्यास कंबर बांधीत. परिषदेच्या कार्यकर्त्यांच्या हाकेला तात्यासाहेबांनी 'ओ' दिली नाही असें घडलेंच नाही.

तात्यासाहेबांची जागा आता या वर्षापासून मागील कार्याध्यक्ष प्रो. वामनराव जोशी यांचेकडे आली आहे आणि तेहि तात्यासाहेबांप्रमाणेच निरलस, विद्वान आणि लोकप्रिय असल्याने परिषदेची पुढील भरभराट घडवून आणण्यास्तव झटतील याविषयी शंकाच नाही.

परिषदेला नव्या मंदिराचा लाभ करून देऊन चापेकरांनी सूत्रें ज्या वेळीं खाली ठेविलीं त्या वेळीं एक वृद्ध परंतु उत्साही, पोस्टमास्तर परंतु रसिक, धर्माने ख्रिस्ती परंतु संस्कृतीने हिंदी असे सरकारसेवानिवृत्त गृहस्थ परिषदेची सेवा करण्यासाठी हौसेने पुढे आले ! हे भगूरकर जोशी मराठीचे कट्टे अभिमानी आणि हुद्देदार असलेले आणि निवृत्त सरकारी अंमलदार गृहस्थ परिषदेस मिळाल्याने परिषदेच्या कार्याची धुरा त्यांचे अंगावर टाकण्यास मंडळीस साहजिक हुरूप वाटला. रावसाहेब रघुवेल लुकस जोशी यांनी आपल्या मनासमोर दोन मुख्य धोरणें ठेविलेलीं दिसतात. एक हें की परिषदेच्या सूत्रांत सर्वांस बांधून आणण्यासाठी प्रयत्न करणें आणि दुसरा परिषदेचें दारिद्र्य नष्ट करण्यासाठी झटणें. या दोन्ही कार्यांत रावसाहेब यांनी निरलसपणें प्रयत्न केला व पुष्कळच यश मिळविलें यांत शंका नाही.

एतदर्थ दौरे काढण्यास त्यांनी कंटाळा केला नाही. परिषदेचे एक हजार तरी सभासद आपण करणार असा चंग रावसाहेब जोशी यांनी बांधला आहे. आपल्या सार्वजनिक संस्थांतील भरतीओहोटीचे नियम अनुभवावरून लक्षांत घेतले तर एक हजार स्थिर सभासदांची जोड मिळवून देणें बरेंच दुस्साध्य कार्य आहे. चापेकर यांच्या कारभारकाळांत सभासदसंख्या मागील सुमारें १५० स्थिरवरून ३२५ पर्यंत चढली तर आता जोशी यांच्या परिश्रमाने सुमारें ७५० स्थिर सभासदांची सीमा गांठली आहे. एवढ्या थोड्या काळांत एवढी भरमक्कम सभासदवाढ ही खचित स्पृहणीय अशी कामगिरी झाली आणि तिचें श्रेय बहुंशीं, किंबहुना सर्वांशीं, रावसाहेब जोशी यांसच दिलें पाहिजे. रावसाहेबांना अनेकांनी साहाय्य केलें परंतु त्यांचे जोडीदार चिटणीस डॉ. अमृतराव भालेराव यांचा हार्दिक पाठिंबा विशेष फलदायक ठरला. डॉ. भालेराव यांनी मुंबई विभागांतील मराठी साहित्यभक्तांची जोमदार संघटना करण्यांत मिळविलेलें यश आणि दाखविलेली धडाडी ही सर्वांस सुपरिचितच आहे. त्यांची जोड म. सा. परिषदेस मोठी लाभदायक ठरली यांत संशय नाही.

सभासदवाढीच्या कार्याबरोबरच परिषद्मंदिराची संपूर्ण उभारणी करण्याचें कार्यहि

---

१ गतगोष्टी-न. चिं. केळकर. पत्रांक ३७० व ३७३ आणि म. सा. पत्रिका, वर्ष १० अंक १ पृ. १० ही पाहावीं.

तडीस नेण्याची उमेद रावसाहेब यांनी धरली आणि कै. माधवराव पटवर्धन-स्मारक-समितीच्या आणि या समितींतील कुशल कार्यकर्ते रा. विठ्ठलराव घाटे यांच्या साहाय्याने त्या उमेदीचें रूपान्तर भव्य मंदिराच्या प्रत्यक्ष उभारणींत झाल्याचें आनंदोत्पादक दृश्य आपण सर्वजण आज पाहत आहोंत. पोस्टासारख्या जिकिरीच्या खात्यांतले रावसाहेब हे नाणावलेले अधिकारी असल्याने कचेरी व दप्तर यांची व्यवस्था त्यांनी चोख ठेविली असेल हें निराळें सांगण्याची देखील आवश्यकता नाही. परिषदेला लाभलेले कारकून रा. देसवंडीकर यांनी सुमारें ८।१० वर्षें परिषदेची सेवा अत्यंत आस्थेने, जबाबदारीने व कुशलतेने केलेली आहे असा परिषदेच्या अधिकारी मंडळींचा अभिप्राय पडेल यांत आम्हांस शंका वाटत नाही. प्रि. ध. रा. गाडगीळ, रा. य. रा. दाते, प्रो. वा. म. जोशी, श्री. काकासाहेब लिमये प्रभृति कार्यकारी सभासदांनीहि मनापासून परिषदेला साहाय्य केलेलें आहे. या सर्वांच्या सेवेमुळे म. सा. परिषद् ही दीर्घकालीन दुबळाईच्या व्याधींतून मुक्त होऊन तेजस्वी आणि बलिष्ठ अशी संस्था होत चालली आहे यांत शंका नाही. अशीच तिची वाढ सर्वांनी करण्याचा निश्चय केल्यास म. सा. परिषदेचें भविष्य उत्तरोत्तर उज्वलच होत जाईल यांत काडीची शंका वाटत नाही.

हें कांही सांगावयास नकोच की अर्थ हा साऱ्या यशस्वी कार्याचा एक प्रधान मूलाधारच आहे. अर्थात् ज्यांनी ज्यांनी परिषदेला आर्थिक साहाय्यता दिली ते तिचे सेवकच होत. वार्षिक वर्गणीदारांपासून तों थेट मोठमोठ्या श्रीमंत महाराज सर तुकोजीराव आणि श्री. राजे बाळासाहेब औंधकर, श्री. इचलकरंजीकर, श्री. छत्रपति राजाराममहाराज, श्री. मा. सौ. इंदिराराजे होळकर, श्री. रमाबाई आपटेप्रभृतीपर्यंत सर्वांचें ऋण परिषदेवर आहे आणि त्यांचें स्मरण संकलन कां होईना पण केल्याविना हा 'परामर्श' पुरा करणें कृतघ्नपणाचें झालें असतें.

किती म्हटलें तरी असले 'परामर्श' परिपूर्ण करणें दुर्घटच कर्म होय. 'प्राधान्येन व्यपदेशः' हा न्याय जरी पुढे केला तरी 'प्राधान्य' तरी कोण ठरविणार? या ग्रंथांत परिषदेच्या पदाधिकाऱ्यांची नामावली दिलेली आहे तथापि पदाधिकारी तेवढेच कांही धन्यवादाधिकारी आणि इतर अनधिकारी असें थोडेंच म्हणतां येतें? आम्हांस तर सर्वांचें स्मरण करावयाचें आहे. नांवें उपलब्ध आहेत त्यांचेंहि विस्मरण होण्याचें जेथे भय तेथे नांवेंच उपलब्ध नाहीत त्यांची वाट कशी लावावी? समाधान येवढेंच की परिषद् चढली वाढली आहे. तिचे आणखीहि इतिहास लिहिण्याचे सुप्रसंग येतील आणि स्मरण परामर्शांचीं प्रकरणें भावी इतिहासकार अधिक परिपूर्ण व निर्दोष करतील. या भावी इतिहासकारांस थोडी पुसट का होईना वाट दाखविण्याचें कार्य आमचे हातून घडलें असेल तर आम्ही संतुष्ट आहों.

प्रकरण सातवें

महाराष्ट्र-साहित्य-परिषदेचा व्याप आणि आकांक्षा

अितर प्रकरणांतून महाराष्ट्र-साहित्य-परिषदेची जी हकीकत आम्हीं ग्रथित केली आहे तिजवरून ध्यानांत आलेंच असेल की म. सा. परिषदेचा व्याप १९०६ ते १९२७ पावेतो फारच मर्यादित असा होता. १९१७।१८ मध्यें इंदूरचे श्रीमंत सर सवाई तुकोजीराव होळकर

महाराज यांची दहा हजारांची देणगी परिषदेस मिळाली हें अेक मोठेंच कार्य झालें. ही देणगी हातीं येतांच तिचें रूपांतर स्थिर निधींत करावें असें ठरवून चालकांनी तशी व्यवस्था केली. परिषदेचें दप्तर किंवा कीर्ति सांभाळण्यांत यद्यपि तत्कालीन कार्यकारी मंडळ यशस्वी झालें नाही, आणि पहिली मोठी देणगी हातीं येतांच तिचें रूपांतर स्थिर निधींत करण्याचेंच धोरण त्यांनी स्वीकारलें तरी स्थिर निधीचें संगोपन तरी त्यांचे हातून नीट पार पडत असेल किंवा काय याबद्दल लोकांस सतत संशय येत राहिला. कारण या स्थिर निधीचें व परिषदेचे सालोसालचे सविस्तर व पद्धतशीर अहवाल प्रसिद्ध करण्याचें कर्तव्य निधिधारकांनी आपण होऊन कधीच बजावलें नाही. कोठेतरी 'विविधज्ञानविस्तारा'च्या मलपृष्ठावर केव्हातरी एखादें तोटकें वृत्त प्रसिद्ध करण्याची पद्धतिच त्यांना योग्य वाटली असावी. अशा पद्धतीमुळे संशय मात्र दुणावले. परंतु आज आम्ही असें निःशंकपणें म्हणूं शकतों की परिषदेचा स्थिर निधि परिषदेच्या विश्वस्तांनी चोखपणें सांभाळला आहे. व्याजाला व्याज लावून, कवडीचुंबकपणाचा संसार चालवून, थोडीफार भर पडेल ती स्थिर निधींत टाकून त्यांनी त्या स्थिर निधीची वाढ केली. हें त्यांचें धोरण एकंदरीने दूरदृष्टीने पाहतां परिषदेच्या प्रगतीस कितपत पोषक झालें हा विषय निराळा. तथापि उपाशी राहून कवडी कवडी सांठविणाऱ्या माणसाचा संग्रहाचा तेवढा गुण तरी आपण कां न घ्यावा? ही निधिरक्षणाची कामगिरी निधिरक्षकांस रक्षक या दृष्टीने भूषणावह होअील अशीच झालेली आहे. आणि या कामगिरीचें सर्व श्रेय परिषदेच्या विश्वस्तांस, विशेषतः रावब. दा. ग. पाध्ये यांस, दिलें पाहिजे.

याच निधींत, स्थापलेला पण थांबलेला, हरिभाऊ आपटे स्मारकनिधि वगैरे लहानसहान निधि सामील करण्यांत आले. या निधीचा प्रथमपासूनचा संक्षिप्त अितिहास म. सा. पत्रिका अंक ५० (जून १९३९) मध्यें छापलेला आहे. तो वाचला असतां कळून येअील की विश्वस्तांजवळ केवळ रोख्यांच्या ठेव पावत्याच तेवढ्या आहेत. व्याजवसुली वगैरे कामें अिंपीरिअल बँकेसच विश्वस्तांनी दिलीं आहेत. बाजारभावाने विश्वस्त निधींची किंमत सुमारें अठरा एकोणीस हजार रुपये होअील.

या निधीच्या व्याजावरच परिषद् बरींच वर्षें तगून राहिलेली होती. याचा अर्थ असा नव्हे की तदभावीं परिषद् बुडाली असती. ज्या पद्धतीने तिचा कारभार त्या वेळीं मुंबअीस चालला होता त्या पद्धतीने मात्र या विश्वस्त निधीच्या व्याजाशिवाय तिला तरणोपाय नव्हता!

परंतु परिषदेचा 'कायापालट' झाल्यावर तिचा मंदावलेला अग्नि प्रदीप्त झाला; तिचे अुपासक वाढूं लागले; तिच्याकडे लोक साकांक्ष पाहूं लागले; फार वर्षें बसून बसून लुलीपांगळी झालेली परिषद् जरा हिंडूं फिरूं लागतांच तिने घोडदौडीने धावावें अशी अपेक्षा जनता करूं लागली; माड्याच्या खोलींत कोणत्या तरी वळचणीला लटकलेला तिचा संसार तिच्या स्वतःच्या मालकीच्या टुमदार मंदिरांत चालूं लागलेला पाहून त्या मंदिरास 'अिवलेंच का'! म्हणून तिचे भक्तच क्वचित् नाक मुरडूं लागले आणि क्षणोक्षणीं तिचा व्याप वाढविण्याविषयीची आतुरता बळावली.

ही आतुरता लक्ष्यांत घेअून पहिला प्रश्न परिषदेने हातीं घेतला तो शुद्धलेखनाचा होय. रा. केळकरांच्या टिळकचरित्रांतील 'अजागळ' अनुस्वारांचें अुचाटन पाहून लोक विस्मित झाले आणि या विस्मयाचा झटका ग्वालेर संमेलनांत प्रकट झाला (१९२८), आणि १९२९ त शुद्धलेखनाचा विचार करण्यासाठी परिषदेने समिति नेमली. या समितीने अनेक सभा भरविल्या, चर्चाविवाद केले आणि आपला निर्णय प्रकट केला. सातारा येथील कै. पावशे आपली

कैफियत घेऊन मडगांव संमेलनांत व्यासपीठावर कसे चढले आणि कोल्हापुर संमेलनांत त्यांच्या अेका शिष्याने 'ठोकरसे अुडा देएंगे'ची भाषा भर संमेलनांत कशी काढली तीं दृश्यें संमेलनांचीं तीं तीं अधिवेशनें पाहणाऱ्यांच्या स्मरणांतून अद्यापि गेलीं नसतील. या शुद्धलेखनास मान्यता मिळविण्याचे कामी बरेंच यश आलें आहे. तथापि आमच्या मुंबअी सरकाराची आणि विद्यापीठाची कृपादृष्टि तिकडे वळली नाही. ती वळविण्याचें कार्य यापुढे केलें पाहिजे; सर्वत्र या नवीन शुद्धलेखनाच प्रसार केला पाहिजे.

१९२९ ते १९३९ हीं दहा वर्षें म्हणजे परिषदेंतील समितियुगाचीं वर्षें समजण्यास चिंता नाही.

देवनागरी लिपीसुधारणेचा प्रश्न संमेलनपरिषदांतून बऱ्याच जोराने चर्चिला जात असतो. आणि कांहीसें अभिमानाने अेंहि म्हटल्यास शोभेल की आमच्या इकडे या बाबतींत जेवढा विचार झालेला आढळतो तितका अन्य देवनागरी लिपीवादी प्रांतांतून झालेला आढळत नाही. अद्यापि या विषयाचा विचार पुढेहि व्हावयास पाहिजे. तथापि झालेल्या प्रयत्नांस कांहीसें यश आता आलेलें आहे. या प्रकरणीं आमच्या लिपिसमितीला धन्यवाद दिले पाहिजेत.

शुद्धलेखन आणि लिपी यांच्याशींच व्याकरणाचा प्रश्न अगदी संलग्न आहे आणि अेक व्याकरणपरिषद् बोलावून आणि व्याकरणसमिति नेमून परिषदेने त्या दिशेनेहि प्रयत्न चालविले आहेत. अद्यापि या कामाला आकार यावयाचा आहे.

नाना शास्त्रांवर मराठींत ग्रंथरचना व्हावी तर शास्त्रीय परिभाषा तयार केली पाहिजे. पुण्याच्या संमेलनांतून या विषयाचा ऊहापोह परिषदेच्या जन्माचे वेळेपासूनच चालू होता. ज्योतिषादि कांही शास्त्रांच्या परिभाषाहि तयार झाल्या होत्या म. सा. पत्रिकेंतून 'रासायनिक परिभाषा' वगैरे कांही कांही परिभाषा प्रसिद्धहि झाल्या होत्या. पण पुढे तो प्रयत्न तेथेच थांबला. एखादी खट्याळ मोटारगाडी जशी वारंवार वारंवार बंद पडावी तशी खोड परिषदेला तिच्या पहिल्या पंचविशींत लागलेली होती. पण परिषदेचा कायापालट झाल्यावर परिभाषेचा प्रश्न तिने पुनः हातीं घेतला, आणि सांप्रत अेक शास्त्रीय परिभाषासमिति आपलें काम अुत्साहाने करीत आहे. म. सा. पत्रिकेंतून अनेक शास्त्रांच्या परिभाषा या परिभाषासमितीने वा मंडळाने प्रसिद्ध केल्या आहेत. तिचें काम पुढे चालूच आहे.

अशी एक तक्रार बृहन्महाराष्ट्रांतून येत असे की महाराष्ट्राबाहेर मराठी शिक्षणाची फार आबाळ होत आहे. दुसऱ्या कित्येकांनी आज आमच्याकडे होऊं शकतें त्यापेक्षा वरिष्ठ प्रकारचें मराठीचें अध्ययन-अध्यापन व्हावयासाठी म. सा. परिषदेने परीक्षा घेण्याचा उपक्रम करावा अशी मागणी करून योजनाहि संमेलनाकडे आणि परिषदेकडे पाठविल्या होत्या. या मागणीचा विचार करून परिषदेने अेक परीक्षासमिति नेमली. या समितीने परीक्षांची एक योजना करून अभ्यासक्रम आखला आणि त्यास अनुसरून "प्राज्ञ" आणि "विशारद" अशा दोन परीक्षा घेण्याचें काम परिषद् अलीकडे करीत आहे. या उपक्रमांचाहि विस्तार केला पाहिजे. आणि त्यांत पुष्कळ सुधारणा करण्याला वाव आहे असें आम्हांस वाटतें. "प्राज्ञ" आणि "विशारद" या मोठ्या पदव्या आहेत. या परीक्षा आज उत्तीर्ण होणारे तशी मोठीं नावें धारण करण्यास खरोखरी कितपत पात्र आहेत याचा अधिक काळजीने विचार झाला पाहिजे. म. सा. परिषदेने निखिल भारतीय आयुर्वेद संमेलनाहून निराळी दिशा स्वीकारणें श्रेयस्कर होईल काय याचाहि विचार केला पाहिजे. तथापि केलेला उपक्रम लोकप्रिय होत आहे यांत शंका नाही.

प्रादेशिक भाषांचा प्रश्न अेक महत्त्वाचा प्रश्न आहे. शिरगणतीच्या दृष्टीने तर या

प्रश्नाचें महत्त्व फारच आहे. खानदेशी भाषा गुजराती कीं मराठी म्हणावी ! असले प्रश्न डावलतां येत नाहीत. म्हणून परिषदेने कोकणी अहिराणी-समिति नेमली. या समितीचाहि अहवाल प्रसिद्ध झालाच आहे. पुढील काम मात्र कांही विशेष झालें नाही. आमचे कोकणी बंधु 'आमगेली कोकणी भास' म्हणून कोकणी भाषेचें "जैत" करण्यास सिद्ध झाले आहेत आणि मराठीच्या कक्षेंतून फुटूं पाहत आहेत. त्यांचेवर आमच्या वरील समितीच्या अहवालाचा कांही सुपरिणाम झाल्याचें दिसत नाही. नुसता अहवाल करून वा 'निवेदन' पाठवून स्तब्ध राहून इष्ट कसें सिद्ध होअील !

याशिवाय पुनर्घटना समिति, परिषद् संमेलन समिति, निधिधारण नियम समिति वगैरे अनेक समित्या परिषदेने नेमल्या. या समित्यांचीं कार्यें प्रायशः परिषदेच्या नव्या मंदिरांत चालतात. तें मंदिर म्हणजे मराठी भाषेच्या ध्रुपासकांचें अेक बलिष्ठ केंद्रच बनत चाललें आहे.

येणेंप्रमाणे परिषदेचा व्याप प्रत्यहीं वाढत आहे. शिवाय अधूनमधून चर्चा, व्याख्यानें, सत्कार, अध्यापनवर्गहि परिषदेकडून चालविण्यांत येतात. याशिवाय कितीतरी कार्यें अद्यापि व्हावयाचीं आहेत. 'हरिभाऊ आपटे ग्रंथालय' सजवावयाचें आहे. मडगांव संमेलनाने दिलेल्या ८०० पुस्तकांपैकीं निम्मीं अधिक तर कीटकांच्या भक्ष्यस्थानीं पडलीं ! कारण त्या वेळीं परिषदेची स्वतःचीं वास्तु नव्हती. पण आता माधवराव पटवर्धन साहित्यमंदिराची जोड झाली आहे आणि त्यांत एक अुत्कृष्ट संदर्भग्रंथालय स्थापण्याचें परिषदेच्या चालकांच्या मनांत आहे.

अेवढा कार्याचा व्याप वाढला, प्रत्यहीं वाढत आहे, पण कामाचा ताण कचेरीवर सांप्रत मनस्वी पडत आहे. कचेरीची मागील दुर्दशा सुधारण्यासाठी श्रीमंत छत्रपति महाराजांनी ६०० रु. दिले. श्रीमंत अिचलकरंजीकर व श्रीमंत औंधकर यांनी कांही मदत केली. परंतु यापुढे कचेरीची पुनर्घटनाच करावी लागेल असें वाटतें.

अेवढ्या व्यापाने कांय झालें आहे ! अजून कोठे प्रारंभच आहे !

पुढल्या आकांक्षा काय सांगाव्या ! आणि तें अितिहासकाराचें कामहि पण नव्हे. तथापि जागजागीं परिषदेच्या शाखा निघाव्या; ठिकठिकाणच्या लहान मोठ्या साहित्यसंस्था संलग्न करून घ्याव्या; परिषदेहून वयाने किंवा व्यापाने वडील असणाऱ्या संस्थांस सहकारी करून घ्यावें; सालोसाल गुजराथ व्ह. सोसायटी काढते त्या प्रकारचीं वार्षिक वाङ्मयसमालोचनें प्रसिद्ध करावीं; म. सा. परिषद् आणि म. सा. संमेलन यांची अेकात्मता सिद्धीस न्यावी; प्रादेशिक संमेलनें सुसंघटित करून परिषदेच्या एकसूत्रांत त्यांस गोवून घ्यावीं, स्थिर निधींत भर टाकावी; नवीं अुपयुक्त प्रकाशनें करावीं आणि करवावीं; मराठी भाषेच्या शिक्षणाची सतत वाढ कशी होईल म्हणून योजना आंखाव्या; मराठीवरील अन्याय्य आक्रमणास पायबंद घालावा; लोकव्यवहारांत मराठीचा प्रसार आणि मान वाढवावा; सरकार आणि विद्यापीठें यांवर वजन पाडून मराठीचें पाऊल पुढे पडेल म्हणून यत्न करावे; समानहेतुक देशी साहित्यपरिषदांशीं परिणामकारक सहकार करावा; महाराष्ट्र विद्यापीठ लवकर अस्तित्वांत यावें म्हणून झटावें, आणि महाराष्ट्रांत मराठीचें अखंड आणि अनिरुद्ध साम्राज्य स्थापण्यासाठी सर्वस्व वेंचण्यास महाराष्ट्रीयांस प्रवृत्त करावें; मराठी बोलणारा तो मराठा ही ऐक्यभावना बाढीस लावावी, आणि भारताचा समुद्धार करून नवयुग निर्माण करण्यास अभिमुख व्हावें याहून निराळ्या आकांक्षा त्या काय सांगाव्या !

प्रकरण आठवें

समारोप

तसें म्हटलें तर या छोटेखानी इतिहासाला समारोपात्मक प्रकरण जोडण्याइतका कांही तो दीर्घ व गुंतागुंतीचा नाही. तथापि संक्षेपाने पुनःकथन केलें तर समजुतीस बरें पडेल अशी सूचना झाल्यावरून हा उपसंहार लिहिला आहे.

मराठी भाषेचा संसार सुव्यवस्थित चालविण्यासाठी एखादी टिकाऊ संस्था काढावी असा विचार कित्येकांच्या मनांत बरींच वर्षें घोळत होता. या संकल्पांस मूर्त स्वरूप देण्याचे प्रयत्न महर्षि माधवराव रानडे आणि लोकहितवादी प्रभृतींनी केले आणि मराठी ग्रंथोत्तेजक सभा किंवा मंडळी या नांवाची एक संस्थाहि स्थापिली. या संस्थेने कांही ग्रंथहि प्रसिद्ध केले. न्यायमूर्ति रानड्यांच्या मृत्यूपूर्वीच ही संस्था नामशेष झाली. तेव्हा पुनः सर्वांना एकत्र आणण्याचा आणखी एखादा प्रयत्न करावा असें कांही वर्षांनी मराठीच्या कित्येक भक्तांच्या मनांत येऊन इ. स. १९०५ मध्ये कांही निमंत्रित मंडळी सातारा येथे जमली. रानडे यांच्या मृत्यूनंतरचें हें पहिलें 'संमेलन' होय. तेथून पुढे लागोपाठ तीन वर्षें– १९०६। ०७।०८– संमेलनें पुण्यास भरलीं. हीं संमेलनें 'मराठी ग्रंथकारांचे संमेलन' या नांवाने भरत आणि प्रथम त्यांत ग्रंथकारांचाच समावेश असे. मग ग्रंथकारांच्या बरोबर फुटकळ लेखकांसहि यांत प्रवेश देण्यांत येऊन त्या संमेलनांची कक्षा विस्तृत करण्यांत आली. पुण्यानंतर लागलीच पुढचें संमेलन बडोद्यास १९०९ मध्यें कै. श्री.सयाजीराव महाराज यांचे आश्रयाने भरलें. **'महाराष्ट्र साहित्य संमेलन'** असें व्यापक नांव प्रथम या वेळीं देण्यांत आलें. या पहिल्या पांच चार वर्षांत या संमेलनाचे प्रमुख सूत्रधार कै. गु. वासुदेव गोविंद आपटे हेच असत. तो काळ राजकीय नवजागृतीचा होता. मवाळ–जहाल असे दोन तट देशांत पडून मोठी धुमाळी माजूं लागली होती. परंतु साहित्याच्या पवित्र क्षेत्रांत हा भेदभाव विसरून सर्वांनी एकत्र यावें असा हेतु मनांत ठेवून हीं संमेलनें भरविण्यांत आलीं होतीं. पुण्याच्या बैठकींतूनच संघटित संस्थेच्या स्थापनेची वाटाघाट चालू होती आणि चिटणिसांच्या नेमणुकाहि करण्यांत आल्या होत्या. कदाचित् कच्ची घटना किंवा नियमावलीहि बनविण्यांत आली असावी परंतु ती छापाविली नसावी असें वाटतें. रा.वासुदेवराव आपटे हे त्या वेळीं मवाळ पक्षांत मोडत आणि रा.कृष्णाजीपंत खाडिलकर हे अर्थात् उघडपणें जहाल पक्षांत मोडत. या उभयपक्षांचा संयोग करण्याचे दृष्टीने या उभयतांची नेमणूक म.सा.परिषदेचे चिटणिस म्हणून करण्यांत आली होती. १९०९ पावेतो संमेलनाचें कार्य वाढत्या उत्साहाने चाललें. इकडे राजकीय आंदोलनाला जोर चढून मतभेदाची तीव्रताहि वाढली. 'जहाल' पक्षाचा संपर्क ठेवला तर सरकार, सरकारी नोकर, देशी राजेरजवाडे बिचकतील. या भयाने हळूहळू रा. खाडिलकर व रा. विनायकराव भावे[1] यांच्यासारख्या जहाल किंवा निमजहाल चिटणीसास दूर होण्याचा सल्ला देण्यांत आला. चढत्या उत्साहाची लाट मात्र येथपासूनच मावळली. तथापि कार्य मोडावें आणि पट उधळावा हें कोणासच अभिप्रेत नव्हतें. कै. रावब. अण्णासाहेब महाजनींसारखे वयोवृद्ध, तपोवृद्ध सल्लागार परिषदेच्या पाठीशीं होते. पण वार्षिक संमेलनेंच १९१०।११ सालीं भरलीं नाहीत; खंड पडला; जोम जरासा ओसरला. अखेर महाजनींच्या गांवी अकोल्यास १९१२ त संमेलन

१ कै. भावे यांनी या लेखकाला कळलें प्रासंगिक निवेदन.

भरविण्यांत आलें. जहाल-मवाळ-भेदाचा चटका तेथेहि ओझरता कां होईना लागण्याचा रंग आला होता (रा. सप्रे, म० रा० उ० वि० योजना, पार्श्वभूमि पृ.१८). परंतु सर्व निभावून गेलें.

वंगीय साहित्यपरिषदेचा कित्ता पुढे ठेवून बडोद्यास १९०९ सालींच महाराष्ट्र साहित्य परिषदेची नियमावली बनाविण्यांत आली ती इ.स.१९१२ सालीं अकोल्यांत संमेलनांच्या बैठकींत मान्य करण्यांत आली. महाराष्ट्र साहित्य परिषद् १९०५ ते १९१२ पावेतो तांत्रिक किंवा जुजबी संघटित होती ती आता नियमबद्ध सुस्पष्ट घटना लाभल्याने संघटनेच्या वाढत्या बळाने पुढे जाईल अशी अपेक्षा होती. परंतु हेंच खरें की १९०८ पर्यंतचा जोम तींत पुनः पुढे बरीच वर्षें आणतां आला नाही. संमेलनें ग्रंथकारांपुरतींच मर्यादित ठेविलीं असलीं तर कदाचित् राजकीय मतभेदाचा असा तीव्र परिणाम दिसून आला नसता. कारण प्रत्यक्ष संमेलनांत संयम पाळण्याचा समंजसपणा प्रकट करण्याचेंच धोरण बहुतेकांचें दिसून येई. पण संमेलनें आता केवळ ग्रंथकारांची उरलीं नव्हतीं, तींत लेखक हा व्यापक वर्ग समाविष्ट झाला होता. 'ग्रंथकार' या पदवीवर हक्क सांगण्यासाठी येणाऱ्यांतहि एखादी 'पद्यकुसुममाला' किंवा एखादी सिन्धूताईची गोष्ट सांगणारा पुस्तककर्ता म्हणून येऊन संख्या फुगवूं शकेल तरी तसे 'ग्रंथकार' हि संख्येने मर्यादितच असावयाचे. पण 'लेखक' म्हटला की एखादें चार ओळींचें बातमीपत्र लिहिणाराहि 'लेखक' ठरतो आणि अशा लोकांची संख्या ग्रंथकारांच्या मानाने किती तरी पट मोठी असणार! याहि पुढे जाऊन प्रकाशक, रसिक अथवा सहानुभविक या टप्प्यापर्यंत आपण पुढे आलों म्हणजे या वर्गांत ग्रंथकारांचा छोटा वर्ग केव्हाच लुप्त होऊन जावयाचा. पण बडोद्यापासून तर संमेलन 'साहित्य संमेलन' असें म्हणवूं लागलें. त्यांत येण्यास सर्वांना वाव मिळाला. हा बाहेरील मोठा वर्ग 'राष्ट्रीय' पक्षाकडे फार मोठ्या प्रमाणांत झुकलेला दिसे. अर्थात् संमेलनाचे 'नेमस्त' पक्षाचे सूत्रचालक या परिस्थितीमुळे साशंक, भयग्रस्त आणि निष्क्रिय बनले असले तर नवल नाही. आणि न जाणो हे बाहेरून येणारे 'जहाल' केव्हा हुल्लड करतील आणि मग पैसा तरी कसा सुरक्षित राहील, सरकार तरी काय मान देईल, विद्यापीठांत कशी दाद लागेल, राजेरजवाड्यांची कृपादृष्टि कशी होईल आणि आपली ही नवी संघटना कशी बळावेल या चिंतेने परिषदेचे तत्कालीन चालक गांगरून गेले असतील तर नवल नाही. संमेलनें हीं उत्साही आणि अत्युत्साही किंवा हुल्लडी लोकांचीं कार्यक्षेत्रें, ते संघटित, नियमबद्ध, मंदगति, संघटित संस्थांकडे वळावयाचे नाहीत तेव्हा संमेलनेंच भरविण्याचें टळलें तर बरें हा विचार पोक्तपणाचाहि वाटला असण्याचा संभव आहे. कोणी संमेलन भरविण्यास पुढे येत नाहीत असें हे सूत्रचालक म्हणत. आणि तें खोटेंच होतें असें नाही. परंतु आज देखील काय, किती ठिकाणचे लोक आपण होऊन आमचीं साहित्यसंमेलनें भरविण्यासाठी आणि त्यांना निमंत्रिण्यासाठी चालकांच्या पाठीं लागतात याचा शोध घेतल्यास कळून येईल की आज एवढा काळ बदलला आहे व जागृति झाली आहे तरीहि उत्साहाचें मान अद्यापि एवढ्या उंचीवर साहित्यक्षेत्रांत अजूनहि पोचलेलें नाही. मात्र लवकरच पोंचेल अशीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. मग त्या वेळची कल्पनाच करा. असो. मीमांसा कांहीहि असो, १९१२ सालानंतर पुढचें संमेलन इंदूरच्या श्री. तुकोजीराव महाराजांच्या आश्रयाने मोठ्या थाटाने इ. स. १९१७ त भरलें. उत्साहाला मोठी भरती आली होती. चार पांच वर्षांचा तटलेला उत्साह उसळून बाहेर पडलेला दिसत होता. श्री. महाराजसाहेब यांनी दहा हजारांची देणगी देऊं केली ती पुढे परिषदेकडे आली. मोठा प्रकाशननिधि जमवावा म्हणून कल्पना पुढे येतांच भराभर आंकडे पडले. परिषदेची संघटना सुधारावी म्हणून कै. प्रो. गणपतराव भाटे प्रभृतींनी योजना सुचविल्या. चालकांच्या निष्क्रियतेसंबंधी नाराजी

पडद्याच्या आंत बरीच प्रकट झाली. इंदूरकर कार्यकर्ते 'पत्रिका' काढण्यास्तव सज्ज झाले. पण चालकांचा 'संशयमंडप' मोडला नाही. पुनः संमेलनाचें गाडें थांबलें. मात्र दहा हजार रुपये हातीं आले. त्याचा मूळ उद्देश कांहीहि असो, परिषदेच्या चालकांनी तो निधि विश्वस्तांच्या ताब्यांत देऊन वार्षिक खर्चाची तजवीज लावण्याचा उद्योग सिद्धीस नेला. याहून अधिक कांही झालें असेल तर अनेकांच्या चित्तांत परिषदेविषयी नवी अढी मात्र बसली. या परिस्थितीचा स्फोट होऊन १९२६ सालीं चालकांनी मुंबईस परिषदेच्या खर्चानेच संमेलन भरविलें. झालें गेलें विसरून जावें असें ठरून पुनः पुढील मार्गाला लागण्याचें ठरलें आणि संमेलनाला पुण्यातर्फे पुढील आमंत्रण देण्यांत आलें.

तात्पर्य, १९०५ ते १९२७ पर्यंतचा परिषदेचा इतिहास असा विशेष नाही कारण तिचें कार्यच विशेष झालें नाही. थोडे सभासद, एक 'वि.विस्तारा'च्या पुच्छरूपाने प्रकट होणारी 'साहित्यपत्रिका', नियमावली व पदाधिकारी, हातीं आलेला विश्वस्तनिधि आणि एक दोन ग्रंथप्रकाशनाच्या योजना, आणि ते ग्रंथहि कोणत्या विषयांवर म्हणाल तर हिंदुस्थानची राज्यघटना आणि बालशुश्रूषा असले! पुण्याच्या अधिवेशनांतून 'मराठी इतिहासाचीं साधनें', 'प्राचीन काव्यग्रंथांची यादी' आणि "पारिभाषिक कोश' या जातीचे ग्रंथ तयार करविण्यावर भर होता. त्या वर्गांत पडणारा 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' एवढाच ग्रंथ काय तो या पुढील काळांतील संकल्पित ग्रंथांत आढळतो. मराठी वाङ्मयाच्या उत्तेजनाच्या दृष्टीने निःपक्षपाताने विचार करणारास मधल्या काळांतील म्हणजे १९१२ ते १९२६ या काळांतील हा परिषदेचा इतिहास पुष्कळ अंशीं उद्वेगजनक असा वाटेल, निदान या लेखकास तरी तो तसा वाटतो, म्हणून त्याची अधिक चिकित्सा करण्यास त्याचें मन येथे प्रवृत्त होत नाही. हें सांगावयास नकोच की व्यक्तिदृष्ट्या या कालखंडांत परिषदेचे खरे सूत्रचालक, सर्वाधिकारी म्हटलें तरी चालेल, रावब. दामोदर गणेश पाध्ये हे होते आणि त्यांस कै. रामभाऊ मोरमकर, विविधज्ञानविस्तारकर्ते, यांचें साहाय्य होतें. बिचारे मोरमकर, त्यांच्या मनाची तळमळ विरळाच असे पण ती मनांतल्या मनांतच सुकून जाई!

कोठे 'वंगीय साहित्य परिषद्' आणि कोठे तिचा कित्ता पुढे ठेवून स्थापण्यांत आलेली 'महाराष्ट्र साहित्य परिषद्'!! वंगीय साहित्य परिषदेचें भवन केवढें विशाल तर आमच्या परिषदेचें भवन म्हणजे कोणा पदाधिकाऱ्याची खाजगी खोली! परिषदेची निरलस सेवा करणारे कै. वासुदेवरावजी आपटे यांनी जवळ जवळ १९१५ सालापासून परिषदेंतून अंग काढून घेतलें. परिषदेच्या निमित्ताने प्रारंभिलेलें मराठीचें कोशकार्य त्यांनी स्वतःच एकट्याच्या बळावर पुरें केलें. 'आनंद'च्या द्वारें आपली सेवा पुढे वाढविली. असे वैयक्तिकरीत्या व्हावयाचे प्रयत्न होतच राहिले. संघटनेच्या सामर्थ्याने परिषदेने पुढे सरकावें तों वर वर्णन केल्याप्रमाणे विपरीतच प्रकार झाला!

पण एवढ्या काळांत बाहेरील जागृति चांगली बहरली होती आणि पुण्यास १९२७ त संमेलन भरलें तेव्हापासून आज मितीपावेतो सालोसाल संमेलनें बिनखंड भरत आलेलीं आहेत. महाराष्ट्रांतील प्रमुख स्थळीं आणि सलग महाराष्ट्राबाहेरील महाराष्ट्रीयांच्या केंद्रस्थळीं हीं संमेलनांचीं अधिवेशनें मोठ्या उत्साहाने आणि यशस्वीपणें पार पडलीं आहेत व प्रतिवर्षी पडत आहेत. परिषदहि आता जोरावत आहे. पुण्यासारख्या महाराष्ट्रांतील प्रमुख स्थळीं तिला हमरस्त्यावर तिच्या सत्तेचें सुंदर भवन लाभलें असून तेथे तिची कचेरी थाटण्यांत आलेली आहे. तिची पत्रिका नियमितपणें आणि स्वतंत्रपणें निघूं लागली आहे. निरनिराळ्या समित्या नेमून त्यांचे वाङ्मया-

त्मक विषयावरील मननीय निष्कर्ष प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. संमेलनांतील ठरावांची अंमल-बजावणीहि पद्धतशीरपणें होऊन केल्या बजावणीचा वृत्तान्त संमेलनांस सादर होऊं लागला आहे. आता त्यावर चर्चा करून कामाचा पल्ला कोठवर आला तें नीट पाहून पुढील धोरण व कार्यक्रम आंखावा ही दृष्टि कांही अजून उदित झालेली नाही. तथापि जनतेची वाढती जागृति हेंहि घडवून आणील अशी आशा करण्यास मन संकोचत नाही. परिषदेच्या समासदवर्गांत समाविष्ट होण्याची इच्छा आणि परिषदेकडे प्रेमाने, आदराने आणि आशेने पाहण्याची भावना बळावत आहे. जागजागीं स्थानिक वाङ्मयमंडळें आणि प्रादेशिक संमेलनेंहि भरूं लागलीं आहेत आणि या स्थानिक संस्था परिषदेशीं संलग्न होत आहेत. इतक्याने म्हणजे सर्व कांही झालें असें कोणी म्हणणार नाही परंतु खऱ्या कार्यास प्रारंभ झाला असें ठासून म्हणण्यास हरकत येणार नाही.


मराठी ग्रंथ संग्रहालय वर्धा
दा. क्र. ८४९४
ग्रंथ संख्या (स्थळ प्रत)



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ठाणे.
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दर्शक क्र. ६८१४
ठाणे (जिल्हा)

महाराष्ट्र साहित्य परिषद्-इतिहास

साधन विभाग

परिशिष्ट १ लें

१८७८ तील ग्रंथकारांचें पहिलें संमेलन

[ज्ञानप्रकाश. गुरुवार तारीख ७ फेब्रुवारी सन १८७८ ई.]

नोटिस

या देशांत उपयोगी ग्रंथ फार थोडे आहेत व त्यांचे वाचणारेहि फार थोडे आहेत. याजमुळे विद्येचा लाभ फार थोडे मनुष्यांस होतो. विलायतेंत त्राक्ट व बुक सोसायटी या नांवच्या मंडळ्या बहुत असून त्या ग्रंथकारांस उत्तेजन देऊन ग्रंथ प्रसिद्ध करून स्वल्प दरानें विकतात. यामुळे फार परोपकार होतो व लोकांचें ज्ञान वाढतें. वास्तव या देशांत ग्रंथकारांस उत्तेजन यावें व स्वस्त दरानें ग्रंथ प्रसिद्ध व्हावे हा हेतु आहे. वास्तव अशी योजना केली आहे की, दरसाल पांच रुपायांचे ग्रंथ घेण्याची इच्छा असेल त्यांणीं यादीवर सही करावी. आम्ही जे ग्रंथ त्यांजकडे पाठवूं ते नापसंत झाल्यास आम्ही परत घेऊं किंवा पूर्वी लिहून त्यांस विचारूं आणि पसंत होतील ते पाठवूं. परंतु दरसाल पांच रुपयांपर्यंत मराठी ग्रंथ आम्ही घेण्यास कबूल आहों, अशा सह्या हजारपर्यंत मिळाल्यास ग्रंथकारांकडून चांगले ग्रंथ करण्याची योजना आम्ही करूं. या मंडळीचें नांव मराठी उत्तेजक मंडळी असें ठेवूं. हजार सह्या मिळाल्यावर या मंडळीचें मुख्य आफिस मुंबई किंवा पुणें येथे ठेवण्याची व ग्रंथकार व परीक्षककमेटी व इतर कामदार यांची योजना करण्याची तजवीज होईल.

वर सांगितलेला हेतु पसंत पडून याप्रमाणे दरसाल पांच रुपयांचे ग्रंथ घेण्यास जे कबूल असतील त्यांनीं आपलें नांव व पत्ता हीं सुवाच्य अक्षरांनीं लिहून अगोदर ज्ञानप्रकाश छापखान्याचे म्यानेजर ह्याजकडे पाठवावीं.

गोपाळराव हरि देशमुख.
माधवराव गोविंद रानडे.

मराठी ग्रंथकारांचें पहिलें संमेलन

तारीख ११ मे (सन १८७८) रोजीं पुण्याला ग्रंथकारांचें पहिलें संमेलन भरलें होतें व त्यांत माधवरावांनी भाग घेतला होता. भाग घेतला नसता तरच आश्चर्य; कारण हें संमेलन भरविण्याची कल्पना माधवरावांचीच होती. त्याविषयी अगोदर एक दोन महिने वाटाघाट चालली होती. परंतु हें संमेलत विशेष यशस्वी झालें नाही. संमेलनाची व्यवस्था नीट नसावी, असेंहि वृत्तपत्रांतील टीकेवरून दिसतें. ग्रंथकार जातीने थोडे आले होते. पुष्कळांनी पत्रें पाठविलीं होतीं. जे आले होते, त्यांची सरबराई योग्य रीतीने

झाली नाही. कित्येकांनी शंका काढली की, संमेलनाच्या संस्थेमुळे कांही फायदा होणार नाही, चार दोन वर्षें तिच्या अस्तित्वाची टिमकी वाजेल व मग तिचें स्मरण देखील कोणास राहणार नाही. संमेलन एका दिवसांत आटोपलें. समारोप करतांना माधवरावांनी वरच्या शंकेला उत्तर दिलें. शंका घेणारांपैकी कांहींनी विलायतकडचीं ग्रंथवृद्धिकारक संस्थांचीं उदाहरणें सांगितलीं होतीं. माधवरावांच्या भाषणांत वरच्या दोन्ही आक्षेपांना उत्तर आहे. त्यांनी प्रथम इंग्लंड, युरोप व हिंदुस्थान या देशांतले भेद दाखवून तिकडचें सर्वांशीं अनुकरण करणें कसें शक्य नाही, याचा ऊहापोह केला आहे. पहिल्या आक्षेपाला 'संस्था निघून लयाला गेली तरी तिचा उपयोग आहे' असा त्यांनी आशादर्शक जबाब दिला आहे. (न. र. फाटक–रानडे चरित्र पृ. २९९)

परिशिष्ट २ रें

१८८५ तील ग्रंथकारांचें दुसरें संमेलन

[केसरी. १९ मे १८८५]

विनंतिपत्र

"मराठी भाषेंतील ग्रंथकार यांस विनंति करण्यांत येते कीं, मराठी भाषेंत ज्यांनीं ज्यांनीं आजपावेतों नवीन ग्रंथ अगर इतर भाषांतून भाषांतरें केलीं असतील अशा सर्व लोकांची परस्पर एकमेकांची ओळख व्हावी व भाषेची स्थिति ग्रंथांसंबंधाने हल्लीं कशी आहे व ती कोणत्या उपायानें सुधारतां येईल याविषयी चर्चा व्हावी या हेतूने चालू वसंतोत्सवांत एक दिवस नेमून त्या दिवशीं ज्या लोकांस येण्यास सवड होईल त्या सर्व ग्रंथकर्त्यांनी एकत्र जमावें असा कित्येक मंडळीचा उद्देश आहे. चालू महिन्यांत अशी मंडळी जमेल त्या दिवशीं गेल्या २० वर्षांत मराठी भाषेंत जे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत त्यांचा साधारण इतिहास देऊन त्यांतील गुणदोष थोडक्यांत सांगून कोणत्या विषयांवर ग्रंथाची न्यूनता आहे व ती दूर कशी होईल याविषयीं निबंध वाचिला जाईल व त्यानंतर या बाबतींत थोडी चर्चाही होईल. पुढे दर वर्षी याचप्रमाणें काम चालू राहून प्रत्येक वर्षास जे नवीन ग्रंथ प्रसिद्ध झाले असतील त्या ग्रंथकर्त्यांचा सन्मान करून त्यांच्या ग्रंथांची प्रसिद्धी ज्या रीतीनें होईल तशी केली जाईल. पूर्वी सूचना करण्यास सवड न झाल्यामुळें यावर्षी सर्वांस आमंत्रण वेळेस पोचणार नाहीं, तथापि या उद्योगास आरंभ या वर्षी करावा असा पुष्कळांचा विचार ठरल्यावरून ही जाहिरात प्रसिद्ध केली आहे. सर्व वर्तमानपत्रकारांनीं कृपा करून ही जाहिरात आपले पत्रीं प्रसिद्ध करावी व ज्या ग्रंथकारांच्या हातांत ही जाहिरात पडेल त्यांनी आपण केलेल्या ग्रंथांची एक एक प्रत येथील नेटिव जनरल लायब्ररीचे चिटणीस यांचे पत्त्यावर पाठवून द्यावी. सवड झाल्यास स्वतः यावें. सवड न झाल्यास वर लिहिल्याप्रमाणें पुस्तकें पाठवून सूचना करणें असतील त्या पत्रद्वारें नेटिव जनरल लायब्ररीचे चिटणिसांचे पत्त्यावर पाठवाव्या. असा ग्रंथसंग्रह एके ठिकाणीं झाल्यानें ग्रंथकर्त्यांस व इतर लोकांस मोठा उपयोग होणार आहे. सर्वांच्या सोईस पडावें म्हणून ता. २४ मे १८८५ इसवी रोजीं मराठी ग्रंथकारांची सभा पुणें येथे जोशी हालांत सार्वजनिक सभेच्या कचेरींत भरेल. तेथे सर्वांनी येण्याची मेहेरबानी करावी."

नी. ज. कीर्तने	का. बा. मराठे	मा. मो. कुंटे	गो. ग. आगरकर
म. गो. रानडे	ना. दा. योगी	ह. कृ. दामले	व्यं. रा. वकील.

मराठी ग्रंथकार मंडळींची सभा

रावब. महादेव गोविंद रानडे प्रभृति विद्वज्जन मंडळींच्या सह्यांची जाहिरात वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होऊन तीच जाहिरात रावब. माधवराव रानडे यांनी प्रसिद्ध प्रसिद्ध ग्रंथकारांकडे स्वतंत्रपणें टपालमार्गे पाठविली व ग्रंथकार लोकांस वेगळें अगत्याचें बोलावणें केलें. त्याप्रमाणे ता. २८।५।८५ रोजीं सातारा, सोलापूर, मुंबई वगैरे ठिकाणचे ग्रंथकार की ज्यांस येण्यास सवड झाली ते येऊन दाखल झाले होते, आणि ज्यांस येण्याला फावलें नाही त्यांजकडून त्यांना केलेल्या सूचनेप्रमाणे त्यांच्या पुस्तकांच्या प्रती आणि त्यांना ह्या ग्रंथकारांच्या सभेंत करावयाच्या सूचनांचीं पत्रें अशीं येऊन दाखल झालीं होतीं.

ठरल्याप्रमाणे वरील तारखेस पुणें येथील जोशी हॉलांत दुपारीं ४ वाजतां पुण्यांतील व बाहेरगांवचे ग्रंथकार आणि वर्तमानपत्रकार असे मिळून सुमारे ३०० निवडक लोक सभास्थानीं जमले होते. सभेच्या नियमाप्रमाणे त्या वेळेपुरते अध्यक्ष वगैरे नेमण्यापूर्वी रावब. रामचंद्र सखाराम गुप्ते यांनी उठून असें सांगितलें की, "मी ज्या गोष्टीची येथे सूचना करणार असून आपला आनंद दर्शविण्याची इच्छा करीत आहे त्या गोष्टीचा आणि प्रस्तुत येथे जमलेल्या मंडळींच्या उद्देशाचा जरी अर्थाअर्थी संबंध नाही तरी, हल्ली येथे जमलेल्या मंडळींस माझें म्हणणें अयोग्य व अप्रासंगिक असें वाटणार नाही अशी खात्री आहे. आपले परमप्रिय आणि मान्य सन्मित्र रावब. महादेव गोविंद रानडे यांस मुंबई सरकारने उदार होऊन व योग्य विचार करून आपले कौन्सिलर नेमल्याचें गेल्या सरकारी गॅझेटवरून सर्वांना कळलेंच आहे. त्यावरून आपणां सर्वांना जो संतोष होत आहे त्याबद्दलचे आनंदोद्गार ह्या वेळीं आपण स्पष्ट बोलून दाखविल्यास त्यांत कांही गैर होईल असें मला वाटत नाही. आपले मित्र रावब. रानडे हे, त्यांस मिळालेल्या हल्लीच्या सन्मानास अत्यंत योग्य आहेत ह्याबद्दल कोणाचाहि मतभेद होणार नाही. रावब. महादेव गोविंद रानडे या नांवामागे 'नामदार' हें बहुमानदर्शक विशेषण लावून त्यांस "नामदार रावब. महादेव गोविंद रानडे" असें म्हणण्यास आपल्याला जें समाधान आणि जो आनंद वाटेल तो अद्वितीय आहे यांत संशय नाही, व मी जें हें म्हणतों त्याचप्रमाणें सर्वांसहि कबूल असेल अशी माझी खात्री आहे. तेव्हा आता ह्या संबंधाने शेवटीं ईश्वराची प्रार्थना म्हणून इतकीच आहे की, त्याने आपल्या ह्या विद्वान आणि सर्वप्रिय मित्रास सर्व प्रकारचें सौख्यसमाधान देऊन, त्यांस ह्या महत्पदाचा उपभोग असाच वारंवार व पुष्कळ दिवस घेण्याचे प्रसंग येऊन, त्यांच्या हाताने अनेक अपेक्षित लोककार्यें आणि देशकार्यें ईश्वर घडवून आणण्यास त्यांना आयुरारोग्य देवो इतकीच त्या परमेश्वराची प्रार्थना करून खाली बसण्यास आपली आज्ञा घेतों."

रावब. गुप्ते यांचें ह्याप्रमाणे भाषण झाल्याबरोबर सर्व मंडळींकडून आपली मान्यतादर्शक असा फार मोठा टाळ्यांचा गजर झाला आणि रावब. गुप्ते बोलले ही गोष्ट सर्वांशीं खरी आणि योग्य झाली याबद्दल त्यांनी आपला आनंद दर्शविला.

नंतर.....यांनी अशी सूचना केली की, आजच्या जमलेल्या सभेंत वय, विद्वत्ता आणि अनुभव यांनी श्रेष्ठ असे वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री कृष्णशास्त्री राजवाडे यांनी अध्यक्षस्थान स्वीकारावें व त्या स्थानास तेच योग्य आहेत ह्या म्हणण्यास

(.....) यांनी आपलें अनुमोदन दिलें आणि सर्वानुमतें वे. शा. सं. कृष्ण-शास्त्री राजवाडे यांनी अध्यक्षस्थान स्वीकारलें.

रा. रा. वामन बाळकृष्ण रानडे, 'ज्ञानचक्षू'चे एडिटर, यांस सभेचें काम करण्यास चिटणीस नेमिलें.

रा. रा. वामनराव रानडे यांनी उठून प्रथमतः सभा भरविण्याच्या उद्देशाचें मूळ प्रसिद्धिपत्रक वाचून दाखविलें व ग्रंथकारांस आणि वर्तमानपत्रकारांस विनंती केल्याप्रमाणे ज्या अर्थी आज ही सभा भरली आहे त्या अर्थी आता आपलें काम चालविण्यास हरकत नाही असें कळवून नंतर पुण्यांतील व बाहेरगांवांहून ज्या ग्रंथकारांकडून आपल्या अभिप्रायाचीं पत्रें आलीं होतीं त्यांपैकी पुढे लिहिल्याप्रमाणे कित्येक गृहस्थांचीं पत्रें वाचून दाखविलीं.

(१) पहिलें पत्र रा. रा. जोती गोविंद फुले यांचें वाचून दाखविलें, तें असें होतें:— (मूळांत जागा कोरी).

(२) दुसरें पत्र रा. रा. जावजी दादाजी, मुंबई येथील निर्णयसागर छापखान्याचे मालक, यांचें असून त्यांतील आशय हा होता :—

"ग्रंथकारांस योग्यतेनुरूप उत्तेजन मिळत नाही म्हणून ग्रंथ प्रसिद्ध होत नाहीत. चांगल्या उपयुक्त ग्रंथांस आश्रय देण्याच्या उद्देशाने पुणें व मुंबई येथील तीन तीन असे सहा गृहस्थांची कमिटी नेमावी. ती वाचून पसंत झाल्यास यांचे कर्त्यास काय द्यावें हें ठरवून त्यांच्या चारशे प्रती खपविण्याची खटपट करावी. किंमत नेमस्त ठेवावी. स्वामित्व कर्त्याकडे राहावें. असें दोन वर्षें करून पाहावें."

× × ×

(३) नंतर श्रीमंत बापूसाहेब (गणपतराव हरिहर) कुरुंदवाडकर यांचें पत्र पुढे लिहिल्याप्रमाणे वाचून दाखविलें :— "सभेचे उद्देश फार स्तुत्य आहेत. येणेंकरून ग्रंथकर्त्यांस उत्तेजन येणार आहे. त्यांचे गुणदोष त्यांस समजवावे. सभेचा निर्णय कळविण्यांत यावा."

* * *

(४) रा. रा. बाळकृष्ण मल्हार हंस, इंदूर, यांचें पत्र असें होतें :—

"दक्षिणा प्राईझ कमिटीप्रमाणे मंडळ्या स्थापित व्हाव्या. ग्रंथकर्त्यांस उत्तेजन देण्यास ह्या मंडळीने पैसा जमवावा, व शाळाखात्यांत इनामें देतात त्यांतूनहि हा पैसा जमवावा. हा पैसा संस्थानिक गायकवाड, होळकर यांजकडे मदत मागावी. सर्वत्रांनी आपल्या मुलांकडून मराठीचा चांगला अभ्यास करवावा. लहान सर्वसिद्ध असा कोश तयार करवावा. कारण कोश व व्याकरण झाल्यावांचून भाषेस स्थाइकपणा येत नाही. इतर भाषांतून शब्द घेऊन भाषा वाढवावी. नाटकें, शास्त्रीय विषयांवर पुस्तकें झालीं आहेत, इतिहासावर नाहीत, सबब त्या-विषयी प्रयत्न व्हावा. ऐपत नसल्यामुळे ग्रंथ छापले गेले नाहीत. जाहिरातीने तपास करून छापण्याजोगे छापवावे."

* * *

(५) रा. रा. जनार्दन महादेव गुर्जर, मुंबई, यांच्या पत्रांतील आशय हा होता :—

"या लायब्ररींत संस्कृत प्राचीन अर्वाचीन ग्रंथांचा संग्रह करावा. पुस्कळांची पुनरावृत्ति होत नाही व कित्येक छापले जात नाहीत."

× * ×

(६) श्री. शहाजी महाराज भोंसले उर्फ जंगली महाराज, सातारा, यांचें पत्र वाचून दाखविलें. तें आपल्या पत्रांत म्हणतात :—

"धर्मबुद्धि जागृत ठेविण्याविषयी निष्ठा अंतःकरणांत असल्यावांचून चांगले ग्रंथ उदयास येणार नाहीत."

* * *

(७) डॉ. कान्होबा रणछोडदास कीर्तिकर, ठाणें, यांचें पत्र पुढे लिहिल्याप्रमाणे होतें :—

"पौराणिक काव्यें खेरीज करून इतर ग्रंथांची फार उणीव आहे. युनिव्हर्सिटीने मराठी काढून टाकिल्यामुळे भाषेस मोठा धक्का बसला आहे. उत्तेजन व ऐपत नसल्यामुळे पुष्कळ ग्रंथ छापले जात नाहीत, म्हणून जागोजागीं मंडळीने एजंट नेमावे व उत्तम पुस्तकें होतील तीं एजंटांमार्फत खपवावीं. यांस ग्रंथकर्त्याकडून कमिशन मिळावें. ज्यांचे ग्रंथ उत्तम ठरतील त्यांस मेडल अगर शेलापागोटें द्यावें. अशाने उत्तेजन येणार आहे."

\+ \+ \+

(८) रेव. नीलकंठशास्त्री गोरे यांचें पत्र वाचून दाखविलें. त्यांत ते म्हणतात :—

"पारशी उर्दू शब्द वापरूं नयेत."

* * *

(९) आणि शेवटीं रा. रा. महादेव चिमणाजी आपटे, मुंबई, यांचें आलेलें पत्र वाचून दाखविलें. त्यांतील आशय इतकाच होता कीं :— (जागा कोरी).

× × ×

टीपः—वर दिलेल्या यादींत आणखी कांही लोकांकडून आलेल्या पत्रांचा समावेश झालेला नाही. तो येथे खाली दिला आहे. हा मजकूर वेगळ्या यादींत पत्रांचा गोषवारा जींत दिला आहे तींतून घेतलेला आहे.

(१) रा. रा. हरि अप्पाजी काणे, पांढरकवडा, हे लिहितातः—"कोणत्या प्रकारचे ग्रंथ असावे अशा विषयी नोटिशींत खुलासा नाही."

(२) रा. रा. वासुदेव वामनशास्त्री खरे, मिरज, लिहितात—"फारशी भाषेंतील चांगल्या चांगल्या पुस्तकांचीं भाषांतरें केल्यास ती एक आपल्या मराठी ग्रंथसमुहांत उत्तम प्रकारची मदत होऊन ग्रंथवृद्धीला कारण होणार आहे. उदाहरणार्थ, ऐन अखबरी ह्या ग्रंथासारख्या सुंदर ग्रंथावरून महाराष्ट्रभाषेंत ग्रंथ झाल्यास अत्यंत इष्ट आहे. तसेंच महाराष्ट्र देशाचा सविस्तर इतिहास लिहिला जाण्याविषयी ग्रंथकार मंडळीने उद्योग केला पाहिजे." आणि रा. खरे यांची तिसरी सूचना अशी होती की, ह्या इतिहासाच्या आधाराने मनोरंजक ऐतिहासिक कादंबऱ्या झाल्या पाहिजेत.

(३) रा. रा. गणेश बाबाजी माटे, वकील, सोलापूर—"यांनी दहा ग्रंथ केले आहेत व मासलेवाईक चार चुटके लिहिले आहेत."

(४) हेनरी जे. ब्रुक्स्, सातारा—"येण्यास फावत नाही. पुस्तकांची यादी पाठविली आहे. खिस्ती लोक येण्याची जरुरी असल्यास सभा आदितवारीं भरवूं नये."

(५) रा. रा. एकनाथ गणेश भांडारे, जबलपूर—वर्तमानपत्रकर्ते ज्याप्रमाणे आपापलीं वर्तमानपत्रें मोबदल्यांत पाठवितात त्याप्रमाणे सर्व ग्रंथकर्त्यांनी आपापले ग्रंथ निदान निम्मे किंमतीस आपल्या ग्रंथकारबांधवांस देण्याचें योजिल्यास ग्रंथांचा तितका जास्त प्रसार होऊन, त्या ग्रंथांपासून ग्रंथकर्त्यास कांही वसूल होईल आणि ग्रंथकारांचे विचार त्यांचे इतर ग्रंथकार

बांधवांस अनायासें कळण्याची सोय होईल. रा. भांडारे यांची दुसरी सूचना अशी आहे की, अशा ग्रंथकारांच्या सभांतील जे निबंध वाचले जातील किंवा भाषणें होतील तीं छापवून थोड्या किंमतीने तीं पुस्तकें मिळतील अशी व्यवस्था झाल्यास आमच्यासारख्या दूर राहणाऱ्या लोकांस सभेचें स्वरूप आणि देखावा सहज रीतीने समजण्यास सुलभ होईल.

(६) रावबहादूर गोपाळराव हरि देशमुख, मुंबई, हे आपल्या पत्रांत लिहितात की, कामाचे नडीमुळे येण्यास व सभेंत हजर राहण्यास मला फावत नाही. यंदा ह्या स्तुत्य कार्यास सुरुवात करावी. पुढील वर्षी हें काम चांगलें जमेल. नवीन नवीन ग्रंथ होऊन दिवसेंदिवस भाषा सुधारत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. परंतु ह्या ग्रंथवृद्धीमध्येच कित्येक बीभत्स ग्रंथ होत असल्याचें दिसतें. अशा ग्रंथप्रसिद्धीस मॅजिस्ट्रेटांकडून कायद्याप्रमाणे प्रतिबंध झाला पाहिजे अशी कांही तजवीज घडल्यास फार बरें होईल.

(७) डॉ. भालचंद्र कृष्ण भाटवडेकर, मु. बडोदें, यांच्या पत्रांतील आशय हा होता की, मजला ह्या सभेस येण्यास फावत नाही याबद्दल मी दिलगीर आहें. तथापि, सभेमध्ये वाचले जाणारे निबंध किंवा ग्रंथांच्या गुणावगुणांविषयीच्या अभिप्रायाचीं झालेलीं भाषणें छापून प्रसिद्ध झाल्यास बरें होईल. व तशीं प्रसिद्ध व्हावीं अशी इच्छा आहे. सभेचा उद्देश फार चांगला आहे. येणेंकरून भाषेची सुधारणा होऊन ग्रंथकर्त्यांस उत्तेजन मिळण्याला एकप्रकारें मार्ग होणार आहे, व तेणेंकरून उत्तम प्रतीचे ग्रंथ उदयास येतील असें वाटतें. त्याचप्रमाणे अनेक शास्त्रीय विषयांवर ग्रंथ झाले पाहिजेत. तसे ग्रंथ फार लोकोपयोगी होऊन ग्रंथवृद्धीची सार्थकता त्यांतच आहे असें मला वाटतें, वगैरे.

(८) रा. रा. सोकर बापुजी त्रिलोकेकर हे आपल्या पत्रांत म्हणतात की, अशा सभेचा उद्देश स्तुत्य आहे. आपल्या मराठी भाषेंतून यावनी शब्द काढून टाकण्याचा सर्व ग्रंथकार मंडळीने निश्चय करून प्रयत्न केल्यास फार चांगलें होईल.

(९) रा. रा. काशिनाथ त्रिंबक खरे यांजकडून पत्र आलें त्यांत ते म्हणतात की, ह्या भरणाऱ्या सभेंत पुस्तकांचे विषयाविषयी चर्चा झाली पाहिजे. त्याचप्रमाणे तशी चर्चा करणारे वर्तमानपत्रकर्ते व मासिक आणि त्रैमासिक पुस्तककर्ते यांचाहि त्या सभेंत समावेश केल्यास तशा चर्चेला एक प्रकारें विशेष साह्य होईल. ह्या कामांत पुढारीपणा घेणारांनी स्वतः कांही तरी अंशतः घस सोसीला पाहिजे म्हणजे अशा सभेचें स्वरूप काय आहे तें लोकांस कळून येईल. नाही तर आरंभशूरपणाचा दोष माथीं येईल, वगैरे.

(१०) रा. घंटय्या नायडू, जबलपूर, लिहितात—"ग्रंथकर्त्यांच्या ओळखीपासून म्हणण्यासारखा फायदा नाही. ग्रंथांच्यासंबंधाने भाषेची सुधारणा करणें सभेच्या शक्तीबाहेर आहे. टीका करणारे ग्रंथ समग्र वाचून टीका करीत नाहीत व कित्येक वेळां ग्रंथकारांवर विनाकारण तुटून पडतात. या भीतिस्तव ग्रंथ प्रसिद्ध होत नाहीत. अपक्व ग्रंथकारांपासून भाषेचें फार अनहित होतें. ग्रंथांची किंमत माफक ठेवावी. तसें न केल्याने ग्रंथ खपत नाहीत व दुसरे करण्यास उत्तेजन येत नाही. हें टीकेचें काम एखाद्या निःपक्षपात विद्वानाने पत्करावें. सभेने आपणांकडे घेऊं नये. कोणत्या विषयावर ग्रंथ पाहिजेत याचा अवश्य शोध व्हावा. ग्रंथकर्त्यांचा सन्मान करण्याचें काम सभेने आपलेकडे घेऊं नये. ग्रंथाचे गुणदोषांवर अवलंबून असावें. सभेने मान दिल्यास लोक देतीलच असें समजूं नये. ग्रंथाचे गुणांवर तो मान्य होणार आहे. ग्रंथकाराने मान्य होण्याचा प्रयत्न करावा. ग्रंथसंग्रहाचा उद्देश स्तुत्य आहे."

(११) रा. रा. गोपाळ नागेश—"गणपतीपर कविता हा ग्रंथ एका उंच कुलांतील बाईने केला आहे. याविषयी चर्चा होऊन योग्य अभिप्राय प्रसिद्ध व्हावा."

(१२) सीताराम सखाराम दातार, तळेगांव ढमढेरें—"पत्र वाचण्यासारखें आहे."

(१३) पंडित नारायण केशव वैद्य—"मराठी ग्रंथांचा संग्रह एके ठिकाणीं असावा."

(१४) रा. यशवंत पुरुषोत्तम मणेरीकर, मुंबई—"ज्यांचेजवळ पुस्तकसंग्रह आहे त्यांजला पुढले सालाकरिता ग्रंथ तयार करून आणण्यास सांगावें व अशा अनुभवी लोकांस या सभेचे सभासद नेमावें. त्यांजकडून चांगले बहुमान्य ग्रंथ तयार होतील. ग्रंथांची प्रसिद्धी .....थोडक्या किंमतींत लोकांस उपयुक्त ग्रंथ कसे मिळतील याबद्दल विचार व्हावा."—

प्रोसिडिंग ग्रंथकारांची सभा

प्रारंभीं रावबहादूर रामचंद्र सखाराम गुप्ते यांनी रावब. रानडे यांस कौन्सिलदार नेमल्याबद्दल आनंद दर्शविला.

१. पहिल्याने वेदशास्त्रसंपन्न कृष्णशास्त्री राजवाडे यांस अध्यक्षस्थानीं नेमून सभा भरविण्याच्या उद्देशाचें पत्रक वाचून दाखविलें.

२. ज्या ग्रंथकारांकडून पत्रें आलीं त्यांचीं नांवें वाचून दाखविलीं.

३. ज्या ग्रंथकारांकडून पत्रें व सूचना आल्या त्यांचीं नांवें वाचून दाखविण्यांत आलीं. पत्रें वाचून दाखविलीं तीं—

(अ) रा. रा. जोती गोविंदराव फुले यांचें.
(ब) रा. रा. जावजी दादाजी, निर्णयसागर छापखान्याचे मालक, यांचें.
(क) श्री. रा. बापुसाहेब कुरुंदवाडकर यांचें.
(ड) रा. रा. बाळकृष्ण मल्हार हंस यांचें.
(ई) रा. रा. जनार्दन महादेव गुर्जर यांचें.
(फ) श्री. शहाजीमहाराज भोसले सातारकर (उर्फ़ जंगली महाराज) यांचें.
(ग) डॉ. कान्होबा रणछोडदास, ठाणें, यांचें.
(ह) रेव्ह. नीलकंठशास्त्री गोरे यांचें.
(आय्) रा. रा. महादेव चिमणाजी आपटे यांचें.

४. कांही पत्रांतील गोषवारा वाचून दाखविला. एकंदर पत्रें ४३ आलीं होतीं.

५. सुमारें ३०० पुस्तकें जमलीं असें कळविण्यांत आलें.

६. रावबहादूर माधवराव रानडे यांनी भाषण केलें.

७. रा. रा. हरि कृष्ण दामले यांनी गेल्या २० वर्षांत जे ग्रंथ प्रसिद्ध झाले त्यांची हकीकत वाचून दाखविली.

८. रावबहादूर रानडे यांनी सालवार टिपण वाचून दाखविलें.

९. (रा.) काशीनाथ बाळकृष्ण मराठे यांची सूचना काव्यकोश आणि व्याकरण यांचें पाऊल पुढे पडावें. कोशाचें पाऊल पुढे अवश्य पडलें पाहिजे.

१०. रा. रा. अमृत श्रीपत नागपूरकर यांची सूचना ग्रंथकारांस उत्तेजन मिळण्याची तजवीज व्हावी. लोकांचे लेखी ग्रंथ पडून राहिले आहेत ते प्रसिद्ध होण्याची तजवीज व्हावी. वेदशास्त्रसंपन्न रघुनाथ भास्कर गोडबोले यांचा मराठी भाषेचा कोश शाळेंत चालू व्हावा.

११. वे. शा. सं. गणेशशास्त्री मालवणकर यांची सूचना मराठी भाषेंत संस्कृत शब्द फार येतात. तो क्रम तसाच झपाट्याने चालवावा अथवा मूळ मराठी शब्द कायम ठेवावे. दुसरी सूचना लेखनकलाविषयक ग्रंथ मीं केला त्याचा प्रसार व्हावा.

१२. रा. रा. गोपाळ गणेश आगरकर यांची सूचना संस्कृत भाषेचे शब्द मराठींत येत जावे. एक भाषा व्हावी. भाषाशुद्धि व्हावी. इंग्रजीची घेडगुजरी करूं नये. भाषा सोवळी करण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे. तसा आग्रह नसावा. भाषेच्या संबंधाने देशत्व येण्यास आमचे विद्वान लोक सरकारी सर्व अधिकारांवर विराजमान झाले पाहिजेत. युनिव्हर्सिटीकडे मराठीचा समावेश व्हावा. ग्रंथकारांनी आपले ग्रंथ सवंग विकून वृद्धि करावी.

१३. रामचंद्र मोरेश्वर साने यांची सूचना. ग्रंथमंडळी आणि ही मंडळी एक करावी. मराठी भाषेंत इतर शब्द आल्यास हरकत नाही. ईडियम्स कायम ठेवावे.

१४. गुजराथेंतून (बडोद्याहून) आलेल्या गृहस्थाची हिंदुस्थानीमध्ये सूचना. सर्व देशांत सारखी भाषा चालेल असा कांही प्रयत्न झाला पाहिजे (लिंग्वा फ्न्यांका).

१५. वे. शा. सं. वामनशास्त्री केमकर यांची सूचना. मराठी भाषेला पुष्टि येण्याला साधन शास्त्रीय व्याकरण, अलंकारशास्त्र यांचा विस्तार झाला पाहिजे. ग्रंथकारांची मंडळी सतत व वारंवार होईल असा कांही उद्योग व्हावा. हा उद्योग जागरूक राहावा.

१६.....ची सूचना. वर्तमानपत्रें, ग्रंथ आणि वक्तृत्व हीं वाढलीं आहेत. त्यांगलें व्याकरण व्हावें.

१७. अध्यक्ष वे. शा. सं. कृष्णशास्त्री राजवाडे यांनी सांगितले की, बोलणारांचीं भाषणें ग्राह्य आहेत.

१८. रावब. रानडे यांनी शेवटीं सांगितलें की, पुष्कळांस भाषणें करावयाचीं राहिलीं आहेत तीं त्यांनी लेखी कळविलीं असतां बरें होईल.

१९. रा. रा. आगरकर यांची सूचना की, अध्यक्ष आणि कै. रावब. दादोबा पांडुरंग यांची कन्या आहिल्याबाई तर्खडकर यांनी आगमन केलें म्हणून त्यांचे आभार मानून आनंद मानतों. आगरकर यांचे सूचनेस रावसाहेब मराठे यांनी अनुमोदन दिलें.

तारीख २४ रोजीं जोशी हॉलांत मराठी ग्रंथकारांची सभा भरली होती त्या वेळीं आमंत्रणावरून पत्रकार, ग्रंथकार मंडळी व इतर लोक हजर होते ते

१ रा. ब. नीलकंठराव जनार्दन कीर्तने
१ रावसा. काशीनाथ बाळकृष्ण मराठे
१ रावब. रामचंद्र सखाराम गुप्ते
१ वे. शा. सं. गणेशशास्त्री मालवणकर
१ रा. रा. बजाराम रामचंद्र नेने
१ रा. रा. सीताराम बाबाजी गुर्जर
१ रा. रा. नारायण बापूजी कानीटकर
१ रा. रा. विष्णु सदाशिव
१ रा. रा. बळवंतराव देव
१ रा. रा. हरि कृष्ण दामले
१ रा. रा. केशवराव गोडबोले
१ रावसा. चिंतामणराव नारायण भट
१ रावसा. वामनराव आबाजी मोडक
१ रा. रा. बाळकृष्ण आत्माराम गुप्ते
१ वे. शा. सं. कृष्णशास्त्री राजवाडे
१ रा रा. सखाराम बाळकृष्ण सरनाईक
१ रा. रा. काशीनाथ गोविंद नातू
१ रा. रा. विठ्ठल बाळकृष्ण सरनाईक
१ रा. रा. रामचंद्र गोविंद सापकर
*१ रा. रा. बाळकृष्ण दिनकर वैद्य कल्याणकर
*१ रा. रा. अमृत श्रीपत नागपूरकर
रा. रा. गोपाळ गणेश आगरकर
रा. रा. महाजनी विष्णु मोरेश्वर
रा. रा. गोळे, M. A. महादेव शिवराम
नारायण दामोदर छत्रे
डॉ. गणेश कृष्ण गर्दे
रा. रा. महादेव बल्लाळ नामजोशी
वे. शा. सं. रघुनाथ भास्कर गोडबोले
जनार्दन महादेव गुर्जर
जनार्दन अनंत जोशी
१ _____
१ _____
१ _____

१ अहिल्याबाई तर्खडकर
१ रा. रा. प्रभाकर लक्ष्मण नागपूरकर Editor
*१ रंगनाथ नारायण मोहोळकर
*१ चिंतामण अनंत लिमये
*१ अनंत वामन बर्वे
*१ बाळाजी सदाशिव डोळे
*१ रावजी वासुदेव साठे
*१ कृष्णराव रामराव ताळपत्रीकर, ग्रंथकार
*१ गोविंद बाळकृष्ण मैंदरगी
*१ नारायण दामोदर खरे
*१ हरि कृष्ण दामले
*१ नारायण गोविंदराव कुलक (फाटक !)
*१ परशुराम हरि थत्ते, हेडमास्तर, इं. शाळा, भुसावळ
१ रामचंद्र मोरेश्वर साने
१ रा. रा. वामन बाळकृष्ण रानडे
१ रा. रा. कृष्णराव बापूजी मांडे
१ रा. रा. रामचंद्र भिकाजी जोशी
१ रा. रा. हरिश्चंद्र नारायण नवलकर
१ वे. शा.सं. वामन एकनाथ केमकरशास्त्री
१ रा. रा. शंकर विश्वनाथ केळकर
१ नारायण हरि भागवत
१ रा. रा. काशीनाथ त्रिंबक खरे

—:0:—

* या सुमारे ह्या गृहस्थांनी स्वतः सभा केल्या असाव्या असें यादी पाहतां दिसतें. द. वा. पो.

साभार निवेदन

म. सा. परिषदेने इतिहास-लेखनाचें कार्य आमच्याकडे सोपविलें तेव्हा शक्य तेवढी जुनी माहिती जमविण्याचा उद्योग आम्हीं आरंभिला. त्यांत आमचे मित्र रा. शरच्चंद्र वामन रानडे, बी. ए., नागपूर, यांनी पुण्यास आपल्या घरचे कागदपत्र चाळीत असतां मिळालेलीं इ. स. १८८५ सालच्या मराठी ग्रंथकारांच्या सभेचीं टिपणें आम्हांस दाखविलीं. रा. श. वा. रानडे यांचे वडील म्हणजे कै. वामनराव रानडे 'ज्ञानचक्षु'कर्ते, पुणें, हे पुण्यांतील मागील पिढींतील एक साक्षेपी लेखक होते. १८८५ तील ग्रंथकारांच्या सभेचे प्रेरक रावब. माधवरावजी रानडे प्रभृति होते आणि कै. वामनराव रानडे यांना सभेचे चिटणीस नेमिलें होतें. यामुळे त्यांचे संग्रहांत हीं टिपणें मिळालीं. कै. वामनराव हे रोजनिशी वगैरे लिहिणारे असें फार साक्षेपी गृहस्थ होते आणि त्यांचे चिरंजीव रा. शरच्चंद्रपंत याचेहि ठिकाणीं वडिलांचा हा गुण भरपूर प्रमाणांत उतरला आहे. त्यामुळेच त्यांनी वडिलांच्या वेळचा गळाठा चाळून हें 'रद्दींतलें रत्न' आम्हांस दाखविलें. हीं मूळचीं टिपणें शाईने लिहिलेलीं आहेत. हीं कांही कच्चीं व कांही पक्कीं दिसतात. हे सर्व कागद पाहून, कोठे थोडा पुनरुक्तीचा मजकूर सहज गाळतां आला तो गाळून, बहुतेक मुळास धरून, जुळवून हा वृत्तांत छापला आहे.

यांत प्रथम सभेची कांही हकीकत, मागून आलेल्या कांही पत्रांचा सारांश, त्यानंतर उरलेल्या इतर पत्रांतील साराश, पुनः प्रोसीडिंग या मथळ्याखाली सापडलेला उपयुक्त मजकूर आणि अखेर हजर मंडळीची यादी असे विभाग बसवून हा १८८५ च्या सभेचा अहवाल येथे प्रसिद्ध केला आहे.

१८७८ सालची ग्रंथकारांची सभा हें पहिलें संमेलन समजलें तर १८८५ सालची ही सभा हें दुसरें संमेलन होय. ही वस्तुस्थिति लक्ष्यांत न घेतां कित्येक मंडळी १८८५ सालच्या वरील सभेलाच पहिलें संमेलन धरून चालतात ती त्यांची भ्रांति होय!!

या सभेचा वृत्तांत इतक्यांतच दुष्प्राप्य व्हावा हें दुर्दैव होय; आणि म्हणून कागद हातीं येतांच रा. रानडे यांनी हा ठेवा या लेखकाचे नजरेस आणून दिला यास्तव या श्रेयाचे तेच पूर्णाधिकारी आहेत. रा. रानडे यांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोंत.

या १८८५ तील सभेस हजर असणाऱ्यांपैकी दोन तरी गृहस्थ अद्यापिहि विद्यमान आहेत ही भाग्याची गोष्ट आहे. ते म्हणजे रा. सीताराम बाबाजी गुर्जर व रा. परशुराम हरि थत्ते. पहिले हे कादंबरीकार विठ्ठलपंत गुर्जरांचे वडील व दुसरे नाशिकचे शोधक लेखक. उभयतांच्या परिचयाचाहि लाभ या लेखकास मिळत असल्यामुळे तो संतोष येथे व्यक्त करणें उचित वाटतें.

चैत्र शु. १।५९
१३।३।३७

दत्तो वामन पोतदार

[केसरी. ता. २६ मे १८८५]

पत्रकर्त्यांच्या स्फुट सूचना

"मागील अंकीं प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीप्रमाणे गेले रविवारीं जोशीबाबांचे दिवाणखान्यांत ग्रंथकर्त्यांची सभा भरली होती. शेसवाशे ग्रंथकार आले होते. संप्रदायाप्रमाणे अध्यक्षांची नेमणूक झाल्यावर गेल्या वीस वर्षांत मराठी भाषेचें पाऊल कितपत पुढे पडलें हें समजण्याकरिता प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांचे संबंधाने रा. ब. रानडे यांची जमलेल्या मंडळींस माहिती दिली. सन १८६५ सालीं रा. ब. यांनी सरकारचे सांगीवरून याच विषयावर एक रपोट केला होता. यामुळे या खेपेस मराठी ग्रंथकारांवर नजर फेकण्याचें काम त्यांनी केल्याने मराठी भाषेचा ओघ अनियमितपणें पुढे धाव घेत आहे हें त्यांस फारच सुबोध रीतीने दाखवितां आलें. रपोट वाचल्यावर दोन चार गृहस्थांनी मराठी भाषेंत ग्रंथाभिवृद्धि होण्यासाठी दोन चार स्तवनांची योजना करण्याविषयी सुचविलें व सरकारी मदत मिळविणें, मराठी ही सर्वांस अवगत भाषा करण्याची खटपट करणें, लोकांस उपयोगी पडतील असेच विषय हातीं घेणें वगैरे झालेल्या व पुढे होतील त्या सूचनांचा विचार करून पुढे काय करावें हें ठरविण्याचें पुढील वर्षावर ठेवून सभा विसर्जन झाली."

परिशिष्ट ३ रें

१९०५ मधील ग्रंथकारांचें *तिसरें संमेलन

[केसरी. अंक ता.२३ माहे मे सन १९०५ इ.]

सातारचें संमेलन

सातारा येथील कित्येक पुढारी मंडळींच्या खटपटीने मराठी ग्रंथकारांचें संमेलन गेल्या आठवड्यांत साताऱ्यास होऊन त्यांत चार विद्वान एकत्र जमले असतां काव्यशास्त्रविनोदाच्या ज्याप्रमाणे गप्पा होतात, तशाप्रमाणे सुखाने व आनंदाने बऱ्याच विषयांवर चर्चा होऊन मोठी मौज झाली, असें सदर संमेलनाच्या प्रसिद्ध झालेल्या हकीकतीवरून दिसतें. चार मंडळीने एकत्र जमून आपला काल आनंदांत, प्रेमांत व मौजेंत घालवूं नये, असा कांही कोणी निर्बंध केलेला नाही. मनुष्य जात्याच उत्सवप्रिय आहे. मग तो विद्वान असो किंवा अविद्वान असो. भेद इतकाच की, विद्वान एकत्र झाले असतां आपला काल काव्यशास्त्रविनोदांत घालवितात आणि मूर्ख त्याच्या उलट व्यसनांत, निद्रेंत किंवा कलहांत घालवितात. सातारच्या सभेंत जमलेले लोक विद्वान असल्यामुळे त्यांनी पहिल्या मार्गाचें अवलंबन केलें. त्यांतून जेथे दादासाहेब करंदीकर, तात्यासाहेब मुताल्लिक किंवा दत्तोपंत पारसनीस यांच्यासारखी मंडळी व्यवस्था ठेवण्यास होती तेथे जेवणाखाण्याचा वगैरे बेत उत्तम राहून मंडळींचा काल पुष्कळ मौजेंत गेला असेल याबद्दल कोणासहि शंका येण्यास जागा नाही. इतकी विद्वान मंडळी एकत्र जमून व व्याख्यानांच्या चक्रथा होऊन पुन्हां जॉनसनच्या रासेलसप्रमाणे या संमेलनाचा शेवट झाला एवढेंच काय तें जरा विलक्षण आहे! विद्याविषयक चर्चा राजकीय दृष्टीने

निरुपद्रवी आहे व म्हणून तिला राजकीय उत्सवापेक्षा अधिक सहानुभूति मिळेल हे खरें आहे. पण कोणतीहि चर्चा किंवा उत्सव निरुपद्रवी आहे एवढ्यानेच त्यांचें कार्य सिद्धीत जात नाही. असो. संमेलनाची ही पहिलीच बैठक आहे. करितां काव्यशास्त्रविनोदापेक्षा यांतून पुढें कांही जास्त निघतें कीं काय हें पाहून मग त्या संबंधाने जास्त लिहिण्यासारखें असल्यास लिहूं. मराठी भाषेंतील ग्रंथकार किंवा विद्वान मौजेकरिता कां होईना, पण एके ठिकाणीं जमले ही आनंदाची गोष्ट आहे; व त्यांच्या करमणुकीची नीट व्यवस्था ठेवल्याबद्दल सातारकरांचें आम्ही अभिनंदन करतों.

परिशिष्ट ४ थें

मराठी ग्रंथकारांचें *चौथें संमेलन

[केसरी अंक. ता. २९ माहे सन मे १९०६ इ.]

मराठी ग्रंथकारांचें *द्वितीय संमेलन

गेले शनिवारीं व रविवारीं दोन दिवस सकाळ सायंकाळ ग्रंथकारांचें +द्वितीय संमेलन येथे मळेकरांच्या वाड्यांत रा. सा. गोविंद वासुदेव कानिटकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलें होतें. गेल्या सालीं सातारा मुक्कामीं भरलेल्या प्रथम संमेलनाप्रमाणे ह्या दुसऱ्या संमेलनानेहि 'काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम्' या न्यायाने शब्दसृष्टींतील आदरणीय व मनोरम प्रदेशांत यथास्थित संचार करण्यांत वेळ घालविला. साताऱ्यास रा. पारसनीस, रा. करंदीकर व रा. मुतालीक यांच्या पाहुणचाराने ग्रंथकर्त्यांस विद्यादेवीच्या प्रसादापेक्षा इतर निरुपद्रवी करमणुकींत कांही काळ व्यर्थ दवडावा लागला; पण, पुणें शहर विद्यादेवीचें माहेरघर असल्यामुळे विद्याविषयक आनंदांतच मंडळी एकसारखी तल्लीन होती. विशिष्ट कामाकरिता जमलेल्या पाहुण्यांवर त्या कामापेक्षा फाजील पाहुणचार लादण्याची राष्ट्रीय सभेने घालून दिलेली पद्धत ह्या विद्वान लोकांच्या संमेलनांत उचलण्यांत आली नाही ही समाधानाची गोष्ट होय. साताऱ्याचें संमेलन रासेलसप्रमाणे काव्यशास्त्रपरिपूर्ण पण कोणत्याच बाबीसंबंधाने व्यवस्थित कार्यक्रमास विशिष्ट स्वरूप न देणारें असें झालें. ग्रंथकार एका जागीं जुळले असतां त्यांनी एक दोन दिवस साहित्यविषयक चर्चा करून मौजेंत वेळ घालविल्यास त्यांत कोणाचें कांही नुकसान नाही; पण तेवढ्या मौजेवरच ग्रंथकारांच्या संमेलनाने संतुष्ट राहणें सांप्रतच्या राष्ट्रजागृतीच्या वेळीं श्रेयस्कर नसल्यामुळे द्वितीय संमेलनांत मौजेशिवाय कांही विशिष्ट गोष्टी घडून आल्या पाहिजेत असें म्हणण्याकडे मंडळींचा विशेष कल होता. गेल्या सालीं मौज झाली. यंदा नुसत्या काव्यशास्त्रविनोदावर मंडळी संतुष्ट नव्हती; एवढ्यापुरतें संमेलनाचें पाऊल पुढे पडलें.

---

* + खरें पहिलें संमेलन १८७८ चें; नंतर दुसरें १८८५ चें; तिसरें १९०५ मधील साताऱ्चें व चौथें १९०६ मधील पुण्याचें. हा क्रम वाचकांनी नीट ध्यानीं ठेवावा. याउलट विधानें आढळतील तीं अशुद्ध समजावीं. (संपादक)

ग्रथकारांचे संमेलनाची कल्पना गेल्या सालपासूनच लोकांपुढे आली असें साधारणपणें समजण्यांत येतें; पण ही चूक आहे. पूर्वी निरनिराळ्या सत्रांच्या वेळीं किंवा यात्रेच्या वेळीं ग्रंथकार, लेखक व इतर विद्याव्यासंगी लोक एका ठिकाणीं जुळत व इतर राष्ट्रीय प्रश्नांबरोबरच वाङ्मयात्मक उर्फ साहित्यविषयक चर्चा करीत. साहित्यसेवा करणारांस संसारांत अडचणी कोणत्या येतात, त्या कामीं राष्ट्रांतील कर्त्या लोकांचें व धनिकांचें कर्तव्यकर्म कोणतें आहे, ही गोष्ट राजेरजवाड्यांच्या व शेटसावकारांच्या नजरेपुढे सदर प्रसंगीं पडत असे, व त्या त्या वेळच्या राष्ट्राच्या कुवतीप्रमाणे राष्ट्रांतील ग्रंथांस व ग्रंथकर्त्यांस राजाश्रय व लोकाश्रय मिळत असे. स्वराज्याबरोबरच राजाश्रयास ग्रंथकार मुकले व 'राजा कालस्य कारणम्' ह्या न्यायाने नवीन तऱ्हेवर ग्रंथरचना होऊं लागली व जुन्या ग्रंथांचें नवीन तऱ्हेने संशोधन व प्रकाशन सुरू झालें. जुन्या तऱ्हेस जुन्या संप्रदायाचा लोकाश्रय अद्याप आहे, पण नवीन ग्रंथरचनेस व नव्या तऱ्हेच्या संशोधनास भरपूर लोकाश्रय मिळत नसल्यामुळे त्या दिशेने काम करणें वाजवीहून अधिक कष्टमय होतें. म्हणून ग्रंथांकडे व जुन्या ग्रंथांचें संगोपन, संशोधन किंवा प्रकाशन यांजकडे लोकांचें लक्ष वेधावें व एकमेकांच्या अडचणी व अनुभव एकमेकांस सांगण्यास संधि मिळावी म्हणून नवीन तऱ्हेचें ग्रंथकारांचें +पहिलें संमेलन १८८५ सालीं पुण्यास भरलें होतें. ह्या पहिल्या संमेलनाचे विनंतिपत्रावर कै. नी. ज. कीर्तने, कै. मा. गो. रानडे, कै. मा. गो. कुंटे, रा. हरि कृष्ण दामले, रा. ब. काशीनाथ बाळकृष्ण मराठे, कै. ना. दा. योगी, कै. गो. ग. आगरकर, रा. ब्यं. रा. वकील यांच्या सह्या होत्या.

ग्रंथकारांची एकमेकांशीं ओळख होऊन एकमेकांच्या अनुभवाचा फायदा मिळावा, भाषेची स्थिति सुधारून ग्रंथकर्तृत्वाचें काम कमी कष्टमय व्हावें व पुढे दरसाल ह्याप्रमाणे संमेलनाचा क्रम चालून दरसाल जे नवीन ग्रंथ प्रसिद्ध झाले असतील त्या ग्रंथकारांचा सन्मान करून त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध करण्यांत यावे हे बेत पहिल्या संमेलनाचे होते, असें त्या वेळीं प्रसिद्ध झालेल्या विनंतिपत्रावरून दिसून येतें. हें पहिलें संमेलन ता. २४ मे १८८५ सालीं जोशी हालांत सार्वजनिक सभेच्या कचेरींत भरलें. सन १८६५ सालीं कै. महादेव गोविंद रानडे यांनी सरकारी हुकुमावरून तत्पूर्वीच्या वीस वर्षांतील मराठी ग्रंथांवर एक रिपोर्ट तयार केला होता. १८८५ सालच्या संमेलनाच्या वेळीं १८६५ ते १८८५ पर्यंतच्या नवीन ग्रंथसमूहाचें कै. रानडे यांनी सिंहावलोकन करून मराठी ग्रंथांची प्रगति कशी चालली आहे, तें दाखविलें. व नंतर तीन चार उपयुक्त ठराव पास होऊन ग्रंथकारांच्या संमेलनाने १८८५ सालीं जी दडी मारली तें सातारा मुक्कामीं वीस वर्षांनी म्हणजे १९०५ सालीं पुनः प्रकट झालें.

ग्रंथकारांच्या संमेलनाने वीस वर्षें एकसारखी झोंप काढून कुंभकर्णावर ताण केली तरी ग्रंथकार झोपीं गेले नव्हते. इतिहास, जुन्या कविता, नव्या कविता, चरित्रें, कादंबऱ्या, नाटकें, शास्त्रीय ग्रंथ, तत्त्वविचाराचे ग्रंथ ह्यांची भर भाषेंत एकसारखी पडत होती. पूर्वी दक्षिणा प्राइझ कमिटी सर्वस्वीं सरकारी असल्यामुळे ग्रंथकारांचा त्या संस्थेवर सतत ओढा राहणें शक्य नव्हतें. ह्या नवीन परिस्थितीला अनुसरून १८९४ सालीं दक्षिणा प्राइझ कमिटीच्या जागीं 'डेक्कन व्हरनॅक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी'ची स्थापना झाली. ही संस्था अर्धी लोकांची व अर्धी सरकारची आहे, व सरकारास किंवा सरकारच्या कांही अधिकाऱ्यांस न आवडणारे शब्द किंवा वाक्यें किंवा कांही विचार ज्या ग्रंथांत असतील असले सर्व ग्रंथ बगळून बाकी राहि-

लेल्या आजीबाईच्या सोवळ्यांतल्या निर्लेप ग्रंथांस ही संस्था परीक्षकांस यत्किंचित्हि तकलीफ न पडेल अशा सावकाशीच्या तजविजीने बक्षिसें देत असते. सरकारचे ताब्यांतील निम्मे पैसे असल्यामुळे हे पैसे ज्या अधिकाऱ्यांच्या मार्फत संस्थेस मिळतात त्या अधिकाऱ्यांच्या दृष्टीने सोवळें ठरणाऱ्या ग्रंथांचेंच परीक्षण संस्थेचे परीक्षक करितात. पण हें मर्यादित तऱ्हेचें परीक्षणहि वेळच्या वेळेस होत नाही. खोगीरभरतीचे परीक्षक कांही कारणांमुळे फार झाल्यामुळे वामकुक्षीच्या वेळीं लोळत करावयाच्या परीक्षणाशिवाय विशेष महत्त्वाचें काम 'डेक्कन व्हरनॅक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी'चे मार्फत होऊं नये, हें साहजिक आहे. नवीन ग्रंथांस उत्तेजन, इंग्रजींतील निवडक ग्रंथांचीं भाषांतरें करविणें व पेशव्यांचें दप्तर तपासून त्यांतील निवडलेल्या लेखांचें प्रकाशन असलीं कामें करण्यास ह्या संस्थेने आरंभ केला; पण ह्या संस्थेचें गेल्या दहा वर्षांतील काम भाडोत्र्यांच्या कामाइतकेंहि समाधानकारक झालेलें नाही.

गेल्या दहा बारा वर्षांत लोकांच्या विचाराला व क्रियेला नवीन वळण लागलें आहे, व ह्या नवीन परिस्थितीशीं तुलना करून पाहतां 'डेक्कन व्हर्नॅक्युलर सोसायटी' फारच मागासलेली व जीर्ण युगांतल्यासारखी दिसते. ही संस्था दहा बारा वर्षांची असून आपलेपणांत यावयाच्या वयाच्या पूर्वीच बुढ्ढी झाली आहे. ह्या संस्थेस लहानपणींच वृद्धावस्था आल्यामुळे ग्रंथसंग्रहालयासंबंधाचे मुंबई व ठाणें येथील उद्योग, जुन्या कवींचे ग्रंथ छापण्याचे ठाण्याचे प्रयत्न, रा. राजवाडे, रा. खरे वगैरे लोकांचे इतिहासप्रकाशनाचे प्रयत्न, धुळ्याच्या सत्कार्योत्तेजक मंडळीचे किंवा रा. पांगारकर यांचे उद्योग, करमणूक व इतर साप्ताहिकें आणि मासिक पुस्तकें यांच्या मार्फत प्रसिद्ध होणारीं मनोरंजक पुस्तकें, कोल्हापूरची ग्रंथमाला व इतर मासिक पुस्तकांच्या द्वारें प्रसिद्ध होणारे ग्रंथ ह्या सर्वांच्या व्यक्तिशः करण्यांत येत असलेल्या प्रयत्नांशीं ह्या संस्थेचा अर्थाअर्थी कांहीच संबंध येत नाही. ग्रंथोत्तेजनाकरिता स्थापलेली ही एकटीच संस्था आहे. व गेल्या दहा बारा वर्षांत जेवढे म्हणून महत्त्वाचे प्रयत्न ग्रंथकर्त्यांकडून करण्यांत आले त्या प्रयत्नांशीं आपण होऊन संबंध ठेवणें ह्या संस्थेस हलकेपणाचें वाटतें. असो. गेल्या दहा बारा वर्षांत ग्रंथकर्तृत्वाचे, संशोधनाचे, संगोपनाचे व प्रकाशनाचे कामीं बऱ्याच महत्त्वाचे स्वतंत्रपणाचे प्रयत्न करण्यांत आले असून सरकार किंवा सरकारच्या बगलेंतील वरील संस्था यांच्या आश्रयाची पर्वा न करतां हे प्रयत्न बऱ्या रीतीने चालले आहेत. यामुळे सांप्रत महाराष्ट्रांत ग्रंथकार, लेखक व संशोधक यांचा एक नवीन स्वतंत्र वर्ग उत्पन्न झाला असून स्वतःच्या धमकीवर अल्पस्वल्प कां होईना पण कांही प्रत्यक्ष काम करून दाखविण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं आहे, असें ह्या वर्गाने गेल्या ८-१० वर्षांतील आपल्या कृतीने सिद्ध करून दाखविलें आहे. १८८५ सालीं सरकारी नोकरीच्या छायेखाली व त्यांच्याच उत्तेजनाने पहिलें संमेलन होऊन त्याने सरकारी मदत मागण्याचा ठराव केला; १८९५ सालीं अर्धवट सरकारी व अर्धवट पेन्शनरी अशी संस्था निर्माण झाली; १९०५ सालीं केवळ ग्रंथकारांच्याच प्रेरणेने सातान्यास ग्रंथकारांचें संमेलन भरलें आणि १९०६ सालीं जमलेल्या ग्रंथकारांनी, संपादकांनी व लेखकांनी केवळ मौजेवर खूष होण्याचें नाकारिलें.

वरील इतिहासाच्या दृष्टीने पाहिलें असतां गेल्या शनिवारीं व रविवारीं भरलेलें ग्रंथकारांचें संमेलन महत्त्वाचें होतें. ह्या संमेलनाला नागपूर, उमरावती, धुळें, नगर, मुंबई, सातारा,

कोल्हापूर, बेलापूर वगैरे ठिकाणचे बरेच ग्रंथकार व लेखक आले होते. शिवाय पुण्यांतील बहुतेक सर्व विद्याव्यासंगी मंडळी हजर होती. वर नमूद केलेल्या निरनिराळ्या व्यक्तिशः उद्योगांचे प्रतिनिधीहि ह्या संमेलनास हजर होते. संमेलनाचे सेक्रेटरी रा. आपटे, रा. दामले व रा. केळकर यांच्यापैकी कोणीहि सरकारी नोकर किंवा पेन्शनर नाही. इतकेंच नव्हे तर तिघेहि कमी अधिक प्रमाणाने लेखकाचा व्यवसाय करणारे आहेत हीहि विशेष गोष्ट आहे. वाङ्मयात्मक चर्चेसाठी सरकारी नोकरांनी किंवा पेन्शरांनी येऊं नये असें आमचें मतहि नाही; इतकेंच नव्हे तर शिकल्यासवरल्या सरकारी नोकरांनी फावल्या वेळीं साहित्यसेवा अवश्य केली पाहिजे व पेन्शनरांना तर ह्यासारखा दुसरा चांगला व्यवसाय नाही असें आमचें मत आहे. तथापि वरील गोष्ट विशेषतः पुढे आणण्याचें कारण इतकेंच की, १८८५, १८९५ व १९०५।६ सालांतील स्थित्यंतर वाचकांचे ध्यानांत यावें. त्या वेळीं साहित्याची सेवा करणाऱ्या स्वतंत्र ग्रंथकर्त्यांचा, लेखकांचा व संशोधकांचा वजनदार वर्ग पुढारी ह्या नात्याने ह्यांत नव्हता व आज तो उत्पन्न झाला आहे. द्वितीय संमेलनाच्या वेळीं मंडळींत उत्साह व गांभीर्य उत्पन्न करतांना हाच वर्ग प्राधान्येंकरून संमेलनापुढे उभा राहत असे व त्याच वर्गाच्या धुरीणत्वाखाली वीस वर्षांनंतर संमेलनाची कल्पना, तिऱ्हाइतांच्या शिकवणीवरून नव्हे तर जरूर भासूं लागली म्हणून, पुनः समाजापुढे आली आहे.

ग्रंथकारांच्या संमेलनाचें अध्यक्षस्थान रा. सा. कानिटकर यांना दिल्यानंतर मुंबई युनिव्हर्सिटीने मॅट्रिक्युलेशनच्या नवीन अभ्यासक्रमांत मराठीचा विषय ऐच्छिक न ठेवतां जरुरीचा ठेवला, ह्याबद्दल युनिव्हर्सिटीचे आभार मानून एम. ए.प्रमाणे बी. ए.पर्यंतच्याहि परिक्षांत ऐच्छिक विषयांत मराठीस स्थान देण्याविषयी विनंति करण्याचा पहिला ठराव रा. ब. चिंतामणराव वैद्य यांनी पुढे आणला व त्या ठरावावर रा. रामभाऊ जोशी, रा. अच्युतराव साठे, प्रो. साठे, प्रो. पानसे यांचीं अनुकूल भाषणें झालीं. युनिव्हर्सिटीचे आभार मानण्याचेंहि कारण नाही, व युनिव्हर्सिटीस अर्ज करणेंहि इष्ट नाही अशा आशयाची उपसूचना वरील ठरावावर प्रो. विजापूरकर यांनी पुढे आणली, व ह्या उपसूचनेस रा. महादेव राजाराम बोडस, रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांचीं भाषणें झालीं. युनिव्हर्सिटींत मराठीचा प्रवेश झाल्यास मराठीस उत्तेजन मिळेल व संस्कृतास काढून न टाकता मराठीस जागा मिळाल्याने मराठीच्या अभ्यासाकडे सुशिक्षितांची प्रवृत्ति अधिक होऊन मराठी वाङ्मयांत भर पडेल. मूळ ठराव ह्या सभेंत पास झाला असतां सभेचा अर्ज पुढे करून युनिव्हर्सिटीतील मराठी फेलोंना काम करण्यास ठीक पडेल असा मतलब ठरावास अनुकूल असलेल्या वक्त्यांचा होता. विरुद्ध मंडळींना हा कोटिक्रम मान्य होता. कॉलेजांतील ऐच्छिक भाषेंत मराठी सामील केल्यास कॉलेजांतील विद्यार्थिनींस सोयिस्कर होईल, हेंहि त्यांना मान्य होतें. पण सांप्रतच्या लोकमताच्या स्थितींत युनिव्हर्सिटीचे आभार मानणें व युनिव्हर्सिटीस अर्ज करणें इष्ट नाही एवढेंच त्यांचें म्हणणें होतें. युनिव्हर्सिटीकडून किरकोळ उत्तेजन भाषेस मिळतें. खरें उत्तेजन ती भाषा बोलणाऱ्या राष्ट्राच्या व्यापावर व कार्यक्षमतेवर अवलंबून असतें. तथापि त्या कामीं जर कोणाचे आभार मानावयाचे असले तर कै. रानडे यांचे किंवा पंडित मदनमोहन मालवीय यांचे मानावेत. राष्ट्रीय युनिव्हर्सिटीच्या मानास जी संस्था योग्य नाही तिचे आभार ग्रंथकारांनी मानणें म्हणजे आपला उच्च दर्जा सोडण्यासारखें होय. युनिव्हर्सिटी ही एक प्रकारची माता (Alma mater) असली तरी कर्झनने बलात्कार करून तिला भ्रष्ट केली असल्या-

मुळे तिचा गौरव करण्यांत ग्रंथकारांना कमीपणा आहे अशा धोरणावर विरुद्ध पक्षाची टीका होती. अशा स्थितींत युनिव्हर्सिटीस दोषहि देऊं नये, व तिचे आभारहि मानूं नयेत हा मध्यस्थ मार्ग योग्य असल्यामुळे ह्या विषयावर कांहीच मत न देतां पुढील कामास सुरुवात करावी अशी रा. नरसिंह चिंतामण केळकर यांनी सूचना पुढे आणली व रा. विजापूरकर यांनी आपली उपसूचना काढून घेऊन या नवीन सूचनेस अनुमोदन दिल्यावर मताधिक्याने रा. केळकर यांची सूचना पास झाली. नंतर मासिक पुस्तकें व वर्तमानपत्रें यांच्या द्वारें मराठी भाषेची झालेली बाढ ह्या विषयावर रा. बा. गं. टिळक यांचें भाषण झालें.

— —

ग्रंथकारांच्या संमेलनाच्या वेळीं शनिवारीं सायंकाळीं रा. बोडस यांनी ऐतिहासिक व वाङ्मयात्मक अप्रसिद्ध लेखांचा संग्रह करण्याची आवश्यकता ह्या विषयावर भाषण केलें. काव्यमाला, काव्यसंग्रह, महाराष्ट्रकवि, ग्रन्थमाला, ऐतिहासिक लेखसंग्रह इत्यादि प्रयत्नांचा उल्लेख करून कै. माधवराव आपटे यांचे व्यवस्थेने आनंदाश्रमांत जसे जुने संस्कृत ग्रंथ अग्नि, उदक, वायु यांपासून सुरक्षित झाले आहेत तशा रीतीने मराठी जुने ग्रंथ व लेख सुरक्षित ठेवण्याकरिता एक गृह बांधावें, अशी रा. बोडस यांनी सूचना केली. रा. राजवाडे यांचें असें मत पडलें की, आणखी ५।२५ वर्षें जर आपण वाट पाहात बसलों तर जुने लेख नाहीसे होतील अशी भीति आहे. १८१७ सालीं रायगड किल्ल्यावर इंग्रजांच्या तोफांचा भडिमार झाला त्या वेळीं श्रीशिवाजीमहाराजांचें दप्तर सर्व जळून गेलें. इनाम कमिशनच्या वेळीं कारकुनांच्याकडून काळीच्या व जमाबंदीच्या कागदांशिवाय इतर कागद फाडून टाकविण्यांत आले. अद्याप इकडे तिकडे बरेच लेख व कागद आहेत, ते प्रथम एका सुरक्षित जागीं ठेवले पाहिजेत. हे कागदपत्र तपासून जुळवून त्यांतून निघणाऱ्या ऐतिहासिक साधनांचें संशोधन करून छापण्याचें काम फारच त्रासाचें व अत्यंत खर्चाचें आहे. हें काम द्रव्यद्वारा तडीस नेण्याचें सामर्थ्य आमच्या धनिकांच्या अंगीं नाही. तेव्हा हें काम निष्काम व संन्यासवृत्तीने राहणाऱ्या दहा वीस गृहस्थांनी अंगावर घेऊन मध्यम स्थितींतील लोकांच्या मदतीने आस्ते आस्ते शेवटास न्यावें. वऱ्हाडचे रा. मुंडले यांनी जुन्या लेखांचा सुरक्षित जागीं संग्रह करण्याकरिता ५० रुपये दिले असून रा. नटेशराव द्रवीड यांनी आपल्या घराचा जरूर तितका भाग देण्याचें कबूल केलें असल्याविषयी रा. केळकर यांनी जाहीर केलें. यानंतर प्रो. विजापूरकर यांनी 'ग्रंथकर्तृत्वाची दिशा' व रा. वासुदेव गोविंद आपटे यांनी 'साहित्यसेवा' ह्या विषयावर निबंध वाचून दाखविले. नंतर रा. पांगारकर यांनी जुन्या कवींचे ग्रंथ प्रसिद्ध करण्यासंबंधाचा आजपर्यंतचा इतिहास सांगून अस्सल प्रती प्रसिद्ध झाल्याने लोकांना कसा उपयोग होणार आहे व कवींचें हृद्गत कसें सर्वांना कळणार आहे हें रा. देव यांनी प्रसिद्ध केलेल्या दासबोधांतील कांही ओंव्या व श्रीएकनाथाच्या भागवतापैकी त्यांनी संशोधित केलेल्या कांही ओंव्या वाचून दाखवून स्पष्ट केलें. शेवटीं रा. पांगारकर यांनी जुन्या ग्रंथांचें सुरक्षित जागीं संगोपन करण्याविषयी अत्यंत कळकळीने सर्वांस विनंती केली व स्वतःची वर्गणी म्हणून पंचवीस रुपये देऊं केले. पण त्याच वेळीं आंकडे घेण्यास सुरवात न झाल्यामुळे व रा. पांगारकर यांच्याइतकी उत्कट इच्छा जमलेल्या मंडळींत नसल्यामुळे तें काम साहित्यपरिषदेवर ढकलण्यांत आलें.

— —

ग्रंथकारांच्या संमेलनाचे वेळीं रविवारीं सकाळीं जुने लेख छापून काढण्याविषयी पुनः सूचना पुढे आली. नाना फडणविसाचे उत्सवाच्या कमिटीचे सेक्रेटरी रा. जोशी यांनी या संबंधांत पूर्वी माधवबागचे सभेंत कसे प्रयत्न झाले व ते कसे फुकट गेले हें सांगितलें. रा. नारायण कृष्ण गद्रे यांनी ऐतिहासिक कागदपत्र छापण्याकरिता काढलेल्या मासिक पुस्तकास २५० देखील वर्गणीदार न मिळाल्यामुळे तें कसें बंद करावें लागलें ह्याचा इतिहास सांगितला व शेवटीं अध्यक्षांनी असें सांगितलें की, ह्या बाबींत नुसता ठराव पास करून कांही होणार नाही. ग्रंथकारांचें संमेलन ही संस्था नेहमी काम करण्यास जबाबदार नसल्यामुळे ह्या संबंधाचे उद्योग साहित्यपरिषदेने करावेत. नंतर प्रो. विजापूरकर यांनी टीका कशी असावी ह्याविषयी चर्चा करण्यास प्रारंभ केला. ह्या विषयावर रा. पांगारकर, रा. राजवाडे, रा. चाफेकर, रा. खाडीलकर यांचीं भाषणें झाल्यावर रा. राजवाडे यांनी एक महत्त्वाचा जुना शिलालेख वाचून दाखवून त्यासंबंधाने बोलतांना सहावे शतकाचे सुमारास मराठी भाषा लोक बोलूं लागले होते असें सप्रमाण अनुमान करण्यास हरकत नाही, असें सांगितलें. रविवारीं सायंकाळीं रे. टिळक यांनी आधुनिक कवींवर सुश्राव्य भाषण केलें. ह्याच विषयावर रा. ह. ना. आपटे व रा. आठवले यांनी उपयुक्त माहिती सांगितल्यावर 'मनोरंजक ग्रंथ' या विषयाचें प्रो. दामले व रा. ह. ना. आपटे यांनी विवेचन केलें. नंतर रा. केळकर यांनी साहित्यपरिषद् स्थापण्यांत आली असून साठ सभासद मिळाले असल्याविषयी व त्या परिषदेच्या सेक्रेटरीचे जागीं ठाण्याच्या 'महाराष्ट्र-कवी'चे संपादक रा. भावे, रा. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर व रा. वासुदेव गोविंद आपटे यांना नेमिलेविषयी जाहीर केलें. रा. पांगारकर यांच्या उत्कट इच्छेप्रमाणे अधिक नेटाने व मोठा फंड करून 'साहित्यपरिषद्' स्थापण्यांत न येतां अल्पसा प्रयत्न करण्यांत आला. ह्यासंबंधाने बोलतांना रा. टिळक यांनी असें सांगितलें की, केवळ उत्कट इच्छेने कामें होत नसतात, तर कर्ते पुरुष पुढे यावे लागतात. कै. नामजोशी यांना मराठी भाषेविषयी उत्कट आस्था नव्हती तरी त्यांनी आपल्या कर्तृत्वशक्तीने मराठी शब्दांचें मराठींतूनच स्पष्टीकरण ज्यांत आहे अशा प्रकारचा मोठा कोश तयार करून ठेवला आहे, त्याला थोडक्या अंशाने विश्वकोश (Encyclopaedia) चें स्वरूप देऊन प्रसिद्ध केल्यास मोठें काम होणार आहे. ह्या कार्मी दहा हजार रुपयांपर्यंत मदत करण्यास सरकार तयार असून प्राथमिक मदत देण्यास व इतर साहाय्य मिळवून देण्यास रा. टिळक तयार आहेत. अशाच प्रकारच्या कोशासंबंधाने मुंबईस कसे प्रयत्न चालले आहेत हें प्रो. रानडे यांनी सांगून ह्या प्रयत्नांचें एकीकरण साहित्य-परिषदेने करावें असें त्यांनी सुचविलें. नंतर अध्यक्षांनी समारोप करून संमेलनाचें काम संपविलें. असल्या संमेलनामुळे बरेच महत्त्वाच्या विषयांची चर्चा होते ही गोष्ट खरी; पण मेहनतीने एकसारखें काम करणारी कांही मंडळी पुढे आल्याशिवाय संमेलनाचे मुख्य हेतु न साधतां साहित्यपरिषदेच्या कर्तव्याची दिशा मौजेच्या व काव्यशास्त्रविनोदाच्या पलीकडे जाणार नाही.

परिशिष्ट ५ वें

मराठी ग्रंथकारांचें +पांचवें संमेलन

[केसरी अंक. ता. २१ माहे मे सन १९०७ इ.]

मराठी ग्रंथकारांचें *तृतीय संमेलन

पूर्वी प्रसिद्ध केल्याप्रमाणे गेल्या शनिवारीं व रविवारीं रा. ब. महाजनी यांच्या अध्यक्षतेखाली मळेकरांचे वाड्यांत मराठी लेखकांचें संमेलन भरलें होतें. अध्यक्षांनी आपल्या प्रास्ताविक भाषणांत आपल्या वाङ्मयाची पूर्वीची पीठिका कायम ठेवून युरोपियन ज्ञानभांडारांतील शास्त्रीय रत्नें मराठींत आणून पांगलेल्या व धनहीन झालेल्या महाराष्ट्रांत विचारजागृति उत्पन्न करून राष्ट्रोन्नति करण्याचे कामीं लेखकांवर कोणती मोठी जबाबदारी असते याचें वर्णन केलें. नंतर साहित्यपरिषदेचे चिटणीस रा. आपटे यांनी संमेलनाचे व परिषदेचे रिपोर्ट वाचून दाखविल्यावर रा. रामभाऊ जोशी यांनी व्याकरणाचे प्रयोगांवर आपला निबंध वाचून दाखविला. संस्कृतांत किंवा इंग्रजींत जेथे कर्तरि प्रयोग असतो तेथे मराठींत कर्मणि प्रयोग घालण्यांत येतो. यासंबंधाने कर्तरि प्रयोग वापरण्यांत आला तरी तो व्याकरणशुद्धच आहे असें मानण्यास हरकत नाही ह्या मुद्यासंबंधाने वे. दातारशास्त्री व काशीनाथशास्त्री लेले, रा. ब. वैद्य, रा. सा. कानिटकर, रा. राजवाडे वगैरे विद्वान गृहस्थांनी बरीच चर्चा केली. संस्कृतांतील प्रयोग प्राकृताच्या द्वारें मराठींत उतरत असतांना सांप्रतची प्रयोगनिष्पत्ति ओघाओघाने कशी झाली हें रा. राजवाडे यांनी स्पष्ट करून दाखविलें व रा. ब. वैद्य यांनी कर्म आणि क्रियापद ह्या दोहोंच्या जागीं एकच शब्द वापरण्याची जेथे व्यवस्था नसते तेथे कर्मणि प्रयोग कसे उत्पन्न होतात ह्याचें दिग्दर्शन केलें. 'मी जेवलों' हा कर्तरी प्रयोग झाला; 'म्यां भोजन केलें' हा कर्मणि प्रयोग झाला. 'भोजन' आणि 'केलें' ह्या दोन कल्पना एका शब्दांत एकवटल्या असतां कर्तरि प्रयोग होतो, व भाषेच्या ठेवणीमुळे म्हणा किंवा विषयप्रतिपादनाच्या सरणीने ह्या दोन्ही कल्पना भिन्न दाखवून लेखकाला ह्या दोन्ही कल्पनांकडे वाचकांचें निरनिराळें लक्ष ओढून घेण्याची जरुरी कांही प्रसंगीं पडत असल्यामुळे म्हणा, कर्म निराळें व क्रियापद निराळें अशी वाक्यरचना करावी लागते असा रा. ब. वैद्य यांचा अभिप्राय पडला. नंतर रा. सा. विनायक कोंडदेव ओक ह्यांचा निबंध वाचण्यांत आला. राजकीय स्वतंत्रतेपासून तों किरकोळ बाबींपर्यंत लोकांत नाना प्रकारच्या कल्पनांची प्रेरणा करण्याचें काम लेखकांचें असून समाजाला समजेल अशी बालबोध व सोपी भाषा लेखकांनी वापरावा असा उपदेश रा. सा. ओक ह्यांनी केला. सर्वच प्रसंगीं व सर्वच विषयांना बालबोध व सोप्या भाषेचा उपयोग योग्य होणार नाही, विषयगांभीर्याला अनुसरून शब्दरचनाहि उदात्त व गंभीर केली पाहिजे असें रा. सा. कानिटकर यांनी या विषयावर आपलें मत दिल्यावर लहान मुलीचा परकर प्रौढ बाईच्या परिणत शरिरास शोभादायक किंवा कार्यसाधक होणार नाही, असें आपलें मत देऊन अध्यक्षांनी या वादाचा समारोप केला. नंतर रा. राजवाडे यांनी प्राचीन शिलालेखांच्या आधारावरून ९०५ सालामध्ये मराठी भाषेंत व्याकरणशुद्ध व व्यवस्थित गद्यपद्यरचना होत होती व त्याच्यापूर्वीहि तीन चारशे वर्षें महाराष्ट्री भाषा बोलण्याचालण्यांत होती असें सिद्ध करून दाखविलें. शनिवारीं सायंकाळीं रा. ब. चिंतामणराव वैद्य ह्यांचा 'मराठी वाङ्मयाची भावी उन्नतावस्था' व रा.

+ * तृतीय नव्हे, पांचवें. चौथें नव्हे, सहावें. (संपादक)

पारसनीस ह्यांचा 'अहिल्याबाई होळकरीण' ह्या विषयांवर असे दोन निबंध वाचण्यांत आले. सौ. काशीबाई कानिटकर यांनी ग्रंथकर्त्रींना आपले ग्रंथ प्रकाशित करण्याचे कामीं कशा अडचणी येतात याचें विवेचन केल्यावर रा. गोविंदराव डुकले यांनी ग्रंथप्रकाशनाकरिता सार्वजनिक भांडवलाची लिमिटेड कंपनी काढून कशी व्यवस्था लावावी व विद्वान लोकांनी ह्या व्यवस्थेस कशी मदत करावी ह्यासंबंधाची आपली योजना सभेपुढे ठेवली. ही योजना सर्वांना पसंत पडली; पण ठरावांत ती योजना नमूद करण्याची जरुरी नसल्यामुळे ह्यासंबंधाने कोणताच ठराव पास करण्यांत आला नाही. रविवारीं गुजराथी साहित्यपरिषदेचे सेक्रेटरी मि. ठाकुरलाल देसाई यांनी मराठी साहित्यपरिषदेच्या प्रतिनिधींना पुढील आगस्ट महिन्यांत भरणाऱ्या गुजराथी साहित्यपरिषदेस हजर राहण्यासंबंधी निमंत्रण केलें. नंतर रा. लक्ष्मणशास्त्री लेले यांचा 'कवि व कविता' या विषयावर निबंध होऊन सौ. काशीबाई हेरलेकर यांनी 'मराठी वाङ्मयास स्त्रियांना कशी मदत करितां येईल' यावर भाषण केल्यावर रा. पांगारकर यांनी नवीन कवि होऊं पाहणारांनी जुन्या कवींचे उद्योग, परमेश्वरावरील त्यांची दृढ निष्ठा, आपल्या कामासंबंधाची हौस ह्या सर्व गोष्टींचें अभ्यासपूर्वक मनन करून नंतरच आपल्या उद्योगास लागावें, एरवी यशप्राप्ति होणार नाही, ह्यासंबंधाने सुरस भाषण केलें. दोनप्रहरी सांप्रतचा सुधारणेचा काळ कवींच्या प्रतिभाशक्तीचा लोप करणारा नाही, असें सप्रमाण रा. केळकर यांनी दाखविल्यावर प्रि. पाध्ये, रा. कानिटकर, प्रो. दामले, रा. देवधर, रा. प्रधान, रा. चाफेकर वगैरे गृहस्थांचीं भाषणें होऊन रा. पांगारकर यांनी जुन्या कवींची महती कबूल करण्यांत नवे कवि होऊं पाहणारांना बिलकूल कमीपणा नसून पूर्वीच्या प्रख्यात कवींचे उद्योग व कार्यतत्परता हीं नवीन कवींना उपदेशपर व प्रोत्साहनदायकच आहेत असें सांगून नव्या जुन्या कवींचा झगडा लावण्याच्या दृष्टीने ह्या विषयाकडे पाहतां कामा नये, असें आपलें मत दिलें. सरकारी क्रमिक पुस्तकांच्या संबंधाचा विचार करण्याकरिता साहित्यपरिषदेने कमिटी नेमावी असा वे. लेले यांचा ठराव सर्वानुमतें पास झाल्यावर व मराठी भाषेंतील निवडक पुस्तकांची जंत्री, नेहमीच्या प्रचारांतील शास्त्रांचा पारिभाषिक शब्दांचा कोश, लेखकांसंबंधाची माहिती, नवीन होणाऱ्या पुस्तकांबद्दल जेवढ्या पुस्तकांची तरफदारी साहित्यपरिषदेस करतां येईल तेवढ्या पुस्तकांवरील अनुकूल अभिप्रायांचें प्रसिद्धीकरण, रा. राजवाडे यांनी जमाविलेल्या ऐतिहासिक कागदपत्रांच्या प्रसिद्धीकरिता मासिक पुस्तक काढून पांचशे रुपयांपर्यंत वर्गणी जमवून तोटा सोसण्याची साहित्यपरिषदेस मंजुरी वगैरे ठराव पास होऊन अध्यक्षांचें अखेरचें भाषण झाल्यावर संमेलनाचें काम संपलें. संमेलनाच्या पूर्वीच्या बैठकीप्रमाणेच यंदाची ही बैठक "काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम्" या न्यायाने समाधानकारक होऊन ह्या संमेलनामुळे साहित्यपरिषदेच्या कामास योग्य दिशा लागण्यास प्रारंभ झाला आहे.

परिशिष्ट ६ वें

मराठी ग्रंथकारांचें सहावें संमेलन

मराठी लेखकांचें संमेलन

रा. रा. केसरीकर्ते यांस :—

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे मार्फत मराठी लेखकांचें *चौथें संमेलन पुणें येथें तारीख ३० व ३१ मे, शनिवार व रविवार रोजीं करण्याचें ठरलें आहे.

ह्या संमेलनाचें अध्यक्षस्थान रा. ब. चिंतामण विनायक वैद्य ह्यांनीं स्वीकारण्याचें कबूल केलें आहे.

मराठी भाषेविषयींचें प्रेम ज्यांचे मनांत वसत आहे व मराठी लेखनाचा व्यासंग ज्यांनीं थोडाबहुत केला आहे त्या सर्वांनीं व त्याचप्रमाणें मराठी भाषेची अभिवृद्धि व्हावी असें मनःपूर्वक इच्छिणाऱ्या सर्व गृहस्थांनीं एकत्र जमावें, साहित्याच्या कांहीं भागांचा ऊहापोह करावा, एकत्र गांठी पडून परस्परांचा परिचय व्हावा व मराठी भाषेच्या उन्नत्यर्थ जे प्रयत्न चालले आहेत त्यांस मदत मिळावी, म्हणून हें संमेलन भरविण्यांत येत असतें. ह्या मुख्य उद्देशांकडे लक्ष देऊन गेल्या सालाप्रमाणें यंदाहि बऱ्याच औपचारिक व थाटाच्या भागांस फाटा देण्याचा विचार आहे. या संमेलनाला महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र, वऱ्हाड, मध्यप्रांत, इंदूर, जयपूर, तंजावर वगैरे सर्व ठिकाणांहून विद्वान लेखक येतील असा अंदाज आहे. तरी या पत्राद्वारें विनंति करण्यांत येत आहे कीं मराठी भाषेविषयीं खरी कळकळ बाळगणाऱ्या प्रत्येक गृहस्थानें सवड करून संमेलनास अवश्य यावें. ज्यांची येथें उतरण्याची वगैरे नीट सोय नाहीं त्यांनीं २५ मे चे आंत येथें सेक्रेटरींना कळविल्यास त्यांची सर्व व्यवस्था ठेवण्यांत येईल.

संमेलनाची जागा व कार्यक्रम मागाहून प्रसिद्ध होईल.

संमेलनाच्या दोन दिवसांपैकीं शेवटच्या दिवसाच्या सायंकाळच्या बैठकींत दोन वर्षांपूर्वी स्थापण्यांत आलेल्या साहित्यपरिषदेच्या रचनेच्या नियमांचे मसुद्याची चर्चा करण्यांत येईल व साहित्यपरिषदेस कार्यक्षम करण्याचे उपाय कायम करण्यांत येतील. बाकीचा वेळ निरनिराळ्या विषयांवरील निबंधवाचन व चर्चा यांना देण्यांत येईल.

गेल्या सालीं संमेलनांत ठरविण्यांत आलें कीं, प्रसिद्ध इतिहास-संशोधक रा. राजवाडे यांनीं फार परिश्रमानें मिळविलेले ऐतिहासिक कागदपत्र साहित्यपरिषदेनें प्रसिद्ध करावे. ह्या कामीं बुडित खर्चाकरितां व तोटा आल्यास तो भरून यावा म्हणून पांचशें रुपये फंड साहित्यपरिषदेनें उभारावा असेंहि ठरविण्यांत आलें. त्याप्रमाणें फंड जमविण्यासाठीं खटपट करण्यांत आली. सांप्रत रा. राजवाडे यांजकडून एका खंडाचा मजकूर—अंदाजें सहाशें सातशें पानें—साहित्यपरिषदेकडे आला असून खंड छापण्यास सुरुवात झाली आहे, व पुस्तक संमेलनाचे सुमारास—निदान जून महिन्यांत तरी—तयार करण्याची व्यवस्था करीत आहों. ह्या पुस्तकासंबंधानें व बुडित खर्चासंबंधानें संमेलनापुढें सविस्तर हकीकत मांडण्यांत येईल.

गेल्या सालच्या संमेलनानें दुसरेंहि एक महत्त्वाचें काम (मराठी भाषेंत शास्त्रीय परिभाषेचा कोश तयार करण्याचें काम) साहित्यपरिषदेकडे सोपविलें होतें. या कोशाच्या रचनेचें काम बरेंच स्वरूपास आलेलें आहे. या कामाची पुढें व्यवस्था काय करावयाची हाहि महत्त्वाचा प्रश्न यंदाच्या संमेलनापुढें यावयाचा आहे. याशिवाय गतवर्षी अवकाश न मिळाल्यामुळें चर्चेंतून वगळलेले असे एकदोन ठळक प्रश्न यंदा हातीं घेण्याचें ठरलें आहे.

या सर्व गोष्टींचा विचार करतां यंदाचें संमेलन विशेष महत्त्वाचें होईल असें दिसतें. यासाठीं महाराष्ट्र-भाषाभिवृद्धि इच्छिणाऱ्या सर्व सदगृहस्थांनीं व स्त्रियांनीं आमच्या या आमंत्रणास मान देऊन संमेलनाला अगत्य यावें व वाङ्मयाच्या या पवित्र कार्यास मनोभावें करून हात भार लावावा, येवढी सर्वांस विनंति आहे.

कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
विनायक लक्ष्मण भावे
वासुदेव गोविंद आपटे
चिटणिस, साहित्यपरिषद्.

पुणें, ता. २५।४।१९०८.

* चौथें म्हणजे सहावें. (सं.)

४६९४

[केसरी अंक. ता. २ माहे जून सन १९०८ इ.]

मराठी ग्रंथकारांचें *चौथें संमेलन

पूर्वी प्रसिद्ध झाल्याप्रमाणे ग्रंथकारांच्या संमेलनास गेल्या शनिवारीं सकाळीं येथील विजयानंद नाटकगृहांत सुरवात झाली. मराठी ग्रंथकार, लेखक, महाराष्ट्रभाषेचे रसिक भक्त व इतर मंडळी मिळून बराच मोठा समाज जमला होता. प्रथम साहित्यपरिषदेचे व संमेलनाचे चिटणीस रा. वासुदेव गोविंद आपटे यांनी ग्रंथकारांचें स्वागत केलें.

मराठी ग्रंथकारांच्या संमेलनास इतके गृहस्थ अडचणी बाजूस ठेवून जमले ही मोठी संतोषाची गोष्ट आहे, असें सांगून त्यांनी साहित्यपरिषदेच्या वतीने त्यांचे आभार मानले. नतर रा. आपटे म्हणालेः—पूर्वी आगगाड्यांसारखीं प्रवासाचीं साधनें नव्हतीं, तेव्हाहि शारीरिक कष्ट सोसून लोक धर्मश्रद्धेच्या बलावर तीर्थयात्रा करीत असत. सध्या देशस्थिति सुधारण्याकडे लोकांचा कल होऊं लागला आहे. निरनिराळ्या कार्यासाठी निरनिराळ्या सभा, परिषदा, महामंडळें भरत असून त्यांकरिता लोक हल्ली दूरचा प्रवास करूं लागले आहेत. या हल्लीच्या काळच्या तीर्थयात्राच होत. वाङ्मय हा राष्ट्रीय जीवनाचा जिवंत झरा आहे; निरनिराळ्या राजकीय, सामाजिक, धार्मिक व औद्योगिक विचारांची नेमस्त, जहाल, कोणी बहिष्कारवादी तर कोणी बहिष्कार नको म्हणणारे, अशा परस्परविरुद्ध मतांचीं माणसें एका सूत्रांत गोवून त्यांच्या अंतःकरणाचें आकर्षण एका केंद्रांत करणारी साहित्यप्रेम ही प्रचंड शक्ति आहे. महाराष्ट्रभाषेची सेवा करणारांत हिंदु, जैन, ब्राह्म, ख्रिस्ती वगैरे पंथांचे लोक असून बंगालीप्रमाणे इकडेहि कालांतराने मराठी भाषेंत सुद्धा मराठी भाषेचे कट्टे भक्त व निष्णात मुसलमान लेखक निपजतील. महाराष्ट्रवाङ्मय हा नवजीवनाचा उत्कृष्ट झरा आहे. या झऱ्याचें पाणी आकंठ पिऊन अमर होण्याचा हक्क ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम यांसारख्या साधूंनी व प्रतिभासंपन्न कवींनी सर्वांना कायमचा देऊन ठेविलेला आहे. वाङ्मय हें राष्ट्रदेहाच्या सगळ्या अवयवांत सारखा संचार करणारें प्राणतत्त्व आहे. महाराष्ट्रवाङ्मयाची परंपरा फार थोर व अभिमानास्पद आहे. ही परंपरा पुढे चालविण्याची जबाबदारी प्रत्येक महाराष्ट्रीयावर आहे. आपल्या वाङ्मयाचें स्वरूप कालानुसार बदलत आलें आहे. ज्या वेळीं वाङ्मय आध्यात्मिक पाहिजे होतें तेव्हा तें आध्यात्मिक, जेव्हा स्वत्वाची ओळख करून देणारें हवें होतें तेव्हा तें त्या प्रकारचें झालेलें आहे. संस्कृत व इंग्रजी भाषांकडे उड्या पडून मातृभाषेचा लोकांना विसर पडतो कीं काय असा प्रसंग आला तेव्हा तिची थोरवी लोकांना समजावून सांगण्याचा प्रयत्न कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर, कै. वामन आबाजी मोडक व न्या. मू. रानडे यांच्यासारख्या विद्वानांनी केला. मराठी व्याकरणाचें संशोधन, शुद्धलेखनाची सुव्यवस्था, वृत्तदर्पणाची वाढ, शास्त्रीय परिभाषेसंबंधाची खटपट, समानार्थक सूक्ष्म अर्थभेद दर्शविणारा ग्रंथ, मराठी वाङ्मयाचा इतिहास, व्युत्पत्तिशास्त्र, विश्वकोश, मुलांसाठी व मुलींसाठी सोपीं व उपयुक्त व तेजस्वी पुस्तकें, १८५७ सालापासूनचा आपला इतिहास, वगैरे गोष्टी मराठी वाङ्मयांत अजून व्हावयाच्या आहेत. यासंबंधाचा विचार आपल्यांतील विद्वानांनी केला पाहिजे. हें होण्यास सर्व ग्रंथकारांची एकजूट होणें आवश्यक असून त्याकरिता त्यांच्यांत स्नेहभाव वाढला पाहिजे. हे स्नेहसंबंध उत्पन्न करणें

+ * तृतीय नव्हे, पांचवें; चौथें नव्हे, सहावें. (संपादक).

हा या संमेलनाचा मुख्य उद्देश आहे. आणि ही गोष्ट सिद्ध झाली तर ती कांही कमी महत्त्वाची नाही. सरकारचा आश्रय नाही, संस्थानिकांचाहि असावा तसा आधार नाही अशी नुसती रडकथा गात न बसतां आपल्या मगदुराप्रमाणे कामाला लागलें पाहिजे. अगोदर पूजा व मग प्रसाद हाच न्याय सरस्वतीदेवीच्या पूजकांनाहि लागू आहे. अशा आशयाचें रा. आपटे यांचें भाषण झाल्यावर प्रो. राजारामशास्त्री भागवत, रा. रामभाऊ टिकेकर, रा. मल्हार खंडेराव चिटणवीस, रा. पांडुरंग रामचंद्र सहस्रबुद्धे आणि रा. बाजीराव सखाराम सोनवणे या ग्रंथकर्त्यांच्या मृत्यूने झालेल्या हानीचें वर्णन करून त्यांनी रा. ब. वैद्य यांनी अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी विनंति केली आणि रा. न. चिं. केळकर यांनी तीस अनुमोदन दिलें. रा. ब. वैद्य टाळ्यांच्या गजरांत अध्यक्षस्थानापन्न होऊन म्हणाले :—

पूर्वेस नागपुरापासून तों पश्चिमेस सुरतेपर्यंत एक रेघ ओढावी, व पश्चिम किनाऱ्यावरून गोव्याच्या खालून नागपुरापर्यंत एक रेघ ओढावी व तिसरी रेघ म्हणजे आरबी समुद्राचा किनारा समजावा म्हणजे जो त्रिकोन होतो त्या प्रदेशांत मराठी भाषा प्रचलित आहे. या प्रदेशांत नागपूर, वर्धा, वऱ्हाड, नाशिक, नगर, सोलापूर, सातारा, ठाणें, कुलाबा, रत्नागिरी हे जिल्हे येत असून शिवाय सांगली, मिरज, कोल्हापूर वगैरे संस्थानें आणि हैद्राबादचे औरंगाबाद व बीड वगैरे जिल्हे येतात. महाभारतांतील भीष्मपर्वाच्या नवव्या अध्यायांत हिंदुस्थानांतील लोकांची जी यादी दिली आहे त्यांत पांडुराष्ट्र, महाराष्ट्र, अश्मगोपराष्ट्र वगैरे महाराष्ट्रीयांच्या पूर्वजांचा उल्लेख आढळतो. दाक्षिणात्य व विदर्भ हे एकच होत. अपरान्त व कोंकण यांचा उल्लेख महाभारतांत असून यांची गणना महाराष्ट्रांत होत असे. महाराष्ट्राची व्याप्ति ख्रिस्ती सनापूर्वीच निश्चित झाली होती. वराहमिहिराच्या ग्रंथांत 'महाराष्ट्र' हें नांव प्रथम सांपडतें. संस्कृत भाषेपासून निघालेल्या भाषांच्या आंतल्या भाषा व बाहेरच्या भाषा असे दोन भेद विद्वान लोक करीत असतात. बंगाली, पंजाबी, काश्मिरी व सिंधी या बाहेरील भाषा असून राजस्थानी, गुजराथी व हिंदी या आंतल्या भाषा होत. मराठी कांही आंतल्या भाषेसारखी, कांही बाहेरच्या भाषेसारखी आणि कांही दोहोंहूनहि निराळी आहे. इ. सनाच्या पांचव्या शतकांत मराठी भाषेस हल्लीचें स्वरूप येऊन मराठी वाङ्मयास नवव्या शतकांत सुरुवात झाली असावी. आचार्यानंतर धर्मजागृतीकरिता विद्वान लोकांनी मराठी भाषेच्या द्वारें यत्न केल्याने महाराष्ट्रवाङ्मयाचा आरंभ झाला. ज्ञानेश्वर, मुकुंदराय व नामदेव यांचे ग्रंथ मराठी वाङ्मयाचा पाया होत. या पायावर एकनाथ, तुकाराम, मुक्तेश्वर, रामदास यांनी डौलदार मजले व पुढील कवींनी लहान व कित्येकांनी मोठे असे मनोरे यावर उभारले. वामनपंडित, मोरोपंत, श्रीधर व महिपती यांच्या मनोहर व उंच मनोऱ्यांशिवाय रघुनाथपंडित, अमृतराय, राम जोशी वगैरेचेहि लहान मनोरे या महाराष्ट्र सरस्वतीमंदिरावर आहेत. १८१८ त महाराष्ट्राचें स्वातंत्र्य गेलें ! धर्मजागृति राहिली नाही ! पाश्चात्यांचें तितकें सारें गोड वाटूं लागलें ! पण एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं स्वदेश व स्वराज्य यांच्या कल्पनांनी महाराष्ट्राच्या प्रतिभेस पुनः स्फूर्ति मिळाली. जुन्या वाङ्मयमंदिराची अधिष्ठात्री देवता भगवद्भक्ति होती; नव्या वाङ्मयमंदिरांतील अधिष्ठात्री देवता स्वदेशभक्ति ही आहे. या मंदिराचा पाया कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी घातला. नंतर रा. ब. वैद्य दासगणूकृत अर्वाचीन भक्तलीलामृत, रा. टिळक यांच्या 'ओरायन'चें मराठी भाषांतर, स्पेन्सर साहेबांच्या Political Institutions चें रा. फडके यांनी केलेलें भाषांतर, प्रो. देसाई यांचें गहन विषयावरील अल्प विचार इ. ग्रंथांचें परीक्षण

करून ते इतिहासाकडे वळले. रा. सरदेसाई यांनी लिहिलेला ग्रीस देशाचा इतिहास व त्यापासून आपण शिकण्यासारख्या गोष्टी, रा. खरे यांनी लिहिलेला 'अधिकारयोग' व त्याचें महत्त्व, रा. भागवत यांनी लिहिलेला थोरले सयाजीमहाराज यांचा इतिहास, रा. हर्डीकरकृत शिवाजीमहाराजांचीं कारस्थानें, जिवबा दादा बक्षी यांचें चरित्र, स्वतः प्रसिद्ध केलेलें ५७ च्या बंडासंबंधाचें 'माझा प्रवास' हें पुस्तक, मराठी कविचरित्र, रा. सावरकर यांचें 'मॅझिनीचें चरित्र' व रा. मंडलिक यांचें मुस्ताफा कॅमेलपाशा यांचें चरित्र, रा. खाडिलकर यांचें 'कीचकवध', रा. आपटे यांची करमणुक पत्रांत छापत असलेली 'माध्यान्ह' कादंबरी, 'रामाची अयोध्या' व 'मूर्तिमंत देशाभिमान' या कादंबऱ्या, काव्य ग्रंथांतील रा. चिटणवीस यांची नवकुसुममाला व टीकालेखांत नवीन दिसणारा 'नाट्यकलारुकूकुठार', रा. पाटणकर यांची 'शब्दांची व्युत्पत्ति' व रा. वि. वा. भिडे यांचे 'मराठी शब्दांचे भाग', रा. चांदोरकर यांनी लिहिलेलें 'आर्य लिपी' पुस्तक इ. ठळक ग्रंथांचें गुणदोषात्मक त्रोटक परीक्षण अध्यक्ष रा. ब. वैद्य यांनी केलें व शेवटीं रामदासस्वामींनी दासबोधांत कवीच्या वैभवाच्या केलेल्या वर्णनाने अध्यक्षांनी आपलें भाषण संपविलें.

अध्यक्षांचें वरील आशयाचें भाषण झाल्यानंतर रा. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी साहित्यपरिषदेच्या कामगिरीचा गेल्या वर्षांचा अहवाल वाचून दाखविला. पूर्वी परिषदेचे सभासद ७० होते ते आता ९० झाले आहेत. वर्षांस प्रसिद्ध झालेलीं जीं पुस्तकें परिषदेकडे येतील त्यांचें योग्य विद्वानांकडून परीक्षण करवावयाचें असें गेल्या संमेलनांत ठरलें होतें. पण पुस्तकें फारच थोडीं असल्यामुळे हें काम होऊं शकलें नाहीं; तरी अध्यक्षांनी आज कित्येक पुस्तकांचें परीक्षण आपल्यापुढे आता केलेंच आहे. शास्त्रीय परिभाषेचा कोश तयार करावयाचा आणि राजनीति, अर्थशास्त्र, रसायन व ज्योतिष या शाखा प्रथम घ्यावयाच्या, असें गेल्या संमेलनांत ठरलें होतें. पण राजनीतीवरील सर्वमान्य ग्रंथ न मिळाल्यामुळे त्याबद्दल गणितशास्त्र घेतलें. रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनी, एम्. ए., यांनी अर्थशास्त्र, प्रो. नारायण बळवंत पेंडसे, एम. ए., एलएल. बी., यांनी गणित, प्रो. लक्ष्मण गणेश साठे, एम. ए., यांनी रसायनशास्त्र, आणि रा. कृष्णाजी शंकर दीक्षित, बी. ए., यांनी ज्योतिष अशा शाखा घेऊन पारिभाषिक इंग्रजी शब्दांना समानार्थक मराठी शब्द तयार करण्याचें कबूल केलें. हें काम लवकर पार पडेल अशी खात्री वाटली, तेव्हा तत्त्वज्ञान व भूगोल या दोन शाखा आणखी हातांत घेतल्या. तत्त्वज्ञानाचें काम रा. हरि गणेश गोडबोले, बी. ए., यांनी आणि भूगोलाचें काम रा. रामचंद्र जनार्दन गोखले, बी. ए., यांनी पत्करिलें. चार शाखांचें काम बहुतेक संपलें आहे व दोन शाखांचें लवकरच संपेल. या शब्दांच्या यादीचें परीक्षण करण्याकरिता निरनिराळ्या विद्वानांचे संघ नेमावयाचे आहेत. रा. रा. राजवाडे यांनी संग्रहित केलेले ऐतिहासिक कागदपत्र छापावयाचे असें गेल्या संमेलनांत ठरलें होतें. रा. राजवाडे यांचा सहाशें पानांचा ग्रंथ छापखान्यांत छापत असून तो शक्य तितक्या त्वरेने बाहेर पडेल. याशिवाय सर्व जुन्या मराठी कवींच्या ग्रंथांची कच्ची यादीहि साहित्यपरिषदेने तयार केली आहे. शेवटीं साहित्यपरिषदेस मदत करणारांचे या अहवालांत आभार मानिले आहेत. नंतर सकाळचें काम संपलें.

दुपारीं तीन वाजतां पुनः सभेस प्रारंभ झाला. ३ ते ४ पर्यंत साहित्यपरिषदेची रचना व कार्यकारी मंडळीची योजना याबद्दल चर्चा झाली. चार वाजल्यानंतर संमेलनाचे कामास प्रारंभ झाला. रा. लक्ष्मण गणेशशास्त्री लेले यांनी सरकारी क्रमिक पुस्तकांसंबंधी आपला टीकात्मक निबंध वाचला. रा. लेले यांनी प्रथम जुन्या क्रमिक पुस्तकांसंबंधाने विचार करतांना

तत्पूर्वी मराठी शिक्षणक्रम कसा होता, एलफिन्स्टनसाहेबांनी मराठी क्रमिक पुस्तकें तयार करविलीं तेव्हा त्यांतील कांही धडे इंग्रजींतून भाषांतर करून घेतलेले व कांही इंग्रजीच्या आधाराने स्वतंत्र लिहिलेले कसे घेतले, हें सांगितलें. नंतर ते म्हणाले, १८२४ सालीं जर्व्हिस यांचें गणित, सदाशिव काशीनाथ छत्रे यांचें लघुवाक्यात्मक 'बालबोध वाचन', मोलस्वर्थ यांची 'शाळेची व्यवस्था' आणि पंचोपाख्यान, विदुरनीति व बालबोध गोष्टी अशीं पुस्तकें तयार झालीं. १८३२ सालीं यांत भर पडली. नंतरचा शिक्षणक्रम कसा होता, हें सांगून १८४५ त झालेली आणखी भर याचा निबंधकारांनी उल्लेख केला. आणि नंतर बेबंदशाहीला कंटाळलेल्या लोकांनी इंग्रजांची कोणतीहि गोष्ट तत्काळ मान्य केली त्याप्रमाणे शिक्षणपद्धतीहि स्वीकारली असें लेले शास्त्री यांनी सांगितलें. पुढे मराठी सहा पुस्तकें तयार झालीं. या मालेस प्रारंभ १८५७ सालीं झाला व ती ६१ सालीं संपूर्ण तयार झाली. १८९६ सालीं या मालेस एक सातवें पुस्तक जोडण्यांत आलें. या सालीं सरकारचें जें राजकीय धोरण दिसलें त्यामुळे लोकांचें लक्ष या पुस्तकांकडे लागलें. स्वदेशभक्ति उत्पन्न करणारे धडे सरकारी पुस्तकांतून काढण्यांत आले. मध्यंतरीं पुस्तकाच्या आवृत्त्या निघाल्या त्यांत जरी मधून मधून लहानसहान फेरबदल करण्यांत येत होते तरी १९०२ सालीं भरविलेल्या मुंबई इलाख्याच्या शिक्षणपरिषदेंत चर्चा होऊन या पुस्तकांत बराचसा बदल करणें जरूर आहे, असें ठरविण्यांत आलें. बुककमिटीने बसून नवी पुस्तकमाला तयार करविली. तिचें काम १९०५ सालीं संपलें. हीं पुस्तकें छापण्याचें काम मॅकमिलन कंपनीला देण्यांत आलें व या कामीं सरकारने कंपनीला हितकर व लोकांवर नाहक कर लादणारा असा करार कंपनीबरोबर केला. त्याचप्रमाणे वर्णमालेचा भंग व शुद्धलेखनांत योजलेला फेरफार, या गोष्टींमुळेहि लोकांचें लक्ष नवीन पुस्तकमालेकडे लागलें. पुस्तकांच्या किंमती वाढल्या, व चित्रें अस्पष्ट पत्करावीं लागलीं. वर्णमालेचा अनुक्रम बदलविण्यांत आला म्हणजे शिकवितांना पूर्वीच्याप्रमाणे अक्षरें न शिकवितां त्यांचे निरनिराळे समुच्चय करून तीं शिकवावीं, असें ठरविण्यांत आलें. यासंबंधाने 'केसरी'तील लेखांमधील व पत्रव्यवहारांतील कांही उतारे वाचून दाखविल्यावर रा. लेलेशास्त्री म्हणाले की, शुद्धलेखनाच्या बाबतींत सरकारने हात घालण्याचें वास्तविक कांही कारण नाही; पण हें करावयास सरकार उद्युक्त झालें ! मुंबईस यासंबंधाने सर भालचंद्र यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरून गव्हर्नरसाहेबांपर्यंत तक्रार नेण्यांत आली; तेव्हा कोठे सध्या तरी यांत बदल करीत नाही, असें सरकाराकडून आश्वासन मिळालें. पुस्तकांची बांधणी वाईट आणि किंमती अधिक आहेत. चित्रें अधिक दिलीं असून विषयांची विभागणी चांगली केली आहे. पण शास्त्रीय विषय जरा दुर्बोध झालेले आहेत; भाषा आळणी आहे. चांगल्या लेखकांच्या लेखांतील उतारे आले म्हणजे अंमळ बरें वाटतें एवढेंच. श्रीशिवाजीमहाराजांच्या चरित्रास पूर्वी हद्दपार केलें होतें पण आता इतिहासाच्या भागांत श्रीशिवाजीमहाराजांसंबंधाचे धडे घातले आहेत. सरकार व लोक, कर वगैरेसंबंधी माहिती द्यावी तशी दिलेली नाही, वादग्रस्त विषय दिले आहेत; ज्या गोष्टींशीं लहान मुलांचा संबंध नाही किंवा नसावा त्या गोष्टींचा उल्लेख पुस्तकांतून केलेला आहे. स्वदेशप्रीति बाणेल असे धडे नाहीत; स्वदेशबांधवांविषयी अनादर उत्पन्न होण्यासारखा भाग कित्येक ठिकाणीं आलेला दिसतो; कवितांची निवड मध्यम प्रतीची आहे असें सामान्यतः सांगून एक एक पुस्तक घेऊन रा. लेलेशास्त्री यांनी त्यांतील गुणदोषांचें सविस्तर व बारकाईने विवेचन केलें. पुस्तकांचे आकार, टाइप व बांधणी, यांच्या मानाने किंमत कशी अधिक ठेवण्यांत आली आहे, राजनिष्ठेचें पुराण उगीच मधून मधून घालण्यांत आलें आहे, वगैरे गोष्टींचें

त्यांनी विवरण केलें. नंतर रा. विष्णु गोविंद चिपळूणकर म्हणाले की, क्रमिक पुस्तकें वाईट तर झालीं आहेतच पण त्यामुळे आपल्या भाषेविषयीच्या आपल्या जाग्रतींतहि भर पडली यांत संशय नाही. अनुस्वारांचें बंड कोकणस्थांनी आणिलें हें खोटें आहे; इतर भाषांत अनुस्वारांकडे विशेष प्रवृत्ति असून ज्यांच्याकरिता अनुस्वार काढावयाचे म्हणतात त्यांची मूळ प्रवृत्ति अनुस्वारांकडेच आहे. थोरले चिपळूणकर यांचें मत दीर्घ ईकारान्त शब्द लिहिण्याकडे होतें, हें म्हणणें खोटें आहे. अशा रीतीने भाषेची अवहेलना होऊं देणें इष्ट नाही, असें ते म्हणाले. रा. नारायण कृष्ण गद्रे यांनी सांप्रतच्या मराठी पुस्तकांतील चुकांचा उल्लेख केला व हल्लीच्या एका कवीच्या भाषांतरकृतींतील चुका दाखवून सांगितलें की या गोष्टीसंबंधाने सविस्तर ऊहापोह करण्याची तजवीज मासिक पुस्तक काढून साहित्यपरिषदेने अवश्य केली पाहिजे. तदनंतर रा. रा. गोगटे (डे. ए. इन्स्पेक्टर, मिरज) यांनी मोडी लिपीसंबंधाचा आपला मार्मिक विवेचनात्मक निबंध वाचून दाखविला. आपल्यांत मोडी अधिक लिहिली जात असून ती झपाट्याने कशी लिहितां येते; लोक लिपीची निवड कशी करतात; आपली वर्णमाला कशी सरस व सशास्त्र आहे; व्यवहारांत शुद्धाशुद्धतेकडे लक्ष देण्यास वेळ नसून लवकर लिहिण्याकडे विशेष लक्ष लागल्यामुळे मोडीची उत्पत्ति बालबोधीपासूनच कशी झाली; कोणी या लिपीला चिटणीशी म्हणतात, कोणी ही मौर्यांची म्हणतात, कोणी ही हेमाडपंतांनी आणिलेली आहे असें म्हणतात; आणि कोणी बालबोध हें प्राचीन देवनागरीचें अर्वाचीन रूप व मोडी हें अशोकलिपीचें अर्वाचीन रूप आहे असें प्रतिपादितात; पण हें म्हणणें कसें सयुक्तिक दिसत नाही, वगैरे गोष्टींचें त्यांनी सविस्तर सोदाहरण विवेचन करून सांप्रतच्या स्थितींत मोडी लिपी सर्वमान्य होण्यास तींत काय सुधारणा करावयास पाहिजे याचा त्यांनी ऊहापोह केला, आणि परिषदेचें शनिवारचें काम संपलें.

दुसरे दिवशीं सकाळीं बाहेरगांवच्या ज्या कांहीं गृहस्थांना संमेलनास हजर राहतां आलें नाही, त्यांनी पाठविलेल्या दिलगिरी दर्शविणाऱ्या तारांचा उल्लेख करण्यांत आल्यानंतर रा. गंगाधर नारायण सहस्रबुद्धे यांनी आपला 'मराठींतील शास्त्रीय वाङ्मय' या विषयावरील निबंध वाचला. जपानी लोकांचा अभ्युदय भौतिक शास्त्रांच्या ज्ञानानेंच झालेला आहे, मनःप्रवर्तन, शरीरवर्धन आणि विज्ञानवर्धन यांस भौतिक शास्त्रांनीं मदत होते, आजपर्यंत मराठींत झालेल्या दहा हजार ग्रंथांत शास्त्रीय ग्रंथ शंभरांवर नाहीत, भौतिक शास्त्रावर पुस्तकें होण्यास सुरवात एकोणिसाव्या शतकांत झाली, प्रथम भौतिक शास्त्रावरील ग्रंथ इंग्रजी पुस्तकांची भाषांतरेंच होतीं, पुढे झालेल्या ग्रंथांची योग्यता कशी कमी होती, झाले ते प्रयत्न कसे निरुपयोगी झाले, आणि बहुजनसमाजाला या विषयाची कशी गोडी उत्पन्न केली पाहिजे, याचें विवेचन करून रा. सहस्रबुद्धे यांनी आपला निबंध संपविला. या विषयासंबंधानें रा. चिपळूणकर यांनी रा. ब. कीर्तने यांच्या उद्योगाचें वर्णन केलें. बडोद्याकडील शिक्षण खात्यासंबंधानें थोडी माहिती सांगितली व बडोद्याच्या Vernacular College of Science चा इतिहास सांगितला. ते म्हणाले कीं, शास्त्रशिक्षण स्वभाषेंत देण्यास सुरवात झाल्याखेरीज चांगले शास्त्रीय ग्रंथ उत्पन्न होणार नाहीत. रा. विनायकराव भावे म्हणाले कीं, एल्. एम् अँड एस्. झालेला डॉक्टर हा केवळ इंग्रजी औषधें खपविणारा दलाल आहे, त्याला इंग्रजांनी पाठविलेलीं औषधें मिळाल्याशिवाय तो कांही एक करूं शकणार नाहीं, त्याला औषधें करतां येत नाहींत किंवा त्यांचे खरें ज्ञानही नसतें, भाषांतर करून शास्त्रीय ग्रंथ होत नसतात, एखाद्या पदार्थाच्या घटकांची यादी या सारख्या गोष्टींचें मात्र भाषांतर चालेल, रूपांतरे हीं ग्रंथकारास

विषय उत्तम समजल्याशिवाय नीट होत नाहींत, स्वतंत्र शास्त्रीय ग्रंथांचें महत्व विशेष आहे. पण इकडे बागबगीचे, रसायनशाळा, वगैरे साधनें नसल्यानें असले ग्रंथ उत्पन्न होणें शक्य नाही, राष्ट्राची तितकी प्रगति झाल्याशिवाय शास्त्रीय ग्रंथ होणार नाहींत, कोश करूनही हें काम होणें नाहीं, तितकी प्रगति होण्यापूर्वी कोश करीत बसणें म्हणजे मूल होण्यापूर्वीच त्याचे त्याचे कपडे बेतीत बसण्यासारखें आहे; शास्त्र हा मुलांचा विषय नसून तो प्रौढांचा द्रव्यसाधनाचा मार्ग आहे; अशा आशयाचें रा. भावे यांचें कळकळीचें व जोरदार भाषण झालें. अध्यक्षांनीं या संबंधानें अशी आशा प्रगट केली कीं, समर्थ विद्यालयांत मराठीमध्यें शास्त्रीय शिक्षण दिलें जाऊन द्रव्याकरितांच नव्हे तर स्वदेशाकरितां तें शिकणारे विद्यार्थी सांपडतील. नंतर प्रसिद्ध इतिहास संशोधक रा. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनीं स्टेनकनाऊ यांचा 'ल' चा 'ळ' मराठींत कसा होतो आणि द्वित्त 'ल्ल' चा नुसता 'ल' कसा होतो वगैरे संबंधानें जो सिद्धांत प्रसिद्ध झाला आहे तो कसा सर्वस्वी खरा नाहीं, यासंबंधाचा एक लहानसा निबंध वाचला. दुसरा एक मुक्तेश्वरासंबंधाचा निबंध रा राजवाडे यांनी वाचला. शिवाजी महाराजांच्या वेळच्या चंद्रात्मज कवीच्या ओव्यांवरून असें दिसतें कीं, जें महाभारत मुक्तेश्वराने केलें त्याच्या पुढील काम चंद्रात्मजानें केलें; तेव्हां मुक्तेश्वराने पांचच पर्वें लिहिलीं, पुढील पर्वें नाहींत, असें सिद्ध होते, हा या निबंधाचा सारांश होता. रा. राजवाडे यांनीं तिसरा एक निबंध वाचला. पूर्वेतिहासाचें ज्ञान झाल्याशिवाय सध्याच्या कालीं किंवा पुढें काय होईल हें सांगतां येत नाहीं; तेव्हां पूर्वीच्या इतिहासाचें संशोधन केल्यावर जें कांहीं प्रसिद्ध करावयाचें त्याला साहाय्य करा हा या निबंधाचा सारांश होता. रा. महादेव हरि मोडक, बी. ए. यांनीं रा. राजवाडे यांच्या स्वार्थत्यागाविषयीं व कामगिरीविषयीं चार शब्द बोलून त्यांच्या कामाला द्रव्यसाहाय्य करा अशी सर्वांस मोठ्या कळकळीनें विनंती केली. डॉ. रानडे (सोलापूर) यांनीं जाहीर केलें कीं, १८०० ते १९०० च्या काळचा इतिहास जो लिहील त्यांस एक गृहस्थ हजार रुपयांचे बक्षीस द्यावयास तयार आहेत. रा. ब. जोशी, रा. ब. वैद्य, रा. ब. महाजनी यांच्या सारख्यांनीं कसा इतिहास पाहिजे या विषयीं विचार करून एक कल्पना प्रसिद्ध करावी व त्याप्रमाणें इतिहास तयार करवावा. यावर रा राजवाडे यानीं सांगितलें कीं, पेन्शनर गुलाम लोकांच्या पसंतीनें व सल्ल्यानें काम करून एक हजार रुपये बक्षीस मिळविण्यास कोणीही स्वाभिमानी व निस्पृह ग्रंथकार तयार होणार नाहीं. शिवाय इतिहास लिहिण्याचा काल अद्यापि आलेला नसून इतिहासाचीं साधनेंच प्रसिद्ध करण्याची सध्यां आवश्यकता आहे. नंतर श्री. रा. शंकरराव चांगण-बॅरिस्टर यांनीं वाक्यांतील उद्देश आणि विधेय ही दोन दिसलीं तरी वास्तविक ती एकच कल्पना आहे, असें विवेचन केलें. रा. मोडक यांनीं याचाच निराळ्या पद्धतीनें अनुवाद केल्यावर सकाळचें काम संपलें.

रविवारीं सायंकाळीं, प्रथम धारवाडचे रा. व्यंकटेश बापुजी केतकर यांनी साहित्यपरिषदेला पाठविलेल्या सूचना अध्यक्षांचे परवानगीवरून रा. वासुदेवराव आपटे यांनी वाचून दाखविल्या. गणित विषयावरील उच्च प्रकारच्या पुस्तकांचीं भाषांतरें व्हावयास पाहिजे आहेत; या कामाकरितां रा. ब. देवल हे ३००० रु. व्ययास तयार आहेत; रँगलर परांजपे यांच्या सारख्यांचें मन या कामाकडे लावण्याचा प्रयत्न करण्यांत यावा, असा त्यांच्या सूचनांचा मथितार्थ होता. नंतर 'दीनबंधू' पत्राचे संपादक रा. वासुदेव लिंगोजी बिर्जे यांनी केलेल्या विनंती प्रमाणें त्यांच्या पत्रांतील एक लेख वाचून दाखविण्यांत आला. त्यांतील मुद्दा एवढाच होता कीं, विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्यासारख्यांची भाषा जोरदार व मोहक असली तरी कठीण व

नवीन शिकणाऱ्याच्या दृष्टीनें तापदायक आहे; तेव्हां ही भाषेची नवी मोड मोडून टाकून जुन्याकाळच्या कवींप्रमाणें साधी व सोपी भाषा वापरावी. नंतर रा. रंगाचार्य रड्डी यांचें भाषण झालें. अलकिडच्या प्राकृतभाषेहून निराळी एक प्राकृत भाषा आहे किंवा नाही, आणि भाषेंत एकाचाच अनेक विस्तार कसा झाला आहे, याचा विचार व्हावा, असें त्यांनी सांगितलें. नंतर रा. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांचे 'ज्ञानेश्वरीचा जीर्णोद्धार' या विषयावर प्रवचन झालें. शके ११९७ त जन्मलेल्या ज्ञानदेवास शके १२०९ त शुद्धिपत्र मिळालें व १२१८ त ते समाधिस्थ झाले. ज्ञानेश्वरी ही शके १२१२मध्यें लिहिली गेली. 'ज्ञानेश्वरीचा जीर्णोद्धार'– ही प्रत शके १५३२ तील आहे. भारद्वाजांजवळच्या ज्ञानेश्वरींतील ओव्या नऊ हजार नऊ आहेत; पण दोन अडीचशे वर्षांतील प्रती पाहिल्यास नऊ हजार सदतीस ओव्या आहेत असें आढळतें. चिद्घ स्वामीने एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, नऊ हजार पन्नास ओव्या ज्ञानेश्वरींत आहेत. निळोबांनी लिहिलें आहे कीं, ज्ञानेश्वरींत दहाहजार ओव्या आहेत. शके १५३२ सालीं लिहिलेल्या एका ग्रंथात ज्ञानेश्वरीमध्ये पंधरा हजार पन्नास ओव्या असल्याचे लिहिले आहे. १५३२ शकांतील प्रत्यक्ष ज्ञानेश्वरीची प्रत मिळाली नाहीं. पण त्यांतली एक प्रत ज्याला मिळाली त्याने या ज्ञानेश्वरीला जी पुरवणी जोडली, तीसांपडली आहे. या पुरवणींतील कांही वेचे रा. पांगारकर यांनी वाचून दाखविले व सांगितलें कीं, ज्ञानेश्वरीसंबंधाने शोध करणाराचे अंगी धर्मश्रद्धा व चौकसपणा हे दोन्ही गुण पाहिजेत. नुसता एक गुण असून उपयोगी नाही. नंतर रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी हे अध्यक्षांचे विनंतीवरून बोलावयास उभे राहिले ते म्हणाले :—

ग्रंथकारांच्या या परिषदेंत बोधप्रद वक्तृत्वप्रचुर प्रवचनें देऊन ग्रंथकारांनीं आपल्याला तल्लीन केलें, विशेषतः 'ज्ञानेश्वरीचा जीर्णोद्धार' या विषयावर रा. पांगारकर यांनी प्रवचन केलें, हा आपल्यावर अनुग्रहच झाला आहे. ग्रंथकारांच्या विचाराप्रमाणें वाचकांचे विचारही परिषदेपुढें येणें अवश्य आहे. म्हणून मी आतां वाचक या नात्यानेच आपले विचार सांगत आहे. महाराष्ट्र वाङ्मयाची अभिवृद्धी राष्ट्राची परिस्थिती व गरजा यांच्या मानाने होत आहे किंवा नाही, आणि जी होत आहे त्यापेक्षा अधिक व्हावयास पाहिजे आहे कीं काय, हे दोन मुख्य विचार आहेत. मुत्सद्दी किंवा योद्धे यांच्या इतकीच किंबहुना अधिक गरज राष्ट्राला ग्रंथकारांची आहे. Ideas and feelings move and govern the world. जगाच्या प्रगतीला जें चलन मिळतें तें विचारांमुळें व मनोवृत्तींमुळें मिळत असतें असें आगस्टस कांट या फ्रेंच लेखकाने म्हटलें आहे. फ्रान्समधील क्रांती रूसो व्हाल्टेरसारख्या तत्ववेत्यांच्या ग्रंथांमुळेंच झाली. या लेखकांच्या विचारांनी एकट्या फ्रान्सांतच नव्हे तर सर्व युरोपांत क्रांती घडवून आणिली. इंग्लडांतील १६८८ सालची राज्यक्रांती लोकांत झालेल्या नवीन विचारांच्या बीजारोपणाचेंच अंतिम होय. जनतेच्या मनाला, विचाराला, व प्रवृत्तीला वळण लावावयाचें, प्रोत्साहन द्यावयाचें, हें काम ग्रंथकारांचेंच आहे. लॉंगफेलो किंवा गेटी, ज्ञानेश्वर अगर रामदास मिल्टन अगर बर्क, यांच्यासारख्या ग्रंथकर्त्यांनी हेंच कार्य केलें आहे. खऱ्या ग्रंथकारांच्या अंगीं नैसर्गिकच गुण असतात; परिस्थितीमुळें या गुणांचा परिपोष होतो-विकास होतो-एवढेच. नुसत्या परिस्थितीने उत्तम ग्रंथकार होत नाहीत. स्वातंत्र्यप्रचुर कविता लिहिणारा कवी व्हिटियर हा स्वतंत्रताप्रिय देशांत निपजला नसता तर असा कवी होता कीं नाही, ही शंका आहे. पण परिस्थिती असून त्याचे अंगीं नैसर्गिक गुण नसता तर तो इतका प्रसिद्ध कधीं झाला नसता. १६५० पासून १८१८ पर्यंत महाराष्ट्रांत मोठमोठे शूर, स्वामिभक्त व देशभक्त होऊन गेले; पण १८१८ नंतर एकही योद्धा झाला नाहीं. हा परिस्थितीचा गुण होय. अलिकडे

एकही बापू गोखले किंवा तानाजी मालुसरे झालेला नाहीं. अध्यक्षांनीं सांगितल्याप्रमाणें मन्वंतर झाल्याकारणानें वास्तुदेवता, स्थलदेवता, बदलली आहे. स्वदेशप्रीति स्वातंत्र्यभक्ति हीं अधिष्ठात्री देवता झाली आहे. नवीन जागृतीला व स्फूर्तीला अनुलक्षून वाङ्मयाची वाढ झाली पाहिजे, असें अध्यक्षांनी सांगितलेच आहे. आपलें राष्ट्र नामशेष होईल कीं काय अशी भीति वाटावयास लावण्याइतकी आपल्या मनाची प्रगती झाली आहे. स्वावलंबनाची कल्पना व स्वावलंबनाने यश येईल अशी भावना हीं नव्या स्फूर्तीचीं दुहेरी अंगें आहेत. आपला पूर्वीचा इतिहास उल्हासजनक व वैभवकारक आहे, तेव्हां आपण निराश होण्याचें कारण नाही. १९०१ साली ११६ ग्रंथ मराठींत झाले, तेंच १९०५-०६ सालीं २०४ ग्रंथ झाले. याबद्दल ग्रंथकारांचें अभिनंदन केले पाहिजे. तरी पण कांहीं उणिवा आहेत यांत संशय नाही. इतिहास हा विषय घेतला तर असें दिसून येईल कीं अजून हिंदुस्थानच्या इतिहासाची पूर्ण साधनेंच उपलब्ध नाहींत. न्या. रानडे व कुंटे यांनाही यामुळेंच हें काम मागें ठेवावें लागलें. पण कांहीं इतिहासाचा भाग लिहिण्यासारखा आहे. युरोपांत ग्रीस देश स्वातंत्र्याची मातृभूमी होती. या देशाचा इतिहास बोधप्रद आहे. पण आपण तिकडे द्यावें तसे लक्ष दिलेले नाहीं. एवढेंच काय मग राष्ट्रीयसभेच्या बावीस बैठकींची समग्र हकीकतसुद्धां मराठींत सापडत नाहीं. शास्त्रीय ग्रंथांसंबंधानें अशीच अनास्था दिसून येते. राष्ट्रीय विचारांत जितकी भर सर्व तऱ्हेनें होईल तितकी पाहिजे आहे. मग या भरीचा उपयोग तात्काल होवो वा कालावधीनें होवो विचार ही एक शक्ती आहे व तिचा फायदा केव्हांना केव्हां तरी झाल्याखेरीज राहणार नाहीं ग्रंथांची अभिवृद्धी होण्यास ग्रंथकार, ग्रंथ व द्रव्य यांचे साहाय्य, आणि वाचक लागत असतात. अनेक प्रकारच्या गुणांनी जो जनसमूह शोभतो तें राष्ट्र होय आणि आपली भूमी तर नुसतें 'राष्ट्र' नसून 'महाराष्ट्र' आहे. आपल्यांत ग्रंथकार सांपडतील; पण द्रव्यसाहाय्य नसल्यानें ग्रंथांस उत्तेजन मिळत नाहीं, परमेश्वराची आपल्या देशावर कृपादृष्टी आहे, यांत संशय नाहीं; पण परराज्यांत राजाश्रय मिळेनासा झाला आहे. राजा व प्रजा यांच्यांत अंतिमासंबंधानें वगैरे मतभेद असल्यामुळें सरकारचें द्रव्य या कामीं घेणें इष्ट नाहीं; कारण सरकारच्या द्रव्याबरोबर सरकारचा ताबा येतो—सरकारच्या आश्रयानें ग्रंथ लिहिण्यापेक्षा तो न लिहिलेलाच बरा! राहतां राहिला लोकांचा आश्रय. त्यांतील सुशिक्षितच काय ते ग्रंथास आश्रय देणार, हें उघड आहे. हिंदुस्थानांत मराठी बोलणारे लोक १ कोटी ८२ लक्ष असून मुंबई इलाख्यांतील मराठी बोलणारांची संख्या ८४-८५ लक्ष आहे. साऱ्या दहा बारा लक्षांना मात्र लिहितां वाचतां येतें. त्यांत नुसतें लिहीणें वाचणें येणारेच फार. राहिले सुमारे पाच लाख लोक. तशांत आपण लोक दरिद्री आहों दर माणसाची दर दिवसाची प्राप्ती पाऊण आणा काय ती असते! तरी पण ग्रंथांच्या अभिवृद्धीकरितां प्रयत्न करणें अवश्य आहे. धनिकांची मदत घेतली पाहिजे. कोणत्याही राष्ट्राला कधीं आला नव्हता असा बिकट प्रसंग सध्यां आपल्या देशावर आला असून नवीन राष्ट्रीय विचारांचे बीजारोपण होणे अवश्य आहे. एक लाख रुपयांचा फंड जमल्यास व्याजाचे चारपांच हजार रुपये जमून आपल्याला अभिमत असे ग्रंथ प्रसिद्ध करतां येतील. ग्रंथकारांस लागणाऱ्या ग्रंथसाहाय्याकरितां ग्रंथसंग्रहही पाहिजे आहे. नवीन विचारांचे बीजारोपण झाले पाहिजे आहे. हें पवित्र कर्तव्य साहित्यपरिषदेच्या तर्फे परमेश्वराच्या कृपेनें होईल अशी आशा प्रदर्शित करून रा. ब. जोशी यांनीं आपले भाषण संपविलें. अध्यक्षांनीं रा. ब. जोशी यांचे आभार मानले व थोडक्यांत संमेलनाच्या यंदाच्या कामाचा समारोप करून त्यांनीं सर्वांचें आभार मानले. शेवटी अध्यक्ष व चिटणीस यांचे रा. न. चिं. केळकर यांनी आभार मानले

ब साहित्य परिषदेचे गतवर्षाचे चिटणीस हेच पुढील सालाकरिता कायम करावे असेंहि सुचविलें. लोकांनी टाळ्यांच्या गजराने आपली याबद्दल अनुमति दर्शविल्यावर ग्रंथकारांच्या या चौथ्या संमेलनाचें काम समाप्त झालें. पुढील संमेलन बहुतकरून मुंबईस होईल.

परिशिष्ट ७ वें

महाराष्ट्र साहित्य संमेलनें १९०९ ते १९४०

विहंगमावलोकन

[इ. स. १९०९ ते १९३९ या तीस वर्षांत जीं महाराष्ट्र-साहित्य-संमेलनें भरलीं त्यांचे अहवाल ग्रंथरूपाने उपलब्ध आहेत. वास्तव त्या संमेलनांतील लक्षणीय विशेष गोष्टींचेंच संकलन प्रसिद्ध झालेल्या वृत्तांताचे आधारें येथे केलें आहे. शिवाय सर्व संमेलनांची जंत्री पुढे दिली आहेच. १९०९-१९४० या कालखंडाचेहि दोन भाग पाडतां येतील. ते असेः— (१) १९०९ ते १९२६ पावेतोंच्या काळांत संमेलनें नियमाने प्रतिवर्षी भरलीं नाहीत. १९०९-११-१५-१७ व २१ एवढीं पांचच संमेलनें भरून पुनः खंड पडला. याला खंड-संमेलनकाल म्हणावें. (२) पुढे १९२६ पासून आजतागायत प्रतिवर्षी संमेलनें अखंडपणें भरत आलीं आहेत. सबब हा अखंड-संमेलनकाल समजावा. प्रस्तुतचें संकलनपर समालोचन वस्तुतः साधनविभागांत मोडत नाही. तथापि साहित्यसंमेलनांचें स्वरूप थोडक्यांत एकत्र पाहतां यावें एवढ्या सोईसाठी त्याचा समावेश येथेच करून घेतला आहे.]

साहित्य संमेलनांचा कार्यक्रम साधारणपणें ठरीव झाल्यासारखा आहे. स्वागताध्यक्ष व संमेलनाध्यक्ष यांचीं भाषणें, ठराव व निबंधवाचन आणि कधी कधी स्वतंत्र व्याख्यानें हीं तर त्यांत असतातच. निबंधवाचन कोठे कोठे विभागवार करण्यांत आलेलें आहे. कांही संमेलनांत विभागसंमेलनें निराळींच भरविण्याचा प्रयोग करून पाहण्यांत आला. ग्रंथ, हस्ताक्षरें, ऐतिहासिक साधनें किंवा कलाकृति यांचीं प्रदर्शनेंहि संमेलनास जोडून भरविण्यांत येतात. काव्य-गायन, नाट्यप्रयोग, गायन, आणि सफरी यांची जोडहि संमेलनकार्यक्रमास देण्यांत येते. उपाहार, भेजवान्या, आणि फोटो हेहि प्रकार असतातच. ठरावांत गत साहित्यसेवकांविषयी दुखवटा, असेल तेव्हा पुढील आमंत्रण, आभार असले कार्यप्राप्त ठरावहि असावयाचेच. बहुधा संमेलनाचे बैठकीचा प्रारंभ ईशस्तवन किंवा मंगलाचरण आणि स्वागतपर पद्यांनी व्हावयाचा ही चाल आहे.

स्वागतसभासद, प्रतिनिधि आणि प्रेक्षक असा संमेलनांचा श्रोतृवर्ग असतो. पुण्याच्या १८८५ च्या सभेंत एकच स्त्री हजर होती. पुढे ही संख्या शेकड्यांनी मोजतां येऊं लागली.

पुण्यास सहा, बडोदें व मुंबई येथे प्रत्येकीं तीन, इंदुरास दोन याप्रमाणे एकाधिक अधिवेशनाचीं स्थळें सोडलीं तर अद्यापि नाशिक, सातारा, सोलापूर, धुळें, उमरावती, ठाणें, इत्यादि कित्येक स्थळें अशीं राहून गेलीं आहेत कीं, तेथे संमेलनाची एकहि बैठक भरलेली नाही ! तथापि अलीकडे प्रादेशिक संमेलनें भरूं लागलीं आहेत हें लक्षण खचित आशादायक होय.

संमेलनांतूनच महाराष्ट्र साहित्य परिषदेची घटना उद्भवली. त्याचा विचार अन्यत्र केला आहे.

संमेलनें भरतात आणि लागलींच ओसरतात ! सटीचें शिंपडण किंवा वळीवाची झोड

थोडासा गारवा उत्पन्न करते; परंतु 'नेमेचि येणाऱ्या' पावसाळ्याची सर त्यास कधीच येत नाही. आता संमेलनें नेमाने अखंड भरूं लागलीं आहेत. परंतु नुसता पाऊस पडला तरी तेवढ्याने कांही पिकें येत नाहीत; नुसतें रान वाढेल किंवा तण माजेल. पिकें पाहिजे असलीं तर जमिनीची मशागत आणि उत्तम बिवडाची योजना केली पाहिजे!!

एवढें सामान्य निरूपण केल्यावर १९०९ ते १९४० पावेतों भरलेल्या संमेलनांतील कांही लक्ष्य विशेषांचें येथे निरूपण करतों:—

(१) बडोदें (१९०९-१९२१-१९३४), इंदूर (१९१७-१९३५), कोल्हापूर (१९३२) पुणें (१९२६) आणि रत्नागिरी (१९४०) या संमेलनांस श्री. महाराज गायकवाड, श्री. महाराज होळकर, श्री. छत्रपती करवीर, श्री. चीफ् साहेब, इचलकरंजी, आणि श्री. महाराणीसाहेब, रीजंट संस्थान सावंतवाडी यांचा आश्रय मिळाला आणि या संस्थानाधिपतींकडून तेथील अधिवेशनांचा उपक्रम किंवा उद्घाटन झालें. संमेलनांस या अधिपतींचे अनेक परींनी साहाय्य झालें. श्री. महाराज सवाई तुकोजीराव होळकर यांनी **दहा हजार रुपयांची** देणगी महाराष्ट्र-साहित्य-परिषदेस दिली ती मात्र अनन्यसाधारण गणली पाहिजे. याच देणगीमुळे महाराष्ट्र-साहित्य-परिषदेला स्थिरपणा लाभला! त्या इंदूर संमेलनाचें यश संमेलनांच्या इतिहासांत अजरामर राहील. संस्थानाधिपतींचा या कार्याशीं दृढतर संबंध जुळवून आणतां आल्यास ती गोष्ट सर्वथा स्पृहणीय अशीच होईल.

(२) **ठराव**:—पहिल्या संमेलनांतून ठरावांची संख्या फारच थोडी असे. वाटाघाट व चर्चा मात्र पुष्कळच होत असे. नगरास तर ४० ठराव झाले, यामुळे तें संमेलन ठरावसंख्येंत पहिलें लागेल! आजवर संमेलनांच्या अधिवेशनांतून संमत झालेल्या ठरावांचें विषयवार वर्गीकरण करून परिशिष्टरूपानें सर्व ठरावच या साधनविभागास जोडले आहेत. पहिल्या पहिल्या संमेलनांतून देशी भाषांचा शिक्षणांत प्रवेश आणि साहित्य-परिषदेची स्थापना या विषयांवरच भर होता. पहिलीं थोडीं वर्षें मोडी लिपीचा कैवार संमेलनाने घेतला, परंतु आता क्वचित्च कोणी त्याची आठवण काढतो! बाहेरील परिस्थितीचे पडसाद संमेलनांत उठणें अपरिहार्य आहे. इ. स. १९०५ ते १९०८ हीं वर्षें राष्ट्रीय शिक्षणाच्या आंदोलनाचीं होतीं त्यामुळे देशी भाषांचा शिक्षणांतून प्रवेश करण्यावर संमेलनाने जोर दिला आणि देशी भाषा स्वस्थापन्न होईपावेतों गरजेप्रमाणे तो विषय संमेलनापुढे येत राहीलहि. मोडी लिपी मोडण्याचा प्रयत्न बाहेर चालू होता. त्यामुळे तोहि विषय संमेलनांत या काळांत गाजला असला तर नवल नाही.

याच कालांत राजवाडे, खरे, पारसनीस, भावे, पांगारकर प्रभृति संशोधकांचे काव्येतिहाससंशोधन बहारास आलें असल्यामुळे साहित्य-संमेलनांत त्याचा ऊहापोह उत्साहाने व्हावा यांत नवल नाही. राजवाडे यांनी जमविलेल्या साधनांचा एक खंडहि संमेलनाच्या मंजुरीने ५०० रु. तोटा सोसून प्रसिद्ध करण्याची जबाबदारी परिषदेनें उचलली. तोच म. इ. साधनें खंड १० वा हा होय. १९०६-७-८ नंतर राजवाडे पुनरपि साहित्य-संमेलनांत आले नाहीत; १९१० त त्यांनी भा. इ. सं. मंडळाची स्थापना केली. ही घटना जितकी अत्यंत सूचक तितकीच बोधप्रद आहे. मनाशींच विचार केल्यास साहित्य संमेलनें आणि साहित्य-परिषद् यांना या घटनेची मीमांसा खचित दिग्दर्शक होईल.

व्याकरण आणि कोश हीं तर भाषेचीं प्रधान अंगें, तेव्हा त्यांच्यासंबंधी चर्चा संमेलनांतून न होणें हें अपरिहार्य होतें. कोश व्हावा म्हणून बोलणें इ. स. १८८५ च्या संमेलनांतहि निघालेलें आढळतें. पारिभाषिक कोशाचें काम परिषदेनें हातीं घेऊन कांही पल्ला गांठलाहि

होता. पण आमच्या साहित्य-संमेलन-परिषदांची मजल तेथेच खुंटली !! तें काम महाराष्ट्र शब्दकोश मंडळाने नुकतेंच पूर्ण केलें आणि आता पारिभाषिक कोशाचें कार्य हातीं घेतलें आहे ! व्याकरणाची रचना कै. प्रो. दामले यांनी संमेलनाच्या जन्मकाळीं इ. स. १९०९ मध्येच पूर्ण केली. अलिकडील काळांत म. सा. परिषदेने व्याकरण समिति नेमून चालविलेलें कार्य आपणांपुढे आहेच. शुद्धलेखनाचा विषयहि असाच जुना आहे. परिषद् व संमेलन यांनी त्यांसहि नवी चालना दिली आहे. हा विषय विशेषतः त्यांतील अनुस्वारांची अडगळ वगैरे प्रश्नांवर संमेलनांत पुष्कळ रणें माजलीं ! नुकतेच कैलासवासी झालेले या विषयांतील एक कळकळीचे रणझुंजार रा. पावशे यांचें पुष्कळांस दीर्घकाळ विस्मरण होणार नाही !

१९०६-८ च्या काळांत राष्ट्रीयतेचें वारें नुकतेंच जोराने वाहू लागलें होतें. त्याची झुळूक लहानग्या साहित्य संमेलनालाहि लागल्याशिवाय राहिली नाहीं. पुण्यास मळेकरांच्या छोट्याशा दिवाणखान्यांत भरलेल्या सभेंत मुंबई विद्यापीठांत मराठीचा जो दुटोकी अल्पसा प्रवेश झाला होता त्याहून सर्व विद्यापीठमंदिरांतच मराठीचा सर्रास प्रवेश व्हावा अशी मागणी करतांना सदर विद्यापीठाचे आभार मानावे असा जो ठरावांत एक भाग होता त्याला त्या वेळीं जोराचा विरोध झाला तो या झुळुकीचाच परिणाम होय. आभारहि नको आणि निषेधहि नको अशी रा. नरसोपंतांची मध्यस्थी संमेलनाने मान्य केली आणि "या वादाच्या ठिणग्या या हॉलाच्या बाहेर जाणार नाहीत" अशी आशा कै. लो. टिळक यांनी प्रकट केली. या वाऱ्याचा जोर आक्षिप्त वाङ्मयाच्या प्रश्नाचे वेळीं चांगलाच जाणवतो आणि अलीकडील मुंबई व नगर संमेलनांतून युद्धवाङ्मयाविषयी जी खणाखणी झालेली दिसली तेंहि यांचेंच फळ ! बाहेरील मोकळी हवा योग्य प्रमाणांत सेवन करणें आरोग्यप्रदच होतें असा अनुभव आहे ! अेकापरी आमचीं संमेलनें म्हणजे आमच्या साहित्यसेवकांना जरा मोकळ्या वाऱ्यांत फेरफटका करण्याचीं साधनेंच नव्हेत काय !

कोणाला वाटेल की श्लील-अश्लील-वादाचा आखाडा आमच्या साहित्यसंमेलनांत नवीनच अुघडला आहे म्हणून ! परंतु इ. स. १८८५ च्या संमेलनाचें जें वृत्त या ग्रंथांत नवीनच छापलें आहे तें वाचल्यावर खात्री होअील की, "बीभत्स ग्रंथ होत" आहेत... अशा "ग्रंथप्रसिद्धीस मॅजिस्ट्रेटाकडून कायद्याप्रमाणें प्रतिबंध झाला पाहिजे" अशी सूचना त्या संमेलनांत आली होती आणि हिचे जनक कोणी निबंधमालाकार नव्हते तर त्या वेळचे पुरोगामी "लोकहितवादी" हे होते हें कळून कांहीसें कौतुक वाटेल यांत आम्हांस संदेह नाही !

निधि आपणांस आज पाहिजे आहे आणि १८८५ तल्या आपल्या पूर्वजांना तो नको होता असें थोडेंच आहे ! हजारांच्या, लाखांच्या, कायमनिधीच्या, प्रतिवर्षी संमेलनें भरविण्याच्या वगैरे साऱ्या कल्पना त्यांच्याहि डोक्यांत घोळत होत्या ! तात्पर्य, कल्पनांची अुणीव नव्हती. आपण जुन्या कल्पनांत कांही भरहि टाकली आहे; आणखी हवीतेवढी टाकतां येअील. पण कै. लो. टिळक यांनी १९०६ सालीं संमेलनांत म्हटलें तेंच खरें की— केवळ अुत्कट अिच्छेने कामें होत नसतात, त्यासाठीं कर्ते पुरुष पुढें यावे लागतात ! १९०६ सालींच पहा ना– टिळकांनी सांगितलें की मराठी कोशासाठी दहा हजार रुपये देण्यास सरकार तयार आहे, अितर मदतीस आपण तयार आहों ! दाता होता पण प्रतिगृहीता नव्हता ! आणि परवा महाराष्ट्र विद्यापीठासाठी दहालाख देणारा अुदार महात्मा निघाला तेव्हाहि घेणारा कचकरला !! आमच्या प्रगतीचें घोडें येथेच पेंड खातें !! घोडें आहे, पेंड आहे, पण आमचा चाबूकस्वार कोठे आहे !

१८७८ त माधवरावांनी ग्रंथकारांस प्रथम जमविलें. पुढे १९०६।७ सालापासून ग्रंथकारांचें संमेलन हें ग्रंथकारांचें आणि लेखकांचें संमेलन झालें. पुढे त्यांत साहित्यप्रेमी जनांस पाचारण होऊं लागलें आणि आता या मेळाव्यांत प्रेक्षकांची गर्दीहि सोडण्यांत येते. गल्ला पुष्कळ जमूं लागला तरी रुपये अधेल्या आणि चवल्या पावल्या किंवा ढब्बू शिवराओ यांची वेगवेगळी मोजदाद करून जमाखर्च ठेवला-पाहिला नाही तर व्यवस्थित व्यापार कसा साधणार?

पहिल्या संमेलनाला किती ग्रंथकार जमले असतील? आंकडा माहित नाही! पण बेडकीचें पोट फुगविलें तरी किती फुगणार? पहिल्या राष्ट्रीयसभेला लहानसा दिवाणखानाहि मोठाच पडला! आताशा अिकडे हजारों तर तिकडे लाखों लोकांचा मेळा जमतो!! पण लोकांचा प्रचंड जमाव कांही छोट्या करोल फौजेची बरोबरी करूं शकणार नाही. पायदळ, घोडदळ, विमानदळ, अशी सेना सज्ज करून, वाटून, प्रसंगाप्रमाणे शिस्तीने चालवून, ब्यूह रचला तरच यशःसिद्धि पदरांत पडण्याची आशा. तें आता करावयाची वेळ आली नाही काय?

संकलनांतच थोडें समालोचन उरकून घेत आहे! पण ग्रंथ लिहावयाचा परिषदेसाठी हें ध्यानांत ठेवून मुळाकडे मुरडलें पाहिजे.

संमेलनप्रसंगाने स्वरचित कविता म्हणण्याचा किंवा वाचून दाखविण्याचा प्रारंभ मुंबईच्या संमेलनांत अि. स. १९१५ त झाला. पुढे (१९२१) बडोद्यास भर बैठकींत सुमंत, यशवंत, देशपांडे, गुणे प्रभृति कवि चमकले!! झालें. कवींची पकड पक्की बसली!! पण दहा पंधरा वर्षांपूर्वी मळेकरांच्या वाड्यांत पुण्यास पांगारकर-भावे अेक बाजू आणि दामले-केळकर दुसरी बाजू अशी जुन्या नव्या पक्षांची लढत लागली होती!! कारण काल पुढे जात होता, नव्हे, सर्वांस नेत होता!

ग्रंथपरीक्षणें व्हावीं, मासिक पुस्तक काढावें, ग्रंथसंग्रह करावा, एजंट अथवा खपल्ये योजावे, इतकेंच काय, पण अलीकडे सावरकर नि पटवर्धन यांच्यामुळे गाजलेला भाषाशुद्धीचा प्रश्न हे प्रश्न कांही संमेलनाला नवे नव्हते असें १८८५ च्या वृत्तावरून दिसून येअील! या संमेलनाला रेवरेंड नीळकंठशास्त्री ऊर्फ नेहेमिया गोरे आणि सोकर बापुजी त्रिलोकेकर यांनी सूचना पाठविल्या होत्या की "पारशी उर्दू शब्द वापरूं नयेत" आणि "आपल्या मराठी भाषेंतून यावनी शब्द काढून टाकावेत!!" माधवराव पटवर्धन जो अेक श्लेष काढीत तो देखील या संमेलनांत वे. गणेशशास्त्री मावळंकर यांनी काढला होता की "मूळ मराठी शब्द कायम ठेवावे"!! हिंदी, हिंदुस्थानीसारखी अेकभाषा करावी हा प्रश्न तरी नवा वाटतो ना? पण छे, या १८८५च्या सभेला बडोद्याहून 'हिंदुस्थानीमध्ये' सूचना जाऊन पोचली होती कीं 'सर्व देशांत सारखी भाषा चालेल (लिंग्वा फ्रांका) असा कांही प्रयत्न झाला पाहिजे"! आपण सांप्रत ठरविलें आहे की अेक हजार सभासद परिषदेचे झाल्यावर मग पुढला विचार करूं; पण हा संकल्प तर संमेलन जन्माला आलें त्याच वर्षी आमच्या लोकहितवादींनी आणि सर्वज्ञ माधवरावांनी सोडला होता! फरक अितकाच की आम्ही आज तीन रुपये सालावर संतुष्ट आहोंत आणि हे आमचे पुढारी पांच रुपयांची अुमेद धरून होते! या वेळची अेखादी शिलकी सूचना सांगावयाची म्हटली तर "सर्व ग्रंथकर्त्यांनी आपापले ग्रंथ निदान निमे किंमतीस आपल्या ग्रंथकारबांधवांस द्यावे" या एकनाथपंत भांडारे यांच्या सूचनेकडे बोट दाखवितां येअील.

महाराष्ट्र विद्यापीठाचा ठराव बडोद्यास १९२१ सालीं प्रथम संमत झाला. तेव्हापासून बहुधा प्रतिवर्षी या विषयावर ठराव होत असतो. होतील त्याला अुणींपुरीं वीस वर्षें! अेक पिढी निघून गेली म्हणा ना! पण विद्यापीठाच्या स्थापनेची मागणी काँग्रेस सरकारालाहि "स्मॉल् सेक्शन्"

ची मागणी म्हणावीसें वाटत आहे ! !

संमेलनाच्या बैठकी जेथे भरतात तेथले स्थानिक विषय संमेलनांत त्या त्या वेळीं पुढे येणें हें साहजिकच आहे. संमेलनाच्या पुष्कळ बैठकी आमच्या देशी संस्थानांतून भरलेल्या आहेत. त्या त्या संस्थानांत मराठी भाषेच्या उन्नतीला प्रतिबंधक असणारे निर्बंध दूर व्हावे आणि तिच्या पोषणास साहाय्य व्हावें अशा अर्थाचे ठराव अनेकवार आलेले आहेत. विशेषतः निजामी मराठवाडा आणि फिरंगाणी गोमांतक या राज्यांतून मराठीच्या अभिवृद्धीस आणि क्वचित् प्रसंगीं तिच्या अस्तित्वासहि बाधक असे जे प्रकार आढळले त्यांस अनुलक्षून बरेच ठराव झालेले आहेत. यांतच देशी-मराठी भाषांचें शिक्षण आणि देशी भाषेंतून शिक्षण यांवरील ठरावांचा समावेश होतो. या ठरावांचा प्रत्यक्ष उपयोग कितीसा झाला म्हणून पाहिलें तर कांही नाहीच म्हटलें तरी चालेल ! कदाचित् मराठीच्या पोषणास नवीन प्रतिबंध होण्याचें थांबलें किंवा मंदावलें असेल अथवा तो प्रतिबंध घालतांना चलाखी आणि काळजी दाखविण्यांत येऊं लागली असेल इतकेंच ! निजामी आणि फिरंगाणी रियासतींची गोष्ट सोडा. ज्या आमच्या इंदूर-ग्वालेरसारख्या अस्सल मराठी संस्थानांत मराठीस कांही द्रव्योत्तेजन मिळत असे तेथे त्याचा ओघ खंडित झाल्यावरून संमेलनाने विनंति करून पाहिली तर तीहि कांही विशेषशी सफल होऊन अभिनंदनाचे प्रसंग बुद्धवल्याचेंहि आपणांस आढळून येणार नाही ! घरींच आमची ही असली प्रतिष्ठा आहे तर मग दारची गोष्ट काय बोलावी !

संमेलन मराठी साहित्याचें आणि त्यांत ठराव पाहावे तर अमक्या परीक्षेला मराठी हा विषय ठेवा, तमक्या परीक्षेंत सन्मानशाखा सुरू करा असे शिक्षणपरिषदेस अधिक शोभणारेच पुष्कळ ! बरें, आलेत तर येवोत. पण त्यांचाहि परिणाम काय लागला ! आणि जो लागला त्यांत अभिनंदनार्ह जें आहे त्याचा वांटा संमेलनाकडे हक्काचा किती आणि बाहेरील जागृतीस किती ! प्रांजळ व न्यायाचें उत्तर हेंच येऊील की, या प्रकरणींहि अल्पस्वल्प यश पदरीं पडलें आहे त्यांत संमेलनाच्या वांट्याला शेवटचा नसला तरी पहिला मान तरी खास नाही ! जेथे संमेलनाचे ठराव नुसते दप्तरीं धूळ खात पडून राहावयाचे; नव्हे, तें दप्तर तर राहो पण धूळहि हातीं येण्याचीं देखील जेथे बरींच वर्षें वानवा होती, तेथे यशाचा वांटा पदरीं येऊील कोठून ! अलीकडे दप्तर लागलें काहे, धूळ तर नांवालाहि उरलेली नाही आणि ठरावांची पोचवणी बिनचूक होऊं लागली आहे तेव्हा भूतकाळीं जें मिळालें नाही तें भविष्यकाळीं आपणांस लाभेल असा विश्वास उत्पन्न झालेला आहे. आपलें काम आता हा विश्वास टिकविण्याचें आणि वाढविण्याचें आहे.

आजवर अेकंदर सुमारें तीनशें ठराव आमच्या साहित्यसंमेलनांतून आम्हीं संमत केलेले आढळतात. यांत मागे सांगितलेले विषय तर आहेतच. शिवाय मुलांमुलींचें शिक्षण, साहित्यिकांचा बहुमान, जनताशिक्षण, ग्रंथसंग्रह व वाचनालयें इत्यादि सर्वमान्य विषयांच्या जोडीला सदभिरुचिप्रवर्तनाविषयी ठराव, वाङ्मयनिर्बंधदूरीकरणाविषयीचे ठराव अशा महत्त्वाच्या विषयांवरहि ठराव झालेले आहेत. जीवन आणि वाङ्मय यांचा निकट संबंध स्पष्ट करणारे ठराव अलीकडे संमेलनांत येऊं लागले आहेत आणि त्यांच्या चर्चेमुळे संमेलन हें शिळोप्याच्या राज्यांत न राहतां जीवनाच्या स्वराज्याशीं अखंड सांगड जोडील असें सुखमय भविष्य दृष्टीस दिसूं लागूं लागलें आहे.

संमेलनांचे पायीं आजवर सुमारें एक लाखाजवळ रुपये खर्चीं पडले असा हिशेब निघतो. यापैकी उणेपुरे वीस हजार कांही स्थायी कार्याकडे खर्च झाले. बाकी सर्व भाषणभोजनांतच उडाले ! परिषदेच्या वांट्याला त्यांतले आले अजमासें दोन हजार ! ! चर्च्य व्हावयास पाहिजे

तर पैसा देखील पाहिजे. आधी पैसा की आधी कार्य, या प्रश्नाचें उत्तर आधीं कार्य असेंच अनुभव देत आला आहे. 'वाचमर्थोऽनुधावति' जसा, तसाच 'कार्यमर्थोऽनुधावति' असाहि दुसरा सिद्धान्त तितकाच सत्य ठरेल.

संमेलनांच्या निमित्ताने जागजागीं मराठीविषयी सहानुभूति व जागृति होत आली आहे एवढें यश मात्र संमेलनांचेंच आहे. म्हटलेंच तर प्राप्तपरिस्थितींत तेंहि कांही तुच्छ नाही. पण अधिक भरीव यशाची प्राप्ति संमेलनांकडे ओढून आणणें आपलें सर्वांचें कर्तव्य आहे.

परिशिष्ट ८– म. सा. संमेलन – शकावली (निराळी जोडली आहे ती पाहावी.)

परिशिष्ट ९ वें

महाराष्ट्र-साहित्य-संमेलनांतील वर्गीकृत ठराव

(इ. स. १९१५ ते १९३९ अखेर)

[संमेलनांतील ठरावांची वर्गीकृत यादी पुढे दिली आहे. वर्गीकरण करतांना ठरावांचा भाषाच तेवढी लक्षांत घेऊन भागणार नाही, मुख्य रोखहि ध्यानांत घेतला पाहिजे. कित्येक ठराव मूळांतच मिश्र स्वरूपाचे आहेत. ते एकाहून अधिक वर्गांत पडण्यासारखे आहेत. वर्गसंख्या मर्यादित करणेंहि सोईच्या दृष्टीने आवश्यकच आहे. या यादींत ठरावांस **धांवता अनुक्रमांक** घातला आहे. प्रत्येक वर्गाच्या पोटांतले ठराव **वर्षवारीने** दिले आहेत. पण पुनः विषयवार पोटविभाग एका दृष्टीने अधिक सोईस्कर झाले असते तरी तसें करणें शक्य झालें नाही. —संपादक.]

ठराव

[१] महाराष्ट्र-साहित्य-परिषद्

*या वर्गांत म. सा. परिषद्-स्थापना, परिषद्-संमेलन, घटना, परिषदेस साहाय्य इ. ठराव घेतले आहेत.

(१) (१) वंगीय साहित्य-परिषदेचे नियम जरूर ते फेरफार करून महाराष्ट्र-साहित्य-परिषदेस लागू करावे.

(२) हे नियम परिषदेचे सेक्रेटरी, बडोद्याच्या स्वागत-कमिटीचे व सद्विचारणी सभेचे सेक्रेटरी व आजपर्यंतच्या परिषदांचे अध्यक्ष यांच्या कमिटीने तपासावे.

(३) नियम तयार होतांच ते प्रसिद्ध करावे; व पुढील मे महिन्यांत ते मंजूर करून घ्यावे. हें काम मे महिन्याच्या आंत झालेंच पाहिजे.

(४) ऐतिहासिक कागदपत्रें व जुन्या कवींचीं ऐतिहासिक काव्यें, यांचें प्रकाशन व संरक्षण, शास्त्रीय विषयांची परिभाषा, मराठी कोशाची सामग्री इत्यादि कामें परिषदेस करावयाचीं आहेत. त्यासाठी पुष्कळ द्रव्यसाहाय्य लागेल म्हणून द्रव्यनिधि (फंड) जमा करण्याचें काम हातीं घ्यावें.

(५) साहित्य-परिषदेच्या कामाकरिता तूर्त दोन हजार फंड उभारावा. हा फंड परिषदेच्या हवालीं करण्यांत यावा व परिषदेने सुव्यवस्थित रीतीने आपलें काम करावें (बडोदें, १९ ...

सं. क्रमांक	संमे	खर्च	संमेलनाकडून परिषदेकडे	† प्रतिनिधि-संख्या	संमेलन ठराव संख्या
१	१८७८;	...	...	...	...
२	१८८५;	...	...	५५	४
३	१९०५,	...	...	...	...
४	१९०६;	...	...	...	४
५	१९०७;	...	...	...	५
६	१९०८;	...	...	...	...
७	१९०९;	...	...	...	...
८	१९१२;	...	...		२
९	१९१५;	१४३४-७-०	सर्व शिल्लक	स्वा.२०८+!	१५
१०	१९१७;	...	...	...	६
११	१९२१;	३४००-०-०	०-०-०	२४४	१२
१२	१९२६:	...	...	स्वा.५४+!	१८
१३	१९२७;	१५५९-१२-०	०-०-०	४३२	२६
१४	१९२८;	८९९२-५-०!	०-०-०	१४४	१९
१५	१९२९;	*४२७६-१२-०	*५०-०-०	१०३६	२५
१६	१९३०;	७५४६-३-०	१००-०-०	७१७	१३
१७	१९३१;	*५५३३-१५-१०	*२५०-०-०	३८३	१३
१८	१९३२;	९१४४-८-३	६००-०-०	१२९४	२३
१९	१९३३;	*३३०९-४-३	*२००-०-०	८२५	१२
२०	१९३४;	४९९९-१४-०	२००-०-०	४४५	२३
२१	१९३५;	७५४८-१५-०	२०१-०-०	७८०	२०
२२	१९३६;	*१८११-४-०	*१०१-०-०	३६४	१८
२३	१९३८;	७७४३-१०-७	२००-०-०	१५१६	१९
२४	१९३९;	*२०६१-१२-९	...	४५४	४०
२५	१९४०;	...	...	...	२५

समाविष्ट आहे.

महाराष्ट्र स

तर पैसा देखील पाहिजे. आधी पैसा की आधी कार्य, या प्रश्नाचें उत्तर आधीं कार्य असेंच अनुभव देत आला आहे. 'वाचमर्थोऽनुधावति' जसा, तसाच 'कार्यमर्थोऽनुधावति' असाहि दुसरा सिद्धान्त तितकाच सत्य ठरेल.

संमेलनांच्या निमित्ताने जागजागीं मराठीविषयी सहानुभूति व जागृति होत आली आहे एवढें यश मात्र संमेलनांचेंच आहे. म्हटलेंच तर प्राप्तपरिस्थितींत तेंहि कांही तुच्छ नाही. पण अधिक भरीव यशाची प्राप्ति संमेलनांकडे ओढून आणणें आपलें सर्वांचें कर्तव्य आहे.

परिशिष्ट ८– म. सा. संमेलन – शकावली (निराळी जोडली आहे ती पाहावी.)

परिशिष्ट ९ वें

महाराष्ट्र-साहित्य-संमेलनांतील वर्गीकृत ठराव

(इ. स. १९१५ ते १९३९ अखेर)

[संमेलनांतील ठरावांची वर्गीकृत यादी पुढे दिली आहे. वर्गीकरण करतांना ठरावांचा भाषाच तेवढी लक्षांत घेऊन भागणार नाही, मुख्य रोखहि ध्यानांत घेतला पाहिजे. कित्येक ठराव मूळांतच मिश्र स्वरूपाचे आहेत. ते एकाहून अधिक वर्गांत पडण्यासारखे आहेत. वर्गसंख्या मर्यादित करणेंहि सोईच्या दृष्टीने आवश्यकच आहे. या यादींत ठरावांस **धांवता अनुक्रमांक** घातला आहे. प्रत्येक वर्गाच्या पोटांतले ठराव **वर्षवारीने** दिले आहेत. पण पुनः विषयवार पोटविभाग एका दृष्टीने अधिक सोईस्कर झाले असते तरी तसें करणें शक्य झालें नाही. —संपादक.]

ठराव

[१] महाराष्ट्र-साहित्य-परिषद्

*या वर्गांत म. सा. परिषद्-स्थापना, परिषद्-संमेलन, घटना, परिषदेस साहाय्य इ. ठराव घेतले आहेत.

(१) (१) वंगीय साहित्य-परिषदेचे नियम जरूर ते फेरफार करून महाराष्ट्र-साहित्य-परिषदेस लागू करावे.

(२) हे नियम परिषदेचे सेक्रेटरी, बडोद्याच्या स्वागत-कमिटीचे व सहविचारणी सभेचे सेक्रेटरी व आजपर्यंतच्या परिषदांचे अध्यक्ष यांच्या कमिटीने तपासावे.

(३) नियम तयार होतांच ते प्रसिद्ध करावे; व पुढील मे महिन्यांत ते मंजूर करून घ्यावे. हें काम मे महिन्याच्या आंत झालेंच पाहिजे.

(४) ऐतिहासिक कागदपत्रें व जुन्या कवींचीं ऐतिहासिक काव्यें, यांचें प्रकाशन व संरक्षण, शास्त्रीय विषयांची परिभाषा, मराठी कोशाची सामग्री इत्यादि कामें परिषदेस करावयाचीं आहेत. त्यासाठी पुष्कळ द्रव्यसाहाय्य लागेल म्हणून द्रव्यनिधि (फंड) जमा करण्याचें काम हातीं घ्यावें.

(५) साहित्य-परिषदेच्या कामाकरिता तूर्त दोन हजार फंड उभारावा. हा फंड परिषदेच्या हवालीं करण्यांत यावा व परिषदेने सुव्यवस्थित रीतीने आपलें काम करावें (बडोदें, १९[illegible]

परिशिष्ट ८ वें

महाराष्ट्र-साहित्य-संमेलनें — अधिवेशनांची शकावली

सं. क्रमांक	संमेलनवर्ष व दिवस	सं. स्थळ	सं. संयोजक संस्था	सं. स्वागताध्यक्ष	संमेलनाध्यक्ष	जमा	खर्च	संमेलनाकडून परिषदेकडे	† प्रतिनिधि-संख्या	संमेलन ठराव संख्या
१	१८७८; ११ मे	पुणें	.....	—	रावब. म. गो. रानडे	...	...	...	...	...
२	१८८५; २८ मे	,,	आठ निमंत्रक	—	वे. कृष्णशास्त्री राजवाडे	...	...	...	५५	४
३	१९०५, मे	सातारा	...	—	रा. रघुनाथ पाण्डुरंग करंदीकर	...	...	...	...	...
४	१९०६; २६ व २७ मे	पुणें	महाराष्ट्र साहित्य परिषद्	—	रावसा. गोविंद वासुदेव कानिटकर	...	...	...	...	४
५	१९०७; १८ व ३१ मे	,,	,,	—	रावब. विष्णु मोरेश्वर महाजनी	...	...	...	...	५
६	१९०८; ३० व ३१ मे	,,	,,	रा. वासुदेव गोविंद आपटे	रावब. चिंतामण विनायक वैद्य	...	...	...	...	...
७	१९०९; २३ व २४ ऑक्टोबर	बडोदें	सहविचारिणी सभा	श्री. बॅ. संपतराव गायकवाड	ले.क. कान्होबा रणछोडदास कीर्तिकर	...	...	...	...	...
८	१९१२; २९ ते ३१ ,,	अकोलें	म. सा. परिषद्	रावब. वि. मो. महाजनी	रा. हरि नारायण आपटे	...	...	...		२
९	१९१५; १६,१७,१८ मे	मुंबई	,,	सर मालचंद्र कृष्ण भाटवडेकर	श्री. सर गंगाधरराव पटवर्धन	१९१८-८-०	१४३४-७-०	सर्व शिल्लक	स्वा.२०८+१	१५
१०	१९१७; ९,१०,११ मार्च	इंदूर	,,	जनरल गोविंदराव मतकर	रावब. गणेश जनार्दन आगाशे	...	...	...	...	६
११	१९२१; २६ ते २८ नोव्हेंबर	बडोदें	सहविचारिणी सभा	श्री. संपतराव गायकवाड	श्री. नरसिंह चिंतामण केळकर	५०००-०-०	३४००-०-०	०-०-०	२४४	१२
१२	१९२६: ३।४।५ मे	मुंबई	महाराष्ट्र साहित्य परिषद्	रावब. पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी	रावब. माधवराव विनायक किबे	...	...	...	स्वा.५४+१	१८
१३	१९२७; २२,२३,२४ मे	पुणें	श्री महाराष्ट्र शारदा मंदिर	श्री. न. चिं. केळकर	श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर	१५५९-१२-०	१५५९-१२-०	०-०-०	४३२	२६
१४	१९२८; ७,८,९ एप्रिल	ग्वालेर	श्री माधव वाङ्मय मंडळ	श्री. चिं. वि. वैद्य	श्री. माधव श्रीहरि अणे	८९९२-५-०	८९९२-५-०†	०-०-०	१४४	१९
१५	१९२९; २६,२७,२८ मे	बेळगांव	वाङ्मय चर्चा मंडळ	दि.ब. अण्णा बाबाजी लठ्ठे	श्री. शिवराम महादेव परांजपे	७०१७-११-०	*४२७६-१२-०	*५०-०-०	१०३६	२५
१६	१९३०; ३,४,५ मे	मडगांव	गोमं. साहित्य सेवक मंडळ	श्री. शांबाराव सरदेसाई	प्रो. वामन मल्हार जोशी	७५६२-३-०	७५४६-३-०	१००-०-०	७१७	१३
१७	१९३१; ७,८,९ मे	द. हैदराबाद	दक्षिण साहित्य संघ व मराठी ग्रंथसंग्रहालय	बॅ. धुंडिराज रायराया बहादुर	डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर	६४५१-१२-६	*५५३३-१५-१०	*२५०-०-०	३८३	१३
१८	१९३२; २७ ते २९ डिसेंबर	कोल्हापूर	नगर वाचन मंदिर	रावब. दत्तोबा मा. भोंसले	श्री. सयाजीराव महाराज गायकवाड	१०४५०-५-९	९१४४-८-३	६००-०-०	१२९४	२३
१९	१९३३; २५ ते २७ डिसेंबर	नागपूर	नॅशनल लायब्ररी	श्री. भवानी शंकर नियोगी	श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर	७१७७-१३-६	*३३०९-४-३	*२००-०-०	८२५	१२
२०	१९३४; २५ ते २७ डिसेंबर	बडोदें	सहविचारिणी सभा	जनरल नानासाहेब शिंदे	रावसा. नारायण गोविंद चापेकर	६६०८-८-०	४९९९-१४-०	२००-०-०	४४५	२३
२१	१९३५; २६ ते २८ डिसेंबर	इंदूर	साहित्य सभा	श्री. विक्रमसिंहराव पवार	श्री. बाळासाहेब पंतप्रतिनिधि	१४२०९-११-३	७५४८-१५-०	२०१-०-०	७८०	२०
२२	१९३६; १०,११ नोव्हेंबर	जळगांव	साहित्यसेवा मंडळ	सौ. आनंदीबाई शिर्के	श्री. प्रो. माधव व्यंबक पटवर्धन	२६०४-२-०	*१८११-४-०	*१०१-०-०	३६४	१८
२३	१९३८; १५ ते १७ एप्रिल	मुंबई	मुं. मराठी साहित्यसंघ	न्या. डॉ. मुकुंद रामराव जयकर	बॅ. विनायक दामोदर सावरकर	९३६६-१२-०	७७४३-१०-७	२००-०-०	१५१६	१९
२४	१९३९; ८,९,१० एप्रिल	अहमदनगर	वाङ्मयोपासक मंडळ	रावब. नरहर बाळकृष्ण देशमुख	प्रो. दत्तो वामन पोतदार	२३६७-३-६	*२०६१-१२-९	...	४५४	४०
२५	१९४०; ४,५,६ मे	रत्नागिरी	मराठी वाङ्मय मंडळ	श्री. भार्गवराम विठ्ठल वरेरकर	प्रो. नारायण सीताराम फडके	...	...	...	...	२५

* म. सा. परिषदेकडे दिले[illegible]ये दिलेल्या या खर्चांत समा[illegible]

† प्रतिनिधिसंख्येतच स्वागतसभासदसंख्याहि समाविष्ट आहे.

सं. क्रमांक	संमेलनवर्ष व दिवस	सं. स्थळ	सं. संयोजक संस्था	सं. स्वागताध्यक्ष	संमेलनाध्यक्ष	जमा	खर्च	संमेलनाकडून परिषदेकडे	प्रतिनिधि-संख्या	संमेलन ठराव संख्या
२६	१९४०; ४,५,६ मे	रत्नागिरी	मराठी वाङ्मय मंडळ	श्री. भार्गवराम विठ्ठल वरेरकर	प्रो. नारायण सीताराम फडके	५२८८-१५-९	४७४८- १-३	१००-०-०	५९०	२५
२७	१९४१; १२,१३,१४ एप्रिल	सोलापूर	साहित्य सेवा मंडळ	श्री. रतनचंद हिराचंद	श्री. विष्णु सखाराम खांडेकर	५७७१-११-०	४७७०-११-०	२००-०-०	७५९	२८
२८	१९४२; ३०,३१ आक्टो. व १ नोव्हेंबर	नाशिक	महाराष्ट्र नाट्य मंदिर	श्री. वामन श्रीधर पुरोहित	आचार्य प्रल्हाद केशव अत्रे	आंकडे अद्यापि	प्रसिद्ध	झाले	नाहीत	१९ खाली तेरीज पाहा

परिशिष्ट ८— पुरवणी

परिशिष्ट ८ छापून झालें तीन वर्षांपूर्वी, रत्नागिरी संमेलनाचा अहवाल छापून प्रसिद्ध होण्यापूर्वी. त्यानंतर सोलापूर व नाशिक येथील संमेलनांचीं अधिवेशनें भरलीं. सोलापूर सं.चा अहवाल छापून प्रसिद्ध झाला आहे; नाशिकचा अद्यापि नाही. मागील पानावर दिलेला तक्ता आजतागायत आणून पुरा करणें आता अवश्य झाल्यामुळे ही पुरवणी जोडावी लागली. एवीतेवी पुरवणी जोडावयाचीच तर कांही नवीन माहिती नोंदणें, चुका शुद्ध करणें हेंहि काम साधेल तोवर उरकून घेणें युक्त वाटलें. तक्त्यांतील १९०५ तील सातारा संमेलनाच्या तारखा १७ ते २० मे समजाव्या (परिशिष्ट १० आणि १६)

मागील तक्त्यांत संमेलन क्रमांकांच्या कोष्टकांत जे क्रमांक दिले त्यांत आता परिशिष्ट १७ प्रमाणे क्रमांतर करणें भाग आहे. या क्रमांतरास अनुसरून १८८१ ची सभा किंवा संमेलन दुसरें होईल आणि मग पुढील क्रमांक एकाने वाढत वाढत रत्नागिरीचा २५ ऐवजीं २६ होईल. रत्नागिरीविषयीचें कोष्टक आतां संपूर्ण भरणें शक्य झालें असल्यामुळे पुनः रत्नागिरीच प्रथम घेऊन पुरवणी तक्ता पुरा केला आहे.

परिशिष्ट ८ मधील तक्त्यांत शेवटच्या रकान्यांत दिलेले ठरावांचे आंकडे चार दोन ठिकाणीं चुकले आहेत. म्हणून येथे १९०९ ते १९४२ पावेतो भरलेल्या सर्व संमेलनांतील ठरावांची तेरीज देत आहों. वर्गीकृत ठरावांत दुखवट्याचे ठराव आम्हीं घेतलेले नाहीत. शिवाय ठरावाची भाषा स्पष्ट न देतां वा क्रमांक न देतां जे आभार-निमंत्रणासारखे ठराव कांही संमेलनवृत्तान्तांतून उल्लेखिलेले आहेत त्यांचेंहि परिगणन मोघमपणामुळे आम्हीं वर्गीकृतांत केलें नाही.

१९०९-१९४२ पावेतोच्या संमेलन ठरावांचें तेरीज

क्रमांक	वर्ष	ठ.संख्या	पैकी दुख.ठ.	क्रमांक	वर्ष	ठ.संख्या	पैकी दुख.ठ.
(८)	१९०९ बडोदा	२-	०	(१९)	१९३२ कोल्हापूर	२३-	१
(९)	१९१२ अकोला	२-	०	(२०)	१९३३ नागपूर	१२ स्वतंत्र नाही	
(१०)	१९१५ मुंबई	१५-	१	(२१)	१९३४ बडोदें	२३-	१
(११)	१९१७ इंदूर	७-	१	(२२)	१९३५ इंदूर	२०-	१
(१२)	१९२१ बडोदा	१२-	१	(२३)	१९३६ जळगांव	१७-	२
(१३)	१९२६ मुंबई	१८-	१	(२४)	१९३८ मुंबई	१९-	१
(१४)	१९२७ पुणें	२६-	१	(२५)	१९३९ अहमदनगर	४०-	३
(१५)	१९२८ ग्वालेर	२५-	१	(२६)	१९४० रत्नागिरी	२५-	३
(१६)	१९२९ बेळगांव	२५-	१	(२७)	१९४१ सोलापूर	२८-	२
(१७)	१९३० मडगांव	१३-	१	(२८)	१९४२ नाशिक	१८-	१
(१८)	१९३१ हैदराबाद	१५-	१		एकूण ठराव	३८५-२४=३६१	

सदरचे ३६१ ठराव सर्व वर्गीकृत करून साधनविभागांत छापले आहेत ते येणेंप्रमाणे:—क्रमांक १-२८९ = परिशिष्ट ९ (पुरवणी व खुलासा); क्रमांक २९०-३५५ = परिशिष्ट १८; क्रमांक ३५६-३६१ परिशिष्ट २४ वें.

(२) महाराष्ट्र-साहित्य-परिषदेची कायमची रचना करण्यासंबंधाने बडोदें येथे नेमलेल्या कमिटीने जी योजना तयार केली आहे, तींत अवश्य ते फेरफार करून *पुढील योजना तयार करण्यांत आली आहे. या योजनेप्रमाणे महाराष्ट्र-साहित्य-परिषदेची योजना तयार करण्यांत यावी. (अकोला, १९१२). * ही योजना अकोलें संमेलनवृत्तास जोडलेली आहे. (सं.)

(३) महाराष्ट्रांतील आणि त्याचप्रमाणे मराठी मातृभाषा असलेला लोकसमूह ज्या प्रांतांत किंवा एतद्देशीय संस्थानांत कायमची वस्ती करून राहिला आहे तेथे साहित्य-परिषदेच्या पोट-संस्था किंवा भगिनी-संस्था, प्रत्येक जिल्हानिहाय निदान एक तरी, अशा स्थापिल्या जाव्या, आणि प्रत्येकीच्या जोडीला एक एक महाराष्ट्र-ग्रंथसंग्रहालय असावें, असें या सभेचें मत आहे. (मुंबई, १९१५).

(४) साहित्य परिषदेनें खालील कामें हातीं घ्यावीं असें ह्या परिषदेचे मत आहे :—

[अ] महाराष्ट्र भाषेचा (जुन्या आणि नव्या) सर्वांगपूर्ण कोश अधिकारयुक्त रीतीनें सरकारच्या आश्रयाने तयार करविणें.

[आ] जुन्या महाराष्ट्र कवींचें संक्षिप्त चरित्र देऊन, त्यांच्या कवितांतील निवडक वेंचे देऊन एक पुस्तकमाला तयार करणें.

[इ] आधुनिक काळांतील सुप्रसिद्ध ग्रंथकार व कवि परलोकवासी झाले आहेत त्यांचें संक्षिप्त चरित्र प्रसिद्ध करणें व त्यांच्या लेखांची समग्र अथवा संक्षिप्त पुनरावृत्ति काढणें.

[इ] सर्व शिक्षण मातृभाषांतून दिलें जावें हें ध्येय उत्तम रीतीने साध्य होण्यासाठीं देशी भाषेंत उच्च शिक्षणास योग्य असे शास्त्रीय विषयावर ग्रंथ लिहून प्रसिद्ध करणें.

[उ] मराठी भाषेचा एक चांगला इतिहास तयार करविणें. मराठी भाषेची उन्नति आजपर्यंत कसकशी होत गेली, मराठी भाषेंत आजपर्यंत कोणकोणते ग्रंथ झाले, त्या त्या वेळीं समाजाची काय स्थिति होती व या ग्रंथांनी समाजाला कोणतें वळण लाविलें, यांचें विस्तृत वर्णन त्यांत असावें, (मुंबई, १९१५).

(५) *वर सांगितलेलीं कामें आणि महाराष्ट्र वाङ्मयाच्या उन्नतीसाठी इष्ट असे अन्य तद्धेचे उपाय योजण्यास साहित्य परिषद् समर्थ व्हावी म्हणून द्रव्यनिधि जमा करणें अत्यावश्यक आहे. तरी या कामीं राजेरजवाडे व महाराष्ट्र भाषाभिमानी आणि इतर धनिक आणि उदार गृहस्थ यांनी सढळ हाताने साह्य द्यावें अशी हें संमेलन त्यांस विनंती करितें. (मुंबई, १९१५). [धावता क्र. ४ – संपा.]

(६) प्रत्येक साहित्य-संमेलनाच्या प्रसंगीं साहित्य-परिषदेमार्फत आलेल्या पूर्वीच्या संमेलनापासून तोंपर्यंत घडलेल्या साहित्य-परिषदेच्या कामगिरीचा संकलित अहवाल जाहीर करण्यांत यावा. हें करतांना महाराष्ट्रांत ज्या निरनिराळ्या परिषदेच्या शाखा अगर उपशाखा, सभा किंवा स्वतंत्र साहित्यसंस्था असतील त्यांना लिहून त्यांजकडून त्यांच्या कामाचे अहवाल आल्यास त्यांतीलहि सारांश जाहीर करावा अशी या सभेची शिफारस आहे. (बडोदें, १९२१).

(७) प्रत्येक महत्त्वाचे ठिकाणी शाखा-संस्था, सहकारी संस्था किंवा संलग्न संस्था स्थापन करण्यांत याव्या व यासंबंधी कार्यकारी मंडळाने नियम करावे. (मुंबई, १९२६).

(८) (अ) महाराष्ट्र-साहित्य-परिषदेच्या कार्यकारी मंडळाने महाराष्ट्रीय वस्तीच्या सर्व महत्त्वाच्या ठिकाणीं आपल्या शाखा-संस्था स्थापन करण्याचा त्याचप्रमाणे सहकारी व संलग्नसंस्था जोडून घेण्याचा झटून प्रयत्न करावा.

(आ) महाराष्ट्र-साहित्य-परिषदेच्या कार्यकारी मंडळाने मराठी महाराष्ट्र सा व लेखकांच्या

माहितीच्या नोंदीचें एक पुस्तक ठेवावें. त्यांत ग्रंथकर्त्यांचें संपूर्ण नांव, पत्ता, प्रसिद्ध केलेले ग्रंथ, तयार असलेले अप्रसिद्ध ग्रथ इत्यादींविषयी संपूर्ण माहिती असावी. परिषदेला सदर्हु माहिती सर्व लेखकांनी अगत्यपूर्वक कळवावी अशी विनंती आहे. (पुणें, १९२७).

(९) सर्व मराठी साहित्यसंस्थांची केंद्रसंस्था म्हणून महाराष्ट्र-साहित्य-परिषदेस मान्यता देण्यांत यावी व महाराष्ट्राबाहेर महाराष्ट्रवाङ्मय व संस्कृति कायम ठेवण्याच्या दृष्टीने ज्या अनेक संस्था अस्तित्वांत आल्या आहेत त्यांच्या अडचणी दूर करण्याकरिता त्या सर्व संस्था महाराष्ट्र-साहित्य-परिषदेस जोडल्या जाऊन त्यांस संघटित स्वरूप प्राप्त व्हावें असें या संमेलनाचें मत आहे. (बेळगांव, १९२९).

(१०) महाराष्ट्र-साहित्य-परिषद् एक प्रकारें संमेलनाचे ठराव अमलांत आणणारें कार्यकारी मंडळ आहे, व या मंडळाला लेखनद्वारा व पत्रद्वारा साहाय्य करणें आवश्यक आहे; तरी साहित्यभक्तांनी साहित्य-परिषदेला हस्तेंपरहस्तें मदत करून ती अधिक कार्यक्षम करावी अशी या संमेलनाची विनंती आहे. (मडगांव, १९३०).

(११) संमेलनांत पास झालेले ठराव अमलांत आणण्याचें कार्य करण्याकरिता व साहित्य-परिषदेशीं सहकार्य करण्यासाठी व जेव्हा अवश्य वाटेल तेव्हा तें कार्य स्वतः करण्यासाठी हें संमेलन खालील गृहस्थांचें कार्यकारी मंडळ नेमीत आहे. सदर मंडळाने आपल्या कार्याचा अहवाल पुढील संमेलनास सादर करावा. (द. हैदराबाद, १९३१).

(१२) हैदराबाद-संमेलनांत निवडण्यांत आलेल्या कार्यकारी मंडळाच्या कार्याबद्दल हें संमेलन आभार व्यक्त करीत असून, त्याकडे असलेले कागदपत्र आपल्या हवालीं करून घेऊन हैदराबाद संमेलनांत घेतलेल्या ठरावांपैकी ज्यांची अंमलबजावणी झाली नाही ते ठराव व या संमेनाने घेतलेले ठराव अमलांत आणण्याचें कार्य साहित्य-परिषदेने करावें. (कोल्हापूर, १९३२).

(१३) महाराष्ट्र-साहित्य-परिषदेने मराठी साहित्यपरीक्षा घेणें, त्यांचा अभ्यासक्रम ठरविणें व पदव्या देणें इत्यादि कार्यें करण्यासाठी एक योजना करावी असें ही सभा सुचविते (कोल्हापूर, १९३२).

(१४) महाराष्ट्र-साहित्य परिषदेचें कार्य सुव्यवस्थित होण्यासाठी कचेरीच्या कायम खर्चाची व्यवस्था होणें अवश्य आहे. याकरिता वार्षिक दोन हजार रुपये व्याजाच्या रूपाने मिळतील येवढा निधि शक्य तितक्या लवकर एकत्रित व्हावा म्हणून प्रत्येक महाराष्ट्रीयाने साहित्य-परिषदेस साहाय्य करावें अशी या संमेलनाची सर्वांना विनंती आहे. (कोल्हापूर, १९३२).

(१५) परिषद् व संमेलन हीं परस्परांस जबाबदार राहून एका आखीव धोरणाने सहकारपूर्वक वाङ्मयकार्य करतील अशी एखादी व्यवहार्य योजना तयार करण्याची वेळ आली आहे असें या सभेचें मत आहे; म्हणून परिषदेने संमेलनाची व परिषदेची कार्यमर्यादा आंखणारी एक घटना तयार करून ती मंजुरीसाठी पुढील संमेलनाच्या बैठकीपुढे सादर करावी अशी या संमेलनाची सूचना आहे. (नागपूर, १९३३).

(१६) महाराष्ट्र-साहित्य परिषदेचें कार्य कायम स्वरूपांत व्यवस्थित रीतीने अखंड चालविण्यासाठी परिषदेचा कायमनिधि वाढविण्याची खटपट मराठी भाषाभिमान्यांनी नेटाने करणें जरूर आहे असें या सभेचें मत आहे. या कामाला ताबडतोब प्रारंभ करावा व संमेलनाने आणि जनतेने उदारपणें साहाय्य करावें अशी या समेची आग्रहाची विनंती आहे. (नागपूर, १९३३).

(१७) [illegible] साद्यन्त अहवाल 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'च्या अंकांत प्रसिद्ध कर-

ण्यांत यावेत व छपाईचा खर्च ज्या त्या संमेलनाच्या स्वागत मंडळाने सोसावा. (बडोदें, १९३४)

(१८) मराठी भाषाभिवृद्धीचें कार्य 'महाराष्ट्र साहित्य परिषदे'स सतत व व्यवस्थित करिता यावें यासाठी परिषदेला कचेरी आणि ग्रंथसंग्रह यांकरिता कायमची जागा असणें जरूर आहे. तसेंच परिषदेचा कायमनिधीहि बराच मोठा असावयास पाहिजे. तरी धनिकांनी साहित्यभक्ति ठेवून परिषदेला उदार द्रव्यसाहाय्य करावें अशी त्यांना या संमेलनाची आग्रहाची विनंती आहे. (बडोदें, १९३४)

(१९) 'महाराष्ट्र साहित्य परिषदे'चें कार्य व्यापक आणि सार्वमहाराष्ट्रीय होणें अत्यावश्य असल्याने ठिकठिकाणच्या वाङ्मयसंस्थांनी परिषदेशीं 'संलग्न' किंवा 'सहकारी' संस्था या नात्याने संबंध जोडावा अशी या संमेलनाची त्यांना कळकळीची शिफारस आहे. (बडोदें, १९३४)

(२०) (अ) 'महाराष्ट्र साहित्य परिषदे'ला आपले उद्देश सफल करण्यासाठी अवश्य तो द्रव्यनिधि सांप्रत नाही, त्यामुळे तिची प्रगति निरुद्ध झाली आहे. म्हणून स्वभाषाभिमानी सज्जनांनी, धनिकांनी आणि राजेरजवाड्यांनी परिषदेला यथाशक्ति द्रव्यसाहाय्य करावें अशी या संमेलनाची सर्वांप्रत आग्रहाची विनंती आहे.

(आ) श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि, औंध, यांनी म. सा. परिषदेच्या 'साहित्य-मंदिरा'साठी आपली जागा सवलतीने दिल्याबद्दल हें संमेलन त्यांचे अत्यंत आभार मानीत आहे, आणि या साहित्यमंदिराच्या उभारणीस सर्वांनी द्रव्यसाहाय्य द्यावें अशी सर्वांस विनंती करीत आहे.

(इ) ठिकठिकाणीं प्रांतिक व स्थानिक साहित्यसंमेलनें भरूं लागलीं आहेत, याबद्दल या संमेलनास आनंद वाटत आहे. त्यांच्या द्वारें होणारें कार्य एकसूत्री, व्यापक व प्रातिनिधिक करण्यासाठी मध्यवर्ती म. सा. परिषदेचें बल वृद्धिंगत केलें पाहिजे. म्हणून सर्व साहित्यसभांनी परिषदेशीं संबद्ध व्हावें अशी त्यांस या संमेलनाची विनंती आहे (इंदूर, १९३५).

(२१) अखिल महाराष्ट्रांतील निरनिराळ्या प्रांतांत सालोसाल जीं संमेलनें भरविण्यांत येतात त्यांस स्वतःची अशी घटना नसल्यामुळे परिषदेचा व अशा संमेलनांचा संबंध काय असावा हें स्पष्ट न होऊन दर वर्षी अनेक वादग्रस्त प्रश्न उत्पन्न होतात व त्यामुळे ज्या उद्देशांनी अशी संमेलनें भरविण्यांत येतात त्या उद्देशांस व कार्यास हानि पोचते असें आढळून आल्यामुळे, ही अडचण नाहीशी करण्याची निकडीची गरज उत्पन्न झाली आहे. ही अनवस्था दूर करण्या-करिता सालोसाल भरणाऱ्या संमेलनाची 'महाराष्ट्र-साहित्य-परिषद्' ही कार्यकारी संस्था व्हावी या मूलभूत तत्त्वावर संमेलन व परिषद या दोहोंचे संबंध स्पष्ट व सुव्यक्त करणारा संमेलनाच्या घटनेचा मसुदा खालील समितीने निदान सहा महिन्यांत तयार करून तो जाहीर चर्चेकरिता प्रसिद्ध करावा, व या चर्चेमध्ये ज्या उपयुक्त सूचना होतील त्यांच्या अनुरोधाने जरूर त्या सुधारणा करून सुधारलेला मसुदा मंजुरीकरिता संमेलनाच्या पुढील अधिवेशनापुढे मांडावा. समितीने आपला अध्यक्ष आपल्यापैकीच निवडावा.

समितींतील सभासद

डॉ. शं. पु. आघारकर, प्रो. चिं. वि. जोशी, श्री. वि. सी. सरवटे, श्री. वि. ह. आपटे, प्रो. श्री. ना. बनहट्टी, प्रो. वि. भि. कोलते, श्री. के. म. सोनाळकर, प्रो. द. वा. पोतदार, श्री. शं. श्री. देव, श्री. लालजी पेंडसे, श्री. वा. ना. देशपांडे, महाराष्ट्र सं. रा. शेंडे.

श्री. सरवटे यांनी या समितीचें 'सभा बोलावणार' [Convener] या नात्याने काम करावें. त्यांनी कबूल न केल्यास श्री. वि. ह. आपटे यांनी तें काम करावें. या समितीला योग्य वाटल्यास तिने अधिक सभासद स्वीकृत करावे. या समितीच्या खर्चासाठी हें संमेलन रु.१०० (शंभर रुपये) मंजूर करीत आहे (इंदूर, १९३५).

(२२) इंदूर येथे १९३५ सालीं भरलेल्या संमेलनाने नेमलेल्या समितीने, परिषदेने घटनेचा पुनः विचार करण्याकरिता नेमलेल्या समितीशीं विचारविनिमय करून जी योजना केली ती परिश्रमपूर्वक व विचारपूर्वक केल्याबद्दल हें संमेलन त्या समितीचें व त्यांतील सर्व सभासदांचें आभारी आहे व ही घटना हें संमेलन दाखल करून घेत आहे. त्या योजनेंत परिषदेच्या साधारण सभेने ९।११।३६ रोजीं केलेले फेरफार या संमेलनास मान्य आहेत व परिषद्-संमेलनवाद मिटला याबद्दल हें संमेलन आनंद व्यक्त करीत आहे. (जळगांव, १९३६).

(२३) म. सा. परिषदेच्या संकल्पित इमारतीचा एक लहानसा भाग परिषदेच्या दसरा-साठी बांधला जात आहे याबद्दल या संमेलनाला आनंद वाटतो. राहिलेला सर्व भाग बांधला जाऊन परिषदेच्या कार्याला सुव्यवस्थित स्वरूप प्राप्त होण्यासाठी परिषदेच्या इमारतनिधीला सर्व साहित्यिकांनी व धनिकांनी शक्य तें साहाय्य करावें अशी विनंती आहे. (जळगांव, १९३६).

(२४) या संमेलनाची महाराष्ट्र-साहित्य-परिषदेस अशी सूचना आहे की घटनेच्या नियम ५५ मधील दुसऱ्या ओळींतील 'कार्यकारी मंडळाने' हे शब्द काढून टाकावे व त्यांबद्दल खालील शब्द घालावे :— "(सूचित नांवें) पाहून परिषदेच्या चिटणीसांनी निवडून आल्यास जे अध्यक्षीय काम करण्यास संमति दर्शवितील अशांचीं नांवें नियामक मंडळाच्या सभासदांकडे लेखी मताकरिता पाठवावीं." (अहमदनगर, १९३९).

---

[२] महाराष्ट्र-विद्यापीठ

(२५) सर्व विद्या मराठींत बद्धमूल होऊन पक्क्या रुजाव्या व वाढाव्या यासाठी एक स्वतंत्र मराठी विद्यापीठ महाराष्ट्रांत असणें अगत्य आहे असें या सभेस वाटतें. या विद्यापीठाचा हेतु व ध्येय परकीय भाषा सोडून सर्व विषयांचें अध्ययन अवलपासून अखेरपर्यंत मराठीच्याच द्वारें व्हावें असें असावें व त्यांत मराठी वाङ्मय, मराठी इतिहास इत्यादि विषयांस अग्रस्थान राहून शिक्षणाची दृष्टि व्यापक परंतु मराठीच ठेवण्याविषयी कटाक्ष असावा. तसेंच मराठी विद्वानांचा व साहित्यसंस्थांचा परामर्श घेणें व गौरव करणें इत्यादि विद्यापीठांचीं कार्यें या पीठाकडूनहि व्हावींत. अशा विद्यापीठाची सविस्तर योजना महाराष्ट्र साहित्य परिषदेने तयार करावी. (बडोदें, १९२१).

(२६) महाराष्ट्रवाङ्मयास आपल्या सर्व परीक्षांच्या अभ्यासक्रमांत विशेष महत्त्व देणारी व महाराष्ट्रवाङ्मय अधिकाधिक संपन्न करण्याविषयी विस्तृत प्रयत्न करणारी आणि सर्व शिक्षण महाराष्ट्रभाषेंतूनच देण्याची व्यवस्था शक्य तितक्या त्वरेने घडवून आणण्याचें ध्येय धरणारी अशी युनिव्हर्सिटी (विश्वविद्यालय) मुंबई इलाख्यांतील सरकार, संस्थानाधिपति आणि श्रीमान् धनिक विद्वानांनी मिळून स्थापावी असें या सभेचें मत बडोदें येथील संमेलनांत पसार झालेल्या ठरावानुसार ही सभा पुनः प्रदर्शित करते. (मुंबई, १९२६).

(२७) मराठीस आपल्या सर्व परीक्षांच्या अभ्यासक्रमांत पहिलें मानाचें स्थळ देणारी, त्याचप्रमाणे मराठी वाङ्मय अधिकाधिक व्यापक, विवेचक, विस्तृत व संपन्न करण्याविषयी झटून

प्रयत्न करणारी आणि सर्व शिक्षण महाराष्ट्र-भाषेंतून देण्याची व्यवस्था शक्य तितक्या त्वरेने घडवून आणण्याचें ध्येय ठेवून चालणारी अशी विद्यापीठ संस्था मुंबई इलाख्यांतील सरकार, महाराष्ट्रीय, बृहन्महाराष्ट्रीय, संस्थानिक, श्रीमान् व विद्वज्जन यांनी मिळून शक्य तितक्या लवकर स्थापण्याचें श्रेय घ्यावें अशी या सभेची महाराष्ट्रास, सरकारास, संस्थानिकांस, धनिकांस व विद्वज्जनांस आग्रहाची विनंती आहे. (पुणें, १९२७).

(२८) महाराष्ट्र व बृहन्महाराष्ट्र यांसाठी कायद्याने मान्य होणारें (Chartered) असें महाराष्ट्र विश्वविद्यालय स्थापन व्हावें असें या संमेलनाचें मत आहे (बेळगांव, १९२९).

(२९) महाराष्ट्रीयांसाठी म्हणजे मराठी ही ज्यांची मातृभाषा आहे त्या सर्व लोकांच्यासाठी, व्यापक दृष्टीच्या, संशोधनप्रधान, आणि मराठींतून आपलें बहुतेक अध्ययन-अध्यापन करणाऱ्या अशा पहिल्या प्रतीच्या एका राजमान्य व सनदी विश्वविद्यालयाची महाराष्ट्राच्या केंद्रस्थानीं स्थापना करणें आता अत्यवश्य आहे असें या संमेलनास वाटतें.

या विश्वविद्यालयाची प्रास्ताविक स्थूल योजना करून तीस सार्वत्रिक सक्रिय सहानुभूति मिळविण्याचा उद्योग करण्यासाठी हें संमेलन पुढील सद्गृहस्थांची समिति नेमीत असून त्या समितीस स्वीय कार्य साधण्यासाठी अधिक सदस्य निवडून घेण्याचा अधिकार देत आहे.

या समितीने सध्या याच विषयांत कार्य करीत असलेल्या इतर समितींशीं सहकार्य करावें.

१ श्रीमन्त सौ. राणीसाहेब सांगली, २ सरदार माधवरावसाहेब किबे, ३ रावबहादुर दत्तोबासाहेब भोसले, ४ दिवाणबहादुर अ. बा. लठ्ठे, ५ ना. भास्करराव जाधव, ६ रा. ना. गो. चापेकर, ७ रा. भा. रा. ताम्बे, ८ प्रो. ना. के. बेहेरे, ९ प्रो. शं. दा. पेण्डसे, १० प्रो. चिं. वि. जोशी, ११ डॉ. श्रीमती कमळाबाई देशपांडे, १२ रा. वामनराव नाईक, हैदराबाद, १३ नामदार द. ब्यं. बेळवी (बेळगांव). या समितीच्या खर्चाची जबाबदारी परिषदेने घ्यावी. (कोल्हापूर, १९३२)

(३०) प्रचलित शिक्षणपद्धतीची पुनर्घटना मातृभाषेच्या द्वारें केली पाहिजे या सर्वसंमत तत्त्वानुसार महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना करण्याचे जे अभिनंदनीय प्रयत्न चालले आहेत त्यांबद्दल या संमेलनाची सहानुभूति असून सर्वांनी या कार्याला आर्थिक व इतर साहाय्य करावें अशी या संमेलनाची आग्रहाची विनंती आहे (नागपूर, १९३३).

(३१) महाराष्ट्र विद्यापीठ लवकर स्थापन व्हावें अशी या संमेलनाची तीव्र इच्छा आहे. एतदर्थ 'महाराष्ट्र युनिव्हर्सिटी असोसिएशन' प्रभृति संस्थांकडून व मंडळींकडून जे प्रयत्न चालू आहेत त्यांस या संमेलनाचा पाठिंबा आहे आणि जनतेने व सरकारने हें विद्यापीठ लवकर स्थापन करण्याची खटपट करावी अशी या संमेलनाची विनंती आहे. (बडोदें, १९३४).

(३२) सर्व विद्यांचा परिपोष मराठींतून व्हावा व मराठीला जागतिक भाषांत उच्च दर्जा प्राप्त व्हावा; तसेंच मराठी साहित्यिकांचा आणि साहित्यसंस्थांचा योग्य गौरव होऊन वाङ्मयाभिवृद्धीस योग्य असें उत्तेजन यावें म्हणून महाराष्ट्रासाठी एक स्वतंत्र विद्यापीठ असणें अगत्याचें झालेलें आहे, असें या संमेलनाचें ठाम मत आहे. असें विद्यापीठ लवकर अस्तित्वांत यावें म्हणून 'पुणें महाराष्ट्र युनिव्हर्सिटी असोसिएशन' या संस्थेस सर्वांनी यथाशक्ति मदत करावी. (इंदूर, १९३५).

(३३) महाराष्ट्र विद्यापीठस्थापनेच्या कार्याला जास्त जोराने चालना मिळण्यासाठी महाराष्ट्र युनिव्हर्सिटी असोसिएशनने व सर्व उच्च शिक्षणसंस्थांनी झटून प्रयत्न करावा व कौन्सिलांतील प्रतिनिधींनी याला मदत करावी अशी संमेलनाची आग्रहाची सूचना आहे. (महाराष्ट्र संमेलन, बेळगांव, १९३६).

(३४) भाषावर प्रांतरचना असणें व देशी भाषांतून शिक्षण देणें हें तत्त्व आता सर्वमान्य झाल्याने महाराष्ट्र, गुजराथ व इतर प्रांतांकडून आपापल्या विद्यापीठांची मागणी होत आहे. मराठी साहित्य संमेलनाने या तत्त्वाचा यापूर्वीच पुरस्कार केला असून महाराष्ट्र विद्यापीठाच्या स्थापनेसंबंधी पूर्वी जो ठराव केला आहे त्याचा हें अधिवेशन पुन्हा उच्चार करीत आहे. या विद्यापीठाच्या मागणीला मुंबई सरकारच्या अर्थमंत्र्यांनी आपल्या कायदेमंडळांतील भाषणांत उघड पुष्टि दिल्याने विद्यापीठाच्या स्थापनेला अधिक अनुकूलता मिळाली आहे. म्हणून या संमेलनाची मंत्रिमंडळाला अशी आग्रहाची विनंति आहे, की महाराष्ट्र विद्यापीठ स्थापन करण्याची योजना मंत्रिमंडळाने ताबडतोब अम्मलांत आणावी; तसेंच सर्व शिक्षणप्रेमी जनतेने या कामाला उदार हाताने द्रव्यसाहाय्य करावें. (मुंबई, १९३८).

(३५) महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या बैठकींतून इ. स. १९२१ सालापासून अनेकवार महाराष्ट्र विद्यापीठ स्थापिलें जावें अशा आशयाचे ठराव मान्य झालेले असूनहि आणि या कार्याविषयी जनतेचा जिव्हाळ्याचा पाठिंबा अनेक रीतीने प्रकट झाला असूनहि अद्यापि सदर विद्यापीठाची स्थापना घडून आलेली नाही म्हणून या संमेलनाची मुंबई सरकारास पुन्हा अशी आग्रहाची मागणी आहे की यापुढे हा विषय निकडीचा समजून सरकारने हें कार्य सिद्धीस न्यावें आणि या कामीं जनतेने सर्वप्रकारें साहाय्य द्यावें व सहकार करावा. (अहमदनगर, १९३९).

---

[३] डाकेबाबत सवलती, तक्रारी इ.

(३६) पोस्टाने बुकपोस्टाचे दर दुप्पट करून व्हाल्युपेबल रजिस्टर करावें लागतें, असा नियम केल्यापासून लहानसहान पुस्तकांचा पुस्तकांचे किंमतीपेक्षाहि टपालखर्च जास्त लागत असल्यामुळें पूर्वीप्रमाणे प्रसार होत नाही. तरी सरकारकडे या बाबतींत गाऱ्हाणें करून दाद मागावी; म्हणजे ग्रंथप्रसाराचे बाबतींतील पोस्टाची सध्या आलेली अडचण दूर होऊन ग्रंथप्रसाराचें काम पूर्वीप्रमाणे जोराने होईल. (पुणें, १९२७).

(३७) पोस्टखात्याने बुकपोस्टाचे दर दुप्पट केले आणि व्हॅल्युपेबल हें रजिस्टर केलें पाहिजे असा नियम केला. यामुळे कित्येकदा टपालखर्च पुस्तकाच्या किंमतीहूनहि अधिक होतो. हे निर्बंध ग्रंथप्रसारास व पर्यायाने शिक्षणाच्या प्रसारास जाचक होत असल्यामुळे सरकारने या बाबतींत पूर्वीच्या सवलती पुनः चालू कराव्यात अशी या संमेलनाची हिंदुस्थान सरकारास विनंती आहे. (कोल्हापूर, १९३२).

(३८) सरकारने पोस्टाचे दर वाढविल्यामुळे वाङ्मयप्रसाराच्या कार्यास व्यत्यय येत आहे, तेव्हा हे दर पूर्ववत् करण्याविषयी हें संमेलन सरकारला आग्रहाची विनंती करीत आहे. (बडोदें, १९३४)

(३९) ग्रंथप्रकाशन आणि ग्रंथप्रसार हीं सुलभ होण्यास पोस्टाचे दर कमी होणें अगदी जरूर आहे. यासाठी ते शक्य तों कमी करण्याबद्दल हें संमेलन सरकारला आग्रहाची विनंती करीत आहे. पोस्टाच्या सवलती देण्याकरिता सरकारने नियतकालिकांची जी व्यवस्था केली आहे, तींत नियतकालिकांत निम्मा मजकूर चालू किंवा प्रचलित विषयांसंबंधी असला पाहिजे अशी अट आहे. तिच्यामुळे गोष्टी अगर मनोरंजक मजकूर देणाऱ्या अथवा तात्त्विक विषयांची चर्चा करणाऱ्या नियतकालिकांना ही सवलत मिळत नाही. हा स्पष्ट अन्याय असल्याने ही अट ताबडतोब रद्द करण्यांत यावी अशी या संमेलनाची मागणी आहे. (इंदूर, १९३५).

(४०) "अनरजिस्टर्ड" व्ही. पी. ने पार्सल पाठविण्याची बंदी पोस्टखात्याने केल्यापासून पुस्तकें व नियतकालिकें यांचा खप बराच कमी झाला आहे. म्हणून ही बंदी काढून टाकण्यासंबंधी, तसेंच बुकपोस्टाचे दर कमी करण्यासंबंधी योग्य ती खटपट म. सा. परिषदेने करावी. (मुंबई, १९३८).

(४१) पोस्टाच्या खात्याचे डिरेक्टर-जनरल यांजकडे महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शिष्टमंडळाने ज्या मागण्या केल्या आहेत त्यांचा हें संमेलन खालीलप्रमाणे पुनरुच्चार करीत असून या मागण्या शक्य तितक्या लवकर पुऱ्या कराव्या अशी त्यांस विनंती करीत आहे.

(१) रु. ५ अथवा कमी किंमतीचें बुकपोस्ट पूर्वीप्रमाणे अनरजिस्टर्ड व्ही. पी. ने पाठविण्याची विशेष सवलत असावी.

(२) अर्धा आण्याच्या हशिलांत २॥ तोळ्याऐवजी ५ तोळे वजनापर्यंत बुकपोस्ट पाठविण्याची सवलत देऊन त्यापुढील दर आताप्रमाणेच असावेत. (अहमदनगर, १९३९).

---

[४] नभोवाणी व चित्रपट

(४२) (अ) हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं नभोवाणीकेंद्रांची स्थापना करून तद्वारा लोकशिक्षणाचे व लोकरंजनाचे कार्यक्रम भारतीय भाषांच्या द्वारा प्रसृत करण्याचा सरकारने केलेला उपक्रम या संमेलनास स्वागतार्ह व उत्तेजनार्ह वाटतो. परंतु त्याचबरोबर हें संमेलन सरकारास असें सुचवितें की नभोवाणीकेंद्रांतून प्रसृत केल्या जाणाऱ्या कार्यक्रमांची आंखणी व पद्धति यांमध्ये भाषाशुद्धि व भाषासौष्ठव यांच्याकडे जेवढें लक्ष पुरविण्यास हवें तेवढें पुरविलें जात नाही; म्हणून नभोवाणीकेंद्रांचे कार्यक्रम ठरवितांना तज्ज्ञ सल्लागारांचा अभिप्राय घेण्याची योजना करण्यांत यावी. यासाठी, प्रत्येक नभोवाणीकेंद्राला एकेक सल्लागारमंडळ असावें व त्यांत त्या त्या विभागांतील साहित्यपरिषदेसारख्या संस्थांच्या प्रतिनिधींचा समावेश अवश्य करण्यांत यावा अशी या संमेलनाची मागणी आहे. (आ) मुंबई नभोवाणी या केंद्राबद्दल या संमेलनाची अशी तक्रार आहे की, मुंबईसारख्या मराठी भाषा बोलणाऱ्यांच्या प्रधान केंद्रांत मराठी भाषेंतील कार्यक्रमांना योग्य व भरपूर स्थान दिलें जात नाही. तें यापुढे अधिक मिळणें अवश्य आहे. तसेंच महाराष्ट्रांत पुणें, नागपूर वगैरे ठिकाणीं मराठी भाषेंतील कार्यक्रमांना प्राधान्य देणारीं नभोवाणीकेंद्रें त्वरित स्थापन करण्याची वेळ आलेली आहे असें या संमेलनाचें निश्चित मत आहे. (इ) मुंबई केंद्रातर्फे दिल्या जाणाऱ्या बातम्या, जाहिराती व इतर माहिती मराठींतून द्यावी; तसेंच पुस्तकपरीक्षण, नाटकें, गोष्टी, पोवाडे, लावण्या, लोकगीतें यांना प्राधान्य द्यावें. गायकांत मराठी गाणीं म्हणणाऱ्यांचा भरणा अधिक असावा. (मुंबई, १९३८).

(४३) चित्रपटाच्या सेन्सॉर बोर्डावर (नियामक मंडळावर) महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फेंचा एक स्त्री-प्रतिनिधि सभासद म्हणून घेण्यांत यावा अशी या संमेलनाची मुंबई सरकारास आग्रहाची विनंती आहे (अहमदनगर, १९३९).

(४४) (अ) मुंबई येथील अखिल भारतीय नभोवाणीचा (ऑल इंडिया रेडिओ) कारभार या प्रांतांतील जनता आणि प्रांतांतील भाषा यांच्या हिताच्या दृष्टीने चालावा म्हणून सल्लामसलत देण्याकरिता सरकारने एक तज्ज्ञ सल्लागारमंडळ नेमावें व या मंडळांत महाराष्ट्र साहित्यपरिषदेचे

प्रतिनिधी घेण्यांत यावेत अशी या संमेलनाची शिफारस आहे व यासाठी खटपट करण्याकरता पुढील समिति संमेलन नेमीत आहेः—

१ महाराष्ट्र साहित्य संमेलनाध्यक्ष
२ म. सा. परिषदेचे अध्यक्ष
३ म. सा. परिषदेचे कार्याध्यक्ष
४ म. सा. पत्रिकेचे संपादक
५ प्रा. ना. के. बेहेरे
६ नामदार बा. ग. खापर्डे
७ डेक्कन रेडिओ असोसिएशन—२ प्रतिनिधि
८ बॉंबे रेडिओ लिसनर्स गिल्ड—२ प्रतिनिधि
९ श्री. चिटणीस, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणें (निमंत्रक)

(आ) महाराष्ट्र साहित्य संमेलनाची हिंदुस्थान सरकारास अशी आग्रहाची आणि निकडीची सूचना आहे की, महाराष्ट्र देशाचा विस्तार, संस्कृति आणि वैशिष्ट्य हीं लक्षांत घेऊन हिंदुस्थान सरकारने पुणें व नागपूर येथे एकेक स्वतंत्र नभोवाणी-केंद्र स्थापन करण्याची त्वरा करावी. मद्रास इलाख्यांत ज्याप्रमाणे तामील प्रांताकरिता त्रिचनापल्ली येथे किंवा पूर्व बंगालमध्ये ढाक्का येथें स्वतंत्र नभोवाणीकेंद्रें स्थापन करण्याला हिंदुस्थान सरकार तयार झालें आहे, त्याप्रमाणे पुणें व नागपूर येथेहि तशी व्यवस्था करणें हें न्याय्य आणि इष्ट होईल असें या संमेलनाचें मत आहे (अहमदनगर, १९३९).

(४५) एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत मुंबई येथे भरल्या जाणाऱ्या मोशन पिक्चर्स कॉंग्रेस (अखिल भारतीय चलच्चित्रपट परिषद्)च्या कार्यकारी मंडळाने आपल्या कार्यक्रमांत लेखकवर्गाची उपेक्षा करून त्यांची गाऱ्हाणीं पुढे मांडण्यास संधि दिली नाही. भांडवला-इतकेंच चित्रपटाच्या धंद्यांत लेखकाचें महत्त्व असल्यामुळे ही उपेक्षा अत्यंत गर्हणीय आहे असें या संमेलनाचें मत असल्यामुळे हें संमेलन सदर मोशन पिक्चर्स कॉंग्रेसच्या कार्यकारी मंडळाचें इकडे लक्ष वेधीत आहे आणि गुजरात साहित्य परिषद्, हिंदी साहित्यपरिषद्, वंगीय साहित्य परिषद् व तत्सम प्रांतिक साहित्यसंस्था यांचेंहि इकडे लक्ष वेधीत आहे. (अहमदनगर, १९३९).

---

[५] लिपि (मोडी-नागरी) आणि व्याकरण व शुद्धलेखन

(४६) मोडी लिपी ही पुरातन काळापासून चालत आलेली, लोकप्रिय आणि महाराष्ट्रांतील सर्व व्यवहारांत पूर्णपणें प्रचलित अशी असल्याकारणाने, ती मुंबई इलाख्यांतील बऱ्याच सरकारी ऑफिसांत वापरली जाऊं नये असा जो सरकारी हुकूम झाला आहे तो रद्द करावा अशी ह्या सभेची सरकारास नम्रपणें विनंती आहे. ह्यासंबंधी साहित्य-परिषदेच्या कार्यकारी मंडळाकडून सरकारकडे अर्ज गेला त्यास प्रतिकूल उत्तर आलें. तथापि संमेलनाचे वतीने एक अर्ज सरकारकडे पाठवा असें या सभेस इष्ट वाटतें. तरी तिचेतर्फे नवा अर्ज तयार करून धाडावा अशी विनंती आहे. (मुंबई, १९१५).

(४७) मोडी लिपी हें मराठी भाषा लिहिण्याचें फार सुलभ व उपयुक्त साधन असल्या मुळे ती चालू राहणें फार आवश्यक आहे व ज्या ज्या ठिकाणीं ती बंद झाली असेल, त्या त्या

ठिकाणीं ती पुन्हा सुरू व्हावी, व त्यासाठी जरूर तो प्रयत्न करण्यांत यावा (बडोदें, १९२१).

(४८) निरनिराळ्या प्रमुख भारतीय भाषांतील वाङ्मयाचा भिन्न भिन्न प्रांतांत अधिकाधिक सुलभतेने प्रसार होण्याचा एक उपाय म्हणून सर्व भारतीय भाषांतील मुद्रण देवनागरी लिपींत व्हावें अशी या संमेलनाची कळकळीची शिफारस आहे. (मुंबई, १९२६).

(४९) ब्रिटिश सरकारच्या व कांहीं हिंदी संस्थानिकांच्या प्रयत्नांनी व लोकांच्या अनास्थेमुळे मोडीचा प्रसार हटत चालला आहे हें अनिष्ट असल्याकारणाने सर्वांनी मोडीचा उपयोग करणें जरूर आहे असें या सभेला वाटतें. (मुंबई, १९२६).

(५०) हल्ली मोडीचा प्रसार सरकार व जनता यांच्या अनास्थेमुळे हटत चालला आहे, हें या सभेस अत्यंत अनिष्ट असें वाटतें. महाराष्ट्रीय शीघ्र लिपीचा सर्व बाजूंनी होणारा हा ऱ्हास सर्व प्रकारें थांबवावा असें या सभेचें मत आहे. (पुणें, १९२७).

(५१) मराठी भाषेतील शुद्धलेखनाचा प्रस्तुतचा घोटाळा मोडून त्यास एकसूत्री निश्चित वळण लावणें अवश्य आहे. तरी महाराष्ट्र साहित्य-परिषदेने तज्ज्ञांचें एक पोटमंडळ नेमून त्याचा याविषयीचा अभिप्राय आणि सूचना पुढील संमेलनप्रसंगीं सादर कराव्या. (पुणें, १९२७).

(५२) छापण्याच्या कामीं अधिक सुलभता यावी म्हणून देवनागरी लिपीची सुधारणा तिचें सांप्रतचें स्वरूप विशेष विकृत न करितां होणें इष्ट आहे असें या सभेचें मत आहे. यासाठी या प्रश्नाचा सांगोपांग विचार करून योग्य त्या सुधारणा सुचविण्याकरिता पुढील गृहस्थांचें एक मंडळ नेमण्यांत यावें. या मंडळाने आपला अभिप्राय सहा महिन्यांचे आत साहित्य-परिषदेकडे पाठवावा. (पुणें, १९२७).

(५३) निरनिराळ्या प्रमुख भारतीय भाषांतील वाङ्मयाचा भिन्न भिन्न प्रांतांत अधिकाधिक सुलभतेने प्रसार होण्याचा एक सुलभ उपाय म्हणून सर्व भारतीय भाषांतील मुद्रण देवनागरी लिपींत व्हावें अशी या संमेलनाची कळकळीची शिफारस आहे. (पुणें, १९२७).

(५४) हें संमेलन असा ठराव करितें की, शुद्धलेखनाविषयी प्रस्तुत जो वाद माजला आहे त्याचा निर्णय करण्याचा प्रयत्न करणें, संमेलनाचें व महाराष्ट्र-साहित्यपरिषदेचें काम असल्यामुळे व या प्रश्नाची इतउत्तर हयगय करणें भाषेच्या दृष्टीने अनिष्ट असल्यामुळे अखिल महाराष्ट्रांपैकी पुणें, मिरज अथवा सांगली, धुळें, उमरावती, नागपूर इत्यादि नगरीं जाऊन शुद्धलेखनाविषयी जाणत्यांचें सर्व साधकबाधक म्हणणें ऐकून घ्यावें व इतर शक्य तो पुरावा विचारांत घ्यावा व त्यावरून काढलेला निकाल वृत्तान्त म्हणून पुढील वर्षाच्या संमेलनांत मांडावा.

वरील ठराव कार्यवाही करण्याकरिता साहित्य-परिषदेने मंडळाच्या सभासदांची निवडणूक करावी व व्ययाकरिता द्रव्य निश्चित करावें अशी या संमेलनाची परिषदेस विनंती आहे. (ग्वाल्हेर, १९२८).

(५५) मोडी लिपी व्यवहारांत जास्त सुलभ व उपयुक्त असल्याने ती प्रत्येकाने शिकावी व व्यवहारांत पुन्हा आणावी अशी या सभेची सर्व महाराष्ट्रास विनंती आहे. तसेंच मोडी लिपीच्या उपयोगास ज्या प्रांतांतून व संस्थानांतून मराठी भाषा बोलण्यांत येत आहे त्यांत मोडीच्या प्रसारास प्रतिबंधक असतील असे नियम रद्द करून सर्व प्रकारें उत्तेजन द्यावें अशी संमेलनाची प्रशस्ति आहे. (ग्वाल्हेर, १९२८).

(५६) निरनिराळ्या प्रमुख भारतीय भाषांतील वाङ्मयाचा भिन्न भिन्न प्रांतांस सुलभतेने आस्वाद घेतां यावा म्हणून सर्व हिंदी भाषांनी देवनागरी लिपीचा स्वीकार करावा अशी शिफारस सर्व साहित्यपरिषदांस हें संमेलन करीत आहे. (बेळगांव, १९२९).

(५७) ब्रिटिश सरकारच्या, कांही हिंदी संस्थानिकांच्या व लोकांच्या दुर्लक्षामुळे मोडी लिपीचा प्रसार कमी होत चालला आहे ही गोष्ट अत्यंत अनिष्ट असून सर्वांनी मोडीच्या उपयोगास उत्तेजन द्यावें असें या संमेलनास वाटतें (बेळगांव, १९२९).

(५८) पुणें येथील संमेलनांत लिपी-सुधारणेचा विचार करण्याकरिता जें मंडळ नेमण्यांत आलें होतें त्या मंडळाने आपला अहवाल पुढील वर्षी भरणाऱ्या संमेलनापूर्वी निदान दोन महिने प्रसिद्ध करून संमेलनापुढे सादर करावा अशी त्याला ह्या संमेलनाची विनंती आहे. (मडगांव, १९३०).

(५९) शुद्धलेखनमंडळाचे निर्णय ह्या संमेलनाला मंजूर असून इतरत्र मान्यता मिळविण्यासाठी हे निर्णय वर्तमानपत्रकर्ते, वाङ्मयसंस्था, मुंबई सरकार, मध्यप्रांत सरकार, मराठी भाषेचीं देशी संस्थानें व लेखकवर्ग ह्या सर्वांस कळवून ज्यांना ते संमत असतील त्यांची संमति मंडळाकडे लेखी कळविण्यास त्यांस विनंती करावी. (२) ह्या निर्णयावर कोणाकडून कांही सूचना किंवा आक्षेप आले तर त्यांचा विचार ह्याच चालू मंडळाने पुढे करून वृत्तान्त व अखेर निर्णय पुढील संमेलनास सादर करावा. (मडगांव, १९३०).

(६०) शुद्धलेखनमंडळाकडून निर्णय न केल्या गेलेल्या बाबींचा, त्याचप्रमाणे विरामचिन्हांबद्दलच्या प्रश्नांचा विचार करण्याकरिता खालील गृहस्थांचें मंडळ नेमण्यांत यावें व त्याला अधिक सभासद जोडून घेण्याचा अधिकार असावा. ह्या मंडळाचा रिपोर्ट पुढील संमेलन भरण्यापूर्वी निदान दोन महिने आधी प्रसिद्ध करण्यांत यावा (मडगांव, १९३०).

(६१) शुद्धलेखनासंबंधी आतापर्यंत निरनिराळ्या विद्वानांनी प्रदर्शित केलेले विचार लक्षांत घेऊन व यानंतरहि अनेक विद्वानांचें साहाय्य घेऊन आणखी दोन महिन्यांनी साहित्यपत्रिकेंत याविषयीचा आपला निर्णय जाहीर करण्याकरिता खालील गृहस्थांचें मंडळ नेमण्यांत यावें. (बेळगांव १९२९).

(६२) (अ) बेळगांव येथे गेल्या सालीं नेमलेल्या शुद्धलेखनमंडळाने पाठविलेल्या अहवालाच्या प्रती संमेलनाच्या व साहित्य-परिषदेच्या दप्तरीं ठेवण्यांत याव्यात.

(आ) वरील मंडळाने सदर अहवाल परिश्रमपूर्वक तयार केल्याबद्दल हें संमेलन मंडळाचे अध्यक्ष, कार्यवाह, सभासद व सहायक विद्वान् मंडळी ह्यांचें आभारी आहे. (मडगांव, १९३०).

(६३) शुद्धलेखनमंडळाने केलेला रिपोर्ट व सूचना ह्या संमेलनाला मान्य असल्यावरून त्यांची अंमलबजावणी संमेलनाच्या एकंदर लिखाणांत व मुद्रणांत सुरू करण्यांत यावी अशी ह्या संमेलनाच्या कार्यकारी मंडळाला व साहित्यपरिषदेला सूचना आहे. (मडगांव, १९३०).

(६४) पुढील गृहस्थांच्या व्याकरण-समितीने प्रचलित व्याकरणांतील मतभेदाचे प्रश्न विचारांत घेऊन त्या बाबतींत व समितीपुढे येणाऱ्या अन्य बाबतींत आपला साधारण निर्णय एक वर्षाच्या आंत प्रसिद्ध करावा, व पुढील संमेलनाने त्याचा विचार करावा. १ श्री. य. रा. दाते, २ श्री. कृ. पां. कुलकर्णी, ३ श्री. गो. पां. पावशे, ४ रा. सा. ना. गो. चापेकर, ५ श्री. वा. कृ. भावे, ६ श्री. श्री. ना. बनहट्टी, ७ श्री. राजारामपंत देसाई, ८ श्री. दि. धों. परांजपे. (कोल्हापूर, १९३२).

(६५) श्रीमन्त सरकार सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या भाषणांत सुचविल्याप्रमाणे यापुढे सर्व महाराष्ट्रीय व इतर प्रांतातील वाङ्मय नागरी लिपींतच छापलें जावें, म्हणजे अखिल हिंदी संस्कृति व भाषा यांच्या एकीकरणाचें कार्य सुकर होईल. यासाठी हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भाषांच्या मुख्य व जबाबदार संस्थांस नागरी लिपीचा मुद्रणांत उपयोग करण्यास विनंती करण्यांत यावी. (कोल्हापूर, १९३२).

(६६) महाराष्ट्र-साहित्य-संमेलनाने नेमलेल्या शुद्धलेखनसमितीने सुचविलेल्या व गोमन्तकांतील साहित्य-संमेलनाने मान्य केलेल्या सुधारणा आता केसरी पत्राने व नवभारत ग्रंथमालेने अंमलांत आणल्या आहेत. त्यांना नागपूर विश्वविद्यालयाने मान्यता दिली आहे. ज्ञानप्रकाश, महाराष्ट्र वगैरे पत्रें, ग्रंथमाला व ग्रंथकार यांनीहि त्या अंमलांत आणाव्या अशी त्यांना या साहित्य-संमेलनाची विनंती आहे. शुद्धलेखनसमितीने उरलेल्या वादग्रस्त प्रश्नांचा निकाल करण्याची आता निकड लावावी. मुंबईच्या विश्वविद्यालयाने शाळाधिकाऱ्यांना पत्रें पाठवून मतें मागविलीं त्यांतहि या सुधारणांना ९५ टक्केहून अधिक मतें अनुकूल पडल्यामुळे मराठीच्या अभ्यासक्रम-समितीने त्या सुधारणांना आता मान्यता द्यावी. (कोल्हापूर, १९३२).

(६७) इतर भारतीय भाषांच्या संस्थांशीं सहकार्य करून सर्व संस्कृतोत्पन्न भाषांसाठी देवनागरी लिपी नक्की करण्याकरिता एक समिति नेमावी व त्या समितीने आपला वृत्तान्त सादर करावा. (बडोदें, १९३४).

(६८) शुद्धलेखनसमितीच्या नियमांप्रमाणे यापुढे लेखक, संपादक आणि प्रकाशक यांनी, तसेंच सरकार व विश्वविद्यालय यांनी आपलीं पुस्तकें छापावीं व नव्या शुद्धलेखनाचा प्रसार करावा अशी त्यांना या संमेलनाची विनंती आहे. (बडोदें, १९३४).

(६९) बडोदें येथील संमेलनांत नेमलेल्या 'लिपिसमिती'च्या निर्णयांस हें संमेलन मान्यता देत आहे, व या कार्याकरिता खालील गृहस्थांची समिति नेमण्यांत येत आहे:—

१ श्री. य. रा. दाते
२ श्री. काका कालेलकर
३ श्री. वा. वि. जोशी
४ प्रो. ना. के. भागवत
५ श्री. धर्मानंद कोसांबी
६ श्री. आचार्य (इंदूर, १९३५)

(७०) म. सा. परिषदेने संमेलनाच्या शिफारशीवरून तयार केलेलें व संमेलनाने मान्यता दिलेलें 'नवीन शुद्धलेखन' ज्या लेखकांनी व नियतकालिकांनी स्वीकारलें आहे, त्यांचें हें संमेलन मनःपूर्वक अभिनंदन करितें व त्यांचें अनुकरण इतरांनी करावें अशी त्यांस विनंती करितें (इंदूर, १९३५).

(७१) इंदूर साहित्यसंमेलनाने मान्य केलेली एकलिपीची योजना ग्रहण करून त्या बाबतींत सरकारी रीत्या पुरस्कार दाखविण्याचा बडोदें सरकारने जो उपक्रम चालविला आहे त्याबद्दल संमेलन बडोदें सरकारचें अभिनंदन करतें आणि सरकारने योजलेली लिपी लवकर अंमलांत आणावी अशी हें संमेलन बडोदें सरकारला विनंती करीत आहे. (जळगांव, १९३६).

(७२) पाठशाळांतून मराठी व्याकरण शिकविण्याच्या कामीं जो हलगर्जीपणा होत आहे तिच्याकडे सरकारी शिक्षणखात्याचें व नगरपालिका (म्युनिसिपालिटी) आणि जिल्हा स्कूल-बोर्डांचें हें संमेलन लक्ष वेधीत आहे. (जळगांव, १९३६).

(७३) परिषदेच्या नवीन शुद्धलेखननियमांस मध्यप्रांत सरकारने मान्यता देऊन त्यांची बजावणी आपल्या ताब्यांतील पाठशाळांतून करण्याच्या दृष्टीने शिक्षणाधिकाऱ्यांना व प्रकाशकांना ज्या सूचना केल्या आहेत, त्याबद्दल हें संमेलन त्या सरकारचें अत्यंत आभारी आहे. तसेंच मुंबई सरकारचें व बडोदें संस्थानचें विद्याखातें यांनी या शुद्धलेखनसुधारणेला सामान्यपणें मान्यता दिल्याबद्दल त्यांचेहि आभार मानतें. (जळगांव, १९३६).

(७४)(अ) श्रीमंत सरकार सयाजीराव गायकवाड यांनी कोल्हापूर संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणांत सुचविल्याप्रमाणे यापुढे सर्व महाराष्ट्रीय व इतर प्रांतांतील वाङ्मय नागरी लिपींतच छापलें जावें, म्हणजे अखिल हिंदी संस्कृति व भाषा यांच्या एकीकरणाचें कार्य सुकर होईल.

यासाठी हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भाषांच्या मुख्य व जबाबदार संस्थांस नागरी लिपीचा मुद्रणांत उपयोग करण्यास विनंती करण्यांत यावी. (आ) तसेंच, इतर भारतीय भाषांच्या संस्थांशीं सहकार्य करून सर्व संस्कृतोत्पन्न भाषांसाठी देवनागरी लिपी नक्की करण्याकरिता महाराष्ट्र साहित्य परिषदेने एक समिति नेमावी व या समितीचा वृत्तान्त संमेलनाच्या पुढील अधिवेशनांत सादर करावा. (मुंबई, १९३८).

(७५) केसरी वर्तमानपत्राने व लोकशिक्षण, सह्याद्रि, किर्लोस्करादि मासिक पुस्तकांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेने पुरस्कारिलेल्या शुद्धलेखनपद्धतीचा स्वीकार केला आहे याबद्दल हें संमेलन त्यांचें अभिनंदन करीत आहे; आणि इतर नियतकालिकांनी व ग्रंथकारांनीहि या पद्धतीचा स्वीकार करावा अशी त्यांस या संमेलनाची आग्रहपूर्वक विनंती आहे. त्याचप्रमाणे नागपूर विद्यापीठाने व मध्यप्रांत सरकारने जशी या शुद्धलेखनपद्धतीस मान्यता दिली तशी मान्यता मुंबई विद्यापीठ व मुंबई सरकार यांनीहि सत्वर द्यावी अशी या संमेलनाची मागणी आहे. (अहमदनगर, १९३९).

---

[६] शिक्षण अभ्यासक्रम–बोधभाषा–विषयक

(७६) मुंबई विश्वविद्यालयांतल्या एम्.ए. व मॅट्रिक या परीक्षांत मराठी भाषेचा समावेश झाला आहेच. इतर आर्टस् परीक्षांतहि मराठी भाषेचा समावेश व्हावा असें या सभेचें मत आहे. शिवाय मराठी भाषेंतून इतर विषयांचें शिक्षण देण्याचा व परीक्षा घेण्याचा उपक्रम विश्वविद्यालयाने करण्याची वेळ आली आहे असेंहि या सभेचें मत आहे (बडोदें, १९०९).

(७७) युनिव्हर्सिटीच्या आर्टस् शाखेंतील सर्व परीक्षांच्या अभ्यासक्रमांत देशी भाषा हा विषय अवश्य विषयांपैकी एक असावा असें या सभेचें मत आहे (अकोला, १९१२).

(७८) हिंदुस्थानच्या शाळांतील व युनिव्हर्सिटीच्या आर्टस् शाखेच्या सर्व परीक्षांच्या अभ्यासक्रमांत देशी भाषा हा विषय 'अवश्य विषयां'पैकी असून त्यांत इतर महत्त्वाच्या विषयांप्रमाणे परीक्षा युनिव्हर्सिटीने देखील घ्याव्या असें या सभेचें मत आहे (मुंबई, १९१५).

(७९) दुय्यम शिक्षणाच्या सर्व विद्यालयांतून दिलें जाणारें शिक्षण देशी भाषेच्या द्वारें दिलें जावें असें या सभेचें मत आहे (मुंबई, १९१५).

(८०) सरकारी कायद्याने सध्या अस्तित्वांत असलेल्या व पुढें अस्तित्वांत येऊं घातलेल्या विश्वविद्यालयांतील सर्व शिक्षणक्रमांत इतर भाषांप्रमाणेच मराठीचा समतेच्या व मान्यतेच्या दृष्टीने समावेश करण्यांत यावा, व शिक्षणप्रदानाचें साधन या नात्यानेहि त्याचा ऐच्छिक असला तर सरसहा उपयोग करण्याचें तत्त्व स्वीकारण्यांत यावें; हें सर्वथा अत्यंत अवश्य व इष्ट आहे, असें या परिषदेचें मत आहे (बडोदें, १९२१).

(अ) वरील भागांतील धोरणास अनुसरून विश्वविद्यालयांतील सर्व परीक्षांसाठी नियत पुस्तकांसह एक अभ्यासक्रमाची योजना तयार करून ती विश्वविद्यालयाकडे धाडून देण्यासाठी (खालील गृहस्थांची) समिति नेमण्यांत यावी (बडोदें, १९२१).

(८२) मुंबई, नागपूर व उस्मानिया या विश्वविद्यालयांच्या प्रवेश-परीक्षेपर्यंत इंग्रजी भाषेखेरीज सर्व विषयांची बोधभाषा (Medium of Instruction) मराठी असावी व प्रवेश-परीक्षेनंतरच्या अभ्यासक्रमांत शक्य तोंवर तीच बोधभाषा असावी असें या संमेलनाचें मत आहे. (मुंबई, १९२६)

(८२)(१) मुंबई विश्वविद्यालयांत बी. ए. च्या अभ्यासक्रमांत मराठी भाषेचा सन्मान-शाखेंत (Honours course) त्वरित समावेश व्हावा असें या संमेलनाचें मत आहे.

(२) मुंबई विश्वविद्यालयाच्या प्रवेशपरीक्षेच्या अभ्यासक्रमांत मराठी मातृभाषा असणाऱ्यांस मराठी हा एक परीक्षेचा आवश्यक विषय असावा.

(३) मुंबई युनिव्हर्सिटीतील बी. ए. खालच्या परीक्षांतील अभ्यासक्रमांत मराठीचा आवश्यक विषय म्हणून समावेश करण्यांत यावा.

(४) मराठी भाषेंतील प्रश्नोत्तरांसाठी मराठी भाषेंत उत्तरें देणें आवश्यक असावें.

(५) वरील तत्त्वाप्रमाणे मराठी भाषेला नागपूर, उस्मानिया इत्यादि इतर युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमांत योग्य स्थान दिलें जावें. (मुंबई, १९२६).

(८३) देशी भाषांस सरकारी युनिव्हर्सिट्यांनी Vernaculer नांवाने उल्लेखिण्याबद्दल Modern Indian Languages हा शब्द वापरावा अशी संमेलनाची सर्व युनिव्हर्सिट्यांस शिफारस आहे. प्रचलित शब्दांचा कोशांतील अर्थ खालीं दिला आहेः— Vernacular (Verna–Slave) an uncultured vocabulary and dialect (मुंबई, १९२६).

(८४) मुंबई,नागपूर व उस्मानिया विश्वविद्यालयांच्या प्रवेशपरीक्षेपर्यंत इंग्रजी भाषेखेरीज सर्व विषयांची बोधभाषा मराठी (मातृभाषा) असावी व प्रवेश-परीक्षेनंतरच्या अभ्यासक्रमांतहि बोधभाषा म्हणून शक्य तेथे आज तिचा प्रवेश व्हावा (मुंबई, १९२६).

(८५) महाराष्ट्राबाहेरील प्रांतांत ज्या ज्या ठिकाणीं मराठी मातृभाषा असलेल्या लोकांची विशेष वस्ती असेल, तेथे त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची मराठींतून व्यवस्था त्या त्या प्रांतांच्या सरकारनी कांही नियमानुसार करावी अशी या सभेची विनंती आहे व तेथे असलेल्या मराठी हायस्कुलांना नागपूर, मुंबई अगर भावी महाराष्ट्र युनिव्हर्सिटीस जोडून घेण्याची परवानगी द्यावी व हें शक्य नसेल तर ज्या युनिव्हर्सिटीशीं त्यांचा संबंध असेल त्यांना मराठी विद्यार्थ्यांची परीक्षा मराठींतूनच घेण्याची तजवीज करावी (पुर्णे, १९२७).

(८६)(अ) महिलाविद्यापीठ, टिळक विद्यापीठ, समर्थविद्यालय, वैश्यविद्याश्रम (सासवनें) या संस्थांत मराठी हें शिक्षणाचें माध्यम केलें आहे याबद्दल या संमेलनास संतोष वाटत आहे.

(आ) मुंबई विद्यापीठांतील बी. ए. च्या अभ्यासक्रमांत मराठी (देशी) भाषेचा प्रावीण्यशाखेंत (Honours) अवश्यमेव समावेश व्हावा.

(इ) मुंबई विद्यापीठाच्या प्रवेश-परीक्षेच्या अभ्यासक्रांत मातृभाषा हा एक परीक्षेचा आवश्यक विषय असावा.

(ई) मुंबई विद्यापीठांत बी. ए. खालील परीक्षांतील अभ्यासक्रमांत मातृभाषा हा एक आवश्यक विषय असावा.

(उ) मातृभाषा या विषयांतील प्रश्नपत्रिका व उत्तरें त्याच भाषेंत असावीं.

(ए) वरील 'अ' ते 'उ' यांत समाविष्ट झालेल्या तत्त्वाप्रमाणे व्यवस्था उस्मानिआ नागपूर व इतर विद्यापीठांतहि व्हावी (पुर्णे, १९२७).

(८७) (अ) मुंबई, नागपूर व उस्मानिया येथील विद्यापीठांत प्रवेश-परीक्षेसुद्धा सर्व इयत्तांत इंग्रजीशिवाय इतर सर्व विषयांची बोधभाषा (माध्यम) ही स्थानिक (बहुजनसमाजाची) भाषाच असावी.

(आ) प्रवेश-परीक्षेनंतरच्या अभ्यासक्रमांतहि स्थानिक भाषा हीच बोधभाषा म्हणून शक्य तेथे आजच स्वीकारावी.

(इ) प्रश्नपत्रिका व उत्तरें बोधभाषेंतच असावीं (पुणें, १९२७).

(८८) सरकारी शिक्षणखात्यामार्फत तयार होणारे शिक्षणोपयोगी मराठी ग्रंथ रचतांना प्रमुख महाराष्ट्रीय शिक्षणशास्त्रज्ञ व प्रमुख साहित्यसेवक त्याचप्रमाणे प्रमुख शिक्षणसंस्था व वाङ्मयसंस्था, यांची सहकारिता नियमेंकरून मिळवावी (पुणें, १९२७).

(८९) हल्लीचे यू.पी.बोर्ड व पुढे होणाऱ्या मध्यहिंदुस्थान, राजपुताना व ग्वाल्हेर संयुक्त-बोर्ड यांच्या परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांत मराठी बोलणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या बरीच मोठी असते. म्हणून ज्या विषयांतलि प्रश्नांचीं उत्तरें देशी भाषांतून देण्याची परवानगी या बोर्डानें ठेविली आहे त्या विषयांस अशा महाराष्ट्र विद्यार्थ्यांना आपल्या मातृभाषेंतून (मराठींतून) प्रश्नांची उत्तरें लिहिण्याची परवानगी असावी अशी त्या बोर्डांना हें संमेलन विनंती करीत आहे (ग्वाल्हेर, १९२८).

(९०) मराठी माषेचा अभ्याक्रम मुंबई, नागपूर, उस्मानिया, आग्रा, मद्रास व म्हैसूर विद्यापीठास जोडलेल्या, महाविद्यालयाच्या प्रथमवर्षापासून एम्. ए. पर्यंत ठेवण्याकरितां वरील विद्यापीठास व अभ्यासनिमंत्रक मंडळास ही सभा विनंती करीत आहे. विशेषतः मुंबई व नागपूर विद्यापीठांत पहिल्या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमांत मराठीचा प्रवेश ऐच्छिक विषय म्हणून अद्यापि झाला नाही तो तावडतोब करावा अशी या सभेची सूचना आहे (ग्वाल्हेर, १९२८.).

(९१) हल्ली यू.पी. बोर्डाच्या परीक्षांतून मराठी हा ऐच्छिक विषय घेण्याची सोय झाली आहे. परंतु कित्येक ठिकाणच्या महाविद्यालयांत मराठी बोलणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या बरीच असून मराठी शिकविण्याची योग्य सोय झाली नसल्याने कित्येक ठिकाणीं विद्यार्थ्यांची इच्छा असतां-नाहि तो विषय घेतां येत नाही. यासाठी संमेलनाची अशी आग्रहाची सूचना आहे की, त्या त्या ठिकाणच्या विद्याधिकाऱ्यांनी मराठींचें योग्य शिक्षण देण्याची व्यवस्था करावी (ग्वाल्हेर, १९२८).

(९२) महाराष्ट्राबाहेरील प्रांतांत म्हणजे बृहन्महाराष्ट्रांत महाराष्ट्रीय लोकांना मराठी भाषेचें व मराठी भाषेंतून शिक्षण घेण्यासंबंधाने हल्ली ठिकठिकाणीं अनेक अडचणी येतात. पुष्कळ ठिकाणीं त्यांस मराठींतून शिक्षण मिळत नाही. तें मिळण्यासाठी अशा ठिकाणीं त्या त्या अडचणी दूर करण्याची व त्यांना मराठीचें व मराठींतून शिक्षण देण्याची सरकारने व्यवस्था करावी अशी या संमेलनाची आग्रहाची विनंती आहे (ग्वाल्हेर, १९२८).

(९३) परप्रांतीय महाराष्ट्रीयांच्या (बृहन्महाराष्ट्रीयांच्या) मराठी शिक्षणाची सोय करण्या-करितां व त्यांच्या अडचणींची माहिती मिळविण्याकरिता साहित्यपरिषदेने प्रचारक नेमावें व त्यांस मराठी पुस्तकें पुरवावीं आणि टिळक विद्यापीठाने पत्रव्यवहाराने व अन्य मार्गाने त्यांस मराठी शिकविण्याची व्यवस्था करावी अशी या संमेलनाची शिफारस आहे (बेळगांव, १९२९).

(९४) आग्रा विश्वविद्यालयाकडून ज्या अर्थी बी.ए.साठी मराठी विषय ठेवण्यांत आला, त्या अर्थी आता इंदूर व ग्वाल्हेर येथील दरबारांनी स्थानिक कॉलेजांतून बी. ए. साठी मराठी शिकविण्याची सोय करावी अशी हें संमेलन सदर दरबारास विनंती करीत आहे (बेळगांव, १९२९).

(९५) गतवर्षी ग्वाल्हेरच्या संमेलनांत इंदुरास होळकर व खिश्चन कॉलेजांत इंटरमिजि-एटला मराठी शिक्षणाची व्यवस्था करण्याची विनंती करणारा ठराव पास झाला. सदर ठराव इंदूर महाराष्ट्र-साहित्य सभेने होळकर सरकारच्या निदर्शनास आणिला. होळकर दरबारने इंदूरच्या महाराष्ट्रसाहित्यसभेच्या विनंतीस मान देऊन होळकर कॉलेजांत मराठी शिक्षणाची

सोय केली त्यावद्दल हें संमेलन दरबारचें अभिनंदन करीत आहे. व इंदूर खिश्चन कॉलेजांतहि मराठीच्या शिक्षणाची सोय करावी अशी त्या कॉलेजच्या अधिकाऱ्यांस विनंती करीत आहे. त्याचप्रमाणे ग्वाल्हेर सरकारलाहि हें संमेलन अशी विनंती करीत आहे की, व्हिक्टोरिआ कॉलेज, ग्वाल्हेर, व माधव कॉलेज, उज्जैन, यांत मराठी शिक्षणाची सोय सत्वर करण्यांत यावी (बेळगांव, १९२९).

(९६)(अ) मुंबई, नागपूर, उस्मानिया विश्वविद्यालयांतील बी. ए. च्या अभ्यासक्रमांत सन्मानशाखेंत (Honours Course) मराठीचा समावेश करावा.

(आ) एम्. ए. परीक्षेस मराठी विषय येऊन बसणाऱ्यास प्रबंध (Thesis) लिहून परीक्षेस बसण्याची मोकळीक असावी. सदरहू प्रबंध मराठींतच लिहिलेला असावा असा निर्बंध करावा.

(इ) एम्. ए. परीक्षेसाठी लिहावयाचे इतर विषयांवरील प्रबंध मराठींतहि लिहिण्याची परवानगी असावी.

(ई) प्रवेश, प्रथमवर्ष (F. Y. A.), इंटर आर्टस् (Inter Arts) या परीक्षांच्या अभ्यासक्रमांत संस्कृत हा आवश्यक विषय ठेवून मराठी हाहि एक आवश्यक विषय ठेवावा (वेळगांव, १९२९).

(९७) सरकारी शाळांतून जीं क्रमिक पुस्तकें अभ्यासाकरिता तयार करण्यांत येतात व लावितात तीं महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या संमतीने व साहाय्याने तयार करावींत व नेमलीं जावींत (बेळगांव, १९२९.)

(९८) हिंदुस्थानांतील निरनिराळ्या विद्यापीठांतून सुरू असलेल्या मराठी भाषेच्या अध्ययनांत एकसूत्रीपणा येणें इष्ट असल्यामुळे मॅट्रिकपासून एम्. ए. पर्यंतच्या परीक्षांचे मराठी विषयाचे अभ्यासक्रम व तदनुसार वाङ्मयांतील ग्रंथांची तपशीलवार विभागणी करण्यासाठी एक (खालील गृहस्थांचें) मंडळ निवडण्यांत यावें.

त्याचप्रमाणे मंडळाला अधिक सभासद घेण्याचा अधिकार असावा व शक्य तोंवर पत्रव्यवहाराने व अवश्य तेव्हा एकत्र जमून ह्या मंडळाने अभ्यासक्रम तयार करावा व निरनिराळ्या विद्यापीठांच्या उपयोगाकरिता तो 'साहित्यपत्रिकें'त प्रसिद्ध करण्यांत यावा (मडगांव, १९३०).

(९९) मुंबई युनिव्हर्सिटीने मॅट्रिकच्या परीक्षेस मराठी भाषा ठेवण्याची सुभा ठेविली आहे. परंतु त्यानंतर मराठी भाषेस बी.ए.च्या परीक्षेशिवाय अभ्यासक्रमांत स्थान नाही. त्यामुळे मॅट्रिकसाठी मराठी घेणारांची फारच कुचंबणा होते व मराठीचा अभ्यासहि व्हावा तसा होत नाही. सबब ही अडचण दूर करण्यावद्दल ह्या संमेलनाची युनिव्हर्सिटीस शिफारस आहे (मडगांव, १९३०).

(१००) आग्रा विद्यापीठाने बी. ए. साठी १९३३ पासून मराठी सुरू करण्याचें ठरविलें आहे. इंटरमीजिएटला मराठी सुरू होऊन दोन वर्षें झाल्याने यंदा इंटरमीजिएटमध्ये मराठी घेऊन पास होणाऱ्या विद्यार्थ्यांना यामुळे यंदाच्या वर्षापुरतेंच मराठी घेतां घेतां नाही. १९३३ ऐवजीं १९३२ पासून मराठी सुरू केल्यास ही गैरसोय दूर होणार आहे. असें न झालें तर मात्र मराठी घेऊन बी. ए. ला बसूं इच्छिणारांची फार कुचंबणा होईल हें निर्विवाद आहे. तरी आग्रा विद्यापीठाने एवढी गैरसोय दूर करावी अशी हें संमेलन आग्रा विद्यापीठाधिकाऱ्यांस विनंती करीत आहे (मडगांव, १९३०.)

(१०१)[अ] निजाम संस्थानांतील मराठवाड्यांत जुने मराठी हस्तलिखित ग्रंथ पुष्कळ आहेत. तरी या संस्थानाच्या निरनिराळ्या जिल्ह्यांतील विद्याव्यासंगी माणसांचें एक मंडळ योजून त्याने जुन्या ग्रंथांचा संग्रह करून तो सुरक्षित ठेवण्याचें व त्यांतील उपयुक्त तेवढें छापून प्रसिद्ध करण्याचें काम हातीं घ्यावें.

[आ] येथील उस्मानिया युनिव्हर्सिटी कॉलेजांत यंदापासून संशोधनशाखा उघडली असून त्याकरिता दरमहा ७५ रुपयांची शिष्यवृत्ति दिली आहे, याबद्दल ही सभा युनिव्हर्सिटी कौन्सिलचे मनःपूर्वक अभिनंदन करीत आहे व त्यांच्या संशोधनशाखेस अशा संग्रहाचा फार उपयोग असल्यामुळे युनिव्हर्सिटी कौन्सिलने या कामास सढळ हाताने मदत करावी अशी ही सभा विनंती करीत आहे (दक्षिण हैद्राबाद, १९३१).

(१०२)[अ] निजाम इलाख्यांतील मराठी विभागांत प्राथमिक शिक्षणाची सोय समाधानकारक नाही, तरी मराठी शिक्षणाच्या स्वतंत्र शाळा उघडून त्यांत मराठी मातृभाषा असणाऱ्या शिक्षकांसच नेमावें अशी या संमेलनाची विनंती आहे.

[ब] ज्याप्रमाणे उस्मानिया विद्यापीठाच्या दुय्यम शिक्षणाच्या शाळांतून सर्व शिक्षण उर्दु भाषेच्या द्वारा दिलें जातें, त्याचप्रमाणे तें मराठी विभागांत मराठी भाषेच्या द्वारा देण्याची व्यवस्था करण्यांत यावी (द. हैद्राबाद, १९३१.)

(१०३) हिंदुस्थानांतील निरनिराळ्या विद्यापीठांतून सुरू असलेल्या मराठी भाषेच्या अध्ययनांत एकसूत्रीपणा येणें इष्ट असल्यामुळे मॅट्रिकपासून एम्.ए.पर्यंत परीक्षांचे मराठी विषयांचे अभ्यासक्रम व तदनुसार वाङ्मयांतील ग्रंथांची तपशिलवार विभागणी करण्यासाठी गतवर्षी (१५ वे संमेलनांत) एक मंडळ स्थापन करण्यांत आलें होतें. त्या मंडळाने अद्याप अहवाल सादर केला नाही; तरी त्या कार्याचें महत्त्व जाणून मंडळाने शक्य तितक्या लवकर अहवाल प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करावी; व मंडळाचे संयोजक (कन्व्हीनर) प्रो. शं. दा. पेंडसे यांस नेमलें असून कमिटीच्या खर्चाकरिता २५ रु. मंजूर केले आहेत (द. हैद्राबाद, १९३१).

(१०४) मराठी प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत करावें आणि दुय्यम शिक्षण देशी भाषांतून देण्याचा उपक्रम करावा अशी या संमेलनाची मुंबई-सरकार व महाराष्ट्रांतील संस्थानिक यांना आग्रहाची विनंती आहे. (कोल्हापूर, १९३२)


(१०५) दुय्यम शाळांत संगीताचें शिक्षण देतांना मराठी चिजांचा उपयोग करण्याचा उपक्रम ज्या संस्था करीत आहेत त्यांचें अभिनंदन करून सदर शिक्षण मराठी चिजांच्याच द्वारें सर्वत्र दिलें जावें अशी या सभेची शिफारस आहे. (नागपूर, १९३३)

(१०६) (अ) ज्यांची जन्मभाषा मराठी आहे अशा विद्यार्थ्यांचें दुय्यम शिक्षण मराठींतूनच दिलें जावें असें या सभेचें मत आहे.

(आ) विश्वविद्यालयीन शिक्षणाचें म ाठी हें एक माध्यम असावें अशी या संमेलनाची शिफारस आहे (नागपूर, १९३३)

(१०७)(अ) अजमेर बोर्डाने आपल्या हायस्कूल, व इंटरमीजिएट परीक्षांस मोडी लिपीचें वाचन व लेखन हा विषय ठेविला आहे. मराठीच्या जुन्या व अत्यंत उपयुक्त लिखाणांचें व लिपीचें अशा रीतीने पुनरुज्जीवन करण्याचा उपक्रम अजमेर बोर्डाने केला ह्याबद्दल हें संमेलन त्याचें गौरवयुक्त अभिनंदन करीत आहे.

(आ) आग्रा युनिव्हर्सिटीने आपल्या अभ्यासक्रमांत मराठी हा विषय बी. ए. पावेतो



ठेवून मराठी बोर्डहि निर्माण केलें आहे. ह्याबद्दल हें संमेलन सदर युनिव्हर्सिटीचें सगौरव अभिनंदन करीत आहे. तसेंच पुढे एक पाऊल टाकून एम्. ए. च्या परीक्षेसहि मराठी हा विषय ठेवावा व उत्तर हिंदुस्थानांत मराठीभाषकांची सोय तिने करावी या संमेलनाची आग्रहाची विनंती आहे (नागपूर, १९३३).

(१०८) वर्तमानपत्रांचा प्रसार वाढत आहे व लोकशिक्षणाचें साधन या दृष्टीने त्यांचें महत्त्व मोठें आहे. तेव्हा योग्य संपादकांचा पुरवठा पडावा म्हणून एक वृत्तपत्रविषयक शिक्षण-शाखा व पदवी चालवावी अशी मुंबई विश्वविद्यालयास या संमेलनाची शिफारस आहे.

(बडोदें, १९३४).

(१०९) मुंबई विश्वविद्यालयाच्या प्रवेश परीक्षेच्या इंग्रजीशिवाय सर्व विषयांचें शिक्षण व परीक्षा मातृभाषेंतून घ्याव्या अशी या संमेलनाची शिफारस आहे (बडोदें, १९३४).

(११०) बहुतेक सर्व विद्यापीठांच्या प्रवेशपरीक्षेसाठी ज्याप्रमाणे अभ्यासक्रमांत मातृभाषा येऊन ती बोधभाषाहि झाली आहे, त्याचप्रमाणे पुढे पदवीपरीक्षांसाठीहि मातृभाषेला तिचें योग्य स्थान मिळवून देण्यासाठी खटपट व्हावी असें या संमेलनाचें मत आहे (इंदूर, १९३५).

(१११) आग्रा युनिव्हर्सिटींत एम्. ए. परीक्षेसाठी मराठी हा विषय असावा व तो शिकविण्याची सोय आग्रा युनिव्हर्सिटींतील होळकर कॉलेज, इंदूर, व्हिक्टोरिया कॉलेज, ग्वाल्हेर इत्यादिकांत करावी अशी या संमेलनाची विनंती आहे. (इंदूर, १९३५)

(११२) प्राथमिक शिक्षक तयार करणाऱ्या ट्रेनिंग कॉलेज संस्थांतून पूर्वीप्रमाणे संस्कृत हा विषय शिक्षणक्रमांत दाखल करण्यांत यावा (जळगांव, १९३६).

(११३) महाराष्ट्रांत किंवा अन्यत्र जेथे जेथे मराठी भाषा शिक्षणाचें माध्यम म्हणून प्रचलित आहे, अथवा जेथे मराठी भाषा आणि साहित्याचा अभ्यास आवश्यक किंवा ऐच्छिक म्हणून केला जातो तेथील अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तकें यांची पाहणी करून त्याविषयी अभिप्राय देण्यासाठी आणि विधायक सूचना करण्यासाठी आणि त्या सूचना अंमलांत आणण्याच्या बाबतींत मदत करण्यासाठी परिषदेने एक स्थायी समिति नेमावी. या स्थायी समितीची मुदत पांच वर्षांची राहील. समितीने आपल्या कार्याचा अहवाल परिषदेकडे सहा सहा महिन्यांनी आणि संमेलनाकडे प्रत्येक अधिवेशनाच्या वेळीं सादर करावा (जळगांव, १९३६).

(११४) संमेलनाने मागे सुचविल्याप्रमाणे पुढील दसऱ्यापासून परीक्षा घेण्याचें जें परिषदेने योजिलें आहे त्याबद्दल संमेलनाला संतोष होत असून, या परीक्षांचा फायदा गुजराती-हिंदी परिक्षाप्रमाणे शाळा-कॉलेजाबाहेरील बृहन्महाराष्ट्रांतील भाषाभ्यासी स्त्री-पुरुषांनी जरूर घ्यावा अशी या संमेलनाची शिफारस आहे (जळगांव, १९३६).

(११५) आग्रा विद्यापीठाने आपल्या अभ्यासक्रमांत मराठीचा समावेश पूर्वीपासून केला आहे, ही गोष्ट अभिनंदनास पात्र आहे. या विद्यापीठाचें धोरण पूर्ण होण्यासाठी एम्. ए. लाहि मराठी विषय लावावा. तसेंच इंदूर, ग्वाल्हेर इत्यादि ठिकाणच्या कॉलेजांत एम्. ए च्या मराठी शिक्षणाची सोय व्हावी अशी या संमेलनाची आग्रा विद्यापीठास आणि त्या त्या संस्थानिकांस आग्रहाची विनंती आहे (मुंबई, १९३८).

(११६) मराठी ही मातृभाषा असल्यामुळे तिला अभ्यासक्रमामध्ये स्वतंत्र स्थान देऊन तीमध्ये पास होण्यास किमान गुण शे. ४० ठेवावेत अशी या संमेलनाची शिफारस आहे (अहमदनगर, १९३९).

(११७) महाराष्ट्र साहित्य परिषद् ही साहित्यप्रांतांतील प्रातिनिधिक संस्था असल्याने

शालेय अभ्यासक्रम, पुस्तकांची निवड वगैरे भाषाविषयक गोष्टींचा विचार करतांना विश्वविद्यालयाने व सरकाराने परिषदेचा अभिप्राय घ्यावा असें या संमेलनाचें मत आहे. (अहमदनगर, १९३९).

---

[७] परिभाषा व कोश

(११८) महाराष्ट्र वाङ्मयांत शास्त्रीय ग्रंथांची भर घालतांना योजावयाची परिभाषा पाश्चात्यांची जशीच्या तशी न घेतां शक्य तितकी स्वदेशीय असावी व तशी परिभाषा आज तयार नसल्यास संस्कृतादि प्राच्य भाषांची मदत घेऊन ती तयार करावी; मात्र सर्व हिंदुस्थानांत मिळून एकच परिभाषा प्रवर्तित होईल असा शक्य तितका प्रयत्न करावा (बडोदें, १९२१).

(११९) मराठी भाषेचा विस्तार, महत्त्व व तिजमधील शब्दभांडार लक्षांत घेता, विशेषतः तिच्या वाढत्या अध्ययनाचीं व प्रगतीचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलेलीं आहेत, अशा वेळीं मूलरूपें, शब्दसिद्धि, समानार्थक शब्द, योजनादर्शक अवतरणें वगैरे सर्व अंगोपांगांनी पूर्ण असा व्यापक व विस्तृत मराठी शब्दांचा कोश अत्यंत अवश्य झालेला असून मराठी साहित्य परिषद्, इतर साहित्यसभा व महाराष्ट्रांतले लोक यांच्या सहकारितेने किंवा व्यक्तिस्फूर्तीने ही उणीव लवकरच भरून निघेल अशी या सभेस आशा वाटत आहे (बडोदें, १९२१).

(१२०) मराठी भाषेचा एक सर्वांगीण बृहत्कोश व्हावा असें या सभेचें मत आहे व हें काम ज्ञानकोशांतील संपादक मंडळानें हातीं घ्यावें अशी या सभेची शिफारस आहे आणि मराठी साहित्य–परिषदेनेहि ह्या कार्यास सर्वप्रकारें साहाय्य द्यावें. (पुणें, १९२७).

(१२१) मराठी शास्त्रीय परिभाषा ठरविणें इष्ट आहे म्हणून तज्ज्ञांचें एक मंडळ नेमावें असें या सभेचें मत आहे. (ग्वाल्हेर, १९२८).

(१२२) या संमेलनाला महाराष्ट्र साहित्यांत शास्त्रीय ग्रंथांची अत्यंत उणीव भासत आहे व ही दूर करण्याच्या दिशेने चाललेल्या पुणें येथील 'महाराष्ट्र शास्त्रीय परिभाषा मंडळा'च्या कार्याची माहिती त्यास असून शास्त्रीय ग्रंथांची वृद्धि होण्याकरिता हें संमेलन सर्व शास्त्रज्ञांना अशी विनंती करतें की, प्रत्येक शास्त्रावर माध्यमिक व उच्च शिक्षणक्रमांत वापरता येईल, त्याचप्रमाणे ज्याचा स्वतंत्र अभ्यासाकरिता उपयोग करितां येईल, असा एक ग्रंथ येत्या वर्षांत त्या त्या शास्त्रज्ञांनी तयार करून प्रसिद्ध करावा; आणि शिवाय हें संमेलन 'मुंबई विश्वविद्यालया'ला अशी विनंती करतें की, सर्व शास्त्रांवर स्वतंत्र अभ्यासाकरिता मराठी भाषेंत ग्रंथनिर्मिति होण्याची योजना मुंबई विश्वविद्यालयाने शक्य तितक्या लवकर करावी (बडोदें, १९३३).

(१२३) महाराष्ट्र शब्दकोशाच्या संपादकांनी शास्त्रीय परिभाषाकोश करण्याचें जें योजिलें आहे त्याला या संमेलनाची पूर्ण मान्यता आहे व कोशाच्या कार्याला अखिल महाराष्ट्राने सहानुभूति दाखवावी अशी त्याची शिफारस आहे. (अहमदनगर, १९३९)

---

[८] आक्षिप्त वाङ्मय व अन्याय-निर्बंधनिवारण

(१२४) ज्या अर्थी सरकारने नेमलेल्या समितीने मुद्रणनियंत्रण कायदा रद्द करावा अशी सूचना केली आहे व तीप्रमाणे तो लवकरच रद्द होणार आहे त्या अर्थी त्या कायद्यान्वयें पूर्वी जप्त केलेल्या पुस्तकांवरील मुद्रण-प्रतिबंध ताबडतोब दूर केला जावा (बडोदें, १९२१).

(१२५) बडोदें येथील साहित्य-संमेलनांत मंजूर झालेल्या ठरावाला अनुसरून ही सभा आपलें मत प्रदर्शित करिते की, सरकारांनी आक्षिप्त ठरविलेल्या पुस्तकांमध्ये आक्षेप घेण्यासारखे भाग कोणते आहेत, तें ठरविण्याविषयी सरकारांनी एक लोकप्रतिनिधींचें मंडळ नेमावें व तें मंडळ जे कांही भाग आक्षेप घेण्यासारखे आहेत असें ठरवील तेवढे गाळून पुस्तक पुनश्च छापून प्रसिद्ध करण्याला सरकारांनी परवानगी द्यावी (मुंबई, १९२६).

(१२६) सरकारी नियंत्रणामुळे शिक्षणसंस्थांतून मराठी पुस्तकांची निवड करावयास व्यवस्थापकास स्वातंत्र्य नाही. यायोगें पुष्कळ सरस मराठी वाङ्मय योग्य असूनहि विद्यार्थ्यांपुढे येत नाही. तरी वरील प्रकारचीं नियंत्रणें त्वरित दूर होणें अवश्य आहे, असें या सभेचें मत आहे. (पुणें, १९२७).

(१२७) निजाम इलाख्यांतील मराठी प्रजेच्या प्राथमिक शिक्षणांत मराठीला गौण स्थान आहे. बऱ्याच मराठी वृत्तपत्रांना बंदी आहे. बोधभाषा म्हणूनहि मराठीचा उपयोग होत नाही. मराठीतून शिक्षण देणाऱ्या खासगी संस्थांच्या वाढीस अडथळा होत आहे. या प्रकारें मराठी प्रजेच्या मनाचा विकास होण्यास प्रतिबंध होत आहे याबद्दल या सभेस दुःख होत असून हे प्रतिबंध दूर होण्याची निजामी प्रजा व निजाम सरकार यांनी खटपट करावी (पुणें, १९२७).

(१२८) पोर्तुगाल सरकारने आपल्या वसाहतीकरिता म्हणून जो एक मुद्रणाचा कायदा अस्तित्वांत आणलेला आहे, त्यांतील कांही कलमें पोर्तुगीज-महाराष्ट्रांतील मराठी नियतकालिकांना मारक झालीं असल्यामुळे तीं शक्य तितक्या लवकर दूर करण्यांत यावीं, अशी ही संस्था गोव्याच्या सरकारास विनंती करीत आहे (पुणें, १९२७).

(१२९) प्रेस ॲक्टाने किंवा इतर एखाद्या कायद्याने सरकाराने एखादें पुस्तक सरकारजमा केलें असल्यास, त्या पुस्तकांतील आक्षिप्त भाग वगळून पुस्तक पुन्हा छापण्यास कोणी तयार असेल तर, सरकाराने असे भाग दाखवून देऊन ते गाळून टाकण्याच्या शर्तीवर तरी छापण्यास परवानगी द्यावी असें या सभेचें मत आहे (पुणें, १९२७).

(१३०) सरकारजमा झालेल्या मराठी पुस्तकांतील वाङ्मयदृष्ट्या बहुमोल असलेल्या कांही निवडक पुस्तकांच्या पुनर्मुद्रणास सरकारी अनुज्ञा मिळावी याविषयी संमेलनाच्या वतीने मध्यप्रांत व मुंबई सरकारांस विनंती करण्यांत यावी.

(१३१) (अ) मराठी भाषा शिकविण्याची व्यवस्था नागपूर येथील हिस्लॉप व मॉरिस् कॉलेजांत केली म्हणून ही सभा समाधान व्यक्त करिते.

(आ) उमरावती महाविद्यालयांतहि बहुतेक विद्यार्थी मराठी बोलणारे असल्यामुळे मराठी शिकविण्याची तेथेंहि व्यवस्था व्हावी अशी या सभेची शिक्षणाधिकाऱ्यांस आग्रहाची मागणी आहे.

(इ) मुंबई येथील एल्फिन्स्टन महाविद्यालयांतील मराठी शिकविणाऱ्या अध्यापकाची जागा कमी करण्यांत आली ही शोचनीय गोष्ट असून त्या योगाने मुंबई विद्यापीठांतील मराठी शिक्षणाची बरीच अडचण व कुचंबणा झाली आहे. तरी उपरोक्त महाविद्यालयांत मराठी शिक्षणाची पुन्हा योग्य व्यवस्था करावी अशी या सभेची शिक्षणाधिकाऱ्यांस आग्रहाची सूचना आहे.

(ई) तसेंच इंदूरच्या होळकर व खिश्चन महाविद्यालयांत मराठी बोलणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पुष्कळ असल्यामुळे तेथेहि मराठी शिकविण्याची व्यवस्था व्हावी अशी तेथील अधिकाऱ्यांस आग्रहाची विनंती आहे.

(उ) हें संमेलन ग्वाल्हेर येथील शिक्षणमंत्री यांस अशी प्रशस्ति आग्रहाने करीत आहे की, व्हिक्टोरिआ महाविद्यालयांत इंटर व बी. ए. वर्गांकरिता मराठी हा विषय शक्य तितक्या लवकर चालू करण्याची व्यवस्था करावी (ग्वाल्हेर, १९२८).

(१३२) गोमांतकांत पोर्तुगीज व मराठी या उभय भाषांतील नियतकालिकांवर असलेल्या सामान्य निर्बंधांशिवाय मराठी नियतकालिकांना गव्हर्नरांची खास परवानगी मिळविण्याचा विशेष निर्बंध पाळावा लागतो. हा निर्बंध मराठी भाषेस अपमानास्पद व अडचणी उत्पन्न करणारा असल्याने तो दूर करण्याची शिफारस गोवा सरकाराने पोर्तुगाल सरकारास करावी अशी या संमेलनाची गोव्याच्या गव्हर्नर जनरलांना विनंती आहे. तसेंच आजच्या पोर्तुगीज सरकारने गोमांतकांतील पोर्तुगीज प्राथमिक शिक्षणाच्या केलेल्या योजनेत मराठी भाषेच्या शालेय शिक्षणास प्रतिबंधक अशीं जीं कलमें आहेत तीं काढून टाकून व गतवर्षी कायदेमंडळांत पास झालेल्या ठरावानुसार सरकारी मराठी शाळांच्या सुधारणा करून, नवीन मराठी शाळा उघडून आणि इतर रीतीनें प्रोत्साहन देऊन मराठी भाषेच्या प्रसारास व अभ्यासास साहाय्य करावें अशी गोवे सरकारास विनंति आहे (बेळगांव, १९२९).

(१३३) मुंबई एल्फिन्स्टन कॉलेजांतील मराठी प्रोफेसराची जागा कमी करण्यांत आली आहे. ती ताबडतोब पुन्हा कायमची भरण्यांत यावी अशी या संमेलनाची मुंबई सराकारास आग्रहाची विनंती आहे (बेळगांव, १९२९).

(१३४) गोमंतकांतील मराठी भाषेच्या उत्तेजनाप्रीत्यर्थ हें साहित्यसंमेलन पोर्तुगीज सरकारास खालील सूचना करीत असून त्या अंमलांत येण्याची तजवीज सरकारामार्फत व्हावी अशी त्या सरकारास विनंती करीत आहेः—

(१) गोमंतकांत मराठी प्रकाशकांवर घातले गेलेले निर्बंध मराठी वाङ्मयविकासास प्रतिबंधक असल्यावरून ते दूर करण्याविषयी पोर्तुगीज सरकारास पुन्हा विनंती आहे.

(२) गोमंतकांतील अर्ध्याअधिक लोकांची मातृभाषा मराठी असल्यावरून त्यांचें प्राथमिक शिक्षण त्याच भाषेतून होणें इष्ट आहे. प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत असावें असें पोर्तुगीज रिपब्लिकच्या राज्यघटनेंत स्पष्ट कलम आहे. सबब प्राथमिक मराठी शाळा सरकारानें स्थापन कराव्या.

(३) सांप्रत चालू असलेल्या सरकारी मराठी शाळांची पुनर्घटना जी (१९२४ चा क्रमांक १२३ चा डिप्लॉम) कायद्यान्वयें करण्यांत आली आहे तिची अंमलबजावणी लवकर करण्यांत यावी.

(४) लिसेव नॉसियॉनालांतील मराठीचा कोर्स शिक्षकाच्या अभावीं तूर्त बंद आहे तो फिरून चालू करण्यांत यावा.

(५) पूर्वी ज्या ज्या कायद्यान्वयें सरकारी हुद्यांस अगर वाकिलीच्या परीक्षांस लिसेवांतील मराठी कोर्साचा जो दाखला घेण्यांत येत होत होता, तो दाखला फिरून घेण्यांत यावा.

(६) प्रांतिक कायदेमंडळ, म्युनिसिपालिट्या इ. मधील सभासदांच्या निवडणुकींत केवळ देशी भाषेचें ज्ञान हें मताधिकाराच्या पात्रतेचें गमक समजण्यांत यावें.

(७) सरकारी वाचनालयांत मराठी वाचकांच्या सोयीसाठी, मराठी ग्रंथ मासिकें व वृत्तपत्रें ठेवण्यांत यावीं. (मडगांव, १९३०).

(१३५) [अ] मराठी भाषेचें उच्च शिक्षण देण्याचे बाबतींत निरनिराळ्या प्रांतांतील शिक्षणाधिकारी जें अक्षम्य दुर्लक्ष करीत आहेत त्याबद्दल ही सभा तीव्र नापसंती दर्शविते.

[ब] मुंबई इलाख्यांत देशी भाषांच्या अध्यापकांचे पगार निम्मे करण्यांत आले या गोष्टीचा ही सभा निषेध करते.

[क] निरनिराळ्या कायदेकौन्सिलांतील मराठी सभासदांना ही दुरवस्था दूर करण्याची खटपट करावी अशी या संमेलनाची विनंती आहे. (द. हैद्राबाद, १९३१).

(१३६) निजाम सरकारच्या शिक्षणखात्याने खाजगी शाळांसंबंधाने जो कायदा चालू केला आहे तो मराठीच्या प्रगतीस विघातक आणि महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणक्रमांत अडथळा उत्पन्न करणारा असल्यामुळे हें संमेलन सदरहु कायद्याचा निषेध करिते; व निजाम सरकारने हा कायदा ताबडतोब रद्द करावा अशी या संमेलनाची आग्रहाची विनंती आहे (द. हैद्राबाद, १९३१).

(१३७) निजाम सरकाराने कोणतीहि सभा परवानगीशिवाय भरवूं नये असा जो हुकूम काढला आहे, तो वाङ्मयात्मक चर्चेस व शिक्षणप्रसारास विघातक असल्यामुळे शक्य तितक्या लवकर रद्द करावा, अशी या संमेलनाची विनंती आहे (द. हैद्राबाद, १९३१).

(१३८) निजाम इलाख्यांत 'ज्ञानप्रकाश'वरील बंदीचा हुकूम काढून घेतल्याबद्दल ही परिषद् संतोष व्यक्त करते व 'केसरी' वगैरे वर्तमानपत्रांवर असलेली बंदी काढून टाकण्याबद्दल ही परिषद् निजाम सरकारास आग्रहाची विनंती करते; त्याचप्रमाणे 'हैद्राबाद व देशी संस्थानें' वगैरे उपयुक्त ग्रंथांवरील बंदीहि ताबडतोब उठवावी असें सुचविते (द. हैद्राबाद, १९३१).

(१३९) निजाम इलाख्यामध्ये केवळ मराठी मातृभाषा असणारे सहा जिल्हे व अर्धमराठी चार जिल्हे असतांहि मराठी शाळा चालविणें, कोर्टदरबारांत मराठींतून व्यवहार करणें, दस्तऐवज मराठींत लिहिणें, नोंदणें इत्यादि अनेक गोष्टींवर जे निर्बंध आहेत व उर्दूस जें प्राधान्य दिलें जात आहे, त्यामुळे प्रजेचे अनेक प्रकारें नुकसान होत आहे. तरी या बाबतींत मराठीस प्राधान्य मिळेल अशी तजवीज निजाम सरकाराने करून जनतेची अडचण दूर करावी अशी या संमेलनाची विनंती आहे. (कोल्हापूर, १९३२)

(१४०) मराठी भाषेतील अनेक ग्रंथ आक्षिप्त म्हणून सरकारजमा करण्यांत आले आहेत. त्यांतील वाङ्मयदृष्ट्या महत्त्वाच्या ग्रंथांवरील निर्बंध दूर व्हावे अशी मुंबई सरकारास या संमेलनाची विनंती आहे. या कामीं जरूर तो सल्ला साहित्य-परिषदेने देऊन सदर निर्बंध दूर होतील अशी खटपट करावी; तसेंच मुंबई सरकारने अशा ग्रंथांची यादी साहित्य-परिषदेकडे पाठवावी. (कोल्हापूर, १९३२)

(१४१) गोव्यांतील निम्याहून अधिक प्रजेची मातृभाषा मराठी असतां व तदनुसार ती आपले धार्मिक, वाङ्मयात्मक, व्यापारविषयक आणि ग्रामसंस्था व देवस्थानें यांच्यासंबंधीचे व्यवहार त्याच भाषेंतून करीत असतां, सरकाराने आजवर तिची अक्षम्य उपेक्षा केली आहे. आपल्या प्रजेच्या मातृभाषेच्या स्वातंत्र्यास व उत्कर्षास सर्व प्रकारें साहाय्य करणें सरकाराचें कर्तव्य असल्याने या संमेलनाची गोवें सरकारास अशी विनंती आहे की,

(१) त्याने मराठीस आपली मातृभाषा समजणाऱ्या लोकांकरितां प्राथमिक शिक्षण मराठींतून देण्याचा सार्वत्रिक उपक्रम होईल तितक्या लौकर करावा;

(२) मराठी भाषा जाणणारांचा काढून घेतलेला मताधिकार त्यांना पुन्हा देण्यांत यावा;

(३) जन्म, मृत्यु इत्यादि गोष्टींच्या नोंदणीच्या कायद्यांत मराठी सही लिहिणारांची सही येत नाही, ती घेतली जावी;

(४) मराठी भाषेंतून नियतकालिक काढावयाचें झाल्यास गव्हर्नर-इन्-कौन्सिलची खास परवानगी घ्यावी लागते, ती घ्यावी लागूं नये; आणि

(५) सक्तीच्या लश्करी शिक्षणाच्या कायद्यांत पोर्तुगीज जाणणारांना जे हक्क दिले आहेत, ते मराठी जाणणारांनाहि देण्यांत यावे. (कोल्हापूर, १९३२)

(१४२) दक्षिण हैद्राबाद (निजाम–इलाखा) व गोवें प्रांत येथें मराठी भाषेच्या शिक्षणादि बाबतींत असलेले अडथळे दूर होतील अशी खटपट करण्याकरिता खालील गृहस्थांचें शिष्टमंडळ त्या त्या प्रांतातील अधिकाऱ्यांकडे पाठविण्याची योजना साहित्यपरिषदेने करावी अशी या संमेलनाची विनंती आहे.

(१) सरदार माधवराव किबे, इंदूर, (२) रा. सा. ना. गो. चापेकर, बदलापूर, (३) श्री. वामनराव नाईक, हैद्राबाद, (४) श्री. पांडुरंगराव जोशी, है. (५) श्री. शांबाराव सरदेसाई, गोवें. (नागपूर, १९३३).

(१४३) राजकीय दृष्टया आक्षेपार्ह म्हणून आतापर्यंत जप्त झालेल्या पुस्तकांपैकी जीं वाङ्मय-दृष्ट्या उत्कृष्ट असतील त्यांवरील जप्ती सरकारनें उठवावी म्हणून परिषदेने पुढील वर्षी जोराने खटपट करावी अशी या सभेची आग्रहाची विनंती आहे. (नागपूर, १९३३).

(१४४) राष्ट्राच्या आकांक्षा व्यक्त करणाऱ्या व तरुण पिढीला मार्गदर्शक होणाऱ्या अशा ज्या राजकीय पुस्तकांवर, त्याचप्रमाणे कामगारांच्या हिताच्या दृष्टीने लिहिल्या गेलेल्या पुस्तकांवर सरकारने जे निर्बंध घातले आहेत त्या निर्बंधांमुळे लेखन– मुद्रण व प्रकाशन-स्वातंत्र्याची पिच्छेहाट होत आहे. अशा वाङ्मयावरील जप्ती उठवून सदर निर्बंध सरकारने काढून घ्यावे असा प्रयत्न करण्यासाठी हें संमेलन पुढील उपसमिति नेमीत आहे; (१) श्री. वि. रा. शिंदे (अध्यक्ष), (२) प्रो. ध. रा. गाडगीळ, (३) श्री. पां. वा. काणे, (४) श्री. न. चिं. केळकर, (५) डॉ. गो. स. घुर्ये, (६) प्रो. ना. के. बेहरे, आणि (७) श्री. य. रा. दाते (चिटणीस) (बडोदें, १९३४).

(१४५) साहित्य व संस्कृति यांची अभिवृद्धि होण्यास योग्य असें भाषण– लेखन– व मुद्रण–स्वातंत्र्य हीं अत्यंत आवश्यक असल्याने समाजाच्या या मूलभूत तत्त्वांना बाध आणणारे कायदे व हुकूम रद्द व्हावे अशी या संमेलनाची सरकाराकडे मागणी आहे (इंदूर, १९३५).

(१४६) सरकाराने आक्षिप्त ठरवून जप्त केलेल्या वाङ्मयांतील आक्षेप घेण्यासारखे भाग कोणते हें दाखवून ते गाळल्यानंतर जप्त पुस्तकें पुनर्मुद्रित करण्याला सरकार परवानगी देत नाही याबद्दल या संमेलनास असंतोष वाटत आहे (जळगांव, १९३६).

(१४७) प्रेस ॲक्टाच्या अंमलापासूंनी मराठी साहित्याच्या निर्मितीला व प्रसाराला अडथळे येत असून लेखनस्वातंत्र्याची पायमल्ली होत आहे म्हणून हा कायदा करणाऱ्या कायदेमंडळाचा हें संमेलन निषेध करीत आहे व प्रेस ॲक्ट रद्द होऊन भाषण, लेखन व मुद्रणस्वातंत्र्याच्या हक्कांचें रक्षण करण्याचे व त्यांविषयी लोकमत जागृत करण्याचे प्रयत्न म. सा. परिषदेने करावे व तशा प्रयत्नांस साह्य करावें अशी या संमेलनाची शिफारस आहे (जळगांव, १९३६).

(१४८) सरकारी नोकरींत असतांना लिहिलेली एक कविता आक्षिप्त ठरवून तेवढ्या सबबीवर श्री. ना. के. बेहरे यांना मध्यप्रांत सरकारने नोकरीवरून दूर केले, असाच प्रकार इतरहि कांही प्रांतांत कांही नोकरांच्या बाबतींत झाला आहे. त्या सर्वांच्या प्रकरणांची फेरचौकशी करून त्यांना समाधानकारक न्याय द्यावा अशी या संमेलनाची त्या त्या सरकाराकडे मागणी आहे (मुंबई, १९३८).

(१४९) नाटक करण्याला परवानगी देण्यासंबंधीची सध्याची पद्धति बेबंद स्वरूपाची आहे. नाटक करण्यासाठी डि. मॅजिस्ट्रेटकडून निरनिराळे परवाने मिळवावे लागतात. हे अधिकारी

आपल्या लहरीप्रमाणे परवाने देतात किंवा नाकारतात. या प्रकारांत एका ठिकाणीं परवानगी मिळालेल्या नाटकांस दुसऱ्या ठिकाणीं बरेच वेळां मज्जाव होतो किंवा फेरबदल सुचविले जातात. यामुळे नाटक मंडळीचें पुष्कळच नुकसान होतें; तशीच वाङ्मयाची व कलेचीहि हानि होते. ही अनवस्था टाळण्यासाठी नाटकांच्या प्रयोगांकरिता परवाना देण्याचा अधिकार प्रत्येक प्रांतांत एकाच अधिकाऱ्याला देण्यांत यावा व असा परवाना मिळाल्यावर त्या सर्व प्रांतांत कोठेहि नाट्यप्रयोग करतां यावा. यासाठी जरूर वाटल्यास सध्याच्या कायद्यांत दुरुस्ती करून किंवा इतर प्रकाराने योग्य ती व्यवस्था करून घेण्याची खटपट म. सा. परिषदेने करावी (मुंबई, १९३८).

(१५०) मुंबई येथील एल्फिन्स्टन कॉलेजांत मराठी भाषेच्या अध्यापनाचीं गेलीं कित्येक वर्षें सोय नसल्यामुळे मराठी विद्यार्थ्यांची व भाषेची फार हेळसांड होत आहे. अशा स्थितींत पुढील वर्षापासून प्रस्तुत कॉलेजांत एक मराठी व्याख्यात्याची तात्पुरती जागा सरकारने निर्माण केली ही गोष्ट कांहीशी समाधानकारक असली तरी या संस्थेंत मराठी भाषेचा स्वतंत्र व कायम प्राध्यापक नेमून व मराठी भाषाध्यापनाची उत्तम सोय करून हा अन्याय दूर करावा अशी या संमेलनाची आग्रहाची विनंती आहे. (मुंबई, १९३८).

(१५१) मुंबई व मध्यप्रांत मंत्रिमंडळांनी आक्षिप्त म्हणून गणल्या गेलेल्या कांही पुस्तकांवरील बंदी उठविली आहे याबद्दल हें संमेलन या मंत्रिमंडळांचें अभिनंदन करीत आहे, व बाकीच्या पुस्तकांवरील बंदीहि विनाविलंब उठविण्यांत यावी अशी आग्रहाची मागणी करीत आहे. तथापि बंदी उठविण्याचें धोरण दिरंगाईचें झालें असल्याने ही बंदी न उठविल्यामुळे वाङ्मयाची व जीवनाची हानि होत आहे, आणि राष्ट्राच्या प्रगतीच्या दृष्टीने ही बंदी अनिष्ट आहे असें या संमेलनचें निश्चित मत असल्यामुळे मंत्रिमंडळाने हा प्रश्न अत्यंत जिव्हाळ्याचा व तातडीचा समजून तो त्वरित सोडवावा अशी सविनय पण साग्रह विनंति आहे. तसेच (अ) कोणत्याहि प्रकारच्या उघड व कायदेशीर चौकशीवांचून आजपर्यंत जीं पुस्तकें जप्त करण्यांत आलीं आहेत त्या सर्वांवरची बंदी अधिक दिरंगाई न करितां बिनशर्त काढून टाकावी. (आ) छापखाने व वाङ्मयप्रकाशन यांची गळचेपी करणारे जे निर्बंध कायद्याने घातलेले आहेत ते मुंबई–मध्यप्रांत सरकारांनी ताबडतोब काढून टाकावे. यांपैकी जे कायदे रद्द करणें या सरकारांच्या अधिकाराबाहेरचें असेल त्या कायद्यांची त्यांनी आपापल्या प्रांतांत अंमलबजावणी करूं नये. (इ) प्रांतिक सरकारांकडे वरील मागणी करीत असतांना, गेल्या जुलै १९३७ मध्ये श्री. एन्. एम्. जोशी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने मुंबई मंत्रिमंडळापुढे ज्या मागण्या मांडल्या त्यांस हें संमेलन पाठिंबा देत असून या प्रश्नाकडे जनतेचें पुन्हा एकदा लक्ष वेधीत आहे, व बंदी आणि निर्बंध रद्द करून घेण्याकरिता जोराची चळवळ चालू ठेवावी अशी त्यांस सूचना देत आहे. त्याचप्रमाणें मराठी भाषा ज्यांत चालू आहे अशा संस्थानांत वाङ्मयावर जे निर्बंध घातले आहेत ते त्या त्या संस्थानांनी काढून टाकून जप्त वाङ्मय मुक्त करावें अशी या संमेलनाची मागणी आहे (मुंबई, १९३८).

(१५२) अलीकडे सरकारने जप्ती उठविल्यामुळे कांही थोडें आक्षिप्त वाङ्मय पुनः प्रकाशांत येऊं शकलें आहे हें पाहून हें संमेलन समाधान व्यक्त करीत आहे. परंतु उरलेल्या आक्षिप्त वाङ्मयांतहि योग्य अशीं पुष्कळ पुस्तकें असूनहि तींहि सत्वर बंधमुक्त करावीं अशी या संमेलनाची सरकारास आग्रहाची मागणी आहे (अहमदनगर, १९३९).

(१५३) जें निर्बंधमुक्त वाङ्मय द्रव्याच्या आणि प्रोत्साहनाच्या अभावीं अद्याप अप्रकाशित राहिलें आहे, तें प्रकाशित होण्यास मुद्रकांनी साहाय्य करावें म्हणून म. साहित्यपरिषदेने प्रयत्न करावा अशी या सम्मेलनाची सूचना आहे. (अहमदनगर, १९३९).

(१५४) निजाम संस्थानांतील प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणक्रमांत मराठी भाषेचें जें शिक्षण दिलें जातें तें मराठी भाषेची परागति करणारें, अपुरें व निरुपयोगी आहे; विशेषतः तें मराठवाडा विभागांतील (औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद इ. सहा जिल्हे) मराठी भाषेची पिछेहाट करणारें आहे. हा प्रकार मराठी वाङ्मयास व साहित्यास अडथळा आणणारा आहे. तरी निजामी शिक्षणक्रमांत उच्च शिक्षणापर्यंत मराठी भाषा–मराठवाड्यापुरती तरी निदान–प्रमुख म्हणून शिकविली जावी अशी निजामीय शिक्षणमंत्र्यांकडे या संमेलनाची आग्रहाची आणि हक्काची मागणी आहे. (अहमदनगर, १९३९).

(१५५) मुंबई येथील एल्फिन्स्टन कॉलेजांत श्रीमंत गायकवाड सरकार व सरदार किबे यांनी मराठीच्या उत्तेजनार्थ विशिष्ट अटींवर बक्षिसें देण्यासाठी अनुक्रमें ५ व २ हजार रुपयांच्या देणग्या दिल्या असतां पुढे सरकाराने हीं बक्षिसें इंग्रजी निबंधांसाठी चालू केलीं याविषयी हें संमेलन आपला असंतोष व्यक्त करीत असून मराठीसाठी संकल्पिलेल्या या देणग्या मराठी-साठीच राखून ठेवून त्याप्रमाणे लागलीच कार्यव्यवस्था चालू करावी अशी मुंबई सरकारास विनंती करीत आहे (अहमदनगर, १९२९).

---

[९] अश्लील-निषेध

(१५६) सांप्रत सदभिरुचीला विघातक आणि अश्लील असें वाङ्मय स्वैरपणें प्रसिद्ध करण्यांत येत आहे हें पाहून या सभेस फार दुःख वाटतें, आणि अशा प्रकारचें वाङ्मय प्रसिद्ध करणाऱ्यांचा ही सभा निषेध करते. (मुंबई, १९२६)

(१५७) सांप्रत सदभिरुचीला विघातक असें आणि अश्लील स्वरूपाचेंहि वाङ्मय स्वैरपणें प्रसिद्ध होत आहे, हें पाहून या सभेस फार दुःख वाटतें. ह्या अनिष्ट प्रकाराला प्रतिबंधक उपायांनी आळा घालणें अवश्य आहे असें या सभेचें मत आहे. सर्व जबाबदार साहित्य-सेवक व साहित्य-संस्था ह्यांनी या प्रकाराकडे लक्ष पुरवावें, अशी विनंती आहे. या अनिष्ट वाङ्मयाचें लेखन, प्रकाशन व प्रसार करण्याचा ही सभा निषेध करीत असून सर्व मराठी वाचकवर्गांनी या वाङ्मयापासून अलिप्त राहावें अशी या सभेची विनंती आहे (पुणें, १९२७).

(१५८) निर्मल आनंद व उदात्त भावना यांची जागृति हें सर्व ललितवाङ्मयाचें ध्येय आहे हें विसरून कित्येक लेखक क्षुद्र विकारांना चेतविणारें लिखाण कळत न कळत लिहीत असतात. अशा अनिष्ट लिखाणांचा हें संमेलन निषेध करीत आहे. (बडोदें, १९३४).

(१५९) सर्व प्रकारच्या वैचारिक दृष्टिकोनाची भिन्नता प्रकट करतांना तात्त्विक व सात्त्विक भूमिकेव्यतिरिक्त केवळ कुचेष्टेच्या दृष्टीने हास्यरस निर्माण करण्यासाठी स्वतःच्या विरोधी बाजूच्या व्यवहारज्ञानावर व शास्त्रीय सिद्धान्तांवर आधारलेल्या प्रामाणिक विश्वासांचें अप्रामाणिक विडंबन व विपर्यास करण्याची जी प्रवृत्ति कधी कधी व कोठे कोठे मराठी वाङ्मयांत प्रकट होत असलेली दिसते ती इष्ट नाही असें या संमेलनाचें मत आहे (अहमदनगर, १९३९).

---

[१०] मराठी भाषा–विद्योत्तेजन

(१६०) श्रीमंत गायकवाड सरकार ह्यांनी संस्थानांतील देशी भाषांत लिहिलेल्या ग्रंथांसाठी म्हणून दोन लक्ष रुपयांची रक्कम वेगळी काढून ठेविली आहे. तींतून मराठी ग्रंथांसाठी मदत दिली जाते, याविषयी आणि श्रीमंत महाराजसाहेब यांनी या संमेलनांत केलेल्या भाषणांत दिलेल्या आश्वासनाबद्दल हें संमेलन कृतज्ञ आहे. पण मराठी भाषेची योग्यता, महत्त्व व गरजा इत्यादीकडे दृष्टि देतां सदर भाषेच्या उत्तेजनासाठीं अधिक रकमेची जरूरी आहे. सबब अशी योग्य ती रक्कम निराळी काढून ठेवावी, व सदर रकमेचा विनियोग सहविचारणी सभेच्या आणि जरूर पडल्यास तिच्या व इतर तज्ज्ञांच्या समितीच्या सल्ल्याने व्हावा अशी या संमेलनाची श्रीमंत महाराजसाहेब यांना नम्रतापूर्वक विनंती आहे (बडोदें, १९२१).

(१६१) यंदाच्या अंदाजपत्रकांत शिक्षणाधिकाऱ्यांनी वाङ्मयोत्तेजनासाठी पूर्वी ९००० रुपये ग्रँट होती ती कमी करून घेतली म्हणजे ६००० केली याबद्दल ही सभा नापसंती व्यक्त करते (पुणें, १९२७).

(१६२) हिंदुस्थानांतील कित्येक ठिकाणीं मराठी मातृभाषा असलेले लोकहि आपली मातृभाषा व संस्कृति विसरले आहेत व विसरत आहेत ही गोष्ट अनिष्ट आहे. तरी ही आपत्ति दूर करण्यासाठी आपली मातृभाषा महाराष्ट्रीयांच्या अधिक प्रचारांत येईल अशी व्यवस्था प्रत्येक ठिकाणच्या महाराष्ट्रीय पुढाऱ्यांनी करावी अशी या संमेलनाची आग्रहाची विनंती आहे आणि ज्या ठिकाणीं मातृभाषेच्या प्रचाराला निष्कारण प्रतिबंध होत असेल त्या ठिकाणच्या लोकांनी त्या प्रतिबंधाचा परिहार करण्याचा प्रयत्न करावा, व त्यास अखिल महाराष्ट्रीयांनी साहाय्य करावें. तसेंच झांशी, सागर, अलाहाबाद, बनारस इत्यादि ठिकाणच्या मंडळींनी मराठी शाळा चालवून जी सेवा चालविली आहे त्याबद्दल हें संमेलन त्यांचें हार्दिक अभिनंदन करीत आहे (ग्वाल्हेर, १९२८).

(१६३) प्रजावत्सल कै.माधवरावमहाराज शिंदे यांच्या इच्छेनुरूप राज्याच्या मुख्य कार्यालयांतून (कचेऱ्यांतून) म्हणजे रेव्हेन्यू, फिनान्स, खाजगी या खात्यांत राजभाषा मराठी चालू ठेविली आहे. याकरितां ही सभा येथील राजसंस्थेचें (कौन्सिलचें) अभिनंदन करिते व अशी नम्र विनंती करिते की, वरील खात्यांसंबंधाने होणारे कायदेकानूहि मराठींतूनच प्रसिद्ध करावे (ग्वाल्हेर, १९२८).

(१६४) ग्वाल्हेर राज्यांत मराठीच्या शिक्षणाकडे अवश्य लक्ष पुरवून व शक्य ते प्रयत्न करून ही राजभाषा वृद्धिंगत करावी अशी या सभेची ग्वाल्हेर दरबारास सविनय विनंती आहे (ग्वालेर, १९२८).

(१६५) उत्तर हिंदुस्थानांत अनेक मोठमोठीं मराठी राज्यें असतांहि एकहि पूर्णपणें मराठी पत्र नाही;तरी ही उणीव उत्तर हिंदुस्थानांतील महाराष्ट्रीयांनी शक्य तितक्या लवकर भरून काढावी अशी या संमेलनाची अत्यंत आग्रहाची सूचना आहे. या कामीं उत्तर–हिंदुस्थानांतील मराठी संस्थानांनी अवश्य तो हातभार लावून आपल्या मातृभाषेची कळकळ व्यक्त करावी अशी या सभेची विनंती आहे (ग्वाल्हेर, १९२८).

(१६६) निजाम इलाख्यांतील मराठी विभागाच्या सर्व अदालतींची भाषा ब्रिटिश इलाख्यांत प्रचलित असलेल्या पद्धतीप्रमाणे मराठी असावी अशी या संमेलनाची विनंती आहे, व

त्याचप्रमाणे पाटील, कुळकर्णी, तहशील व तालुकदारांच्या कचेरींतील दप्तरें मराठींत असावींत (द. हैद्राबाद, १९३१).

(१६७) मराठी भाषेच्या अभिवृद्धीकरिता निजाम सरकारने पुढील सूचना अमलांत आणाव्या अशी या संमेलनाची विनंती आहे.

[अ] उस्मानिया विद्यापीठाच्या विद्यमाने मराठी भाषा व वाङ्मयाच्या विषयांवर वेळोवेळीं तज्ज्ञांचीं व्याख्यानें करण्यांत यावीं.

[आ] हैद्राबाद संस्थानांतील मराठी वाङ्मयाचा इतिहास लिहिण्याकरिता एका तज्ज्ञाची नेमणूक करावी व मराठी विभागांत असलेल्या वाङ्मयाचें संशोधन व संकलन करून त्यांच्या संग्रहाची व त्यांपैकी निवडक ग्रंथांच्या प्रसिद्धीची व्यवस्था करावी.

[इ] हैद्राबाद स्टेट लायब्ररींत उर्दु, फारशी, अरबी व इंग्रजी ग्रंथांप्रमाणे मराठी ग्रंथांचाहि एक विभाग ठेवण्यांत यावा व अशीं सार्वजनिक मोफत ग्रंथालयें जिल्ह्यानिहाय स्थापन करून त्या त्या जिल्ह्याच्या भाषेंतील ग्रंथांना प्राधान्य देण्यांत यावें (द. हैद्राबाद, १९३१).

(१६८) बृहन्महाराष्ट्रापैकी दक्षिणमहाराष्ट्र, कर्नाटक व मद्रास इत्यादि दक्षिणेकडील भागांत राहणाऱ्या महाराष्ट्रीयांस मराठी भाषेची जोपासना करण्याची तीव्र इच्छा असल्यामुळे त्यांनी जीं 'महाराष्ट्रमंडळें' स्थापन केलीं आहेत त्यांस त्यांचा मराठीचा अभ्यास वाढविण्यासाठी शक्य तें साहाय्य करण्यांत यावें अशी या संमेलनाची शिफारस आहे. (कोल्हापूर, १९३२)

(१६९) मुंबई इलाख्यांतील कारवार व बेळगांव या दोन जिल्ह्यांमध्ये मिळून ज्या लोकांची मातृभाषा मराठी आहे अशा लोकांच्या सोयीसाठी मराठीच्या शिक्षणाची व कोर्टांतील व कचेरींतील कामें मराठींतून करण्याची व्यवस्था करावी अशी मुंबई सरकारास या संमेलनाची आग्रहाची विनंती आहे. (कोल्हापूर, १९३२)

(१७०) श्रीमंत श्री सवाई तुकोजीराव महाराज होळकर यांच्या औदार्यामुळे महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक मंडळ, इंदूर या संस्थेस सन १९१६-३१ अखेर प्रतिवर्षी रुपये २५०० व नंतर रुपये १००० देणगी मिळत असे. ती यंदा १९३३ ऑक्टोबरपासून नव्या काटछाटीच्या धोरणान्वयें बंद करण्यांत आली आहे असें समजतें. श्रीमंत श्री सवाई यशवंतराव महाराज यांच्या नजरेस सदर गोष्ट आली नसावी अशी या संमेलनास खात्री वाटते. तरी श्रीमंत श्री यशवंतराव महाराजांनी वडिलांच्या धोरणास अनुसरून मातृभाषेची सहजासहजी होणारी, परंतु अत्यंत महत्त्वाची सेवा पूर्ववत् चालू ठेवावी अशी या संमेलनाची श्रीमंतांस नम्र विनंती आहे. (नागपूर, १९३३)

(१७१) बृहन्महाराष्ट्रांत महाराष्ट्रभाषा व संस्कृति यांचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या ज्या चळवळी चालू आहेत त्या सर्वांस या संमेलनाचा पाठिंबा आहे. आणि या चळवळींची माहिती महाराष्ट्र-साहित्य परिषदेने मिळवून महाराष्ट्र-साहित्य-पत्रिकेंत प्रसिद्ध करावी (नागपूर, १९३३).

(१७२) पूर्वी मातृभाषा मराठी होती, परंतु आता ज्यांनी इतर भाषांचा स्वीकार केला आहे अशा लोकांत मातृभाषेचें पुनरुज्जीवन करण्याकरितां परिषदेने प्रचारकार्य अंगावर घ्यावें (बडोदें, १९३४)

(१७३) महाराष्ट्रापासून दूर असलेल्या परप्रांतांतील खासगी मराठी शाळांस जनतेने अल्प स्वल्प वार्षिक मदत देऊन त्यांच्या प्रयत्नाची बूज करावी. (बडोदें, १९३४)

(१७४) इंदूर आणि ग्वाल्हेर दरबारांकडून मराठी वाङ्मयाच्या पुरस्कारासाठी दरसाल कांही रकमा खर्ची पडून लेखकांना जें चांगलें उत्तेजन मिळे तें आतां मिळत नसल्याचें पाहून या संमेलनास वाईट वाटत आहे. या दरबारांनी आपल्या ग्रंथोत्तेजक कार्यास पुन्हा सत्वर आरंभ करावा अशी त्यांस या संमेलनाची विनंती आहे. (बडोदें, १९३४)

(१७५) मुंबई सरकार मराठी वाङ्मयाभिवृद्धीला उत्तेजनार्थ मदत (Encouragement Grant) देत असे, ती अलीकडे बंद करण्यांत आली आहे, याबद्दल हें संमेलन तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे; व कौन्सिलांतील प्रतिनिधींना अशी विनंती करीत आहे की त्यांनी सरकारला या प्रकरणीं आपलें कर्तव्य करण्यास भाग पाडावे (इंदूर, १९३५).

(१७६) इंदूर सरकार व ग्वाल्हेर सरकार दरसाल मराठी ग्रंथोत्तेजनासाठी सालिना कांही देणग्या देत असत व त्यांतून ग्रंथकारांस उत्तेजन मिळत असे. या सालिना देणग्या या सरकारांनी पुनः चालू कराव्या आणि यासाठी स्वतंत्र असा निधिच तोडून द्यावा, आणि अशा रीतीने उत्कृष्ट वाङ्मय-निर्मितीस चालना देण्याचें श्रेय त्यांनी संपादावें अशी या उभय सरकारांकडे या संमेलनाची आग्रहाची पण नम्र मागणी आहे. या कामासाठी त्यांजकडे म. सा. परिषदेने शिष्टमंडळें पाठविण्याची व्यवस्था करावी (इंदूर, १९३५).

(१७७) ग्वाल्हेरचे श्रीमंत जिवाजीराव महाराज यांनी नुकतींच अधिकारसूत्रें आपल्या हातीं घेतलीं आहेत. श्रीमंत महाराजांच्या हातून राज्यांत सर्वांगीण सुधारणा होऊन प्रजेचें कल्याण व्हावें व तसेंच श्रीमंत महाराजांची मातृभाषा व ग्वाल्हेर संस्थानांतील एक प्रमुख भाषा जी मराठी तिच्या संवर्धनाकडे श्रीमंत महाराजांनी परंपरेस अनुसरून चांगलें लक्ष द्यावें असें हें संमेलन मनापासून इच्छितें (जळगांव, १९३६).

(१७८) चांगल्या मराठी पुस्तकांच्या लेखकांना उत्तेजन मिळावें या हेतूने इंदूर सरकार पूर्वी सालिना देणगी देत असे. ती देणगी मध्यंतरी बंद पडली. ती पुन्हा चालू करून चांगल्या वाङ्याला उत्तेजन द्यावें अशी या संमेलनाची इंदूर सरकारला आग्रहाची विनंती आहे (मुंबई, (१९३८).

(१७९) स्वभाषेच्या द्वारा शिक्षण देण्याकरिता आणि स्वभाषेच्या अभ्यासास उत्तेजन देण्याकरिता प्रो. कर्वे यांनी स्थापिलेल्या व उदारधी सर विठ्ठलदास ठाकरसी यांनी पुरस्कारिलेल्या 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी' भारतवर्षीय महिला विद्यापीठाच्या पदध्यांना मुंबई सरकारने मान्यता दिल्याबद्दल आणि दरसाल रु. ५००० ची देणगी दिल्याबद्दल हें संमेलन सरकारचें अभिनंदन करीत आहे. या विद्यापीठास सरकारी सनद (Charter) देण्याची हिंदुस्थान सरकारकडे शिफारस करून आणि यापुढे शक्य तें अधिक आर्थिक साहाय्य देऊन विद्यापीठाच्या प्रगतीस आणि परंपरेने स्त्रीशिक्षण व देशी भाषा यांच्याहि प्रगतीस हातभार लावावा अशी या संमेलनाची मुंबई सरकारास विनंती आहे (अहमदनगर, १९३९).

(१८०) मुंबई सरकाराने चालू वर्षाच्या अंदाजपत्रकांत गुजराती आणि कानडी भाषांच्या उच्च संशोधनाकरिता १२॥ हजार रुपयांची रक्कम देणगी म्हणून देण्याची तरतूद केली आहे ही या संमेलनाच्या मतें समाधानाची गोष्ट होय; पण त्याचबरोबर या इलाख्यांतील बहुसंख्य जनतेच्या मराठी भाषेच्या संशोधनाकरिता यापेक्षा अधिक किंवा निदान तेवढी रक्कम तरी अंदाजपत्रकांत देणगी म्हणून घालणें हें अत्यंत आवश्यक आहे असें या संमेलनाचें स्पष्ट मत आहे. मराठी भाषेच्या संशोधनाच्या आणि उत्तेजनाच्या बाबतींत सरकारने व विधिमंडळाने स्वीकारलेल्या

ह्या औदासीन्याच्या आणि उपेक्षेच्या धोरणाविषयी खेद व्यक्त करणें ह्या संमेलनास भाग पडत आहे (अहमदनगर, १९३९).

---

[११] दुर्मिळ-ग्रंथ-पुनर्मुद्रण

(१८१) मराठी भाषेंत छापलेलीं बरींच उत्कृष्ट गद्यपद्य पुस्तकें अलीकडे दुर्मिळ झालेलीं आहेत. तरी महाराष्ट्र साहित्य परिषदेने अशा पुस्तकांची योग्य निवड करून तीं प्रसिद्ध करण्याची तजवीज करावी (बडोदें, १९२१).

(१८२) मराठी भाषेतील दुर्मिळ पण उपयुक्त असें जे मुद्रित ग्रंथ उपलब्ध नाहीत व ज्यांचें पुनर्मुद्रण होणें अवश्य आहे असे ग्रंथ ज्या ज्या प्रकाशकांनी आजवर प्रसिद्ध केले आहेत, त्यांचें ही सभा अभिनंदन करिते. तसेंच अशा प्रकारचे प्रयत्न करण्याला प्रकाशकांना उत्तेजन मिळावें म्हणून सरकार, महाराष्ट्र–साहित्य–परिषद्, साहित्यप्रेमी धनिक, ग्रंथसंग्रहालयासारख्या संस्था यांनी सर्वतोपरी साहाय्य करावें अशी या सभेची शिफारस आहे (पुणें, १९२७).

(१८३) दुर्मिळ किंवा अमुद्रित परंतु वाङ्मयाच्या इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाचीं व चिरस्थायी पुस्तकें संमेलनाने प्रकाशित करण्याच्या बाबतींत एक निश्चित योजना तयार करावी अशी या संमेलनाची शिफारस आहे. या कार्याकरिता मुंबई, नागपूर, आग्रा, बनारस हिंदु, व उस्मानिया विश्वविद्यालयें, आणि अजमेर बोर्ड या शिक्षणसंस्थांशीं पत्रव्यवहार करून कोणतीं पुस्तकें प्रथम हातीं घेणें अवश्य आहे, याचा विचार करावा व यासंबंधीचा समग्र अहवाल पुढील वर्षाच्या संमेलनास सादर करावा (इंदूर, १९३५).

---

[१२] भाषांतर

(१८४) आरबी, फार्सी, उर्दू, कानडी वगैरे परभाषांतील उत्कृष्ट वाङ्मय मराठींत भाषांतरित झाल्यास त्याच्या प्रकाशनास हिंदु, मुसलमान वगैरे धनिक लोकांनी व संस्थानिकांनी आर्थिक साहाय्य करावें अशी हें संमेलन शिफारस करीत आहे. (कोल्हापूर, १९३२)

(१८५) मराठी भाषेस आन्तरराष्ट्रीय महत्त्व देण्यासाठी मराठी वाङ्मयाची इंग्रजींत भाषांतरें करणारी एक संस्था असावी असें या सभेचें मत आहे (नागपूर, १९३३).

(१८६) हिंदी, गुजराथी, कानडी, बंगाली इत्यादि अन्य भारतीय भाषांतील उत्तमोत्तम ग्रंथांशीं मराठी भाषकांचा परिचय व्हावा, तसेंच अशा वाङ्मयाची भाषांतररूपाने मराठींत भर पडावी व मराठी वाङ्मयाचींहि इतर भाषांत रूपांतरें व्हावीं या हेतूने त्या त्या भाषेच्या साहित्यसंस्थांशी दळणवळण ठेवून परस्परसहकार्याने वाङ्मयाची देवघेव करण्याकरिता सदर कार्याची रूपरेषा, नियम वगैरे ठरविण्याकरिता एक मंडळ नेमण्याची सूचना ही सभा करीत आहे व परिषदेने ती योजना पुढील संमेलनास सादर करावी. (नागपूर, १९३३)

(१८७) परभाषांत प्रसिद्ध होणाऱ्या उत्कृष्ट ललित व शास्त्रीय ग्रंथांची भर मराठी वाङ्मयांत घालणें अवश्य व हिताचें असल्याने तशा वाङ्मयकृतींची निवड करून त्यांचीं भाषान्तरें प्रसिद्ध करविण्याचे प्रयत्न महाराष्ट्र साहित्य परिषदेने करावे अशी या संमेलनाची परिषदेला आग्रहाची शिफारस आहे (मुंबई, १९३८).

(१८८) मराठी साहित्य अत्यंत उच्च दर्जाचें आणि अखिल मानवजातीच्या हिताचें असून त्यांतील ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास इत्यादिकांचीं ग्रंथरत्नें केवळ अमूल्य व असाधारण आहेत. त्यांपैकी व कांही नवीन निवडक ग्रंथांची इंग्रजी भाषान्तरें अधिकृतरीत्या प्रसिद्ध करण्याची योजना या संमेलनास मान्य असून या दृष्टीने कार्यास आरंभ करण्याची शक्यता अजमावण्यासाठी हें संमेलन पुढील गृहस्थांचें मंडळ नेमीत आहे :— (१) प्रा. द. वा. पोतदार, (२) लो. मा. श्री. अणे, (३) श्री. मो. ज्ञा. शहाणे, (४) श्री. य. खु. देशपांडे, (५) प्रा. या. मु. पाठक (आमंत्रक) (अहमदनगर, १९३९).

---

[१३] बालवाङ्मय

(१८९) मुलांमुलींच्या शिक्षणाच्या कामीं उपयोगी पडेल असें विशिष्ट वाङ्मय तयार करण्याचा उपक्रम व्हावा असें या सभेचें मत आहे (मुंबई, १९१५).

(१९०) मुलांमुलींकरिता शिक्षणाचे कामीं उपयोगी पडेल असें विशिष्ट वाङ्मय तयार करण्याचा शिक्षणखातीं व शिक्षणसंस्था यांनी मिळून विशेष नेटाने आणि व्यापक स्वरूपाचा प्रयत्न करावा. महाराष्ट्रांतील सर्व शिक्षणखात्यांतर्फे तयार करण्यांत येणाऱ्या शिक्षणविषयक ग्रंथांसंबंधी मराठींतील प्रमुख शिक्षणविषयनिपुण व जनमतनिदर्शक गृहस्थांचा सल्ला व साहाय्य सरसहा घेण्यांत यावें.

मुलांमुलींच्या शिक्षणाच्या कामीं उपयोगी पडतील अशीं मनोरंजक व क्रमिक पुस्तकें शिक्षणसंस्था अगर खाजगी व्यक्ति यांनी तयार केल्यास त्यांस उत्तेजन म्हणून द्रव्यद्वारा मदत करण्यास साहित्यपरिषदेने तयार असावें (मुंबई, १९२६).

(१९१) मुलांमुलींच्या शिक्षणांत उपयोगी पडणारें वाङ्मय शिक्षणखातें, शिक्षणसंस्था, शिक्षणशास्त्रज्ञ व लेखक यांनी मराठींत तयार करण्याचा व्यापक प्रयत्न नेटाने करावा (पुणें, १९२७).

(१९२) मुलांमुलींच्या शिक्षणास उपयोगी पडेल असें मराठी भाषेतील बालवाङ्मय प्रसिद्ध करण्याकडे शिक्षणखातीं, शिक्षणसंस्था व साहित्यसंस्था यांनी विशेष लक्ष द्यावें अशी या संमेलनाची विनंती आहे (बेळगांव, १९२९).

(१९३) सध्या जें बालवाङ्मय निर्माण होत आहे तें अजूनहि अपुरें वाटतें. अधिक वाङ्मय निर्माण होण्याच्या दृष्टीने साहित्यिकांना पाठिंबा मिळावा म्हणून एक योजना करण्याकरिता हें संमेलन पुढील समिति नेमीत आहे व या समितींत अधिक सभासद सामील करून घेण्यास तीस अधिकार देत आहे :— (१) शांताबाई कशाळकर, (२) ताराबाई मोडक, (३) वेणूबाई मोडक, (४) सुशीलाबाई सप्तर्षि, (५) गोपीनाथपंत तळवलकर, (६) साने गुरुजी, (७) आपटे गुरुजी, निमंत्रक– शांताबाई कशाळकर (अहमदनगर, १९३९).

---

[१४] परीक्षण–समालोचन

(१९४) वेळोवेळीं नवीन प्रसिद्ध होणाऱ्या वाङ्मयाचें निःपक्षपाताने परीक्षण करून त्यावर अधिकारयुक्त मंडळींचा अभिप्राय वेळोवेळीं प्रसिद्ध होणें अवश्य आहे, आणि त्यासाठी साहित्य

परिषदेच्या कार्यकारी मंडळीने एक खास कमिटी नेमावी असें या सभेचें मत आहे (मुंबई, १९१५).

(१९५) [अ] मराठीमध्ये दरसाल जें वाङ्मय प्रसिद्ध होतें त्याची यादी दरसाल प्रसिद्ध करावी.

[आ] त्याचप्रमाणे दरसाल प्रसिद्ध होणाऱ्या मराठी वाङ्मयाचें अधिकारी लेखकांकडून समालोचन यादीला जोडून प्रसिद्ध करावें.

पुढील वर्षांत प्रसिद्ध होणाऱ्या वाङ्मयाचें समालोचन करण्याकरिता खालील गृहस्थांची कमिटी नेमली आहे. या वर्षांत जो ग्रंथ उत्कृष्ट ठरेल त्यास १०० रुपये पारितोषिक द्यावें (पुणें, १९२७).

(१९६) देशी वाङ्मयाचा जो वार्षिक आढावा मुंबई सरकारकडून पूर्वी प्रसिद्ध होत असे तो पुन्हा प्रसिद्ध करण्यांत येत जावा असा या संमेलनाचा अभिप्राय आहे (इंदूर, १९३५).

(१९७) प्रतिवर्षी प्रसिद्ध होणाऱ्या मराठी वाङ्मयाचें वर्गीकृत व पद्धतशीर समालोचन व आंकडेवारी प्रसिद्ध होणें अगत्याचें आहे. पूर्वी सरकारतर्फे वाङ्मयसमालोचनाची प्रसिद्धि होत असे. तरी मुंबई सरकारने पुनः हा उपक्रम हातीं घ्यावा अशी या संमेलनाची सरकारास शिफारस आहे (अहमदनगर, १९३९).

---

[१५] वाङ्मयिक आकांक्षा

(१९८) जगांत आज समजून घेण्यास योग्य अशा शेकडों विषयांचें ज्ञान अनेक देशांतून फैलावत आहे. पण त्या त्या परदेशी भाषा शिकणारांस म्हणजे एकंदर जनतेच्या मानाने फारच थोड्या व्यक्तींना या ज्ञानाचा लाभ मिळूं शकतो. स्वभाषा हें सर्व ज्ञानमंदिरांत प्रवेश करण्याचें जनतेला सुलभ असें एकच द्वार असतें. याकरिता प्राचीनापासून आधुनिकांतील आधुनिकापर्यंत सर्व प्रकारच्या ज्ञानसंग्रहाचा लाभ विषयवार व सुसंगत असा महाराष्ट्रजनतेस मिळावा, याकरिता सोप्या, लोकप्रिय पण प्रौढ अशा भाषेंत लिहिलेलीं, अल्प विस्तारांत मुख्य विषयाचें यथार्थ ज्ञान करून देणारीं प्रमाणबद्ध, सचित्र व बेतशीर किंमतीला मिळणारीं अशीं पुस्तकें स्वतंत्र ग्रंथमालेच्या रूपाने तयार होणें अवश्य आहे व या कामीं मराठी साहित्य परिषदेने मध्यवर्ती संस्था या नात्याने, इतर संस्था, विद्वान, धार्मिक लोक व छापखानेवाले यांची सहानुभूति व सहकार्य मिळवून हा उद्योग हातीं घ्यावा, अशी या सभेची शिफारस आहे (बडोदें, १९२१).

(१९९) साहित्य हा समाजाच्या जीवनाचा आदर्श आहे. परंतु महाराष्ट्रांतील शेतकरी आणि कामकरी यांच्या भावनांना पोषक अशी वाङ्मयनिर्मिति आतापर्यंत फारच कमी झाली आहे; म्हणून यापुढे या वर्गाच्या हिताला पोषक असें वाङ्मय निर्माण करण्याला हें संमेलन साहित्यभक्तांना शिफारस करीत आहे. (कोल्हापूर, १९३२)

(२००) हें साहित्य संमेलन अखिल महाराष्ट्रांतील सर्व वर्तमानपत्रांना आणि नियतकालिकांना अशी सविनय विनंती करतें की, त्यांनी आपल्या वर्तमानपत्रांतून आणि नियतकालिकांतून सुबोध, शास्त्रीय आणि औद्योगिक लेखांना प्रमुख स्थान अवश्य द्यावें (बडोदें, १९३४).

(२०१) समाजाच्या विचारशक्तीला चालना देऊन प्रगतिपर विचारसरणीची जोपासना करणें हें लेखकांचें व कलावंतांचें महत्त्वाचें काम असल्यामुळे ते राष्ट्रहित व संस्कृति यांचे खरे

संरक्षक आहेत. साम्राज्यवाद्यांकडून युद्धाची तयारी जोरांत होत असून युद्धाला अनुकूल असें लोकमत व्हावें म्हणून प्रचार चालू आहे. पण साम्राज्यसंरक्षणासाठी व वर्धनासाठी होणारीं युद्धें मानवी संस्कृति, शांतता व स्वातंत्र्य यांच्या मुळावर घाव घालणारीं आहेत. म्हणून युद्धविरोधी विचारांची जागृति करणें आणि त्या युद्धांचा योग्य प्रतिकार करण्यास समर्थ होण्यासाठी आर्थिक आणि सैनिक सिद्धता करण्याच्या दृष्टीने अवश्य तो प्रचार करणें हें आजच्या लेखकांचें व कलावंतांचें महत्त्वाचें कर्तव्य आहे. या कर्तव्याकडे हें संमेलन सर्व लेखक, कवि, चित्रकार इत्यादि कलावंतांचें लक्ष वेधीत आहे (मुंबई, १९३८).

(२०२) अलीकडे जीवनव्यवहार व्यापक होत असल्यामुळे नवीन नवीन शब्दांची नड वाढत आहे; म्हणुन चटकन् समजूं शकतील व व्यवहारांत सहज उपयोगांत आणतां येतील असे सोपे, साधे व अर्थवादी शब्द शक्य तों मराठी वळणाचे बनवावेत आणि अनवश्यक असे संस्कृत किंवा इतर भाषांतील दुर्बोध शब्द बळें बळें घालूं नयेत असें या संमेलनाचें मत आहे (मुंबई, १९३८).

(२०३) लेखकवर्ग हा समाजाच्या विचारसंपदेचा संरक्षक आणि संवर्धक असल्यामुळे साम्राज्यवाद्यांच्या हिताच्या दृष्टीने आज चालू असलेल्या युद्धप्रचारास विरोधक असा विचारप्रक्षोभ करणें आणि साम्राज्यवाद्यांच्या युद्धांत निरनिराळ्या कारणांमुळे हिंदुस्थानच्या जनतेला गोवण्याच्या प्रयत्नास कसून विरोध करणें हें लेखकांचें कर्तव्य आहे असें ह्या संमेलनाचें मत आहे (अहमदनगर, १९३९).

(२०४) खेडेगांवांत राहणाऱ्या जनतेंत जागृति करण्याकडे हल्ली प्रवृत्ति जोरावत आहे. तें कार्य फलदायी होण्यास सोप्या आणि सुबोध भाषेंत लिहिलेलें आणि खेडेगांवांची सामाजिक, धार्मिक, राजकीय अशी सर्वांगीण सुधारणा होईल याविषयी ज्ञान करून देणारें जानपदवाङ्मय निर्माण करण्याचें कार्य निदान साहित्यिकांनी सत्वर हातीं घ्यावें अशी या संमेलनाची शिफारस आहे (अहमदनगर, १९३९).

---

[१६] ग्रंथालय–वाचनालयें

(२०५) मराठींत प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक पुस्तकाची एक प्रत सरकारने प्रकाशकांकडून अगर लेखकांकडून नियमाने घ्यावी आणि अशा पुस्तकांचा संग्रह एखाद्या मध्यवर्ती ग्रंथालयांत सार्वजनिक उपयोगासाठी ठेवण्यांत यावा. सदर संग्रह सर्वांस मोफत खुला राहावा (पुणें, १९२७).

(२०६) मराठींत प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांच्या सरकारकडे येणाऱ्या प्रतींपैकीं एक एक प्रत राखून ठेवून सरकारने एक मराठी ग्रंथसंग्रहालय सार्वजनिक उपयोगाकरिता चालवावें असें या संमेलनाचें मत आहे (बेळगांव, १९२९).

(२०७) मराठींत प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक पुस्तकाच्या दोन प्रति प्रकाशकांकडून घेण्यांत येतात. त्या प्रांतिक मध्यवर्ती ग्रन्थसंग्रहालय स्थापून तेथेच उपयोग करून घेण्यासाठी ठेवण्यांत याव्या अशी सरकारास या संमेलनाची विनंती आहे. (कोल्हापूर, १९३२)

(२०८) मराठींत प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक पुस्तकाच्या ज्या तीन प्रती सरकार प्रकाशकांकडून घेतें त्यांचा संग्रह करून व ग्रंथालय बनवून त्यांचा उपयोग अभ्यासकांस होईल अशी व्यवस्था सरकारने करावी अशी या संमेलनाची सरकार विनंती आहे. (बडोदें, १९३४)

(२०९) सरकारने स्वतः किंवा स्थानिक स्वराज्यसंस्थांकडून ग्रंथालयें व वाचनालयें यांस ठराविक आर्थिक मदत दरवर्षी करावी अशी सरकारला या संमेलनाकडून शिफारस करण्यांत येत आहे, व कांही संस्थांना हल्लीहि मदत मिळत आहे त्याबद्दल हें संमेलन सरकारचें व त्या त्या स्थानिक स्वराज्यसंस्थांचें अभिनंदन करीत आहे (अहमदनगर, १९३९).

(२१०) सरकारी गॅझेट व सरकारमार्फत प्रसिद्ध होणारीं इतर सर्व प्रकाशनें 'रजिस्टर्ड' वाचनालयांना नियमितपणें विनामूल्य पुरविण्याची व्यवस्था करावी अशी या संमेलनाची सरकारला विनंती आहे (अहमदनगर, १९३९).

(२११) न नोंदविलेल्या वाचनसंस्थांनी आपल्या संस्था नोंदवून घेण्याची तजवीज सत्वर करावी अशी या संमेलनाची त्या संस्थांना विनंती आहे (अहमदनगर, १९३९).

(२१२) प्रौढ शिक्षणाचा प्रचार होण्याकरिता फिरतीं पुस्तकालयें काढून तीं चालविण्याची योजना सरकारने करावी अशी या संमेलनाची सरकारला विनंती आहे (अहमदनगर, १९३९).

(२१३) मुंबई सरकार जो 'पुस्तकालय' कायद्याचा मसुदा तयार करीत आहे त्यांत इष्ट ते फेर सुचविण्याकरिता हें संमेलन खालील गृहस्थांची समिति नेमीत आहे:—

(१) प्रा. द. वा. पोतदार, (२) प्रा. चिं. वि. जोशी, (३) प्रि. ग. स. महाजनी, (४) श्री. द. वा. जोशी (आमंत्रक) (अहमदनगर, १९३९).

(२१४) (अ) मराठी भाषेंत प्रसिद्ध होणाऱ्या आणि प्रांतिक सरकारकडे द्यावयाच्या प्रत्येक पुस्तकाच्या प्रतींपैकी एकेक प्रत एखाद्या मध्यवर्ती ग्रंथालयांत विनामूल्य सार्वजनिक उपयोगाकरता ठेवण्याची सरकारने व्यवस्था करावी अशी या संमेलनाची प्रांतिक सरकारास विनंती आहे.

(आ) जर सरकारकडे येणाऱ्या पुस्तकांच्या प्रतींपैकी प्रत सरकारास देतां येत नसेल तर अशीं पुस्तकें विकत घेऊनहि वरील व्यवस्था करावी.

(इ) याशिवाय प्रांतिक सरकारच्या संग्रहीं जीं जीं पुस्तकें पडून असतील तीं तीं पुस्तकेंहि वर सुचविलेल्या मध्यवर्ती ग्रंथालयांत ठेवावींत (अहमदनगर, १९३९).

(२१५) महाराष्ट्र-साहित्य-संमेलनाला जोडून एक भाग म्हणून मराठी साहित्याच्या अभिवृद्धीच्या कार्यापुरत्या भागाचें संचालन करण्यासाठी म. सा. परिषदेने वाचनालय कार्यकर्त्यांचें संमेलन भरविण्याची प्रथा सुरू करावी असें या संमेलनाचें मत आहे (अहमदनगर, १९३९).

---

[१७] भाषावार विभागणी आणि शिरगणती

(२१६) हल्ली कर्नाटकांत कानडी मराठीचा जो वाद उत्पन्न झाला आहे, तो सर्व दृष्टींनी अत्यंत अनिष्ट असून शक्य तितक्या लवकर मिटविला जाणें हें उभयपक्षींहि अत्यंत जरूरीचें आहे, असें या संमेलनाचे मत आहे (बेळगांव, १९२९).

(२१७) सन १९३१ च्या खानेसुमारींत खानदेशी अगर अहिराणी व कोंकणी या दोन प्रांतिक भाषा मराठीपासून पृथक् काढून त्या स्वतंत्र भाषा आहेत असें ठरविल्यामुळे मराठी-भाषकांचें संख्याबळ घटणार; यासाठी या प्रांतिक भाषा मराठीच्याच उपभाषा आहेत की नाहीत हें ठरविण्यासाठी या संमेलनाने तज्ज्ञांची एक समिति नेमून तिजकडून अधिकृत मत पुढील अधिवेशनाकरता मागवावे (बडोदें, १९३४).

(२१८) हैदराबाद संस्थानच्या खिस्त शक १९३१च्या लोकगणतीच्या वेळीं त्या संस्थानच्या मराठवाडा ह्या भागांतील मराठी भाषिकांच्या संख्येंत डोळ्यांत भरण्यासारखी घट झाली असल्याचें दिसून आलें आहे व ती घट होण्याचीं कारणें अगत्य चौकशी करण्यासारखीं आहेत असा अभिप्रायहि त्या लोकगणतीच्या अधिकाऱ्यांनीच आपल्या प्रतिवृत्तांत स्पष्ट लिहून ठेविला आहे. मराठी भाषिकांच्या म्हणजेच मराठी भाषेच्या विस्ताराचा संकोच हा विषय निःसंशय उपेक्षणीय नसल्यामुळे तेथील प्रत्यक्ष परिस्थितीची चौकशी करण्याकरिता साहित्य परिषदेने व्यवस्था करावी (जळगांव, १९३६).

(२१९) कर्नाटक प्रांत स्वतंत्र व्हावा म्हणून आजपर्यंत केलेल्या प्रयत्नांमुळे मुंबई व मद्रास प्रांतांच्या असेंब्लींत अनुकूल निर्णय घेण्यांत आला याबद्दल हें संमेलन सर्व कर्नाटकाचें अभिनंदन करीत आहे. या तत्त्वावरच वऱ्हाड, नागपूर व जेथे जेथे महाराष्ट्रीय बहुसंख्य आहेत ते प्रांत एकत्र जोडून मराठी बोलणारांचाहि तसाच निराळा विभाग करावा अशी या संमेलनाची महाराष्ट्रास आग्रहाची सूचना आहे. बेळगांव, कारवार वगैरे जिल्ह्यांत मराठी भाषा बोलणारे बरेच तालुके आणि गांवें असल्याने कोणत्या भाषेच्या प्रांतांत आपल्या तालुक्याचा व गांवांचा समावेश व्हावा ह्याचा निकाल स्वयंनिर्णयाच्या तत्त्वावर, गांव हे परिमाण म्हणून, वयांत आलेल्या सर्व स्त्रीपुरुषांचीं मतें घेऊन Plebiscite ने लावण्यांत यावा अशी विनंती हें संमेलन सरकारास करीत आहे. नवीन होणाऱ्या कर्नाटक प्रांतांत अल्पसंख्य असलेल्या महाराष्ट्रीयांच्या मुलांना मराठी भाषेंतून प्राथमिक शिक्षण मिळेल अशी जबाबदारी त्या प्रांताच्या सरकारवर लादण्यांत यावी अशी या संमेलनाची मागणी आहे (मुंबई, १९३८).

(२२०) हिंदुस्थानची सध्या जी प्रांतवार विभागणी करण्यांत आली आहे तिच्यांत दोन प्रांतांच्या सीमाभागावरील कांही प्रदेश कोणत्या तरी एका प्रांताला जोडले जाऊन त्या प्रदेशांतील अन्य भाषा बोलणाऱ्या लोकांना त्या प्रांताच्या भाषेंतून शिक्षण घ्यावें लागतें. जेथे जेथे असा प्रश्न उत्पन्न होत असेल तेथे तेथे त्या प्रांतांतील सरकारांनी मराठी शिक्षणाची सोय तावडतोब करणें अवश्य आहे. मुंबई म्युनिसिपालिटीने येथील मद्रासी लोकांकरिता व पुणें म्युनिसिपालिटीने गुजराथी लोकांकरिता त्यांच्या भाषांतून शिक्षण देण्याची जी सोय केली आहे तिचें अनुकरण मुख्यतः मध्यप्रांत व मुंबई सरकारांनी करून त्या विभागांत मराठी शाळा काढण्याची तावडतोब व्यवस्था करावी अशी या संमेलनाची या दोन्ही सरकारांकडे जोराची मागणी आहे (मुंबई, १९३८).

(२२१) भाषावार प्रांतरचनेचा व तसेंच विशिष्ट भाषेची व लोकसंख्येची अभिवृद्धि होत आहे की अवनति होत आहे या गोष्टींचा विचार करतांना पुढील माहिती उपयुक्त, किंबहुना आवश्यक आहे म्हणून १९४१ सालीं होणाऱ्या लोकगणतीमध्ये प्रत्येक जिल्ह्यांत, तालुक्यांत व गांवांतहि ती ती भाषा बोलणाऱ्या लोकांच्या लोकसंख्येची नोंद करण्यांत यावी व ही माहिती सरकारी दप्तरखान्यांतच न ठेवितां प्रसिद्ध करण्यांत यावी अशी या साहित्य संमेलनाची हिंदुस्थान सरकारास आग्रहाची विनंती आहे (अहमदनगर, १९३९).

(२२२) हें संमेलन १९४१ च्या शिरगणती खात्याच्या प्रमुखाला (Census Commissioner, Delhi) अशी शिफारस करतें की त्यांनी १९४१ च्या आगामी शिरगणतीमध्ये कोंकणी आणि खानदेशी उर्फ अहिराणी या दोन्ही मराठी भाषेच्या प्रादेशिक बोली मराठी भाषेंत दाखल करून घ्याव्यात आणि त्या बोली बोलणारे मराठी भाषकांत सामील करावेत. (अहमदनगर, १९३९)

(२२३) कर्नाटकाच्या एकीकरणाचा जो ठराव मुंबई प्रांताच्या कायदेमंडळांत मान्य करण्यांत आला आहे त्याच्या अंमलबजावणीच्या वेळीं कर्नाटकाच्या सीमा ठरवितांना सरकारानें खालील सूचना अवश्य ध्यानांत घ्याव्या अशी या संमेलनाची सरकारास विनंती आहे.

(१) प्रांताची सीमा ठरवितांना खेडें हें परिमाण ठरविण्यांत यावें. कोणतें खेडें कोणत्या भाषेच्या प्रांतांत समाविष्ट करण्यांत यावें याचा निर्णय त्या त्या खेड्यांतील प्रौढ रहिवाशांचीं मतें गुप्तमतदानपद्धतीने मागून करण्यांत यावा.

(२) बेळगांव व कारवार या दोन्ही जिल्ह्यांतील जीं खेडीं व शहरें मराठी बोलणाऱ्या बहुसंख्य लोकांची असतील तीं सर्व एकत्रित करून त्यांचा एक नवीन मराठी जिल्हा सिद्ध करावा आणि तो महाराष्ट्रांत समाविष्ट करण्यांत यावा. तसेंच विजापूर जिल्ह्यांतील अशीं मराठी खेडीं शेजारच्या मराठी जिल्ह्यांस जोडण्यांत यावीं. (अहमदनगर, १९३९).

---

[१८] महाराष्ट्र-शारदामंडळ आणि भारतीय साहित्यपरिषद्

(२२४) प्रस्तुत संमेलनाच्या अध्यक्षांनी आपल्या भाषणांत २९ व्या प्याऱ्यामध्ये उल्लेख केलेल्या प्रकारचें मराठी भाषेची अभियुक्त सेवा केलेल्या पंडितांचें एक 'महाराष्ट्र शारदा मंडळ' अस्तित्वांत आणावें. या प्रश्नाचा सर्वांगीण विचार म. सा. परिषदेच्या कार्यकारी मंडळीने करावा आणि त्यासंबंधी आपला अभिप्राय व शिफारसी परिषदेच्या विशिष्ट सभेपुढे सादर कराव्यीं (मुंबई, १९२६).

(२२५) महाराष्ट्रीयांची वाङ्मयनिर्मिति आणि व्यासंग व सार्वत्रिक ज्ञानप्रसार हे हेतु शीघ्र सिद्धीस जाण्याकरिता एक सुव्यवस्थित व सर्वमान्य योजना करून ती कृतींत आणणारी एक मध्यवर्ती संस्था " अखिल महाराष्ट्रीय शारदा मंडळ " (Academy) स्थापण्यांत यावें असें या संमेलनाचें मत आहे. या संस्थेचें स्वरूप सामान्यतः श्रीमाधव मराठी मंडळाने प्रसिद्ध केलेल्या योजनेंतील आराखड्याप्रमाणे असावें. वरील आराखड्याप्रमाणे तयार केलेली योजना प्रसिद्ध करून साहाय्य मिळविण्याचा प्रयत्न करण्यांत यावा आणि मंडळाची स्थापना करण्यांत येऊन कार्यास प्रारंभ व्हावा म्हणून हें संमेलन पुढील गृहस्थांचें मंडळ नेमीत आहे (ग्वाल्हेर, १९२८.)

(२२६) खाली दिलेलें व त्याच प्रकारचें कार्य करण्यासाठी हिंदुस्थानांतील प्रमुख साहित्य परिषदांच्या निवडक प्रतिनिधींची "भारत–साहित्य परिषद्" (Academy) स्थापन करावी.

(अ) वैचक पुस्तकाची वेगळाल्या भाषांत भाषांतरें करणें व परस्पर परिचय वाढविण्यास मदत करणें.

(आ) सर्व भारतीय भाषांस मान्य अशा पारिभाषिक संज्ञा ठरविणें.

(इ) राष्ट्रभाषा, विशेषतः राष्ट्रलिपी, पसंत करून छपाईचीं सुधारलेलीं यंत्रें मोठ्या प्रमाणावर तयार करण्यास मदत करणें, वगैरे.

वरील परिषदेची स्थापना करण्याच्या खटपटीसाठी पांच गृहस्थांची एक समिती नेमण्यांत यावी व तींत (१) सरदार माधवरावसाहेब किबे, (२) श्री. दत्तात्रेय व्यंकटेश पै (३) डॉ. खांडेकर, इंदूर, (४) श्री. श्री. दा. सातवळेकर, (५) रा. शंकरराव दाते असावेत व जरूर पडल्यास या समितीस अधिक सभासद स्वीकृत करून घेण्याचा अधिकार असावा असें ही सभा ठरविते. (कोल्हापूर, १९३२)

(२२७) भारतवर्षांतील भिन्न भिन्न प्रांतीय भाषांमध्ये सहकार वाढावा व एकमेकांच्या साहित्याचा परस्परांस लाभ मिळावा यासाठी त्यांच्यामध्ये सहकार करण्याचा समय आला आहे, व अशा प्रकारचे प्रयत्न हिंदी साहित्य संमेलन, प्रयाग वगैरे ठिकाणीं सुरू झाले आहेत. अशा प्रयत्नांशीं सहकार करून सार्वभारतीय वाङ्मयविषयक प्रश्नांचा विचार करण्यासाठी आणि भारतीय भाषांच्या उन्नतीचे प्रयत्न करण्यासाठी एक 'भारतीय साहित्य परिषद्' स्थापण्यांत यावी असें या संमेलनाचें मत आहे. आणि या कार्मी महाराष्ट्र साहित्य परिषदेने योग्य ती मदत व सहकार्य द्यावें अशी या संमेलनाची शिफारस आहे. या कार्याकरिता खालील गृहस्थांचा समावेश करून परिषदेने एक समिति नेमावी. तिला आवश्यक तर अधिक सभासद स्वीकृत करण्याचा व कार्य सफल करण्याकरिता आवश्यक असा इतर सर्व अधिकार असावा. या कार्यासाठी संमेलनाने योग्य व शक्य तें आर्थिक साहाय्य करावें.

समितींतील सद्गृहस्थांचीं नांवें

१ सरदार मा. वि. किबे, इंदूर	२ रा. सा. ना. गो. चापेकर, औंध
३ श्री. पां. वा. काणे, मुंबई	४ श्री. काकासाहेब कालेलकर, वर्धा
५ प्रो. मा. त्रिं. पटवर्धन, कोल्हापूर	६ श्री. य. रा. दाते, पुणें
७ प्रो. द. वा. पोतदार, पुणें	८ श्री. भाईसाहेब कोतवाल, इंदूर
९ प्रो. शं. दा. पेंडसे, नागपूर	१० प्रो. श्री. ना. बनहट्टी, नागपूर (संयोजक)

(इंदूर, १९३५)

---

[१९] विविध

[या विभागांत— हिंदी, राजवाडे स्मारक, पेशवे दफ्तर, कीर्तन, लिमिटेड् योजना, किर्लोस्कर मंदिर, ज्ञानदेव विद्यापीठ, लेखक-संघटना, संमेलन-इतिहास इत्यादि विविध विषय आले आहेत.]

(२२८) देशी वाङ्मयाची उन्नति, विद्येचा प्रसार आणि सामाजिक प्रगति ह्या सर्व दृष्टींनी विचार करितां खाली नमूद केलेल्या सुधारणा होणें इष्ट आहे असें या सभेचें मत आहे:-

[अ] सर्व देशी भाषा एकाच लिपींत लिहिण्याचा प्रघात सुरू व्हावा. ह्या कामाला देवनागरी लिपी सर्वथैव योग्य आहे.

[आ] कोणती तरी एक देशी भाषा देशांतील सर्व प्रांतांतील शाळांत, इंग्रजी भाषा आणि त्या त्या प्रांतांची विशिष्ट भाषा या खेरीज, तिसरी भाषा म्हणून साधारण व्यवहारास उपयोगी पडेल इतकी तरी शिकविली जावी. या कामाला हिंदी भाषा योग्य आहे (मुंबई, १९१५).

(२२९) महाराष्ट्रवाङ्मयाच्या वृद्धीचें कार्य इतउत्तर सुव्यवस्थित पायावर चालविलें जावें, यासाठी त्यास द्रव्य, विद्या व प्रकाशनसाधन या त्रयीची आवश्यकता आहे व म्हणून त्यांसाठी या तिघांचें एकीकरण ज्यांत उत्तम होऊं शकेल, अशी व्यवस्था करण्यासाठी, एक समिति महाराष्ट्र साहित्य परिषदेने नेमावी, व तिने महाराष्ट्रांतील वाङ्मयसंस्थांच्या सहविचाराने ही योजना मुक्रर करावी (बडोदें, १९२१).

(२३०) महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचे रचनेसाठी एक लिमिटेड कंपनी स्थापून आरंभिलेला उद्योग आता पुरा झाला याबद्दल या सभेस फार संतोष वाटतो आणि हें प्रचंड कार्य सिद्धीस

नेल्याबद्दल कंपनीचे योजक व संस्थापक डॉ. केतकर यांचें व महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळाचें ही सभा अभिनंदन करिते.

ज्ञानकोशाच्या कार्यास मुंबई सरकार व मध्यप्रांत सरकार या दोन सरकारांनी मदत केली नाही याबद्दल ही सभा खेद व्यक्त करिते व अजूनहि या पुस्तकाच्या प्रती संपून जाण्यापूर्वी दोन्ही सरकारांनी या पुस्तकांच्या प्रतींचा संग्रह करावा (पुणें, १९२७).

(२३१) कै. इतिहासाचार्य राजवाडे यांच्या स्मारकासंबंधी प्रसिद्ध झालेली योजना या सभेस मान्य आहे व त्या योजनेप्रमाणे उपरिनिर्दिष्ट स्मारकाला प्रत्येक महाराष्ट्रीयाने सर्वतोपरी साहाय्य करावें अशी या सभेची आग्रहपूर्वक विनंती आहे (ग्वाल्हेर, १९२८).

(२३२) इतिहासाचार्य कै. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांचा अपूर्व संग्रह सुरक्षित ठेवण्यासाठी व यथावकाश प्रकाशित करण्यासाठी धुळें येथे जें 'राजवाडे संशोधन मंदिर' व्हावयाचें आहे त्यास सर्व वाङ्मयभक्तांनी मदत करावी अशी या संमेलनाची आग्रहाची शिफारस आहे (बेळगांव, १९२९).

(२३३) महाराष्ट्र-साहित्य-परिषदेचा एक एक प्रतिनिधि सर्व हिंदी विश्वविद्यालयांच्या अधिकारी मंडळांत असावा अशी या संमेलनाची त्या त्या प्रांतिक सरकारास विनंती आहे. (बेळगांव, १९२९)

(२३४) धुळे येथे कै. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांचें स्मारक म्हणून उभारण्यांत आलेल्या राजवाडे संशोधन मंदिरांत सुरक्षित ठेवण्यांत आलेल्या राजवाड्यांनी तयार केलेल्या 'मराठी धातुकोश' या बहुमोल ग्रंथाच्या प्रसिद्धिकरणास मराठी भाषाभिमान्यांनी द्रव्यद्वारा यथाशक्ति मदत करावी, अशी हें संमेलन शिफारस करीत आहे. (कोल्हापूर, १९३२)

(२३५) पेशवे-दप्तरांतील निवडक पत्रव्यवहाराचें जें गेल्या चार वर्षांत प्रकाशन झालें आहे त्या योगाने मराठी भाषेंत व महाराष्ट्राच्या इतिहासाच्या साधनांत फार मोठी भर पडली आहे. या कार्याबद्दल या संमेलनास संतोष होत असून हें कार्य पार पाडण्यास मुंबई सरकार व बडोदें, इंदूर, सौंडूर, औंध, फलटण, इचलकरंजी, विशाळगड, सावंतवाडी वगैरे संस्थानांचे अधिपति यांनी जें साहाय्य केलें आहे, त्याबद्दल या सर्वांचे आभार मानण्याची हें संमेलन संधि घेत आहे. हें महत्त्वाचें दप्तर योग्य अटींवर अभ्यासकांस खुलें झालें पाहिजे असें या सभेचें मत आहे; आणि या उपक्रमाचें अनुकरण मराठी संस्थानांनी करावें अशी त्यांस या संमेलनाची विनंती आहे. (कोल्हापूर, १९३२)

(२३६) डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीसारख्या पुणें, इंदूर, बडोदें वगैरे ठिकाणीं ग्रंथोत्तेजनाचें कार्य करणाऱ्या ज्या ज्या संस्था आहेत, त्यांनी सहविचार व सहकार्य करून ग्रंथोत्तेजनाचें काम करावें, म्हणजे ग्रंथोत्तेजनास व्यापक, व्यवस्थित व प्रगतिपर असें स्वरूप येईल असें या संमेलनाचें मत आहे. (कोल्हापूर, १९३२)

(२३७) साहित्यप्रकाशन व साहित्यप्रसार करण्यासाठी एखादी सहकारी संस्था स्थापन करण्याकरिता श्री. गो. कृ. देवधर, श्री. य. रा. दाते, श्री. रा. ना. राजाज्ञ व श्रीयुत भिडे व श्री. देवरूखकर यांचें एक मंडळ नेमावें व या मंडळास अधिक सभासद स्वीकृत करून घेण्याचा अधिकार असावा. (कोल्हापूर, १९३२)

(२३८) महाराष्ट्र साहित्य परिषदेशीं संलग्न असलेल्या बेळगांव येथील 'वाङ्मयचर्चामंडळ' या संस्थेने नाट्याचार्य, नाटककार व नट कै. अण्णासाहेब किर्लोस्कर यांचें त्यांच्या जिल्ह्याच्या ठिकाणीं म्हणजे बेळगांव येथे 'किर्लोस्कर-मंदिर' बांधून कायमचें स्मारक करण्याचें योजिलें

आहे. महाराष्ट्र साहित्याला अत्यंत उपयुक्त अशा नाट्यवस्तु व नाट्यग्रंथ यांच्या परिपूर्ण संग्रहाची जोड या स्मारकमंदिरास देण्यांत यावयाची आहे. या संमेलनाचा पूर्ण पाठिंबा आहे. (बडोदें, १९३४)

(२३९) साहित्य संमेलनाचा एकत्र आणि सुसंगत असा इतिहास परिषदेने अधिकारी लेखकाकडून लिहून घेऊन पुढील संमेलनापूर्वी प्रसिद्ध करावा. (बडोदें, १९३४)

(२४०) (अ) 'पेशवे दप्तरा'चे पंचेचाळीस खंड प्रसिद्ध केल्याबद्दल हें संमेलन मुंबई सरकारचे आभार मानीत आहे.

(आ) पेशवे दप्तराच्या खंडांच्या किंमती या संमेलनाच्या मतें फार भारी आहेत. सबब हें संमेलन मुंबई सरकारास अशी विनंती करीत आहे की, त्यांनी सदर खंडांच्या किंमती एक रुपयास छापील दोनशें पृष्ठें या प्रमाणांत आकारून सवलतीने सर्व लोकांस हे खंड उपलब्ध करून द्यावेत. (बडोदें, १९३४).

(२४१) कीर्तनसंस्था ही एक साहित्यांतील महत्त्वाची संस्था आहे आणि त्या संस्थेची जोपासना करण्याचें व तिला योग्य वळण लावण्याचें कार्य संमेलनाने करावें(बडोदें,१९३४).

(२४२) आजच्या विषम सामाजिक व आर्थिक परिस्थितीमुळे बहुसंख्य लेखकवर्गावर अनेक नियंत्रणें पडत आहेत. यामुळे राष्ट्राचें फार नुकसान होत आहे. लेखकवर्गाला स्वातंत्र्य मिळविण्याचे प्रयत्न त्या वर्गाने आपली संघटना करून करावयाचे असल्याने, त्यांनी आपली संघटना करावी अशी या संमेलनाची त्यांस शिफारस आहे (मुंबई, १९३८).

(२४३) मुंबई साहित्य संमेलनांत मंजूर झालेल्या ठरावांच्या अंमलबजावणीचा वृत्तान्त (छापील) महाराष्ट्र साहित्य परिषदेकडून संमेलनास सादर करण्यांत आला आहे तो हें संमेलन दाखल करून घेत आहे (अहमदनगर १९३९).

(२४४) श्रीज्ञानेश्वरांची ज्ञानदेवी ज्या पवित्रस्थळीं निर्माण झाली त्या नेवासें गांवीं श्रीज्ञानदेव विद्यापीठ स्थापण्याचा जो स्तुत्य संकल्प नगर वाङ्मयोपासक मंडळाने केला आहे त्याला या संमेलनाचा मनःपूर्वक पाठिंबा आहे आणि या संमेलनास आशा आहे की जनतेकडून उदारपणें साहाय्य मिळून श्रीज्ञानेश्वरांच्या कीर्तीस साजेसें स्वरूप या स्थळास लवकरच प्राप्त होईल (अहमदनगर, १९३९).

---

[२०] गौरव-बहुमान

(२४५) ज्या प्रतिभासंपन्न महाराष्ट्र ग्रंथकारांनी आणि कवींनी वाङ्मयाची विशेष सेवा करून असाधारण कीर्ति मिळविली असेल, त्यांचा सार्वजनिक रीतीने बहुमान करण्याची कांही तरी सुसंघटित व्यवस्था असावी असें ह्या सभेचें मत आहे व यासंबंधी कांहीं तरी सयुक्तिक योजना साहित्य परिषदेच्या कार्यकारी मंडळीने पुढील संमेलनापुढे विचारार्थ मांडावी. (मुंबई, १९१५).

(२४६) मराठी भाषेंत प्रतिवर्षी प्रसिद्ध झालेल्या व ज्यांची एक प्रत महाराष्ट्र साहित्य परिषदेकडे पाठविली असेल अशा गद्यांत लिहिलेल्या आणि पद्यात्मक पुस्तकांपैकी प्रत्येकीं जें सर्वोत्कृष्ट ठरेल त्याच्या कर्त्यास साहित्य परिषदेमार्फत गौरवदर्शक असें एक पारितोषिक उचित स्वरूपाचें देण्यांत यावें. यासंबंधाची योग्य योजना परिषदेच्या कार्यकारी मंडळानें करावी (मुंबई, १९२६).

(२४७) देशी वाङ्मयामध्ये अमोलिक भर टाकणाऱ्या विद्वान साहित्यिकांचा सन्मान करण्याच्या आवश्यकतेकडे हें संमेलन हिंदी विश्वविद्यालयांचें लक्ष वेधतें (जळगांव, १९३६).

---

[२१] प्रार्थना-आभार-अभिनंदन-संतोष

(२४८) लहान लहान राष्ट्रांना स्वतंत्रतेने राहण्याचा हक्क आहे आणि राष्ट्रीय व्यवहारांत आश्वासनें, तहनामे आणि करार यांचें माहात्म्य अविच्छिन्न आहे इत्यादि उदात्त तत्त्वें स्थापित करण्यासाठीच ग्रेट ब्रिटन व त्याचीं दोस्त राष्ट्रें हीं सांप्रतचें युरोप खंडांतील युद्ध चालवीत आहेत असें आपलें मत ही सभा नमूद करते आणि त्यांस संपूर्ण यश येवो अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करिते त्याचप्रमाणे सदरहू लढाईत जर्मनी आणि आणि आस्ट्रिया या देशांनी निरपराधी मनुष्यांचे प्राण घेणें, गांवें आणि शहरें उद्ध्वस्त करणें, अपरिहार्य युद्धाची उग्रता कमी करण्यासाठी मान्य गणिलेल्या धर्मयुद्धाचे निर्बंधांचा धिःकार करणें, आणि विशेषतः कुलाकुशलतेचीं निवासस्थानें, देवालयें, विद्यालयें आणि सरस्वतीपीठें यांचा नाश करणें, इत्यादि जे मनुष्यजातीच्या संस्कृतीस काळिमा आणणारे अत्याचार करण्याचे प्रकार कायम ठेविले आहेत त्यांचा ही सभा तिरस्कारपूर्वक निषेध करिते. ब्रिटिश व दोस्त राष्ट्रांच्या आणि खास हिंदुस्थानांतून गेलेल्या रणक्षेत्रीं लढणाऱ्या शूर सैनिकांस, 'तुम्ही मनुष्यसंस्कृतीचे रक्षणार्थ लढत आहां म्हणून ही सभा तुमचा अंतःकरणपूर्वक गौरव करिते, व तुम्हांस यश येवो अशी परमेश्वरापाशीं प्रार्थना करिते' असा निरोप ही सभा योग्य अधिकाऱ्यांमार्फत धाडते (मुंबई, १९१५).

(२४९) श्रीमंत अलिजाबहादर शिंदे सरकार यांच्या राज्यारोहणप्रसंगी ग्रंथरचनेस उत्तेजन देण्यासाठी श्रीमंत मातोश्री महाराणीसाहेब शिंदे व त्यांच्या मंत्रिमंडळाने पांच हजार रुपयांची वार्षिक देणगी जाहीर केली याबद्दल ही सभा त्यांचें कृतज्ञतापूर्वक आभार मानते व विनंती करते की, या संबंधांत सत्वर ग्रंथोत्तेजक मंडळ्या स्थापन करून ग्रंथोत्तेजनाच्या कार्यास सत्वर आरंभ करावा (धुळें, १९२७).

(२५०) हें संमेलन प्रगतिप्रिय ग्वाल्हेर दरबारच्या कृपाछत्राखाली भरत आहे म्हणून ही सभा श्रीमंत महाराज जयाजीराव शिंदे, उभयतां राजमाता व येथील राज्यसंस्था (कौन्सिल) यांचें सादर साभिनंदन करीत आहे आणि हें संमेलन या राज्याची व राजघराण्याची अभिवृद्धि चिंतितें (ग्वाल्हेर, १९२८).

(२५१) श्रीशिवचरित्रावर समकालीन असा अपूर्व प्रकाश पाडणारा 'शिवभारत' हा ग्रंथ श्री. दिवेकर यांनी परिश्रम करून व संशोधन करून प्रसिद्ध केल्याबद्दल या संमेलनास अत्यंत आनंद होत आहे (ग्वाल्हेर, १९२८).

(२५२) 'प्रतापगडयुद्ध' हा ग्रंथ लिहून हिंदवी लष्करी इतिहासाचा नवीन उपक्रम कॅ. ग. वा. मोडक यांनी केला. याकरिता ही सभा त्यांचें सानंद अभिनंदन करीत आहे. या पुस्तकास सर्व महाराष्ट्रीयांनी उदार आश्रय देऊन हिंदवी लश्करी इतिहासाचे रूपाने आपल्या पूर्वजांचें स्मारक चिरंतन करावें अशी सभेची विनंती आहे (ग्वाल्हेर, १९२८).

(२५३) ग्रंथकारांस उत्तेजन व आश्रय देण्याकरिता ग्वाल्हेर दरबारने प्रतिवर्षी पांच सहस्र रुपये देऊं केले आहेत व त्याचा विनियोग करण्याचें काम येथील माधवमंडळावर सोपविलें आहे. याकरिता ही सभा दरबारचें अभिनंदन करीत आहे. त्याप्रमाणे इंदूर दरबारने

ग्रंथोत्तेजनास पाच सहस्र रुपये मंजूर केले आहेत त्यासाठी त्यांचेंहि ही सभा अभिनंदन करिते (ग्वाल्हेर, १९२८).

(२५४) ग्वाल्हेरच्या साहित्य-संमेलनांत झालेल्या ठरावान्वयें आग्रा विश्वविद्यालयांत बी. ए.साठीं मराठी विषय ठेवण्यांत आला याबद्दल सदर विश्वविद्यालयाधिकाऱ्यांचे हें संमेलन आभार मानीत आहे (बेळगांव, १९२९).

(२५५) धार दरबारने इंटर-कॉलेजिएट (Inter-Collegiate) स्कूल काढून त्याच्या अभ्यासक्रमांत मराठीच्या उत्तेजनासाठी मराठीच्या अभ्यासाची व्यवस्था केली आहे याबद्दल हें साहित्य संमेलन दरबारचें अभिनंदन करीत आहे. या ठरावाची नक्कल दरबारकडे पाठवून देण्यांत यावी (मडगांव, १९३०).

(२५६) महाराष्ट्र साहित्य संमेलन हैदराबाद शहरीं भरविण्यास दक्षिणाधिपति निजाम सरकार यांनी परवानगी देऊन हैदराबादकर व वृहन्महाराष्ट्रीय साहित्यभक्त यांना परस्पर परिचय करून घेण्याची संधि दिली याबद्दल हें संमेलन त्यांचें आभारी आहे व त्यांना आयुरारोग्य प्राप्त व्हावें अशी प्रार्थना करीत आहे (दक्षिण हैदराबाद, १९३१).

(२५७) श्रीमंत महाराज यशवंतराव होळकर यांनी महाराष्ट्र साहित्य सभा, इंदूर, या संस्थेस मोठी इमारत देऊन साहित्यकार्यास जें साह्य केलें त्याबद्दल हें संमेलन श्रीमंतांचें आदरपूर्वक आभारी आहे (इंदूर, १९३५).

(२५८) म. सा. परिषदेकडून श्रीमंत सरदार मा. वि. किबेसाहेब यांचे द्वारें झालेल्या प्रयत्नांस थोडेंसें यश येऊन निजाम सरकारच्या शिक्षणमंत्र्यांनी प्राथमिक शाळांतून विद्यार्थ्यांची (मूलची) मातृभाषा दुर्लक्षिली जाणार नाही म्हणून जें लेखी आश्वासन (पेशी कचेरी नं.३६९) दिलें आहे त्याबद्दल हें संमेलन निजाम सरकारचें व सर अकबर हैदरीसाहेब व नबाब महदी यार जंगबहादुर यांचें आभारी आहे (इंदूर, १९३५).

(२५९) श्रीमंत राजकन्या मनोरमाराजे होळकर यांची प्रकृति अस्वस्थ असल्याने होळकर राजकुटुंब व प्रजाजन यांस वाटत असलेल्या काळजींत हें संमेलन वाटेकरी आहे व श्रीमंत राजकन्या यांची प्रकृति लवकर बरी व्हावी व त्यांस आरोग्य व चिरायु लाभावें अशी परमेश्वराजवळ अंतःकरणपूर्वक प्रार्थना करीत आहे. (इंदूर, १९३५).

(२६०) श्रीमंत फरजंद-इ-दौलत-इंग्लिशिया महाराज सर सयाजीराव गायकवाड, सेनाखासखेल, समशेरबहादुर, जी. सी. एस्. आय्., जी. सी. आय्. ई., एल्एल्. डी., यांच्या राज्यकारभारास ६० वर्षे पूर्ण झालीं. सुस्थिर, प्रगतिप्रिय, उदार आणि सर्वांगपूर्ण अशा दीर्घकालीन राज्यकारभाराचें महद्भाग्य श्रीमंतांस लाभलें याबद्दल त्यांचे प्रजाजन करीत असलेल्या हीरकोत्सवांत हें संमेलन अभिनंदनपूर्वक सहभागी होत आहे. मराठी वाङ्मयाच्या अभिवृद्ध्यर्थ श्रीमंतांनी दिलेल्या उदार आश्रयामुळे मराठी साहित्यांत जी भर पडली आहे व पडत आहे तिच्याबद्दल हें संमेलन श्रीमंतांचें ऋणी आहे आणि अशीच सत्कार्यांची महानदी श्रीमंतांकडून अखंड वाहावी, श्रीमंतांस सहकुटुंब सहपरिवार उत्तम आयुरारोग्य लाभावें आणि श्रीमंतांचें यशोगौरव वृद्धिंगत व्हावें अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करीत आहे. (इंदूर, १९३५).

(२६१) अजमेर बोर्डाने आपल्या अभ्यासक्रमांत मोडीचा अंतर्भाव केला आहे याबद्दल हें संमेलन बोर्डाचें अभिनंदन करीत आहे (इंदूर, १९३५).

(२६२) मॅट्रिक्युलेशन परिक्षेंत भूगोल, भौतिक शास्त्र [सायन्स] व गणित या विषयांचीं उत्तेर जन्मभाषेंत देण्याची सवलत १९३७ पासून दिल्याबद्दल हें संमेलन मुंबई विद्यापीठाचें अभिनंदन करीत आहे. तसेंच ही परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाहि कॉलेजमधील परीक्षांमध्यें हीच सवलत देण्यांत यावी अशी आग्रहाची सूचना हें संमेलन विद्यापीठास करीत आहे (जळगांव, १९३६).

(२६३) हिंदुस्थानांतील सर्व प्रमुख देशी भाषांची वाढ होऊन त्यांना राष्ट्रीय संस्कृतींत समान दर्जा मिळावा हें शिक्षणपद्धतीचें ध्येय असलें पाहिजे. या दृष्टीने प्राथमिक शिक्षणाप्रमाणेंच महाविद्यालयांतील शिक्षणहि त्या त्या प्रांतांतील देशी भाषेंतून दिलें जावें या तत्त्वाचा पुरस्कार संमेलन प्रथमपासून करीत आलें असून या तत्त्वाची आपल्या शिक्षणक्रमांत अंमलबजावणी केल्याबद्दल हें संमेलन श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिलाविद्यापीठाचें अभिनंदन करीत आहे. तसेंच या विद्यापीठास सरकारमान्य विद्यापीठाचा दर्जा मिळवून देण्याची जरूर ती व्यवस्था करावी, अशी मुंबई मंत्रिमंडळापाशीं या संमेलनाची आग्रहाची मागणी आहे (मुंबई, १९३८).

(२६४) नगर वाङ्मयोपासक मंडळाने पांच वर्षांपूर्वी ज्ञानेश्वरदर्शन ह्या नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध करून आणि नेवासें वगैरे ठिकाणीं संमेलनें भरवून त्यांचप्रमाणे पुढेहि एकनाथदर्शन वगैरे ग्रंथ प्रसिद्ध करण्याचें उत्साहाने अंगावर घेऊन आणि प्रस्तुत अखिल महाराष्ट्र साहित्य संमेलन भरवून जें मराठी वाङ्मयोपासनेचें प्रशंसनीय कार्य चालविलें आहे, त्याबद्दल ह्या संमेलनास अतिशय संतोष वाटत आहे; आणि हें संमेलन नगर वाङ्मयोपासक मंडळाचें अंतःकरणपूर्वक अभिनंदन करीत आहे (अहमदनगर, १९३९).

(२६५) मराठी भाषेच्या कोशरचनेचें अत्यन्त आवश्यक परंतु व्यवहारदृष्ट्या अतिशय दुर्घट कार्य, सहकार्य, दीर्घोद्योग व कार्यनिष्ठा यांच्या बलावर महाराष्ट्र शब्दकोशमंडळाने संघटित रीत्या पार पाडलें याबद्दल त्यांच्या चालकांचें हें संमेलन अभिनंदन करीत आहे. मराठी भाषेच्या उत्कर्षाला साहाय्यभूत होणाऱ्या अशा सर्व कार्यास धनिकांनी विशेष देणग्या देऊन आणि इतरांनी त्या त्या कोशांच्या प्रती विकत घेऊन हीं कार्यें आर्थिक दृष्ट्या यशस्वी करावींत अशी या संमेलनाची विनंती आहे (अहमदनगर, १९३९).

---

[२२] संमेलन-निमंत्रण

[निमंत्रणाचे प्रत्यक्ष लेखबद्ध रीतसर ठराव आढळले तेवढ्यांचीच नोंद येथे केली आहे.]

(२६६) महाराष्ट्र साहित्य संमेलनाचें पुढील अधिवेशन गोवें प्रांतांत भरवावें असें गोवें प्रांतांतील साहित्यभक्तांचें निमंत्रण आलें आहे तें स्वीकारावें, अशी शिफारस हें संमेलन महाराष्ट्र साहित्य परिषदेस करीत आहे. तसेंच कोल्हापूर, धुळें, अंधेरी व मिरज यांजकडून आलेल्या निमंत्रणांबद्दल त्यांचे आभार मानीत आहे. (बेळगांव, १९२९).

(२६७) पुढील अधिवेशनासाठी महाराष्ट्र शारदा मंडळाचें रीतसर आमंत्रण आलेलें आहे; आणि अहमदनगर येथील नगर वाङ्मयोपासक मंडळाचें आमंत्रण आलेलें आहे परंतु तें घटना नियम ५४ [अ] प्रमाणे लागणाऱ्या वेळेपूर्वी आलेलें नाही. तथापि नगर येथे अखिल

महाराष्ट्र साहित्य संमेलन यापूर्वी कधीहि भरलेलें नाही हें लक्ष्यांत घेऊन मुदतीची- ५४ [अ] नियमाची-अडचण यंदा अपवाद म्हणून नजरेआड करण्याविषयी महाराष्ट्र साहित्य परिषदेकडे तशी विनंती करावी अशी शिफारस करून हें संमेलन पुढील अधिवेशन अहमदनगर येथे भरविण्याचें आमंत्रण स्वीकारतें (मुंबई, १९३८).

(२६८) पुढील महाराष्ट्र साहित्य संमेलन रत्नागिरी येथील मराठी वाङ्मय मंडळ ह्या संस्थेमार्फत भरविण्यांत यावें ही विनंती या संमेलनास संमत आहे (अहमदनगर, १९३९).

पुरवणी यादी (वर्गीकृत ठराव)

(२६९)—[१] :—आठव्या साहित्यसंमेलनांत पसार झालेल्या ठरावांपैकीं सरकार व युनिव्हर्सिटी यांच्या संबंधाचे ठराव त्यांजकडे योग्य रीतीने धाडण्याची व्यवस्था करण्याचा अधिकार स्वागत-कमिटीच्या कार्यकारी मंडळास हें संमेलन देतें. (१४, मुंबई १९१५)

(२७०)—[१]— साहित्य संमेलनाचें कार्य सुकर व्हावें म्हणून संमेलनाच्या चार पोटमंडळ्या कराव्या व त्यांनीं आलेले निबंध वाचून व त्या त्या विषयाचा ऊहापोह करून संमेलनास कांही सूचना करण्यासारख्या असल्यास त्या संमेलनापुढे मांडाव्या, व या शाखा कायम कराव्या कीं काय याविषयीहि आपला अभिप्राय द्यावा. (३, इंदूर १९१७)

(२७१)—[१]— महाराष्ट्र साहित्य परिषदेने मराठी ग्रंथकारांचें एक नोंदीचें पुस्तक ठेवावें. त्यांत ग्रंथकर्त्यांचें संपूर्ण नांव व पत्ता व त्यांनी प्रसिद्ध केलेल्या ग्रंथांविषयींची माहिती असावी. ही माहिती सर्व ग्रंथकर्त्यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या चिटणिसांकडे पाठवावी. (८, मुंबई १९२६)

(२७२)—[१]— महाराष्ट्र साहित्य परिषदेने मराठी ग्रंथकारांच्या नोंदणीचें एक पुस्तक ठेवावें त्यांत प्रत्येक ग्रंथकर्त्याचें नांव, पत्ता, त्याचे ग्रंथ व चरित्र या विषयांची माहिती असावी. हें व परिषदेकडून होणारें पुस्तकपरीक्षणाचें काम सुलभ व्हावें म्हणून सर्व ग्रंथकार, प्रकाशक व मुद्रक ह्यांनी त्यांच्या ग्रंथाची एक प्रत परिषदेस पाठवावी अशी त्यांस आग्रहाची विनंती आहे. (२१, बेळगांव १९२९)

(२७३)—[१]— संमेलनाचीं अधिवेशनें प्रतिवर्षी नाताळांत भरविण्यांत यावीं, अशी संमेलनाची शिफारस आहे. (८, द. हैदराबाद १९३१)

(२७४)—[५]— ज्या ज्या ठिकाणीं सरकारी हुकुमाने सरकारी व्यवहारांत मोडी लिपी बंद करण्यांत आली आहे त्या त्या ठिकाणीं ती पुनः सुरू व्हावी अशासाठी योग्य तो प्रयत्न संमेलनाने एक मंडळी नेमून करावा. ह्या मंडळींत रा. महादेव राजाराम बोडस, व जगन्नाथ रघुनाथ घारपुरे, रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनी, रा. श्रीनिवास त्रिंबक द्रविड आणि रा. सा. गणेश जनार्दन आगाशे हे गृहस्थ असावे. (७, इंदूर १९१७)

(२७५)—[६]— दुय्यम शाळांतून इंग्रजी विषयाखेरीज बाकीच्या सर्व विषयांचें शिक्षण देशी भाषेच्या द्वारें दिलें जावें व परीक्षाहि देशी भाषेच्या द्वारेंच घेण्यांत याव्या. (४, इंदूर १९१७)

(२७६)—[६]— हिंदुस्थानच्या शाळांतील व युनिव्हर्सिटीच्या आर्टस् शाखेच्या सर्व परीक्षांच्या अभ्यासक्रमांत देशी भाषा हा विषय अवश्य विषयांत घालण्यांत यावा. (५, इंदूर १९१७)

(२७७)—[६]— मराठी इतिहासाच्या पुस्तकांत आढळणाऱ्या पर्शिअन् व उर्दू नांवांचे शुद्ध उच्चार व शुद्ध लेखन निश्चित करण्यासाठी व एकवाक्यता करण्यासाठी यादी करण्याकरिता पुढील गृहस्थांची समिति करण्यांत यावी- (१) श्रीमंत सरदार किबेसाहेब, (२) श्री. गो. स. सरदेसाई, (३) प्रो. द. वा. पोतदार, (४) डॉ. बाळकृष्ण. या समितीने तयार केलेल्या यादीस संमति मिळण्यासाठी याच्या पुढील महाराष्ट्र साहित्य संमेलनामध्यें ती यादी सादर करावी. डॉ. बाळकृष्ण या समितीचे चिटणीस म्हणून काम करतील. (१०, बेळगांव १९२९)

(२७८)—[८]— पोर्तुगीज अंमलाखालीं असलेल्या गोमांतक या महाराष्ट्राच्या भागांत तेथील सरकार मराठी शिक्षणाला मदत करीत नाही व मराठी भाषेला मताधिकार देत नाही. लोकभाषेविषयीच्या पोर्तुगीज सरकारच्या या अनुदार धोरणाचा हें संमेलन आपला निषेध प्रदर्शित करीत आहे; आणि पोर्तुगीज हिंदुस्थानातर्फे निवडल्या गेलेल्या पोर्तुगीज पार्लमेंटांतील प्रतिनिधींना हे हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न करण्याबद्दल विनंति करीत आहे. (१२, मुंबई १९२६)

(२७९)—[८]— निजाम हैदराबाद संस्थानामध्यें खासगी शाळा बंद करण्याचा जो कायदा करण्यांत आला आहे त्यामुळे मराठी शाळांना नुकसान पोहोचणार असल्याने ही परिषद् त्या कायद्याचा निषेध करीत आहे. (९, मुंबई १९२६)

(२८०)—[१५]— हिंदु आणि मुसलमान यांच्यामध्ये ऐक्याचें संवर्धन जेणेंकरून होईल व उभय समाजांस आपआपसांविषयीं जेणेंकरून अधिक माहिती मिळेल अशा तऱ्हेचा चांगला ग्रंथ तयार करण्याबद्दल महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यकारी मंडळाने युक्त योजना करावी. (१८, मुंबई १९२६)

(२८१)—[१५]— (अ) जुने शाहिरी पोवाडे, बोधपर व उपदेशपर लावण्या, ख्याल, टप्पा वगैरे अुच्च प्रकारचे मराठी गायनप्रबंध वगैरे काव्यांचें संरक्षण व संगोपन करणें, त्यांचा संग्रह करणें, त्यांच्या जुन्या चालींचें नोटेशन् करवून त्या चाली जिवंत ठेवणें, तसेंच जुन्या अगर नव्या चालींवर पोवाडे अगर लावण्या तयार होतील असें त्यांस अुत्तेजन देणें हें अत्यंत इष्ट आहे.

(आ) या वाङ्मयाच्या चाली वगैरे बाबतींत (वृत्त, मात्रा, यमक आणि प्रास वगैरे) काय काय नियम आहेत ते लिहून शाहिरी पेशास उत्तेजन मिळावें म्हणून या वाङ्मयास शास्त्रीय स्वरूप देण्याचा प्रयत्न हें वाङ्मय व गायनशास्त्र यांतील तज्ज्ञ लोकांनी करावा असें या सभेचें मत आहे.

(इ) त्याचप्रमाणे स्त्रीगीतें, गोपगीतें व लोकगीतें यांचाहि संग्रह करावा. (२३, पुणें १९२७)

(२८२)—[१५]— १९३० सालीं आधुनिक मराठी रंगभूमीस पन्नास वर्षें पुरीं होतात. या पन्नास वर्षांचा मराठी रंगभूमीचा सांगोपांग व सचित्र इतिहास मराठी नाट्यवाङ्मय व मराठी रंगभूमीच्या ज्युबिलीप्रसंगीं प्रसिद्ध करण्याचें काम महाराष्ट्र साहित्य परिषदेने अंगावर घ्यावें व या कामास महाराष्ट्रांतील सर्व नाटक मंडळ्यांनी साहाय्य करावें अशी या संमेलनाची विनंती आहे. (१७, बेळगांव १९२९)

(२८३)—[१५]— व्यक्तींत, समाजांत व राष्ट्रांत नवचैतन्य उत्पन्न करून राष्ट्रीय-बल वाढविण्यास कारणीभूत अशा व्यायामविषयक वाङ्मयांत लेखकवर्गाने यथाशक्ति भर घालण्याचा प्रयत्न करावा अशी या संमेलनाची सूचना आहे. (१२, द. हैदराबाद १९३१)

(२८४)—[१५]—राष्ट्रांत नवचैतन्य व नवस्फूर्ति उत्पन्न होईल असें राष्ट्रीय गुण-संवर्धक वाङ्मय निर्माण करण्याचा साहित्यलेखकांनी विशेष प्रयत्न करावा अशी त्यांस आग्रहाची विनंती आहे. (१३ द. हैदराबाद १९३१)

(२८५)—[१८]— देशी भाषा व साहित्य यांचा प्रसार व परिपोष करण्याकरिता जे जे उपाय इष्ट दिसतील ते ते योजून इष्ट हेतु सफल करण्यासाठी हिंदुस्थानांत प्रचलित असलेल्या सर्व देशी भाषांच्या साहित्यसभांशीं जुटीने काम करण्यास महाराष्ट्र साहित्य परिषद् तयार आहे. (६, इंदूर १९१७)

(२८६)—[१९]— संमेलनापुढे कोणते ठराव आणावयाचे तें ठरविण्याचें काम खाली दिलेल्या गृहस्थांच्या कमिटीकडे सोंपविण्यांत येत आहे (पुढे नांवें)– (२, मुंबई १९१५)

(२८७)—[१९]— या संमेलनाच्या निमित्ताने भरलेल्या प्रदर्शनांत ठेवण्याकरिता जीं छापील पुस्तकें आलेलीं आहेत तीं साहित्यपरिषदेच्या पुस्तकालयाला देण्यांत यावींत. (८, मडगांव १९३०)

(२८८)—[२१]— ठराव १५ मुंबई– स्वयंसेवक, वगैरेंचा आभार मानणारा— (१५, मुंबई १९१५)

(२८९)—[२१] — ब्रिटिश साम्राज्य व दोस्तराष्ट्रें यांचा चालू युद्धांत लवकर विजय व्हावा अशी ही सभा मनःपूर्वक प्रार्थना करते. (१, अिंदूर १९१७)

खुलासा

अि. स. १९०९ ते १९३९ पर्यंतच्या संमेलनांत अेकंदर ३०८ ठराव मंजूर झाले. पैकी दुखवट्याचे ठराव १९ भरतात. ते वर्गीकरणांत गाळले आहेत. बाकी अुरले जे २८९ ठराव त्यांचें वर्गीकरण वर केलें आहे.

पैकीं क्रमांक १ ते २६८ पावेतों ठरावांचा अेक भाग आणि २६९ ते २८९ मिळून २१ ठरावांचा पुरवणी भाग अशा दोन भागांत हे २८९ ठराव वांटावे लागले. मागे म. सा. पत्रिकेंत (वर्ष ५ अंक ४) १९०९ ते १९३१ अखेर भरलेल्या संमेलनांतील ठराव वर्गीकृत करून दिले होते. तेच आम्हीं प्रथम जुळण्यास दिले. नवेंच वर्गीकरण केलें. पुढे मूळावरून अुलटसुलट ताळेबंद तयार करूं लागलों तेव्हा या प्रयत्नांतील अपुरेपणा दिसून आला. म्हणून २१ ठरावांची पुरवणी जोडून हें वर्गीकरण पुरें केलें.

पुरवणी यादींत ठरावांच्या धावत्या अनुक्रमांकापुढे चौकटी कंसांत घातलेला आंकडा वर्गीकरण-विभागाचा समजावा. वर्गीकरण-विभाग अेकूण २२ आहेत हें वर्गीकृताच्या पहिल्या विभागावरून व अनुक्रमणिकेवरून स्पष्ट होअील. शेवटी स्थलाच्या मागें टाकलेला आंकडा त्या त्या वेळच्या संमेलनांतील ठराव क्रमांकाचा समजावा.

ठराव वर्गीकरणास घेतांना संमेलनांच्या छापील वृत्तान्तांत ज्यांची गणना ठरावांत केली आहे असें दिसून आलें त्या ठरावांचाच अंतर्भाव केला आहे. अध्यक्षसूचना आणि आभार यां बाबत

ठराव असे शब्द अहवालांतील वर्णनांत येतात परंतु अशा ठरावांस क्रमांक घालून त्यांचे परिगणन, क्रमांक २८८ चा अपवाद सोडल्यास, अन्यत्र कोठें केल्याचें आढळून आलें नाही. अर्थात् असे अननुक्रम ठराव आम्हीं वर्गीकरणार्थ घेतलेले नाहीत.

क्वचित् असें आढळून आलें की गळलेला ठराव अहवालांतील ठरावसंख्येंत परिगणला आहे (अुदा. नागपुर संमेलन–अहवालांतील संमेलनीय ठराव क्रमांक ९). आम्हीं असे ठराव वगळून आंकडा धरला आहे म्हणजे नागपूरचे ठराव १३ अैवजी १२ च धरले आहेत. तसेंच नागपूर संमेलनांत दुखवट्याचा समावेश संमेलनीय क्रमांक १३ च्या ठरावांतच अेक भाग म्हणून केला आहे. तो दुःखवटयाचा भाग आम्हीं दुखवटयाचे ठराव वगळले असल्यामुळे आमच्या पुनर्मुद्रणांत गाळला आहे (वर्गीकृत क्रमांक १०७ पाहा)

तसेंच समिति नेमण्याच्या ठरावांतून समितीवरील सभासदांचीं नांवेंहि दिलेलीं आम्हीं गाळण्याचेंच धोरण ठेवलें. तथापि हें धोरण निरपवादपणें पाळलें गेलें नाही त्यामुळे कित्येक स्थळीं हीं नांवें येअूनहि गेलीं आहेत ! !

वर्गीकृत क्र. २५६ चा ठराव हैदराबाद संमेलनाच्या अहवालांत आढळत नाही. परंतु तो म. सा. पत्रिकेच्या हैदराबाद ठराव यादींत आला आहे (म. सा. प. वर्ष ४ अंक १।२, पृ. १२३ संमेलनीय ठराव क्रमांक २ पाहा) पत्रिकेंतील अुपर्युल्लिखित ठराव वर्गीकरणांतहि तो समाविष्ट आहे (म. सा. प. वर्ष५, अंक ४, पृ. १३ पहा.) सबब आम्ही पात्रिकेचें अनुसरण केलें आहे.

आमचा वर्गीकृत ठराव क्रमांक १३० (बेळगांव) यांतील पुढील मजकूर—"त्यापैकी कांही पुस्तकें—(१) निबंधमालेंतील सद्यस्थिति, (२) मॅझिनीचें चरित्र–सावरकरकृत, (३) 'रामदासीबोवा'–पांगारकरकृत, (४) ग्रंथमालेंत प्रसिद्ध झालेला "आचार्यपरिषद्" व (५) धनुर्धारी यांचे 'शूर अबला'– आहे तो ठरावाच्या भागासारखा दिसत नाही म्हणून पत्रिका-वर्गीकरणांत गाळला असावा असें दिसतें. 'सद्यस्थिति' हें नांवहि बरोबर नाही. निबंधाचें नांव 'आमच्या देशाची स्थिति' असें आहे ! ! परंतु अितकें बारीक पाहतो कोण संमेलनाच्या धांदलींत ? असा भाग गाळला गेला तेंच एकापरी बरें झालें असें म्हणावेंसें वाटतें.

आमच्या वर्गीकरणांतील क्र. ८२ चा ठराव (पृ. ४६ चा तळ) हा ठराव वास्तविक **बेळगांव** (१९२९) चा आहे. परंतु तो व क्रमांक ८४ हे जवळ जवळ एकच असल्याने घोटाळा लवकर अुलगडला नाही. अर्थात् क्रमाने पाहतां हा पहिला ८२ चा ठराव आमच्या क्रमांक ९२ च्या नंतर यावयास पाहिजे. एवढीच चूक नाही. या ८२ च्या पुढल्या ठरावासहि ८२ हाच क्रमांक पडला आहे. परंतु क्रमांक ८१ मुदलांतच गळाला आहे. अर्थात् योग्य ती दुरुस्ती वाचकांनी कृपा करून करून घ्यावी. अितकें बरें झालें की अेकूण क्रमांकांत कांही फरक पडला नाही.

वर्गीकृत क्रमांक २१६ च्या ठरावांत पुढील मजकूर अधिक जोडला पाहिजे

"म्हणून या हेतूने असें ठरविण्यांत येत आहे की—

(१) बेळगांव जिल्ह्यांतील महाराष्ट्रीयांनी कानडी भाषेला या जिल्ह्यांतील प्रमुख भाषा या नात्याने तिलाहि योग्य तो मान द्यावा.

(२) त्याबरोबरच या जिल्ह्यांतील कर्नाटकीय लोकांनीहि मराठी ही महत्त्वाची भाषा या नात्याने योग्य तो मान द्यावा.

वर कलम (१) व (२) यांत नमूद केलेल्या तत्त्वाचें प्रतिपादन कर्नाटक साहित्य

संमेलनानेहि आपल्या ठरावाच्या द्वाराने करून कर्नाटक व महाराष्ट्र यांच्यामधील सलोखा कायम टिकविण्याला मदत करावी अशी या संमेलनाची अिच्छा आहे.''

वर्गीकृत क्रमांक ६१ हा क्रमाप्रमाणे क्रमांक ५७ च्या मागोमाग घ्यावयास पाहिजे.

वर्गीकृत क्रमांक १२२ चें साल १९३४ पाहिजे; आणि क्रमांक १३० पुढें बेळगांव १९२९ असा सर्कस मजकूर पाहिजे; आणि क्रमांक १५५ चे साल १९३९ पाहिजे.

क्रमांक १७२ मध्यें 'पूर्वी' पुढे ''ज्यांची'' पाहिजे; क्रमांक ९९ मध्यें 'मुंबअी युनिव्हर्सिटी'बद्दल 'मुंबअी विश्वविद्यालयाने' अशी दुरुस्ती हवी; क्रमांक ९० ओळ १ 'अभ्यासक्रम' अशी शुद्धि पाहिजे आणि क्रमांक ८३ मध्यें Vernacular असा वर्णक्रम पाहिजे.

शेवटची चूक सुधारावयास हवी ती ही की सा. वि. पृष्ठ ३४, परिशिष्ट ९ वें, येथे कंसांतील मथळ्यांतील इ. स. १९१५ ऐवजी १९०९ ते १९३९ असें वाचावें.

परिशिष्ट १० वें

१९०५ मधील सातारा येथील संमेलन

परिशिष्ट ३ मध्यें सातारा संमेलनाबाबतची नोंद 'केसरी'तील कांहीशा टीकात्मक स्फुटाचे आधारें केली आहे. बडोदें संमेलनांत रा. वा. गो. आपटे यांनी या संमेलनासंबंधाने पुढीलप्रमाणे उल्लेख केला आहे. ''मराठी भाषेविषयीं कळकळ बाळगणारे लेखक व वाचक यांना एकत्र करून साहित्याच्या उत्पत्तीच्या यत्नाविषयींचा प्रश्न त्यांचेपुढें मांडावा अशी कल्पना पांच वर्षांपूर्वी सातारच्या माझ्या मित्रांपैकीं कित्येकांना प्रथम सुचली ... हें पहिलें संमेलन १९०५ सालीं झालें. सातारची मंडळी व बाहेरगांवचे गृहस्थ मिळून २५।३० गृहस्थ येवढेच काय ते यांत मन घालणारे गृहस्थ होते. त्यांच्या खाजगी भेटी व संभाषणें आणि दोन तीन जाहीर सभा व व्याख्यानें वगैरे होऊन अशी संमेलनें वरचेवर व्हावीं, त्याचप्रमाणे मराठी भाषा बोलणाऱ्या निरनिराळ्या प्रांतांतल्या लोकांचें एकीकरण व्हावें हें इष्ट असून त्यासाठीं जुटीनें यत्न करावे असें ठरलें.'' [रा. वासुदेव गोविंद आपटे – भाषण – बडोदें संमेलन १९०९, पृ.१२.] तत्कालीन टिपणें, पत्रव्यवहार, वर्तमानपत्रें, नियतकालिकें आणि कदाचित् सरकारी गुप्त व प्रकट दप्तरें हीं पाहण्यास मिळतील तर या संमेलनाचा सविस्तर वृत्तान्त सिद्ध करतां येईल. येथें अलीकडे हातीं आलेल्या एका महत्त्वाच्या टिपणावरून थोडी माहिती जुळवून लिहिली आहे.

सातारा येथील कै. दादासाहेब करंदीकर हे एक अत्यंत साक्षेपी गृहस्थ होते. दिनचर्या लिहिण्याचा त्यांचा क्रम असे. विद्यार्थी असतांनाच त्यांनी दिनचर्या लिहिण्यास प्रारंभ केला. एका प्रसंगाने या लेखकास त्यांनी कौतुकाने आपली १८७४ सालची दिनचर्या-वही दाखविली होती ! कै. दादासाहेब हे वरील १९०५ च्या सातारा-संमेलनाचे अध्यक्ष होते असें दिसतें. तेव्हा दादासाहेबांच्या 'दिनचर्ये'त या संमेलनाची नोंद अवश्य मिळेल अशी आमची अटकळ होती. दादासाहेब यांचे सुविद्य चिरंजीव बॅ. विठ्ठलराव करंदीकर यांनी माझेकरिता तसदी सोसून या 'दिनचर्ये'तून असलेल्या कांही नोंदी पाठविल्या आहेत. दिनचर्येतील या नोंदी मुद्देवजा असून इंग्रजी-मराठी अशा संमिश्र आहेत. त्यांत सातारासंमेलन असा स्पष्टोल्लेख

नाही. परंतु त्या नोंदी या संमेलनाच्यासंबंधीच असाव्यात हें अनुमान अगदी स्पष्ट करतां येतें. केसरींतील स्फुट २३ मेचें आहे, आणि मागील आठवड्यांत साताऱ्यास संमेलन झालें असें त्यांत म्हटलें आहे; या नोंदी १७।५।१९०५ ते २१।५।१९०५ पावेतोच्या आहेत. २१।५ ला रविवार साधून तो संमेलनाचा मुख्य दिवस धरला असावा. या नोंदीचा निष्कर्ष येणेंप्रमाणे निघतो.

ता. १७।५।१९०५– मुंबईची शेट पुरुषोत्तमदास (म्हणजे बहुधा शेट पुरुषोत्तम विश्राम मावजी हे असावे. कै. द. ब. पारसनीस हे या सातारा संमेलनांतील एक उत्साही कार्यकर्ते होते; आणि मुंबईचे शिवाजी-भक्त मावजी शेट आणि पारसनीस यांचा निकट संबंध सुप्रसिद्धच आहे.) वगैरे. मंडळी येतात त्यांस स्टेशनावरून आणून सचिवबाड्यांत उतरविलें. दुपारीं भोजनोत्तर चर्चा झाली– प्रारंभ (कार्याचा) कसा करावा ! नंतर सायंकाळीं सातारा हायस्कूलच्या इमारतींत सभा भरली. रा. पांगारकर यांचें 'अठराव्या शतकांतील (मराठी)– कवि' या विषयावर रा. पाठक (कै. रावब. विठ्ठल नारायण– मुख्याध्यापक) यांच्या अध्यक्षतेंत व्याख्यान झालें.

ता. १९।५।१९०५– सातारा युनियन क्लबमध्ये (संमेलनासाठी) आलेल्या विद्वद्रत्नांस पानसुपारी झाली व गवयाचें गायन ऐकविलें.

या संमेलनांत दादासाहेब यांनी जें भाषण केलें त्याचा अंदाज होण्याजोगे मुद्दे दिनचर्येंत २०।५।०५ नोंदलेले आढळतात. ता. १६ च्या टाइम्समधील लिटररी काँग्रेस व सर्व्हेंटिज्बाबतचा उल्लेख करून त्यांनी वाङ्मयाची लाट खाजगी पत्रांतहि कशी उसळते हें दर्शवितांना नाना फडणीस यांस नाशिक येथून एका स्त्रीने लिहिलेला पुढील श्लोक वाचून दाखविला :–

यत्नें कल्पतरूस रायपुरिंचें आळें बरें बांधिलें ।
साक्षेपें सुरधेनुच्याऽमृतरसें हो सर्व कीं लिंपिलें ॥
त्या वृक्षीं रुइचीं फुलें प्रगटलीं झाली निराशा मना ।
वांच्छा हे पुरवील कोण मनिंची श्रीमंत नानाविना ॥

मेघनाथ देवशास्त्री यांनी काशीहून लिहिलेल्या पत्राचा उल्लेख करून काव्य व संगीत या भावनेच्या दोन भाषा असून गद्यापेक्षा त्या अधिक चिरकालिक असतात असा आपला अभिप्राय त्यांनी प्रगट केला.

इंग्रजी-वाङ्मयांतहि धार्मिक प्रवृत्ति कशी प्रबळ दिसते हें त्यांनी पोपकौपरादिकांचा उल्लेख करून दर्शविलें. परंतु ऐहिकाविषयीं उदासीन राहणें उचित नाही, नुसत्या ध्यानाने हित साध्य होणार नाही, राष्ट्रालाहि देह आणि आत्मा दोन्ही अंगें असतात, आपण या उभय अंगांचा समन्वय केला पाहिजे; स्पेन्सरने म्हटल्याप्रमाणे समजुती आणि आचार यांत पक्का मेळ ठेवला पाहिजे; निव्वळ चिंतनपरता हा आळसाचा परिणाम होय, यासाठी जागे व्हा आणि कामाला लागा, विलायतेंत अनेक पक्ष व मतें असूनहि ज्याप्रमाणे राष्ट्रहिताचा प्रश्न पुढे येतांच सारे एक होतात, तीच धारणा येथें आपण शिकली पाहिजे आणि वाङ्मयांत ती प्रवृत्ति बळावेल अशा कर्तव्यबुद्धीनें वागलें पाहिजे, इत्यादि प्रतिपादन त्यांनी केलें.

या संमेलनांत रा. केशवराव आपटे, रा. लोंढे, प्रो. रानडे, रा. करमरकर, रा. पांगारकर, रा. कोल्हटकर, रा. सोनटक्के प्रभृतींचीं भाषणें झालीं; कांही ठरावहि झाले आणि ता. २१।५।१९०५ ला रा. साने, रा. पाटणकर, प्रो. रानडे, करमरकर, भाजेकर इ. मंडळी पुनः जमली असें दादांच्या टिपणांवरून दिसतें.

रा. केशवराव आपटे यांनी बंगाली भाषा एका दिवसांत शिकविता येते; रा. लोंढे यांनी मुसलमानी कावेता आमच्याकडे आली परंतु त्यांचें रहस्य आलें नाही; प्रो. रानडेयांनी श्री. गायकवाड यांच्या ३२००० रु. देणगीचा उल्लेख करून कोश तयार आहे, शास्त्रीय परिभाषा सिद्ध करून शास्त्रीय ग्रंथ मराठींत झाले पाहिजेत; रा. करमरकर यांनी हिंदी भाषा व उर्दू लिपि यांच्यामुळे कसा घोटाळा होतो आणि एक भाषा व एक लिपि यांची आवश्यकता किती आहे; रा. कीर्तिकर व रा. सांबारे यांनी कालमानानें शब्दांचे अर्थ फिरतात ते नियमित केले पाहिजेत इत्यादि मुद्दे चर्चेंत पुढे मांडले.

वरील टिपणांत दहा विषयांवर सुलभ व सोप्या अशा सदीप व्याख्यानांसाठी डिस्ट्रिक्ट बोर्डाच्या १००० रु. च्या देणगीचा आणि संशोधनासाठी रु. ८०० च्या देणगीचाहि मोघम उल्लेख आढळतो.

रा. पांगारकर यांच्या भाषणांत साहित्याची चर्चा झाली. मुद्यांतील टांचणांवरून दिसतें. की 'मोरोपंती वेंचे' या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत रा. पांगारकर यांनी याच विषयावरील आपलीं मतें प्रतिपादिलीं आहेत*.

* ठिकाठिकाणचा कंसांतील मजकूर आमचा आहे. बॅ. करंदीकर यांनी केलेल्या साहाय्याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहों. —संपादक

परिशिष्ट ११ वें[1]

(कसरी, तारीख १० जुलै सन १९०६)

महाराष्ट्र साहित्य परिषद्

रा. रा. केसरीकर्ते यांस—

वि. वि. मराठी भाषेच्या अभिमान्यांस 'महाराष्ट्र साहित्य-परिषदे'कडून खालील विनंतिपत्र पाठविण्यांत आलें आहे.

विनंतिपत्र

मराठी ग्रंथकारांचें दुसरें संमेलन गेल्या मे महिन्यांत पुणें येथे होऊन 'महाराष्ट्र साहित्य परिषद्' नांवाची एक सभा स्थापण्यांत आली हें आपणास माहीत असेलच. हल्लीच्या काळांत मराठी भाषेची वाढ चांगल्या रीतीने होण्यास ज्या साधनांची जरूर आहे तीं साधनें गोळा करण्याचा प्रयत्न करणें हें या परिषदेचें मुख्य काम आहे व तें सिद्धीस नेण्याकरिता सध्या तीन सेक्रेटरींची नेमणूक केली आहे परिषदेच्या कामास लोकांकडून कसें काय साहाय्य मिळतें हें पाहून मग पुस्तकसंग्रहाकरिता इमारत वगैरेची व्यवस्था करावयाची आहे. इंग्रजी भाषा इतकी प्रौढ आहे तरी विलायतेंत अद्यापीहि वेळोवेळीं इंग्रजी वाङ्मयाच्या कांही विशिष्ट शाखेंत उत्तेजन देण्याकरिता सभा काढण्यांत येतात. अशा धर्तीवरच हल्लीची महाराष्ट्र साहित्य-परिषद् काढलेली आहे. मुंबई, ठाणें वगैरे ठिकाणीं ग्रंथसंग्रहालयासारख्या संस्था निघाल्या आहेत, व त्या आपापलें काम चांगल्या रीतीने करीत आहेत. पण पुस्तकांचा नुसता संग्रह केल्याने सर्व काम होत नाही. म्हणून ही नवी परिषद् स्थापण्यांत आली आहे. ह्या परिषदेने

---

१ सदरहू पत्रक माझाहून राहिलें, तथापि उपयुक्त जाणून त्याचा संग्रह येथे केला आहे. —संपादक.

हातीं घेण्यासारखीं जीं कामें आहेत ती येणेंप्रमाणे :—

(१) मराठी ग्रंथकारांची व लेखकांची वेळोवेळीं परिषद् भरवून परस्परांमधील परिचय वाढविणें व त्यांच्या अडचणी काय आहेत तें समजून घेऊन त्या दूर करण्याचा प्रयत्न करणें.

(२) आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या मराठी ग्रंथांचा किंवा लेखांचा ठाणें, मुंबईप्रमाणे इतर मुख्य मुख्य ठिकाणीं संग्रह करण्यास उत्तेजन देणें व वाचनालय काढणें.

(३) प्रसिद्ध न झालेल्या मराठी काव्यांचा किंवा ऐतिहासिक कागदपत्रांचा व वाङ्मयात्मक लेखांचा संग्रह करून त्यांच्या प्रसिद्धीची तजवीज करणें.

(४) प्रसिद्ध झालेल्या मराठी ग्रंथांचें परीक्षण होऊन चांगल्या ग्रंथांस उत्तेजन मिळावें याकरिता व एकंदर परिषदेचे हेतु तडीस नेण्याकरिता आणि साहित्यचर्चा करण्याकरिता साधल्यास एखादें मासिक किंवा त्रैमासिक काढणें.

(५) मराठी भाषेचा मराठींत मोठा कोश करण्याची तजवीज करणें.

(६) निरनिराळ्या विषयांवर योग्य बक्षिसें देऊन ग्रंथ तयार करविणें.

(७) शुद्धलेखनादि करून महाराष्ट्र व्याकरण-विषयक व सामान्यतः वाङ्मयात्मक प्रश्नांची चर्चा करणें.

(८) हिंदुस्थानभर दूरदूर ठिकाणीं मराठी भाषा बोलणारांचा परिचय भाषेचा द्वारें वाढविणें व त्यांस भाषाभिवृद्धीच्या कार्मी साहाय्य देणें.

(९) मराठी भाषेंतील व्यवहार वाढविणें.

हीं सगळीं कामें जशीं फार महत्त्वाचीं तशीं घडून येण्यास बरींच अवघड आहेत' म्हणून हीं सगळीं एकदम हातीं न घेतां थोडीशीं प्रथम हातीं घेऊन तीं शेवटास नेण्याचा यत्न करणें अधिक श्रेयस्कर वाटून आम्हीं पुढील उद्योगास तूर्त लागण्याचें योजिलें आहे :—

(१) जुनीं मराठी काव्यें, ऐतिहासिक कागदपत्र व इतर वाङ्मयात्मक लेख इत्यादिकांचा एखाद्या सुरक्षित इमारतींत संग्रह करण्यासाठी इमारत बांधण्याचें सामर्थ्य येईपर्यंत दुसऱ्या एखाद्या सुरक्षित स्थळीं सदर लेख व कागदपत्र वगैरे ठेवण्याची तजवीज करणें.

(२) डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रा. सोसायटीच्या हातून लोकांना संतोष होईल असें काम कां होत नाही, याविषयींची माहिती मिळवून त्या संस्थेच्या मार्गांतल्या अडचणी दूर करण्याचे कार्मी साहाय्य देतां आल्यास तें देऊन महाराष्ट्र साहित्याच्या उत्कर्षास या संस्थेचा उपयोग करून घेतां येईल अशी तजवीज करणें.

(३) मराठी व्याकरणांत सध्या वादग्रस्त मुद्दे कोणते आहेत ते निवडून त्यांवर ठळक ठळक विद्वान गृहस्थांचे अभिप्राय गोळा करणें.

हीं व इतर कामें जीं ही परिषद् वेळोवेळीं हातीं हेईल तीं नीट रीतीने पार पाडण्यास अनेकांच्या प्रत्यक्षाप्रत्यक्ष सांपत्तिक व अन्य प्रकारच्या साहाय्याची फार जरूरी असल्यामुळे मराठी भाषेची अभिवृद्धि इच्छिणारांनी या परिषदेचे सभासद होऊन यथाशक्ति मदत करावी अशी आमची अगत्याची विनंति आहे. आम्हीं योजिलेल्या कामांपैकी कांही कामें ठाणें व मुंबई येथील ग्रंथसंग्रहालय कमिट्या, डे. व्ह. ट्रा. सोसायटी व दुसऱ्या कांही संस्था करीत आहेत. तरी अद्याप इतकें काम होणें आहे की, निराळी साहित्य परिषद् निघाल्याने पूर्वीच्या कोणत्याहि संस्थेस धक्का पोचण्याचा कधीहि संभव नाही. शिवाय परिषदेची वार्षिक वर्गणी अवघी १ रुपया ठरविली आहे. ही फारच अल्प आहे खरी. तथापि पुष्कळ वर्गणीदार मिळाल्यास 'दसका लकडी एकका बोजा' या म्हणीप्रमाणे या अल्पारंभानेहि बरेंच कार्य होईल.

किंबहुना वर्गणी कमी ठेवून परिषदेचे सभासद होण्याची सवड होईल तितक्या मोठ्या समाजास द्यावयाची असा परिषदेचा हेतूच आहे. मराठी भाषा बोलणारांची व तिची अभिवृद्धि इच्छिणारांची संख्या महाराष्ट्रांत आणि मध्यप्रांत, वऱ्हाड, बडोदें, इंदूर, ग्वालेर, बनारस, तंजावर वगैरे दूरदूरच्या प्रांतांतून बरीच मोठी आहे. या सर्वांनी या परिषदेच्या कामांस साहाय्य केलें असतां बरेंच कार्य होईल. सारांश, परिषदेस मदत करून तिला यशस्वी करणें हें सर्वथा तिच्या साहाय्यकर्त्यांच्या हातीं आहे, आणि अशा गृहस्थांकडून उदारपणें साहाय्य मिळेल अशी परिषदेस उमेद आहे. क. ब. हे. वि.

वासुदेव गोविंद आपटे
विनायक लक्ष्मण भावे
कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर
सेक्रेटरी म. सा. प.

परिशिष्ट १२ वें
संमेलन-नामकरण आणि वर्षगणन

नामकरण

"महाराष्ट्र साहित्य संमेलन" हें नांवच आमच्या प्रतिवार्षिक संमेलनांस चालतें. प्रथम कांही वर्षें "मराठी ग्रंथकारांचें संमेलन" असें नांव चाललें. १९०८ त त्याला मराठी लेखकांचें संमेलन' म्हणण्यांत आलें. पण १९०९ च्या बडोदा अधिवेशनांत महाराष्ट्र साहित्य संमेलन" हें नांव पहिल्याने देण्यांत आलें. परंतु पुढे संमेलनाचीं जीं दोन अधिवेशनें बडोद्यास झालीं त्या वेळीं महाराष्ट्र हा शब्द बदलून "मराठी साहित्य संमेलन" असें नांव दिलेलें आढळतें आणि हा बदलहि बडोदें येथेच प्रथम दिलेल्या आणि पुढे चालत आलेल्या नांवांत आणि तोहि बडोदें येथेच करण्यांत आला ! नंतर कोल्हापूर व इंदूर (१९३५) या दोन अधिवेशनांना (१९३२) हें 'मराठी'युक्त नूतन नांवच चालकांनी चालविलें. ग्वाल्हेर (१९२८) संमेलनाच्या मागे 'अखिल भारतीय' ही उपाधि लावण्यांत आली होती. यावरून संमेलनाचें नामकरणहि नियमाने निश्चित करणें अवश्य आहे असें वाटतें, म्हणजे असे विसंवाद दिसून येणार नाहीत.

वर्षगणन

नामकरणापेक्षाहि वर्षगणनांत फारच घोटाळा झालेला आढळून येतो. १९०५त साताऱ्यास मंडळी जमली आणि त्यालाच "पहिलें संमेलन" (बडोदें १९०९ हकीकत पृ.२२) म्हणण्यांत आलें. नंतर पुढचीं तीन संमेलनें लागोपाठ प्रतिवर्षी पुण्यास भरली तेव्हा १९०९ मधील बडोद्याचें संमेलन क्रमाने "पांचवी बैठक" गणलें गेलें (बडोदें १९०९ हकीकत पृ. ३). १९०९ नंतरचें सहावें संमेलन १९१२ त अकोल्यास श्रीराम नाटकगृहांत झालें. त्याचा 'रिपोर्ट' म. सा. परिषदेच्या चिटणिसांनी प्रसिद्ध केला. परंतु या अकोल्याच्या सहाव्या संमेलनास वरील क्रमाप्रमाणे सहावें न म्हणतां सातवें म्हणण्यांत आलें ! या संमेलनाचे स्वागताध्यक्ष वयोवृद्ध कै रावब. वि. मो. महाजनी यांच्या भाषणांत याचा उल्लेख आढळतो (पाहा अकोलें १९१२ 'रिपोर्ट' पृ.६). रावब. महाजनी यांचाच अनुवाद चिटणीसांनी आपल्या रिपोर्टांत केला (अकोले पृ.१). यद्यपि रावब. चें विधान— पहिलें संमेलन

रानडे यांनी पुण्यास "सन १८८० च्या आगेमागें" भरविलें—असें अनिश्चित होतें तरी चिटणिसांच्या रिपोर्टांत मात्र तें १८८० सालीं भरल्याचा निश्चितपणा त्यास प्राप्त झाला! हा निश्चितपणा १९१५च्या मुंबई संमेलनाच्या चिटणिशी "रिपोर्टांत" स्थिरावला! इतकेंच नव्हे तर या चिटणिशी निवेदनांत नुकतीच पुण्यास १९०६-०७-०८ सालीं भरलेलीं संमेलनें एक एक वर्षाने पुढे भरल्याची चुकीची माहिती नमूद झाली! म्हणजे १९०६-७-८ ऐवजीं १९०७-०८-०९ अशीं तीं स्थलें नमूद झालीं! (पाहा मुंबई, 'रिपोर्ट' स्वतंत्र पृ.१). सन१९२१ ते २५ अखेरचा परिषदेचा एक अहवाल आढळला त्यांत १८८५ हें साल बरोबर दिलें आहे. परंतु पुण्याच्या तीन संमेलनाचीं सालें एक एक वर्षानें पुढेंच ठेविली आहेत!

१९०९ च्या बडोदें हकीकतीवर कोणताच क्रमांक तेथील संमेलनास दिलेला नाही; आणि छापील असा संमेलनाचा वृत्तांत हाच पहिला आहे. पण अकोला बैठकीला वर दिल्याप्रमाणे प्रथमच चिटणिसांनी **सातवा क्रमांक** लावून दिला! अर्थात् त्यांनी रानडे-संचालित संमेलन, जें त्यांनी १८८०त धरलें होतें, तें पहिलें धरून, सातारा दुसरें, पुढे पुण्याचीं तीन, नंतर बडोद्याचें सहावें असा हिशेब बसवून अकोल्याचें सातवें ठरविलें हें उघड आहे; आणि मग गतानुगतिकन्यायाने तोच वर्षगणनाक्रम पुढे आजवर चालत आला आहे! १९३८ च्या मुंबई संमेलनाच्या चालकांच्या ध्यानांत ही चूक आली होती, आणि त्याचें स्पष्ट विवेचन मुंबईच्या वृत्तांताच्या 'समालोचन व आभार' या प्रकरणांत आलें आहे. तथापि चूक सुधारण्याची रीतसर तजवीज अद्यापि झालेली नाही. म. सा. परिषदेनेच या कामीं आता पुढाकार घेणें अवश्य आहे.

येथे हेंहि सांगितलें पाहिजे की कै. महाजनी यांनी अदमासाने रानडेसंचालित पुणें संमेलनाचें साल १८८० च्या आगेमागे म्हणून म्हटलें. वास्तविक हें संमेलन सन १८८५ च्या मे महिन्यांत भरलें होतें, याविषयी कसलीहि शंका नाही. साधनविभागांत तर या संमेलनाचा सविस्तर मिळालेला मूळ लिखित वृत्तान्तच आम्हीं जोडून प्रसिद्ध केला आहे. थोड्या चौकशीने ही चूक अकोला रिपोर्टांत टाळतां आली असती!

१९३५ च्या सुमारास परिषदेचीं जीं अधिकृत पत्रकें प्रसिद्ध झालीं त्यांत ही चूक आमच्या सूचनेवरून सुधारण्यांत आली होती आणि इ. स. १८७८ सालीं पुण्यास रानडे यांनी मराठी ग्रंथकारांची पहिली सभा बोलाविली होती तिचा निर्देश करण्यांत आलेला होता. या १८७८ संमेलनाची तारीख प्रो. न. र. फाटक यांच्या रानडेचरित्रांत त्यांनी शोधपूर्वक नमूद केली आहे. या संमेलनाची मूळ 'नोटिस' आमचें संग्रहीं होती ती साधनविभागांत आरंभींच आता प्रसिद्ध केली आहे.

१८८५ तील संमेलन अथवा सभा हिचे रानडेच प्रवर्तक होते, आणि जशी ती मराठी ग्रंथकारांचीच सभा होती तशीच १८७८ तील पहिली सभा हीहि रानडेप्रवर्तित आणि मराठी ग्रंथकारांचीच सभा होती. अर्थात् यांतली एक ध्यावयाची व मोजावयाची आणि दुसरी सोडावयाची हें न्यायाचें होणार नाही. आजचा हिशेब तसा झाला आहे. आता जें झालें तें कोणीं जाणूनबुजून व हट्टाने केलेलें आहे असें नाही. झालेली चूक केवळ अज्ञानामुळे आणि आळसामुळे झाली आणि त्यामुळेच बळावून बसली आहे.

---

१ लोकहितवादी यांचे चिटणीस रा. वामनराव रानडे यांच्या १८७८च्या रोजनिशींत पुढील उल्लेख आढळतो. तो रा. य. रा. दाते यांनी दिला :—"रावसाहेब मराठी ग्रंथोत्तेजक कान्फरन्सला १०मे ला पुण्यास गेले."

याचा एक विचित्र परिणाम झालेला दिसतो, आणि तो मात्र केवळ अज्ञानाने झाला असें म्हणतां यावयाचें नाही. इंदूर संमेलनाचे चालकांनी १९३५ साल हें १८८५ पासून पन्नासावे, सबब इंदूरच्या संमेलनास विसावें म्हणत असतांहि तो संमेलनाचा सुवर्णमहोत्सव म्हणून घोषणा केली ! तर पुढे १९३८ साली मुंबई संमेलनाच्या चालकांनी १८७८ हें संमेलनस्थापनेचें मूळ वर्ष, वास्तव संमेलनास साठावें वर्ष लागल्याचें दाखवून त्याचा हीरक-महोत्सव साजरा केला ! म्हणजे १९३५ साली संमेलनाचा सुवर्णमहोत्सव तर तर १९३८ सालीं म्हणजे लागलीच तीन वर्षांनी झाला त्याचा हीरकमहोत्सव !! आणि यंदा १९४१ सालीं सोलापुरकर हे संमेलनाचा अधिवेशनक्रमांक पंचविसावा (रूढीने) येतो म्हणून संमेलनाचा आता रौप्यमहोत्सव साजरा करणार आहेत !! असें सारें अराजक चाललें आहे !! मुंबईकरांनी १९३५ तच क्रमांकगणना वस्तुस्थितीस धरून संमेलनठरावाने बदलून घेतली असती तर बरें झालें असतें ! यापुढे तरी हा गोंधळ न चालावा म्हणून व्यवस्था झाली पाहिजे. एवढ्याचसाठी सर्व वस्तुस्थिति येथे सप्रमाण स्पष्ट केली आहे !

परिशिष्ट १३ वें

परिषदेचें निधिपत्र (ट्रस्टडीड)

A True Copy of the Trust Deed of the Maharashtra Sahitya Parishad

To all to whom these presents shall come we Sir Bhalchandra Krishna Bhatawadekar Kt. and **Damodar Ganesh Padhye** both of Bombay Hindu Inhabitants send greeting. **Whereas a** body called the **Maharashtra Sahitya Parishad** was formed in the year one thousand nine hundred and twelve for advancing and promoting the cause of Marathi literature and with that view to hold periodical gatherings of the Marathi literary public at places fixed from time to time by the said **Maharashtra Sahitya Parishad and whereas** to effect such object subscriptions were invited from the general public and **His Highness the Maharaja Holkar** of Indore thereupon generously subscribed Rs. 10,000/— (ten thousand) **and whereas** we the said **Sir Bhalchandra Krishna Bhatawadekar** Kt. and **Damodar Ganesh Padhye** were appointed Trustees of the said fund of Rs. 10,000 (ten thousand) and others that may be handed over to them by the Managing Committee of the said **Maharashtra Sahitya Parishad** at its meeting held on the 15th day of June one thousand nine hundred and eighteen at the residence of **Sir Bhalchandra Krihhna Bhatawadekar** at Charni Road Girgaum, Bombay, and **whereas** the said sum of Rs. 10,000 (ten thousand) with interest accrued thereon is now invested and consists of two War Bonds of the nominal value of Rs. 5000 each and two War Bonds of the nominal value of Rs.100 each

both bearing interest at the rate of $5\frac{1}{2}$ percent per annum and whereas the said War Bonds stand endorsed to our names, Now these presents witness and it is hereby declared that we the said Sir Bhalchandra Krishna Bhatawadekar and Damodar Ganesh Padhye and the survivor of us or other the Trustees or Trustee for the time being of these presents appointed as hereinafter mentioned, hereinafter called the Trustees shall hold the said War Bonds or the investments for the time being representing the same and other the property that may hereafter belong to the said Parishad and be transferred to the Trustees hereinafter referred to as the Trust Fund, upon the trusts and with and subject to the powers and provisions hereinafter appearing, that is to say :—

1. The Trustees shall keep the Trust Fund in the names of the Trustees in any investments permitted by the Law of British India for the investment of Trust Funds and may at any time and from time to time vary any such invesments for others of a like nature provided that the Trustees shall not nor shall any of them be subject to any liability in the event of any of the said investments or any other investment representing the same becoming depreciable in value while the same shall remain in their hands so invested as aforesaid

2. The Trustees shall stand possessed of the Trust Funds upon trusts to pay out of the net income thereof to the Chairman of the Managing Committee of the said Maharashtra Sahitya Parishad such sum or sums as he may from time to time require.

3. Any income of the Trust Fund or any part thereof at any time in the hands of the Trustees and not immediately required for any purpose shall be invested at the discretion of the Trustees in any investments permitted by the Law of British India for the investment of Trust Fund with power to the Trustees at their discretion to vary any investment for others of any nature hereby authorised.

4. The Trustees may pending the negotiations for and preparation of any security hereby authorised or during any other time while an investment of the nature hereby authorised is being sought for, deposit any money subject to the Trust of these presents with any joint stock or other Bank at interest or otherwise as may be by the Trustees deemed expedient and the interest if any and other periodical payments in the nature of income accruing from and payable in respect of any such deposits shall for the purposes of these presents be deemed income and be applied accordingly.

5. The Trusteee shall be respectively chargeable only for such monies and securities as they shall respectively actually receive notwithstanding their respectively signing any receipt for the sake of conformity and shall respectively be answerable and responsible only for their own respective acts, receipts omissions neglects and defaults and not for those of his co-trustee or any Banker Broker or other person

with whom or into whose hands any trust monies or securities shall be deposited or come nor for the deficiency in value of any investments nor for any other loss unless the same shall happen through their own wilful neglect or default respectively.

6. The number of Trustees shall not be less than two or more than three and the power of appointing a new Trustee or Trustees in case of any vacancy happening by death, resignation, refusing, declining or becoming incapable to act, becoming bankrupt or taking the benefit of any act for the relief of insolvent debtors or going to reside out of India for a period of more than two years (each of which circumstances shall create a vacancy) shall be vested in the Managing Committee.

7. It shall be lawful for the Trustees to appoint a Clerk or peon to assist them in the execution of the Trust of these presents and from time to time to remove such employees and appoint others in their stead and out of the Trust Fund to pay them a reasonble salary or renumeration. It shall be lawful for the Trustees to make such rules, if any, from time to time, as they may deem necessary or advisable for conducting their business of Trustees of these presents such as holding meetings, keeping minutes of their proceedings etc.

8. Full accounts shall be entered in proper books of accounts to be provided for the purpose of all money received and paid on acoount of the Trust. Such books of account shall be made up for each year and shall be examined and passed by the Trustees at the end of each Christian year and shall be thereupon signed by them.

As witness the hands and seals of the parties hereto this thirteenth day of December 1918.

Signed, sealed and delivered by the within-named Sir Bhalchandra Krishna Bhatawadekar and Damodar Ganesh Padhye in the presence of

(*Signed*) **Bhalchandra Krishna.**
5-1-19

(*Signed*) **D. G. Padhye.**
13-12-18

1. (*Signed*) **N. V. Joshi.**
5-1-19.

2. (*Signed*) **R. R. Moramkar.**
13-12-18.

परिशिष्ट १४ वें

परिषदेच्या इमारत-जागेचा भाडेपट्टा

[म. सा. परिषदेच्या साधारण सभेने २९ सप्टेंबर १९३५ रोजी भरलेल्या सभेंत पुढील ठराव मंजूर केला :

"साहित्यपरिद् व श्रीमंत औंध सरकार यांच्या दरम्यान श्रीमंत औंधकर यांची पुणें येथील टिळक रोडवरील जागा लांब मुदतीच्या कराराने घेण्यासंबंधाने जो पत्रव्यवहार झाला तो या सभेस वाचून दाखविण्यांत आल्यावरून सामान्यतः त्यांतील शर्ती या सभेस मान्य आहेत असें ही सभा नमूद करीत आहे. फक्त ज्या मुदतीचा भाडेपट्टा होईल ती मुदत संपल्यानंतर परस्परांच्या संमतीने नवीन पट्टा न झाल्यास जागेवर असलेली इमारत पंचांमार्फत ठरेल त्या किंमतीने श्रीमंत औंध सरकार यांनी विकत घ्यावी असें पट्ट्यांत कलम घालण्यांत यावें. वरील शर्तींस अनुसरून किंवा याहिपेक्षा अधिक फायदेशीर सवलती मिळत असल्यास त्या मिळविण्याचा प्रयत्न करून जागेसंबंधाने भाडेपट्टा वगैरे कायदेशीर व्यवस्था करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास देण्यांत येत आहे."

कार्यकारी मंडळाने आपल्या २४ मे १९३६ च्या सभेंत पुढील ठराव केला :

"म. सा. परिषदेस श्रीमंत राजेसाहेब, औंध, यांनी दिलेल्या जागेबाबतचा या सभेस सादर केलेला कराराचा मसुदा या सभेस मान्य असून ही सभा ता. २९ सप्टेंबर १९३५ च्या साधारण सभेने ठराव करून कार्यकारी मंडळास दिलेल्या अधिकारान्वयें रा. सा. ना. गो. चापेकर, कार्याध्यक्ष, म. सा. परिषद्, यांस सदर करारावर परिषदेतर्फे सही करून तो सरकारांत नोंदण्याचा अधिकार देत आहे."

या अधिकारान्वयें कार्याध्यक्ष श्री. ना. गो. चापेकर यांनी ६ जुलै १९३६ रोजी पुढील भाडेपट्टा सब-रजिस्टर कचेरींत रीतसर नोंदला.]

THIS LEASE made on the 24th day of May 1936 BETWEEN RAJESAHEB BHAWANRAO SRINIWASRAO ALIAS BALASAHEB PANT PRATINIDHI, RAJA OF AUNDH, (hereinafter referred to as the "Landlord" which expression shall unless it be repugnant to or inconsistent with the subject or context include him, his heirs, executors, administrators and assigns as well as the successor for the time being to the Gadi of the Aundh State and the Reversioner for the time being immediately expectant on the term hereby created and all persons deriving title from him or them respectively) of the ONE PART and THE MAHARASTRA SAHITYA PARISHAD, a Society registered under the Societies' Registration Act XXI of 1860 (hereinafter called the "Tenant") of the other part, WHEREAS the Landlord is the ruling prince of the Indian State of Aundh and as such is absolutely seized and possessed of the piece or parcel of land of ground hereinafter described and intended to be hereby demised. NOW THIS INDENTURE WITNESSETH :—

1. That in consideration of the rent and covenants on the part of the tenant hereinafter reserved and contained the Landlord hereby demises to the Tenant all that piece of land having a frontage of 132 feet or thereabouts on the Tilak Road and a total area of 677.6 square yards or thereabouts and which piece of land is for the purpose of identification with the dimensions and abuttals thereof delineated on the plan hereto annexed and thereon coloured red and described in the schedule hereunder written TO HOLD the said land, messuages and premises unto the Tenant from the 1st July 1936 for the term of nine hundred and ninety-nine years yielding and paying herefor unto the Landlord during the said term the yearly rent of Rs. 15/, the first payment to be made in July 1936 and each subsequent payment to be made in the month of July in each year.

2. The Tenant covenants with the Landlord as follows:—

(*a*). To pay the said yearly rent hereinbefore reserved at the time at which the same is hereinbefore made payable.

(*b*). To pay all rates, taxes and other outgoings which now are or shall at any time hereafter during the said term be charged upon or in respect of the said demised premises or any part thereof.

(*c*). To use the demised premises for erecting and maintaining thereon one or more building or buildings for its own use and benefit and for carrying on its activities.

(*d*). At the end or sooner determination of the said term peaceably to surrender up to the Landlord the said demised premises by removing the building or buildings if any erected thereon and restoring the premises to the same condition in which the same are at present PROVIDED ALWAYS that if the Landlord gives notice to the tenant not less than two months before the end of the tenancy that he desires to buy the said building or buildings then standing on the demised land the tenant shall leave the same intact on being paid the then value thereof to be ascertained by arbitration in case the parties differ.

(*e*). To permit the Landlord and his agents during the said term at reasonable times to enter upon the demised premises for receiving rent and other necessary purposes.

(*f*). In consideration of the special concessions given by the Landlord to the Tenant being a public institution not to mortgage, assign or underlet or otherwise deal with or part with possession of the demised premises without the consent in writing of the Landlord first had and obtained for that purpose.

3. PROVIDED ALWAYS that if the Tenant Society at any time ceases to exist or the said demised premises are used for purposes other than those for which the Tenant Society is formed or if a creditor of the Tenant either takes possession of the demised premises or if the said premises are sold or attached for a period of 21 days in execution of a Decree or Orber of a Court or if default shall be made in the performance or observance of any of the covenants, conditions or agreements on the part of the tenant therein contained then and in such case it shall be lawful for the Landlord or any person or persons duly authorised by him in that behalf into and upon the said demised premises or any part thereof in the name of the whole to re-enter and the same to have again, repossess and enjoy as in his first and former estate anything herein contained to the contrary notwithstanding and thereupon the term hereby created shall cease.

4. The Landlord hereby covenants with the Tenant that the tenant paying the rent hereinbefore reserved, and performing and observing the covenants, conditions and agreements on the part of the tenant hereinbefore contained shall and may peaceably and quietly hold and enjoy the said demised premises for the term hereby granted without any interruption of or by the Landlord or any person lawfully claiming through under or in trust for him.

5. The tenant will pay the costs and expenses of and incidental o this lease.

Schedule above referred to

All that piece of land situate at Tilak Road within the registration Division and District Poona and Sub-division and Taluka Haveli admeasuring about 677.6 square yards being part of City Survey No. 10, Sadashiva Peth, Northward Division and bounded on the North partly by the property of Shankar Dhondiba Hagavne bearing City Survey No. 9 and partly by land belonging to the Municipality, on the South by land belonging to the Municipality and beyond that by the Tilak Road, on the East by public Road leading to the Training College and on the West by Tilak Road.

IN WITNESS WHEREOF THE LANDLORD AND NARAYAN GOVIND CHAPEKAR as the Chairman of the Executive Committee of the Maharashtra Sahitya Parishad have set their respective hands and seals the day and year first above written.

Signed, sealed and delivered by the within-named Rajesaheb Bhawanrao Shrinivasrao alias Balasaheb Pant Pratinidhi, Raja of Aundh, in the presence of
(1) S.G.Darshane, Diwan, Aundh State
(2) D. G. Kulkarni, Sub-judge and Magistrate I Class, Aundh.

S. Ramabai Pant,
Regent, Aundh State, and constituted attorney of Rajesaheb Bhavanrao Shrinivasrao alias Balasaheb Pant Pratinidhi.

Signed, sealed and delivered by Narayan Govind Chapekar as the Chairman of the Executive Committee of the within-named Maharashtra Sahitya Parishad as authorised by a Resolution of the said Executive Committee dated 24th May 1936 in the presence of—
(१) दत्तो वामन पोतदार
(2) D. R. Gadgil

N. G. Chapekar, Chairman, Executive Comittee, M. S. P.

1. Mr. N. G. Chapekar, Brahmin, Pensioner, 66, Badalapur, as Chairman of the Executive Committee of the Maharashtra Sahitya Parishad executing party admits execution of this deed and the u/s. S. R. knows him personally.

N. G. Chapekar

2. Mr. Anant Govind Darshane, agent of S. Ramabai Pant, Regent and Ranisaheb, Aundh State, and constituted attorney of Rajesaheb Bhavanrao Shrinivas alias Balasaheb Pant Pratinidhi, Brahmin, service, 31 Poona, Narayan Peth, admits execution by S. Ramabai Pant. He is personally known to the u/s. S. R.

Date 6 July 1936.

A. G. Darshane,
G. B. Bhagali, Jt. Sub-Registrar
Haveli No.1.
Registered at No.1589, Book No.1.

Date 6 July, 1936.

G. B. Bhagali,
Jt. Sub-Registrar, Haveli No.1.

परिशिष्ट १५ वें

महाराष्ट्र-साहित्य-परिषद्

(इ. स. १९४०-४१)

शाखा-सभा

१ मध्यप्रांत शाखा सभा, नागपूर
२ दक्षिणी संस्थान साहित्य सभा, सांगली
३ सोलापूर साहित्य समिति, सोलापूर

संलग्न-संस्था

१ करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर
२ नॅशनल लायब्ररी, महाल, नागपूर
३ वाङ्मय चर्चा मंडळ, १७५४ किर्लोस्कर रस्ता, बेळगांव
४ महाराष्ट्र साहित्य सभा, १४ मेन रोड, तोफखाना, इंदूर
५ राजाराम लायब्ररी, सीताबर्डी, नागपूर
६ सार्वजनिक वाचनालय, नाशिक
७ डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रॅन्सलेशन सोसायटी, सदाशिव, पुणें २
८ साहित्य सेवा मंडळ, इचलकरंजी
९ स्नेहसंवर्धक संघ, मिरज
१० महाराष्ट्र कोश मंडळ लि., ७७ शनिवार, पुणें २
११ मुंबई मराठी साहित्य संघ, विठ्ठलभाई पटेल रस्ता, मुंबई ४
१२ हनुमान वाचनालय, असोदें (पू.खा.)
१३ मराठी वाङ्मय मंडळ, रत्नागिरी
१४ महाराष्ट्र मंडळ, पो. बसवनगुडी (बंगलूर)
१५ सोशल क्लब नाट्यसंशोधन मंदिर, सदाशिव पेठ, पुणें २
१६ कर्नाटक महाराष्ट्र मंडळ, धारवाड
१७ शारदा मंडळ, कोल्हापूर
१८ आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी
१९ महाराष्ट्र शारदा मंदिर, पुणें २
२० वाङ्मयोपासक मंडळ, अहमदनगर
२१ मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, भाई जीवनजीची गल्ली, मुंबई २
२२ भगिनी मंडळ, सीताबर्डी, नागपूर
२३ साहित्य सेवा मंडळ, सोलापूर
२४ महाराष्ट्र नाट्य मंदिर, नाशिक
२५ अभिनव वाङ्मय मंडळ, वेंगुर्ले
२६ पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २

परिशिष्ट १६ वें

पुनः सातारा संमेलन

[संदर्भः— परिशिष्ट १० वें; व साधनविभाग]

१९०५ मधील सातारा संमेलनासंबंधी आणखी कांही जास्त माहिती मागील मजकूर छापून गेल्यावर हातीं आली. अद्यापि हा ग्रंथ प्रसिद्ध व्हावयाचें लांबल्यामुळे व या माहितीचा समावेश येथेच करून घेणें उचित वाटल्यावरून हें परिशिष्ट जोडलें आहे. नवीन साधनें उपलब्ध झालीं तींः-(१) रा. न. चिं. केळकर-गतगोष्टी, पत्र क्र. १०१ (पृ. ४३-४४)-द.ब. पारसनीस-केळकर यांस २ मे १९०५ ला लिहितातः- "मे महिन्यांत सातारा येथे **विद्याव्यासंगी महाराष्ट्रभाषाभिमानी मित्रमंडळीचें संमेलन** करावें असें येथील प्रमुख मंडळींनी योजिलें आहे ××× १७ ते २० ह्या संमेलनाच्या तारखा ठरविल्या आहेत." (२) रा. रामचंद्र बळवंत परांजपे, सातारा, यांनी लिहिलेली रोजनिशी त्यांचे चिरंजीव रा. दत्तोपंत परांजपे मास्तर यांच्या कृपेने २९।८।४१ रोजीं पाहण्यास मिळाली. तींत प्रायशः इंग्रजींतच टिपणें आहेत. ता. १७ मे १९०५ बुधवारच्या टिपणांत या संमेलनाला Gathering of learned men असें संबोधलें असून हें संमेलन 'only held this year by Messrs. काळे, पारसनीस, दत्तोपंत पाठक हेडमास्तर and others असा शेरा नमूद केला आहे. पुढे ता. १८ मे १९०५ गुरुवारच्या टिपणांत (कै. दादासाहेब करंदीकर रोजनिशींत ता. १८ मे ची कांहीच नोंद नाही.) "अनेक विद्वानांचीं भाषणें ऐकिलीं. श्री. गोडबोले हेड्मास्तर ('अध्यात्मविद्या'कर्ते ?—संपादक) हे अध्यक्ष होते" अशी नोंद आहे. ही नवीन माहिती मिळाली. ता. १९ मे शुक्रवारच्या टिपणांत "Attended the meeting of *the members* of the Gathering of the learned. Heard the speech. (कोरी जागा)... Mr. Kale R. R. was the chairman." या बाबीचीहि नोंद करंदीकरांनी केलेली नाही; म्हणून ही माहितीहि अधिक मिळाली. ता. १९ मे ची करंदीकरनोंद फक्त सातारा युनियन क्लबच्या गाण्याची व पानसुपारीची आहे. मूळ करंदीकरनोंदी साताऱ्यास जाऊन जेव्हा पाहिल्या तेव्हा ही १९ तारखेच्या गाण्याची नोंदहि दादासाहेबांनी युनियन क्लबच्या दप्तरांतील १८ मेची सेक्रेटरी दीक्षित यांच्या सहीची सूचना बऱ्याच वर्षांनंतर म्हणजे २५ आगस्ट १९३४ रोजीं उतरून आणून पुरी केली आहे असा शेरा त्यांनी तेथे लिहून ठेवलेला आढळला.

नंतर परांजपे रोजनिशींतली ता. २० मे शनिवारची नोंद येणेंप्रमाणे आहेः— "पानसुपारी to the members of the learned men's Gathering. Speeches were delivered in the meeting as yerterday. Mr. Karandikar was the chairman".

ता. २१ रोजीं- करंदीकररोजनिशीप्रमाणे— करंदीकरांच्या "घरीं साने, पाटणकर, प्रो. रानडे, करमरकर, भाजेकर सकाळीं निमंत्रणावरून गेले. उपासनी जरा मागाहून आले. भोजन काळे यांचेकडे" अशी माहिती मिळते.

करंदीकरांच्याच कांही टिपणांवरून या संमेलनाच्या व्यवस्थेचा विचार करण्यासाठी वाटाघाटी एप्रिल महिन्यांत साताऱ्यास झाल्या आणि श्री. द. ब. पारसनीस यांजकडे कार्यवाहपणा सोपविण्यांत आला असें दिसतें. परंतु मूळ टिपणें अद्यापि हातीं आलीं नाहीत.

पूर्वी आणि आता येथे वर, जेवढी माहिती शोध करून देतां आली आहे ती नीट काळजीपूर्वक ध्यानीं घेतां आमच्या बुद्धीने निष्कर्ष निघतो तो असाः—

विद्वत्संमेलनाच्या संमेलनीय बैठकी दोन दिवस म्हणजे १९ मे व २० मे या दिवशीं झाल्या. शिवाय कांही विद्वानांचीं जाहीर व्याख्यानें झालीं. जाहीर व्याख्यानांचे वेळीं रा. ब. विठ्ठलराव एकदा आणि रा. सा. गोडबोले हे दुसऱ्या वेळीं असे हे हेडमास्तर अध्यक्ष होते; आणि बैठकीहि दोन झाल्या; त्या प्रसंगीं प्रथम दिवशीं रा. ब. रा. रा. काळे आणि दुसऱ्या दिवशीं रा. दादासाहेब करंदीकर अध्यक्ष होते. संमेलनाचें अध्यक्षपद दादासाहेबांकडे होतें म्हणून प्रचलित प्रवाद प्रमाण मानून जरी आम्हींहि यापूर्वी लिहिलें आहे तरी वस्तुस्थिति येथे वर दाखविल्याप्रमाणे असावी असा आमचा तर्क होतो. सातारकरांची सार्वजनिक कामासंबंधी एक विशेष बारकाव्याची समतोलनपद्धति मार्मिकांस पूर्वीपासून अवगतच आहे. दोन हेडमास्तर व दोन पुढारी वकील यांची अध्यक्षपदीं स्थापना करण्यांत आली त्यांतली चतुराई लक्ष्यांत घेण्यासारखी आहे.

प्रस्तुत ग्रंथ, साधनविभाग पृ.८० व ८१, येथे केशवराव आपटे असें नांव आलें आहे. परंतु मूळ करंदीकर रोजनिशी समक्ष पाहतां येथे **वासुदेवराव आपटे** असेंच नांव आहे व तेंच बरोबर असलें पाहिजे. त्याचप्रमाणे पृ. ८१ वर जो देणग्यांचा उल्लेख आहे तो करंदीकर-रोजनिशी मूळ पाहतां रा.करमरकर यांच्या भाषणांतील भाग असावा असें वाटतें आणि त्यांचा संबंध बडोदें सरकाराशीं असावा असा आमचा एक तर्क होतो.

परिशिष्ट १७ वें

मराठी ग्रंथोत्तेजक मंडळी आणि महाराष्ट्र साहित्य संमेलनें

[संदर्भः— साधनविभाग परिशिष्ट १, २, ८ व १२ आणि इतर तदनुषंगिक विधानें व विवेचनें]

प्रथम नवीन मिळालेलीं साधनें व टिपणें नमूद करतों. मग त्यांवरील विवेचन करतोंः—

(१) इ. स. १८७८:— "गेले शनिवार ता. ११ रोजीं संध्याकाळीं हिराबागेंत ग्रंथोत्तेजक मंडळीची सभा भरली होती. कांहीं वेळ वादविवाद होऊन जनरल व म्यानेजिंग कमिटींत कोणकोणते गृहस्थ नेमावे याबद्दल सूचना झाल्या. परंतु अखेरचा ठराव अजूनपर्यंत करण्यांत आला नाहीं." ('ज्ञानप्रकाश' पत्रांतील उतारे —श्री. श्रीधर शंकर मुजुमदार यांचीं अप्रकाशित टिपणें)

(२) इ. स. १८८१:—

(अ) "मराठी ग्रंथोत्तेजक मंडळीचा **द्वितीय** समारंभ ता. **१३ मे १८८१ शुक्रवारीं** दुपारीं हिराबागेंत झाला. सुमारें ३-४ शें लोक हजर होते. रावब. रानडे यांचें फारच उत्तम संभाषण झालें. (कै. वामन बाळकृष्ण रानडे— रोजनिशींतील उतारा —काढून पाठविणार रा. य. रा. दाते.)

(आ) केसरी ता.१० मे १८८१ च्या अंकांत 'ग्रंथोत्तेजक मंडळी'ची द्वितीय रिपोर्ट० **जाहीर सभा** ता. १३ मे शुक्रवार सायंकाळीं ५ वाजतां हिराबागेंत भरेल या आशयाची सूचना व्यवस्थापक रावब. म. गो. रानडे यांचेकडून आल्याचें वृत्त प्रसिद्ध झालें आहे. (केसरी समक्ष पाहून, संपादक)

(इ) ता. २४ मे १८८१ पासून 'केसरी' वर्तमानपत्रांत 'मराठी ग्रंथोत्तेजक मंडळी' या विषयावर लेखमाला सुरू.

(१) मंडळीचे चिटणीस रावजी प्रभाकर भावे होते. (या गृहस्थांना संपादकाने अनेकवार पाहिलें होतें. पण लहान वयांत ! त्यामुळे 'डिस्मिस्ड् नाझर' म्हणून त्यांचा उपहास होई एवढेंच त्यांस आठवतें. आज कळतें की कै. वामन प्रभाकर भावे 'भावे स्कूल'स्थापक यांचे हे बंधु; पुण्यांतील एके काळचे प्रमुख आणि हुशार गृहस्थ म्हणून प्रसिद्ध होते. परंतु ग्रं.मंडळीच्या कामीं यांनी पैशाची अफरातफर केल्याचें 'केसरी'तील लेखांवरून दिसून येतें. या गृहस्थांमुळे रानडे व देशमुख या उभयतां रावबहादुरांस 'केसरी'ने दोष लावला आहे. (केसरी ता.२८ जून १८८१).

(२) मंडळीस दरसाल पांच रुपये देऊं म्हणून अभिवचन देणाऱ्या एक हजारावर सह्या लवकर मिळाल्या. परंतु पहिल्या वर्षी वर्गणी वसूल शेंकडा १०, दुसऱ्या वर्षी शेंकडा ५ आणि तिसऱ्या वर्षी शेंकडा १ असा प्रत्यक्ष वसूल झाला. मोबदल्यांत वर्गणीदारांस दिलेल्या कांही पुस्तकांचीं नांवें:— 'कृषिकर्म'; 'स्वाध्याय'; 'आश्वलायनगृह्यसूत्र'; 'तारा'नाटक; 'स्वपराक्रम'; 'तुर्क व रूस ००० लढाईंचा इतिहास'; 'लॉर्ड बेकन्'. असलीं पुस्तकें कोण वाचतो ? मनोरंजक पुस्तकें द्यावयास पाहिजे होतीं अशी टीका याबाबत केसरी लेखमालेंत केली आहे. हे लेख बहुशः विष्णुशास्त्री चिपळोणकर किंवा आगरकर यांपैकी कोणा एकाचे असावे.

मंडळीचे नवे चिटणीस म्हणून रावबहादूर गोपाळराव हरि देशमुख यांचें नांव आलें आहे.

(३) (उ) ता. २६ मे१८८१:—'मराठी ग्रंथोत्तेजक मंडळीचा सन१८७९च्या नोव्हेंबरपासून १८८१चे मेपर्यंतचा रिपोर्ट प्रसिद्ध' झाल्याचें वृत्त 'ज्ञानप्रकाश'मध्ये आलें आहे. (श्री. शं. मु. ज्ञानप्रकाश–उतारे–वही).

(ऋ) ता. २५ ऑगस्ट १८८१:— 'मराठी ग्रंथोत्तेजक मंडळीचे आज तारखेपासून रा. रा. कृष्णराव बापू मांडे यांस सेक्रेटरी नेमलें. (ज्ञानप्रकाश उतारे, श्री. शं. मुं.)

या सर्व माहितीवरून पुढील विचार सुचतात. इ. स. १८७८ ते १८८१ अखेर मराठी ग्रंथोत्तेजक मंडळी म्हणून एक संस्था चालविण्याचा प्रयत्न विशेषतः माधवराव रानडे आणि गोपाळराव हरि यांनी केला. या संस्थेचा जो एक रिपोर्ट प्रसिद्ध झाला तो कांही आमच्या अवलोकनांत अद्यापि आलेला नाही. तथापि ही संस्था १८८१ च्या सुमारास लयाला गेली असावी असें अनुमान संभवतें. मग रावब. रानडे यांच्या प्रोत्साहनामुळे पुनः मुख्यतः मराठी ग्रंथकारांना व पत्रकारांना एकत्र करण्याचा दुसरा प्रयत्न १८८५त झाला. पण तोहि तितक्यावरच थांबला असावा असें दिसतें. १८७८ ते १८८१ पावेतों या खटपटीच्या सभा हिराबागेंत आणि १८८५ ची सभा जोशी बाबांचे दिवाणखान्यांत झाली. निमंत्रित आणि निवडक मंडळीच्या छोट्या सभा आणि शिवाय निराळ्या जाहीर सभा अशी दुहेरी मांडणी या वेळीं होत असावी. साताऱ्यास १९०५ सालीं हाच नमुना ठेवला होता. 'संमेलन' असें स्पष्ट नांव १९०५ त तर या सभांस दिलेलें होतें हें स्पष्ट आहे. १८७८ तहि हें नांव होतें

असें प्रो. न. र. फाटक म्हणतात. ग्रंथोत्तेजक मंडळी आणि 'ही मंडळी' असे दोन कांहीसे निराळे प्रयत्न समजले जात असावे असें रा. साने यांच्या १८८५ तील उद्गारांवरून दिसतें. (साधनविभाग पृ. ८). एक मुद्दा मात्र स्पष्ट ठरला की १८७८ची सभा पहिलें संमेलन म्हणून धरली तर १८८१ ची सभा दुसरें संमेलन म्हणून गणली पाहिजे; आणि मग १८८५ च्या सभेला दुसरें संमेलन न म्हणतां तिसरें संमेलन म्हणून परिगणिलें पाहिजे. १८८५ ते १९०५ पावेतों ही सर्व हालचाल कां बंद राहिली हें आज तरी गूढच आहे. कारण मूळचे उत्पादक रावब. रानडे आणि रावब. देशमुख दोघेहि पुढे कित्येक वर्षें विद्यमान होते. कांहीशी निराशा त्यांच्या पदरीं पडली खरी; परंतु तेवढ्याने खचून जाणारे हे पुरुष नव्हते!!

परिशिष्ट १८ वें

वर्गीकृत ठराव

[संदर्भः— परिशिष्ट ९ वें]

(२९०) – [१] **ठराव १७**— (अ) महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचें धोरण खाली लिहिल्याप्रमाणे असावें–

(१) पत्रिकेचें अेक प्रमुख कार्य मराठी ग्रंथांचीं परीक्षणें शक्य तितक्या लवकर देणें.

(२) तसेंच पत्रिकेचें दुसरें प्रमुख कार्य साहित्यविषयक व संशोधनात्मक लेख प्रसिद्ध करणें.

(३) कलम १ मधील कार्याच्या पूर्ततेसाठी प्रांतिक सरकारांनी प्रसिद्ध केलेल्या महत्त्वाच्या ग्रंथांच्या याद्या छापणें.

(आ) (१) साहित्यपत्रिका त्रैमासिक असावी.

(२) छपाई व सजावट यांना बाध न येतां कमी खर्चांत जास्त पानें देण्यांत यावीं. या कामासाठी जाहिराती मिळविण्याची तजवीज करावी.

(३) ललित, काव्य, कला, अितिहास आणि शास्त्रीय व अितर वाङ्मय असे विभाग पाडून या प्रत्येक विभागाचा अधिकारी संपादक संपादकमंडळांत घ्यावा व या प्रत्येक संपादकाने दर तिमाहींत प्रसिद्ध झालेल्या सर्व महत्त्वाच्या पुस्तकांचा परामर्श घेण्याची व्यवस्था स्वतः करावी अगर करवून घ्यावी.

(४) कोणत्याहि परीक्षणात्मक लेखावर परीक्षकांचीं नांवें प्रसिद्ध करूं नयेत.

(५) वैयक्तिक टीकेच्या स्वरूपाचा लेख 'पत्रिकें'त घेऊं नये.

(६) लायब्रऱ्या व इतर सार्वजनिक संस्था आणि व्यक्ति यांच्यांत 'पत्रिके'चा प्रसार मोठ्या प्रमाणांत होण्याचे सर्व प्रकारचे प्रयत्न करण्यांत यावे.

(१७, रत्नागिरी १९४०)

(२९१) – [१] बृहन्महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं असलेल्या कॉलेजांतील वाङ्मयमंडळें व प्रांतिक संमेलनें मराठी साहित्याच्या संवर्धनाकरिता अभिनंदनीय प्रयत्न करीत आहेत. मराठी भाषेच्या आजच्या अडचणी दूर करणें व तिच्या पुढील प्रगतीकरिता मरीव कार्य आंखणें

सुलभ व्हावें आणि मराठीवाचकांची संघशक्ति वाढावी यासाठी या सर्व प्रयत्नांत अेकसूत्रीपणा येणें अगत्याचें आहे. म्हणून शिक्षणसंस्थांतील वाङ्मयमंडळांस व प्रांतिक संमेलन भरविणाऱ्या संस्थांस या संमेलनाची आग्रहाची विनंती आहे की, त्यांनी 'संलग्न' संस्था म्हणून अगर अन्य तऱ्हेने महाराष्ट्र-साहित्य-परिषद् या मध्यवर्ती संस्थेशीं विलंब न करतां नियुक्त व्हावें.

(१६, सोलापूर १९४०)

(२९२) – [१] मातृभाषेचें अध्यापन करणारा शिक्षकवर्ग व साहित्यिक वर्ग यांच्यांत अधिकाअधिक सहकार्य होऊन मातृभाषेच्या अध्यापनाला अधिक तेज चढावें, यासाठी प्रत्येक जिल्ह्यांत तेथील साहित्यिक व शिक्षक यांचीं भाषाविकासमंडळें स्थापन करावींत. हीं साहित्य-परिषदेस जोडलीं जावींत. (५, नाशिक १९४२)

(२९३) – [१] महाराष्ट्रांतील मराठी भाषा शिकणाऱ्या सर्व प्राथमिक, दुय्यम व अुच्च शिक्षणसंस्थांना व शिक्षकांना अशी आग्रहाची विनंती आहे की, त्यांनी अविलंबेंकरून महाराष्ट्र साहित्य परिषदेचे सभासद म्हणून स्वतःला जोडून घ्यावें. आणि अशा संस्थांनी यापुढे भरणाऱ्या प्रत्येक साहित्यसंमेलनाला आर्थिक साहाय्य देअून आपला प्रतिनिधि पाठवावा.

(९, नाशिक १९४२)

(२९४) – [२] महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या बैठकींतून इ. स. १९२१ सालापासून महाराष्ट्र विद्यापीठ स्थापिलें जावें अशा आशयाचे ठराव अनेकवार मान्य झालेले असूनहि आणि या कार्याविषयी जनतेचा जिव्हाळ्याचा पाठिंबा अनेक रीतींनी प्रकट झाला असूनहि अद्यापि सदर विद्यापीठाची स्थापना घडून आलेली नाही म्हणून या संमेलनाची मुंबअी सरकाराकडे पुन्हा अशी आग्रहाची मागणी आहे की, यापुढे हा विषय निकडीचा समजून सरकाराने हें कार्य सिद्धीस न्यावें. तसेंच या कामीं जनतेने सर्व प्रकारें साहाय्य द्यावें व सहकार करावा.

(११, रत्नागिरी १९४०)

(२९५) – [२] मराठी भाषा व महाराष्ट्रांतील सांस्कृतिक जीवन यांच्या अभिवृद्ध्यर्थ महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना होणें अत्यावश्यक आहे असें या संमेलनाचें मत आहे. हें विद्यापीठ स्थापन होण्यासाठी शक्य ती खटपट महाराष्ट्र साहित्य परिषदेने इतर संस्थांच्या सहकार्याने करावी अशी या संमेलनाची परिषदेस आग्रहपूर्वक विनंती आहे. तसेंच विद्यापीठ स्थापन होण्याच्या आधीहि निरनिराळ्या संस्थांत सहकार्य घडवून आणून महाराष्ट्रांतील ज्ञान-प्रसार व संशोधन यांच्या साधनांची संघटना करण्याचा प्रयत्न म. सा. परिषदेने करावा असें या संमेलनाचें मत आहे.

(१९, सोलापूर १९४०)

(२९६) – [२] महाराष्ट्र साहित्य संमेलनाचा वाढता व्याप व त्यांत चर्चेला येणाऱ्या विषयांचें बव्हंशीं केवळ लोकप्रिय व लौकिक असें स्वरूप लोकजागृतीच्या दृष्टीने त्याचें प्रतिवर्षी स्थानान्तर करण्याची इष्टता इत्यादि विशेष लक्षांत घेतां सध्याचें साहित्यसंमेलनाचें स्वरूप व कार्यपद्धति कायम असलेलें असें संमेलनाचें वार्षिक अधिवेशन भरवूनहि मराठी भाषेच्या अभिवृद्ध्यर्थ ज्याचा अुपयोग होअील अशा स्वरूपाचें ज्यांत भाषाविषयक शास्त्रीय चर्चेला व तद्विषयक प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या आंखणीला प्राधान्य मिळूं शकेल असें दुसरें अेक अधिवेशन पुणें, मुंबअी, नागपूर, बडोदें किंवा कोल्हापूर यांपैकी अिष्ट वाटेल त्यांपैकी कोणत्यातरी अेका शहरीं प्रतिवर्षी महाराष्ट्र साहित्य परिषदेने भरवावें अशी या संमेलनाची सूचना आहे.

(८, नाशिक १९४२)

(२९७) – [२] मराठी भाषा व महाराष्ट्रांतील सांस्कृतिक जीवन यांच्या अभिवृद्धयर्थ महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना होणें अत्यावश्यक असून या बाबतींत मुंबई सरकारने ना. जयकर यांच्या अध्यक्षतेखाली अेक समिति नेमली आहे हें पाहून या संमेलनास समाधान वाटत आहे. या समितीने आपला अहवाल शक्य तितक्या लवकर पाठवावा व सरकारनेहि महाराष्ट्र विद्यापीठाची शक्य तितक्या लवकर स्थापना करावी अशी या संमेलनाची मागणी आहे. (७, नाशिक १९४२)

(२९८) – [४] महाराष्ट्र साहित्य संमेलनांची हिंदुस्थान सरकारास अशी आग्रहाची आणि निकडीची सूचना आहे की, महाराष्ट्र देशाचा विस्तार, संस्कृति आणि वैशिष्ट्य हीं लक्षांत घेअून हिंदुस्थान सरकारने पुणें व नागपूर येथे अेकेक स्वतंत्र नभोवाणीकेंद्र स्थापन करण्याची त्वरा करावी. मद्रास इलाख्यांत ज्याप्रमाणे तामील प्रांताकरिता त्रिचनापल्ली येथे किंवा पूर्वबंगालमध्ये डाक्का येथे स्वतंत्र नभोवाणीकेंद्रें स्थापन करण्याला हिंदुस्थान सरकार तयार झालें आहे, त्याप्रमाणे पुणें व नागपूर येथेहि तशी व्यवस्था करणें हें न्याय्य आणि इष्ट होअील असें या संमेलनाचें मत आहे. (५, रत्नागिरी १९४०)

(२९९) – [४] चित्रपटाच्या सेन्सार बोर्डावर (नियामक मंडळावर) महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फेंचा एक प्रातिनिधि सभासद म्हणून घेण्यांत यावा अशी मागणी संमेलनाने गेल्या वर्षी केली होती. या मागणीबद्दल सरकारने जी दिरंगाई दाखविली त्याबद्दल या संमेलनास खेद होत असून, ह्या मागणीची त्वरित अंमलबजावणी व्हावी अशी या संमेलनाची सरकारकडे मागणी आहे. (२२, रत्नागिरी १९४०)

(३००) – [४] (अ) महाराष्ट्र साहित्य संमेलनाची हिंदुस्थान सरकारास अशी आग्रहाची व निकडीची सूचना आहे की, महाराष्ट्र देशाचा विस्तार, संस्कृति आणि वैशिष्ट्य हीं लक्षांत घेऊन हिंदुस्थान सरकारने पुणें व नागपूर येथे एक एक स्वतंत्र नभोवाणीकेंद्र स्थापन करण्याची त्वरा करावी. मद्रास इलाख्यांत ज्याप्रमाणे तामीळ प्रांताकरिता त्रिचनापल्ली येथे किंवा पूर्वबंगालमध्ये डाक्का येथे स्वतंत्र नभोवाणीकेंद्रें स्थापन करण्याला हिंदुस्थान सरकार तयार झालें आहे, त्याप्रमाणे पुणें व नागपूर येथेहि तशी व्यवस्था करणें हें न्याय्य व अिष्ट होईल असें या संमेलनाचें मत आहे.

(आ) तसेंच महाराष्ट्र साहित्य संमेलनाची अशी मागणी आहे की, दिल्ली येथील नभोवाणीकेंद्रावरून निवेदन केल्या जाणाऱ्या मराठी बातम्यांच्या निवेदनाला सध्यापेक्षा अधिक वेळ देण्याची व्यवस्था करावी; तसेंच मुंबई-केंद्रातर्फे केल्या जाणाऱ्या पुस्तकपरीक्षण, कथानिवेदन, काव्यगायन, लोकगीतगायन या कार्यक्रमांत मराठी भाषेंतील कार्यक्रमांना प्राधान्य आणि सध्यापेक्षा अधिक वेळ दिला जाणें हें मुंबई इलाख्यांतील मराठीभाषकांच्या दृष्टीने आवश्यक आहे.

(इ) त्याचप्रमाणे मुंबई-नभोवाणीकेंद्राच्या सल्लागारमंडळांत महाराष्ट्र-साहित्य-परिषदेच्या प्रतिनिधींचा समावेश केला जावा अशी या संमेलनाची मागणी आहे.

(ई) ऑल इंडिया रेडिओचें मुखपत्र 'दि इंडियन लिसनर' या नियतकालिकाच्या हिंदी, उर्दू, बंगाली व तामीळ अशा आवृत्त्या ज्याप्रमाणे निघतात त्याप्रमाणे एक मराठी आवृत्तिहि निघावी अशी या संमेलनाची मागणी आहे.

(उ) मुंबई केंद्राचा मराठी भाषेचा कारभार व्यवस्थित चालला आहे किंवा नाही हें पाहण्यासाठी खालील समिति नेमिली जावी व नभोवाणीकेंद्राने तिचा वारंवार सल्ला घ्यावा अशी या संमेलनाची मागणी आहे:—

१ श्री. वि. स. खांडेकर, २ प्रा. वा. म. जोशी, ३ श्री. के. नारायण काळे, ४ श्री. अनंत काणेकर, ५ प्रा. शं. के. कानिटकर, ६ डॉ. अ. ना. भालेराव, ७ श्री. पु. य. देशपांडे, ८ श्री. प्रभाकर पाध्ये [आमंत्रक]. (१२, **सोलापूर** १९४१).

(३०१) – [४] औरंगाबाद नभोवाणी केंद्रावरून दररोज अडीच तास संपूर्ण मराठी कार्यक्रम प्रसृत होतो, अशा प्रकारची व्यवस्था अितर कोठेहि नाही. या गोष्टींचा विशेष अुल्लेख करतांना या संमेलनास आनंद वाटतो. त्याबरोबरच सम्मेलनाची निजाम सरकारच्या नभोवाणी-संचालकांस अशी विनंती आहे की, बृहन्महाराष्ट्रीयांस या केंद्राचा यथोचित लाभ घेतां यावा या दृष्टीने केंद्राचें कार्यक्षेत्र जास्त विस्तृत व व्यापक (power and range) करण्यांत यावें. (११, **नाशिक** १९४२)

(३०२) – [५] महाराष्ट्र साहित्य परिषदेने पुरस्कारिलेल्या शुद्धलेखनपद्धतीचा स्वीकार नियतकालिकांनी, ग्रंथकारांनी, शिक्षणखात्याने व मुंबई विद्यापीठाने त्वरित करावा अशी त्यांस या संमेलनाची आग्रहपूर्वक विनंती आहे. (८, **रत्नागिरी** १९४०)

(३०३)–[५] सर्वमान्य अशा मराठी लघुलिपीच्या अभावीं बातमीदारांचें व लेखकांचें काम सुकर होत नाही असा अनुभव आहे. मराठी लघुलिपीची निर्दोष व यशस्वी योजना सिद्धीस न्यावी म्हणून आजवर श्री. भुजंगराव मानकर, श्री. विनायकराव नाफड, श्री. वासुदेवराव बेंद्रे आणि कै. दाबके इत्यादींनी केलेले प्रयोग अभिनंदनीय व आशादायक ठरले आहेत हें लक्ष्यांत घेअून कार्याची पुढील प्रगति कुंठित होऊं नये म्हणून हें संमेलन म. सा. परिषदेस विनंती करीत आहे की, परिषदेने पूर्वी झालेली प्रगति विचारांत घेऊन मराठी लघुलिपीची एखादी सर्वमान्य योजना तयार करून तिचा प्रचार सर्वत्र करण्याची खटपट करावी. अशी योजना सिद्ध करण्यास साहायभूत म्हणून खालील गृहस्थ उपसमितींत राहावे आणि जरूरीप्रमाणे आणखी तीन पावेतो सभासद जोडून घेण्याचा वरील उपसमितीस अधिकार देण्यांत यावा. साहित्यपरिषदेने अेका वर्षाच्या आंत उपर्युक्त स्वरूपाची योजना तयार करून ती पुढील संमेलनास सादर करावी अशी विनंती आहे—

(१) श्री. भुजंगराव मानकर, (२) श्री. विनायक दत्तात्रेय नाफड, (३) श्री. भा. वि. वरेरकर (निमंत्रक), (४) श्री. काका कालेलकर, (५) श्री. द. वा. पोतदार.
(२४, **रत्नागिरी**, १९४०).

(३०४)–[५] महाराष्ट्र साहित्य परिषदेने पुरस्कारिलेल्या शुद्धलेखनपद्धतीचा स्वीकार नियतकालिकांनी, ग्रंथकारांनी, शिक्षणखात्याने व मुंबअी विद्यापीठाने त्वरित करावा अशी त्यांस या संमेलनाची आग्रहपूर्वक विनंती आहे. (३, **सोलापूर** १९४१).

(३०५) [५] (अ) मराठी लिपीमध्ये 'अ'ची बाराखडी ज्याप्रमाणे आता रूढ होत चालली आहे त्याप्रमाणे उकाराचीं चिन्हें ओळींत घालण्याची व 'र'फार ऐवजीं अर्धा 'र' ओळींत घालून वापरून पाहण्याची प्रथा व्यवहारांत कितपत आणतां येईल तें अजमावून पाहण्याकरिता साहित्यपत्रिकेमध्ये अशा तऱ्हेचा कांही मजकूर छापून प्रसिद्ध करण्याचा प्रयोग करून पाहावा अशी या संमेलनाची विनंती आहे.

(आ) मराठी लिपी-सुधारणेमध्ये करावयाचे नवीन नवीन प्रयोग प्रत्यक्ष करून पाहण्याकरिता व सुधारलेल्या लिपी जनतेपुढे येण्यास संधि मिळावी याकरिता अशा नवीन तऱ्हेने जुळविलेला मजकूर साहित्य पत्रिका हें त्रैमासिक व इतर मासिकांत वरचेवर देण्याची तजवीज परिषदेने करावी अशी या संमेलनाची विनंती आहे. (१५, **सोलापूर** १९४१).

(३०६) – [५] गेलीं अनेक वर्षें मोडी लिपीची फारच गळचेपी व पायमल्ली होत आहे. तरी ही होत असलेली तिची दुर्दशा थांबवावी नि तिला तिचें पूर्ववत् वैभव मिळवून द्यावें असें या संमेलना अंतःकरणपूर्वक वाटतें. आणि याबाबत जि. बोर्ड, म्यु. बोर्ड व त्यांचे शिक्षणाधिकारी यांच्याशीं विचारविनिमय करून ती प्रत्यक्ष व्यवहारांत आणण्याकरिता प्रतिनिधींना ही सभा आग्रहपूर्वक सांगत आहे. (२, **नाशिक** १९४२)

(३०७)–[६] महाराष्ट्र साहित्य परिषद् ही साहित्यप्रांतांतील प्रातिनिधिक संस्था असल्याने शालेय अभ्यासक्रम, पुस्तकांची निवड वगैरे भाषाविषयक गोष्टींचा विचार करतांना विश्वविद्यालयाने व सरकाराने परिषदेचा अभिप्राय घ्यावा असें या संमेलनाचें मत आहे. (१०, **रत्नागिरी** १९४०).

(३०८) – [६] या संमेलनाचें असें मत आहे की मातृभाषेचें शिक्षण अद्यापि जेथे सक्तीचें झालेलें नाही तेथे तें तसें सक्तीचें करण्यांत यावें.

हें धोरण अंमलांत आणण्यासाठी अभ्यासक्रमाची आंखणी करतांना मराठी ही मातृभाषा असणाऱ्या विद्यार्थ्यांची मातृभाषेची परीक्षा स्वतंत्र राखावी आणि तींत उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक गुणांचें किमान प्रमाण इतर विषयांच्या मानाने अधिकांत अधिक असावें.

मराठीचें शिक्षण चालणाऱ्या ठिकाणीं जेथे वरील धोरणाच्या दृष्टीने कांही उणीवा आढळतील त्यांची चौकशी करून त्या त्या ठिकाणीं वर नमूद केल्याप्रमाणे अंमल होईल अशी खटपट महाराष्ट्र साहित्य परिषदेने करावी. (१६, **रत्नागिरी** १९४०)

(३०९) – [६] हें संमेलन श्रीमंत महाराज होळकर सरकार यांस आग्रहपूर्वक विनंती करितें की, होळकर कॉलेजांत एस्. ए. करिता मराठी विषय शिकविण्याची सोय व्हावी. (७, **सोलापूर** १९४१)

(३१०) – [६] हें संमेलन अलिजाबहादुर श्रीमंत महाराज शिंदे सरकार यांस आग्रहपूर्वक विनंती करीत आहे की, व्हिक्टोरिया कॉलेजांत एस् ए. करिता मराठी विषय शिकविण्याची सोय व्हावी. (८, **सोलापूर** १९४१)

(३११) – [६] आग्रा विद्यापीठाच्या एस्. ए. परीक्षेच्या अभ्यासक्रमांत मराठी भाषा आणि वाङ्मय या विषयाला हिंदी, उर्दू इत्यादि भाषांप्रमाणे स्थान देण्यांत येणें आवश्यक आहे असें या संमेलनाचें मत असून आग्रा विद्यापीठाने बी. ए. परीक्षेप्रमाणे एस्. ए. परीक्षेच्या अभ्यासक्रमांत या विषयाचा त्वरित समावेश करावा आणि त्यासाठी योग्य ती तजवीज करावी अशी या संमेलनाची मागणी आहे. (१०, **सोलापूर** १९४१)

(३१२) – [६] मॅट्रिक्युलेशन परीक्षेच्या संस्कृत, इतिहास, भूगोल व शास्त्रीय विषय ह्या विषयांच्या प्रश्नपत्रिका इंग्लिश आणि त्या त्या प्रांतिक भाषांतून काढल्या जाव्यात अशी सूचना हें संमेलन मुंबई विश्वविद्यालयास करीत आहे. (२४, **सोलापूर** १९४१)

(३१३)– [६] डेक्कन कॉलेज कौन्सिलच्या घटनेसंबंधाच्या मुंबई सरकारच्या ठरावांत महाराष्ट्र विद्यापीठाच्या स्थापनेसंबंधाने व्यक्त करण्यांत आलेल्या सरकारी धोरणाचा हे संमेलन तीव्र निषेध करितें. तसेंच डेक्कन कॉलेजच्या कौन्सिलांत इलाख्यांतील निरनिराळ्या भागांतील सभासद त्या त्या विभागांचे प्रतिनिधि या नात्याने (प्रतिनिधि) म्हणून समाविष्ट करण्यालाहि या संमेलनाचा विरोध आहे. या दोन्ही बाबतींत सरकारने आपल्या निर्णयाचा फेरविचार करावा अशी या संमेलनाची मागणी आहे. (१४, **सोलापूर** १९४१)

६२५४ ६४१४

(३१४) – [७] मराठी भाषेंतील अनेक जुन्या अप्रकाशित ग्रंथांच्या प्रकाशनासाठी, तसेंच प्रकाशित ग्रंथांच्या पाठशुद्ध आवृत्ति तयार करण्यासाठी उपलब्ध हस्तलिखितांची समग्र यादी होणें अत्यंत अवश्य आहे. महाराष्ट्रांत व महाराष्ट्राबाहेर अशा हस्तलिखितांचे ठिकठिकाणीं बरेच संग्रह आहेत. समर्थ वाग्देवता मंदिर, धुळें, व तंजावरची सरस्वती महाल लायब्ररी या संस्थांतर्फे त्यांच्या संग्रहांतील याद्या प्रकाशित झाल्या आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्रांतील इतर संग्रहांच्या याद्या म. सा. परिषदेने तयार कराव्या आणि परदेशांतील अशा याद्या मागवून घ्याव्या की जेणेंकरून Catalogus Catalogorum सारखी मराठी हस्तलिखितांची बृहत्सूची तयार करणें शक्य होईल. यासंबंधी व्यवहार्य योजना तयार करण्यासाठी खालील समिति नेमण्यांत यावी व या समितीने म. सा. परिषदेला आपला अहवाल सादर करावा. अधिक सभासद स्वीकृत करून घेण्याचा अधिकार या समितीस देण्यांत येत आहेः—

(१) श्री. शंकर श्रीकृष्ण देव, (२) श्रीमंत राजे बाळासाहेब पंतप्रातिनिधि, (३) श्री. पुरुषोत्तम मंगेश लाड. (१५, **रत्नागिरी** १९४०)

(३१५)–[७] महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या घटनेंतील नियम ३ (इ) अन्वयें मराठी भाषेचा कोश तयार करणें हें एक महत्त्वाचें कर्तव्य आहे. नुकत्याच श्री. दाते यांच्या कोशमंडळाने अत्यंत परिश्रमपूर्वक महाराष्ट्र शब्दकोश तयार करण्याचा खाजगी प्रयत्न पुरा केला असल्यामुळे New English Dictionary सारख्या सर्वांगीण स्वरूपाचा कोश निर्माण करणें किती कष्टाचें काम आहे हें पटवून दिलें आहे. हें कार्य खासगी संस्थांनी करण्यापेक्षा म. सा. परिषदेमार्फत महाराष्ट्रांतील अखिल विद्वानांच्या व संस्थांच्या सहकार्याने होणें अवश्य आहे. अशा प्रकारें कांही वर्षें अखंड कार्य चालू ठेवून ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, वामन, तुकाराम, मोरोपंत प्रभृतींच्या ग्रंथांच्या समग्र शब्दसूची तयार करून New English Dictionary प्रमाणेच हा कोश तयार झाला पाहिजे. यासंबंधी व्यवहार्य योजना तयार करण्याकरिता खालील विद्वानांची समिति नेमण्यांत यावी :—

(१) डॉ. कात्रे, (२) प्रो. कृ. पां. कुलकर्णी, (३) प्रो. धर्मानंद कोसंबी, (४) श्री. य. रा. दाते (निमंत्रक), (५) श्री. य. खु. देशपांडे, (६) श्री. पु. मं. लाड, (७) डॉ. मावे. वरील समितीने आपला अहवाल म. सा. परिषदेस सादर करावा. (१९, **रत्नागिरी** १९४०).

(३१६)–[७] मराठी हस्तलिखितांची बृहत्सूची तयार करण्यास रत्नागिरी संमेलनाने नेमलेल्या समितीचें कार्य महत्त्वाचें असल्यामुळे तें सतत चालू ठेवण्याची व्यवस्था महाराष्ट्र साहित्य परिषदेने करावी अशी या संमेलनाची शिफारस आहे. (४, **सोलापूर** १९४१).

(३१७)– [७] मराठी भाषेचा सर्वांगीण स्वरूपाचा कोश होण्याच्या उद्देशाने प्राचीन कवींच्या ग्रंथांत समग्र शब्दसूची तयार करण्यास रत्नागिरीस संमेलनांत नेमलेल्या समितीचा वृत्तान्त परिषदेस सादर झाला. म. सा. परिषदेने एक कोशमंडळ नेमून हें कार्य सतत चालू ठेवावें अशी या संमेलनाची शिफारस आहे. (५, **सोलापूर** १९४१).

(३१८)–[८] माजी काँग्रेस सरकारने जप्ती उठविल्यामुळे कांही थोडें आक्षिप्त वाङ्मय प्रकाशांत येऊं शकलें हें पाहून संमेलन समाधान व्यक्त करीत आहे. परंतु उरलेल्या आक्षिप्त वाङ्मयाचें त्वरित बंधमोचन करण्याबाबत उदार धोरण चालू सरकारने स्वीकारावें अशी या सरकारास आग्रहाची मागणी आहे. (९, **रत्नागिरी**, १९४०).

(३१९) – [८] निजाम संस्थानांतील प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणक्रमांत मराठी भाषेचें जें शिक्षण दिलें जातें तें मराठी भाषेची परागति करणारें, अपुरें व निरुपयोगी आहे;

विशेषतः तें मराठवाडा विभागांतील (औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद इ. जिल्हे) मराठी भाषेची पिछेहाट करणारें आहे. हा प्रकार मराठी वाङ्मयास व साहित्यास अडथळा आणणारा आहे. तरी निजामी शिक्षणक्रमांत उच्च शिक्षणापर्यंत मराठी भाषा मराठवाड्यापुरती तरी निदान प्रमुख म्हणून शिकविली जावी, अशी निजामीय शिक्षणमंत्र्यांकडे या संमेलनाची आग्रहाची आणि हक्काची मागणी आहे. (१३, **रत्नागिरी** १९४०)

(३२०) – [८] मॅट्रिक परीक्षेच्या इंग्रजी प्रश्नपत्रिकेंत गेलीं दोन वर्षें मराठीचे सदोष नमुने घालण्यांत आले त्यायोगें मराठी भाषेची जी विटंबना मुंबई विद्यापीठाकडून झाली आहे त्याबद्दल हें संमेलन मुंबई विद्यापीठाचा निषेध करीत आहे. अशी मराठी भाषेची होणारी विटंबना ताबडतोब थांबवावी अशी या संमेलनाची मुंबई विद्यापीठास मागणी आहे.

(१८, **रत्नागिरी** १९४०).

(३२१) – [८] मराठी भाषेवर ठिकठिकाणीं जें निरनिराळ्या प्रकाराने सरकारी व संघटित स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या पक्षपाती धोरणामुळे किंवा निकटच्या परभाषाभाषी समाजांच्या विरोधी धोरणामुळे आक्रमण होतांना दिसेल त्याची दखल घेण्यासाठी सर्व स्थानिक कार्यकर्ते आणि मराठी भाषेचे अभिमानी यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेस अशा सर्व घडामोडींची अवश्य ती माहिती सदैव पुरवावी व अन्यतऱ्हेने साहाय्य करावें अशी या संमेलनाची त्यांस विनंती आहे. मराठी नियतकालिकें आणि त्यांचे बातमीदार यांनीहि या प्रकारच्या घटनांचें प्रकाशन करून त्वरेने मतप्रकाशन करावें व लहानमोठ्या सर्व प्रकारच्या आक्रमणांची दाद लावून घेण्यास झटावें अशीहि या संमेलनाची शिफारस आहे. (१३, **सोलापूर** १९४१)

(३२२)– [८] निजाम सरकारचें सध्याचें भाषाशिक्षण आणि नियतकालिकविषयक धोरण निजामप्रांतीय महाराष्ट्राची भाषा, वाङ्मय आणि संस्कृति यांच्या वाढीस अपकारक आहे असें या संमेलनाचें मत आहे. आणि निजाम सरकारने आपलें धोरण ताबडतोब बदलून लोकमतानुवर्ती करावें अशी या संमेलनाची आग्रहाची मागणी आहे (१८, **सोलापूर** १९४१)

(३२३)– [८] मुद्रणस्वातन्त्र्य साहित्याला अत्यंत पोषक असल्याने हें संमेलन सरकारच्या सध्याच्या मुद्रणनियंत्रणाच्या पद्धतीचा तीव्र निषेध करीत आहे व मुद्रणस्वातंत्र्यावरील हे सर्व निर्बंध सरकारने शक्य तों लवकर दूर करावे असें हें संमेलन सरकारास सुचवीत आहे. (२५, **सोलापूर** १९४१)

(३२४) – [८] निजामप्रांतीय मराठी साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या अधिवेशनास निजाम-सरकारकडून उदार मनाने परवानगी देण्यांत आली पण अधिवेशन नांदेड येथे न भरवितां उमरीसारख्या ठिकाणीं भरविण्याविषयी जी अट आहे, तिच्यासंबंधी फेरविचार व्हावा अशी विनंती आहे.

(६, **नाशिक** १९४२)

(३२५) – [८] साहित्यिकांच्यावर त्यांच्या विशिष्ट मतप्रणालीबद्दल जे जे शारीरिक व हिंसात्मक हल्ले होतात त्यांचा हें संमेलन तीव्र निषेध करीत आहे. (१२, **नाशिक** १९४२)

(३२६) – [८] अखिल भारतवर्षांत गेले दोन महिने जें आंदोलन सुरू आहे, त्यामुळे कांही प्रतिभासंपन्न साहित्यिक कारागृहांत अडकले आहेत. वाङ्मयाशीं संबंध असलेल्या कार्यकर्त्यांना त्यामुळे उपसर्ग पोहचत आहे आणि कांही वृत्तपत्रकारांना आपलीं प्रकाशनें बेमुदत बंद करावीं लागलीं आहेत. अशा रीतीने सरकारने मुद्रणस्वातंत्र्य आणि भाषणस्वातंत्र्य यांवर गदा चालून नागरिकांचे मूलभूत हक्क हिरावून घेतले आहेत. सरकारच्या ह्या धोरणाबद्दल

हें संमेलन तीव्र निषेध व्यक्त करीत असून सरकारने मुद्रण आणि भाषणस्वातंत्र्य ह्यांजवरील बंदी ताबडतोब उठवावी अशी हें संमेलन सरकारला जोराची मागणी करीत आहे,

(१४, **नाशिक** १९४२)

(३२७)– [९] कांही मराठी नियतकालिकांतून आजकाल बीभत्स व असभ्यतासूचक मजकूर छापला जातो व ग्राम्य कुचाळी व दुष्ट वैयक्तिक टीका केली जाते. या अनिष्ट लेखनास प्रतिबंध होणें सार्वजनिक हितदृष्ट्या अिष्ट असल्यामुळे अशा प्रकारच्या लेखनाचें परीक्षण करून योग्य तें मार्गदर्शन करण्याकरिता महाराष्ट्र साहित्य परिषदेने पुढील पांच गृहस्थांची एक समालोचनसमिति स्थापन करावी. या समितीने आपल्या कार्याचें अितिवृत्त व सूचना दर तीन महिन्यांनी परिषदेच्या त्रैमासिकांत प्रसिद्ध कराव्या अशी या संमेलनाची आग्रहाची सूचना आहे.

१ वि. स. खांडेकर (अध्यक्ष), २ प्रा. द. वा. पोतदार, ३ प्रा. वा. म. जोशी, ४ श्री. चिं. ग. कर्वे, ५ श्री. कृ. गो. मराठे (आमंत्रक). (२८, **सोलापूर** १९४१)

(३२८)– [१०] स्वभाषेच्या द्वारा शिक्षण देण्याकरिता आणि स्वभाषेच्या अभ्यासास उत्तेजन देण्याकरिता प्रो. कर्वे यांनी स्थापिलेल्या व उदारधी सर विठ्ठलदास ठाकरसी यांनी पुरस्कारिलेल्या 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी' या विद्यापीठास सरकारी सनद देण्याची हिंदुस्थान सरकारकडे शिफारस करून आणि यापुढे शक्य तें अधिक आर्थिक साहाय्य देऊन विद्यापीठाच्या प्रगतीस आणि परंपरेने स्त्रीशिक्षण व देशी भाषा यांच्याहि प्रगतीस हातभार लावावा अशी या संमेलनाची मुंबई सरकारास विनंती आहे. (४, **रत्नागिरी** १९४०)

(३२९)– [१०] हें संमेलन श्रीमंत महाराज होळकर यांस विनंती करीत आहे की पूर्वी मराठी ग्रंथोत्तेजक मंडळास रु. २५०० वार्षिक साहाय्य दिलें जात होतें व जें अलीकडे थांबविण्यांत आलें आहे तें पुन्हा चालू व्हावें. (९, **सोलापूर** १९४१)

(३३०)– [१०] मराठी भाषा बोलणारांत व लिहिणारांत जैनधर्मीयांचें स्थान महत्त्वाचें आहे. मराठी भाषेंतील आज उपलब्ध असलेल्या लेखांत म्हैसूर संस्थानांतील श्रवण बेलगोळा येथील श्रीगोमटेश्वराच्या भव्य जिनमूर्तीखालील शिलालेखच पहिला आहे. तसेंच मराठीची माता महाराष्ट्री व जैनमहाराष्ट्री, अर्धमागधी, अपभ्रंश वगैरे मराठीशीं व्याकरणदृष्ट्या साम्य असणाऱ्या भाषांत जैनांचें वाङ्मय विपुल प्रमाणांत उपलब्ध आहे. तेव्हा प्राचीन जैन वाङ्मयाचें संशोधन केल्यास महाराष्ट्री वगैरे प्राकृत आणि मराठी यांमधील दुवा सांपडण्याची व जुनें मराठी लिखाण मिळण्याची शक्यता आहे. हा दुवा सांपडल्यास मराठी भाषेच्या उत्पत्तीच्या दृष्टीने आपणांस बरेंच मागे जातां येईल म्हणून असें संशोधन करावें असें या संमेलनाचें मत आहे व हें संशोधनकार्य करण्याकरिता खालील सद्गृहस्थांची एक समिति हें संमेलन नियुक्त करीत आहे:—

१ डॉ. प. ल. वैद्य (अध्यक्ष), डॉ. अ. ना. उपाध्ये, ३ प्रा. कै. शि. मेहता (आमंत्रक), ४ श्री. रतनलाल डी. शहा, ५ प्रा. भू. अ. चौगुले, ६ श्री. जीवराज गौ. दोशी, ७ प्रा. ना. के. भागवत, ८ प्रा. श्री नी. चापेकर, ९ श्री. रा. ने. शहा. (२२, **सोलापूर** १९४१)

(३३१) – [१०] निरनिराळ्या भारतीय विद्यापीठांतून अर्धमागधी, पाली व तत्सम इतर भाषा यांना अभ्यासक्रमांत स्थान दिल्याबद्दल या संमेलनास आनंद होत आहे.

यापुढची पायरी म्हणजे जैन वाङ्मयांतील नीतिबोध, अध्यात्म व इतर अभिजात वाङ्मय यांतील मराठींत भाषांतरित किंवा रूपांतरित केलेले ग्रंथ मराठीच्या निरनिराळ्या परीक्षांच्या अभ्यासक्रमांत समाविष्ट करणें ही होय. या ग्रंथांचा अभ्यास निरनिराळे धर्म व

संस्कृति यांच्या शैक्षणिक अभ्यासास व मूलमापनास उपयोगी पडल्याशिवाय राहणार नाही असें या संमेचें मत आहे.

यासाठी मुंबई, नागपूर, श्रीमती नाथीबाई ठाकरसी, बनारस हिंदु विद्यापीठ, ढाका विद्यापीठ वगैरे विद्यापीठें यांनी या बाबतींत सक्रिय प्रोत्साहन देऊन या वाङ्मयाचा अभ्यास जारीने सुरू करावा अशी या संमेलनाची या संस्थांना आग्रहाची विनंती आहे.

(२३, **सोलापूर** १९४१)

(३३२)– [१३] गेल्या वर्षी संमेलनांत बालवाङ्मयासंबंधी जो ठराव संमेलनाने केला आहे त्यांत एक समिति नेमण्यांत आली होती. गतवर्षी कांही कारणाने समितीचें कार्य होऊं शकलें नाही.

या वर्षी त्याच ठरावांतील मूलभूत तत्त्वें मान्य करून खालील दुसरी लहान व सुटसुटीत समिति हें संमेलन नेमीत आहे व वेळोवेळीं जरूरीप्रमाणे स्वीकृत सभासद करून घेण्याची या समितीस परवानगी देत आहे:—

(१) श्री. ताराबाई मोडक (अध्यक्ष), (२) श्री. गोपीनाथ तळवळकर, (३) प्रो. श्री. बा. रानडे, (४) श्री. पा. ना. मिसाळ, (५) श्री. पालवणकर, (६) श्री. गं. दे. खानोलकर, (७) श्री. देवदत्त नारायण टिळक, (८) कु. माई वेरेरकर (आमंत्रक). (२२, **रत्नागिरी** १९४०)

(३३३)– [१४] प्रतिवर्षी प्रसिद्ध होणाऱ्या मराठी वाङ्मयाचें वर्गीकृत व पद्धतशीर समालोचन व आंकडेवारी प्रसिद्ध होणें अगत्याचें आहे. पूर्वी सरकारतर्फे वाङ्मयसमालोचनाची प्रसिद्धि होत असे. तरी मुंबई सरकारने पुन्हा हा उपक्रम हातीं घ्यावा अशी या संमेलनाची सरकारास शिफारस आहे. (१४, **रत्नागिरी** १९४०)

(३३४)– [१४] ह्या संमेलनाचें असें मत आहे की महाराष्ट्रांतील साहित्यिक संस्थांनी महाराष्ट्र ज्ञानकोशाचें काम चालू ठेवण्यासाठी उपाययोजना करावी. तसेंच आतापर्यंत निर्माण झालेल्या व पुढे होणाऱ्या एकंदर मराठी साहित्याची एक समीक्षणसूची तयार करून तीहि पुढे चालू ठेवावी. यासंबंधी श्री. राम गोगटे यांनी एक योजना तयार करून ती संमेलनापुढे सादर करण्याकरिता परिषदेकडे सादर करावी. (२१, **रत्नागिरी** १९४०)

(३३५)– [१५] साक्षरताप्रसाराच्या व्यापक प्रमाणांत सुरू झालेल्या मोहिमेमुळे ज्या बहुसंख्य अशा अशिक्षित वर्गाला अक्षरओळख झाली आहे नि ज्ञानार्जनाचा मार्ग खुला नि सुलभ झाला आहे अशा वर्गाला आवश्यक नि उपयुक्त असें वाङ्मय हवें त्या प्रमाणांत लिहिलें जात नाही. नव्यानेच अक्षरओळख झालेल्या व बहुतांशीं प्रौढ असलेल्या जनतेच्या हातीं राजकीय, सामाजिक, धार्मिक, सर्वांगीण उन्नति होईल, त्यांना जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टि येईल, त्यांच्यांतील रूढिप्रियता नष्ट होईल नि त्यांना आपल्या मूलभूत हक्कांची जाणीव होईल नि त्याचबरोबर कर्तव्याचीहि ओळख होईल अशा प्रकारचें वाङ्मय निर्माण होणें जरूर आहे. हल्लीचे आघाडीवरचे साहित्यिक नि नियतकालिकें यांची दृष्टि या बहुजनसमाजाकडे वळलेली नाही; त्यांचें वाङ्मय पुढारलेल्या वर्गासाठीच आहे; त्यांचा विनोद नि शाब्दीय दृष्टिकोन बहुजनसमाजाच्या आटोक्यांतील नाही; तरी नव्या युगाचा ओघ लक्षांत घेऊनच नवोदित लेखकांनी नि हल्लीच्या मान्यवर साहित्यिकांनी असें बहुजनोपयोगी साहित्य निर्माण करण्याकडे विशेष लक्ष पुरवावें अशी या संमेची विनंती आहे. (२१, **सोलापूर** १९४१)

(३३६) – [१५] व्यायामविषयक वाङ्मयाला मराठी साहित्यांत आणि साहित्यसंमेलनांतून जें योग्य स्थान द्यावयाला पाहिजे तें दिलें जात नाही याबद्दल या संमेलनाला खेद

होत आहे आणि या वाङ्मयाला योग्य तें स्थान दिलें जावें अशी या संमेलनाची शिफारस आहे. (३, **नाशिक** १९४१)

(३३७) – [१५] मराठी साहित्याची सर्वांगीण उन्नति होण्याच्या दृष्टीने विचार करितां एकंदर शास्त्रीय वाङ्मयाकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे असें दिसतें. 'शुद्ध शास्त्र' हा विषय जरी सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने महत्त्वाचा नसला तरी लौकिकशास्त्र ही शाखा सर्वसामान्य साक्षर जनतेच्या ज्ञानांत योग्य व जरूर अशी भर घालणारी असून क्लिष्टपणा टाळून लिहितां येण्याजोगें असल्यामुळे प्रकाशकांनी व नियतकालिकांनी या विषयाकडे विशेष लक्ष पुरवावें अशी ही सभा त्यांस विनंती करीत आहे. (४, **नाशिक** १९४२)

(३३८) – [१५] रशियन व चिनी लोक आणि त्यांचीं सैन्यें जर्मन, इटालियन आणि जपानी फासिस्टांच्या पाशवी हल्ल्यांना तोंड देतांना जें अतुल धैर्य नि पराक्रम दाखवीत आहे त्याबद्दल ह्या संमेलनाला अत्यंत आदर वाटत असून, स्वातंत्र्यवादी रशिया आणि चीन ह्यांचा विजय होवो आणि जगांतील फासिझमचा नायनाट होवो अशी ह्या संमेलनाची इच्छा आहे. प्रस्तुत युद्धपरिस्थितीची झळ ह्या देशाला लागलेली असल्याने देशाच्या संरक्षणार्थ सर्व स्वातंत्र्यवादी शक्तींची राष्ट्रीय एकजूट घडवून आणण्यासाठी सर्व साहित्यिकांनी हिरीरीने पुढे यावें असा या संमेलनाचा त्यांना आग्रह आहे. (१५, **नाशिक** १९४२)

(३३९)– [१६] (अ) मराठी भाषेंत प्रसिद्ध होणाऱ्या आणि प्रांतिक सरकारांकडे द्यावयाच्या प्रत्येक पुस्तकाच्या प्रतींपैकी एकेक प्रत एखाद्या मध्यवर्ती ग्रंथालयांत विनामूल्य सार्वजनिक उपयोगाकरिता ठेवण्याची सरकारने व्यवस्था करावी अशी या संमेलनाची प्रांतिक सरकारास विनंती आहे.

(आ) जर सरकारकडे येणाऱ्या पुस्तकांच्या प्रतींपैकी प्रत सरकारास देतां येत नसेल तर अशीं पुस्तकें विकत घेऊनहि वरील व्यवस्था करावी.

(इ) याशिवाय प्रांतिक सरकारच्या संग्रहीं जीं जीं पुस्तकें पडून असतील तीं तीं पुस्तकें-हि वर सुचविलेल्या मध्यवर्ती ग्रंथालयांत ठेवावीत. (६, **रत्नागिरी** १९४०)

(३४०) – [१७] कर्नाटकाच्या एकीकरणाचा जो ठराव मुंबई प्रांताच्या कायदेमंडळांत मान्य करण्यांत आला आहे त्याच्या अंमलबजावणीच्या वेळीं कर्नाटकाच्या सीमा ठरवितांना सरकारने खालील सूचना अवश्य ध्यानांत घ्याव्या अशी या संमेलनाची सरकारास विनंती आहे.

(१) प्रांताची सीमा ठरवितांना खेडें हें परिमाण ठरविण्यांत यावें. कोणतें खेडें कोणत्या भाषेच्या प्रांतांत समाविष्ट करण्यांत यावें याचा निर्णय त्या त्या खेड्यांतील प्रौढ रहिवाशांचीं मतें गुप्त मतदानपद्धतीने मागवून करण्यांत यावा.

(२) बेळगांव, कारवार व धारवाड या तीन्ही जिल्ह्यांतील जीं खेडीं व शहरें मराठी बोलणाऱ्या बहुसंख्य लोकांचीं असतील तीं सर्व एकत्रित करून त्यांचा एक नवीन मराठी जिल्हा सिद्ध करावा आणि तो महाराष्ट्रांत समाविष्ट करण्यांत यावा. तसेंच विजापूर जिल्ह्यां-तील अशीं मराठी खेडीं शेजारच्या मराठी जिल्ह्यास जोडण्यांत यावीं. (७, **रत्नागिरी** १९४०)

(३४१) - [१७] मराठी भाषा, परंपरा व संस्कृति यांची जोपासना व महाराष्ट्रीयांच्या हितसंबंधाचें योग्य संरक्षण हीं होण्याकरिता मराठी बोलणारे बहुसंख्य लोक असलेल्या प्रदेशाचा निराळा प्रांत बनविणें आवश्यक आहे असें या संमेलनाचें मत आहे, व नवीन संयुक्त राज्य-घटनेचा विचार होण्यापूर्वी हा प्रांत अस्तित्वांत आणिला जावा अशी या संमेलनाची मागणी आहे. (११, **सोलापूर** १९४१)

(३४२) – [१७] गेल्या फेब्रुवारीच्या २८ तारखेस झालेल्या शिरगणतीत मुंबईतील व विशेषतः दक्षिण कोकणांतील पुष्कळ मंडळींनी आपली जन्मभाषा किंवा पाळण्यांतील भाषा (Language of the cradle) 'कोकणी' अशी सांगितली असल्याळे कोकणी ही मराठी भाषेपासून अगदी निराळी अशी स्वतंत्र भाषा आहे अशी चुकीची नोंद १९३१ च्या शिरगणतीप्रमाणे १९४१ च्या शिरगणतीतहि होण्याचा संभव आहे. त्याचप्रमाणे कोकणांतील 'चित्पावनी' याहि बोलीचा अंतर्भाव 'कोकणी'त केला गेला असल्यामुळे इतर कोकणी बोली-प्रमाणे 'चित्पावनी' बोलीहि मराठी भाषेपासून निराळी अशी नोंदली जाणार आहे. 'कोकणी' ही बोली सध्याच्या ग्रांथिक मराठी भाषेचेंच एक जुनें स्वरूप असून तिचा अन्तर्भाव पूर्वी-प्रमाणेच मराठींत करण्यांत आला पाहिजे. या सर्व साधकबाधक प्रमाणांचा विचार करून एक अधिकृत निवेदनपत्र (Representation) शिरगणतीखात्याच्या मुख्य अधिकाऱ्यांकडे पाठवून त्या कामीं आणखी आवश्यक ती माहिती त्यांना पुरविण्याकरिता हें संमेलन पुढील गृहस्थांची एक समिति नेमीत आहे. या समितीस अधिक सभासद् स्वीकृत करून घेण्याचा अधिकार आहे.

१ डॉ. वि. सि. सुकथनकर, एम्. ए., पीएच्. डी., भांडारकर रीसर्च इन्स्टिटयूट.
२ प्रो. पांडुरंग वामन काणे, एम्. ए., एल्एल्.बी.
३ श्री. शिवराम वि. पालेकर, बी.ए., एल्एल्.बी.
४ डॉ. व्यंकटराव कैकिणी, एम्. आर.सी.एस्.ई. (एडिन्बरो).
५ श्री. अनंत काकबा प्रियोळकर, बी.ए. [आमंत्रक].
६ डॉ. जे. ए. कोलॅसो, एल्.एम्. अँड् एस्., एम्.एल्.ए., मेयर, मुंबई कॉर्पोरेशन.

(१७, **सोलापूर** १९४१)

(३४३) – [१८] अखिल भारतीय स्वरूपाची सांस्कृतिक ऐक्यपोषक साहित्यसंस्था स्थापन करण्यासंबंधी इतर प्रांतांतील साहित्यिकांशीं तसेंच साहित्यसंस्थांशीं विचारविनिमय करण्याकरिता आणि अखिल भारतीय स्वरूपाची सांस्कृतिक ऐक्यपोषक साहित्यसंस्था स्थाप-ण्याची योजना तयार करण्याकरिता पुढील लोकांची समिति या ठरावानुसार नेमण्यांत येत आहे. या समितीने आपल्या कार्याचा अहवाल पुढील संमेलनापुढे सादर करावा. या समितीला अधिक सभासद स्वीकृत करण्याचा व निधि गोळा करण्याचा अधिकार देण्यांत येत आहे.

१ श्री. पु. य. देशपांडे (आमंत्रक), २ श्री. प्र. के. अत्रे, ३ श्री. द. वा. पोतदार, ४ श्री. वा. म. जोशी, ५ श्री. कृ. पां. कुलकर्णी. (१३, **नाशिक** १९४२)

(३४४) – [१९] मुंबई येथील सरकारी चित्रकलाशिक्षणविद्यालय (Sir J. J. School of Arts) या संस्थेवरील मुख्याधिकाऱ्याच्या जागीं हिंदी कलावंताची नेमणूक करण्याची मागणी हिंदी कलावंतांकडून गेलीं कित्येक वर्षें केली जात असूनहि अद्यापि त्या मागणीप्रमाणे सरकारने व्यवस्था केली नाही याबद्दल हें संमेलन मुंबई सरकारचा निषेध करीत आहे. हिंदुस्थानांतील इतर सर्व चित्रकला नि इतर कलाविद्यालयें हिंदी कलावंतांच्या नेतृत्वा-खाली चालू असतांनाहि, मुंबईच्या विद्यालयावर अद्यापि परकीय कलावंतच प्रमुखस्थानीं आहेत हें मुंबई सरकारचें धोरण प्रतिगामी आहे असें या संमेलनाचें मत आहे. कारण त्यामुळे कला-साहित्यनिर्मितीस अवश्य तितका अवसर मिळत नाही. चित्रकलाविद्यालयें चालविण्याची पात्रता असलेले पहिल्या दर्जाचे हिंदी कलावंत मुंबई इलाख्यांत आहेत याची जाणीव ठेवून मुंबई सरकारने त्या संस्थेचे हिंदीकरण शक्य तितक्या लौकर करावें अशी या संमेलनाची मागणी आहे. (२०, **रत्नागिरी** १९४०)

(३४५)– [१९] महाराष्ट्र नाट्यकला व रंगभूमि यांचा शताब्दिमहोत्सव १९४३ साली रंगभूमीचें उगमस्थान सांगली येथे व अखिल महाराष्ट्रांत इतरत्र शक्य होईल तेथे, या अपूर्व प्रसंगास साजेशा रीतीने साजरा केला जावा अशी या संमेलनाची उत्कट अिच्छा आहे. या उत्सवासंबंधीची योजना सहा महिन्यांच्या आंत तयार करण्यांत येऊन ती प्रसिद्ध करण्यांत यावी अशी महाराष्ट्र नाट्यसंमेलनास या संमेलनाची विनंती आहे. (२३, **रत्नागिरी** १९४०)

(३४६)– [१९] महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे आद्यकल्पक, संस्थापक आणि प्रवर्तक कै. न्यायमूर्ति म. गो. रानडे यांना जन्मून १९४२ या वर्षी शंभर वर्षे पूर्ण होतात म्हणून संमेलनाच्या या आद्यप्रवर्तकाच्या स्मरणार्थ त्या प्रसंगी योग्य वाङ्मयस्मारक केलें जावें अशी या संमेलनाची इच्छा आहे. या कामासाठी खालील समिति नेमण्यांत येत आहेः—

(१) श्री. वि. स. खांडेकर, (२) प्रा. वा. म. जोशी, (३) श्री. भा. वि. वरेरकर, (४) रावसा. र. लु. जोशी, (५) प्रा. श्री. ना. बनहट्टी [आमंत्रक].

या समितीस अधिक सभासद स्वीकृत करून घेण्याचा अधिकार देण्यांत येत आहे. (६, **सोलापूर** १९४१)

(३४७)– [१९] महाराष्ट्र भाषेची सेवा करणाऱ्या निष्ठावंत साहित्यिकांत ज्ञानकोशकार कै. डॉ. केतकर यांचें स्थान पहिल्या दर्जाचें असल्याकारणाने त्यांच्या कीर्तीस व साहित्यसेवेस साजेसें स्मारक महाराष्ट्रांत मराठीभाषाभिमानी लोकांनी करावें अशी या संमेलनाची सर्व महाराष्ट्रभाषाभिमानी लेखकांना, साहित्यिकांना व जनतेला कळकळीची विनंती आहे. (२०, **सोलापूर** १९४१)

(३४८)– [१९] रत्नागिरी साहित्य संमेलनांत मान्य झालेल्या ठरावांच्या अंमलबजावणीचा छापील वृत्तान्त महाराष्ट्र साहित्य परिषदेकडून संमेलनास सादर करण्यांत आला तो हें संमेलन दाखल करून घेत आहे. (२६, **सोलापूर** १९४१)

(३४९) – [१९] साहित्याचा मूळ हेतु जगांत पुरोगामी विचारसरणीचा प्रसार करून मानवजातीच्या प्रगतीचे व स्वातंत्र्याचे मार्ग खुले करणें व दलितांवर सत्ताधीशांकडून होणारे अन्याय व पिळणूक थांबवून त्यांचें जीवन सुखी करणें हा आहे.

हा उद्देश पार पाडण्याच्या मार्गांत आज फासिस्ट आणि साम्राज्यशाही तत्त्वज्ञान, विचारसरणी आणि प्रचार अडथळा आणीत आहेत. ह्या दोन विचारसरणींचा विजय झाला तर जगांत मतस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य, संघस्वातंत्र्य, मुद्रण आणि भाषास्वातंत्र्य यांना वाव देणारी लोकशाही राज्यव्यवस्था नष्ट होईल आणि सारें जग गुलामगिरींत पडेल. साहित्यिकांच्या पुरोगामी विचारसरणीच्या प्रचाराचें कार्य लोकशाहीप्रधान राज्यव्यवस्थेंतच चालूं शकेल. फासिस्ट आणि साम्राज्यशाही राजवटीच्या गुलामगिरींत हें कार्य होणें अशक्य आहे. यांचें प्रत्यंतर जर्मनी, इटली, जपान या फासिस्ट देशांत आणि इंग्लंड, अमेरिका आणि हिंदुस्थान या साम्राज्यवादी राज्यकर्त्यांच्या अमलाखाली असलेल्या देशांत पुरोगामी लेखकांची जी गळचेपी झाली आहे व होत आहे त्याने आलेलें आहे. म्हणून साम्राज्यशाही नि फासिझमचें तत्त्वज्ञान हें जागतिक स्वातंत्र्याचें वैरी आहे आणि तें तत्त्वज्ञान नष्ट होणें अवश्य आहे असें या संमेलनाचें मत आहे. जागतिक स्वातंत्र्यासाठी फासिस्ट नि साम्राज्यशाही तत्त्वज्ञानांविरुद्ध चाललेल्या संग्रामाला या संमेलनाचा पूर्ण पाठिंबा आहे. आणि या लढ्यांत लोकशाही तत्त्वज्ञान नि विचारसरणी यांनाच विजय मिळावा अशी या संमेलनाची इच्छा आहे.

(१६, **नाशिक** १९४२)

(३५०) – [१९] सध्या हुकूमशाही राष्ट्रें आणि लोकशाही राष्ट्रें ह्यांच्यामध्ये जो भीषण रणसंग्राम चाललेला आहे तो मानवी संस्कृतीला, स्वातंत्र्याला आणि खऱ्या लोकहिताला अत्यंत घातक असल्याने ह्या युद्धांत हुकूमशाहीच्या प्रवर्तकांचें पूर्ण उच्चाटण करण्यासाठी लोकशाही पक्ष्याला पाठिंबा देणें हें सर्व मराठी लेखकांचें कर्तव्य आहे, असें ह्या संमेलनाचें स्पष्ट मत आहे. या फासिस्टविरोधी आघाडीला महाराष्ट्रीय लेखकांनी हार्दिक साहाय्य करावें अशी या संमेलनाची त्यांना शिफारस आहे. तथापि त्याबरोबर हें संमेलन आपला असा अभिप्राय स्पष्टपणें नमूद करतें की, जोपर्यंत लोकशाही राष्ट्रांकडून अंकित राष्ट्रांना समतेने वागविण्यांत येत नाही, आणि जोपर्यंत ब्रिटिश राष्ट्र साम्राज्यवादाच्या भूमिकेचा त्याग करून भारतवर्षाला संपूर्ण स्वातंत्र्यदान करीत नाही, इतकेंच नव्हे तर फासिस्ट शत्रु दाराशीं येऊन ठेपला असतांहि देशांत दडपशाहीचा पुरस्कार करीत आहे, तोपर्यंत त्या लोकशाही राष्ट्रांकडून चीन आणि रशिया ह्यांना पूर्ण युद्धसाहाय्य होऊं शकणार नाही आणि युद्धप्रयत्नांत हिंदी जनतेचें त्यांना संपूर्ण सहकार्य संपादन करितां येणें शक्य होणार नाही असें या संमेलनास वाटतें. म्हणून संमेलनाची सरकारकडे अशी मागणी आहे की सरकारने आपल्या दडपशाहीच्या धोरणाचा ताबडतोब त्याग करावा, लोकपक्षीय पुढाऱ्यांना त्वरित बंधमुक्त करावें आणि जनतेला संपूर्ण स्वातंत्र्याचें सत्तादान करून राष्ट्रीय सरकारची ताबडतोब स्थापना करावी. स्वतंत्र राष्ट्रांच्या बरोबरीने फासिस्टविरोधी लढा लढण्याच्या जनतेच्या आकांक्षा दडपल्या गेल्यामुळे देशांतील परिस्थिति अत्यंत बिघडलेली आहे ती नाहींशी करून फासिस्टविरोधी आघाडी बळकट करावी आणि मानवी प्रगतीचा मार्ग सुरक्षित करावा अशी या संमेलनाची सरकारला हट्टाची मागणी आहे.

(१७, **नाशिक** १९४२)

(३५१) – [१९] सोलापूर साहित्य संमेलनांत मान्य झालेल्या ठरावांच्या अंमलबजावणीचा टंकलिखित वृत्तान्त महाराष्ट्र साहित्य परिषदेकडून सादर करण्यांत आला तो हें संमेलन दाखल करून घेत आहे. (१८, **नाशिक** १९४२)

(३५२) – [२०] प्रत्येक शाळेंतून दिवंगत व सुप्रसिद्ध मराठी साहित्यसेवकांचे स्मृतिदिन त्यांच्या वाङ्मयाचा अभ्यास करून साजरे करण्यांत यावे व या उत्सवांना शाळेच्या कार्यक्रमांत स्थान मिळेल असा प्रयत्न करण्यांत यावा. (१०, **नाशिक** १९४२)

(३५३)– [२२] दक्षिणी संस्थान साहित्य सभा, सांगली ही शाखासभा आणि साहित्य सेवामंडळ, सोलापूर ही संलग्न संस्था, अशा दोन संस्थांकडून पुढील संमेलनासाठी निमंत्रणें आलीं आहेत या निमंत्रणांबद्दल हें संमेलन या उभय संस्थांचे आभार मानीत आहे. सांगलीकरांकडून पूर्वी एक वेळ संमेलनास आमंत्रण आलें होतें. त्यामुळे त्यांच्याकडे या प्रकरणीं वडीलकीचा मान जातो हें खरें; तथापि सोलापूर बाजूकडील मराठीच्या संरक्षणाबाबतची परिस्थिति व निकड विचारांत घेतां वरील दोन्ही आमंत्रणांपैकी सोलापूर येथील आमंत्रण हें संमेलन स्वीकारीत आहे आणि त्याच वेळीं सांगलीकरांस प्रेमाने पुढील विनंती करीत आहे की त्यांनी संमेलनावरील आपला लोभ बिलकूल उणावूं देऊं नये आणि योग्य समयीं शिलकी निमंत्रण मान्य करून घ्यावें. (२५, **रत्नागिरी** १९४०)

(३५४) – [२२] पुढील साहित्य संमेलन नाशिक येथील महाराष्ट्र नाट्य मंदिर या संस्थेमार्फत भरविण्यांत यावें ही विनंती या संमेलनास संमत आहे. (२७, **सोलापूर** १९४१)

(३५५) – [२२] २७ वें महाराष्ट्र साहित्य संमेलन सांगली येथे सन १९४३ साली भरविण्यास दक्षिणी संस्थान साहित्यसभा आमंत्रण देत आहे. १९४३ साल हें मराठी रंग-

भूमीचें शतसांवत्सरिक वर्ष आहे म्हणून महाराष्ट्र-साहित्य-संमेलनातर्फे मराठी रंगभूमीचा शतसांवत्सरिक महोत्सव व नाट्यसंमेलन हीं साजरीं करण्यांत यावींत व या संस्थांशीं सहकार्य करून दक्षिणी संस्थान साहित्य सभा त्याच वेळीं महाराष्ट्र साहित्य संमेलनाचा सोहळाहि सांगली येथेच साजरा करू इच्छीत आहे. तरी तिच्या आमंत्रणाचा स्वीकार करण्यांत येत आहे.

(१९, नाशिक १९४२)

(पुढे परिशिष्ट पाहा)

परिशिष्ट १९ वें

म. सा. परिषदेचे पदाधिकारी

प्रस्तुत यादी संपादकाचे देखरेखीखाली म. सा. परिषदेचे कारकून रा. वि. चिं. देसवंडीकर यांनी तयार केली आहे. जेवढीं नांवें व सालें प्रत्यक्ष नोंदलेलीं आढळून आलीं तेवढींच येथे नोंदलीं आहेत. व्यक्ती-सूचि बहुशः परिपूर्ण आहे असें म्हणण्यास चिंता नाही. परंतु वर्षांची नोंद अपूर्ण असण्याचा संभव आहे. तथापि दिलेलीं वर्षें प्रत्यक्ष प्रमाण पाहून दिलेलीं आहेत.

अध्यक्ष

किबे, माधवराव विनायक, १९२६, १९२८ ते जून १९३७

केळकर, नरसिंह चिंतामण, जून १९३७ ते १९४२

महाजनी, (कै.) विष्णु मोरेश्वर, १९१२, १९१५, १९१७, १९२२

उपाध्यक्ष

आपटे, (कै.) हरि नारायण, १९१२, १९१५, १९१७

आंग्रे, चंद्रोजीराव संभाजीराव, १९२८

करंदीकर, (कै.) रघुनाथ पांडुरंग, १९१२

काणे, पांडुरंग वामन, १९३३-१९४२

किबे, माधवराव विनायक, १९१७, १९२२, १९३७-४२

केळकर, नरसिंह चिंतामण, १९२२, १९२६, १९२८, १९३१, १९३७

कोरटकर, (कै.) केशवराव १९३१-३३

कोल्हटकर, (कै.) श्रीपाद कृष्ण १९२२, १९२८, १९३३-३६

गायकवाड, (कै.) संपतराव, १९२२, १९२६, १९३१-३३

चापेकर, नारायण गोविंद, १९३६-१९४२

जोशी, (कै.) पुरुषोत्तम बाळकृष्ण, १९२८

जोशी, वामन मल्हार, १९३१-१९३७

तुळजापूरकर, दत्तो अप्पाजी १९३७-३९

तांबे, (कै.) गोपाळ रामचंद्र, १९३७

देशमुख, (कै.) मोरेश्वर गोपाळ, १९१२, १९१५, १९१७, १९२२, १९२६

नियोगी, भवानीशंकर, १९३६-३७

पाध्ये, (कै.) दामोदर गणेश, १९१२, १९१५, १९२६

पोतदार, दत्तो वामन, १९३७-४२

पंडित, (कै.) भास्कर महादेव १९२६

फडके, नारायण सीताराम, १९४०-४२

भाटवडेकर, (कै.) मालचंद्र कृष्ण, १९१२, १९१५, १९१७, १९२२

वैद्य, (कै.) चिंतामण विनायक, १९२८, १९३१-३६

शारंगपाणी, (कै.) कृष्णराव विनायक, १९२२

कार्याध्यक्ष

चापेकर, नारायण गोविंद, १९२८-१९३७

जोशी, वामन मल्हार, १९३७-१९४२

पाध्ये, (कै.) दामोदर गणेश, १९२३-१९२८

भाटवडेकर, (कै.) भालचंद्र कृष्ण, १९१७, १९१८, १९२२

कार्योपाध्यक्ष

काणे, पांडुरंग वामन, १९२३, १९२६-१९२८
घारपुरे, जगन्नाथ रघुनाथ, १९२८
पाध्ये, (कै.) दामोदर गणेश, १९१७, १९१८, १९२२

महाराष्ट्र साहित्य पत्रिका-संपादक

काळे, के. नारायण, १९४०-४२
पटवर्धन, (कै.) माधव त्रिंबक, १९३६-३७
पोतदार, दत्तो वामन, १९३३-३६
शहाणे, मोहन ज्ञानेश्वर, १९३७-३९

खजिनदार

गाडगीळ, धनंजय रामचंद्र, १९३३-१९४२
पंडित, (कै.) भास्कर महादेव, १९१२, १९१५, १९१७, १९२२
मुळ्ये, विनायक कृष्ण, १९१७, १९१९, १९२२
रायकर, सुं. बा. १९२६, १९२८
वैद्य, सुंदरराव भास्कर, १९२६, १९२८, १९३१-३३

चिटणीस

आपटे, (कै.) वासुदेव गोविंद, १९०६, १९०७, १९०८, १९१२, १९१५
ओगले, केशव लक्ष्मण, १९२९-३१
उजगरे, (कै.) भास्कर कृष्ण, १९३५
कर्वे, चिंतामण गणेश, १९३६-७
काळे, के. नारायण, १९३५
काळे, द. गो. १९२८
कुलकर्णी, कृष्णाजी पांडुरंग, १९३१-३३
खाडिलकर, कृष्णाजी प्रभाकर, १९०६, १९०७, १९०८
जोशी, रघुवेल लुकस, १९३६-१९४२
तटणीस, रामचंद्र काशिनाथ १९२६
दाते, यशवंत रामकृष्ण, १९२६, १९२८
देसाई, राजाराम दामोदर, १९३३-३४
पटवर्धन, (कै.) माधव त्रिंबक १९३१-३३
पाटणकर, भालचंद्र लक्ष्मण, १९२६
पेंडसे, शंकर दामोदर, १९३५-३६
फाटक, नरहर रघुनाथ, १९२०, १९२२, १९२६, १९२८
बेहेरे, नारायण केशव, १९३७-१९३९
भानू, (कै.) चिंतामण गंगाधर, १९१७-१९२०
भालेराव, अमृत नारायण, १९४०-४२
भावे, (कै.) विनायक लक्ष्मण, १९०६, १९०७, १९०८
माकोडे, गोविंद बळवंत, १९२८
मोरमकर, (कै.) रामकृष्ण रघुनाथ, १९१२, १९१५, १९१७, १९२२
रायकर, (कै.) मा. वि., १९२३, १९२६, १९२८
वाडेकर, देविदास दत्तात्रेय, १९३३-३६

कार्यकारी मंडळाचे सदस्य

अभ्यंकर, (कै.) गणेश रघुनाथ, १९१७, १९२२
अळतेकर, माधव दामोदर, १९२२, १९२६, १९२८, १९३७-३९
आपटे, (कै.) गोविंद सदाशिव, १९१७
आपटे, दाजी नागेश, १९२२, १९२६, १९२८
आपटे, (कै.) वासुदेव गोविंद, १९१७, १९२२, १९२६, १९२८
उजगरे, (कै.) भास्कर कृष्ण, १९३३-३५
ओक, (कै.) गोविंद रामचंद्र, १९१३, १९१५
ओक, (कै.) जनार्दन विनायक, १९१७
ओक, दामोदर केशव, १९१८
ओगले, गोपाळ अनंत, १९२२
करंदीकर, (कै.) रघुनाथ पांडुरंग, १९१७
कर्वे, चिंतामण गणेश, १९३१-३६
कानेटकर, गंगाधर गोविंद, १९१७
काणे, (कै.) गोविंद नारायण, १९१७
काणे, पांडुरंग वामन १९१३, १९१५, १९१८, १९२२, १९२८
काळे, दत्तात्रय गोविंद, १९२६

काळे, के. नारायण, १९३३-३६, १९४०-१९४२
काळे, दिनकर विनायक १९४०-४२
किबे, सौ. कमळाबाई, १९२२, १९२६, १९२८
किबे, माधवराव विनायक, १९२६
कीर्तिकर, (कै.) रामराव बाळकृष्ण, १९१२, १९१५, १९२६
कुडाळकर (कै.) जनार्दन सखाराम, १९१७
कुलकर्णी, कृष्णाजी पांडुरंग, १९३३-३९
केळकर, सौ. गिरिजाबाई, १९१७, १९२६,
केळकर, नरसिंह चिंतामण, १९१२, १९१५, १९१७
कोरटकर, (कै.) केशवराव, १९१७, १९२६
कोलते, विष्णु भिकाजी, १९४०-४२
कोल्हटकर, (कै.) श्रीपाद कृष्ण, १९१२, १९१५, १९१७
कोल्हटकर, ग. त्र्यं., १९२८
खाडिलकर, कृष्णाजी प्रभाकर, १९२८
खेडकर, (कै.) आर. व्ही., १९१२, १९१५
गोखले, वासुदेव दामोदर, १९४०-४२
घाटे, विठ्ठल दत्तात्रेय, १९४०-४२
घारपुरे, जगन्नाथ रघुनाथ, १९१७, १९२२, १९२६
घैसास, शंकर गोपाळ, १९३१-३३
चापेकर, नारायण गोविंद, १९२६
चापेकर, (कै.) श्रीकृष्ण नीळकंठ, १९२२, १९२६, १९२८
चितळे, गणेश कृष्ण १९१२, १९१५
चौधरी, (कै.) तुकाराम जावजी, १९१२, १९१५
जोग, रामचंद्र श्रीपाद, १९४०-४२
जोशी, चिंतामण विनायक, १९२६, १९३५-३६
जोशी, (कै). पुरुषोत्तम बाळकृष्ण, १९२६
जोशी, मोरो विश्वनाथ, १९१२
जोशी, रघुवेल लुकस, १९३५-३६
जोशी, वामन मल्हार, १९२६, १९२८
जांभेकर, गणेश गंगाधर, १९६३-३९
तटणीस, रामचंद्र काशीनाथ, १९२८
दळवी, द. ग., १९२८
दामले, केशव गोविंद, १९१२
दामले, (कै.) मोरो केशव, १९१२
दाते, यशवंत रामकृष्ण, १९३७-१९४२
देव, लक्ष्मण बाळकृष्ण, १९२८
देवधर, (कै.) गोपाळ कृष्ण, १९१५
नाईक, वसंत नारायण, १९२८
पटवर्धन, (कै.) माधव त्रिंबक, १९२८, १९३७-१९३९
परांजपे, नारायण गणेश, १९२२
पाटणकर, निळकंठ पांडुरंग, १९११, १९१५, १९१७, १९२२, १९२६
पारसनीस, (कै.) दत्तात्रेय बळवंत, १९१२
पाध्ये, (कै.) दामोदर गणेश, १९१७, १९२८
पुणतांबेकर, अंबादास गोपाळ, १९२६
पोतदार, दत्तो वामन, १९२२, १९२६, १९२८, १९३३-३७
पंडित, (कै.) भास्कर महादेव १९१७,
पेंडसे, शंकर दामोदर, १९३३-३७
फणसे, केशव विश्वास, १९२२, १९२६
बेहेरे, नारायण केशव, १९१७, १९२२, १९२६, १९२८, १९३६-३९
बोडस, (कै.) महादेव राजाराम, १९२२, १९२८
भवाळकर, (कै.) नीळकंठ बळवंत, १९२२, १९२६, १९२८
भाटे, (कै.) ग. स., १९१७
भानू, (कै.) चिंतामण गंगाधर, १९१२, १९१५
भावे, (कै.) विनायक लक्ष्मण, १९०६, १९०७, १९१२
मराठे, माधवराव, १९१२
महाजनी, (कै.) रामचंद्र विष्णु, १९१२, १९१५, १९२२, १९२६, १९२८
माकोडे, गोविंद बळवंत, १९२६
मायदेव, वासुदेव गोविंद, १९२६, १९२८

माधळंकर, गणेश वासुदेव, १९२९
मित्र, (कै.) काशिनाथ रघुनाथ, १९१५
मुळे, वि. कृ. १९२६
यंदे, दामोदर सावळाराम, १९१२,१९१५, १९२२, १९२६, १९२८
रणसिंग, (कै.) रामचंद्र नरसिंह, १९१२, १९१५
लाड, ग. वि., १९२८
लिमये, कृष्णाजी गणेश, १९३७-१९४२
लिमये, (कै.) हरि गोविंद, १९१८
लेले, (कै.) लक्ष्मण गणेशशास्त्री, १९१२, १९१५
लेले, (कै.) विष्णु रघुनाथ, १९१२,१९१५
वझे, (कै.) कृष्णाजी विनायक, १९२८
वाकसकर, विनायक सदाशिव, १९२६
वाडेकर, देविदास दत्तात्रेय, १९३३-३७
वैद्य, नारायण कृष्ण, १९२२, १९२६
विंचूरकर, ना. ग., १९२६
शारंगपाणी, (कै.) कृ. वि., १९१७
शेख, अब्दुल कादर सर्फराज, १९२८
सरदेसाई, गोविंद सखाराम,१९१५,१९२२
सरवटे, विनायक सीताराम, १९२२,१९२६
साठे, (कै.) अच्युत सीताराम, १९१३, १९१५
सालोमन, इझिकेल, १९२८
सोमण, कृष्णाजी लक्ष्मण, १९१७

हिशेब तपासनीस

गोखले, महादव विष्णु, १९३९-४२
देशपांडे, दत्तात्रय दामोदर,१९३३-१९४१
परुळकर, जिवाजी कृष्ण, १९२२-१९३८
पंडित, (कै.) भास्कर महादेव,... ?
नेने, (कै.) यशवंत विष्णु, १९१५, १९१७

परिषदेचे पदाधिकारी (१९४३-४५)

अध्यक्ष
प्रा. वामन मल्हार जोशी

उपाध्यक्ष
म. म. पांडुरंग वामन काणे
प्रा. दत्तो वामन पोतदार.
श्री. नारायण गोविंद चापेकर
श्री. सरदार माधवराव विनायक किबे
श्री. भास्करराव विठोजीराव जाधव

कार्याध्यक्ष
रा. सा. रघुवेल लुकस जोशी

खजिनदार
प्रि. धनंजय रामचंद्र गाडगीळ

म. सा. पत्रिकेचे संपादक
प्रा. रामचंद्र श्रीपाद जोग

चिटणीस
श्री. के. नारायण काळे
श्री. वासुदेव दामोदर गोखले

कार्यकारी मंडळाचे सदस्य
श्री. विठ्ठल दत्तात्रेय घाटे
श्री. कृष्णाजी गणेश लिमये
डॉ. अमृत नारायण भालेराव
प्रा. श्रीनिवास नारायण बनहट्टी
प्रा. डॉ. नरहर काशिनाथ घारपुरे
प्रा. श्रीपाद रामचंद्र पारसनीस
श्री. गंगाधर माऊराव निरंतर

परिशिष्ट २० वें

म. सा. परिषद्-सभासद

सालवार कोष्टक

[खुलासाः— इ. स. १९०६ ते १९३२ अखेरचे आंकडे परिषदेच्या दप्तरांत मिळालेले नाहीत ते संपादकाने इतर साधनांचे आधारें शोधून नोंदले आहेत. १९३३ पासूनचे आंकडे म. सा. परिषदेच्या कचेरीकडून आले तसे दिले आहेत. परिषदेकडून आलेले आंकडे त्या त्या वेळच्या म. सा. परिषदेच्या ठरलेल्या सालअखेरीचे आहेत. म. सा. परिषदेची वर्ष-गणना १९१२ किंवा २७ पर्यंतच्या घटनेंत नमूदच नाहीं! वाटतें की प्रथमपासून वर्ष एप्रिल ते मार्च असेंच असावें. इ. स. १९२७ च्या घटनापत्रकांत तें असेंच नमूद आहे. इ. स. १९२८ च्या घटनापत्रकांत वर्षगणना जानेवारी-डिसेंबर याप्रमाणे होती. इ. स. १९३३ च्या घटनेंत एप्रिल-मार्चचेंच वर्ष दिलेलें आहे. १९३७ पासून तो नियम बदलून वर्ष पुनः जानेवारी-डिसेंबरचें झालें.

वर्ष	तहहयात व त्या वर्गावरील सभासद	साधारण सभासद	एकूण संख्या
१९०६	...	६०	६०
१९०७	...	७०	७०
१९०८	...	९०	९०
१९०९	...	९५	९५
१९१२	...	७५	७५
१९२०	१२	१००	११२
१९२२	१२	११२+९६	२२०
१९३१	३४	२२९	२६३
१९३२	३५	२४३	२७८
१९३३–३४	१०४	२५९	३६३
१९३४–३५	१०९	२२६	३३५
१९३५–३६	९६	२२३	३१९
१९३६–३७	९५	३३३	४२८
१९३७	१००	५१८	६१८
१९३८	१३४	६६१	७९५
१९३९	१३८	७८९	९२७
१९४०	१४२	८१०	९५२
१९४१	१९३	७४०	९३३
१९४२	२०४	६५५	८५९

म. सा. परिषद् सभासद
(जुलै १९४२) गटवार तपशील

(१) मुंबईः—	तहा.	३०	+ साधारण ४९ = ७९
(२) मुंबई उपनगरः—	साहाय्यक	१	
	हितचिंतक	१	+ साधारण ३७ = ५०
	तहाहयात	११	
		१३	
(३) पुणें व भोरः—	आश्रयदाते	१	
	हितचिंतक	६	+ साधारण १७७=२३१
	तहाहयात	४७	
		५४	
(४) सातारा + औंध + फलटणः—	आश्रयदाते	१	
	साहाय्यक	१	
	हितचिंतक	१	+ साधारण १६ = २१
	तहाहयात	२	
		५	
(५) अहमदनगरः—	तहाहयात	४	+ साधारण ८ = १२
(६) नाशिकः—	...	...	+ साधारण ९ = ९
(७) पूर्व खानदेशः—	तहाहयात	१	+ साधारण ४ = ५
(८) पश्चिम खानदेशः—	तहाहयात	१	+ साधारण ९ = १०
(९) सोलापूर + अक्कलकोट + मुधोळः—	तहाहयात	१	+ साधारण ६३ = ६४
(१०) ठाणें + जव्हारः—	हितचिंतक	१	
	तहाहयात	५	+ साधारण १३ = १९
		६	
(११) कुलाबा + जंजिराः—	हितचिंतक	१	+ साधारण ६ = ७
(१२) रत्नागिरीः—	...	...	+ साधारण ७ = ७
(१३) बेळगांव + कारवार + सावंतवाडीः—	तहाहयात	३	+ साधारण १६ = १९
(१४) धारवाड + विजापूर + जतः—	तहाहयात	२	+ साधारण ११ = १३
(१५) अकोलाः—	....	..	+ साधारण १ = १
(१६) यवतमाळ			
(१७) बुलढाणाः—	तहाहयात	१	+ साधारण ० = १
(१८) उमरावतीः—	तहाहयात	१	+ साधारण ३ = ४
(१९) मध्यप्रांत शाखा सभाः—	हितचिंतक	१	
	तहाहयात	१६	+ साधारण १८ = ३५
		१७	
(२०) मराठवाडाः—	हितचिंतक	१	+ साधारण १३ = १४
(२१) हैदराबादनिजाम + संस्थान उर्वरितः-	तहाहयात	९	+ साधारण २७ = ३६

(२२) कोल्हापूरः—

(२३) दक्षिणी संस्थान साहित्य सभाः—
(सांगली + मिरज + बुधगांव +
जमखंडी + कुरुंदवाड)

(२४) गोमंतकः—

(२५) बडोदेः—

(२६) गुजराथ + काठेवाडः—

(२७) सिंधः—

(२८) इंदूरः—

(२९) ग्वालेर + धार देवास राजपुताना

(३०) बंगाल + बिहार + उत्कल + अस

(३१) दिल्ली + पंजाब + वायव्यसीमाः—

(३२) मद्रास + म्हैसूर + कूर्ग + कोचीन

(३३) संयुक्त प्रांतः —

(३४) परदेशः—

आश्रय० + हि० +

वरील कोष्टकें विचार करणारांस अति
असतात याचा उत्कृष्ट अनुभव येईल. सभा
कष्टणारा रा. सा. र. लुः जोशांसारखा चिट
एवढेंच सुचविणें अवश्य वाटतें की आजच
गणी पाहतां त्यांत मोठीच विषमता आढळून
२८, आणि मुंबई व उपनगर मिळून सुमारें
प्रमाण ४३ टके पडलें आहे. खानदेश-वऱ्हा
नगर, रत्नागिरी प्रभृति ठिकाणीं संमेलनें भ
नांवालाच एखादा सभासद आढळतो ! अ
या ग्रंथाच्या मर्यादेपलीकडील आहे आणि
समर्थ आहेत.

आश्रयदाते १ तहाहयात १२		+ साधारण २४ = ३७
१३		
तहाहयात ७		+ साधारण ४३ = ५०
		+ साधारण १३ = १३
हितचिंतक १ तहाहयात ५		+ साधारण १५ = २१
६		
तहाहयात २		+ साधारण १५ = १७
		+ साधारण १ = १
उपकर्ते १ आश्रयदाते १ हितचिंतक ३ तहाहयात २		+ साधारण १२ = १९
७		

+ मध्यहिंदुस्तानः—

तहाहयात ४		+ साधारण १४ = १८

म + नेपाळः—

तहाहयात २		+ साधारण ३ = ५
— तहाहयात २		+ ,, १ = ३
न + त्रावणकोरः—		+ साधारण २ = २
		+ साधारण ५ = ५
		+ साधारण ५ = ५

सा० + तहा० १९३ + साधारण६४०=८३३

शय उपयोगी पडतील आणि आंकडे किती बोलके सदांची संख्या वाढली आणि एतदर्थ कळकळीने णीस लामला हा संतोषजनक इतिहास सांगतांना ्या परिषदेच्या सभासदसंख्येची प्रादेशिक विभा- येते. पुणें गटाच्या सभासदांचें प्रमाण सुमारें शेकडा १५-५ प्रमाण पडतें. म्हणजे पुणें मुंबई विभागाचेंच ड इकडे परिषदेचा प्रभाव फारच दुर्बलसा दिसतो. रूनहि प्रमाण किती अल्प येतें ! कांही विभागांत शा या आंकड्यांवरून निघणारा सर्व निष्कर्ष सांगणें समंजस वाचक तो निष्कर्ष स्वतःच काढण्यास

परिशिष्ट २१ वें

महाराष्ट्र साहित्य परिषद्— शकावलि

इ. स. १९०६ — म. सा. परिषद्-स्थापना (रविवार, ता. २७ मे समजावी.) व्यवहारस्थळ पुणें. (साधनविभाग, परि ४, पृ. १७.)

इ. स. १९१० — मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १० वा, वि. का. राजवाडे संपादित, म. सा. प.ने प्रकाशित केला.

इ. स. १९१२ — म. सा. परिषदेचे नियम पक्के झाले (अकोला संमेलन).

इ. स. १९१३ — म. सा. पत्रिका 'विविधज्ञानविस्तारा'स जोडून निघूं लागली.

इ. स. १९१७ — म. सा. परिषदेस **श्रीमंत महाराज सवाई तुकोजीराव होळकर** यांनी दहा हजार रुपयांची देणगी जाहीर केली (इंदूर संमेलन).

इ. स. १९१८ (ता. २३ डिसेंबर) — वरील रु. दहा हजारांच्या देणगीच्या विनियोगासाठी म. सा.परिषद् ट्रस्ट करून ट्रस्टडीड (निधिपत्र) नोंदलें. (निधिपत्र— पत्रिका, वर्ष ६, अं. २, पृ. ४०.)

इ. स. १९२८ — म. सा. पत्रिका स्वतंत्रपणें निघूं लागली.

इ. स. १९३३ — कचेरी पुण्यास कायम झाली.

इ.स.१९३५ (ता.२८ ऑक्टोबर) — **रा.ब. दामोदर गणेश पाध्ये** यांच्या हस्तें म. सा. परिषदेच्या मंदिराचा पाया घातला.(पत्रिका, व.८, अं.३ पृ.९१)

इ. स. १९३६ — पुण्यांत टिळक रस्त्यावर पंतांच्या गोटांतील जागा **श्रीमंत राजे बाळासाहेब पंतप्रतिनिधि, अधिपति औंध,** यांजकडून नाममात्र भाड्याच्या करारावर (ता. २४ मे १९३६) घेतली. करार ता.६ जुलै १९३६ दिवशीं नोंदला. (करार— पत्रिका, वर्ष ९, अं. १-२, पृ. ५७.)

इ. स. १९३६ (२५,२६डिसेंबर) — पहिली मराठी व्याकरण परिषद् म. सा. परिषदेने भरविली.

इ. स. १९३७ (ता. ७ फेब्रुवारी) — या जागेवरील संकल्पित मंदिराच्या प्रथम विभागाचें उद्घाटन **श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे,** इचलकरंजी, यांच्या हस्तें झालें. (पत्रिका वर्ष १०, अं. १, पृ. १८.)

इ. स. १९४१ (ता. ११ एप्रिल) — श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे यांनी रु.२०००चे कर्जरोखे परिषदेच्या नांवें करून दिले.

इ. स. १९४१ (ता.२९ नोव्हेंबर) — माधवराव पटवर्धन स्मारक समितीच्या साहाय्याने तयार झालेल्या आणि परिषदेच्या मालकीच्या 'माधवराव पटवर्धन साहित्य मंदिरा'चा पाया **श्री. नरसिंह चिंतामण केळकर** याच्या हस्तें घातला.

इ. स. १९४२ (ता.३० नोव्हेंबर) — 'माधवराव पटवर्धन साहित्य मंदिरा'चें उद्घाटन **श्रीमंत मेजर मालोजीराजे नाईक निंबाळकर,** अधिपति फलटण, यांच्या हस्तें झालें. (पत्रिका वर्ष १६, अं.१, पृ.९८.)

[परिशिष्ट ८ वें, संमेलन-अधिवेशनें, परिशिष्ट २० वें, पदाधिकारी, आणि परिशिष्ट २२ वें, विविध समित्या पाहा.]

परिशिष्ट २२ वें

विविध समित्या

[परिषद् आणि संमेलन उभयतांनीहि विविध कार्यासाठी वेळोवेळीं लहानमोठ्या समित्या नेमलेल्या आढळतात. कार्याच्या महत्त्वाच्या दृष्टीने असल्या समित्या समान तोलाच्याच असतात असें नाही. कित्येक समित्यांचा, त्या महत्त्वाच्या असून द्रव्याभावीं किंवा इतर अडचणीमुळे संकल्प मात्र सुटतो, पण त्या जन्माला येण्यापूर्वीच मरून जातात! कांहींचें मात्र प्राथमिक काम जोरास लागतें पण त्यापुढील कार्य कांहीच निष्पन्न होत नाही. ज्या समित्यांचीं कामें होऊन येतात त्यांतील परिश्रमी सभासदांचें कौतुकच केलें पाहिजे. अशा महत्त्वाच्या समित्यांचे अहवाल किंवा निर्णय म. सा. पत्रिकेतून प्रसिद्धहि होत असतात.

अशा ज्या निवडक व महत्त्वाच्या १३ समित्या आढळल्या त्यांची नोंद व संदर्भ या परिशिष्टांत दिले आहेत. शिवाय समितिसभासदांचीं नांवेंहि दिलीं आहेत. हें परिशिष्ट संपादकांच्या देखरेखीखाली परिषदेचे कारकून रा. देसवंडीकर यांनी तयार केलें आहे.]

शुद्धलेखनमंडळ

स्थापना— वर्गीकृत ठराव ६१ प्रमाणे.

सभासद— १ श्री. ना. गो. चापेकर (अध्यक्ष), २ श्री. चिं. वि. वैद्य, ३ श्री. रा. दा. देसाई, ४ श्री. कृ. पां. कुलकर्णी (चिटणीस), ५ श्री. न. चिं. केळकर, ६ श्री. ना. दा. बनहट्टी, ७ प्रा. ब. ग. खापर्डे.

प्रसिद्धि— समिति वृत्तान्त व निर्णय– म. सा. पत्रिका व.३, अं.२, पृ.१८७...

निकाल— वर्गीकृत ठराव ५९ पाहा.

अभ्यासक्रममंडळ

स्थापना— वर्गीकृत ठराव ९८ प्रमाणे.

सभासद— १ श्री. ना. गो. चापेकर (अध्यक्ष), २ प्रा. द. वा. पोतदार, ३ प्रा. वा. म. जोशी, ४ प्रा. ब. ग. खापर्डे, ५ श्री. मा. रा. ओक, ६ प्रा. शं. दा. पेंडसे (आमंत्रक), ७ श्री. ग. गं. जांभेकर.

प्रसिद्धि— म. सा. पत्रिका व. ५, अं. २-३, पृ.१४७ (समितीचा प्राथमिक अहवाल); म. सा. पत्रिका व.७, अं.४, पृ.३७६... (अहवालाची पुरवणी).

निकाल— * * *

पुनर्घटनासमिति

स्थापना—म.सा.परिषदेच्या विशेष साधारण सभेतील ठरावाप्रमाणें (२७-३-१९३२).

सभासद— १ प्रा. मा. दा. अळतेकर, २ श्री. जि. कृ. परुळकर, ३ श्री. स. रा. खांदेवाले, ४ श्री. य. रा. दाते, ५ श्री. श्री. म. वर्दे, ६ डॉ. कुरुळकर, ७ श्री. सुं. मा. वैद्य, ८ रा. ब. दा. ग. पाध्ये, ९ श्री. न. र. फाटक, १० श्री. ग. गं. जांभेकर, ११ श्री. न. चिं. केळकर, १२ श्री. के. ल. ओगले, १३ श्री. पां. वा. काणे, १४ श्री. ब. स. राऊत, १५ श्री. चिं. ग. कर्वे, १६ श्री. कृ. पां. कुलकर्णी, १७ प्रा. मा. त्र्यं. पटवर्धन, १८ श्रीमंत मा. वि. किबे, १९ श्री. ना. गो. चापेकर, २० प्रि. ध. रा. गाडगीळ,

२१ प्रा. दे. द. वाडेकर, २२ श्री. रा. ग. हर्षे, २३ श्री. गं. दे. खानोलकर, २४ श्री. के. ना. काळे. (शेवटचे पांच सभासद ता. १३-११-३२ च्या सभेंत स्वीकृत करण्यांत आले.)

प्रसिद्धि— वृत्तांत– म. सा. पत्रिका व.५, अं.२-३, पृ.१६९.
वृत्तांत व अहवाल– म. सा. पत्रिका व.५, अं.४ (पुरवणी).

निकाल— परिषद साधारण सभेचें (ता. २७, २८ डिसेंबर १९३२) वृत्त पाहा. (म. सा. पत्रिका, व. ५, अं. ४, पृ. ७५-८१)

व्याकरणसमिति

स्थापना— वर्गीकृत ठराव ६४ प्रमाणे.

सभासद— १ श्री. य. रा. दाते (कार्यवाह), २ श्री. कृ. पां. कुळकर्णी, ३ श्री. गो. पां. पावशे, ४ श्री. ना. गो. चापेकर (अध्यक्ष), ५ श्री. वा. कृ. भावे, ६ श्री. रा. दा. देसाई, ७ श्री. दि. धों. परांजपे.

प्रसिद्धि— अहवाल व निर्णय– म. सा. पत्रिका, व.७, अं.५, पृ.४२८...
अखेरचे निर्णय– म. सा. पत्रिका, व.९, अं.३, पृ.१०३...

निकाल— साधारण सभेची (७ एप्रिल ३९) मान्यता (पत्रिका वर्ष १२, अंक ५, पृ. १२१)

परिषद्-संमेलन-समिति

स्थापना— वर्गीकृत ठराव १५ यास अनुलक्षून कार्य. मं. च्या ता.२८ जानेवारी १९३४ च्या ठरावाप्रमाणे; पुढे काम चालू कार्यकारी मंडळाच्या सभेंतील (ता.२०-१-३५) ठरावाप्रमाणें.

सभासद— १ प्रि. ध. रा. गाडगीळ (अध्यक्ष), २ प्रा. द. वा. पोतदार, ३ डॉ. शं. पु. आघारकर, ४ प्रा. चिं. वि. जोशी, ५ श्री. य. खु. देशपांडे, ६ प्रा. शं. दा. पेंडसें, ७ श्री. मा. रा. पटवर्धन, ८ श्री. के. ना. काळे, ९ प्रा. दे. द. वाडेकर (चिटणीस), १० श्री. वि. सी. सरवटे.

प्रसिद्धि— समिति वृत्तान्त व शिफारशी– म. सा. पत्रिका, व.७, अं.४, पृ.३५९. उर्वरित शिफारशी– म. सा. पत्रिका, व.८, अं.४, पृ. ७८२.

निकाल— साधारण सभेच्या (ता. ९ नोव्हेंबर १९३६) ठरावाप्रमाणें दप्तरी दाखल (पत्रिका वर्ष ९, अंक ४, पृ. ३३)

लिपिसमिति

स्थापना— वर्गीकृत ठराव ६७ यास अनुलक्षून कार्यकारी मं.ची सभा ता.११ मार्च १९३५ च्या ठरावाप्रमाणे; तसेंच वर्गीकृत ठराव ६९ प्रमाणे.

सभासद— १ प्रि. ज. र. घारपुरे, २ श्री. वा. वि. जोशी, ३ प्रा. मा. त्र्यं. पटवर्धन, ४ श्री. य. रा. दाते (चिटणीस), ५ प्रा. ना. के. भागवत, ६ प्रा. धर्मानंद कोसंबी, ७ श्री. आचार्य, ८ श्री. काका कालेलकर.

प्रसिद्धि— निर्णय प्रसिद्धि– म. सा. पत्रिका, व.९, अं.३, पृ.१०१.

निकाल— साधारण सभेची (७ एप्रिल १९३९) मान्यता (पत्रिका वर्ष १२, अंक ५, पृ.१२१)

वाङ्मयनिर्बंधनिवारक समिति

स्थापना-- वर्गीकृत ठराव १४४ प्रमाणे.

सभासद— १ श्री. वि. रा. शिंदे (अध्यक्ष), २ प्रि. ध. रा. गाडगीळ, ३ श्री. पां. वा. काणे, ४ श्री. न. चिं. केळकर, ५ डॉ. गो. स. घुर्ये, ६ प्रा. ना. के. बेहेरे, ७ श्री. य. रा. दाते (चिटणीस).

प्रसिद्धि-- अहवाल- म. सा. पत्रिका, व.९, अं.३, पृ.११३...

निकाल * * *

कोकणी-अहिराणी-समिति

स्थापना— वर्गीकृत ठराव २१७ यास अनुलक्षून.

सभासद-- १ प्रा. कृ. पां. कुलकर्णी, २ श्री. वि. ह. निजसुरे, ३ श्री. चिं. ग. कर्वे, ४ श्री. ना. गो. चापेकर.

प्रसिद्धि-- अहवाल- म. सा. पत्रिका, व.११, अं.३, पुरवणी.

निकाल—साधा. समेची (७ एप्रिल १९३९) मान्यता (पत्रिका वर्ष १२, अंक ५ पृ. १२१)

शिवाय वर्गी ठ. ३४२ प्रमाणे स्थापन झालेल्या समितीने तयार केलेलें निवेदन पत्र पत्रिका (अंक ६१ सोबत पाठविलेलें) पाहावें.

परीक्षा समिति

स्थापना— कार्यकारी मंडळाची सभा ता. १७-९-१९३४.

सभासद— १ प्रि. ध. रा. गाडगीळ (अध्यक्ष), २ प्रा. द. वा. पोतदार, ३ श्री. रा. दा. देसाई (चिटणीस), ४ श्री. के. ना. काळे.

प्रसिद्धि— अहवाल व शिफारशी- म. सा. पत्रिका, व.७, अं.४, पृ.३७२...

निकाल— अहवाल व शिफारसी मान्य करून ता. २७-१२-३४ च्या साधारण समेच्या ठरावास अनुलक्षून कार्यकारी मंडळानें दुसरी परीक्षासमिति नेमली (कार्य. मंडळ, ता. २०-१-१९३५).

परीक्षा समिति

स्थापना— कार्यकारी मंडळ सभा २० जानेवारी १९३५

सभासद— १ श्री. रा. दा. देसाई (अध्यक्ष), २ प्रि. ध. रा. गाडगीळ, ३ श्री. कृ. पां. कुलकर्णी, ४ श्री. चिं. ग. कर्वे (चिटणीस).

प्रसिद्धि— अभ्यासक्रम व योजना- म. सा. पत्रिका वर्ष ९, अंक १-२, पृ. २८*

निर्णय— योजनेप्रमाणे परीक्षा सालोसाल घेतल्या जातात.

परीषद्घटनासमिति

स्थापना — ता. १५ जानेवारी १९३६ दिवशी भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या ठरावाप्रमाणे

* परीक्षांचा त्रैवार्षिक अभ्यासक्रम, नियम वगैरे ज्यांत प्रसिद्ध झाले ते म. सा. पत्रिकेचे अंक : वर्ष ११ अंक २ पृ. १२१, वर्ष १३ अंक १ पृ. ७४, वर्ष १५ अंक ४ पृ. ४२७.

सभासद— १ प्रि. ध. रा. गाडगीळ (अध्यक्ष), २ प्रा. द. वा. पोतदार, ३ डॉ. शं. पु. आघारकर, ४ प्रा. चिं. वि. जोशी, ५ श्री. म. खु. देशपांडे, ६ प्रा. शं. दा. पेंडसे, ७ श्री. मा. रा. पटवर्धन, ८ श्री. के. ना. काळे, ९ रा. सा. र. लु. जोशी, १० श्री. पां. वा. काणे, ११ श्री. द. अ. तुळजापुरकर, १२ श्री. श्री. म. वर्दे, १३ श्री. य. रा. दाते,

प्रसिद्धि— म. सा. पत्रिका वर्ष ९, अंक ३, पृ. १२३ ते १३७.

निकाल— अहवाल मान्य होऊन त्याप्रमाणे दुरुस्त घटना ता. १ जानेवारी १९३७ पासून अंमलांत आणावी असें ता. ९ नोव्हेंबर १९३६ दिवशीं जळगांवी भरलेल्या साधारण सभेने ठरविलें. (शिवाय वर्गीकृत ठराव २२ पाहा)

मराठी-व्याकरण-समिति

स्थापना— म. सा. परिषदेने भरविलेल्या मराठी-व्याकरण-परिषदेंतील ठरावाप्रमाणे (ता. २६ डिसेंबर १९३६).

सभासद— १ वे. शा. सं. रंगाचार्य रड्डी (अध्यक्ष), २ प्रा. कृ. पां. कुलकर्णी, ३ डॉ. प. ल. वैद्य, ४ डॉ. वा. गो. परांजपे, (चिटणीस), ५ प्रा. ग. ह. केळकर, ७ श्री. य. ग. फके, ८ श्री. गो. कृ. मोडक, ९ श्री रा. दा. देसाई (चिटणीस), १० श्री. नी. शं. नवरे, ११ श्री. ब. रा. दाते, १२ श्री. चिं. ग. कर्वे, १३ श्री. ना. गो. चापेकर, १४ डॉ. शं. दा. पेंडसे, १५ प्रा. गो. प. पटवर्धन, १६ श्री. बा. मा. खुपेरकर, १७ प्रा. वा. मा. पाठक, १८ श्री. वि. ह. निजसुरे, १९ श्री. गो. ग. निजसुरे, २० श्री. अ. बा. रसाळ, २१ डॉ. एस्. एम्. कत्रे, २२ श्री. ह. ना. नेने, २३ प्रा. रा. श्री. जोग.

प्रसिद्धि— समितिवृत्तान्त (ता. १-८-३७ ते ९ २-४१)—म. सा. पत्रिका व. १४, अं. २ पृ. ९६..., समितिवृत्तान्त (१९४१)—म. सा. पत्रिका व. १५, अं. २, पृ. २१७...

परिभाषा-चर्चा-मंडळ

स्थापना— कार्यकारी मंडळाची सभा ता. १ जानेवारी १९४०.

सभासद— १ प्रा. श्री. ल. आजरेकर, २ डॉ. दि. धों. परांजपे, ३ प्रा. द. बा. लिमये, ४ प्रा. स. वि. आपटे, ५ श्री. त्र्यं. गो. ढवळे. (कार्यवाह)

प्रसिद्धि— म. सा. पत्रिका व. १४, अं. २, पृ. ९१ (१९४० चें अितिवृत्त), म. सा. पत्रिका व. १४, अं. ३, पृ. ३७ (औद्भिदशास्त्र-परिभाषा), म. सा. पत्रिका व. १५, अं. २, पृ. १४२ (सभाकार्यविषयक परिभाषा) व पृ. २१८ (१९४१ चें इतिवृत्त).

याशिवाय म. शा. परिभाषामंडळातर्फे तयार केलेली परिभाषा म. सा. पत्रिकेच्या खालील अंकांतून प्रसिद्ध झालेली आहेः—

व. ३, अं. २, पृ. १३५ (प्रकाश); व. ३, अं. ३, पृ. २४३ (रसायन); व. ३, अं. ४, पृ. ३९७ (वैजिक); व. ४, अं. १-२, पृ. २६ (रसायन प्रकरण चालू); व. ५, अं. १, पृ. २५ (भौमिक); व. ६, अंक १, पृ. ११ (भूमिति); व. ७, अं. ३, पृ. ११९, (संवाद, ध्वनि); व. ८, अं. ३, पृ. ७३१ (शारीर, ऐंद्रिय, सौतिक); व. ११, अं. १, पृ. ४३ (तर्कशास्त्र); व. १२, अं. २, पृ. ३१ (आंतरिक्ष).

['माधवराव पटवर्धन स्मारक समिती'ची स्थापना स्वतंत्रपणें झाली असल्यानें तिची नोंद अनुक्रमणिकेवरून पाहावी.]

परिशिष्ट २३ वें

महाराष्ट्र साहित्य परिषद्– आर्थिक परिस्थिति

(१) इ. स. १९०६-१९१२ :—या वर्षांतील हिशेब उपलब्ध झाले नाहीत, आणि त्या वेळचें दप्तरहि कोठे उपलब्ध नाही किंवा होण्याचा कांही संभव दिसत नाही. या काळांतील शिल्लक रु. ७१ पुढील शिलकेंत जमा झाल्याची नोंद १९२० अखेर अहवालांत पृ.९ कलम ७ मध्यें आढळते.

(२) इ. स. १९१३-१९२५ :—'म. सा. परिषदेची हकीगत— स्थापनेपासून सन १९२० अखेर' परिशिष्ट अ या नांवाने परिषदेचा '१९२१–१९२५ अखेरचा अहवाल' चिटणिसांनी प्रसिद्ध केला आहे. वरील 'परिशिष्ट अ' ला 'म. सा. परिषदेच्या जमा-खर्चाचा आढावा' म्हणून 'परिशिष्ट अ-१', 'परिशिष्ट अ-२', 'परिशिष्ट आ' आणि 'परिशिष्ट इ' अशीं चार परिशिष्टें जोडलीं आहेत. या परिशिष्टांत अनुक्रमें १९१३-१५ मे अखेर, २० मे १९१५ पासून ६ मार्च १९१७ पर्यंतचा हिशेब, 'मार्च १९१७ पासून १९१८ अखेरचा हिशेब' आणि 'जानेवारी १९१९ ते डिसेंबर १९२० अखेर दोन सालांचा हिशेब' असे हिशेब दिले आहेत. या हिशेबांत ट्रस्टडीड, वॉरबांड खरेदी आणि ट्रस्टींकडे १९२० साल-अखेर असलेला निधि नोंदला आहे. हा प्रसिद्ध झालेला असा **ट्रस्टींचा पहिला हिशेब** म्हणावयाचा. प्रारंभींच्या काळीं परिषदेची सुमारें ६०० रु.ची शिल्लक 'बॉंबे बँकिंग कंपनी'त होती. पण कंपनीचें दिवाळें निघाल्यामुळे अखेर रुपयांत सात आणे वसूल हातीं आला ! १९१३ पासून १९१७ पर्यंत सालिना सुमारें २००।२५० रु. सभासदवर्गणी जमा आणि अकोला व मुंबई संमेलन रिपोर्टांची छपाई व म. सा. पत्रिकेचा थोडा खर्च एवढेच सांगण्याजोगे खर्च होते.

१९१७-१८– सभासद वर्गणी ७४४ रु., ग्रंथप्रकाशन फंड रु. ५८९, इंदूर संमेलन देणगी रु. ३०० आणि या सर्वांवर कळस म्हणून श्रीमन्महाराज होळकर सरकार यांची देणगी रु. दहा हजार अशी प्राप्ति शिगेला गेली. परिषद् नोंदविणें, ट्रस्ट स्थापना हे नवे खर्च झाले ! 'परिशिष्ट इ' पाहतां १९१९-२० या दोन सालांत सभासद वर्गणी **अवघी रु. १३** आली ! केवळ युद्धपरिस्थितीकडे बोट करून या आंकड्यांची कथा उडवून लावतां येणार नाही ! परिषदेच्या तत्कालीन अधिकारी मंडळाचे प्रमुखच या परिस्थितीस जबाबदार आहेत आणि १९२१ च्या बडोदें संमे-

लनांत जनमताचा जो प्रक्षोभ झाला त्याचें बीजहि या परिस्थितींतच आहे. असा हा आंकडा बोलका आहे! याच परिस्थितीचा परिणाम होऊन हीं परिशिष्टें, हिशेब व अहवाल **प्रथमच प्रसिद्ध** झाले!

या हकीगतीस व परिशिष्टांस जोडूनच परिषद् **ट्रस्टफंडाचे** १९२१-२५ चे हिशेब आणि म. सा. **परिषदेचे** जुलै १९२२ ते १९२५ डिसेंबर अखेरचे हिशेब प्रसिद्ध झाले! दुर्दैवाने परिषदेचे आस्थेवाईक चिटणीस रा. सा. मोरमकर हे १९२३ त कालवश झाले; आणि बहुशः याच कारणामुळें '...ची शिल्लक कशा रीतीने येते हें समजण्यास **हिशेबाच्या वह्यांचे अभावीं** मार्ग नाही!!' असा शेरा या हिशेबांत आढळतो. आणखी एक गोष्ट येथे नमूद करणें अवश्य वाटतें. 'परिषदेच्या ऑफिसाची नांवाची पाटी', 'म. सा. पत्रिका छापण्याबद्दल'चा खर्च, असले खर्च ट्रस्टफंडाच्या हिशेबांतच समाविष्ट आहेत.

(३) इ. स. १९२६-१९३१ :— 'पुनर्घटना समिती'चा वृत्तान्त (म. सा. पत्रिका, वर्ष ५, अंक २ व ३, इ. स. १९३२) पाहिला असतां सर्व उलगडा होईल. पुण्यांत कचेरी नेण्याचा एक मुद्दा मुळाशीं होता. वर्तमानपत्रांत या संबंधाने खूप उलटसुलट पत्रव्यवहार झाला. डिसेंबर १९२६ चे व इ. स. १९२७ ते १९३१ ह्या पांच वर्षांचे **ट्रस्टफंडाचे** हिशेब या कमिटीच्या पत्रिकेच्या वरील अंकांत प्रसिद्ध झालेल्या अहवालांत परिशिष्ट २ मध्ये छापलेले आहेत. पुनर्घटना समितीचें काम पुनः पुढे चाललें. पहिला प्रसिद्ध झाला तो 'वृत्तांत' व दुसरा प्रसिद्ध झाला तो पु. क. चा 'वृत्तांत व अहवाल' या नांवाचा. या वृत्तान्ताचा आणि वृत्तान्त व अहवालाचा विचार कोल्हापूर संमेलनप्रसंगीं म. सा. परिषदेच्या साधारण सभेंत झाला आणि १९२६ ते १९३१ अखेरचे ट्रस्टी हिशेब वगळून बाकीचे पुरे झाले व मे १९३१ अखेर शिल्लक कांही नाही असें समजावें असें ठरलें. (म. सा. पत्रिका वर्ष ५ अंक ४ ला जोडलेला पु. क. चा वृत्तांत व अहवाल आणि परिषद्वार्ता पृ. ७६-७८).

(४) इ. स. १९३१-१९४२:— ३१ डिसेंबर १९३१ ते मार्च १९३४ पर्यंतचा **ट्रस्टफंडाचा हिशेब** म. सा. पत्रिका वर्ष ७ अंक ४ (आक्टो. १९३४) यांत प्रसिद्ध झाला असून त्यापुढे **ट्रस्टफंडाचे** हिशेब पुढील अनुक्रमाने छापले गेले आहेतः- म. सा.प. वर्ष ८ अंक ३ मध्ये १ एप्रिल १९३४ ते ३१ मार्च १९३५ पर्यंतचे; म. सा. प. वर्ष ९, अं.४ मध्ये १९३५-३९ चा;

म. सा. प. वर्ष १२, अं. ६ यांत १ एप्रिल १९३६ ते ३१ डिसेंबर १९३८ म्हणजे एकूण पावणेतीन वर्षांचा; म. सा. प. वर्ष १३, अंक ३ यांत इ. स. १९३९ चा, म. सा. प. वर्ष १५, अं. २ यांत इ. स. १९४० व १९४१ चा.

(५) इ. स. १९३४-३५ च्या ट्रस्टफंड हिशेबाचे वेळीं एक मोठा आणीबाणीचा वाद निघाला आणि प्रकरण कोर्टापर्यंत जाईल कीं काय अशी स्पष्ट भीति उद्भवली. परिषदेची इमारत व्हावी म्हणून कार्यकारी मंडळाने नागपूर संमेलनाचे भर बैठकींत आंकडे घेतले आणि अशी जमलेली रक्कम ट्रस्टीकडे न भरतां खजिनदारांजवळच राहूं दिली. मात्र ट्रस्टवरील सालिना व्याजाची मागणी ट्रस्टीकडे चालूच ठेविली. ट्रस्टी व कार्यकारी मंडळ यांच्यांत बेबनाव उद्भवला आणि ट्रस्टींनी निराळें पत्रक छापून काढून त्यावरून सभासदांचा कौल अजमावण्याचा प्रयत्न केला. परंतु परस्परांत विचारविनिमय होऊन एकमेकांचे संशय फिटले आणि एकमताने तडजोडीचीं कलमें [नवी म. सा. पत्रिका वर्ष ८/३ तळ पृ. ६८७ ते ६८९] ठरलीं! ट्रस्टींच्या सचोटीवर कोणाचाच अविश्वास नव्हता आणि ट्रस्टफंडाचे हिशेब प्रसिद्ध होऊं लागले तेव्हा जनतेची खातरजमा झाली की, ट्रस्टी निधिसंरक्षणाचें काम चोखपणें करीत आले आहेत. थोड्या दिवसांपूर्वी ट्रस्टींपैकी प्रमुख रा. ब. पाध्ये हे दिवंगत झाले आणि पुढील सर्व मांडणी यापुढे व्हावयाची असल्याने येथे हा विषय इतक्यावरच संपविणें इष्ट होईल.

(६) ट्रस्टफंडाचा १९४१ चा जो हिशेब म. सा. पत्रिका, अंक ६२ मध्ये प्रसिद्ध झाला आहे त्यावरून निघणारे ठोकळ आंकडे येणेंप्रमाणेः—

बॉंबे म्यु. डिबेंचर (चारटक्के)	–	५००
सेंट्रल प्रॉ. रेल्वे शेअर	–	२३००
तापी व्हॅली ,, ,,	–	१५००
गव्हर्मेंट पेपर (पांच टक्के)	–	११०००
,, ,, (साडेतीन टक्के)	–	७००
बॉंबे प्रॉ को. बँक शेअर	–	१२५०
श्री. इचलकरंजीकर, शेअर	–	२०००
		१९२५०

या १९२५० च्या रोख्यांशिवाय रु. ६८०–४–११ रोख आहेत. या एकूण रकमेंत इमारत फंडाचे (रोखे १५०० + रोख २९३-६-१) रु. १७९३-६-१ आहेत. आणि रिझर्व फंडाचे (रोखे २५० + ३८६-१४-१० रोख) रु. ६३६-१४-१० आहेत.

सदर १९२५० चे रोखे इंपी. बँक ऑफ इंडियाकडे सेफ कस्टडीमध्ये आहेत; आणि रोख रकमा त्याच बँकेच्या सेव्हिंग्ज व करंट खात्यांतून ठेवलेले आहेत.

ट्रस्टींचा कारभारी खर्च साधारणपणें चाळीस रुपये सालिना होत आलेला आहे. ऑडिट् केलेले ट्रस्टींचे हिशेब वर नमूद केल्याप्रमाणे वेळोवेळीं म. सा. पत्रिकेच्या द्वारा प्रसिद्ध झालेले आहेत.

(७) ही झाली ट्रस्टफंडाची कथा. आता म. सा. परिषद्-कचेरी हिशेबाची पुढील माहिती पाहूं. वर कलम २ मध्ये १९२५ च्या अखेरपर्यंत आपण आलों. त्यापुढील जमाखर्च 'पुनर्घटनसमिती'ने जे उपलब्ध झाले त्या साहित्याचे आधारें तयार करविले ते ता. २७ डिसेंबर १९३२ रोजीं कोल्हापुरास भरलेल्या परिषदेच्या साधारण सभेने संमत करून घेतले [पुनर्घटनासमिति–पत्रिका वर्ष ५/२।३ पृ.२०ते२४ आणि 'परिषद्वार्ता', म. सा. प. वर्ष ५/

२।३ पृ. ७७/२११). म. सा. परिषद् कचेरीकडून पुढे दिल्याप्रमाणे रीतसर हिशेब यापुढे सालोसाल प्रसिद्ध झाले आहेत. हे हिशेब नियमांप्रमाणे हिशेबतपासनीसांकडून तपासवून घेऊन म. सा. परिषदेच्या साधारण सभेपुढे ठेऊन संमत झालेले आहेत. ते येणेंप्रमाणे:—

(अ)	ता. १ जानेवारी १९३२ ते मार्च १९३३	= म.सा.प. वर्ष ७।३, तळ पृ. २९५-९६
(आ)	एप्रिल १९३३ ते मार्च १९३४	= ,, ,, ,, ७।४, तळ पृ.३५४-३५५
(इ)	एप्रिल १९३४ ते मार्च १९३५	= ,, ,, ,, ८।२, तळ पृ.५५०-५५३
(ई)	एप्रिल १९३५ ते मार्च १९३६	= ,, ,, ,, ९।१-२, पृ. ४४ ते ४८
(उ)	एप्रिल १९३६ ते मार्च १९३७	= ,, ,, ,, १०।२, पृ. ४१ ते ४३
(ऊ)	एप्रिल १९३७ ते डिसेंबर १९३७	= ,, ,, ,, ११।२, पृ. ११७-११८
(ऋ)	१९३८ (जानेवारी-डिसेंबर)	= ,, ,, ,, १२।३, पृ. ८८-९०
(ॠ)	१९३९ ,,	= ,, ,, ,, १३।२, पृ. १४७-१४९
(ऌ)	१९४० ,,	= ,, ,, ,, १४।२, पृ. १०२-१०४
(ॡ)	१९४१ ,,	= ,, ,, ,, १५।२, पृ. २१९-२२१
(अं)*	१९४२ ,,	= ,, ,, ,, १६।२, पृ. १७१-१७३

म. सा. परिषदेच्या जमाखर्चाचे अलीकडील तीन वर्षांचे हिशेबी आंकडे पाहून स्थूल मानाने आयव्ययाची कल्पना येण्यासाठी पुढील कोष्टक उपयोगी पडेल.

आय		व्यय	
समासद वर्गणी	१७००	कचेरी	१०००
म. सा. पत्रिका वर्गणी	१००	म. सा. पत्रिका	२१००
संलग्नसंस्था	७५	परीक्षा	१६०
ग्रंथविक्री	९०	संमेलन खर्च	५०
व्याज (ट्रस्ट व इतर)	७६०	संमेलन ठराव बजावणी	७०
	७०	शाखासभा	१२०
परीक्षा	५५०	प्रवास	८०
संमेलन देणगी	२००	इतर	७०
किरकोळ	५५		
	३६००		३६५०

हे स्थूल आंकडे आणि प्रत्यक्ष प्रसिद्ध झालेले हिशेब यांची तुलना करून पाहिल्यास आयव्ययाची तोंडमिळवणी कटाकटीनेच करावी लागत आहे असें दिसतें. आयहि वाढत आहे आणि व्ययहि वाढत आहे हीं दोन्ही चिन्हें वर्धमान प्रगतीचींच स्पष्ट गमकें आहेत.

आयाच्या बाजूला तहाहयात समासदांचा आंकडा धरलेला नाही; आणि इमारत-देणग्यांचा व खर्चाचाहि समावेश नित्याच्या आयव्ययांत न मोडणारा म्हणून वगळला आहे.

येथवर एक ट्रस्टफंड म्हणजे स्थिरनिधि आणि दुसरा वार्षिक आयव्यय यांची आंकडे-वार माहिती दिली.

* हे अद्यापि साधारण सभेकडून मंजूर व्हावयाचे आहेत.

(८) परिषदेच्या स्थिरनिधीखेरीज परिषदेची स्थावर मालमत्ताहि आता गणण्याजोगी झाली आहे. परिषदेच्या सत्तेच्या मंदिराचे दोन विभाग आहेत. पैकी पहिल्या विभागाचा खर्च रु. ७८८६-८-६ आणि दुसऱ्या 'माधवराव पटवर्धन साहित्य मंदिर' या विभागाचा खर्च रु. २१११०-१-० असा झालेला आहे. यापैकी पटवर्धन स्मारकसमितीकडून रु. १०२९३-४-० देणगी म्हणून आलेले असून आणखीहि कांही देणगी जमवून मिळणार आहे. परिषदेच्या इमारतनिधींतून रु. ३०१९ मिळालेले आहेत आणि उरलेल्या फेडीसाठी रु. ९२०० चें कर्ज उभारलेलें आहे.

याव्यतिरिक्त परिषदेजवळ जें सामानसुमान आहे त्यासाठी परिषदेने रु. १३०४-८-९ खर्चिलेले आहेत. याखेरीज हरि नारायण आपटे ग्रंथालयांत १००० ग्रंथ आहेत आणि म. सा. पत्रिकेच्या मागील अंकांचे गठ्ठेहि आहेत.

असा हा म. सा. परिषदेच्या आर्थिक वस्तुस्थितीचा आढावा या परिशिष्टांत संकलित करून दिला आहे.

परिशिष्ट २४ वें

वर्गीकृत ठराव

[टीप:—मागील संदर्भ परिशिष्ट ९ व १८ पाहा. साधनविभाग पृ. १०९ वर सूचित केल्याप्रमाणे ही पुरवणी दिली आहे. आता वर्गीकृत ठराव **समाप्त**. परिशिष्ट ८ पुरवणी यांत एकूण ३६१ ठरावांचें तेरीज दिलें आहे.]

(३५६) [१] चालू महाराष्ट्र साहित्य संमेलनांत होणाऱ्या ठरावांची योग्य कार्यवाही व्हावी याकरिता पांच सभासदांचें कार्यकारी मंडळ निवडावें व मंडळाने आपण केलेल्या कार्याचा वृत्तान्त पुढील संमेलनांत सादर करावा.

मंडळांतील सभासद:—	
श्री. मा. श्री. अणे, अध्यक्ष,	श्री. चिं. वि. वैद्य
सरदार चं. सं आंग्रे, (कार्यवाह)	डॉ. आपटे
	श्री. धुळेकर, झांशी (२४, ग्वाल्हेर १९२८)

(३५७) [६] (अ) महाराष्ट्रांत दुय्यम शिक्षण देतांना इंग्रजीशिवाय इतर सर्व विषय मराठींतून शिकविण्यांत यावे.

(आ) महाराष्ट्रांतील महाविद्यालयांतून इंग्रजीशिवाय इतर सर्व विषय मराठींतून शिकविण्यास शक्य तेथे एकदम प्रारंभ करावा.

(इ) प्रश्नपत्रिका व उत्तरेंहि मराठींतून देण्यांत यावीं.

(२२, ग्वाल्हेर १९२८)

(३५८) [८] सरकारजमा झालेल्या मराठी पुस्तकांतील वाङ्मयदृष्ट्या बहुमोल असलेल्या कांही निवडक पुस्तकांच्या पुनर्मुद्रणास सरकारी अनुज्ञा मिळावी याविषयी संमेलनाच्या वतीने मध्यप्रांत व मुंबई सरकारास विनंती करण्यांत यावी. त्यांपैकी कांही पुस्तकें :—

निबंधमालेंतील "सद्य:स्थिति"*

---

* वर्गीकृत ठराव क्र. १३० चा खुलासा परिशिष्ट ९, पृष्ठ ७८ वर पाहा. —सं.

माझिनीचें चरित्र–(सावरकर कृत)
काळांतील निबंध–भाग १ ते ४
रामदासीबोवा–(पांगारकरकृत) (२०, ग्वाल्हेर १९२८)

(३५९) [१०] श्री माधव मराठी वाङ्मय मंडळ, ग्वाल्हेर, या संस्थेने मराठ्यांच्या इतिहास संशोधनाचें जें स्तुत्य कार्य आपल्या शिरावर घेतलें आहे त्यास योग्य तें साहाय्य करावें अशी इतिहासप्रसिद्ध ग्वाल्हेर दरबारला ही सभा विनंती करते. (२३, ग्वाल्हेर १९२८)

(३६०) [१९] बाराव्या संमेलनांतील पुढील ठराव पुनः मंजूर करण्यांत येत आहेत.

ठराव क्रमांक १५ सरकारने ग्रंथसंग्रहालय करण्याबद्दल.
,, ,, ११ पोस्टखातें व वाङ्मयविकास.
,, ,, २२ अश्लीलवाङ्मयाचा निषेध.
,, ,, २४ दुर्मिळ ग्रंथांचें पुनर्मुद्रण. (२१, ग्वाल्हेर १९२८)

(३६१) [२१] यंदाचें संमेलन ग्वाल्हेर येथे बोलावून तें सर्वतोपरी यशस्वी करण्याचें कार्य श्री. सरदार आंग्रेसाहेब यांनी केले व ग्वाल्हेर दरबारने त्यास सहाय्य केलें यासाठी त्यांचे व दरबारचे हे संमेलन आभार मानतें. (२५, ग्वाल्हेर, १९२८)

टीपः–"मराठी साहित्य संमेलनाचे प्रसंगी इतर देशी भाषांच्या परिषदांना आपले प्रतिनिधि पाठविण्यासाठी विनंती करण्यांत येत आहे" (१३ द. हैदराबाद, म. सा. पत्रिका वर्ष ४ अंक १।२ इ. स. १९३१)

हैदराबाद सं. अहवालांत १३ ठराव दिलेले आहेत आणि दुखवट्याच्या ठरावाचा निराळा उल्लेख आहे; परंतु म. सा. पत्रिकेंतील हैदराबाद ठराव-यादी १६ ठरावांची आहे. ठरावांची भाषाहि दोहीकडील यादींत सर्वत्रच एकसारखी नाही. असो. पत्रिका-यादीप्रमाणे अधिक येणारे ठरावांपैकी एक ठराव वर्गीकृत २५६ हा होय (परिशिष्ट ९, खुलासाहि पाहा.) आणि आता येथे दिला आहे तो दुसरा. या ठरावाचा येणारा १३ वा क्रमांक पत्रिकेंत नीट छापलेला नाही. हा ठराव वर्गीकृत केल्यास एकंदर ठराव ३६१ ऐवजी ३६२ होतील.

परिशिष्ट २५ वें

माधवराव पटवर्धन स्मारक समिति

समितीचे सभासद— अध्यक्ष– श्री. न. चिं. केळकर. खजिनदार– रा. सा. र. लु. जोशी. चिटणीस– रा. सा. र. लु. जोशी, श्री. वि. द. घाटे, प्रा. शं. के. कानेटकर, श्री. गो. ग. तळवलकर, डॉ. अ. ना. भालेराव. सभासद– प्रि. ध. रा. गाडगीळ, आचार्य प्र. के. अत्रे, प्रा. श्री. बा. रानडे, श्री. गं. बा. गरूड, श्री. द. ल. गोखले, श्री. य. दि. पेंढरकर, श्री. मो. ज्ञा. शहाणे, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, प्रा. द. वा. पोतदार.

वरील नांवाच्या समितीचा अनेकवार उल्लेख या ग्रंथांत करावा लागला आहे. ही समिति परिषद् किंवा संमेलन यांपैकी कोणींहि नेमली नसली तरी म. सा. परिषदेशीं तिचा इतका निकट संबंध आला आहे की, ही समिति परिषदेशीं एकजीव झाल्यासारखी वाटावी.

माधवराव पटवर्धन ता. २९ नोव्हेंबर १९३९ त वारले आणि ५ डिसेंबर १९३९ ला जी दुखवट्याची जाहीर सभा पुण्यांत भरविण्यांत आली त्या सभेने वरील समितीची स्थापना केली.

हरिभाऊ आपटे किंवा केतकर वगैरेंच्या मृत्यूनंतरहि अशाच समित्या स्थापन झाल्या होत्या, परंतु विशेष फळ हातीं लागलें नाही. हरिभाऊ आपटे यांचा स्मारकनिधि ५०० रु. झाला तो परिषदेने व्याजीं लावून दरसाल प्रसिद्ध होणाऱ्या मराठी कादंबऱ्यांत जी सर्वोत्कृष्ट ठरेल तिच्या कर्त्यास एक 'सन्मानपदक' देण्याचा ठरावहि कार्यकारी मंडळाने केला (वि. ज्ञा. विस्तार, व. ५६, अं. ५, मे १९२५ (मलपृष्ठ)). त्याप्रमाणे रक्कम ट्रस्टींकडे जमा आहे. मात्र पदकाचा कोठे पत्ता दिसत नाही ! केतकरांचें स्मारक अद्यापि कांहींच आकारास आलें नाही !

असा पूर्वीचा अनुभव असतां माधवराव भाग्यशाली म्हटले पाहिजेत की त्यांच्या स्मारकसमितीने आपल्या योजनेच्या सिद्धीत कल्पनातीत यश मिळवून दाखविलें ! याचें सर्व श्रेय रा. विठ्ठलराव घाटे आणि रावसा. र. लु. जोशी यांचेकडेच दिलें पाहिजे.

समितीने प्रथम स्मारकयोजना तयार केली. त्यांत माधवरावांचें प्रसिद्धाप्रसिद्ध गद्य लिखाण प्रकाशित करणें, त्यांचें तैलचित्र लावणें, एक संदर्भग्रंथालय स्थापणें आणि एक सभागृह उभारणें अशीं कामें योजिलीं आणि सभागृहाचें काम प्रथम हातीं घेण्याचें ठरविलें. आधी सभागृहाचा अंदाज दहा हजारांचा धरून स्मारकसमितीने सात हजार जमवून देण्याचें आणि ती देणगी म. सा. परिषदेकडे देऊन 'माधवराव साहित्य सभागृह' बांधवून घेण्याचें ठरविलें. पुढे नकाशा पक्का तयार झाल्यावर या युद्धकाळांत सभागृहाचा अंदाज सतरा हजारांवर गेला. तेव्हा स्मारकसमितीने आणखी सात हजार म्हणजे एकूण चौदा हजार रुपये जमवून देण्याचा संकल्प परिषदेस कळविला. आता हें सभागृह—ज्यास 'माधवराव पटवर्धन साहित्य मंदिर' असें नांव देण्याचें ठरलें – उभें झालें असून त्याचा खर्च रु. २१११०–१–० झाला आहे. पैकी स्मारकसमितीने आतापावेतो रु. १०२९३–४–० इतकी रक्कम परिषदेकडे जमवून दिली आहे. अद्यापि समितीचें काम पुढे चालावयाचें आहे.

समितीने ही रक्कम जमविण्यासाठी काव्यगायनाचे, नाटकाचे वगैरे प्रयोग घडवून आणले; 'माधवरावस्मृतिप्रसाद' छापून त्याची विक्री विद्यार्थ्यांतून केली; आणि देणग्या मिळविल्या. देणगीदारांस म. सा. परिषदेचे सभासद मोबदल्यांत करून घेण्याचें परिषदेने मान्य केलें.

श्रीमंत महाराज तुकोजीराव यांनी दहा हजार रुपये परिषदेस दिले आणि या समितीने आताच दहा हजाराहून अधिक मदत मिळवून दिली ! स्मारकसमितीने आपलें कार्य अत्यंत जोमाने व कळकळीने केलें आणि माधवरावांचें नांव म. सा. परिषदेशीं निरंतरचें संबद्ध करून टाकलें ! म. सा. परिषदेला अशा सुरुचिर मंदिराची जोड मिळवून देण्यास मुख्यतः स्मारक-समितीच कारण झाली. समितीस द्यावे तेवढे धन्यवाद थोडेच होतील !

परिशिष्ट २६ वें

संदर्भ-साहित्य

प्रस्तुत इतिहासांत जागजागीं आधार नमूद केलेले आहेत. तथापि त्यांची संकलित यादी दिली असतां उपयुक्त होईल असें वाटल्यावरून पुढील यादी दिली आहे :—

(१) ज्ञानप्रकाश, ता. ७ फेब्रुवारी १८७८ इ. स. मधील **'नोटिस'**— साधन-विभाग पृ. १.

(२) कै. वामन बाळकृष्ण रानडे यांची रोजनिशी—साधनविभाग पृ. ८४; पृ. ९४.

(३) कै. दादासाहेब करंदीकर रोजनिशी— साधनविभाग पृ. ७९ ते ८१ व पृ. ९३

(४) कै. परांजपे यांची रोजनिशी— साधनविभाग पृ. ९३.

(५) ज्ञानप्रकाशमधील उताऱ्यांचीं टांचणें (श्री. शं. मुजुमदार)— साधनविभाग पृ. ९४।९५.

(६) केसरी— साधनविभाग पृ. २, ११ ते २१; पृ. ८१, ८२, ८३, ९५.

(७) महाराष्ट्र-साहित्य पत्रिका— जुनी (विविधज्ञानविस्तारास जोडून निघणारी). इ. स. १९१३ ते १९२५.

(८) महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका— नवी; पुनर्घटना-समिति वृत्तान्त व पु. घ. स. वृत्तान्त व अहवाल; परिषद्वार्ता— १९२८ ते १९४३.

(९) महाराष्ट्र-साहित्य-परिषद्— ट्रस्ट फंड— इ. स. १९३४-३५ चा हिशेब आणि परिषदेच्या सभासदांस पाठविलेलें पत्र (दा. ग. पाध्ये—इ. स. १९३५). परिशिष्ट २३ वें.

(१०) म. सा. परिषद्— अहवाल, इ. स. १९२१-२५ व परिशिष्ट (अ)— म. सा. परिषद् हकीकत स्थापनेपासून सन १९२० अखेर—वृत्तविभाग पृ. ४।५।७. परिशिष्ट २३ वें.

(११) विविधज्ञानविस्तार— (१) पुस्तक ४४ वें । २ इ.स. १९१३. वृत्त वि. पृ. ११.
(२) वर्ष ५४।११ ,, पृ. २४.
(३) वर्ष ५६।५ — १९२५ मलपृष्ठ—साधनवि. पृ. १२७.

(१२) म. सा. परिषदेच्या वेळोवेळींच्या उपलब्ध घटना— वृत्तविभाग पृ. १२.

(१३) अध्यक्ष— नगर नाशिक वाङ्मयोपासक संमेलन— भाषण (रावब. दा. ग. पाध्ये, इ. स. १९२८) वृत्तविभाग पृ. २४.

(१४) गतगोष्टी (न. चिं. केळकर) — साधनविभाग पृ. ९३ व वृत्त वि. पृ. २९.

(१५) रानडे चरित्र (न. र. फाटक)— साधनविभाग पृ. १।२.

(१६) मराठी ग्रंथकार मंडळींची सभा— (वा. बा. रानडे— इ. स. १८८५च्या सभेचें वृत्त)— साधनविभाग पृ. ३-९.

(१७) म. साहित्य संमेलनांचे* अहवाल — इ. स. १९०९ ते १९४२.

(१८) रा. सप्रे (१९४१) महाराष्ट्राच्या रा. उत्कर्षाची वि. विधायक योजना—पार्श्वभूमि वृत्त वि. पृ. ३५.

———

*एकूण २१ पुस्तकें.—परिशिष्ट ८।९।१८।२४ इ.

दुरुस्ती–पुस्ती

अनुक्रमणिका — पृ २ (१५) यांतील इ. स. १९४०-४१ ऐवजी १९४०-४२.

भूमिका

असें पाहिजे	असें पाहिजे
पृ. ४– खालून ५ वी ओळ — ९२ ऐवजीं १९१२	पृ. ६– शेवटची ओळ — ग्रंथाचे ऐ. च्या

वृत्तविभाग

पृ. ४– खालून ५ वी ओळ—आषाढ शु. इ. ऐवजीं "चैत्र शु. १ १८५०, ता. २२ मार्च १९२८"

पृ. ९– खालून १३ वी ओळ—वि.वि.च्या पुढे "म.सा. पत्रिका, जुनी, पृ. ८०"

पृ. ११– वरून ५ वी ओळ—१४ ऐ. १६

पृ. १६– वरून १४ वी ओळ—१९२७ ला ऐ. ची

पृ. १९– वरून १० वी ओळ—अंक ३ ऐ. ४

पृ. २१– वरून १७ वी ओळ—नगर लं. ऐ. सं.

पृ. २६–वरून ७ वी ओळ—वि. लि. ऐ. वि .वि.

पृ. २६–वरून २० वी ओळ— उक्षयतांच्या ऐवजी उभयतांच्या

पृ. २८– वरून १९ वी ओळ—होण्याजोगा ऐ. गी

पृ. २८– वरून २६ वी ओळ—पदाधिष्ठित हा शब्द गाळावा व्यक्तीची ऐ. व्यक्तींची

,, २७ वी ओळ—मंडळीनीहि ऐ. मंडळीनी हीं

खालून २ री ओळ—ते हा शब्द गाळावा

पृ. २९– वरून ७ वी ओळ—आणि हा शब्द गाळावा

पृ. २९– तळटीप, ओळ २ री—पृ. १० ऐ. पृ. २२

पृ. ३३– वरून ६ वी ओळ—'निवेदन'च्या पुढे कंसांत 'वर्गीकृत ३४२' हे शब्द घालावे.

साधनविभाग


पृ. ३४, परिशिष्ट ९ वें—मथळ्यांतील वर्षनिर्देशांत १९१५ ऐवजीं १९०९ वाचावें

पृ. ७३, (२६०)—मायकवाड ऐवजीं गायकवाड

पृ.७८, वरून ५ वी ओळ–क्रमांक ९ ऐ. ५

असें पाहिजे	
पृ. ९२, मथळा--(इ.स.१९४०-४१)ऐ.	(इ.स. १९४०-४२)
पृ. ९३, मथळा--[ ] या कंसांतील मजकूर पुढीलप्रमाणे	वाचावा. [साधनविभाग परिशिष्ट ३रें व १० वें]
पृ. १०९, वरून ६ वी ओळ—	(परिशिष्ट २४ वें पाहा)
पृ. १११, वरून १ली ओळ—जांभेकर	० मधील १९६३ ऐवजीं १९३६

असें पाहिजे	
पृ. १२०, परिभाषा चर्चा मंडळ—नांवांत	डॉ. दि. धों. परांजपे ऐ. डॉ. दि. धों. कर्वे
पृ. १२४, वरून ४ थी ओळ—वर्ष ७—३	ऐ. वर्ष ७—२
पृ. १२६, परिशिष्ट २५ वें—	माधवराव प. स्मा. समितींत पुढील चार नांवें अधिक पाहिजेत : प्रा. वा. म. जोशी श्री. के. ना. काळे श्री. शं. वा. किर्लोस्कर सौ. गंगुबाई पटवर्धन



REFBK-0006414